मा. १३०

मराठी ग्रंथ संग्रहालय, ठाणें.
(जिल्हा वाचनालय)


मासिकाचे नांव — शालापत्रक

संपादक —

मासिक क्रमांक — सन — १९२३.

अंक —

(महिने) १ ते १२



मराठी ग्रंथ संग्रहालय, ठाणे

वा·मा·३५३८

REGISTERED B. NO. 179.




पुस्तक ३४. जानेवारी सन १९२३. अंक १.

| विषय. | पृष्ठ. |
| --- | --- |
| प्राथमिक शिक्षणाची रूपरेखा. .... .... .... .... | १ |
| विचार करा. .... .... .... .... | ८ |
| सिंही आणि तिचे छावे. .... .... .... .... | ९ |
| चरख्याची थोरवी. .... .... .... .... | १० |
| गिरिजा. .... .... .... .... | ११ |
| ईश्वर जें काय करितो तें चांगल्याकरितां करीत असतो .... .... | १२ |
| "कन्हैयालाल दत्त." .... .... .... .... | १३ |
| तीळ-गूळ घ्या! आणि गोड बोला. .... .... .... .... | १५ |
| एक गमतीचा खेळ. .... .... .... .... | १७ |
| हातचें सोडून पळत्याच्या पाठीं. .... .... .... .... | १९ |
| शालापत्रकाची चढाओढ. .... .... .... .... | २० |

मुद्रक व प्रकाशक—रा. रा. शंकर नरहर जोशी, चित्रशाळा प्रेस, १०२६ सदाशिव पेठ पुणे सिटी

# रंगीत इसाप-नीति.

यांत एकंदर इसापनीतींतील आठ अगदीं सोप्या गोष्टी मोठ्या व जाड टाइपांत दिलेल्या असून प्रत्येक गोष्टीसमोर त्यांतील रहस्य दाखविणारें रंगीत सुंदर चित्र दिलेलें आहे. चित्रें पाहूनच मुलांना गोष्टींतील तात्पर्य कळतें. किं० ८६. ट. ह. ८८६.

# सचित्र इसाप-नीति.

[ उत्तरार्ध. ]

[ नवीन भाषांतर भाग २ रा. ]

वरीलप्रमाणेंच हा दुसरा भाग विक्रीस तयार आहे. याचीं सुमारें ३०० पानें असून यांत ३५० गोष्टी आहेत. चित्रांची संख्या १५० पर्यंत आहे. किं. १८४

दोन्ही भाग एके ठिकाणीं बांधलेलें सुंदर पुस्तक किं० रु. २

# विद्यार्थ्यांकरितां नाटिका.

शीलं परं भूषणम्.

ही नाटिका प्रसिद्ध कवि-शिरोमणि नारायण वामन टिळक यांनीं केवळ लहान मुलांकरितां लिहिलेली आहे. यांत शृंगाररस मुळींच नाहीं एवढेंच नव्हे, तर स्त्रीची भूमिका या नाटकांत आणलेलीच नाहीं. शिवाय नाटकाचा विषय नैतिक विचारानें पूर्ण भरलेला असल्यामुळें शाळांतून वार्षिक संमेलनाचे वेळीं मुलांकडून या नाटकाचा प्रयोग करविण्यास तें योग्य आहे. ना[illegible] धनाची योग्यता जास्त किंवा ज्ञानाची योग्यता जास्त हा आहे. पुस्तकांत [illegible]र चित्रें कथानकास अनुसरून दिलेलीं आहेत; किं० ८४.

म्यानेजर--चित्रशाळा प्रेस, पुणें.

---

# चिमुकलें भारत व रामायण.

महाभारत व रामायण हे आपले राष्ट्रीय ग्रंथ आहेत. यांत आपला प्राचीन इतिहास असून प्रपंच साधून परमार्थ कसा जोडावा हें उत्तम दाखविलें आहे. व्यावहारिक बोधाच्या ह्या केवळ खाणी आहेत. आबालवृद्ध स्त्री-पुरुषांना या ग्रंथांचें ज्ञान होणें अगत्याचें आहे. प्रौढांकरितां आमचीं लोकप्रिय ' भारती युद्ध ' व ' रामचरित्र ' हीं पुस्तकें आहेत. आतां बारातेरा वर्षांच्या मुलांमुलींकरितां ' चिमुकलें भारत ' व ' चिमुकलें रामायण ' हीं दोन पुस्तकें अनुक्रमें आम्हीं रामकृष्णवाक्सुधेचे प्रसिद्ध लेखक रा. कृष्णाजी गोविंद किनरे व रा. विद्याधर वामन भिडे बी. ए. यांजकडून मुद्दाम लिहविलीं आहेत. पुस्तकाची भाषा फारच मोहक व सोपी आहे. वाचतांवाचतांच मुलांच्या मनावर त्यांतील रहस्य ठसावें म्हणून उपदेशपर वाक्यें जाड टाइपांत घातलीं आहेत आणि कथानकांच्या अनुरोधानें हाफटोन प्रोसेसनें तयार केलेलीं भारतांत आ[illegible] व रामायणांत सात अशीं सुंदर चित्रें घातलीं आहेत. भारताचीं पृष्ठें १७२ व रामायणाचीं पृष्ठें ८२ छपाई बांधणी सुबक. किं० ८६, व रामायण किं० ८४.

मिळण्याचें ठिकाण—म्यानेजर चित्रशाळा प्रेस, पुणें शहर.

सामा ३५३५

# मराठी शालापत्रक

येथें शब्द नाहीं शिष्यासी । हें अवघें सद्गुरूपाशीं ।
सद्गुरु पालटी अवगुणांसी । नाना यत्नें करोनी ॥
जें कांहीं आपणास ठावें । तें हळु हळु शिकवावें
शहाणें करून सोडावें । सकळा जनां ॥ १ ॥

रामदास.

पुस्तक ३४. जानेवारी सन १९२३. अंक १

## प्राथमिक शिक्षणाची रूपरेखा.

मागील अंकावरून समाप्त.

(१) इन्फंट व पहिल्या इयत्तामध्यें तसेच वरील वर्गासाठीं अभ्यासक्रमामध्यें जी उजळणीची वांटणी केली आहे ती योग्य आहे. पहिल्या इयत्तेला संख्या १००,०० पर्यंत लिहितां येणेंही ठीक आहे. (२) दुसऱ्या इयत्तेला अभ्यासपत्रकामध्यें साधी बेरीज, वजाबाकी, गुणाकार, भागाकार असतां परीक्षक त्यांच्यांवरून होणारीं सोपीं उदाहरणें म्हणून विनाकारण अवघड उदाहरणें घालतात व शिक्षकवर्गही विद्यार्थ्यांस वर्षभर असलीं गणितें शिकवून त्रास नात. त्यायोगें त्यांच्यांवर ताण पडून ते निसत्व होतात. म्हणून ह्या गोष्टीला प्रत्यक्ष अथवा अप्रत्यक्ष कारण परीक्षकच होतात.

(३) यापुढें बेरीज, वजाबाकी, गुणाकार, भागाकार ( साधा ) यावरून होणारीं फक्त एकेरी गणितें घालावीं. दोहोंचीही मिसळ त्यांत असूं नये. अशा रीतीनें गणितांचा ३ इयत्तेपर्यंतचा कार्यक्रम:—

इन्फंट:—( १०० अंक, दहा पाडे, दहापर्यंत तोंडी बेरीज, वजाबाकी, दहापर्यंत बेरीज वजाबाकीचे फक्त हिशेब.) इ० १ ली:—[ १००,०० पर्यंत संख्या लिहिणें, वाचणें=यांत स्थानांचा घोटाळा फार असूं नये=तिसापर्यंत पाडे, पावकी, निमकी, दिडकी, अडीचकी. चलनी नाण्यांच्या कोष्टकाची माहिती, एकंपरिमाणाची किंमत देऊन झालेल्या उजळणीवरील हिशेब. ]

इ० २ री:—दशकोटीपर्यंत संख्या लिहिणें, वाचणें (यांत ३। लक्ष, ५॥ हजार, साडसातशें पस्तीस असली संख्या असूं नये), पाऊणकी, सवायकी, आणे ही उजळणी; [टाक, शेर, मण, ही उजळणी या वर्गांत नको ].

साधीं बेरीज, वजाबाकी, गुणाकार, भागाकार, पैशाचे व उजळणीचे साधे हिशेब.

इ० ३ रीः—ह्या वर्गात आल्यावरील उजळणी शिकवावी. रेघी बेरीज वजावाकी, चढती उतरती भांजणी, फक्त आपल्या भागांत चालणारीं वजनमापें यांचीं कोष्टकें यांसह, ह्यांचीच ( विविध ) बेरीज वजाबाकी गुणाकार भागाकार साधा. हिशेब—कोष्टकें व उजळणी यांवरून होणारे साधे.

आतांपर्यंत गणितामध्यें छाटाछाट फारच अल्प प्रमाणानें केली आहे. तेथून पुढें त्याला मोठाच छाट देण्याचें योजिलें आहे; कारण अंकगणिताचा खरा त्रासदायक निरर्थक असा भाग येथूनच पुढें आहे.

इ० ४ थीः—व्यवहाराला सदैव जरूर अशींच इंग्रजी कोष्टकें [अवार्ड्डु पाइस, त्रायवेट, त्रायभ्रन अशा प्रकारचीं कोष्टकें घोकून मुळींच कालक्षेप करूं नये. त्यांचा खरोखर अर्थ मुळींच मोठेपणींही समजत नाहीं. ] व्यवहारी अपुर्णांक व त्यांचीं संक्षिप्त कृत्यें सर्व; पण त्यांतही चे, ÷, ×, असले संबंध मुळींच भानगडीचे असू नयेत. एकादा संबंध फार तर समजला आहे कीं नाहीं हें पाहण्यास असावा. हिस्सेरशी नकोच नको. त्रैराशिकाचीं एकेरी सोपीं उदाहरणें; मागें झालेली बेरीज, वजाबाकी, गुणाकार, भागाकार, यांवरून होणारीं सोपीं उदाहरणें.

[ उदाहरणें सोपीं म्हणण्याचें कारण याच्या बाहेर जगांतील उदाहरण नाहीं. कित्येक प्रसंगीं अधिकारी, मुलांना उदाहरणें घालतात व तें अवघड असतें—जरी तें त्रैराशिकांनींच सुटलें तरी अवघडपणा कोठें जात नाहीं. असें उदाहरण आलें नाहीं म्हणजे शिक्षकावर ताशेरा उडतोच. त्यांतून एकाद्या अधिकाऱ्याला एकाद्या शिक्षकाची खोडच काढावयाची असली तर मग विचारूंच नका. ] असो. पुढें एकमान पद्धति, सारखळरीति यांची जरूर नाहीं. दृढभाजक व लघुतम यांचीं सोपीं उदाहरणेंसुद्धां या वर्गांत घेण्याचें प्रयोजन नाहीं. सरळव्याजसुद्धां या वर्गांत नको. कारण व्याजाची कल्पना या वर्गामध्यें येणें कठिण जाईल, म्हणून व्याज हें प्रकरण इ० ५ वी मध्यें शिकवावें. व्यवहार व गणित यांची फारकत असूं नये. हिशेब—व्यवहाराला लागणाऱ्या जरूरीच्या चालीवरून होणारे, पण यांत किरकोळ माल घेणें देणें व एकदम घेणें देणें हा व्यवहारांतील फरक मुलांच्या लक्षांत आणून द्यावा. येथून पुढें व्यवहारांतील सर्व हिशेब समजेल येवढीच रचना असावी.

इ० ५ वीः—पंचराशिक व बहुराशिक यांवरून होणारीं सोपीं उदाहरणें; काळ, काम, वेग यांचीं साधारणतः व्यवहाराला उपयोगी पडतील अशीं सोपीं उदाहरणें ( हीं चौथ्या इयत्तेंत मुळींच घेऊं नयेत; कारण तीं व्यस्त प्रमाणामध्यें असतात. ); दशांश अपूर्णांकाची समजूत सर्व कृत्यांसह; सरासरी व शेंकडा नफा तोटा कसा काढावा तें फक्त साध्या उदाहरणांनीं शिकवावें; सरळ व्याजाचें प्रकरण ह्या इयत्तेंत घ्यावें; पण त्या गणितांत एकापेक्षां ज्यास्त अव्यक्तें असूं नयेत. व्यवहारामध्यें अशीं अव्यक्तें कधींही नसतात. इतकेंच नव्हे तर व्याजाचा दर काढावयाचा प्रसंग व्यवहारांत फारसा कधीं येत नाहीं.

इ० ६ वीः—चक्रवाढव्याजाचें प्रकरण, पण यांत दर काढावयाची भानगड कोणत्याही वर्गांत असूं नये. यांतही एकच अव्यक्त असावें. कटमुदतीचें प्रकरण हें सातव्या इयत्तेस घ्यावें. हुंडीची पुरी माहिती झाल्याविना वटावली व हुंडी घेतली, मुदतीच्या पलीकडे येणें राहिली ही भानगड नको. या वर्गांत नफातोटा प्रकरणाचीं साधीं गणितें, सरकत वाटणीचीं साधीं गणितें ( व्यवहाराला अनुसरून कच्चयावरून होणारीं सुद्धां ), महत्त्वमापनांपैकीं या वर्गांत रेषामापन हा भाग घ्यावा. त्याला वर्गमूळ हा अंकगणितांतील भाग जरूर असल्यामुळें तो घ्यावा;

पण वर्गमूळावरून होणारीं अन्यगणितें कधींच शिकवूं नयेत.

इ० ७वी:—या वर्गांत कटमुदतीचीं उदाहरणें वर सांगितल्याप्रमाणें, ठेवीची सामान्य माहिती ( ठेव म्हणजे काय, तिचा भाव वाढतो म्हणजे काय, सारांश, शेअर्ससंबंधीं व्यवहाराला जरूर ती माहिती या वर्गांत मिळावी. ), इतर कांहीं व्यवहारोपयोगी संकीर्ण गणितें, महत्त्वमापन याचा राहिलेला क्षेत्रमापन व घनमापन हा भाग, पण हा संपूर्ण न सांगतां व्यवहारोपयोगी भागाला लागणारा तेवढाच यांतून घ्यावा. लांकडांची कापणी, विहिरींची बांधणी, ओट्यांची रचणी, खड्ड्यांची खणणी, शेत मोजणी, नकाशाची आंखणी वगैरे व्यवहाराची पद्धति सर्व अवगत असावी.

हल्लीं गणितामध्यें बीजपद्धतीनें सुटणारीं पुष्कळ गणितें आहेत. त्यांच्या रीति अंकगणिताच्या व महत्त्वमापनाच्या दोन्हीही पाठ करून ठेवाव्या लागतात. तसेंच, गळका हौद, वाढतें कुरण, घड्याळाचीं गणितें, वयाचीं गणितें असे निरर्थक पुष्कळच भाग गणितामध्यें आहेत व त्यांत निरर्थक कालाचा व्यय होऊन उपयुक्त विषयाकडे वेळ मिळत नाहीं. अशी परिस्थिति होते, तरी सदर भागाला फाटा मिळणें अवश्य आहे.

ह्या अभ्यासक्रमाच्या छोट्याशा निबंधांत जितकें साग्र व स्पष्ट वर्णन यावयास पाहिजे तितकें तें न आल्यामुळें हल्लींच्या गणितांतून ग्राह्यभाग कोणता व अग्राह्य कोणता हें काढतां येणें कठिण आहे. त्यासाठीं अंकगणिताचीं नवींच पुस्तकें लिहिणें इष्ट आहे. हींच पुस्तकें असलीं तर उभयपक्षीं—शिक्षक व परीक्षक— चुका होण्याचा जास्त संभव.

येणेंप्रमाणें प्राथमिक शाळांतील फक्त अंकगणित हा विषय संपला. या क्रमाला खालील वर्गांत आठवड्यांतून ३ तास व वरील वर्गांत दोन तास पुरे होतील. बाकीचे विषय व त्यांच्या तासांची वांटणी आम्ही खालीं देणार आहों; पण त्याबरोबर मुख्य विषय कोणते, पद्धति असून विषयासारखे होऊन बसलेले कोण, ह्यांचा विचारही करणें जरूर आहे.

१ शाळेमध्यें चालत असलेले मुख्य विषय:—

१ गणित ( यांत अंकगणित, तोंडी हिशेब, भूमिति, महत्त्वमापन हे विषय येतात. ), २ जमाखर्च, ३ भाषा, ४ इतिहास भूगोल, ५ शास्त्रीय विषय, ६ लेखन.

२ शाळेंत असलेले किरकोळ विषय:—

किंडरगार्डन, देणग्या वगैरे, ड्रॉइंग, तालीम, गायन, स्लाइड, वस्तुपाठ, गाणीं, गोष्टी, नीतिपाठ.

१ गणित:—या विषयांपैकीं अंकगणित, तोंडी हिशेब व महत्त्वमापन वगैरे असतात. आतां भूमितीसंबंधीं पाहूं. प्राथमिक शिक्षणामध्यें या विषयाला विनाकारण महत्त्व दिलें आहे. त्याचा जेवढा भाग व्यवहाराला अर्थात् महत्त्वमापनाला उपयोगी पडण्यासारखा असेल तेवढा प्रत्यक्ष प्रमाणांच्या दृष्टीनें स्पष्ट करून सांगावा. तसेंच, कृत्यांपैकीं कांहीं कृत्यें व्यवहारोपयोगी आहेत तेवढीं फक्त कृतीनें शिकवावीं, सिद्धतेची आवश्यकता नाहीं. भूमितीचे बीजरूप सिद्धांत प्रत्यक्ष सिद्धतेनें दाखवावें, अनुमानिक सिद्धतेची कटकट नको.

२ जमाखर्च:—हा विषय ५ वीपासून ठेवावा. ५ वीच्या मुलांना फक्त रोख रक्कम जमा करणें, खर्च लिहिणें व शिलक काढणें येवढ्या गोष्टी याव्यात. त्यांना खात्यांची भानगड असूं नये, तथापि खुद्दखातें—पगारखातें, धर्मादाय खातें, दुकानखर्च खातें, उसनवारीच्या संबंधाचीं खातीं हीं मुलांना माहिती असावी. इ० ६ ला व इ० ७ ला मिळून हल्लीं शिकविण्यांत येतो तितका जमाखर्च असावा. मुलगा शाळेंतून बाहेर पडतांच थोड्याच व्यापारी पद्ध-

तीच्या जमाखर्चाच्या शिक्षणानें तो तयार व्हावा. आतां हिंदुस्थानाला व्यापारी जगाबरोबर तोंड द्यावयाचें आहे हें लक्षांत ठेवून ह्या भागाचें शिक्षण ठरवावें.

३ भाषा:—इतर कोणत्याही विषयापेक्षां आम्हीं या विषयाला विशेष महत्त्व देतों. इतकें कीं, इतर कोणताही विषय न येतां जर भाषाविषय पूर्णत्वानें आला तर इतर विषयांची फिकीर नाहीं. सर्वत्र चालू असलेल्या उलाढाली समजण्यास भाषाच कारण आहे. लोक नुसते साक्षर करून सोडून देण्यांत अर्थ नाहीं. तर त्यांना कोणत्याही ग्रंथांतील रहस्य जाणतां आलें पाहिजेच. त्यावर विचार करून आपला त्या संबंधाचा अगर कोणताही विचार लेखनद्वारां किंवा भाषणद्वारां लोकांना सांगतां आला पाहिजे. जातां जातां येवढेंही सांगावेसें वाटतें कीं, यापुढें लोक साक्षर करून सोडून दिले तर त्यांना वाचण्याची संवय कायम रहावी म्हणून त्यांची विचारपरंपरा टिकावी म्हणून त्यांना तशा प्रकारचीं पुस्तकें पुरविलीं पाहिजेत.

शिक्षणबोर्डानें साधारण मोठ्या टाइपांचीं ६।७ पानांचीं नीतीच्या पण मनोरंजक गोष्टींनीं भरलेलीं पुस्तकें छापवून तीं मोफत अगर पाव आणा किंमतीनें खेडोंपाडीं विकण्याला पाठविलीं पाहिजेत. अशीं पुस्तकें वरचेवर छापवावीं. महिन्यांतून कमीत कमी दोन वेळांत तरी पुस्तकें निरनिराळीं वाटलीं पाहिजेत. या पुस्तकांत चित्रांचीही भर असावी. सारांश, शक्य तितक्या परीनें लोकांनीं पुस्तकें घ्यावींत अशाच प्रकारनें पुस्तकें तयार करावीं. हा खर्च सोसण्यासारखी परिस्थिति बोर्डानें करून घ्यावी. अशा रीतीनें उपक्रम केला तर शिकलेले लोक शेतकीच्या कामाला लागले म्हणजे जें शिक्षण विसरून फिरून कोरे होतात ते होणार नाहींत. या गोष्टीचा सुज्ञांनीं नीट विचार करावा.

वर सांगितल्याप्रमाणें भाषा विषयामध्यें पूर्णत्व होण्यास प्रथमपासून मुलाला तशा अवस्थांतूनच चालविणें योग्य असल्यामुळें तसा अभ्यासक्रम आंखून त्यांत भाषा विषयाला मुबलक वेळ दिला पाहिजे. त्यासाठीं क्रमिक व इतर पुस्तकें अभ्यासक्रमांत दाखल केलीं पाहिजेत. अशा रीतीनें केल्यास फक्त साक्षर न राहतां त्यांच्या बुद्धिमत्तेची विशेष वाढ झाल्याखेरीज राहणार नाहीं. हल्लींही शाळांमधून मुलें भाषा विषयामध्यें कच्चीं राहतात. याचें कारण विषयांचें अनेकत्व हें तर खास. मुलगा अनेक विषयांत गुंड व्हावा हें जरी खरें; तरी इच्छाशक्ति अनेक ठिकाणीं विभागल्यामुळें सूर्यकिरणाप्रमाणें तिचा प्रभाव असा कोठेंच दिसून येत नाहीं. यासाठीं ती एकाचित्त व्हावी लागते. म्हणून हल्लीं अभ्यासक्रमांत सतरा विषय व अठरा पद्धति आहेत त्या काढून टाकून विद्यार्थ्यांच्या जीवन क्रमाला आवश्यक अशा थोड्याच गोष्टींचा पूर्णत्वानें समावेश करणेंच जरूर आहे.

येथें हेंही सांगणें इष्ट आहे कीं, आतां शिक्षकालाच जर भाषेचें मर्म कळणार नाहीं, इतकेंचसें काय; पण शब्दार्थही कळणार नाहीं. तर विद्यार्थ्याला काय समजणार ! शिक्षकाची परिस्थिति काय होते या गोष्टीचा अनुभव पाहण्यास आम्हांला १।२ महिने सवड मिळाल्यामुळें कळतें आहे. सत्संग किंवा क्रमिक पुस्तकांतील मोरोपंतांचीं काव्यें शिकवितांना परिस्थिति कशी होते हें त्यांनाच विचारिलें पाहिजे. आम्हांस वाटतें कीं, कदाचित् कांहीं शिक्षक 'चंद्रशाला विशाला ( विशा नांवाच्या मनुष्याला ) नयना न दिसती' असा अर्थ करण्यास चुकणार नाहींत. ह्या सर्व गोष्टींचें खापर ट्रेनिंग कॉलेजमधून संस्कृत काढून टाकलें या गोष्टीच्या बोडक्यावर फोडण्यास आम्हांस मुळींच हरकत वाटत नाहीं. अशी शिक्षकाची स्थिति असतां टिपणी पुस्तकांचा शब्दा-

ना.भा. ३५३



र्थवजा-मुळमुळाट झाला, तीं शिक्षकांनीं बाळगिलीं, विद्यार्थ्यांनाही घेऊं दिली; तर त्यांत काय नवल! ट्रेनिंगमध्यें शिक्षण कसें द्यावें या पद्धतीचें ज्ञान करून द्यावयाचें असेल तर त्याला निराळी योजना करावी लागेल. आमच्या मतें हल्लींची ट्रेनिंग कॉलेजची पद्धति मोडून टाकावी. नवीन मराठी शिक्षणाचीं कॉलेजें स्थापन करावीं व त्यांतून जे विद्यार्थी योग्य असतील ते ट्रेंड करण्यासाठीं म्हणून घ्यावे. सविस्तर योजना देण्याचें हें स्थळ नव्हे.

भाषाविषयाला मर्यादा नाहीं; तरी पण लहान शाळांतून क्रमिकपुस्तकें वरील दृष्टीनें पुरीं झालेलीं असावीं व मोठ्या शाळांतून क्रमिकपुस्तकाशिवाय योग्य अशा दुसऱ्या पुस्तकांची योजना असावी. भाषाविषयामध्यें व्याकरणाचा भाग फार भानगडीचा येतो. तथापि त्या सर्व भानगडी मुलांच्या पुढें न आणतां मतभेद बाजूस ठेवून वाक्याची रचना शुद्ध करतां येणें—यांनीं ऱ्हस्व, दीर्घ, निरर्थक अनुस्वार गळतील तर बरें—हें ध्येय डोळ्यांपुढें ठेवून व्याकरण शिकवावें. स्वभाषा असल्यामुळें विशेषशी अडचण मुलांना पडणार नाहीं. तसेंच, भाषेमध्यें व्युत्पत्तीचाही समावेश होतो. प्राथमिक शिक्षणांत व्युत्पत्तीचें इतकेसें महत्त्व नाहीं; तरी पण सामान्य रीतीनें ठोकळ नियमांनीं शब्द कसे बनतात हें व्युत्पत्तीप्रदीप व्युत्पत्तिदीपिका यांच्या अनुरोधानें शिकवावें; पण ह्याच्यावर विशेष भर देऊन व्युत्पत्तीप्रदीपांतील यादींच्या यादी पाठ करावयास लावण्याचें कारण नाहीं.

४ इतिहास भूगोल—याचा क्रम हल्लीं आहे असाच ठेवावा; पण पुस्तकें मात्र बदलून तीं निराळ्या गोष्टीरूप व मनोरंजक पद्धतीनें लिहवून घ्यावींत. इतिहास, मुलांच्या महाराष्ट्रासारखीं पुस्तकें किंवा मार्सडेनच्या इतिहासांत मुसलमानांचा भाग जसा लिहिला आहे तशा प्रकारानें लिहिलेलीं पुस्तकें मुद्दाम तयार करवावीं. उगीच मुलांना टिपणें उतरून देण्याच्या भानगडींत शिक्षकानें पडूं नये. त्यांत सर्व वेळ खर्च होतो. आम्हीं ट्रेनिंगमध्यें हा अनुभव घेतला आहे त्यावरून या टिपणांचा त्रास कसा होतो हें पुरें आम्हांस माहीत आहे. इतिहासांत सनाच्या भानगडी फार असूं नयेत. याचप्रमाणें भूगोलाचेंही नवीन भूवर्णन हें पुस्तक चांगल्या पद्धतीनें लिहिलें आहे. तरी पण शिक्षक ह्यांही पुस्तकांचा दुरुपयोग करून त्यांतील निरर्थक भाग कीं जो घोकून लक्षांत ठेवण्याचें कारण नाहीं तोही घोकून घेतात; पण त्याला पुस्तककर्त्यानें काय करावें? या बाबतींत शिक्षकांवर अर्थात् क्रमानेंच परीक्षकांवरही जबाबदारी आहेच.

इतिहासाचा भाग ब्रिटिश अम्मल हा मुलांना फार मोठ्या प्रमाणानें शिकविला जात आहे. एक तो गोष्टीरूपानें तरी त्यांच्यापुढें आला पाहिजे; किंवा त्याचा फारच मोठा भाग संक्षिप्त केला पाहिजे. त्याशिवाय तो ध्यानांत धरून एकंदर ब्रिटिश राज्यस्थापना कसकशी झाली हें ध्यानांत येणें फार कठिण जातें. ह्या सर्व अडचणी नवीन योग्य पुस्तकाशिवाय दुरुस्त होणार नाहींत.

५ शास्त्रीय विषय—यांतच आरोग्य विज्ञानाचाही समावेश होतो. आरोग्य विज्ञानाचे धडे जर क्रमिक पुस्तकांतच योग्य ठिकाणीं घातले तर हा एक निराळा विषय होऊन बसला आहे तसा बसला नसता, व त्याचें योग्य ज्ञानही झालें असतें. हा विषय ( आ. विज्ञान, शा. पाठ ) आहे. या क्रमानें मुलांना सांगण्यास कांहीं हरकत नाहीं.

६ लेखन—कोणताही विषय मुलांना लिहितां आला पाहिजे हा आग्रह व्यर्थ होय. तसेंच अक्षरही अगदीं मोत्यांच्या ओळीप्रमाणें पाहिजे हेंही म्हणणें इष्ट नाहीं. छापखान्याची उत्तम सोय असतां हस्ताक्षराचें इतकें महत्त्व काय? पण एकाद्या साध्या

नेहमींच्या परिचयाच्या विषयावर चार ओळी लोकांना वाचतां येतील अशा अक्षरांनीं व शुद्ध लिहितां याव्या इतकाच लेखनाचा हेतु असावा. त्या दृष्टीनेंच परीक्षकांनींही परीक्षा घ्यावी.

आतां किरकोळ विषयांकडे वळूं. प्रथम ड्रॉइंग हा विषय घेतला तर त्याची परिस्थिति पाहूं. या विषयाची सांप्रतची स्थिति म्हणजे निराळ्या वह्या करणें, त्यांवर ठराविक चित्रें काढणें असा झाला आहे. वास्तविक प्राथमिक शाळेंत ड्रॉइंग ह्या विषयाला इतकें महत्त्व नकोच. एकाद्या वस्तूची साधारणतः प्रतिमा मुलांच्या डोळ्यांपुढें असलेली ती त्यांना रेखा कृतींनीं दाखवितां यावी या पद्धतीनें धड्यांचें शिक्षण दिलें म्हणजे झालें; तरी पण असे धडे अनेक व आकृतीही अनेक प्रकारच्या असणार तेव्हां त्यांतही शिक्षकांनाही हरघडी अडचण आल्याखेरीज राहणार नाहीं म्हणून या विषयाला अजिबात छाट द्यावा. अगर या विषयाला कलेच्या दृष्टीनें महत्त्व देऊन त्याचें शिक्षण भरपूर तरी ठेवावें. म्हणजे त्याचा पुढील आयुष्यक्रमांत तरी उपयोग होईल. पण असा अर्धवटपणा कामाचा नये. यानें विषय तर वाढून बसतोच; पण तो शेळीच्या गलस्तनाप्रमाणें होतो.

नीतिपाठ—या विषयाची स्वतंत्ररीत्या जी योजना करण्यांत आली आहे त्याची काय आवश्यकता आहे न कळे.

शिक्षक प्रत्येक नीतितत्त्व, गद्यांत, पद्यांत, इतिहासांत, सर्व विषयांत जेथें जेथें येईल तेथें तेथें जर समजून सांगत असेल—आणि प्रत्येक शिक्षकानें तें सांगितलेंच पाहिजे. तर या फार्साची काय आवश्यकता आहे? पण संवयच ही कीं कार्खानीक काढून बाजारांत मांडलें पाहिजे. यामुळेंच निरर्थक विषय वाढून बसतो.

वृत्तदर्पण—हें ७ व्या इयत्तेमध्यें पुरें समजत नाहीं. त्याचा बरें उपयोग तरी व्हावा तोही नाहीं. विनाकारण वेळ व मुलांचे घोकण्याचे श्रम वाया जातात. इतर विषयांला त्या मानानें वेळाची व श्रमाची कमतरता पडते. म्हणून ह्याही विषयाला अजिबात छाट द्यावा.

सृष्टिनिरीक्षण—हा विषय ज्या पद्धतीनें जितका वेळ देऊन शिकविला गेला पाहिजे तितका वेळ देण्यास प्राथमिक शाळांत सवडच नाहीं. हा विषय श्री. बोस यांच्या शाळेंत शिकविला जावा. शिक्षकांनाच जेथें माहिती नाहीं तेथें हा निरर्थक कालाचा अपव्यय करणारा एक फार्स होऊन बसल्याविना राहणार नाहीं. व हल्लीं पाहतां तो तसाच फार्स झाला आहे खास. किंडरगार्डनची पद्धति नुसती नांवाला ठेवावयाची. एका शिक्षकाच्या ताब्यांत ३०-३५ मुलें, तींही सर्व सारखीं नाहींत. शाळेंत सोयी आहेत नाहींत अशा स्थितींत हा फार्स कालाचा अपव्यय करणारा नाहीं असें कोण म्हणेल?

मातीकाम—हा विषयही विनाकारण वेळ घालविणारा आहे. कला या दृष्टीनें हा शिकविण्यांत आला तर उपयोग, पण तसा तो कोणत्याही शाळेंत शिकविला जात नाहीं असेंच दिसतें. शिक्षकांस तरी या विषयांत काय कळतें? विनाकारण आठवड्यांतून बराच वेळ या निरर्थक होणाऱ्या कामाकडे खर्च केला जातो. कोठें मेणबत्त्यांच्या आकाराचा गोळा, कोठें सिलिंडराचा गोळा, कोठें फार मजल गेली तर वाटीचा आकार, यापेक्षां जास्त मर्यादा जात नाहीं. निदान बेंदराला बैल, गणेश चतुर्थीला गणपति, हरतालिका, नाग, गौरींचे मुखवटे असले कांहीं व्यवहारोपयोगी जिन्नसही मुलांना करितां येत नाहींत. यावरून हा विषय शाळेंत कितपत तयार होतो व होणार हें दिसतेंच. ड्रॉइंग, मातीकाम त्याचप्रमाणें स्लाईड—कागदाचें कातर काम त्या गोष्टी कलेच्या

दृष्टीनें ठेवाव्या. प्रसंगोपात्त यापासून मुलांना पैसा उत्पन्न करितां आला पाहिजे. कागदांच्या कातर-कामांत हल्लीं निरर्थक पैसा जात आहे. मुलींच्या शाळांमधून तर हा पैसा निरर्थक जात आहे ही गोष्ट घडधडीत दिसत आहे. पैसा बाहेरच्या बाहेर उत्पन्न व्हावा, वरचेवर अशा प्रत्येक गोष्टीला पाल-कांना पैसा पुरविणें अशक्य होतें.

वस्तुपाठ ह्या विषयांत शिक्षकांना वस्तुदर्शनानें शक्य तोंवर धडे शिकविणें ही गोष्ट लक्षांत ठेवण्या-लायक आहे. शिक्षकांनींच या विषयाला निरर्थक महत्त्व दिलें आहे. हा शा. पाठांतच समाविष्ट होतो. गाणीं व गोष्टी, पुस्तका बाहेरच्या गोष्टी व गाणीं— उपयुक्त अशीं—एका शिक्षकाकडे एकच वर्ग जेथें आहे त्या ठिकाणीं फक्त इन्फंट वर्गास शिकवावी. इतर ठिकाणीं पुस्तकांतल्या गोष्टी व त्यांतील कविता सांगाव्या.

साधारण शिक्षणक्रमाचा आराखडा म्हणून जें सामान्य स्वरूप द्यावयाचें तें येथवर चर्चेसह दिलें. यापुढें शिक्षकांवर शाळेचा वेळ खेरीज करून कराव-याचीं कांहीं कामें सोपविणार आहों. वेळापत्रकांत आठवड्यांतून तालमीचे दोन तास ठेवलेले असतात. ते इतर उपयुक्त विषयांकडे घेऊन, तालीम शाळा सुटल्यावर बाहेरचीं वीस पंचवीस मिनिटें खर्च करून दररोज मुलांकडून जोर, जोडी, उठाबशा, मलखांब या रूपानें करून घ्यावी. केव्हां केव्हां खेळावयास सोडावें. अशा रीतीनें मुलांना नियमित व्यायाम मिळून त्यांच्या प्रकृति सुधारतील. आठ-वड्यांतून दोन तास फार्स करण्यांत कांहीं हाशील नाहीं. ही गोष्ट अधिकाऱ्यांसाठीं म्हणून करावयाची नसून आपल्याच पुढील पिढीच्या सुधारणेसाठीं करावयाची आहे. ही गोष्ट ध्यानांत ठेवावी.

दुसरी सूचना अशी कीं—साहजिकच एका ठिकाणीं राहिल्यानें मनुष्याला कंटाळा येतो. नानाप्रकारचे देश, सृष्टीशोभा पाहून मुलांच्या मनाला करमणूक होऊन त्यांना ज्ञानही प्राप्त होईल तेव्हां, असे निरनिराळे प्रदेश पाहण्यासाठीं आठवड्यांतून, महिन्यांतून किंवा सुटींत सवड झाल्यास मुलांना घेऊन ठिकठिकाणीं जाणें योग्य आहे. अशा रीतीनें ज्ञान तर ज्ञान, करमणूक तर करमणूक शिवाय शरीर सामर्थ्यही प्राप्त होईल. तेव्हां हें श्रेय शिक्षकानें घेणें इष्ट आहे, व तें घ्यावें अशी शिक्षकांना माझी सविनय प्रार्थना आहे.

अशा रीतीनें जो वेळ वाचेल (हा वेळ निदान आठवड्यांतून दररोज दोन तासप्रमाणें १३—१४ तास सांपडले) तो औद्योगिक शिक्षणाकडे खर्च करतां येतील. आतां औद्योगिक—शिक्षण कोणतें देतां येईल तें पाहूं. मातकाम (पुरे); डॉइंग, फोटो, रिपेअर (सायकल घड्याळ), भांडीं कल्हई, डाक लावणें, सुतारकाम (कातकाम), विणकाम (सुताचें वेताचें, वगैरे उठावाचे नकाशे तयार करणें, बोर्ड तयार करणें, कपडे रंगविणें, पुस्तकें बांधणें, टाइप जुळणी, शोभेची बाग तयार करणें (माळी काम), कागदाचें कात काम, जोड काम, ओतीव काम, बटणें, निरनिराळीं ओतीव मेणाचीं चित्रें, सुताचीं बटणें, शिंप्याचें काम इत्यादि अनेक उद्योग शाळेंत शिकवितां येतील. मोठ्या शाळांतून शक्य अस-ल्यास ह्यांपैकीं किंबहुना हे सर्व धंदे (ज्या मुलाला ज्या विषयाची आवड आहे त्याला तो) शिकवितां येतील. त्याला वेळही मुबलक मिळेल.

खेडेगांवांत शेतकरी वर्ग मोठा असल्यामुळें शेतकीचें शिक्षण देणें जरूर आहे. त्या ठिकाणीं सकाळीं २ तास अभ्यासाचें शिक्षण झाल्यावर दोन प्रहरचा सर्व वेळ मुलांनीं शिक्षकासह रानांत घाल-वावा. पंचांच्या सहाय्यानें-शिक्षकही एक पंच असून— प्रत्येक आठवडा शेतकामासाठीं एक एका शेतक-ऱ्याकडे जावें. तेथें त्याच्या शेतांत भांगलणीपासून

तों तहत काढणी, मळणीपर्यंत कामें स्वतां विद्यार्थ्यांनीं करावीं. त्यांच्या मजुरीदाखल शेतकऱ्यानें—कारण त्याची कांहीं मजुरी वाचेल खास—कांहीं मजुरी विद्यार्थ्यांना द्यावी. त्या योगें-पंचाच्या देखरेखीखालीं ती ठेवून—विद्यार्थ्यांना बक्षिसें, त्यांचें वाचनालय, गरीब विद्यार्थ्यांना फुकट पुस्तकें वगैरे पुरवावें.

असें केल्यास शेतकऱ्यांचीं मुलें सुशिक्षित होऊन त्यांना शेतकामाचीही संवय राहील; व हल्लीं जीं तीं पोशाखीं बनून शेतकामाला नालायक होतात, तशीं होणार नाहींत; आणि शेतकरीवर्ग जो शिक्षणाला अडथळा करतो तो करणार नाहीं. या कामीं याही पेक्षां ज्यास्त वेळ लागल्यास वरील अभ्यासक्रमांत छाटाछाट करून आणखीही वेळ काढतां येईल. त्यांतच आठवड्यांतून एकादा दिवस गांवांतील धंदे, कुंभार, सुतार, लोहार यांचे धंदेही दाखवून प्रत्यक्ष त्यांचेंही शिक्षण देतां येईल.

नवीन पद्धतींत एकएक वर्ग आठवड्यांतून दोन तास शेतकीवर नेऊन शिक्षण देण्याचें घाटत आहे; पण यांत कांहीं अर्थ नाहीं. ट्रेनिंगमध्यें यांचा आम्हीं पुरा अनुभव घेतला आहे. तसेंच या विषयांत परीक्षा घेणें, हाही एक फार्स आहे. प्रत्यक्ष हातून कृति गेली, प्रत्यक्ष कष्ट झाले म्हणजे झाले. अधिकारी तालुक्यावर एक एक याप्रमाणें आहेतच. त्यांनीं वरचेवर देखरेख करावी. शिक्षकांनींही या बाबतींत कष्ट घेणें इष्ट आहे.

इतका उद्योग शिक्षकांकडून होण्यास त्यांस अपुरें वेतन असतां कामा नये. त्याला आपल्या चरितार्थासाठीं दुसरा उद्योग करण्याचें कारण पडूं नये, अशी व्यवस्था ठेवून त्याच्याकडून तशा प्रकारच्या कामाची अपेक्षा करावी. व शिक्षकानेंही कृतज्ञ राहून आपलें कर्तव्य मन:पूर्वक करावें अशी विनंति करून हा बराच वाढलेला परंतु अजूनही पूर्णत्वानें विवेचन न झालेला निबंध पुरा करतों. यावरून साधारण शिक्षणाची कल्पना येण्यास पंचाईत पडणार नाहीं. वेळापत्रक व स्पष्ट अभ्यासपत्रक यांवरून तयार करतां येईल. ह्या सर्वांचा सुज्ञांनीं विचार करावा. इत्यलम्.

---

## विचार करा.

ज्याला दुय्यम म्हणून काम करता येत नाहीं तो थोर पुरुष नव्हे.

ज्या मनुष्याच्या अंगांत गुण कमी तोच आपल्या गुणांचीं प्रशंसा करतो.

क्षमा करणाऱ्या पुरुषांना क्षमा करूं नये.

उत्साहभंग हें मनुष्याचें मरण होय.

गाढवांतील आळशाला गाढव मनुष्य म्हणतात कीं काय न कळे.

भांडणामध्यें आपला मत्पक्ष अशी जास्त खात्री झेंऊ लागली म्हणजे क्षमा करणें सोपें होतें.

कोणतीही गोष्ट करण्यापूर्वीं पुष्कळ विचार करा; परंतु विचार ठरल्यावर मात्र वेळ दवडूं नका.

जो दुसऱ्याची निंदा तुमच्याजवळ करतो, तो तुमची निंदा दुसऱ्याजवळ खास करील.

शांत चित्तानें ऐकून घेणारा मनुष्य मित्र व ज्ञान संपादितो.

शहाणा मुलगा बापाला आवडतो; पण वेडा आईला प्रीय असतो.

---

# सिंही आणि तिचे छावे.

लेखिका—शांताबाई भिडे

एका सिंहीनें छानदार शिकार मारून आणली होती, यामुळें तिच्या छाव्यांची आज मोठी चंगळ उडाली होती. त्यांना आज प्रथमच मांस चाखावयाला मिळालें होतें, आणि तें त्यांना फारच आवडत होतें. असें त्यांच्या मुद्रेवरून आणि ते मिटक्या मारीत होते, ह्यावरून स्पष्ट कळत होतें.

हे छावे तें मांस खात असतां त्यांची आई त्यांना दांत आणि पंजे ह्यांचा कसा उपयोग करावयाचा हें शिकवीत होती.

ह्या छाव्यांचे दांत व पंजे हुबेहूब मांजरांच्या सारखेच होते; पण अधिक मोठे आणि बळकट असे होते.

जेवण संपल्याबरोबर ते छावे आईच्या अंगाशीं बिलगून निजले आणि ती त्यांना आपल्या लांब जिभेनें चाटूं लागली; पण ती जीभ अबब किती तरी खरबरीत होती ! जणों काय खराराच !

सर्वच मोठ्या खुषींत होतीं. इतक्यांत त्यांना दूरवरच्या घनगर्जनेंप्रमाणें एक आरोळी ऐकू आली. सर्वांत थोरला जो छावा, तो आपलें अठरावें म्हणजे शेवटलें नख चाटून साफ करण्यांत गुंतला होता. त्यानें आपल्या आईला विचारलें, " आई, हा कसला ग आवाज ?"

त्याला सिंहीनें उत्तर दिलें, "सगळ्या पशूंचा स्वामी जो सिंह त्याची ही आरोळी आहे. कदाचित् हा तुमचा बापच असेल!"

थोरल्या छाव्यानें विचारलें, " आई, तो कां बरें ओरडत आहे ?"

आईनें उत्तर दिलें, " त्याला भूक लागली आहे म्हणून ओरडतांना तो आपलें तोंड भुईला लावतो व यामुळें त्याच्या आरोळीच्या आवाजाच्या लाटा दूरवर जमिनीसरपट पसरत जातात. इतर जनावरें तो आवाज ऐकून घाबरून जातात. त्यांना आवाज कोणत्या दिशेनें येत आहे हें उमगतच नाहीं आणि त्यामुळें पुष्कळ वेळां तीं थेट सिंहाकडेच धांवत येतात आणि त्याच्याच भक्ष्यस्थानीं पडतात."

दुसरा एक छावा म्हणाला, "आई, मला देखील आरोळी मारावी असें वाटतें" म्हणून त्यानें आरोळी मारण्याचा खूब प्रयत्न केला; पण त्याचें ओरडणें मांजरासारखेंच होतें; पण जरासें मोठें होतें इतकेंच.

तेव्हां त्याची आई त्याला म्हणाली, " बेट्या, तूं अठरा महिन्यांचा होईतोंपर्यंत धीर धर ! मग तुला डरकाळ्या फोडतां येऊं लागतील !"

इतक्यांत तिकडून सिंह आपले मऊ मऊ पण मोठे मोठे पंजे टाकीत मंद गतीनें तेथें आला. सिंहीनें त्याला सलामी दिली. तेव्हां थोरला छावा उद्गारला, " मी बाबांच्या सारखा असावा असें वाटतें."

सिंही त्याला गर्वानें म्हणाली, " बेट्या, तुझ्या बापाचे स्नायु इतके बळकट आहेत कीं, तो एक सबंधचा सबंध बैल तोंडांत धरून वाहून नेऊं शकतो. तो आपल्या झुपकेदार शेपटीच्या एकाच तडाख्यानें माणसाला लोळवतो. त्याच्या पंज्याविषयीं म्हणशील तर तो तुला खात्रीनें सांगतें कीं, सिंहाच्या पुढच्या पंज्यांइतके बळकट आणि भक्कम सर्व श्वापदांच्या राज्यांत तुम्हांला कांहींच आढळावयाचें नाहीं."

सिंह जो लांबून आलेला होता तो आपल्या कुटुंबांत मोठ्या ऐटीनें बसला आणि आपली दाट आणि लांबलचक आयाळ हलवून, रागीट चेहेरा करून आणि आठ्यां पाडून गंभीर स्वरानें म्हणाला, "बेट्यांनो, शत्रूस कधींही पाठ दाखवूं नका. आपण सिंह कधींही असें करीत नाहीं. भूक लागल्याशिवाय हत्या करूं नका, आणि फक्त मोठाल्याच जनावरांवर हात

टाका, बारक्यांच्या वाटेस जाऊं नका. तुम्हीं मोठे होऊन आपले स्वताचें संरक्षण करून घ्यावें. यास समर्थ होईपर्यंत आपल्या आईची पाठ सोडूं नका. ती जिवंत असे तोंपर्यंत तुम्हांला पारधी लोकांची भीति नाहीं. ती खरोखरच वनराजाची आई असण्यास लायक आहे. तुमच्यावर जर संकट ओढवलें तर मी देखील उग्र होत नाहीं, इतकी ती उग्र होते आणि पिसाळते."

सिंहिणीनें ही स्तुति ऐकून आनंदसूचक गर्जना केली; पण इतक्यांत सांबरांचा थवा सिंहाच्या दृष्टीस पडला, त्याबरोबर तो तिकडे पळत सुटला.

सिंहाच्या डोळ्यांची रचना अशी केलेली असते कीं, त्याला सभोंवारचा सर्व प्रदेश दिसतो.

सिंही आपल्या पिलांना सांगूं लागली, "पूर्वी उष्ण देशांतील राजे आपल्या माणसाळलेल्या सिंहांना बरोबर घेऊन शिकार करीत" व पण तिचे बच्चे गुरगुरत म्हणाले, "आम्हांला मागल्या गोष्टी ऐकण्याचा भारी कंटाळा आहे."

असें म्हणून ते सर्व बच्चे निजले, आणि त्यांना गाढ झोंप लागली सिंही ही सर्व जागा सुरक्षित आहे असें पाहून त्यांच्याच शेजारीं झोपीं गेली.

---

## चरक्याची थोरवी

म्हणुं अतां मातरं वंदे ।
ताराया अपुले धंदे ॥ यापुढें ॥
परदेशीं आपुला पैसा ।
जाइ तो बघुं नका ऐसा ॥
परक्यांचीं वस्त्रें त्यागा ।
स्पर्शु नका परकी धागा ॥
जाणा हो परकीं वस्त्रें ।
कंठ हीं चिराया अस्त्रें ॥
निज हिता, गांधिजी पिता, लेशहि न भितां ।
बोधि तें साधा, नेम घ्या खादिचा साधा ॥ यापुढें ॥
दास्यांतुनि व्हाया मुक्त ।
गांधिचें स्मरा मनिं उक्त ॥
गांधिचे व्हाच अनुयायी ।
त्यांचिया नम्र व्हा पायीं ॥
स्वातंत्र्या मिळवायास ।
सिद्ध व्हा करुनिया कास ॥
हा धरा, बोध अंतरा, नित्य तो स्मरा, ।
पडुं नका नरकीं । घेऊं नका वस्त्रें परकीं ॥ यापुढें ॥
शस्त्रें परवस्त्रें माना ।
आपुल्या चिराया माना ॥
गांधिचा धरा मनिं बोध ।
करुं नका उगिच त्या रोध ॥
अंगावरि ल्याहो खादी ।
व्हा झणीं देशहित वादी ॥
देश हा, बुडतसे पहा, दैन्य हें महा, ।
ल्या तुम्ही खादी । होउनिया आशावादी ॥ २ ॥
घेउनियां हातीं चरका ।
हौसेनें द्या तया गरका ॥
चरक्यावरी काढुनि धागा ।
लावा तो घरच्या मागा ॥
धाग्यांच्या राशी काढा ।
गांधिचा स्मरा मनिं पाढा ॥
भय मनीं, मित्रमेळनीं, लाज कीं जनीं, ।
धरू नका कांहीं । खादीची फिरवा द्वाही ॥ यापुढें ॥

---

ग्रा.मा. ३५३

# गिरिजा.

[ लेखक—धों. खं. कुलकर्णी, विजापूर. ]

गोजिरवाणें दिसेल पाडस पळतांना कुरणांत । हिरवा डोंगर दिसेल निर्झर वाहतांना शेतांत ॥
परी अहाहा ! गोंडस बाळा गिरजा त्या जागेंत । दिसणें अगदीं अशक्य ! मग ती दिसेल ना स्वर्गांत ॥ १ ॥

डोंगर बराच मोठा होता. हरतऱ्हेच्या झाडांनीं व पुष्पलतांनीं तो अगदीं भरून गेला होता. त्याच डोंगरांतून एक लहानसा झरा निघून त्याच्या पायथ्याशीं असलेल्या रामजीच्या शेताच्या कडेनें वहात होता. झऱ्यापासून थोड्याच अंतरावर रामजीचें एक लहानसें खोपटें होतें. ते दिवस शाळूच्या हंगामाचे असल्यामुळें रामजीसारखे पुष्कळ शेतकरी आपआपल्या शेतांत झोंपडी बांधून राहिले होते. रामजीच्या त्या लहानशा झोंपडींत, रामजी, त्याची बायको आणि त्याची आठ वर्षाची लाडकी मुलगी गिरिजा एवढीच काय ती मंडळी ! रामजी हा अत्यंत गरीब, सरळ अंतःकरणाचा, देवानें दिलेली मीठ भाकरी का होईना पण त्यांतच सुख मानून राहणारा एक शेतकरी होता. वडिलोपार्जित असलेल्या त्याच्या लहानशा जमिनींत त्याच्या पोटापुरतें पिकत असे. शेताच्या सभोंवतीं आंब्याचीं झाडें लावून त्यानें ती जागा फार मनोहर केली होती. झऱ्याचें पाणी आपल्या शेतांत वळवून तो भाजीपाल्याची लागवडही थोडी करीत असे, आणि तो भाजीपाला त्याची बायको दर बाजारीं गांवांत जाऊन विकून येत असे. त्या दोघांनीं मिळून दिवसभर काम करावें, रात्रीं जेवणखाण आटोपल्यावर गिरिजेला जवळ घेऊन तुकोबाचे अभंग मोठ्या भाक्तिभावानें म्हणावें आणि नंतर सुखानें झोंपीं जावें, असा त्या गरीब कुटुंबाचा दररोजचा क्रम असे. एकूण देवानें दिलेल्या स्थितींत रामजी आपल्या बायकोमुलीसह सुखानें काळ कंठीत होता. त्या दोघांचें गिरिजेवर अतिशय प्रेम ! का असणार नाहीं ? चार पांच मुलांत ती एकटी राहिलेली, आणि त्यांत ती फारच सद्गुणी! बाप काम करू नको म्हणत असतांना सुद्धां त्याचे बरोबर आपल्या हातून होईल तितकें काम करावें, थकवा आला म्हणजे त्या झुळझुळीत वाहणाऱ्या झऱ्याजवळ खेळत बसावें, कधीं कधीं डोंगरावर चढून त्यावरचीं फुलें तोडून आणावीं आणि त्याचा एक सुंदर हार बनवून आपल्या पाडसाच्या गळ्यांत तो घालावा, पाडसाचे कितीतरी मुके घ्यावे, केव्हां केव्हां त्या आवडत्या पाडसाला घेऊन हिरव्या कुरणावरून पळावें, केव्हां केव्हां त्या पाडसाबरोबर तास तासभर बोलत बसावें ! पण हें सर्व ती करी ते एकटीच. शेजारीं असलेल्या शेतकऱ्यांच्या पोरींत ती कधीं मिसळली नाहीं. कुणाबरोबर भांडण नाहीं, तंटा नाहीं, कांहीं नाहीं ! आपण भलें कीं आपला खेळ भला ! आपल्या मुलीचे खेळ पाहून रामजीला मोठें कौतुक वाटावें आणि केव्हां केव्हां मध्येंच काम सोडून त्यानें गिरजेजवळ जाऊन बसावें, तिच्या पाठीवरून प्रेमानें हात फिरवावा, वाऱ्यानें उडत असलेल्या तिच्या कुरळ्या केंसावरून हात फिरवावा, प्रेमभरानें त्यानें तिचे किती तरी मुके घ्यावे, आणि केव्हां केव्हां आपल्या मृत बाळांची आठवण होऊन त्याच्या डोळ्यांतून टप टप अश्रु गळावे आणि मनांत प्रार्थना करावी कीं, देवा एवढी तरी मला अभाग्याला लाभू दे. रामजीच्या डोळ्यांत अश्रु आलेले पाहून त्याच्या बायकोला अतोनात दुःख व्हावे आणि त्या दोघांनीं मिळून मनसोक्त अश्रु ढाळावे. कधीं कधीं तसल्या दुःखांत सुद्धां गिरजेनें आपल्या आईबापांस विनोदाचे प्रश्न करावे आणि ते प्रश्न ऐकून तसल्या स्थितींत सुद्धां त्यांनीं हंसावें आणि आपलें दुःख आंवरून पुन्हां कामास लागावें. असो. त्या शेतापासून गांव जवळच म्हणजे दोन तीन मैलांवर होता. आपल्या आईबरोबर गिरिजेनें गांवांत जावें. बाजारांतलि सुंदर वस्तु विकत घ्याव्या आणि त्या वस्तु आपल्या आईबापांला दाखवाव्या, बाजार कसा भरला होता, त्यांत सुंदर वस्तूंचीं दुकानें कितीं होतीं, याचें आपल्या गोड शब्दांनीं वर्णन करून सांगावें ! असो. हा नेहमींचाच क्रम असे.

आज त्या गांवचा बाजार होता. गिरजेची आई सकाळींच भाजी विकण्यासाठीं गांवांत गेली होती; पण तिच्याबरोबर गिरजा गेली नव्हती. रामजीचें डोकें दुखत होतें म्हणून तो झोंपडींत निजला होता. गिरिजा झोंपडीच्या दाराशीं बसून पाडसाच्या गळ्यांत घालण्याकरितां हार गुंफीत होती. गिरिजेनें आपला हार संपविला आणि त्या पाडसाच्या गळ्यांत घातला. आणि त्याचें प्रेमानें चुंबन घेतलें. हाय ! तो गिरिजेच्या हातचा हार

शेवटचा तर ठरणार नाहीं ना ? आणि शेवटचें चुंबन तर नसेल ना ? सहा वाजले तरी गिरिजेची आई आली नाहीं. तेव्हां रामजी म्हणाला, " गिरिजे ती आली का ? " गिरिजा म्हणाली, " नाहीं. बाबा, मी जाऊं कां ? " ' नको बाळ, हे पहा आकाशांत ढग जमूं लागले आहेत. वाटेंत पाऊस पडेल ! ' गिरिजेनें जाण्याचा फारच आग्रह धरला. तिचें म्हणणें रामजीला मोडवेना. त्यानें तिला जाऊं दिलें. त्या वेळीं आकाशांत ढग जमूं लागले होते. पाऊस येण्याचीं चिन्हें दिसूं लागलीं होतीं. खरें पाहिलें असतां बहुतेक ते पाऊस येण्याचे दिवस नव्हते. पण त्या दिवशींच तो कां आला तें त्यालाच माहीत ! गिरिजा एक मैल गेली असेल नसेल तों आकाश काळाकुट्ट ढगानें व्याप्त होऊन गेलें होतें. सर्वत्र अंधार पडूं लागला. क्षणोक्षणीं विजा चमकूं लागल्या. गडगडाट सुरू झाला. वारा सोसाट्याचा सुटला. आतां खालचा रस्तासुद्धां दिसेना. कोण भयंकर ती वेळ ! क्षणोक्षणीं गिरिजा ठेंचाळूं लागली, गिरिजा चालतच होती; पण गांव कांहीं आज लवकर येईना. अरेरे ! वाचक हो, ती पहा गिरिजा गांवचा रस्ता सोडून भलतीकडेच गेली. मुसळधार पावसाचा मारा सुरू झाला. तसल्या स्थितींत गिरिजेची काय स्थिति झाली असेल ! असो. कोणत्याही गोष्टीला शेवट असतोच, व त्याचप्रमाणें एकदां तो काळपाऊस थांबला. दिवे लावायच्या सुमारास गिरिजेची आई परत आली. तिच्याबरोबर गिरिजा नाहीं असें पाहून झोंपडीच्या दाराशीं उभा असलेला रामजी धाडकन् जमिनीवर बेशुद्धच पडला. याचें कारण गिरिजेच्या आईला तात्काळ कळलें. तिनें एक हंबरडा फोडला आणि तीही बेशुद्ध पडली. पुष्कळ वेळानें रामजी शुद्धीवर आला. त्या वेळीं त्याच्या अंगांत ताप भरला होता. गिरिजेच्या नांवानें ओरडत तो उघडा बोडका पळतच सुटला. तो गेल्यावर त्याची बायको शुद्धीवर आली; पण तिची पहिली स्थिति पार बदलून गेली होती. ती वेड्याप्रमाणें कांहीं तरीच बडबडूं लागली. ती बडबडतच डोंगराकडे केली. गेली ती अजून परत आली नाहीं असें तिथले लोक सांगतात. इकडे रामजी रात्रभर रानांत गिरिजेच्या नांवानें ओरडत भटकत होता. अखेर पहाट झाली. गिरिजेचीं चिमुकलीं पावलें चिखलांत उमटलीं होतीं. पावलांच्या मागोमाग रामजी गेला; पण हाय ! तीं पावलें पुष्पावती नदीच्या पुलापर्यंतच रामजीला दिसलीं. पण पुढें—पुढें काय तें मला सांगतां येत नाहीं. पुष्पावती नदी भरून बेफाम चाललीं होती. थोड्याच वेळांत पाण्यांत एक आवाज झाला ! झालें ! गिरिजेचें पाडस आतां कृश होऊन कुरणांतून फिरतांना लोकांच्या दृष्टीस पडत असेल.

---

# ईश्वर जें काय करतो तें चांगल्याकरितां करीत असतो.

एक होता राजा. त्याचा एक प्रधान होता. तो प्रधान नेहमीं म्हणे कीं, देव जें काय करतो तें चांगल्याकरितां करतो. हें त्याचें म्हणणें राजा नेहमीं ऐकत असे. तें ऐकून ऐकून त्याला अगदीं कंटाळा आला होता.

एकदां काय झालें कीं, त्या राजाच्या बोटाला एक पुटकुळी झाली. पुढें ती वाढतां वाढतां इतकी मोठी झाली कीं, त्याच्या योगानें सारा हात सडून जाण्याची भीति वाटूं लागली. तेव्हां त्या राजानें मोठमोठ्या वैद्यांना व हकीमांना बोलावणें पाठविलें. त्यांनीं नानाप्रकारचे इलाज करून पाहिले; परंतु कशानें गुण येईना. अखेरीस एके दिवशीं साऱ्या वैद्य हकीमांची सभा राजानें भरवली व काय उपाय योजावा असें त्यानें त्यांना विचारलें. मोठमोठ्या वैद्यांचे सुद्धां कांहीं चाललें नसल्यामुळें ते अगदीं निराश झाले होते. ही पुळी अशीच वाढली तर कांहीं तरी भलतें सलतेंच होईल असें भय त्यांना वाटूं लागलें. तेव्हां त्या सर्वांनीं राजाला असें एकमतानें सांगितलें कीं, तें बोट कापल्याखेरीज गत्यंतर नाहीं.

हें ऐकून राजानें आपल्या प्रधानाला बोलावणें पाठविलें. तो आल्यावर आतां काय करावें असें

त्याला विचारलें. प्रधान म्हणाला, त्यांत काय मोठें ? कापून टाका तें बोट. ईश्वर जें काय करतो तें चांगल्याकरितां करतो. हे त्याचे शब्द ऐकून राजाला फार संताप आला व तो म्हणाला माझा आतां जीव जाण्याची पाळी आली तरी देव करतो तें चांगल्याकरितां करतो असें म्हणावयास तुला लाज कशी वाटत नाहीं. जर ईश्वर करतो तें चांगल्याकरितां करतो असें तुझें म्हणणें आहे तर मी तुला आज तुरुंगांत टाकून देतों. तेथें सुद्धां देव तुझें चांगलें करील. असें म्हणून राजानें त्याला बंदीशाळेंत टाकून दिलें.

नंतर शस्त्रवैद्यानें राजाचें बोट कापलें आणि कांहीं दिवसांनीं राजा चांगला बरा झाला.

नंतर एके दिवशीं राजा शिकारीस एकटाच गेला होता तो फिरतां फिरतां फारच लांब गेला. संध्याकाळ झालेली पाहून राजा घरीं परत येण्यास निघाला. रस्त्यांत त्याला कांहीं दरवडेखोर भेटले. त्यांना देवीला बळी देण्यास कोणी तरी मनुष्य पाहिजे. हा चांगला गलेलठ्ठ प्राणी पाहून त्यांना फार आनंद झाला. त्यांनीं त्याला चांगला आवळून देवळांत नेलें. तेथें त्यांनीं त्याचे कपडे वगैरे सारे उतरवले व सुरा पाजळून जवळ ठेवून दिला. कपडे उतरवता उतरवता ते त्याच्या प्रत्येक अवयवाकडे निरखून पहात होते. पहातां पहातां त्याचे एक बोट तुटलेलें आहे असें आढळून त्यांना आलें. बळी द्यावयाच्या मनुष्यांत कांहीं व्यंग असतां कामा नये असा त्यांचा नियम असल्यामुळें त्यांनीं त्याला सोडून दिलें.

आपल्या जिवावरचें संकट टळलेलें पाहून राजाला फार हर्ष झाला. व त्याला ह्या वेळीं प्रधानाची आठवण झाली. तो तसाच त्याकडे धांवत गेला व झालेला प्रकार त्याला सांगूं लागला.

प्रधान म्हणाला, ‘ महाराज, देव जें काय करतो. तें चांगल्याकरितांच करतो. आपलें बोट कापलें नसतें तर आपण आज प्राणास मुकलां असतां. आणि आपण मला जर बंदिशाळेंत टाकलें नसतें तर मी खात्रीनें आपल्याबरोबर शिकारीस आलों असतों व पकडलों गेलों असतों. परंतु तुमच्याप्रमाणें माझ्या अवयवांत वैगुण्य नसल्यामुळें मी आज प्राणांस मुकलों असतों. तेव्हां देवानें मला जें तुरुंगांत टाकलेंत तेंहि माझ्या चांगल्याच करतां. अशा प्रकारें देवाची करणी विचित्र असते. ’

हें भाषण ऐकून राजाचें समाधान झालें व तो देवावर पूर्ण विश्वास ठेऊं लागला.

## “ कन्हैयालालदत्त ”

लेखकः—मंगेश रघुनाथ सरमंडळ.

[अलीपूर बांब केसमध्यें पकडलेल्या बंगाली तरुणांपैकीं कन्हैया, सत्येंद्र व नरेंद्र हे तीघे होते. नरेंद्र हा सरकारला वश झाल्यामुळें, कन्हैया व सत्येंद्र ह्यांनीं त्याचा तुरुंगांतच खून केला ! नरेंद्र सरकारचा साक्षीदार म्हणून त्याला दवाखान्यांत निराळे ठेवण्यांत आलें होतें; पण कन्हैया व सत्येंद्र ह्यांनीं

कोणत्या तरी निमित्तानें आपला तेथें शिरकाव करून नरेंद्रास मारण्याचा बेत तडीस नेला.]

कन्हैया कोणी मोठा पुरुष किंवा पुढारी नव्हता. त्याला अनुयायी नव्हते. रूढ अर्थाप्रमाणें तो विद्वान किंवा तत्त्ववेत्ता नव्हता. दाही दिशा दणाणून सोडणारा तो वक्ताही नव्हता; पण ती देशभक्तीनें जळणारी एक जिवंत जोत होती. स्वार्थत्यागाच्या सामर्थ्यानें फोफवणारा तो समुद्र होता भारतमातेच्या भावी भाग्यरवीचा तो बालकिरण होता, किंवा राष्ट्रप्रेमाच्या मंगलमय स्वरूपांत आत्मतेजानें चकाकणारी ती परमेशाची पवित्र मूर्तीच होती.

प्रातःकाळचा समय. रात्रभर अंधकाराच्या साम्राज्यांत निद्रावश झालेल्या जगांत, नवजिवनाचा संचार करणाऱ्या अरुणाची आरक्त ध्वजा पूर्व दिग्भागीं फडफडत होती. वसुंधरा उत्साहभरें डोलत होती. सर्व वस्तु चैतन्यमय भासत होत्या. सात्त्विक प्रेमाच्या लहरीवर जगाचें पारडें सानंद पोहत होतें. कन्हैया व सत्येंद्र ह्यांचा आत्मा परमेश्वर स्वरूपी लीन होण्यास उत्साहानें उडत होता. नांवानें नरेंद्र; पण कृतीनें कापरयाचा काळा कोळसा. स्वतःच्या जीवलालसेला वर जीवांचा बळी देण्यास तयार झालेला नीच, आज कन्हैयाच्या करवीं काळास अर्पण होणार होता.

"भाई, आज शुभ दीन आहे" कन्हैया सत्येंद्रास म्हणाला, "परकीय नरेंद्रानें नडलेल्या भारत स्वरूपी कालीमातेचें ऊग्र स्वरूप नरेंद्राच्या निःसत्त्व रुधिरानें शांत होऊं दे." सत्येंद्राच्या तोंडावर आनंद खेळूं लागला. डोळ्यांत आत्मतेज चमकूं लागलें, स्वयंस्फुर्तीनें बाहु फुरफुरू लागले, दिव्य तेजाची चपला चेहऱ्यावर चमकूं लागली, व शौर्य शरीरांत नाचूं लागले, त्यानें पिस्तूल काढलें, एक क्षण तो स्तब्ध होता. त्याच्या प्रेमळ मूर्तीच्या ठिकाणीं रौद्रस्वरूप भासूं लागलें! तो, नरेंद्रास स्वर्गाची पायरी दाखविण्यास पायऱ्या चढून वर गेला. कन्हैया शांत होता. एक....दोन....तीन....मिनीटें गेलीं. पिस्तुलाचा....धाड........धाड........धाड आवाज झाला. कन्हैया वर गेला, तों नामर्द नरेंद्र पळतांना दिसला. कन्हैया त्याच्या पाठीं लागला एक इंग्रज शिपाई आड आला; पण काळस्वरूपी कन्हैयास कोण काय करणार? कन्हैयानें नरेंद्रास गांठलें. व एका क्षणांत आपलें अवतार कृत्य आटपलें! नरेंद्र मातृद्रोही होता; पण अखेर माताच ती, तिनें नीच नरेंद्राचा नश्वरदेह अंकावर सांवरून धरला! नरेंद्र मातृभूमीवर पहुडला!

वरील गोष्टीस कांहीं दिवस लोटले. कन्हैयाचें कृत्य अन्यायी ठरलें. त्याला फांशीची शिक्षा झाली! बा कन्हैया, देशासाठीं तळमळणाऱ्या तुझ्या आत्म्याला देशोद्धाराचा अन्य मार्ग नव्हता काय? वातावरणांतील विकारास वीवश झालेल्या वेड्या, तुला तो कसा दिसणार?

तुझ्या सारख्या आत्मबलाच्या योग्याला हत्या तडफडून मरण यावें? पण परवश मातेच्या (आडमार्गानें जाणाऱ्या) अल्लड पण पवित्र पुत्रांना ह्या हतभागी जगांत दुसरी जागाच नाहीं!

फांशीचा दिवस ठरला. कन्हैयाचे सोबती त्याची अखेरची भेट घेण्यास जमले होते. प्रत्येकजण अश्रूंची माला गुंफीत होता; पण कन्हैयाच्या मुखावर आनंदाची लकेर विलसत होती कन्हैया मित्रांना धीर देत होता. तो कन्हैया नव्हता ती धीराची मूर्ति होती. भित्रेपणाचा तेथें वास नव्हता. दुःख व काळजीचा लेश नव्हता. आनंदाचें वारें वाहत होतें. व आत्मानंद परिपूर्ण अशी कन्हैयाची मूर्ति ब्रह्मानंदीं तल्लीन होती. फांशीची वेळ आली. शिपाई कन्हैयास नेण्यास आले. सर्वांचीं हृदयें दुःखानें भडभडून आलींत. कन्हैया आनंदानें उचंबळूं लागला. त्यानें सर्वांचा निरोप घेतला. त्याच्या मित्रांनीं कन्हैयाच्या धीरोदात्त मूर्तीला साष्टांग प्रणीपात केला.

सकाळचा समय झाला. कन्हैया फांशीच्या ठिकाणीं उभा राहिला. त्याचा चेहरा अचल होता. विकारांना वाव नव्हता. वासनांचा वास नव्हता. कन्हैया आत्मरंगांत दंग होता. सभोंवति काळजीनें काळवंडलेल्या चेहऱ्यांत, घनवेष्टीत सुर्याप्रमाणें त्या बालार्काची तेजोमय मूर्ति चमकत होती. वेळ झाली, कन्हैयानें मातृभूमीला नमन केलें, व त्यागाच्या तेजानें तळपणाऱ्या त्या तपोनिधीनें, मोहमायेच्या फांसांतून मुक्त करणारा फांस आपल्या गळ्याभोंवति लावला, व मग काय?

अश्रूंच्या ओघानें दुःखाच्या दर्याला भरती आली. हिंदमाता स्वपुत्राच्या रक्तानें न्हाली. लोकांचा देह जळू लागला, जीव तळमळू लागला, व थोड्यांच वेळांत देशस्वातंत्र्यासाठीं तळमळणारा कन्हैयाचा आत्मा स्वर्गांत सानंद भराऱ्या मारूं लागला.

कन्हैयाच्या प्रेमळ मूर्तीच्या दर्शनास लोकसमुदाय वेडा झाला. तुरुंगाचें दार लोकांनीं तुडुंब भरलें. कन्हैयाचा पवित्र देह दोन सोल्जरांनीं दारांत आणला. तें दिव्य तेज तेथें चमकत होतें. तें स्मितास्य आनंदाचें क्रीडांगण भासत होतें. कन्हैयाची मूर्ति गूढ समाधींत लीन झालेली दिसत होती. अश्रु गाळून लोकांचे डोळे सुजले. दुःखानें हृदय दुःभंग झालें. कन्हैयाचा कुसुमाच्छादित पवित्र देह अंत्यविधीसाठीं काली घाटांवर नेण्यांत आला!

त्यानंतर ती सद्गुणांची सगूण मूर्ति, हिंददेशाची पुर्ण भक्ति, योगाची प्रतिमा, व त्यागाची सीमा कधीं कोणास आढळली नाहीं.

वेड्या कन्हैयानें, देशभक्तीनें अंध होऊन आडमार्गाचें अवलंबन केलें; पण त्याच्या इतर सद्गुण समुच्चयाला कोण सादर अभिवादन करणार नाहीं?

वंदे मातरम्

---

## तीळ-गुळ घ्या! आणि गोडबोला.

ले. सांब केशव जोशी. देऊळगांव राजा.

संक्रांत हा सण सुवासिणी स्त्रियांचा! हा सण अस्तित्त्वांत कसा आला याचें पौराणिकदृष्ट्या निरीक्षण करण्याचा आजच्या लेखाचा विषय नसून ह्या सणांत एकमेकांस तीळगुळ देऊन प्रेमभाव व्यक्त करीत असतांना 'तीळ गुळ घ्या आणि गोड बोला' असें म्हणत असतात. त्या सूत्रासंबंधीं विचार करण्याचा मानस आहे.

गोड बोला म्हणजे कसें बोला? दुसऱ्याला जें इष्ट-आवडतें-प्रिय-असेंचना? 'व्यक्ति तितक्या प्रकृति' याप्रमाणें या जगांत जर स्थिति आहे तर दुसऱ्यांना प्रिय कोणतें हें कसें ठरविणार! आपल्याला जें गोड तें दुसऱ्याला गोडच वाटेल अशी आशा करणें व्यर्थ आहे. बरें, गोड किंवा कडू हें ठरविणार कोण? बुद्धीचना! समजा, कांहीं मनुष्यें दरवडेखोरांच्या हातांतून निसटून तुमच्या देखत दाट रानांत दडून राहिलीं आणि मागावून हातांत तरवार घेतलेले दरवडेखोर येऊन तीं मनुष्यें कोठें गेलीं म्हणून तुम्हांस विचारूं लागलीं तर तुमची बुद्धि काय निकाल देईल? त्या दरवडेखोरांना गोड वाटेल असें बोलण्यास लावील! बरें, त्या वेळीं त्या निरापराधी मनुष्यांचा जीव वांचविण्याकरतां हुं हूं करून वेळ मारून न्याल; पण त्या वेळीं इतक्यावर निभावत नसून प्रत्यक्ष तुमच्या प्राणावर बेतली तर आपली बुद्धि काय

निकाल देईल? पहा, आपल्या बुद्धीचा निकाल! मग गोड-सत्य म्हणजे कसें?

कारण वरील प्रसंगांत प्रथम हुं हूं करून वेळ मारून नेली असती तर काय हरकत होती? पण हुं हूं करून वेळ मारून नेणें म्हणजे पर्यायानें खोटें बोलणें होत नाहीं काय? मग सत्याची महति ती काय राहिली? कारण 'नास्ति सत्यात् परोधर्मः' या सूत्राची वाट काय? शिवाय "अश्वमेध शतांचें पुण्य। एकीकडे सत्य वचन। तुळीता सत्य आगळे जाण। मेरु पर्वत दृष्टांतें. ॥१॥" "कोटी पुण्यें जोडिलीं यत्नीं। तीं नासतीं एके असत्य वचनीं।" असें सत्याचें महत्त्व आहे. म्हणून "सत्या परता नाहीं धर्म। सत्य तेंची परब्रह्म। सत्यापाशीं पुरुषोत्तम। सर्वकाळ तिष्टत॥१॥" याशिवाय उपनिषदांतही 'सत्यंवद! धर्मंचर!' यांत सत्यालाच अग्रस्थान दिलें आहे. याशिवाय मनु म्हणतो, "मनुष्याचे सर्व व्यवहार वाणीनें चाललेले असतात, परस्परांचे विचार कळण्यास शब्दासारखें दुसरें साधन नाहीं, सर्व व्यवहाराला आश्रयीभूत असा जो हा वाणीचा झरा तोंच जो गढूळ करून टाकतो तो मनुष्य केवळ मुद्दलाचीच चोरी करतो, म्हणून सत्य बोलत जा" असा त्याचा उपदेश आहे.

अशा रीतीनें सर्वतोंपरीं सर्व धर्मांचें सार जें 'सत्य' त्याला वरील प्रसंगांत हुं हूं करून वेळ मारून नेणें—खोटें बोलणें—म्हणजे सत्याला हरताळ फासल्यासारखें होत नाहीं काय?

सत्य बोलणें हा मनुष्याचा धर्म खरा; पण ज्या सत्य बोलण्यानें अधिकांचें अधिक नुकसान होतें तें सत्य कोणत्या उपयोगीं? कारण सत्यधर्म केवळ शब्दोच्चारणा पुरताच निघालेला नसून ज्या सत्यानें सर्वांचें नुकसान होतें तें सत्यच नव्हे.

कारण "सत्यस्य वचनं श्रेयः सत्यादपि हितं वदेत। यद्भुतहित मत्यंतं एतत्सत्यं मतं मम ॥" (शांतीपर्व) सत्य बोलणें हें प्रशस्त होय, पण सत्यापेक्षांही ज्यांत सर्व भूतांचें हित असेल तें बोलावें. ज्यांत सर्वांचें हित असेल तेंच माझें मतें खरें सत्य होय.

राजकारणांत गढून गेलेले मुत्सद्दी आपलें राजकारण गुप्त न ठेवतां ते खरें बोलूं लागले तर लौकरच चांगलीं राज्येंसुद्धां लयाला जातील! ह्याडांचीं कांडें करून बनलेले वकील लोक जर खरें बोलूं लागले तर वकिलीसुद्धां कोणी शिकणार नाहीं!

अशा कांहीं गोष्टींची सत्यापवादांत गणना करतात. आपल्या शास्त्रकारांनीं प्रसंग ओळखून असत्य केव्हां बोलावें याचे नियम घालून दिले आहेत.

"न नर्म युक्तं वचनं हिनस्ती न स्त्रीषु राजन्न विवाह काले। प्राणात्यये सर्व धनापहारे पंचानृतान्याहुरपातकानीं ॥ १ ॥"

महाभारत—शांतीपर्व.

भावार्थः—

थट्टेंत बायकांजवळ, प्राणावर लग्नाचे वेळीं संकट आलें असतां आणि मिळकत वचावण्यासाठीं, मिळून पांच ठिकाणीं अनृत बोलणें पातक नाहीं.

यावरून बायकांजवळ नेहमींच असत्य बोलावें किंवा जरा कांहीं संकट आलें असतां खोटें बोलावें असा याचा अर्थ नाहीं तर तें केवळ अपवाद आहेत असें समजून तीळगुळ खातांना तें जितकें गोड लागतात तितकेंच पुष्कळांना पुष्कळ सुख होईल आणि परिणामीं जें बोलणें हितकारक होईल असें गोड बोलत जा. असाच शिरोभागीं दिलेल्या सूत्राचा अर्थ समजून एकमेकांस मोठ्या प्रेमानें तीळ—गुळ देतात, व आपलें प्रेम व्यक्त करतात. मग—

घ्या!


प्रिय बांधवांनो!! हा तीळ—गुळ घ्या आणि गोड बोला.!!!

ॐ तत्सत्!

# एक गमतिचा खेळ.

## लहान मुलांकरितां.

हा खेळ खेळण्याकरितां एक कागदी पेटी लागते. टोपीची किंवा बुटाची पेटी असते ती चालेल, नाहीं तर जाड कागद घेऊन आपण एखादी तयार करावी. वरील झांकणाची जरूरी लागत नाहीं.




ह्या पेटीच्या लांबट बाजूला चार लहान लहान कोनाडे चाकूनें कातरावेत. ह्या कोनाड्यांतून उंदराला जातां येईल इतके ते उंच व रुंद असावेत. नंतर वरची बाजु चित्रांत दाखविल्याप्रमाणें खालीं करून पाटावर, टेबलावर अगर गुळगुळीत भागावर ठेवावी.

हा खेळ खेळण्याकरितां प्रत्येकानें पांच पांच गोट्या घ्याव्या आणि ह्या पेटीपासून कांहीं अंतरावर उभे रहावें. नंतर खेळावयास सुरवात करावी. प्रत्येकाला एकेक कोनाडा नेमून द्यावा. त्यांनीं त्या कोनाड्यांतचं गोटी टाकली पाहिजे.


खेळाच्या सुरवातीस २०० वेळां कां ३०० वेळां गोट्या टाकावयाच्या हें ठरवून ठेवावें. नंतर जितके वेळां ह्या कोनाड्यांतून गोटी जाईल, तो आंकडा प्रत्येकाच्या नांवावर मांडून ठेवावा. हा आंकडा त्याच्या त्याच्या कोनाड्यावर मांडला तरी चालतो.

ह्या खेळाच्या योगानें नेम कसा धरावा हें चांगलें कळतें. कांहीं वेळानें मुलें चांगली पटाईत होतात व बिनचूक खेळ खेळतात.

---

## विमानें कशीं करावीं.

एक जाड कागदाचा तुकडा घ्यावा आणि त्याला पंख उघडलेल्या पक्षाचा आकार द्यावा. दोन्ही पंख बरोबर यावे म्हणून मध्यें घडी घालून कापावें.




ह्या पक्षाचें शेपूट बोटांनीं पकडावें व तो पक्षी पुरादिशीं उडवून द्यावा आणि मग काय मजा होते ती पहावी. तुम्हांला हा पक्षी दोन चार हात उडतांना दिसेल आणि नंतर खालीं आलेला आढळेल. खालीं येतां येतां हा पुष्कळ कोलांट्या उड्यां मारील.

ह्यांत कांहीं तरी चुकत आहे असें तुमच्या लवकरच लक्षांत येईल. हें विमान जास्त उंच जाण्यास थोडीशी वजनाची जरूरी आहे असें तुम्हांला कळेल. म्हणून त्याच्या डोक्यावर अ ह्या बिंदूजवळ मेणबत्ती ऊन करून तिचे थेंब पाडावे. आतां हा पक्षी पूर्वीपेक्षां जास्त दूर जाईल. तो अधिक दूर जावा म्हणून आणखी थोडे थेंब त्याच्यावर पाडावेत.

तुम्हीं हा पक्षी कितीं सरळ कापलात तरी तो उजवीकडे किंवा डावीकडे थोडासा वळेलच. हा दोष काढून टाकण्याकरितां खालील युक्ति योजावी. तो उजवीकडे जात असेल तर तो भाग थोडा खालीं दाबावा व डावा पंख वर उचलावा. तसेंच डावीकडे जात असेल तर तो पंख खालीं दुमटावा व उजवा

वर उचलावा. विमान खालीं पडत असेल तर त्याचें डोकें वर उचलावें.

अशा प्रकारें निरनिराळ्या आकारांचीं विमानें बनविलीं असतां मोठी मौज वाटते व करमणूक होते.

---

## पुस्तकाशीं खेळ.

हा खेळ खेळण्याकरितां तुम्ही एखादें जुनें बिनकामी असें पुस्तक घ्या. त्या पुस्तकांत खुणा करावयाच्या असल्यामुळें चांगलें पुस्तक घेऊं नका.

एक शिसपेन्सिल आणा. आणि त्या पेन्सिलीनें पुस्तकांत आंकडे मांडण्यास सुरवात करा. पुस्तक उघडा. नंतर कुठल्या तरी पानावर ५, १०, १५, २०, २५ यांपैकीं एखादा आंकडा मांडा. पुढें १५ २० पानें सोडून दुसरा आंकडा मांडा. अशा रीतीनें कांहीं आंकडे मांडिल्यावर पुढें लहान फुल्या असलेले आंकडे मांडण्यास सुरवात करा. ते आंकडे असे असावेत:—५* १०* वगैरे. अशा प्रकारें आंकडे मांडीत पुस्तकाच्या शेवटपर्यंत जावें.

हा खेळ खेळण्यास दोघां तिघांपेक्षां जास्तजण नसावेत. त्यांनीं आपल्या नांवांच्या कागदाच्या पट्ट्या तयार कराव्यात. ह्या पट्ट्या पुस्तकाच्या लांबीच्या असाव्यात. इतकी तयारी झाल्यावर खेळास सुरवात करावी.

प्रथम एकानें पुस्तक उघडावें. पुस्तक उघडल्यावर जर त्याच्यांत आंकडा नसला तर त्याचा डाव गेला. त्यानें तें पुस्तक दुसऱ्याला द्यावें. त्याला जर आंकडा सांपडला तर ठीक नाहीं तर त्याचाहि डाव गेला. जर त्याला आंकडा सांपडला तर खेळास सुरवात झाली समजा त्या पानावर १० चा आंकडा असला तर तुम्हीं ती कागदाची पट्टी दहा पानें मोजून तेथें ठेवावी. पुनः तुमची पाळी आली आणि पांचाचा आंकडा सांपडला तर तीच पट्टी ५ पानें पुढें ठेवावी. समजा २५चा आंकडा तुम्हांला सांपडला तर तुमची फारच मजा होईल: कारण ती पट्टी एकदम २५ पानें पुढें जाईल. जर फुली असलेला आंकडा सांपडला तर पांच किंवा दहा पानें पुढें ढकलण्यास सांपडतात, एवढेंच नव्हे तर पुनः त्यालाच खेळण्यास सांपडतें असा त्या फुलीचा अर्थ आहे. जो प्रथम शेवट गांठतो त्याचा जय झाला असें समजण्यांत येतें.


अशा प्रकारें हा खेळ फारच मजेचा आहे. तुम्हांला घरीं करमत नसेल किंवा तुम्ही एखाद्या गांवीं हिंडायला गेलांत तर यानें फारच करमणूक होईल.

---

## एक उपयुक्त गांठ.

एकादी लांब दोरी असली व ती आपणास आंखूड करावयाची असल्यास कशी करावी हा कित्येकांना प्रश्न पडतो. त्याच्याकरितां खालील माहिती दिली आहे.

प्रथम सबंध दोरीचा एकतृतीयांश भाग मोजून घ्या. प्रत्येक हाताच्या आंगठ्यानें व शेजारच्या बोटानें दोरीचीं टोंकें धरा. (आ. १).




नंतर दोरीचें टोंक धरलेला उजवा हात डाव्या हाताकडे न्या. आणि दोन्हीं हातांच्या मधल्या बोटांनीं ⅓ भाग धरा. (आ. २) डाव्या हातांतली


दोरी टाकून द्या व ती मध्यावर धरा. नंतर उजव्या हातांतील दोरीचें टोंक बाकीच्या दोरीभोंवतीं आवळून गांठ मारावी. ( आ. ३ व ४ ) त्याचप्रमाणें - डाव्या हातांत त्या टोंकाचीहि गांठ मारावी. ( आ. ५ ) नंतर ७ व्या. आकृतींत दर्शविल्याप्रमाणें दोरी होते. त्याच टोंकांची पुनः एकदां गांठ मारली तर आठव्या आकृतिप्रमाणें दोरी होते.

---


# हातचें सोडून पळत्याच्या पाठीं.



एकदां वाघोबांची स्वारी शिकारीस बाहेर पडली. त्यानें दिवसभर सगळीकडे धांवपळ केली; पण कांहींच सांपडलें नाहीं. इतक्यांत त्याला एक ससा दिसला. तो निजला होता. वाघोबानें त्याजवर



झडप घातली. पंजांत सांपडलेला ससा म्हणतो, " महाराज, मी एवढासा मिरमुटला, माझी चटणीदेखील तुम्हाला पुरायची नाहीं. तें पहा पलीकडे



केवढें मोठें हरीण धांवतें आहे. कसलें तें धिप्पाड आणि खायला लुसलुसीत आणि कुरकुरीत आहे. "



हें ऐकून वाघोबानें त्याला टाकून दिलें, आणि हरिणाची पाठ धरली. पण बोलून चालून हरीणच तें. त्यानें केव्हांच सूंबाल्या केला. हें पाहून वाघोबा परत सशाकडे आले; पण त्यानेंहि धूम ठोकली होती. " अरेरे! किती मी मूर्ख! हातांत सांपडलेला लहान घास टाकून मी वेड्यासारखा मोठ्या घासाच्या मागें लागलों " असें म्हणून वाघोबा रडूं लागले.

---

# शालापत्रकाची चढाओढ.

शालापत्रकाचे वाचकांना बौद्धिक चलन मिळावें म्हणून आम्ही येत्या अंकापासून कांहीं कोडीं देणार आहोंत. तसेंच, शालापत्रकाच्या बालवाचकांकरितांहि आम्ही निराळीं कोडीं अथवा दुसरें कांहीं तरी देणार आहोंत. हीं कोडीं सोडविणाऱ्यांना पुस्तकें बक्षीस ठेवलीं आहेत. एकंदर दहा बक्षिसें आहेत. त्यांतील पांच बालवाचकांकरितां असून पांच इतरांकरितां आहेत. लहान मुलांकरितां ठेवलेलीं बक्षिस–पुस्तकें फार बोधप्रद व मनोरंजक असून सचित्र आहेत.

इतरांकरितां ठेवलेलीं पुस्तकें विद्वान् लेखकांनीं लिहिलेलीं असून संग्राह्य आहेत.

कोड्यांचीं उत्तरें पाठवितांना सोबतचें कूपन फाडून पाठवावें. कूपनाशिवाय आलेल्या उत्तराचा विचार केला जाणार नाहीं. उत्तरें बरोबर पाठविणाऱ्यांचीं नांवें व मिळालेलें बक्षीस दुसऱ्या अंकांत प्रसिद्ध केलें जाईल. उत्तरें दर महिन्याचे आंत पाठवावींत. लहान मुलाचें वय १५ चे आंत असावें व त्यानें याबद्दल वडिलांची अगर पालकांची चिठ्ठी जोडून आमची खात्री पटवावी. तसेंच, आपण स्वतः कोडें सोडविलें आहे अशाबद्दलहि त्यांत उल्लेख करावा. दर खेपेला कोडींच येतील असें नाहीं. कधीं कधीं कविता, गोष्टी, निबंध वगैरेहि मागविले जातील. एखाद्या मुलानें दुसऱ्याकडून कोडें सोडवून घेतलें आहे असा आम्हांस संशय आल्यास त्याला बक्षीस मिळणार नाहीं.

## सर्वांकरितां.

एक तेरा अक्षरी म्हण आहे. त्याचे पांच शब्द होतात. पहिला व पांचवा शब्द आणि दुसरा व चवथा शब्द सारखे आहेत. एक नाहींत. दुसरा शब्द दोन अक्षरी असून त्याचा संबंध समुद्र, नदी वगैरेशीं येतो. पांचवा शब्दहि दोन अक्षरीच आहे. मात्र त्याचा संबंध पाण्याशीं न येतां जमिनीशीं येतो. कित्येक वेळां दुसऱ्या शब्दांतील वस्तु पांचव्या शब्दांतील वस्तूवर बसते व कित्येक वेळां पांचव्या शब्दांताल वस्तु दुसऱ्या शब्दांतील वस्तूवर बसते, हाच त्या म्हणीचा अर्थ आहे. मधला शब्द निरुपद्रवी असून त्याचें काम सुतारासारखें आहे. तो एकाक्षरी आहे. तेव्हां ती म्हण कोणती ?

---

## पंधराच्या आंतील मुलांकरितां.-

१ बिनपाण्याचा समुद्र व बिनवस्तीचें शहर कोठें आहे ?

२ रामाला विचारलें तुझें वय काय ? तेव्हां तो म्हणाला "वडिलांच्या वयाच्या ३/८ माझें वय आहे, व बहिणीचें वय त्यांच्या १/६ आहे. आजपासून चार वर्षांनीं ती वडिलांच्या वयाच्या १/५ होईल व माझ्या वयाच्या १/२ होईल." तर तिघांचीं वयें काढा.

---

| सर्वांकरितां | मुलांकरितां |
|---|---|
| नं. १ शालापत्रक. | नं. २ बालवाचकांकरितां. |

## लहान मुलांकरितां उपयुक्त अशीं पुस्तकें.

नवी आवृत्ति ] **सचित्र अक्षरबोध.** [ नवी आवृत्ति

या पुस्तकांत 'अ' पासून 'ज्ञ' पर्यंत स्वर आणि व्यंजनें हीं सर्व निरनिराळ्या भपकेदार रंगांत त तें अक्षर नांवाच्या प्रथम अक्षरानें दर्शविणाऱ्या चित्रांसह दाखविलेलीं असून १ पासून १० पर्यंत अंकहि वरील पद्धतीनें दाखविलेले आहेत. पुस्तकाचा साईज क्राऊन चतुर्थांशाइतका मोठा ७×९ इंच ठेवला असल्यामुळें अक्षरें व चित्रें फारच सुबक व मोठीं अशीं झालीं आहेत. एकंदर पुस्तक इंग्रजींतील सचित्र रंगीत ए. बी. सी. डी. शिकण्यास उपयोगी अशा पुस्तकाच्या धर्तीवर तयार केलें असल्यामुळें हें पुस्तक लहान मुलांस फारच आवडून त्यावरून तीं आपला धडा सहज शिकतात. किं. ८.

## उजळणीचें पुस्तक.

ह्यांत सर्व मुळाक्षरें चित्रयुक्त दिलीं असून मोडी व बालबोध बाराखड्या तयार करण्याची समजूत थोडक्यांत करून दिली आहे. नंतर मोडी व बालबोध सोपे शब्द मुलांना सहज ओळखण्यासारखे दिले आहेत. पुढें १० अंक सचित्र दिले असून त्यांबरोबरच मुलांस बेरीज व वजाबाकीची समजूत टिंबांच्या आकृतींनीं व गोट्यांच्या चौकटीच्या सहाय्यानें घालून दिली आहे. नंतर पाढ्यांची समजूत दिली असून शेवटीं उजळणी दिली आहे. एकंदरींत हें पुस्तक नवीन तऱ्हेनें मुलांना शिकविण्यास फार उपयुक्त असें झालें आहे. कागद ग्लेज किं. ८१८६

भाग १ ते ६ ] **चिमुकल्या गोष्टी.** [ भाग १ ते ६

ह्या गोष्टींत रोज व्यवहारांत घडणाऱ्याच गोष्टी दिलेल्या आहेत, पण त्या इतक्या मोहक, मनोरंजक व मार्मिक लिहिल्या आहेत कीं, त्या गोष्टींतील तत्त्वबोध गोष्टी वाचतां वाचतांच मुलांच्या मनावर सहज ठसला जातो. पुस्तक वन्नीक टाइपांत सुंदर जाड व ग्लेज कागदावर छापिलेलें असून प्रत्येक गोष्टीचे प्रारंभीं कथानकाचें सुंदर चित्र दिलेलें आहे. एकंदर ह्या गोष्टीचे सहा भाग आहेत. प्रत्येक भागांत दहा गोष्टी सचित्र आहेत, प्रत्येक भागास किं ८४.

## जोडाक्षर-विरहित वाचनपाठ.

हें पुस्तक नुकत्याच अक्षर ओळख झालेल्या मुलांमुलींकरितांच लिहिलेलें आहे. पुस्तकांत एकंदर १७ गोष्टी अगदीं सोप्या भाषेंत, व एकहि जोडाक्षर न येऊं देतां लिहिल्या आहेत. प्रत्येक गोष्टीचे आरंभीं कथानकाचें मूर्तिमंत चित्र दिलें असल्यामुळें गोष्ट वाचण्याचे अगोदरच त्यांतील सारांश मुलांचे सहज लक्षांत येतो. किं. अवघी चार आणे.

**मिळण्याचें ठिकाण**—म्यानेजर—चित्रशाळा प्रेस, पुणें.

॥ ॐ नमः श्रीरामचंद्राय ॥

# आर्यमहौषधालय मु० पो० आंजर्ले.

**कोंकणप्रांतांतील अगदीं ताज्या व शुद्ध वनस्पतींचीं जगत्प्रसिद्ध निर्दोष व रामबाण औषधें.**

**कंदर्पमंजरी पाक—** हा अपूर्व पाक गरिबांपासून तों अमीरउमरावांपर्यंत सर्वांसही अत्यंत उपयोगी असून किंमत माफक ठेविली आहे. यांत मौक्तिक, प्रवाल, लोह, माक्षिक, कस्तूरी, अंबर इ० अत्युच्च गुणकारक पदार्थ असून शिवाय बदाम, पिस्ते, अक्रोड, चारोळी, केशर, वेलची, पंजाबी सालममिश्री, सफेतमुसळी, गत्री, गोक्षुर, शतावरी, आस्कंद, वंशलोचन वगैरे ( ८० ) उपयुक्त वनस्पति घातल्या आहेत. यानें पथ्यावांचून गुण येतो. यापासून कोणत्याही कारणांनीं होणारा व कशाही प्रकारचा शुक्रस्राव, नपुंसकत्व, मूळव्याधि, रक्तदूषणामुळें त्वगरोग, स्त्रियांची धुपणी व गर्भाशयस्थ दोष या भावना त्यांच्या एकंदर उपविकारांसह तत्काल बऱ्या होऊन धातुवृद्धि होते, व शरीर कणखर आणि तेजस्वी बनतें. २० तो० ड० २ रुपये. एकदम ३ डबे घेणारास ५ रुपये.

**स्वर्णधात्री तेल—** हें चारोळी, बदाम, कंकोळ, एला, बहुविध वनस्पतींचीं सत्त्वें व उपयुक्त तेलें अशा अनेक पदार्थांनीं बनविलें असल्यानें याच्या मर्दनापासून अपस्मार, उन्माद, वेड, चक्कर इ० रोगांस जलद आराम पडतो. केंसांस चोळिल्यानें केंस काळेकुळकुळीत, तजेलदार, सडकलांब व मृदु होऊन मेंदु शांत आणि रोगरहित बनतो. यानें मस्तकाचें टक्कल जातें. हें अंगास चोळून स्नान करीत गेल्यानें शरीराचा दुर्गंध जातो. खरूज, गजकर्ण, शिबें, तसेंच तळपाय, तळहात, डोळे व मस्तक यांचा दाह हे विकार खास बरे होऊन निद्रा चांगली येते, आणि नेत्ररोग दुरुस्त होतात. बा० किं० १। रु०


**दंतरक्षक पूड—** ही दांत व हिरड्या यांचे सर्व विकार तत्काल दुरुस्त करून दांत स्वच्छ व मजबूत करण्यांत प्रतिष्ठेची आहे. ड. ६ आणे.

सुरंगी, मालती, कल्हार, गुलबहार, दणाणा, लक्ष्मीविलास इ० बादशाही अति उंचीं अत्तरें व त्याचप्रमाणें गुलाब, हिना, केवडा, चमेली, जाई वगैरे सुगंधी अत्तरें आणि केंसांस लावण्याचीं हरएक प्रकारचीं सुवासिक तेलें माफक दरानें पूर्ण खात्रीचीं मिळतील

**सूचनाः—**वरील औषधें व अत्तरें वगैरे पूर्ण खात्रीचीं असल्यामुळें आज पंचवीस वर्षांत त्यांचा लक्षावधि लोकांस अप्रतिम उपयोग झाला म्हणून त्यांचा नेहमीं फारच खप होत आहे. अनुभवानंतर पूर्ण खात्री पटेलच. औषधें माहितीचे लक्षणांसह रोखीनें अगर व्ही. पी. नें पाठवूं. प्याकिंग व टपाल खर्च वेगळा. घाऊक घेणारांस कमिशन भरपूर. सर्व औषधांच्या आणि आरोग्यरक्षणाच्या माहितीचें सचित्र मोठें पुस्तक देऊं, आमचीं औषधें वगैरे मागविणें तीं खा[illegible]नचूक पत्त्यावर मागवावीं.

**कृष्णशास्त्री बिवलकर, वैद्य.**

REGISTERED B. NO. 179.




पुस्तक ३४. फेब्रुवारी सन १९२३. अंक २.

**विषय.** **पृष्ठ.**


| | |
|---|---|
| आरोग्य विषयक प्रश्नमालिका. .... .... .... .... | २१ |
| थोर पुरुषांच्या आख्यायिका. .... .... .... .... | २४ |
| अशोक. .... .... .... .... | २५ |
| भगिनींशीं हितगुज. .... .... .... .... | २७ |
| लहान मुलांचा व्यायाम. .... .... .... .... | २९ |
| शालापत्रकाची चढाओढ. .... .... .... .... | ३० |
| मीठ खा व गोरे व्हा. .... .... .... | ३२ |
| शास्त्रीय माहिती. .... .... .... .... | ३३ |
| सालस बंडोपंत. .... .... .... .... | ३४ |
| फुलीया. .... .... .... .... | ३५ |
| गमतीचा गुणाकार. .... .... .... .... | ३८ |
| चुटके. .... .... .... .... | ३९ |
| गमतीचा नवा खेळ. .... .... .... .... | ४० |


मुद्रक व प्रकाशक—रा. रा. शंकर नरहर जोशी, चित्रशाळा प्रेस, १०२६ सदाशिव पेठ, पुणें सिटी.

# रंगीत इसाप-नीति.

यांत एकंदर इसापनीतींतील आठ अगदीं सोप्या गोष्टी मोठ्या व जाड टाइपांत दिलेल्या असून प्रत्येक गोष्टीसमोर त्यांतील रहस्य दाखविणारें रंगीत सुंदर चित्र दिलेलें आहे. चित्रें पाहूनच मुलांना गोष्टींतील तात्पर्य कळतें. किं० ८६. ट. ह. ८८६.

# सचित्र इसाप-नीति.

[ उत्तरार्ध. ]

[ नवीन भाषांतर भाग २ रा. ]

वरीलप्रमाणेंच हा दुसरा भाग विक्रीस तयार आहे. याचीं सुमारें ३०० पानें आहेत असून यांत ३५० गोष्टी आहेत. चित्रांची संख्या १५० पर्यंत आहे. किं. १८४

दोन्ही भाग एके ठिकाणीं बांधलेलें सुंदर पुस्तक किं० रु. २

# विद्यार्थ्यांकरितां नाटिका.

शीलं परं भूषणम्.

ही नाटिका प्रसिद्ध कवि-शिरोमणि नारायण वामन टिळक यांनीं केवळ लहान मुलांकरितांच लिहिलेली आहे. यांत शृंगाररस मुळींच नाहीं एवढेंच नव्हे, तर स्त्रीची भूमिका या नाटकांत आणलेलीच नाहीं. शिवाय नाटकाचा विषय नैतिक विचारानें पूर्ण भरलेला असल्यामुळें शाळांतून वार्षिक संमेलनाचे वेळीं मुलांकडून ह्या नाटकाचा प्रयोग करविण्यास तें योग्य आहे. नाटकाचा विषय मनाची योग्यता जास्त किंवा ज्ञानाची योग्यता जास्त हा आहे. पुस्तकांत चार सुंदर चित्रें कथानकास अनुसरून दिलेलीं आहेत; किं० ८४.

म्यानेजर—चित्रशाळा प्रेस, पुणें.

---

# चिमुकलें भारत व रामायण.

महाभारत व रामायण हे आपले राष्ट्रीय ग्रंथ आहेत. यांत आपला प्राचीन इतिहास असून प्रपंच साधून परमार्थ कसा जोडावा हें उत्तम दाखविलें आहे. व्यावहारिक बोधाच्या ह्या केवळ खाणी आहेत. आबालवृद्ध स्त्री-पुरुषांना या ग्रंथांचें ज्ञान होणें अगत्याचें आहे. प्रौढांकरितां आमचीं लोकप्रिय ' भरती युद्ध ' व ' रामचरित्र ' हीं पुस्तकें आहेत. आतां बारातेरा वर्षांच्या मुलांमुलींकरितां ' चिमुकलें भारत ' व ' चिमुकलें रामायण ' हीं दोन पुस्तकें अनुक्रमें आम्हीं रामकृष्णवाक्सुधेचे प्रसिद्ध लेखक रा. कृष्णाजी गोविंद किनरे व रा. विद्याधर वामन भिडे बी. ए. यांजकडून मुद्दाम लिहविलीं आहेत. पुस्तकाची भाषा फारच मोहक व सोपी आहे. वाचतांवाचतांच मुलांच्या मनावर त्यांतील रहस्य ठसावें म्हणून उपदेशपर वाक्यें जाड टाइपांत घातलीं आहेत आणि कथानकांच्या अनुरोधानें हाफटोन प्रोसेसनें तयार केलेलीं भारतांत आठ व रामायणांत सात अशीं सुंदर चित्रें घातलीं आहेत. भारताचीं पृष्ठें १७३ व रामायणाचीं पृष्ठें ८२. छपाई बांधणी सुबक. किं० ८६, व रामायण किं० ८४.

मिळण्याचें ठिकाण—म्यानेजर चित्रशाळा प्रेस, पुणें शहर.

मराठी
# बालपत्रक

येथें शब्द नाहीं शिष्यासी । हें अवघें सद्गुरुपाशीं ।
सद्गुरु पालटी अवगुणांसी । नाना यत्नें करोनी ॥
जें कांहीं आपणास ठावें । तें हळु हळु शिकवावें
शहाणें करून सोडावें । सकळा जनां ॥ १ ॥

रामदास.

पुस्तक ३४. फेब्रुवारी सन १९२३. अंक २

## आरोग्य विषयक प्रश्नमालिका.

अमेरिकेमध्यें आरोग्यासंबंधीं किती काळजी बाळगतात व त्याबद्दल काय काय उपाय योजना करतात याची माहिती आपल्याकडील शिक्षक व विद्यार्थी वर्गाला होणें जरूर असल्यामुळें त्याचा थोडासा विचार करण्याचें योजिलें आहे. अमेरिकेमध्यें शारीरिक शिक्षणाला किती महत्त्व देतात हें पाहिलें म्हणजे त्यांना भावी पिढीबद्दल कशी कळकळ वाटते, हें लक्षांत येईल. लहान बालकें भावी पिढीचे आधारस्तंभ असल्यामुळें त्यांच्याकरितां लागेल तितका पैसा खर्च करण्याचें त्यांना कांहींच वाटत नाहीं. ह्या आरोग्याकरितां त्यांनीं निराळें खातें काढलें असून त्या खात्यावर त्यांनीं निरनिराळे अधिकारी नेमले आहेत. हे अधिकारी प्रत्येक शाळेंत जातात, विद्यार्थ्यांच्या प्रकृतीविषयीं चौकशी करतात व पालकांना वेळोवेळीं सूचना देतात. तेथील शाळेंतील प्रत्येक मुलाचा आरोग्यविषयक पट तयार केलेला असतो व त्या पटावरून या मुलाची प्रकृति सुधारत आहे कां तो दिवसेंदिवस रोगी बनत चालला आहे, हें कळून येतें.

मुलाची प्रकृति, त्याच्या संवयी, घरची स्थिति, खाण्यापिण्याची व्यवस्था वगैरेबद्दल निरनिराळ्या प्रश्नमालिका तेथें तयार करून त्यांचीं उत्तरें मुलांकडून मागवितात. हीं उत्तरें मुलांनीच द्याव-

याचीं असतात. कारण, अशीं उत्तरें द्यावयाचे प्रसंग त्यांच्यावर वारंवार येत असल्यामुळें तीं मुलें आपल्या प्रकृतीकडे विशेष लक्ष देऊं लागतात. शिवाय ही सारी माहिती फार थोड्या वेळांत व व्यवस्थेशीर मिळू शकते. ही माहिती आल्यावर प्रत्येक मुलाच्या वैगुण्याप्रमाणें त्याचे निरनिराळे गट पाडण्यांत येतात व त्यांना अवश्य तें शिक्षण देण्यांत येतें. त्या मुलांना जे प्रश्न विचारण्यांत येतात त्यांचा उपयोग आपल्याकडे केला तर होईल हें जाणून थोड्याशा फरकांनीं आम्ही ते खालीं देत आहोंत.

### आरोग्य विषयक प्रश्न.

विद्यार्थ्याचें वय ——————————

इयत्ता ——————————

शिक्षकाचें नांव ——————————

शाळा ——————————

विद्यार्थ्यांनीं ह्या प्रश्नांचीं उत्तरें स्वतः द्यावींत, परंतु त्यावर सही करूं नये.

१ निजतांना तुमच्या खोलीच्या खिडक्या उघड्या असतात काय?

२ तुम्ही दररोज कमीतकमी दहा तास निजतां काय?

३ सकाळीं तुम्ही ७ वाजतां उठतां का नाहीं?

४ दररोज तुम्ही किती दूध पितां?

५ सकाळीं तुम्ही कांहीं खातां का नाहीं?

६ सकाळीं तुम्ही फळें खातां काय?

७ तुम्ही कॉफी पितां काय?

८ तुम्ही चहा घेतां काय?

९ तुम्ही सावकाश व अन्न चांगलें चावून खातां कीं नाहीं?

१० तुम्ही वेळेवर स्नान करतां का नाहीं?

११ स्नान कोणत्या पाण्यानें गार का ऊन?

१२ तुम्ही दररोज दांत घासतां का नाहीं?

१३ तुमचे दांत किडलेले आहेत काय?

१४ तुम्ही कधीं दंतवैद्याकडे गेलां होतां कां?

१५ तुमचें डोकें नेहमीं दुखतें काय?

१६ तुमचे डोळे खुपतात काय?

१७ फळ्यावरील लिहिलेलें तुम्हांला सहज वाचतां येतें कां?

१८ शिक्षक काय बोलतात हें तुम्हांला स्पष्ट ऐकूं येतें काय!

१९ तुम्हांला थंडी वगैरे वाजते काय?

२० तुम्हांला इतर कोणते रोग आहेत?

ही माहिती दिल्यावर त्यावर विद्यार्थ्यांनीं सही करूं नये. शिक्षकांनीं मुलाच्या न कळत त्यावर त्याचें नांव घालावें असें केल्यानें विद्यार्थ्यांकडून खरी माहिती येईल. विद्यार्थ्यांना यांत चढाओढ आहे अथवा त्याला मार्क किंवा बक्षीस ठेवले आहे असें कळलें म्हणजे ते ही माहिती फुगवून देतात. ह्या प्रश्नांचीं उत्तरें होय किंवा नाहीं या पलीकडे फारशी विस्तृत नसावींत.

ही माहिती खंकलीत करणें फारसें कठिण नाहीं. शिक्षकांनीं प्रत्येक प्रश्नाला "होय" अशीं उत्तरें किंवा "नाहीं" अशीं उत्तरें किती आलीं याचा आंकडा वरिष्ठ अधिकाऱ्यांना कळविला म्हणजे पुरे. हे वरिष्ठ अधिकारी निरनिराळ्या यत्तांचे व निरनिराळ्या शाळांचे आंकडे प्रसिद्ध करून प्रत्येकाची प्रगति कशी होत आहे हें उघडकीस आणतात. ह्या प्रश्नांचीं उत्तरें वर्षांतून एकदां अगर दोनदां निरनिराळ्या वेळीं मागवावींत, म्हणजे ऋतूमानाप्रमाणें विद्यार्थ्यांत काय फरक पडतो हें कळून येईल.

ही माहिती एकत्र गोळा केल्यावर त्यापासून पुढें एकेक सिद्धांत कसे प्रस्थापित करतात हें आपण पाहूं. तत्पूर्वीं ही माहिती खरी आहे किंवा बनावट आहे हा प्रश्न असतो. तथापि हा प्रश्न सामान्य माहितीवरून सुटण्यासारखा असतो. उदा-

हरणार्थ दुधाविषयीं आपण विचार केला तर कोणत्याहि देशांत आपणास असेच आढळून येईल कीं, मूल जसजसें वाढूं लागतें तसतसें त्याचें दूध सुटतें. लहान मुलाचे दुधावांचून अगदींच चालत नाहीं वयपरत्वें दुसऱ्या प्रकारचें पदार्थ मनुष्य खाऊं लागतो. आपण आतां त्यांना दूध, चहा व कॉफी संबंधीं काय अनुभव आला तो पाहूं.

### कोष्टक १

चवथ्या ते आठव्या वर्गांतिल दूध, चहा व कॉफी पिणाऱ्या मुलांचें प्रमाण.

| | ४ थी | ५ वी | ६ वी | ७ वी | ८ वी |
|---|---|---|---|---|---|
| दूध | ७९ | ७४ | ७१ | ६५ | ६० |
| कॉफी | १५ | १९ | २३ | २८ | ३४ |
| चहा | १२ | १४ | १७ | २२ | २५ |

ह्या कोष्टकावरून मुलगा चौथीपासून आठवीपर्यंत म्हणजे साधारणपणें १० ते १४ वर्षांच्या वयापर्यंत दूध कमी कमी पिऊं लागतो. याच्या उलट चहा व कॉफी पिण्याचें प्रमाण वाढूं लागतें असें आढळून येतें. ह्या कोष्टकांतील कॉफी व दूध पिणाऱ्यांची बेरीज केली तर ती ९४, ९३, ९४, ९३, ९४ अशी होते. यावरून जितक्यांचें दूध सुटतें तितके कॉफी पिऊं लागतात असा निष्कर्ष काढण्यास हरकत नाहीं. आपल्या देशांत काय प्रकार असेल हें ठाऊक नाहीं. परतु कॉफी पिणाऱ्यांच्या ऐवजीं चहा पिणारेच असतील असें मानण्यास हरकत नाहीं. तेव्हां ही माहिती गोळा करण्यापासून काय उपयोग करून घेतां येईल हें येथील अधिकारी ठरवितात.

चहा अगर कॉफी सारखी पेयें प्याल्यानें प्रकृतीवर अनिष्ट परिणाम होतो. मुलांचें आरोग्य बिघडतें. त्यांना निरनिराळीं दुखणीं जडतात. त्यांच्या हातुन अभ्यास होत नाहीं. व अखेरीस तीं निरूपयोगी ठरतात. तेव्हां पुढील आयुष्यांत असा प्रसंग येऊं नये म्हणून पालकांना आगाऊ सूचना देणें हें ह्या आरोग्य खात्याचें मुख्य काम असतें. पालकांच्या गरिबीमुळें जरी दुधाचा पुरवठा त्यांना करतां येत नसला तरी चहा व कॉफी सारखी उन्मादक पेयें मुलांना देऊं नये म्हणून त्यांचें मन वळविणें जरूर असतें व तें काम या मंडळाकडून केलें गेलें म्हणजे झालें.

आतां आपण दुसऱ्या कांहीं कोष्टकांकडे पाहूं.

### कोष्टक २

डोकें दुखणें, डोळे खुपणें, अगर हींवताप येणें यांची सरासरी खालील कोष्टकावरून आपणांस कळून येईल. मुलगा जसजसा वाढत जातो तसतसा

| | ४ थी | ५ वी | ६ वी | ७ वी | ८ वी |
|---|---|---|---|---|---|
| डोकें दुखणें | १९ | १७ | १३ | १४ | १२ |
| डोळे खुपणें | १८ | १७ | १५ | १३ | १० |
| थंडी वाजणें | २८ | २४ | २१ | १९ | १८ |

त्याची दुखणीं कमी होत जातात लहानपणीं मुलांच्या अंगांत रोगाबरोबर झगडण्याची ताकद नसते.

लहानपणीं मूल अगदीं नाजूक असतें व तें अगदीं थोडक्या कारणानें आजारी पडतें. जसजसा मुलगा मोठा होत जातो तसतसा तो कमी आजारी पडतो

यास पाहिजे. मोठेपणीं तो सारखा कुरकुर करूं लागला तर त्याच्या प्रकृतींत कांहीं तरी बिघाड झाला आहे असें खात्रीनें समजावें.

तुम्ही दररोज दहा तास निजतां काय हा प्रश्न मुलांना विचारला असतां त्याचेंहि वरीलप्रमाणेंच उत्तर मिळतें. लहानपणीं मुलांना जास्त झोंप लागते. परंतु तीं जसजशीं मोठीं होऊं लागतात, तसतशी त्यांची झोंप कमी होते. दहा तास निजणाऱ्या मुलांचा अनुक्रम खालीलप्रमाणें आढळतो, ९३, ९२, ९०, ८५, ७९.

हें झोंपेचें प्रमाण ऋतुमानाप्रमाणें बदलतें. थंडीच्या दिवसांत मुलें लवकर निजतात व उशीरां उठतात; परंतु उन्हाळ्यांत ही झोंप कमी होऊं शकते. त्याचप्रमाणें सकाळीं उठण्याचें आहे. कांहीं ऋतूंत मुलें लवकर उठतात तर कांहीं ऋतूंत उशीरां उठतात.

ऋतुमानाप्रमाणें बदल होणारे दुसरे कोष्टक म्हणजे हींवतापाचें. हिंवाळ्यांत हींवतापाचें प्रमाण जास्त असतें आणि उन्हाळ्यांत कमी होते.

दररोज किती मुलें स्नान करून येतात याचा आपण विचार केला तर आपणांस असें आढळून येईल कीं, नऊ अगर दहा वर्षांचीं अशीं मुलें शेंकडा ६० सांपडतात. मुलें जसजशीं वाढत जातात तसतसें हें प्रमाण वाढतें. यांतहि ऋतूप्रमाणें फरक होतो. हिवाळ्यांत स्नान करणारीं मुलें थोडीं असतात. परंतु उन्हाळ्यांत मात्र हें प्रमाण वाढतें; तथापि ही माहिती खरी असते अशी खात्री नाहीं. कारण अंघोळ न करतां आपण अंघोळ केली असें खोटें सांगण्याकडे मुलांचा कल जास्त असतो.

तेव्हां अशा प्रकारचे प्रश्न विचारून त्यांचीं उत्तरें आल्यावर पुढें मुलांचें आरोग्य सुधारण्याच्या बाबतींत काय काय उपाय योजना करतां येईल याचा विचार आपण पुढील खेपेस करूं.

---

## थोर पुरुषांच्या आख्यायिका.

आख्यायिका १.

एकदां पेशव्यांचे दरबारीं एक मनुष्य आला. त्या मनुष्याला सर्व भाषा अगदीं चांगल्या येत असत व त्यामुळें त्याची जन्मभाषा कोणालाच ओळखतां येत नसे. पेशव्यांचे दरबारचे लोक किती शहाणे आहेत हें पाहण्याकरतांच तो आला होता. दरबारीं आल्यावर नानांनीं त्यांची जन्मभाषा ओळखण्याचें वचन देऊन त्यांस आपले घरीं वस्तीस बोलावलें.

रात्रीं नानांनीं एका चाकरास सांगितलें कीं, हा मनुष्य निजला म्हणजे रात्रीं माठांतल्या गार पाण्याचे १०-१५ शितोडे याचे अंगावर टाक व तो काय बोलतो तेवढें मला येऊन सांग.

चाकरानें सांगितल्याप्रमाणें काम केलें. रात्रीं थेंब टाकतांच तो मनुष्य आपले मातृभाषेंत [ म्हणजे त्याच्या गुजराथी भाषेंत ( त्रासून ) ] बडबडला. ते शब्द चाकरानें ऐकून नानांस कळविले. मग दुसरे दिवशीं नानांनीं तुमची भाषा गुजराथी आहे असें त्या मनुष्यास कळविलें. आपली भाषा कशी ओळखली याचें त्या मनुष्यास आश्चर्य वाटलें व त्यानें त्याबद्दल नानांस प्रश्न केला. तेव्हां नानांनीं सांगितलें, " अहो, मनुष्य जेव्हां भानावर नसतो

तेव्हां तो आपले भाषेंत बडबडतो. त्या वेळीं त्याला मुळींच भान नसतें. तुमची गोष्टदेखील मीं रात्रीं तुम्ही भानावर नसतानांच ओळखिली.

आख्यायिका २.

एकदां टिपूनें पेशव्यांचें शहाणपण पाहण्याकरतां एका छानदार कलाबुतूनें, मोत्यांनीं व जरानें मढविलेले पिशवींत चांगले मोठे जोंधळ्याचे दाणे त्यांचेकडे पाठविले. इकडे पेशव्यांचे दरबारचे लोकांना वाटलें कीं, कांहीं तरी छानदार नजराणा असेल, पण मागाहून पाहतात तों जोंधळ्याचे टप्पूसदार दाणे! ते पाहून सर्वांस आश्चर्य वाटलें, पण नानांनीं तो कावा ओळखून त्यांजकडे त्याच्या लाह्या करून पाठविल्या. लाह्या पाहून टिपू मनांत शरमला व त्यानें मग सर्व लोकांस फोड करून सांगितली ती अशीः—

"मीं पेशव्यांकडे दरबारचें शहाणपण पाहण्याकरितां जोंधळे पाठविले व त्यांत माझा त्यांना सांगण्याचा असा अर्थ होता कीं, आमचेकडे या जोंधळ्याचे दाण्याप्रमाणें १०-१० जणांना पुरून उरणारे शिपाईगडी आहेत; परंतु ते त्यांनीं ओळखून आम्ही तुमच्या लाह्या करूं असें या लाह्यावरून सांगितलें.

आख्यायिका ३.

एकदां पेशव्यांचे दरबारीं एका कुशल कारागिरानें एक सोन्याची फक्कड आंगठी केली. त्यांत खडीसाखरेचा खडा बसवून त्यावर पैलूच पैलू पाडले. ते असे कीं, ते खडीसाखरेचे आहेत असें वाटूच नये, अशी आंगठी करून त्यानें ती दरबारीं पाठविली. हे पैलू कशाचे पाडले आहेत हें कोणास ओळखूं येईना. मग नानांनीं ती हातांत घेऊन बराच विचार केला; पण कळेना. शेवटीं त्यांवर २-३ माशा येऊन बसल्या. त्या तीवरून कांहीं उठल्या नाहींत. तेव्हां नानांनीं हा कांहीं तरी गोड पदार्थ असावा अशी अटकळ करून ती आंगठी 'रामपात्र' भर पाणी मागवून त्यांत टाकली. कांहीं वेळानें तो खडा त्यांत विरघळला. मग नानांनीं तें पाणी चाखून ती खडीसाखरेची असावी असें सांगितलें.

---

## अशोक.

लेखकः—ग. म. केळकर–केळयें. पो. बसणी (रत्नागिरी)

ज्यानें फार प्राचीन काळीं आपले पराक्रमानें राज्य मिळविलें, आणि बौद्धधर्माचा सर्वत्र प्रसार केला त्या अशोकाचें अत्यल्प चरित्र मराठी शालापत्रकाचे बालवाचकांकरितां सादर करीत आहें.

अशोक हा इसवी सनापूर्वी या भरत खंडांत पहिला चक्रवर्ति राजा झाला. याचे आजाचें नांव चंद्रगुप्त. हा महापराक्रमी होता. याचा मुलगा बिंदुसार आणि बिंदुसाराचा मुलगा अशोक.

अशोकाची आई फार चतुर स्त्री होती. ती एका गरीब ब्राह्मणाची मुलगी. तिजवर बिंदुसाराचें मन बसलें, म्हणून त्यानें तिच्याशीं लग्न केलें. त्यामुळें राजाचें लक्ष तिच्याकडे जास्त जाऊं लागलें. हें इतर राण्यांस सहन न होऊन त्या तिचा द्वेष करूं लागल्या. आणि त्या तिची व राजाची मुळीं भेटच होऊं देत नसत. म्हणून तिनें पुरुषवेश घेऊन राजाजवळ नापिताचें काम केलें. आणि पुन्हा राजाची

मर्जी संपादन केली, व पट्टराणीचें पद पटकाविलें. तिला पहिला पुत्र झाला त्या वेळीं तिला प्रसव वेदना मुळींच झाली नाहीं म्हणूनच मुलाचें नांव अशोक ठेविलें. अशोक हा लहानपणीं अतिक्रूर व कुरूप होता. बापाच्या मनांत त्याला राज्यपद द्यावयाचें नव्हतें. परंतु त्यानें तें स्वपराक्रमानें बळकाविलें. एवढेंच नव्हे तर सर्व उत्तरप्रांत व दक्षिणेकडेहि त्याचा प्रवेश झाला. मग काय विचारावें त्यास वाटूं लागलें कीं, आपणास इंद्रपदच प्राप्त झालें. पुढें तो इतका क्रूर बनला कीं, आपले कालक्रमणासाठीं लोकांचे हाल हाल करून मारणें, त्यांना त्रास देणें, यांतच त्याला आनंद वाटूं लागला.

त्यासाठीं त्यानें शहराबाहेर एक मोठी बाग रस्त्याचे बाजूस तयार केली. आणि तिच्यांत लोकांचे हाल करण्याच्या नानायुक्त्या योजून तीं सर्व साधनें तेथें लावून ठेविलीं. आणि कोणी येणारा जाणारा सांपडला कीं, त्यास धरून त्याचे हाल हाल करून, त्याचे दूत त्यास जिवानिशी मारीत असत. असा क्रम पुष्कळ दिवस चालला. एके दिवशीं एक बौद्ध भिक्षु त्या रस्त्यानें जात असतां दोन प्रहरच्या उन्हानें त्रासल्यामुळें तो त्या बागेंत बसण्यासाठीं आला. त्याला त्या राजाच्या यमदुतांनीं पकडून नेलें. त्या वेळीं त्याच्या मनाची स्थिति काय झाली असेल त्याची वाचकांनींच कल्पना करावी. याचे पूर्वीं एका मनुष्याला त्यांनीं पकडून आणिलें होतें. आणि त्याला नानाप्रकारें छळून त्यांनीं यमसदनास पाठविलें. नंतर या भिक्षूची पाळी आली. तो महासाधु होता. त्याचें तारण परमेश्वर न करील तर कोण करणार ? त्यास त्या यमदूतानें तापलेल्या तेलाच्या कढईत टाकलें. तेव्हां तो सुधन्व्याप्रमाणें त्यांत ईश्वरभजन करीत स्वस्थ पडून राहिला. तें पाहून त्या यमदूतांला मोठें नवल वाटलें. तेव्हां त्यांनीं ही हकीगत राजास कळविली तेव्हां तो लागलाच तेथें आला आणि त्यानें त्या भिक्षूला कढईतून बाहेर काढलें. पुढें तो त्याला शरण गेला व त्यानें त्याच्यापासून गुरुपदेश घेतला. तो भिक्षु बौद्धधर्मी असल्यामुळें त्यानें राजाला "अहिंसा परमो धर्मः" या तत्त्वाचा उपदेश केला आणि तो राजाला पटला. लागलीच त्याची वृत्ति पालटली. असें उदाहरण क्वचितच सांपडेल.

ज्या राज्याच्या भोजनाकरितां रोज हजारो प्राणी मरावयाचे तेथें किड मुंगीसुद्धां मारावयाची सक्त मनाई झाली. जो पूर्वीं राक्षसी कृत्यें करी तोच आतां अगदीं शांतीचें माहेर घर झाला. तो ज्या बोधिवृक्षाखालीं बसे तो वृक्ष त्याच्या एका राणीनें एका रात्रींत तोडून नाहींसा केला. परंतु राजाचे हातून तिचें कोणत्याही प्रकारें पारिपत्य झालें नाहीं. ज्यानें पूर्वीं स्त्रियांस जिवंत जाळलें तोच आतां शांत वृत्तीचा बनला. तो स्वतः आर्यधर्माचा असतां त्याचे मनावर बौद्धधर्माचीं तत्त्वें पूर्णपणें बाणलीं. जरी त्यानें पूर्वीचा आपला ब्राह्मणधर्म सोडला तरी त्या धर्माचा छळ केला नाहीं ही गोष्टही लक्षांत ठेवण्यासारखीच आहे.

अशा प्रकारें त्यानें बौद्धधर्माचा आपण स्वतः स्वीकार केला, एवढेंच नव्हे तर त्याच्याबद्दल जिवापाड मेहनत करून त्यानें तो धर्म उर्जितावस्थेस आणला. त्यानें इ. स. पूर्वीची बुद्धाची महासभा भरविली. बौद्धधर्माचा निर्माल्यवत् झालेला धर्मगुरु मोगलीपुत्र शिष्य यांस त्यानें जी एक मोठी सभा भरविली होती तिचा अध्यक्ष केलें. आणि सर्व भिक्षूंची परीक्षा घेऊन, धर्मपुस्तकें शुद्ध करून त्यांचीं भाषांतरें करून वाटलीं. मोठमोठे धर्मपरायण भिक्षु देशोदेशीं उपदेशार्थ पाठविले. फार काय सांगावें, आपला मुलगा महेंद्र व कन्या संगमित्रा ह्यांना सुद्धां भिक्षुवेष देऊन धर्मप्रसारार्थ पाठविलें. आणि जिकडे तिकडे शीलालेख व स्तंभ उभे करून

लोकांस कायमचे ऋणी करून ठेविलें आहे. ते शिलालेख बहुतेक पाली भाषेंत आहेत. एवढें सांगून हा अगदीं त्रोटक चारित्रलेख पुरा करून वाचकांची रजा घेतों.

---

# भगिनींशीं हितगुज.

लेः—सौ. मनोरमाबाई जोशी

प्रिय भगिनींनो ! गृहशिक्षण संपादून आपण ' गृहिणी ' या पदाला योग्य झालों म्हणजे आपलें कर्तव्य संपलें असें नाहीं. तर ' गृहरत्नानिबालका ' याप्रमाणें सर्व घराची शोभा जे बालक त्याची योग्य जोपासना करून शारीरिक, मानसिक, नैतिक व शिक्षणाबद्दल काळजी घेऊन, भरतभूमीला भूषणीभूत होईल असा देशभक्त तयार करणें हें अत्यंत जोखमीचें काम आपणांवर आहे. प्रत्येक भगिनीनें ' वीरमाता ' या विशेषणानें अलंकृत करून घेण्याचा प्रयत्न करणें जरूर आहे. आणि आपण मनावर घेतल्यास हा आपल्या हातचा मळ आहे. पण भगिनींनो ! आपलें बरेंच चुकत आहे हें खास !

मुलांच्या शारीरिक वाढीची पायमल्ली आपणांकडूनच केली जाते ! लहान मुलास जेवणाची इच्छा नसून सुद्धां आपण पुष्कळ वेळां त्यास ढोसढोसून जेऊं घालतों. कित्येक भगिनी तर मुलगा रडावयाचें कारण त्याला लागलेली भूक हें समजून बळेंच त्याला जेऊं घालतात. कित्येक तर नेहमींच मुलांच्या हातांत खाण्याचा पदार्थ देतात. पण रडण्याच्या कारणाची अशी मीमांसा लावून त्याचें रडें अशा तऱ्हेनें थांबविण्याचा प्रयत्न केला असतां काय स्थिति होते ?

जें अन्न शरीर वाढीला कारणीभूत होत असतें तेंच मुलांस पचेनाशें झाल्यामुळें अपायकारक होतें. आणि त्यामुळें मुलाचें शरीर म्हणजे रोगांचें माहेरघर बनून जातें. रोगांचें बीजारोपण झालें म्हणजे त्याचा परिणाम मुलें अशक्त, कुजट, रोगी बनून लौकरच मृत्युमुखीं पडतात; आणि लहान मुलांची मृत्युसंख्या वाढण्यास हेंच प्रबळ कारण आहे.

तेव्हां भगिनींनो ! मुलाच्या खाण्यांत नियमीत व व्यवस्थितपणा असणें अगत्याचें आहे. तसेंच मुलांचे कपडे साधे जरी असले तरी ते स्वच्छ असणें जरूर आहे. नाहीं तर कित्येक मुलांच्या कपड्यांस आठ आठ दिवस पाणी लागत नाहीं. त्यामुळें ते कातड्यासारखे रठ्ठ बनतात. पण हें अगदीं वाईट !

मुलें हीं निसर्गतःच अनुकरणप्रिय असतात. त्यांच्या समोर जसा कित्ता असेल तसा ते अजाणता गिरवीत असतात. हा त्यांचा दोष आहे असें नाहीं. तर हा त्यांचा मूळ स्वभावच आहे. तेव्हां प्रथम मुलांच्या समोर पहिला कित्ता ठेवण्याची जबाबदारी आपणांवर आहे. कारण बालपणीं आईचा जितका लळा असतो तितका दुसरा कोणाचाच नसतो. तेव्हां मातृपद स्वीकारण्यापूर्वींच आपलें वर्तन नमु-

नेदार असलें पाहिजे. कारण दुसऱ्यांस चांगल्या संवयीं लागाव्या अशी मनांतून प्रबळ इच्छा असेल तर स्वतः आपली वर्तणूक उत्कृष्ट ठेवून आपण त्या कामास पात्र आहोंत अशी इतरांची खात्री झाल्याशिवाय 'मातृपद' स्वीकारणें म्हणजे जगांत एका अजगरास जन्म देण्यासारखें आहे. कारण 'खाण तशी माती' किंवा 'बीज तैशीं फळें' ही गोष्ट नेहमीं लक्षांत ठेवली पाहिजे.

मुलें ही राष्ट्राचे भावी आधारस्तंभ होत. तेव्हां ते सुशिक्षित निपजून नियमित, व्यवस्थित, उद्योगी, आज्ञाधारक, परोपकारी, मितव्ययी, मेहनती, निर्व्यसनी व गुणी निपजण्याकरतां वर दिलेल्या मालिकेंतील प्रत्येक गुण आपल्या आंगीं परिपूर्ण असणें अत्यंत आवश्यक आहे. कारण लहानपणीं लागलेला गुण जन्मपर्यंत रहातो.

पुष्कळ वेळां मुलांच्या नैतिक भावनेस आपणच निराळें वळण देतों.

मुलांस खोटें बोलावयास कोण शिकवितो? तर आपणच! मुलांना फार धाकांत ठेवण्याचा प्रयत्न केला असतां तीं खोटीं बोलूं लागतात. खरें सांगितलें असतां क्षमा केली जाते, शिक्षा होत नाहीं. अशी मुलांची खात्री झाली म्हणजे तीं सहसा खोटें बोलत नाहींत. खरें सांगितल्यावर कधींही शिक्षा करूं नये. मात्र पुन्हा असें न करण्याविषयीं ताकीद द्यावी. मुलांशीं प्रेमळपणानें वागावें, त्यांचें म्हणणें शांतपणानें ऐकून घ्यावें. त्यांचे आंगावर खसकन् ओरडूं नये. बारीकसारीक अपराधाबद्दल शिक्षा करूं नये; किंवा फडाफड बोलूं नये. एकदां, दोनदां, तिनदां सांगून जर मुलगा ऐकणार नाहीं तर शासन केल्यावांचून राहूं नये. शिक्षा करणें ती अपराधाचे मानानें असावी. क्षुल्लक अपराधास कडक शिक्षा कधींही करूं नये. किंवा रागाचे भरांत तोंडसुख घेऊं नये. जरा कांहीं झालें कीं लगाव श्रीमुखांत, घे गालगुचा अशी पुष्कळ भगिनींस संवय असते; पण हें फार वाईट! यामुळें आपला हेतु एका बाजूला राहून मुलांच्या मनांवर व शरिरावर अनिष्ट परिणाम पडून मुलें जास्त लबाड बोलूं लागतात. प्रियभगिनींनो! ही साधी गोष्टसुद्धां आपल्या लक्षांत येत नाहीं असें आपलें पुष्कळ ठिकाणीं चुकतें.

तेव्हां भगिनींनो! अशा चुक्यांचा परिणाम पुढें भयंकर होतो. तो होऊं नये म्हणून वेळींच सावध रहाणें जरूर आहे. तुकाराम, रामदास, शिवाजी, बाजी देशपांडे वगैरे विभूतींना जन्म देणारे तसेच स्वामी विवेकानंद, स्वामी रामतीर्थ, लो० टिळक, महात्मा गांधी अशा महाविभूतींना जन्म देऊन त्यांना सर्व जगास वंद्यनिय बनविण्यास आपणच कारण आहोंत. आतांही प्रयत्न केल्यास अशी नररत्नें तयार करणें आपले स्वाधीन आहे; पण प्रबळ इच्छा मात्र पाहिजे.

# लहान मुलांचा व्यायाम.

जगांतील सर्व ठिकाणचीं मुलें कोणत्या तऱ्हेचा व्यायाम करतात हें लहान मुलांना ठाऊक पाहिजे. म्हणजे त्यांचे पाहून व्यायाम करण्याची हौस उत्पन्न होईल. सोबतच्या चित्रांतील मुलें अमेरिकेंतील असून त्यांचे आईबाप त्यांना लहानपणापासून कांहीं ना कांहीं व्यायाम करण्यास लावीत आले आहेत. आपल्या इकडील आईबापांनींसुद्धां त्यांचेंच अनुकरण करून मुलें सुदृढ होण्यास व पुष्कळ वर्षें जगण्यास मदत केली पाहिजे.

हें मूल पांच वर्षांचें असून एका दांडीवर कसरत करीत आहे. ह्याची ही संवय अगदीं रोजची



आहे. हें मूल दोन महिन्यांचें झालें, तेव्हांपासून त्याच्या आईबापांनीं त्याला दांडीवर लोंबकळण्यास शिकविलें.

हा सर्वांत लहान मुलगा सायकलीवर चांगला बसतो. ह्याचें वय फक्त २॥ वर्षांचें आहे. ह्यानें स्पेनमध्यें सायकलीवर बसण्यांत एक चांदीचा प्याला मिळविला.



हें तीन वर्षांचें मूल डबलबारवर कसें झोंके घेत आहे पहा. नुकत्याच भरलेल्या लहान मुलांच्या प्रदर्श-




नांत ह्या मुलाचें अवयव चांगले पिळदार आहेत म्हणून ह्याला बक्षीस मिळालें.

हें अठरा महिन्यांचें मूल पहा कसें झाडा-



वर चढत आहे. झाडावर चढण्याच्या संवयीमुळें त्याचे दंड, मांड्या वगैरे मजबूत झाल्या आहेत.

ह्या मुलाला उत्कृष्ट पोहता येते. याचें वय फक्त ५ वर्षांचें आहे. याला खोल पाण्यांत चांगल्य



बुड्या मारता येतात. तो पोहण्याच्या कड्यावर पोहत आहे.

---

## शालापत्रकाची चढाओढ.

मार्गाल महिन्यांत दिलेल्या कोड्यांचीं उत्तरें बऱ्याच वाचकांकडून आलीं त्यांपैकीं ज्यांनीं उत्तरें बरोबर पाठविलीं त्यांचीं नांवें खालीं दिलीं आहेत. त्यांना द्यावयाचीं बक्षिसें त्यांच्याकडे रवाना होतील. लहान मुलांच्या चढाओढींत पहिल्या प्रश्नाचें उत्तर कोणाकडूनच समाधानकारक न आल्यानें आम्हीं पुन: तेंच कोडें सर्वांकरितां ठेवीत आहों.

पहिल्या कोड्याचें उत्तर "गाड्यावर नाव व नावेवर गाडा."

उत्तर बरोबर पाठविणारांचीं नांवें.

१ गणेश कृष्ण कुळकर्णी, कोल्हापूर.
२ कृष्णाजी रामचंद्र देशपांडे, उमरखेड.
३ पंढरीनाथ रामकृष्ण आलेगांवकर, खडकी.
४ पु. दा. जोशी, इचलकरंजी.
५ शंकर खंडेराव पुरंदरे, पुणें.
६ महादेव बळीराम चोरे, आगर.
७ गणेश गोपाळ कुळकर्णी, पुणें.

यांपैकीं शेवटचे गृहस्थ रा. कुळकर्णी यांचें उत्तर

अगदीं शेवटीं आल्यामुळें व आम्हीं जाहीर केलेली मर्यादा संपल्यामुळें त्यांना बक्षीस देतां येत नाहीं.

खालील गृहस्थाकडून कोड्याचें उत्तर जरा निराळें आलें तें असें.

‘ गाड्यावर होडी व होडीवर गाडी ’ परंतु त्यांचा नामनिर्देश करण्यापलीकडे आम्हांस कांहीं विचार करतां येत नाहीं.

१ वासुदेव जनार्दन सिद्धये, मुंबई.

२ वासुदेव गोविंद गोडबोले, केळये, रत्नागिरी.

बक्षीस मिळणाऱ्या सहा गृहस्थांना अनुक्रमें खालील पुस्तकें बक्षीस मिळालीं आहेत.

१ अर्वाचीन महाराष्ट्र.

२ अर्वाचीन महाराष्ट्र.

३ सामर्थ्यवान् विचार.

४ विष्णुशास्त्री चिपळूणकरकृत विद्वत्त्व, कवित्त्व व वक्तृत्त्व.

५ सदर.

६ सदर.

### लहान मुलांकरितां.

उत्तर, ४५, १०, ३.

दुसऱ्या कोड्यांचीं बरोबर उत्तरें पाठविणाऱ्यांचीं नांवें.

१ विश्वनाथ पुरुषोत्तम जोशी, इचलकरंजी.

२ रामचंद्र धोंडो देवळे, पुणें.

३ राजाराम दत्तात्रय गोडबोले, केळये, रत्नागिरी.

४ वासुदेव यशवंत पांडे, उमरखेड.

पहिल्या कोड्याचींहि वरींच उत्तरें आलीं आहेत. परंतु प्रत्येकाची समज अशी झालेली आहे कीं, बीनपाण्याचा समुद्र व बीनवस्तीचें शहर हीं दोन्हीं निरनिराळीं आहेत; परंतु ही समज चुकीची आहे. दोहींचें उत्तर एकच पाहिजे.

बक्षीस पुस्तकें अनुक्रमानें दिलीं आहेत.

१ ध्रुव व चिलीया.

२ साक्रेटिसाचें चरित्र.

३ लक्ष्मीपूजन अथवा भाऊबीजेची ओंवाळणी.

४ चिमुकलें रामायण.

### नवी चढाओढ.

१५ वर्षांच्या आंतील मुलांकरितां.

पाडव्याच्या सणाला अनुलक्षून एकादी गोष्ट लिहा. अटी पूर्वीप्रमाणें. पसंत गोष्टी शालापत्रकांत छापण्यांत येतील. पहिल्या पांच नंबरांना बक्षिसें ठेवलीं आहेत.

### सर्वां करितां

बिनपाण्याचा समुद्र व बिनवस्तीचें शहर कोठें आहे ?

### सर्वांकरितां.

| |
|---|
| नंबर ३. |
| कूपन |

### मुलांकरितां

| |
|---|
| नंबर ४. |
| शालापत्रक |

# मीठ खा व गोरे व्हा.

आपण मीठ रोज खातों. व आपलें मिठाशिवाय अगदीं अडून रहातें. पण हें मीठ कोठून येतें काय येतें, तें कसें तयार करतात, त्याचें आणखी किती उपयोग होतात हें आपणांस ठाऊक नसतें. मीठ जसें माणसाला लागतें तसें कांहीं जनावरांनाहि लागतें. मीठ खाणींत, पाण्यांत व विहिरींत सांपडतें. आपण स्वयंपाकघरांत जें मीठ वापरतों तें पांढरें शुभ्र असतें. तथापि खाणींत सांपडणारें मीठ निरनिराळ्या रंगांचें असतें. त्याचे तांबडे, निळे, हिरवे, पिंगट वगैरे रंग असतात. कांहीं देशांत तर मिठाचा उपयोग नाण्याकडे करतात. आपल्या रुपये, आणे वगैरेंना जशी किंमत असते तशी आफ्रिकेंत मिठाला असते.

आतां मिठाच्या खाणी कशा झाल्या हें आपण पाहूं. सध्यां जेथें जमीन आहे तेथें एकदां समुद्र होता. पुढें भूकंप झाला आणि समुद्राचा तळ वर येऊन तेथून पाणी हटलें. याच तळाची जमीन झाली. ह्या जमिनीवर मिठाचे थर राहिले आणि त्याच्या पुढें खाणी झाल्या.

उटा नांवाचा एक प्रांत आहे. त्या ठिकाणचीं शहरें मिठाच्या खडकावर बांधलीं आहेत. हे मिठाचे खडक फोडून तेथून एक रेलवे रस्ता बांधला आहे. ह्या ठिकाणीं पुष्कळ मीठ असलें तरी तें कोणी काढून विकीत नाहीं. कारण तेथें मीठ विकत घेणारेच कोणी नाहींत. लोकांना लागणारें मीठ प्रत्येकाच्या विहिरींत सांपडतें.

युरोप खंडांत एक शहर आहे. त्या ठिकाणीं एक आश्चर्यकारक मिठाची खाण आहे. ह्या खाणींतून सात आठशें वर्षें मीठ काढीत आहेत तरी तें संपत नाहीं. ही खाण ५०० मैल लांब, २० मैल रुंद व किती तरी फूट खोल आहे. तेथील मीठ अगदीं स्वच्छ आहे. ही खाण एखाद्या मोठ्या घराप्रमाणें आहे, कारण तिला चार मजले आहेत. खाणींत हजारों माणसें काम करीत आहेत. त्यांच्यांपैकीं बहुतेक तळमजल्यावर रहात आहेत, ह्या तळमजल्यावर किती तरी घरें, शाळा, देवळें, बाजार वगैरे आहेत. जेव्हां आंतमध्यें प्रकाश पडतो, तेव्हां हें मिठाचें शहर किती सुंदर दिसत असेल याची आपणांस कल्पना नाहीं. ही खाण जगांतील सर्व खाणींत अप्रतीम आहे. मिठाचे उपयोग पुष्कळ आहेत. मिठाशिवाय आपलें रक्त शुद्ध रहाणार नाहीं. मीठ नसलें तर आपल्या खाण्याचें पुष्कळ पदार्थ सोडून द्यावे लागतील. मिठाखेरीज गाई चांगलें दूध देत नाहींत, आणि मेंढीच्या पाठीवर दाट उबदार लोकर वाढत नाहीं.

कापूस कांतून जे कपडे विणतात त्यांना कपडे पांढरे शुभ्र करण्याकरितां मीठ लागतें. मिठामध्यें आपल्याला किती तरी पदार्थ खारून ठेवतां येतात. ज्यांना साबू करावयाचा असतो किंवा कांच करावयाची असते त्यांना मिठाचा उपयोग फार होतो. तेव्हां यावरून मिठाची किंमत सोन्यासारखी आहे असें आपणांस कळून येईल.

मिठाचा व रंगाचा फार निकट संबंध आहे असें म्हणतात. ज्यांचे पूर्वज फार मीठ खात असत त्यांचा रंग गोरा असतो असें शास्त्रज्ञ म्हणतात. युरोपांतील लोक गोरे आहेत. चीन, कोरीया, हिंदुस्थान, जपान वगैरे ठिकाणचे लोक पिवळे आहेत. मलाया द्विपकल्प व अमेरिकेच्या कांहीं भागांतील लोक पिंगट आहेत आणि आफ्रिकेंतील लोक काळे आहेत. रंगाचा व मिठाचा परस्पर संबंध आहे यांत शंका नाहीं. ज्या ठिकाणीं मिठाची जास्त पैदास होतें त्या ठिकाणीं रहाणारे लोक गोरे असतात असा निष्कर्ष काढण्यास हरकत नाहीं. युरोपमधील लोक गोरे असण्याचें कारण तेथें मिठाचा पुरवठा भरपूर आहे हेंच होय असें शास्त्रज्ञ म्हणतात. चीन वगैरे देशांत मीठ आहे पण सरकारला मिठावर कर बसविणें सोईचें आहे असें वाटतें. म्हणून लोकांना भरपूर मीठ खावयास मिळत नाहीं. हिंदुस्थान, चीन वगैरे देशांत तांब्याभर समुद्राचें पाणी आणून तें उन्हांत ठेवून त्याचें मीठ करणें म्हणजे एक गुन्हाच समजतात. त्यामुळें गरीब लोकांना मीठ मिळणें कठिण असतें. ज्या ठिकाणीं मीठ कमी त्या ठिकाणीं लोक काळे असतात असा अनुभव आहे. आफ्रिकेच्या पश्चिम किनाऱ्याला मीठ म्हणजे काय चीज आहे हें लोकांना माहीत नाहीं. " हा मनुष्य जेवतांना मीठ खातो " म्हणजे आपल्याकडील भाषेंत तो रोज पक्वान्नें झोडतो असें म्हणण्यापैकीं तिकडे समजतात. आपण आपला रंग मीठ खाऊन पालटूं असें म्हणणें योग्य नाहीं. कारण एकाएकीं असा बदल होणें शक्य नाहीं.

मनुष्याच्या शरीरांत जर योग्य प्रमाणापेक्षां कमी मीठ गेलें तर त्यापासून रोग उद्भवतात. तेव्हां आरोग्यदृष्टया शरीरांत मिठाचा भरपूर पुरवठा होणें जरूर आहे. सध्यां सरकारनें मिठावरील कर दुप्पट करण्याचें योजिलें असल्यामुळें आपल्या राष्ट्रावर कोणती आपत्ती कोसळणार आहे कोणास ठाऊक ?

---

# शास्त्रीय माहिती.

एक जस्ती पत्र्याचा तुकडा व दुसरा तांब्याच्या पत्र्याचा तुकडा असे जिभेच्या वरच्या बाजूस एक व खालच्या बाजूस एक असे धरावे. दोहोंचा जोंपर्यंत संगम केला नाहीं; तोंपर्यंत कांहीं कार्य अनुभवास येत नाहीं. परंतु दोन्ही एकमेकांस लावून धरिले कीं, विद्युच्छक्ति उत्पन्न होऊन जिभेवर एक प्रकारची रिवरिवी उत्पन्न होते. तांब्याच्या तुकड्याच्या जागीं रुपया किंवा अधेली घेतली तरी असाच प्रकार घडतो.

लांकडी कोळसा व ओंतीव लोखंडाचा तुकडा जिभेवर धरिल्यानें घडणारें विद्युत्कार्य जिभेला जाणवतें.

एका बाजूस हिरडी व गाल यामध्यें रुप्याचा चमचा घालावा; आणि दुसऱ्या बाजूस हिरडी व गाल यामध्यें जस्ताच्या पत्र्याचा तुकडा घालावा. तोंडाबाहेर दोहोंचा संगम करावा, म्हणजे तत्काळ संगमकालीं बारीक ठिणगी दृष्टीस पडते. संगम तोडावा म्हणजे पुनः ठिणगी दिसेल.

एका मोठ्या जस्ताच्या पत्र्यावर रुपया ठेवावा. रुपयावर एक जिवंत जळू, किंवा पिकली ( गोगलगाय ) ठेवावी. जोंपर्यंत प्राणी रुपयावरच असून जस्ताच्या सन्निध येत नाहीं. तोंपर्यंत त्यास कांहीं होत नाहीं. परंतु सरकत सरकत जस्ताच्या पत्र्यावर

येतांच दोहों धातूंचा संगम होऊन विद्युत उत्पन्न होते; व तेणेंकरून त्याच्या शरिरांत शिरशिरी येऊन तो मागें सरतो.

एका ग्लासांत मोरचुताचा द्रव घ्यावा, व रुप्याचा चमचा आणि जस्ताचा दांडा त्यांत घालावा. त्यांचा संगम करी पावेतों त्यांवर कांहीं कार्य घडत नाहीं. परंतु संगम करितांच रुप्यावर तांबें चढतें. तें खरडून सहजपणें निवत नाहीं.

आमोनिया वायूंत आयोडीन मिळविला म्हणजे त्यांची काळी पूड बनते. ही पूड वाळल्यावर तिला स्पर्श केल्यास तत्काळ मोठा बार होतो. कधीं कधीं ही पूड आपोआपही उडते.

रंगित फुलें व चिंध्या तारेस अडकवून ती तार फ्लाक्साच्या बुचास अडकवावी. नंतर एका वाटींत गंधक पेटवून त्यावर तो फ्लाक्स ठेवावा. म्हणजे त्या फुलांचा व चिंध्यांचा रंग जाईल, व तीं शुभ्र होतील. नंतर त्यांना जलमिश्रित सलफ्युरिक आसिडांत बुडविल्यानें पुन्हां पूर्ववत् रंग येतो.

---

# सालस बंडोपंत.

बंडोपंत म्हणजे अगदीं गरीब माणूस. तो आपला प्रपंच कसा तरी हाकीत असे. त्याला दोन मुलें होतीं. एकाचें नांव केशव व दुसरीचें नांव गंगू. मुलें फार सालस व हुषार असत. बाप अगदीं गरीब असल्यामुळें त्यांना शेजारच्या मुलांप्रमाणें छान शोकी अगर चैन करावयास सांपडत नसे. परंतु तें त्याबद्दल एक अक्षरहि काढीत नसत. त्यांच्या वडिलांना अवघा १५ रुपये पगार असे. तेवढ्यांत तो कशी तरी गुजराण करी. आज पाडव्याचा दिवस. जिकडे तिकडे लोक मारे गुढ्या उभारीत होते. नवे नवे कपडे घालीत होते आणि मजा मारीत होते. लहान मुलें शाळेंत जाऊन पाटीपूजा करीत होतें. व गुरूजींना नमस्कार करीत होतें. बंडोपंत सकाळीं आपल्या कामावर गेले. आज त्यांच्याजवळ एकहि पैसा नव्हता. तेव्हां मुलांचे लाड ते कसले पुरवणार अगर घरांत तरी कसलीं पक्वान्नें करून खाणार. परंतु त्यांच्या दैवाला त्यांची करुणा आली. घरीं येतां येतां त्यांना वाटेंत एका कोपऱ्यांत पडलेला एक कागदाचा तुकडा दिसला. त्यांना काय वाटलें कोणास ठाऊक? जवळ जाऊन पहातात तों दहा रुपयांची नोट. त्यांच्या आनंदाला पारावार उरला नाहीं. ते आपल्या मनांत मोठमोठे मनोरे रचू लागले. आज आपण आपल्या मुलांना यंव घेऊं आणि त्यंव घेऊं. घरीं असलें पक्वान्न करूं आणि तसलें पक्वान्न करूं, वगैरे विचार करीत ते चालले होते. आनंदाच्या भरांत ती नोट खिशांत ठेवून द्यावयाच्या ऐवजीं हें हातांत धरून चालले होते. त्यांच्या ओळखीचा जो जो मनुष्य भेटे त्याला त्याला ही आनंदाची बातमी ते सांगत सुटले. त्यांच्यापैकीं एकानें हळूच एका पोलिसाला ही बातमी सांगितली. तो पोलीस आला आणि त्यानें कमी जास्त चौकशी न करतां बंडोपंतांना पकडून नेलें. मग कसला पाडवा आणि काय? एका क्षणापूर्वीं आनंद सागरांत बुड्या मारणारे बंडोपंत दुःखाच्या खाईंत पडले. त्यांचीं मुलें व बायको धाय मोकलून रडूं लागलीं. शेवटीं बराच वेळानें शिपायानें ती नोट त्यांच्याजवळून हिसकावून घेऊन आपल्या खिशांत घातली व त्यांना सोडून दिलें. दैव देतें आणि कर्म नेतें म्हणतात तें खोटें नाहीं.

---

# फुतीया.

अशिक्षित लोकांचा अद्याप जादूटोण्यावर विश्वास आहे. सुधारलेल्या देशांतून हे प्रकार झपाट्यानें बंद होत आहेत; परंतु अगदीं रानटी लोकांचा यावर बराच विश्वास असलेला आढळून येतो. विशेषतः हा विश्वास कोणी मनुष्य अजारी पडला असतां दिसून येतो. त्यांच्या मतानें मनुष्य अजारी पडतो तो कोणातरी भूताकडून पछाडले गेल्यामुळें पडतो. शरीरांत विघाड होतो ह्या गोष्टीवर त्यांचा



विश्वास नाहीं. बरें हें भूत कां पछाडतें तर त्याला कोणी तरी मागें लावून देतें म्हणून. शत्रूच्या करणीखेरीज मनुष्याला मरता येणें शक्य नाहीं. म्हणून त्यांच्यांतले बरेचसे लोक जराई, मराई वगैरेंचे उपासक असतात. मनुष्य झाडावरून पडला, किंवा घर कोसळलें अगर पूर आला तर त्यांची समजूत अशी होते कीं, हे सारे प्रकार भूतामुळें होतात. त्यामुळें हें भूत शोधून काढण्याचा ते एखाद्या देवऋष्याकडे जाऊन प्रयत्न करतात. हे देवऋषि किती लुच्चे असतात हें सांगावयास नकोच. ते कोणत्याना कोणत्या प्रयत्नानें आपलें वर्चस्व लोकांवर बसविण्याचा प्रयत्न करतात.

ह्या देवऋष्याला सारे कांहीं येत असतें. ते पाण्यांत पाहून पुढील साऱ्या गोष्टी सांगत असतात. त्यांना पाऊस पाडता येतो, व रोग बरे करता येतात. एकदां पोलिसांनीं एका म्हाताऱ्या चेटक्याला त्यानें जमिनीच्या कांहीं भागावर मुद्दाम पाऊस पडू दिला नाहीं म्हणून कोर्टापुढें आणलें. मॅजिस्ट्रेटनें त्या म्हाताऱ्याला म्हटलें कीं, "तूं अपराधी नाहींस असें सांगून जा." परंतु तो म्हातारा म्हणाला, "छे, मींच असें केल्यामुळें पाऊस पडला नाहीं, आणि मला लागेल तेव्हां मी तेथें पाऊस पडूं देणार नाहीं."



त्या चेटक्याला शिक्षा झाली म्हणजे त्याचें वजन लोकांत फार वाढतें म्हणून ते आपले अपराध कधींहि कबूल करीत नाहींत.

एके ठिकाणीं फुतीया नांवाचा एक नायक रहात होता. ह्या फुतीयामुळें जवळपास खून, दरोडे पडतात, मारामाऱ्या होतात असा लोकांचा समज होता. परंतु त्याच्याविरुद्ध कांहीं जबरदस्त पुरावा नसल्यामुळें त्याला कोणी पकडू शकत नसे. एकदां त्यानें साऱ्या लोकांचें लक्ष आपल्याकडे वेधण्यासारखें एक

कृत्य केलें. तो एकाएकीं गांवांत गेला आणि त्यानें चार खून पाडले. त्यांपैकीं त्याची बायको एक होती व दुसरीं तीन परकीं माणसें होतीं. हें कृत्य करून तो जंगलांत घुसून दिसेनासा झाला. त्याच्या हातांत बंदूक वगैरे नसल्यामुळें त्याला तात्काळ पकडण्यांत आलें आणि त्याला एका भक्कम खोलींत कोंडून ठेवलें. फुतीया हा चेटक्या म्हणून चांगला प्रसिद्ध



होता. त्याला खोलींत कोंडून त्याच्यावर एक पहारेकरी ठेवला, आणि त्या पहारेकऱ्याला हा पळून जाऊं लागला तर ठार कर असा हुकूम देण्यांत आला. दैवयोगानें फुतीया ज्या गांवचा होता त्याच गांवचा हा पहारेकरी निघाला. दुसऱ्या दिवशीं हा पहारेकरी ठाण्यावर आला आणि म्हणू लागला कीं, फुतीया पळून गेला. हें कसें झालें असें त्याला विचारल्यावर तो म्हणू लागला कीं, दाराच्या कड्या खळकन् निसटल्या आणि तोंडांतून आगीच्या ज्वाळा निघणारा फुतीया तेजःपुंज स्वरूपांत माझी बंदूक व भाला घेऊन बाहेर पडला.

ही सारी गोष्ट बनावट असल्यामुळें तेथलि लोकांनीं त्या पहारेकऱ्याला जास्त प्रश्न विचारण्यास सुरवात केली. तो म्हणाला, " रात्र झाली होती. काळोख पडला होता. मी माझ्या पहाऱ्यावर होतों. कदाचित् मला झोंप लागली असेल. एकाएकीं कोणी तरी माझ्या नांवानें मला हाका मारीत आहे असें मला समजलें, म्हणून मी कान टवकारूं लागलों, तों फुतीयाचाच अवाज मला ऐकूं आला. तो अवाज माझ्या खांद्यावर येऊन बसला आणि कानांत शिरून माझ्या नांवानें हाका मारूं लागला. प्रथम मीं तिकडे लक्ष दिलें नाहीं, परंतु तो अवाज सारखा निघतच होता, तेव्हां मीं ' काय ' म्हणून विचारलें. " तो अवाज म्हणाला, ' तूं मरणार हें पाहून मला फार वाईट वाटतें. '

मीं म्हटलें " छे, मी मरणार नाहीं. "

" परंतु त्या अवाजानें मजकडे लक्ष दिलें नाहीं. तो अवाज म्हणाला ' तूं मरणार हें निश्चित परंतु तुझ्या मरणापूर्वीं तुला फार दुःख भोगावें लागेल. तुझी बायको खंगून खंगून प्राणाला मुकेल. आणि तुझीं मुलें सुद्धां तशीच मरतील.' मला त्यामुळें भीति वाटली. मीं तो अवाज दूर लोटण्याचा प्रयत्न केला, पण तो दूर जाईना. तो अधिक अधिक जवळ येऊं लागला. तो हंसूं लागला आणि मी त्याच्या अगदीं जवळ गेलोंसें मला दिसलें. तो अवाज म्हणाला, ' पहा ! पहा ! तुझ्या हातांतली बंदूक निसटूं लागली. ' आणि खरोखर माझ्या हातांतली बंदूक गळून पडली. तो अवाज पुन्हां हंसून म्हणतो, ' छे, तुला ती उचलतां येणार

नाहीं. ' नंतर त्यानें मला जवळ येण्यास आज्ञा केली. आणि मी फुतीयाच्या दरवाज्याजवळ गेलों. त्यांनीं मला दार उघडण्यास फर्मावलें. माझ्या हातावर माझी सत्ता उरली नाहीं. मीं दार उघडलें आणि फुतीया बाहेर आला. बाहेर येतांच तो उंचच्या उंच झाला. तो नारळाच्या झाडाएवढा उंच झाला. मी त्याच्यापुढें खुजा दिसूं लागलों. त्याच्या तोंडांतून ज्वाळा निघू लागल्या. तो म्हणाला, ' मीं जें काय तुला सांगितलें तें तूं केलें नसतेंस तर तूं मेला असतास. आतां जर तूं माझ्यामागें जंगलांत येशील तर तूं तत्काळ मरशील. तथापि तुझी आयुष्यमर्यादा फक्त दहा दिवस उरली आहे. नंतर त्यानें माझी बंदूक उचलली व तो निघून गेला. पुढें मी जागा झालों व डोळे उघडून पहातों तों फुतीया निघून गेला, असें मला आढळून आलें. झालें. आतां माझें आयुष्य फक्त दहा दिवस उरले. "
अशा प्रकारें फुतीया हातचा निसटला. नंतर त्याच्या शोधार्थ पुष्कळ लोक पाठविण्यांत आले; परंतु त्याचा पत्ता लागेना. शेवटीं फुतीया मेला असेंच सर्वांनीं ठरविलें.

कांहीं दिवस गेल्यावर ठिकठिकाणाहून अशा बातम्या येऊं लागल्या कीं, एक भयंकर राक्षस खेडोपाडीं जातो, तेथें सांपडेल तें लुबाडतो व लोकांना ठार मारतो. तथापि तो अमुकच ठिकाणीं आहे असें कोणाला निश्चित म्हणवेना. आज येथें तर उद्यां तेथें, अशा त्याच्याविषयीं गप्पा येऊं लागल्या. एकदां त्यानें एका चिनी गृहस्थाला ठार केलें. पुढें दुसरे दिवशीं एका व्यापाऱ्याच्या दारावर रात्रींच्या वेळीं कोणी थापा मारूं लागले. त्याला वाटलें कीं, गांवांतला कोणी तरी इसम कांहीं सामान न्यायला आला असावा म्हणून त्यानें एका फटींतून बाहेर पाहिलें. बाहेर चंद्र प्रकाशला होता आणि त्या चंद्रप्रकाशांत त्याला उंच, रानटी, हातांत कांहीं शस्त्र वगैरे नसलेला एक माणूस दृष्टीस पडला. त्यानें एका हातांत कांहीं पैसे धरले होते व तो त्या व्यापाऱ्याला हात दोन हात कापड कमरेभोंवतीं गुंडाळण्यास विकत मागत होता. त्या व्यापाऱ्याला संशय आला, तथापि त्या बाहेरच्या अकाळ विकाळ पुरुषानें त्याची खात्री पटवली कीं, तुझ्या जिवाला कोणत्याही प्रकारचा अपाय होणार नाहीं. त्यामुळें त्यानें आपलें दार उघडलें. आंत शिरतांक्षणींच त्या चांडाळानें त्याच्या डोक्यांत कुऱ्हाड घातली आणि त्याचे दोन तुकडे केले. पुढें त्यानें दुकानांतल्या जिनसा साऱ्या अस्ताव्यस्त टाकल्या व तेथून धूम ठोकली.

ही बातमी तेथील सरकारला समजल्यावर त्यांनीं जास्त चौकशी करण्यास सुरवात केली. तथापि त्या चौकशीचा कांहीं उपयोग होऊं शकला नाहीं. पुढें पुष्कळ दिवस फुतीयाची कांहींच बातमी आली नाहीं, त्यामुळें तो मेला अशी लोकांची खात्री झाली.

एका ऑस्ट्रेलियन शिपायानें एका खेडेंगांवांत आपली झोंपडी उभारली होती. ही झोंपडी फुतीया जेथें प्रथम दृष्टीस पडला तेथून ७०० मैलांवर होती. त्या ठिकाणीं हा शिपाई बसला असतां आपल्या झोंपडींत कोणी तरी डोकावून पहात आहे असें त्याला वाटलें. म्हणून तो बाहेर आला व इकडे तिकडे पाहूं लागला. परंतु त्याला कोणीच दिसेना म्हणून त्यानें आपली पाठ वळवली. इतक्यांत हातांत बंदूक घेऊन घोड्यावर बोट ठेवलेला असा एक रानटी पुरुष आपणावर गोळी झाडीत आहे असें त्याला दिसलें.

आतां जीव बचावण्यास अगर कोणाला हांका मारण्यास अगदीं वेळ नव्हता. परंतु तो शिपाई मोठा प्रसंगावधानी होता. तो ओरडून म्हणाला, " बरोबर, मित्रहो आपण ज्याचा शोध करीत आहोंत तोच हा फुतीया तुमच्या समोर उभा आहे.

या झाडींतून पुढें या आणि याला आवळा." हे शब्द ऐकतांच फुतीया घाबरला व पळून जाण्याकरितां मागें वळला. त्या बरोबर या शिपायानें त्याला धरलें आणि जमिनीवर पाडलें, नंतर तो ओरडून आस-पासच्या लोकांना बोलावू लागला, त्या बरोबर सारे लोक जमा झाले, त्यांनीं त्याला चांगला बांधला आणि पोलिसच्या स्वाधीन केला. पुढें त्याच्यावर खटला होऊन त्याला १८ वर्षांच्या हद्दपारीची शिक्षा देण्यांत आली. अशा प्रकारें या चेटक्याचा शेवट झाला. तेव्हां यावरून असल्या ढोंगी लोकांच्या अंगांत कांहीं दैवी सामर्थ्य असतें अशी कल्पना करणें कसें चूक आहे हें कळून येईल. आपली कांहीं तरी भोळी समजूत असते आणि त्याचा हे ढोंगी लोक फायदा घेतात इतकेंच.

---

## गमतीचा गुणाकार.

तुम्हांला बारापासून वीसापर्यंत गुणाकार करायचा असेल तर एक युक्ति सांगतों. प्रथम एकंस्थानाचा गुणाकार करावा. नंतर एकंस्थानाचा व दहंसहीन दुसऱ्या संख्येची बेरीज करावी. नंतर गुणाकारांतलें एकंस्थान सोडून बेरीज करावी.

समजा, आपणांस १८ × १२ चा गुणाकार करावयाचा आहे. तर

```
८×२    =  १६
१८+२   = २०
        ------
         २१६
```

गुणाकाराच्या चार जाति.

**प्रकार पहिला.**

```
  ५६७२
 ×२७९
--------
  ५१०४८
 ३९७०४
११३४४
--------
१५८२४८८
```

**प्रकार दुसरा.**

```
  ५६७२
 ×२७९
--------
११३४४
 ३९७०४
  ५१०४८
--------
१५८२४८८
```

**प्रकार तिसरा.**


५६७२ गुण्य

×२७९ गुणक

| | | |
|---|---|---|
| २७९ | × | ५६७२ |
| १३९ | | ११३४४ |
| ६९ | | २२६८८ |
| ३४ | | ४५३७६ |
| १७ | | ९०७५२ |
| ८ | | १८१५०४ |
| ४ | | ३६३००८ |
| २ | | ७२६०१६ |
| १ | | १४५२०३२ |
| | | १५८२४८८ |

प्रथम गुण्य व गुणक समोरासमोर मांडावे, नंतर गुणकाची निम्पट व गुणकाची दुप्पट करावी. निम्पट करतांना शेवटीं १ राहिल्यास सोडून द्यावा. अखेरीस निम्पटीच्या शेवटीं विषम अंक असलेल्या समोरच्या आंकड्यांची बेरीज करावी.

**प्रकार ४ था.**




एक चौकोन करावा, त्याला गुण्यइतकीं घरें पाडावीं. पुनः गुणकाइतकीं घरें पाडावीं. प्रत्येक घराला कर्ण काढावा. गुणकानें गुण्याला गुणावें व तो आंकडा दोन भागांत मांडावा. गुणाकारांत एकच आंकडा येत असेल तर तो खालीं मांडावा. शेवटीं या तिसऱ्या रेषेप्रमाणें बेरीज करावी. म्हणजे उत्तरांत बरोबर गुणाकार येईल.

---

## चटके

एका वैद्यानें एका नव्या रोगाचा शोध लावला आहे. ह्या आपल्या शोधाचा फायदा ते बहुतकरून आपल्या खास रोग्यांना देणार असावेत.

बाईसाहेबः—( मोलकरणीस ) मीं तुझ्या नांवानें आतांपर्यंत दहा हांका मारल्या. तूं होतीस तरी कोठें ?

मोल०ः—बाईसाहेब, आपण फक्त सहाच हांका मारल्या. मला उगीच दोष देऊं नका मी आपल्या हांका मोजीत होतें.

एका शहरांत लठ्ठ माणसावर एक नवा कर बसविण्यांत आला आहे. हीं सारीं लठ्ठ माणसें गोळा होऊन कर वसुलीच्या ठिकाणीं जाऊन रस्ता बंद करतील यांत संशय नाहीं.

वडीलः—( रागावून ) कार्ट्या, असा कसा तूं नापास झालास. तुला कांहीं लाज वाटत नाहीं ?

मुलगाः—बाबा, मला मुळींच लाज वाटत नाहीं. तुम्हीं म्हणाला कीं, मी पास झालों तर मला दहा रुपये मिळतील; पण बाबा, अशा दुष्काळाच्या दिवसांत आपण उधळपट्टी करणें चांगलें नाहीं असा मीं पोक्त विचार केला

मालकीनः—( चाकराला ) हें पहा, मला कोणी खोटें बोललेलें अगर माझा हुकूम मोडलेलें अगदीं खपत नाहीं.

चाकरः—पण बाईसाहेब आपण घरांत असून जेव्हां बाहेर गेलां असें सांगावयास लावतां तेव्हां आम्हीं काय समजावें ?

मास्तरः—जें इतर प्राण्यांना नसून फक्त हत्तीला असतें असें काय ?

मुलगाः—लहान हत्ती, मास्तर !

"कसें काय डॉक्टरसाहेब ! मला मोठा सांगायला आनंद वाटतो कीं, आपल्या औषधानें माझा चांगलाच फायदा झाला."

डॉक्टरः—"पण आपण माझे रोगी होतां असें मला मुळींच आठवत नाहीं."

"छे छे, मी आपला रोगी होतों असें मी म्हणत नाहीं. अहो, आमच्या काकांना आपण औषध देत होता, आणि मी त्यांचा वारस पुतण्या आहे."


दोघां प्रोफेसरांनीं स्त्रियांच्या डोक्यांवर पुरुषांच्या डोक्यांपेक्षां २०००० केस जास्त असतात असा शोध लावला आहे. त्यांच्या डोक्यांवर हा बोजा असल्यामुळेंच त्यांचीं तोंडें सारखीं चालू असतात

"डॉक्टर, आपण हें काय औषध लिहून दिलेंत तें मला वाचता येत नाहीं." "तुम्हाला वाचतां येण्याची बिलकूल जरूर नाहीं."

"बरें तर मग आपण जेव्हां बील कराल तेव्हां तें मला असेंच न वाचतां येण्यासारखें करा म्हणजे झालें."

## गमतीचा नवा खेळ.

हें एक सोबत वर्तुळ दिलेलें आहे. तें पाहिजे असल्यास कापून एका कार्ड बोर्डावर बसवावें, अगर आहे तसेंच राहूं द्यावें. पुढें उजव्या हाताला दाखविल्याप्रमाणें एक काटा घ्यावा आणि त्यामध्यें एकादी टाचणी बसवावी. नंतर तो काटा जोरानें फिरवावा. तो काटा जेथें थांबेल तेथें लिहिलेला आंकडा पहावा व तो आंकडा एका बाजूस लिहून ठेवावा. हा खेळ खेळण्यास असतील तेवढे गडी चालतात. अशा प्रकारें बेरीज करता करता ज्याची बेरीज प्रथम २०० होईल त्यानें जिंकलें असें समजावें.



## लहान मुलांकरितां उपयुक्त अशीं पुस्तकें.

नवी आवृत्ति ] **सचित्र अक्षरबोध.** [ नवी आवृत्ति

या पुस्तकांत 'अ' पासून 'ज्ञ' पर्यंत स्वर आणि व्यंजनें हीं सर्व निरनिराळ्या भपकेदार रंगांत तें अक्षर नांवाच्या प्रथम अक्षरानें दर्शविणाऱ्या चित्रांसह दाखविलेलीं असून १ पासून १० पर्यंत अंकहि वरील पद्धतीनें दाखविलेले आहेत. पुस्तकाचा साईज क्राऊन चतुर्थांशाइतका मोठा ७×९ इंच ठेवला असल्या-मुळें अक्षरें व चित्रें फारच सुबक व मोठीं अशीं झालीं आहेत. एकंदर पुस्तक इंग्रजींतील सचित्र रंगीत ए. बी. सी. डी. शिकण्यास उपयोगी अशा पुस्तकाच्या धर्तीवर तयार केलें असल्यामुळें हें पुस्तक लहान मुलांस फारच आवडून त्यावरून तीं आपला धडा सहज शिकतात. किं. ८८.

## उजळणीचें पुस्तक.

ह्यांत सर्व मुळाक्षरें चित्रयुक्त दिलीं असून मोडी व बालबोध बाराखड्या तयार करण्याची सम-जूत थोडक्यांत करून दिली आहे. नंतर मोडी व बालबोध सोपे शब्द मुलांना सहज ओळखण्यासारखे दिले आहेत. पुढें १० अंक सचित्र दिले असून त्यांबरोबरच मुलांस बेरीज व वजाबाकीची समजूत टिंबांच्या आकृ-तींनीं व गोट्यांच्या चौकटीच्या सहाय्यानें घालून दिली आहे. नंतर पाढ्यांची समजूत दिली असून शेवटीं उजळणी दिली आहे. एकंदरींत हें पुस्तक नवीन तऱ्हेनें मुलांना शिकविण्यास फार उपयुक्त असें झालें आहे. कागद ग्लेज किं. ८११८६

भाग १ ते ६ ] **चिमुकल्या गोष्टी.** [ भाग १ ते ६

ह्या गोष्टींत रोज व्यवहारांत घडणाऱ्याच गोष्टी दिलेल्या आहेत, पण त्या इतक्या मोहक, मनोरंजक व मार्मिक लिहिल्या आहेत कीं, त्या गोष्टींतील तत्त्वबोध गोष्टी वाचतां वाचतांच मुलांच्या मनावर सहज ठसला जातो. पुस्तक ठळक टाइपांत सुंदर जाड व ग्लेज कागदावर छापिलेलें असून प्रत्येक गोष्टीचे प्रारंभीं कथानकाचें सुंदर चित्र दिलेलें आहे. एकंदर ह्या गोष्टीचे सहा भाग आहेत. प्रत्येक भागांत दहा गोष्टी सचित्र आहेत; प्रत्येक भागास किं. ८४.

## जोडाक्षरें-विरहित वाचनपाठ.

हें पुस्तक नुकत्याच अक्षर ओळख झालेल्या मुलांमुलींकरितांच लिहिलेलें आहे. पुस्तकांत एकंदर १७ गोष्टी अगदीं सोप्या भाषेंत, व एकहि जोडाक्षर न येऊं देतां लिहिल्या आहेत. प्रत्येक गोष्टीचे आरंभीं कथा-नकाचें मूर्तिमंत चित्र दिलें असल्यामुळें गोष्ट वाचण्याचे अगोदरच त्यांतील सारांश मुलांचे सहज लक्षांत येतो. किं. अवघी चार आणे.

**मिळण्याचें ठिकाण**—मॅनेजर–चित्रशाळा प्रेस, पुणें.

॥ ॐनमः श्रीरामचंद्राय ॥

# आर्यमहौषधालय मु० पो० आंजर्ले.

**कोंकणप्रांतांतील अगदीं ताज्या व शुद्ध वनस्पतींचीं जगत्प्रसिद्ध निर्दोष व रामबाण औषधें.**

**कंदर्पमंजरी पाक**—हा अपूर्व पाक गरिबांपासून तों अमीरउमरावांपर्यंत सर्वांसही अत्यंत उपयोगी असून किंमत माफक ठेविली आहे. यांत मौक्तिक, प्रवाळ लोह, माक्षिक, कस्तूरी, अंबर इ० अत्युच्च गुणकारक पदार्थ असून शिवाय बदाम, पिस्ते, अक्रोड चारोळी, केशर, वेलची, पंजाबी सालममिश्री, सफेतमुसळी, पत्री, गोक्षुर, शतावरी, आस्कंद, वंशलोचन वगैरे ( ८० ) उपयुक्त वनस्पति घातल्या आहेत. यानें पथ्यावांचून गुण येतो. यापासून कोणत्याही कारणांनीं होणारा व कशाही प्रकारचा शुक्रस्राव, नपुंसकत्व, मूळव्याधि, रक्तदूषणामुळें स्वगरोग, स्त्रियांची धुपणी व गर्भाशयस्थ दोष या भावना त्यांच्या एकंदर उपविकारांसह तत्काल वऱ्या होऊन धातुवृद्धि होते, व शरीर कणखर आणि तेजस्वी बनतें. २० तो० ड० २ रुपये एकदम ३ डबे घेणारास ५ रुपये.

**स्वर्णधात्री तेल**—हें चारोळी, बदाम, कंकोळ, एला, बहुविध वनस्पतींचीं सत्वें व उपयुक्त तेलें अशा अनेक पदार्थांनीं बनविलें असल्यानें याच्या मर्दनापासून अपस्मार, उन्माद, वेड, चक्कर इ० रोगांस जलद आराम पडतो. केंसांस चोळल्यानें केंस काळेकुळकुळीत, तजेलदार, सडकलांब व मृदु होऊन मेंदु शांत आणि रोगेरहित बनतो. यानें मस्तकाचें टक्कल जातें. हें अंगास चोळून स्नान करीत गेल्यानें शरीराचा दुर्गंध जातो. खरूज गजकर्ण, शिबें, तसेंच तळपाय, तळहात, डोळे व मस्तक यांचा दाह हे विकार खास बरे होऊन निद्रा चांगली येते, आणि नेत्ररोग दुरुस्त होतात. बा० किं० १ रु०

**दंतरक्षक पूड**—ही दांत व हिरड्या यांचे सर्व विकार तत्काल दुरुस्त करून दांत स्वच्छ व मजबूत करण्यांत प्रतिज्ञेची आहे. ड. ६ आणे.

सुरंगी, मालती, कल्हार, गुलबहार, दवणा, लक्ष्मीविलास इ० बादशाही अति उंची अत्तरें व त्याचप्रमाणें गुलाब, हिना, केवडा, चमेली, जाई वगैरे सुगंधी अत्तरें आणि केंसांस लावण्याचीं हरएक प्रकारचीं सुवासिक तेल माफक दरानें पूर्ण खात्रीचीं मिळतील.

**सूचना:**—वरील औषधें व अत्तरें वगैरे पूर्ण खात्रीचीं असल्यामुळें आज पंचवीस वर्षांत त्यांचा लक्षावधि लोकांस अप्रातिम उपयोग झाला म्हणून त्यांचा नेहमीं फारच खप होत आहे. अनुभवानंतर पूर्ण खात्री पटेलच. औषधें माहितीचे खर्चासह रोखीनें अगर व्ही. पी. नें पाठवूं. प्याकिंग व टपाल खर्च वेगळा. घाऊक घेणारास कमिशन भरपूर. सर्व औषधांच्या आणि आरोग्यरक्षणाच्या माहितीचें सचित्र मोठें पुस्तक देऊं. आमचीं औषधें वगैरे मागविणें तीं खालील बिनचूक पत्त्यावर मागवावीं.

**कृष्णशास्त्री बिवलकर, वैद्य.**

REGISTERED B. NO. 1[illegible]5.




पुस्तक ३४. मार्च-एप्रील सन १९२२. अंक ३-४.


| विषय | पृष्ठ. | विषय | पृष्ठ. |
|---|---|---|---|
| आरोग्य कसें सुधरावें? .... .... .... | ४१ | आपण काय प्यावें? .... .... .... | ६८ |
| राजकन्या .... .... .... .... | ४४ | धोंडी वाघ व बापु गोखला .... .... | ७१ |
| वेडी शेरडी .... .... .... .... | ४५ | वीणा पक्षी.... .... .... .... | ७२ |
| वाघ आणि अस्वल .... .... .... | ४६ | भट्टी पक्षी .... .... .... .... | ७३ |
| हिरा .... .... .... .... | ४७ | हिऱ्याची गांठोडी } गर्विष्ठ अधेली } .... .... .... | ७४ |
| एक जादूचा प्रयोग .... .... .... | ४८ | | |
| पोपटाची आत्मकथा .... .... .... | ५० | श्रीमंत होणारा मनुष्य .... .... .... | ७५ |
| बंगालचे पहिलवान भीम भवानी .... .... | ५२ | मनुष्य व ढग } ब्राह्मण व तलवारी } .... .... | ७६ |
| राधाकृष्ण विनोद ... ... | ५४ | | |
| पांच मिनिटांत पृथ्वी प्रदक्षिणा .... .... | ५५ | जादूचा पक्षी .... .... .. .... | ७७ |
| पेशवाईतील शिक्षण .... .... .... | ६२ | ब्रह्मदेशांतील गोष्ट .... .... .... | ७८ |
| तपासणी .... .... .... .... | ६३ | अविचाराचा परिणाम .... .... | ७९ |
| पाटीवर लेखन .... .... .... .... | ६६ | शालापत्रकाची चढाओढ ... | ८० |


मुद्रक व प्रकाशक—रा. रा. शंकर नरहर जोशी, चित्रशाळा प्रेस, १०२६ सदाशिव पेठ पुणें सिटी

मराठी वाङ्मयांतील अगदीं आवश्यक.

# रंगीत इसाप-नीति.

मोठ्या इसापनीतींतील आठ अगदीं सोप्या गोष्टी मोठ्या व जाड टाइपांत दिलेल्या असून प्रत्येक गोष्टीसमोर त्यांतील रहस्य दाखविणारें रंगीत सुंदर चित्र दिलेलें आहे. चित्रें पाहूनच मुलांना गोष्टींतील तात्पर्य कळतें. किं० ८६. ट. ह. ८८६.

# सचित्र इसाप-नीति.

[ उत्तरार्ध. ]

[ नवीन भाषांतर भाग २ रा. ]

वरीलप्रमाणेंच हा दुसरा भाग विक्रीस तयार आहे. याचीं सुमारें ३०० पानें असून यांत २५० गोष्टी आहेत. चित्रांची संख्या १५० पर्यंत आहे. किं. १८४

दोन्ही भाग एके ठिकाणीं बांधलेलें सुंदर पुस्तक किं० रु. २

# विद्यार्थ्यांकरितां नाटिका.

शीलं परं भूषणम्.

ही नाटिका प्रसिद्ध कवि—शिरोमणि नारायण वामन टिळक यांनीं केवळ लहान मुलांकरितांच लिहिलेली आहे. यांत शृंगाररस मुळींच नाहीं एवढेंच नव्हे, तर स्त्रीची भूमिका या नाटकांत आणलेलीच नाहीं. शिवाय नाटकाचा विषय नैतिक विचारानें पूर्ण भरलेला असल्यामुळें शाळांतून वार्षिक संमेलनाचे वेळीं मुलांकडून या नाटकाचा प्रयोग करविण्यास हें योग्य आहे. नाटकाचा विषय धनाची योग्यता जास्त किंवा ज्ञानाची योग्यता जास्त हा आहे. पुस्तकांत चार सुंदर चित्रें कथानकास अनुसरून दिलेलीं आहेत; किं० ८४.

म्यानेजर—चित्रशाळा प्रेस, पुणें.

---

# चिमुकलें भारत व रामायण.

महाभारत व रामायण हे आपले राष्ट्रीय ग्रंथ आहेत यांत आपला प्राचीन इतिहास असून प्रपंच साधून परमार्थ कसा जोडावा हें उत्तम दाखविलें आहे. व्यावहारिक बोधाच्या ह्या केवळ खाणी आहेत. आबालवृद्ध स्त्री—पुरुषांना या ग्रंथांचें ज्ञान होणें अगत्याचें आहे. प्रौढांकरितां आमचीं लोकप्रिय 'भारती युद्ध' व 'रामचरित्र' हीं पुस्तकें आहेत आतां बारातेरा वर्षांच्या मुलांमुलींकरितां 'चिमुकलें भारत' व 'चिमुकलें रामायण' हीं दोन पुस्तकें अनुक्रमें आम्हीं रामकृष्णवाक्सुधेचे प्रसिद्ध लेखक रा. कृष्णाजी गोविंद किनरे व रा. विद्याधर वामन भिडे बा. ए. यांजकडून मुद्दाम लिहविलीं आहेत. पुस्तकाची भाषा फारच मोहक व सोपी आहे. वाचतांवाचतांच मुलांच्या मनावर त्यांतील रहस्य ठसावें म्हणून उपदेशपर वाक्यें जाड टाइपांत घातलीं आहेत आणि कथानकांच्या अनुरोधानें हाफटोन प्रोसेसनें तयार केलेलीं भारतांत आठ व रामायणांत सात अशीं सुंदर चित्रें घातलीं आहेत. भारताचीं पृष्ठ १७२ व रामायणाचीं पृष्ठें ८२. छपाई बांधणी सुबक. किं० ८६, व रामायण किं० ८४.

मिळण्याचें ठिकाण—म्यानेजर चित्रशाळा प्रेस, पुणें शहर.

मराठी

# शालापत्रक

येथें शब्द नाहीं शिष्यासी । हें अवघें सद्गुरूपाशीं ।
सद्गुरु पालटी अवगुणांसी । नाना यत्नें करोनी ॥
जें कांहीं आपणास ठावें । तें हळु हळु शिकवावें
शहाणे करून सोडावें । सकळा जनां ॥ १ ॥

रामदास.

पुस्तक ३४. मार्च व एप्रील सन १९२३. अंक ३।४

## आरोग्य कसें सुधारावें?

विद्यार्थ्यांच्या प्रकृतिमानाचे नुसते आंकडे घेऊन केव्हांहि काम भागत नसतें. त्यांच्यामध्यें जें कांहीं न्यून असेल तें दूर करून त्यांना निकोप, सुदृढ व बलवान् कसें बनविता येईल याकडे लक्ष दिलें पाहिजे. आजच्या लेखामध्यें त्यासंबंधीं विचार करावयाचा आहे. प्रकृती निरोगी रहण्याकरितां आरोग्यविषयक पाठ घेणें जरूर आहे. सध्यांच्या शिक्षणक्रमांत तशी व्यवस्था करण्यांत आली आहे. प्रत्येक वर्गाला आरोग्यविषयक शिक्षण दिलें जातें. परंतु तें शिक्षण अद्यापपर्यंत प्राथमिक शाळांतून पसरलें नाहीं. तथापि प्रत्येक शिक्षकाला इतकी संवड असते कीं, त्यांनीं मनावर घेतलें तर त्याला हे आरोग्याचे पाठ क्रमानें देता येतील. आठवड्यांतून सुमारें अर्धा तास यावर खर्च केला तर पुरेसा आहे. कारण आरोग्य शिक्षणाचे पाठ देण्यांत फार वेळ खर्च न करतां प्रत्यक्ष व्यायाम करवून घेतला तर फार चांगलें. आरोग्याचे पाठ देण्याकरितां ठिकठिकाणीं सामुग्रीहि विपुल असल्यामुळें प्रत्यक्ष शिक्षण न घेतलेल्या परंतु शिकविण्याची इच्छा असलेल्या शिक्षकांना सोपे पडेल. आरोग्याकडे प्रत्येक शाळेच्या अधिकाऱ्यानें लक्ष घातलें पाहिजे, शिक्षकांना जरूर ती सामुग्री दिली

पाहिजे व त्यांच्यावर देखरेख ठेवून त्यांना म दाखवून दिला पाहिजे.

शाळेंतील मुलांचें वजन करतां यावें म्हणू शाळेंत कांटा असणें जरूर आहे. या कांट्यावर मुलां वर्षांतून कमींत कमी चार वेळ तरी वजन करण्यां यावें. या वजनांत कमी जास्त फरक कसा पड जातो याचें टिपण शिक्षकाजवळ असावें. ज्य मुलांचें वजन कमी झालें असेल त्यांच्या पालकांन योग्य वेळीं खबर देऊन मुलांच्या प्रकृतीस जपण्या सांगावें.

वास्तविक विचार करितां लहानपणीं मुलांच प्रकृति बिघडण्याचें कांहीं कारण नाहीं. लहान मु वाढीस लागावयाचीं असल्यामुळें रोग वगैरेंना त्यां जुमानावयास नको आहे. परंतु सध्यांची पिढी अने कारणांमुळें इतकी कमकुवत बनत चालली आहे कीं त्यांची प्रजा निरोगी नसल्यास त्यांत नवल नाह जीवनार्थ कलह इतका दुःसह झाला आहे कीं दोन वेळेला तुकडा मिळविणें म्हणजेच धन्यत वाटू लागते. तेव्हां स्वतःच्या प्रकृतीकडे फार पहातो कोण? आणि त्यांत नानाप्रकारच्या व्यसनांच सुळसुळाट झाला असल्यामुळें तर विचारावयास नको.

लहान मुलांची प्रकृति निरोगी रहाण्यास फार श्रम पडतील असें नाहीं. ताजें स्वच्छ अन्न, भरप झोंप, थोडासा व्यायाम, नियमितपणा वगैरेकडे ल पुरविलें म्हणजे काम भागेल. मुलांना फार लहान पणीं शाळेंत घालण्यांत येतें, त्यामुळें त्यांच्य बौद्धिक शक्तीवर अकालीं ताण पडतो व शरीराच वाढ जशी व्हावयास पाहिजे तशी होत नाहीं अल्पवयामध्यें मुलांना शाळेंत घातल्यामुळें अशा प्रक रचा दुष्परिणाम होण्याचा संभव असतो. तेव्हां कांह मुलांची प्रकृति बिघडण्याचें हेंहि एक कारण आहे

मागील अंकांत जी आरोग्यविषयक प्रश्न-मालिका दिली होती तिच्यापासून अमेरिकेंत काय काय परिणाम झाले ते आपण पाहूं. ह्या प्रश्नांचीं उत्तरें वारंवार मागवीत गेल्यास मुलांच्या प्रकृतींत बदल होतो ही गोष्ट सांगावयास नको. मागें जे प्रश्न विचारले होते, त्यांचे गुणानुक्रमें दोन भाग करता येतील. कांहीं प्रश्न आरोग्यकारक परिस्थितीचे होते आणि कांहीं आरोग्याच्या संवयींविषयीं होते. उदाहरणार्थ, मुलें रहात असलेलें घर, आसपासची वस्ती, वाडवडिलांच्या संवयी वगैरेमध्यें सुधारणा होईल अशी आशा करणें व्यर्थ आहे. याच्या उलट आरोग्यकारक संवयींकडे पाहिलें म्हणजे त्यांत सुधारणा होणें शक्य आहे असें आढळून येईल. चहा व कॉफी पिण्याच्या संवयी, दांत घासण्याचा नियमितपणा चाऊन खाण्याची पद्धत वगैरेमध्यें मुलें फार लवकर बदल करूं शकतात. कांहीं कांहीं बाबतींत मुलांचा नाइलाज असतो हें मागें सांगितलेंच. एखादा मुलगा रोज फळें अथवा दूध प्यावयास मागेल व घरची स्थिति गरिबीची असेल तर तो त्यांत काय सुधारणा करूं शकेल?

या प्रश्नोत्तर-मालिकेनें मुलांच्या आरोग्यांत कसा बदल होऊं शकतो तें आपण पाहूं. वर्षाच्या अंतरानें हे प्रश्न विचारले असतां कसकसा फरक होतो हें आपल्या लक्षांत येईल. चहा, कॉफी, पिण्याच्या संवयींमध्यें एका वर्षांत फारच फरक पडतो असें आढळून आलें आहे. कांहीं कांहीं बाबतींत पालकांच्या आर्थिक परिस्थितीप्रमाणें उलटाहि परिणाम झालेला आढळून येतो. पालकांच्या उत्पन्नांत तूट आली म्हणजे मुलांच्या खाण्यापिण्यांत काटकसर होऊं लागते आणि असा अनुभव या आंकडेशास्त्रज्ञांना आला आहे. एखादा मजुरांचा गांव घेतला तर त्यांच्या

मुलांच्या खाण्यापिण्यांत असा कमजास्तीपणा होत असलेला आढळून येईल. अर्थातच याचा दोष मुलांकडे बिलकूल येत नाहीं.

मुलांचें आरोग्य जसजसें सुधारूं लागतें तसतसें त्यांचें डोकें दुखणें, ताप येणें वगैरेंचें प्रमाण कमी होऊं लागतें. हा फरक जरी असले प्रश्न विचारण्यांनीं होतो असें म्हणतां येत नाहीं तरी बरेंचसें श्रेय या प्रश्नांनाच दिलें पाहिजे.

एका शाळेंत कॉफी पिणाऱ्या मुलांचें शेंकडा प्रमाण ५२ होतें. परंतु वर्षाच्या अंतरानें हेंच प्रमाण शेंकडा २५ वर आलें. दुसऱ्या एका शाळेंत चहा पिणाऱ्या मुलांचें असेंच प्रमाण होतें, तेंहि शेंकडा ४० नीं कमी झालें. हें चहा, कॉफी पिणारांचें प्रमाण जसजसें कमी होऊं लागतें तसतसें दूध पिणारांचें प्रमाण वाढतें. मात्र ही वाढ अगदीं काटेतोल असत नाहीं. कारण कांहीं मुलांनीं कॉफी सोडली तर तीं दूध पितीलच असें म्हणतां येत नाहीं; तेव्हां साधारणपणें म्हणावयाचें म्हणजे चहा जसजसा सुटतो तसतसा इतर पदार्थ खाण्याकडे कल होऊं लागतो असें म्हणतां येईल.

मुलांचें आरोग्य सुधारण्यास यांखेरीज इतर उपाय म्हणजे आरोग्यविषयक नकाशे, संभाषणें, चुटके, लहान लहान नाट्यप्रयोग, वादविवाद वगैरे होत. नैसर्गिक मार्गांनीं जेव्हां आरोग्य सुधारेनासें होतें तेव्हां असल्या कृत्रिम मार्गांचा अवलंब करावा लागतो; परंतु दिवसेंदिवस जगाचा ओढा जास्त यांत्रिक बनण्याकडे असल्यामुळें असल्या आपत्ति आल्या तर त्यांत नवल नाहीं.

तेव्हां हे प्रश्न विचारल्यामुळें शिक्षकांना एक प्रकारची मदत होती, कोणता मुलगा किती निरोगी आहे व त्यानें किती सुधारलें पाहिजे हें यावरून स्पष्ट होतें. शिक्षकांना आरोग्यविषयक पाठ देतांना एका विशिष्ट विषयावर जोर देता येतो. विद्यार्थ्यांना नुसतें निरोगी कसें व्हावें हें शिकवून भागत नाहीं. त्यांना आपलें आरोग्य सुधारण्यास सवड दिली पाहिजे. ही सवड त्यांना शाळेपेक्षां घरामध्यें अधिक असते. मुलांच्या आरोग्याचा प्रश्न जसे आईबाप सोडवूं शकतात तसे शिक्षक सोडवूं शकत नाहींत. तथापि शाळेंत कांहींच करता यावयाचें नाहीं असें नाहीं. मुलांना संध्याकाळचे वेळीं तालमींत अगर उघड्या मैदानांत व्यायाम कसा करावा हें शिक्षक शिकवूं शकतो. तेव्हां मुलांच्या आरोग्याची घरच्या आईबापांवर जितकी जबाबदारी असते, तितकीच जबाबदारी शिक्षकांवरहि असते, ही गोष्ट मनांत बाळगून शिक्षकांनीं आपलें काम केलें तर बराच कार्यभाग होण्यासारखा आहे.

वरील विवेचनावरून प्रश्नमालिकेचें महत्त्व काय आहे हें लक्षांत येईल. ही प्रश्नमालिका सुरू झाली म्हणजे विद्यार्थ्यांच्या मागें एक प्रकारची कांचणी असते, त्यामुळें विद्यार्थी आपल्या संवयी सुधारूं शकतात व त्याचा सुपरिणाम होतो. तेव्हां याकडे लक्ष देऊन आपल्या देशांत जर ही पद्धत सुरू झाली तर फार चांगलें.

---


# अभिनव काव्यमाला भाग २

या पुस्तकाची दुसरी आवृत्ति छापून विक्रीस तयार आहे. किं. १ रु. ट. ह. व व्ही. पी. खर्च निराळा.

म्यानेजर—चित्रशाळा प्रेस, पुणें

# राजकन्या.

आमच्या गोष्टीला फार वर्षें झालीं. पूर्वीं विजयनगर म्हणून एक गांव असे. तेथें एक राजा राज्य करीत होता. राजाच्या राज्यांत सर्व प्रकारची अबादानी होती. दुःखाचें अगर दुष्काळाचें नांव कोणास माहीत नसे. इतके असूनहि राजाला संतति नसल्यामुळें तो नेहमीं उदासीन असे. संतती होण्याकरितां त्यानें व राणीनें अनेक व्रतें, उपास व नवससायास केले. तरी त्याला मूल होईना. अशा प्रकारें बरींच वर्षें गेल्यावर त्याचें दैन्य संपलें. त्याची बायको गरोदर राहिली. राजाला मोठा आनंद झाला जिकडे तिकडे मोठे उत्सव होऊं लागले. गोरगरिबांना अन्नसंतर्पण करूं लागले. देवादिकांना अभिषेक करण्यांत आले. अशा प्रकारें कांहीं महिने गेल्यावर राणीसाहेब योग्य काळीं प्रसूत झाल्या. राजाला वाटलें कीं, आपल्या गादीला वारस मुलगा होऊन आपण सर्व काळजींतून सुटूं. परंतु देवाची इच्छा निराळी होती. राजाला मुलगा न होता मुलगीच झाली. तथापि अगदींच संतति नसण्यापेक्षां मुलगी असलेली बरी असा विचार करून दोघेहि आनंद मानू लागले. शेवटीं बारशाचा दिवस आला. आज राज्यामध्यें कोण आनंद. विजयनगरचे सारे रस्ते सुवासिक द्रव्यांनीं संमार्जीले होते. जिकडे तिकडे ध्वजापताका आणि गुडीतोरणें उभारलीं होतीं. राज्यांतील झाडून साऱ्या माणसांना जेवायला आमंत्रण दिलें होतें. राजाचे सारे कुलगुरु त्या ठिकाणीं आले. भोजनें वगैरे उरकलीं व प्रत्येकजण नूतन राजकन्येला कांहींना कांहीं देणगी देऊं लागला. कुलगुरूंनींहि तिला सौभाग्यपर व सुखरूपपर निरनिराळे आशिर्वाद दिले. इतक्यांत दुधामध्यें मिठाचा खडा पडावा त्याप्रमाणें एक शीघ्र कोपी संन्यासी पुढें येऊन आपणास निमंत्रण न पाठविल्यामुळें क्रोधानें लाल होत्साता ही कन्या आतांच्या आतां मरण पावेल असा शाप देऊन निघून गेला. एका क्षणामध्यें साऱ्यांचे चेहरे उतरले. सर्वजण मोठ्या काळजींत पडले. परंतु राजाच्या कुलगुरूंपैकीं श्रेष्ठ कुलगुरु पुढें सरसावून म्हणाले, "राजा, त्यानें दिलेल्या शापाविरुद्ध मला कांहीं करतां येत नाहीं. तथापि मी एवढाच उच्छाप देतों कीं, ही राजकन्या कुदळीशीं खेळतां खेळतां स्वतःला जखम करून घेईल; आणि नंतर शंभर वर्षेंपर्यंत तिला गाढ झोंप लागेल, व पुढें तिला एक राजपुत्र जागे करील." हें ऐकतांच राजानें आपल्या राज्यांतील साऱ्या कुदळी नष्ट करून टाकाव्या म्हणून हुकूम सोडला. झालें, कांहीं दिवसांनीं कोणाच्या घरीं कुदळ म्हणून सांपडेना. राजकन्या १६ वर्षांची झाल्यावर एके दिवशीं राजा व राणी शिकारीस गेले. घरीं त्यांची मुलगी एकटीच होती. ती खेळतां खेळतां बागेंतल्या एका खोपट्यांत गेली. तेथें एक म्हातारी स्वस्थ पडून राहिली होती. ही राजकन्या तिच्या झोंपडींत इकडे तिकडे उचकूं लागली. तेव्हां अगदीं अडगळींत असलेली एक कुदळ तिला सांपडली. ती कुदळ लहानच होती. राजकन्या त्या कुदळीबरोबर खेळूं लागली. त्या म्हातारीला या राजाच्या हुकुमाची दाद नसल्यामुळें तिच्या झोंपडींत ही कुदळ तशीच राहिली होती. खेळतां खेळतां तिला थोडेसें खरचटलें, व ती मूर्च्छा येऊन पडली. त्याबरोबर म्हातारीनें मोठा आक्रोश केला. सारी गडीमाणसें जमा झालीं.

त्यांनीं त्या राजकन्येला हळूच उचलून महालांत नेऊन ठेवलें. ही गोष्ट अन्तर्ज्ञानानें समजतांक्षणींच ते श्रेष्ठ कुलगुरु तेथें आले. व त्यांनीं सर्व राजवाड्याभोंवतीं एक दाट वेलींचें कुंपण घातलें. राजवाड्यांतील चाकर नोकर, गडीमाणसें, शिपाई प्यादी, पशु पक्षी, गाडी घोडे होते त्या स्थितींत जमिनीला खिळून राहिले. पुढें शिकारीहून राजा परत आला, तेव्हां आपला सारा राजवाडा आच्छादलेला त्यानें पाहिला, आणि त्याला सारा प्रकार पाहून फार वाईट वाटलें. त्याला आंतमध्यें जातां येईना.

अशा प्रकारें बरींच वर्षें गेल्यावर राजकन्येची झोंप संपण्याचा काळ आला. त्या वेळीं एकदां सकाळच्या वेळीं एका दुसऱ्या देशचा राजपुत्र शिकार करीत असतां त्यानें तो मंतरलेला राजवाडा पाहिला. तो फिरतां फिरतां त्या राजवाड्यांजवळ गेला, व आसपास त्या राजवाड्यासंबंधीं चौकशी करूं लागला. परंतु कोणालाहि त्या वाड्यासंबंधीं माहिती नव्हती. अखेरीस बरीच चौकशी करितां त्याला एक जरठ म्हातारा भेटला. त्यानें त्याला सारी हकिगत सांगितली. त्या बरोबर तो राजपुत्र वाड्याजवळ गेला. वाड्यांजवळ जातांच तें कुंपण बाजूला झालें, आणि पहाऱ्यावरील शिपाई जणू काय कांहींच घडलें नाहीं, असें दाखवून पुनः येरझारा घालूं लागला. शंभर वर्षांपूर्वीं ज्या माणसांनीं जें काम अर्धवट ठेवलें होतें तीं तें काम पुरें करूं लागलीं. अखेरीस तो राजपुत्र त्या राजकन्येच्या पलंगाजवळ गेला व त्यानें तिचें हळूच चुंबन घेतलें. त्याबरोबर ती राजकन्या आपले डोळे चोळून उठली आणि म्हणाली, "मी आपली किती दिवस तरी वाट पहात होतें, आपण इतके उशिरां का आला?" ती राजकन्या आतां आपल्या तारुण्याच्या ऐन भरांत आली होती. पुढें त्या दोघांचें लग्न झालें आणि तो राजपुत्र त्या ठिकाणीं येऊन राहिला.

---

# वेडी शेरडी.

## लहान मुलांकरितां

एकदां कांहीं शेरड्या एका लहानशा टेकडीवर नुकतेच उगवलेले गवत खात होत्या. त्या टेकडीच्या खालीं एक ओढा होता. त्या ओढ्यावर ह्या शेरड्या नेहमीं पाणी प्यावयास जात.


एकदां संध्याकाळच्या वेळीं एक वाघ त्या ओढ्यावर पाणी प्यायला आला. पाणी वगैरे प्याल्यावर स्वारी थोडीशी थांबून मोठ्यानें गर्जना करूं लागली. ती गर्जना ऐकतांच ह्या साऱ्या शेरड्या घाबरून एका खोपट्यांत जाऊन लपल्या. त्यांपैकीं एक मूर्ख शेरडी होती. तिनें हा सारा प्रकार पाहून आपल्या मनाशीं खूणगांठ बांधली कीं, जशी वाघाची आरोळी ऐकून आपण घाबरून गेलों, तशी आपली आरोळी ऐकून वाघहि घाबरून जाईल. पुढें कांहीं दिवसांनीं अशीच संध्याकाळची वेळ होती आणि त्या वेळीं पूर्वीसारखाच तो वाघ पाणी प्यायला ओढ्यावर आला. हें बघून त्या मूर्ख शेरडीनें मोठ्यानें बें बें असा अवाज केला. तो अवाज ऐकून वाघाला वाटलें कीं, जवळच कोठें तरी शिकार आहे. आज वाघाची आरोळी न ऐकू आल्यामुळें धनगर अगदीं बेफिकीर होता शिवाय मेंढ्यांना पूर्वीप्रमाणें खोपट्यांत जातां येणें शक्य नव्हतें. त्यामुळें तो वाघ त्यांच्यावर चालून आला आणि त्यानें त्या मेंढ्यांचा फन्ना उडविला.


तेव्हां प्रत्येकानें आपलें सामर्थ्य ओळखून कोणतीहि गोष्ट करीत असावें. अनुकरणानें मनुष्य मोठा न होतां संकटांत सांपडतो.

---

# वाघ आणि अस्वल.







एका वर्षी पाऊस बिलकूल पडला नाहीं. त्यामुळें साऱ्या नद्या व नाले आटून गेले होते. पाणी कोठेंहि दिसेना. दिवस उन्हाळ्याचे होते. वेळ दुपारची होती. अशा वेळीं एक वाघ आणि एक अस्वल तहानेनें व्याकूळ होऊन इकडे तिकडें हिंडत होतें. इतक्यांत एका डोंगरामागें त्यांना एक डबकें दिसलें. तें पहातांच अस्वल एकदम पाणी प्यावयास चालली. वाघ ओरडून म्हणतो, " थांब, तुला माहीत नाहीं कीं, मी जनावरांचा राजा आहें? त्यामुळें पाणी पिण्याचा पहिला हक्क माझा आहे." अस्वल म्हणाली, " मी राजा बीजा कांहीं ओळखीत नाहीं. मीं अगोदर हें डबकें पाहिलें असल्यामुळें प्रथम मी पाणी पिणार आणि मला तुझ्यापेक्षां जास्त तहान लागली आहे." असें म्हणून ते दोघेजण एकमेकांबरोबर लढूं लागले. लढतां लढतां अखेरीस ते दोघे थकले, आणि जमिनीवर पडले पुढें आसपास पहातात तों त्यांना एक गिधाड दिसलें. तें पाहून वाघ

म्हणतो, " आपण किती मूर्ख आहोत आपण जर असेंच पाणी न पितां लढत राहिलों तर या गिधाडाला आपली चांगलीच मेजवानी मिळेल. असें म्हणून ते दोघेहि पाणी पिऊं लागले.



---

# हिरा.

आपल्या हिंदुस्थानांत निरनिराळ्या प्रकारचे व गुणाचे हिरे आहेत ही गोष्ट आपणा सर्वांस ठाऊक आहे. त्या हिऱ्याविषयीं निरनिराळ्या मनोरंजक व आश्चर्यकारक अशा गोष्टी आपण ऐकत आलों आहों. कोहिनूर हिऱ्याची गोष्ट शालापत्रकाच्या वाचकांना माहीत आहेच. पहिल्यानें हा हिरा युद्धिष्ठिराजवळ होता, नंतर तो ज्या ज्या राजाजवळ गेला त्याचें त्याचें वैभव वाढवीत गेला. मोंगलांच्या वेळीं तो नादीरशहाजवळ होता. पुढें तो काबूलच्या शहासुजाजवळ गेला. त्याच्याजवळून पंजाबचा सिंह रणजीतसिंग यानें हिराऊन घेतला रणजीतसिंगाच्या मृत्युनंतर इंग्रजांचे राज्य हिंदुस्थानांत सुरु झालें व त्याच्या दिवट्या चिरंजीवानें स्वतःची इभ्रत वाडावी म्हणून तो व्हिक्टोरियाला अर्पण केला. सध्यां तो जॉर्ज राजाजवळ आहे.

आज आम्ही एका वैभवशाली हिऱ्याची गोष्ट सांगणार नसून एका हतभागी हिऱ्याची हकिगत सांगणार आहों. तो हिरा आपल्याच देशांत उत्पन्न झाला. त्याची कहाणी शोकजनक आहे. तो ज्याच्या ज्याच्या जवळ गेला त्याचें त्याचें वाटोळें झालें. टैव्हर्निअर नांवाचा प्रवासी आपल्या देशांत आला होता. त्यानें हा हिरा फ्रान्स मध्यें नेला. त्यानीं तो तेथील बादशहा जो चौदावा लुई त्याला नजर केला. त्यावेळेपासून हा हिरा आपला प्रभाव दाखवूं लागला. त्या टैव्हर्निअरचा सारा व्यापार नष्ट झाला आणि तो बिचारा जहाजांतच मरण पावला.

पुढें लुईनें तो हिरा एका स्त्रीला दिला. त्या स्त्रीचें व बादशहाचें वाकडें आलें. नंतर तो एका निराळ्याच माणसाला मिळाला. परंतु त्या माणसाला फांशीची शिक्षा झाली. पुढें तो सोळाव्या लुईकडे आला आणि त्याच्या प्रजेनें बंड करून त्याला ठार केलें. त्यानंतर तो एका दासीला मिळाला, परंतु तीही बिचारी या धुमश्चक्रींत ठार मारली गेली, पुढें तो अशाच एका चोरानें लांबवला; परंतु त्यालाहि योग्य प्रायश्चित्त मिळालें. अशा प्रकारें सर्वांची वाटोळी करीत करीत तो हिरा टर्कीचे सुलतान अबदुल हमीद याजकडे आला. परंतु त्यामुळें सुलतान साहेबांना पदच्युत व्हावें लागलें. त्यानंतर तो एका श्रीमान् गृहस्थानें खरेदी केला. परंतु त्याचा मुलगा लवकर मोटार खालीं सांपडून ठार झाला. अशा प्रकारें हा अशुभ हिरा आपला प्रताप गाजवीत आहे.

---

# + एक जादूचा प्रयोग.

नानाः—गोविंदा, चल इकडे ये. तूं पुष्कळ दिवस म्हणत आहेस ना कीं मला एक जादूचा खेळ करून दाखवा म्हणून, हा पहा, मी खेळ करतों.

गोविंदाः—नाना नाना ! थांबा जरा, मी मनीला आणि बंड्याला घेऊन येतों. मग आम्हा तिघांना दाखवाल न नाना ?

नानाः—बरं जा घेऊन ये. मला तरी तिघं पाहिजेतच.

[ गोविंदा तिघांना घेऊन येतो. ]

मनीः—नाना, तो अंजीर कशाला आणलात ? मला द्या खायला. आणि हें काय काढलत केळं अरेवा बंड्या, आज आपली मौज आहे.

बंड्याः—हा वेडे तें बघ नानांनीं एक नारींग काढलें.

गोविंदाः—नाना तुम्हीं तर थेट गारोड्याची पिशवीच आणलीत म्हणायची आतां ह्या काय काढल्यात सुपाऱ्या ?

नानाः—हं मुलांनो ! नीट ऐका. सरळ उभे रहा. मी आतां बाहेर जातों. येथे अंजीर, केळं, आणि नारींग ठेवलं आहे भांडूं नका. ज्याला जें पाहिजे, असेल तें त्यांनीं घ्या, मी जातो आणि तुमचें झालें म्हणजे परत येतों. सुपाऱ्याला मात्र हात लावूं नका. आणि अंजीर वगैरे इतक्यांत खाऊं नका; आपल्याला जादू करायची आहे जादू.

असें बजावून नाना बाहेर गेले. दरम्यान त्या मुलांपैकीं कोणीं काय घेतलें हें जरी नानांना ठाऊक नव्हतें तरी मी गुप्त गोष्ट सांगतों. मात्र नानांना सांगतां कामा नये. मनीला अंजीर फार आवडे म्हणून तिनें अंजीर उचलला. बंड्या केळाचा शोकी तेव्हां त्यांनीं केळं घेतलें आणि गोविंदा सगळ्यांहून वडील तेव्हां त्याच्या वाट्याला नारिंग आलं. हीं वाटणी झाल्यावर नाना आंत आले.

नानाः—मुलांनो, तुम्हीं आतां फळं खालीत तीं तुम्हाला पचणार नाहींत म्हणून मी तुम्हाला सुपाऱ्या देतों.

असें म्हणून त्यांनीं एकाला एक, दुसऱ्याला दोन व तिसऱ्याला तीन अशा सुपाऱ्या दिल्या, ह्या सुपाऱ्या त्यांनीं कशा तरी दिल्या. अमुकच क्रमानें दिल्या असें नाहीं. पुढें नाना म्हणाले:—

मुलांनो ! मी सांगतों त्याप्रमाणें करा. मी पुन्हां बाहेर जातों. ज्याच्या जवळ अंजीर असेल त्यांनीं आपल्या जवळील सुपाऱ्या इतक्या सुपाऱ्या येथून उचलाव्या. ज्याच्याजवळ केळं असेल त्यांनीं आपल्या जवळील सुपाऱ्यांच्या दुप्पट सुपाऱ्या घ्याव्या, आणि ज्याच्या जवळ नारिंग असेल त्यांनीं आपल्या जवळील सुपाऱ्याच्या चौपट सुपाऱ्या उचलाव्यात.

नानांनीं सुपाऱ्या देतांना मनीला एक दिली, बंड्याला दोन दिल्या व गोविंदाला तीन दिल्या. असो आतां नाना बाहेर गेले. तेव्हां मुलांनीं काय केलें तें पाहूं. गोविंदा सर्वांत हुशार, तेव्हां त्यांनीं सुपाऱ्याची वाटणी केली. मनीला तितकीच म्हणजे १ सुपारी दिली. बंड्याला दुप्पट म्हणजे ४ दिल्या आणि स्वतःला चौपट म्हणजे १२ सुपाऱ्या घेतल्या. तेव्हां एकंदर त्यांनीं २३ सुपाऱ्या उचलल्या व खालीं एक सुपारी राहिली.

नाना आंत आले व त्यांना एक सुपारी बाकी राहिलेली दिसली. त्यांनीं सुपाऱ्यांची वांटणी बरोबर केली कां नाहीं असें तिन तिनदां खोद खोदून विचारलें व स्वतःचें समाधान झाल्यावर मनीजवळ अंजीर, बंड्याजवळ केळ व गोविंदाजवळ नारींग आहे असें चटकन उत्तर दिलें. ही जादुगिरी पाहून सारी मुलें थक्क झालीं. पण मनी म्हणाली ऊँ त्यांत काय मोठें ? मला अंजीर आवडतो हें तुम्हांला ठाऊक आहे म्हणून तुम्ही असें उत्तर दिलेंत.

पुढें गोविंदानें फारच हट्ट धरला तेव्हां नाना त्याला त्यांतलि इंगीत सांगू लागले. ते म्हणाले, कोणाजवळ कोणतें फळ आहे हें ओळखण्याचा एक मंत्र आहे. तो तुला सांगतों.

| १ | २ | ३ |
|---|---|---|
| अकेना | केअना | अनाके |
| ५ | ६ | ७ |
| केनाअ | नाअके | नाकेअ |


ह्या मंत्रांत ४ था आंकडा नाहीं. तो मुद्दाम गाळला आहे, हे आंकडे बाकी उरलेल्या सुपाऱ्यांचे आहेत. समज, खालीं १ च सुपारी उरली तर पहिल्यानें अ म्हणजे अंजीर, दुसऱ्यानें के म्हणजे केळं आणि तिसऱ्यानें ना म्हणजे नारींग घेतलें असलें पाहिजे. ५ उरले तर केळं, नारींग, अंजीर या क्रमानें फळें घेतलीं असलीं पाहिजेत असें ओळखावें. याप्रमाणेंच इतरहि जाणावें. हा मंत्र पाठ करणें सोपें आहे. पहिल्याच्या उलट ७ वा, दुसऱ्याच्या उलट ६ वा व तिसऱ्याच्या उलट ५ वा, असा हा सांकेतिक मंत्र आहे. ४ बाकी कधीं उरत नसल्यामुळें तो यांत नाहीं.

बाकी उरलेल्या सुपाऱ्याच्या आंकड्यांचा संबंध ह्या मंत्राशीं असून त्यावरून कोणी कोणतें फळ घेतलें हें ओळखतां येतें.

हा प्रयोग करणाऱ्यांनीं आपण कोणाला किती सुपाऱ्या दिल्या हें पक्कें लक्षांत ठेवावें. कारण त्यावरून कोणी कोणतें फळ घेतलें हें सांगतां येतें. त्याचप्रमाणें चौपट दुप्पट वगैरे करावयास सांगतांना सुद्धां फार काळजी घ्यावी, नाहींतर सारेंच चुकावयाचें. हा प्रयोग केव्हांहि चुकत नाहीं हें लक्षांत ठेवावें.

प्रयोग करण्यास अमुकच फळें किंवा सुपाऱ्या पाहिजेत असें नाहीं. सुपाऱ्याऐवजीं दगड असले तरी चालतील; परंतु संख्या २४ च पाहिजे.

## प्रदर्शनाकरितां एका बागेंत तयार केलेला मोर.



# पोपटाची आत्मकथा.

लहान मुलांच्या जवळ पक्षी असणें म्हणजे एक मौज असते. मी एक पक्षी आहें आणि माझ्या मालकिणीचें नांव कमला आहे. लहान मुलांच्या ताब्यांत असणें म्हणजे काय याची मला कल्पना आहे. मी नेहमीं स्वतःला म्हणतों कीं, आम्ही मुलांच्या ताब्यांत असण्याऐवजीं मुलेंच आमच्या ताब्यांत असतीं तर किती मौज झाली असती! मी माझ्या दांडीवर बसतों आणि या गोष्टीचा तासचे तास विचार करीत असतों, परंतु मला त्याचें उत्तर मिळत नाहीं. पिंजऱ्यांत त्याचा विचार करण्यास किती लहान जागा असते.

पुष्कळ दिवसांपूर्वीची गोष्टः मी एका सुंदर अरण्यांत रहात असे. तें अरण्य एका दूरच्या देशांत होतें. तेथील झाडी इतकी गर्द होती आणि झाडें इतकीं उंच वाढलीं होतीं कीं, जर तुम्ही जमिनीला पाठ लाऊन वर आकाशाकडे पाहूं लागला तर तुम्हाला कांहींच दिसलें नसतें. फक्त हिरवीं झाडांचीं टोकें दिसलीं असतीं. आम्ही सारे पोपट ह्या झाडांच्या टोंकावर रहात असूं. उन्हामध्यें फिरणें किती गमतीचें असतें याची तुम्हाला कल्पनाच येणें शक्य नाहीं.

आम्ही मोटमोठ्या कुटुंबांनीं रहात होतों. आमचे आई, बाप, चुलता, मामा, आजा आजी सारे एकत्र होते. सकाळीं न्याहारीची वेळ झाली म्हणजे आम्हीं किलकिलाट करीत होतों. आणि हा आमचा आवाज फारच मोठा होता. आमच्या त्या जंगलांत चांगलीं केळीं पिकत होतीं. त्याखेरीज इतर जातींचीं फळें इतकीं होतीं. कीं त्यांचीं नांवें मी सांगूं लागलों तरी ती तुम्हाला समजणार नाहींत. आम्ही एखाद्या फळझाडावर सकाळीं जाऊन बसायचें आणि त्या झाडावर फराळ करायचे. किती तरी आनंदाचे दिवस होते ते!

पुढें कांहीं दिवसांनीं एक ‘ चांडाळ पारधी आला आणि त्यांनीं मला पकडलें. त्यांनीं आम्हाला पकडण्याकरितां एक जाळें लावलें आणि मी सर्वांत लहान असल्यामुळें मोठ्या हौसेनें त्या जाळ्यांत जाऊन बसलों. पुढें त्यांनीं मला एका पिंजऱ्यांत कोंडलें व तेथून रेलवेंतून व गाड्यांतून प्रवास करीत करीत ज्याला तुम्ही शहर म्हणतां तेथें आणलें. नंतर मला एका दुकानांत विकण्यांत आलें. हा सारा वेळ मी मोठ्या दुःखांत व रागांत होतों. माझ्या दुर्दैवानें मी जंगलांतील स्वातंत्र्यास मुकलों. तेथील तें स्वैर वागडणें, फळें खाणें, उन्हांत फिरणें या साऱ्या आनंदाला मी पारखा झालों. मी सारा दिवस रडण्यांत घालवूं लागलों आणि जो कोणी मजजवळ येई त्याला चावूं लागलों. याला माझा इलाज नव्हता.

नंतर एके दिवशीं एक उंच माणूस दुकानीं आला आणि त्यांनीं मला विकत घेतलें. हाच आमच्या कमळचा बाप होय. त्यांनीं मला विकत नेलें व कमळला बक्षीस म्हणून दिलें. कमळच्या ताब्यांत जातांच मला थोडा आनंद होऊं लागला. ती मजवर प्रेम करी व तिला पक्षांचें अंतःकरण कळे. कमळनें माझें शाम म्हणून नांव ठेवलें.

हें नांव चांगलें आहे कां कसें आहे हें मला ठाऊक नाहीं. पण तें कमळनें ठेवल्यामुळें मला आवडूं लागलें.

मी इतके दिवस मुकस्तंभ होतों, पण कमळच्या

जवळ जातांच मी बोलूं लागलों. पुढें कमळ मला बोलायला शिकवूं लागली. मला शिकायला फार दिवस लागले. तिला तेच तेच शब्द पुनः पुनः म्हणावे लागत. तुम्हा माणसांची भाषा शिकायला फार कठीण. अखेरीस मी " पोपट पोपट " असें म्हणायला शिकलों. माझ्या तोंडांतून हा शब्द ऐकतांच कमळ आनंदानें नाचूं उडूं लागली; व टाळ्या पिटूं लागली. पुढें असेच मी कांहीं शब्द शिकलों.

आमच्या कमळला लहान लहान प्राण्यांची फार हौस. तिचें एक लठ्ठ मांजर होतें, एक पारवा होता आणि एक खार होती. आम्ही जर एकमेकाबरोबर भांडलों तर ती आम्हांला कोंडून ठेवण्याची शिक्षा देत असे. त्यामुळें आम्ही गुण्यागोविंदानें वागत असूं. मजवर कमळचे भारी प्रेम असे. कारण तिच्या लाडक्या प्राण्यांमध्यें मला एकट्यालाच बोलतां येई. मांजर नुसतें ' म्यॉव म्यॉव ' करी, पारवा ' कूं कूं ' करीत बसे आणि खारीला नुसता किलकिलाट करतां येई. मला बोलतां येतें याचा फार अभिमान वाटे.

कमळला बाहुल्यांचा फारसा नाद नसे. तिच्या जवळ इतुके पाळलेले प्राणी होते कीं बाहुल्यांशीं खेळायला तिला वेळच नसे. कधीं कधीं ती मजवर बाहुल्यांचा पोषाख चढवी, मला तें आवडत नसे. माझा सुंदर पिसारा त्या चिरगुटापेक्षां मला सहस्र पटीनें आवडे.

एके दिवशीं मजवर एक संकट आलें. तें मी कधीं विसरणार नाहीं. मला कमळ नेहमीं पिंजऱ्या बाहेर ठेवी. त्यावेळीं पिंजऱ्याच्या बाहेर दांडीवर हेलकावे खात होतों. इतक्यांत आमच्या मालकिणीची नवी मोलकरीण आली आणि केरसुणीनें मला भेवडावूं लागली. मागाहून ती म्हणाली कीं मला फक्त तिच्या मनांतून पिंजऱ्यांत घालवयांच होतें पण तें मला कळलें नाहीं. मी फार भ्यालों आणि झाडावर उडून बसलों. पण त्या झाडावर मला चैन पडेना. कारण बंदीवासाची मला चांगली संवय झाली होती. मी एका झाडावरून दुसऱ्या झाडावर उडूं लागलों पण मला सारखी भीति वाटत होती. मला कमळचें घर सांपडेना. पुढें रात्र झाली. थंडी आणि काळोख पडूं लागला. मला भूक लागली व मी थंडीनें खुडखुडूं लागलों. मला त्या पिंजऱ्याची फार आठवण होऊं लागली. माझी कमळ मला पुनः भेटेल काय असा मी उद्विग्नतेनें विचार करूं लागलों. मला माझ्या पिंजऱ्यांत जातां येईल काय ? कीं दुसरा कोणी माझी जागा पटकावील हाहि विचार माझ्या मनांत आल्याखेरीज राहिला नाहीं.

सकाळच्या वेळीं एक माणूस आला व मी जेथें होतों तेथें चढून त्यांनीं मला पकडलें. माझें शरीर ताठ झाल्यामुळें माझ्या अंगांत उडण्याची शक्ति उरली नव्हती त्यांनीं माझ्या डोक्यावर एक फडकें टाकलें व मला पुनः कमळकडे नेलें. घरीं जातों तों कमळ सारखी रडत असलेली मला दिसली. मला पहातांच ती धांवली व माझें चुंबन घेऊं लागली आणि मला आंजारूं गोंजारूं लागली. मला किती आनंद झाला याची कल्पना तुम्हाला येणें शक्य नाहीं.

मी पिंजऱ्यांत बसल्यावर मला मधून मधून पुनः झाडांवर बागडण्यास जावें असें वाटे. पण इथली झाडें आमच्या घरच्या झाडापेक्षां अगदीं निराळी. त्यांच्यावर चांगलीं मधुर व रसाळ फळें नव्हतीं कांहीं नव्हतें.

त्या दिवसापासून मी आपलें घर कधींच सोडलें नाहीं.

एकूण परक्या देशांत गेलें म्हणजे कोणाजवळ तरी रहाणें चांगलें.

# बंगालचे पहिलवान भीम भवानी.

बंगालमध्यें भीम भवानी या नांवाचे एक पहिलवान ता. २२ रोजीं दिवंगत झाले. त्यांची माहिती तिकडील वर्तमानपत्रांत प्रसिद्ध झाली आहे. ती मनोरंजक व उत्तेजक असल्यामुळें वाचकां-करितां देत आहों. हे पहिलवान पहिल्यानें अगदीं काटकुळे होते. ते नेहमीं हिंवतापानें आजारी असत. एकदां ते शाळेंतून परत येत होते. तेव्हां त्यांची व दुसऱ्या एका मुलाची रस्त्यांत बोलाचाली होऊन दोघांची मारामारी झाली. त्यांत आमचे पहिलवान अगदींच अशक्त असल्यामुळें पराभूत झाले त्यांच्या प्रतिस्पर्ध्यानें त्यांना चांगलाच चोप दिला. हें पाहून इतर मुलेंहि त्यांची टवाळी करूं लागलीं. ही गोष्ट त्यांना पसंत पडली नाहीं. त्यांना अगदीं मेल्यापेक्षां मेले झाले. तेव्हां त्यांनीं एकदम सशक्त होण्याचा निश्चय केला. ते कलकत्ता येथील सुप्रसिद्ध गुह नांवाच्या पहिलवानांना भेटले, व आपणांस शरीर कमवावयाचें आहे असें म्हणाले. गुह यांची पिढी पुष्कळ दिवसांपासून पहिलवानगिरींत प्रसिद्ध होती. त्यांनीं या मुलाला दररोज तालमींत येऊन शरीर कमावण्यास सला दिला. त्या वेळीं भीम भवानीचा जोडी दासगोबर या नांवाचा होता. या दोघांनीं शरीरसाधन इतकें केलें कीं, त्यांचें नांव बंगालमध्यें सर्वश्रुत झालें. पुढें पुढें तर यांची कीर्ती जगभर पसरली.

एकदां प्रो राममूर्ति हे कलकत्त्यास आले. राममूर्तींचें नांव आपणा सर्वांस परिचित आहे. राममूर्तिचे खेळ पहाण्यास लोकांची गर्दी लोटत असे. एकदां असाच खेळ होता. खेळाला गर्दी खूप झाली होती.

भीम भवानी यांची इच्छा खेळपहाण्यास जाण्याची होती. परंतु त्यांना तिकिट मिळालें नाहीं. ते तंबू भोंवतीं घिरट्या घालीत होते. इतक्यांत त्यांच्याशरीर यष्टीकडे पाहून एक धिप्पाड मूर्ती जवळ आली व मागून त्यांच्या खांद्यावर हात ठेऊन खेळ पहाण्याची इच्छा आहे काय म्हणून विचारलें ती मूर्ती म्हणजे प्रो. राममूर्ती यांची होती. त्यांनीं भीम भवानी यांना आपल्या मंडळींत नेऊन बसविलें; त्या वेळीं भीम भवानी यांचें वय १९ वर्षांचें होतें. राममूर्तींना त्याच्या पीळदार शरिराकडे पाहून वाटलें कीं, या मनुष्याचा उपयोग आपल्याला चांगला होईल.

हे राममूर्तींच्या तोंडचे उद्गार ऐकून भीम भवानी यांचा आनंद गगनांत मावेना. त्यांना प्रो. राममूर्ती बरोबर जावें असें वाटूं लागलें. या गोष्टीस प्रो. राममूर्तींनी संमत्ती दिली. तेव्हां भीम भवानी यांनीं घरीं कोणास न विचारतां राममूर्तींबरोबर रंगूनला कूच केलें तेथून ते जावा, सिंगापूर वगैरे ठिकाणीं गेले.

जावा येथें एका डच पहिलवानानें राममूर्तींना कुस्ती खेळण्यास आव्हान केलें, व तें त्यांनीं पत्करलें. भीम भमानी जवळ होते. त्यांनीं राम-मूर्तींना विनंति केली कीं, ज्या अर्थीं मी आपला शिष्य आहें त्या अर्थीं प्रथम मला खेळूं द्या. मी हरलों, तर आपण आहांच. ही विनंति मान्य कर-

ण्यांत आली. पुढें त्या दोघांची कुस्ती ठरली. आणि भीम भवानीनें त्या पहिलवानास हां हां म्हणतांच चीत केलें. हें पाहून राममूर्तींना किति आनंद झाला असेल याची कल्पना वाचकांनींच करावी. दुर्दैवानें राममूर्ती व त्यांचे पुढें जमेनासें झाले. भीम भवानीनें राममूर्तींची रजा घेतली व ते दुसऱ्या एका सर्कशींत शिरले. तेथें ते मोटार थांबविणें, दातांनीं ५।६ माणसें बसलेलें पीप उचलणें, छातीवर दगडाची शीला ठेवणें वगैरे अचाट कामें करूं लागले, हें पाहून लोकांना फार आश्चर्य वाटूं लागलें. त्यांनीं या सर्कशीबरोबर सगळ्या आशिया खंडांत प्रवास केला.

एकदां ते चीनमध्यें गेले असतां शांघाय येथें त्यांची व एका अमेरिकन पहिलवानाची ३००० रुपयांची कुस्ती ठरली. ही कुस्ती त्यांनीं सहज जिंकली, परंतु त्या अमेरिकन गृहस्थाला आपला अपमान सहन करवेना म्हणून त्यानें भीम भवानीला मारण्याचा प्रयत्न केला. पण तो निष्फळ झाला. तेथील एक गृहस्थानें यांच्या शक्तीची परीक्षा पहाण्याकरितां एका उत्तम पैकीं मोटार थांबविण्यास सांगितलें व त्यांनीं थांबविली तर मोटारच बक्षी देऊं असें म्हटलें. ठरलेल्या शर्तीप्रमाणें भीम भवानीनें ती मोटार थांबवून बक्षीस मिळविलें.

पुढें ते जपानमध्यें गेले. तेथील बादशहा मिकॅडो हा यांचीं अद्भुत कामें पाहून खूष झाला. बादशहानें त्यांना सुवर्णपदक व कांहीं द्रव्य अर्पण केलें. पुढें ते स्वदेशीं आले. त्यांचा मुक्काम एकदां भरतपूर संस्थान मध्यें होता. तेथील महाराजांनीं त्यांना तीन मोटारी थांबविल्या तर २००० रु. चें बक्षीस देण्याचें कबूल केलें. हा प्रयत्न त्यांनीं पूर्वीं कधीं केला नव्हता. तीन मोटारींत तिघेजण बसले. भीम भवानी जमिनीवर पडले. त्यांनीं प्रत्येक मोटारीस एकेक दोर बांधला. त्यांपैकीं एक कमरेला व दोन दोन हातांत धरले. पुढें त्यांनीं मोटारी सोडण्यास सांगितल्या. परंतु त्या तसूभरहि जागेवरून हलेनात. हें पाहून महाराजांनीं आनंद प्रदर्शित करून ठराविक बक्षीस दिलें.

अशा प्रकारचीं अचाट कामें हे करीत असत. यांना कलीयुगांतील भीम म्हणत. यांचा आहार तितकाच मोठा होता.

एकदां एक खेळ करीत असतां त्यांचें डोकें दुखूं लागलें. त्यांना एकाएकीं ताप भरला व शेवटीं त्यांतच त्यांचा अंत झाला.

त्यांचें आयुष्य किती विलक्षण प्रकारचें होतें ! प्रत्येक वेळीं क्षुल्लक कारणावरून त्यांना मोठेपणाची संधी मिळाली. तिचा त्यांनीं योग्य उपयोग करून घेतला व आपलें नांव अजरामर करून ठेवलें. प्रत्येक मनुष्य जर त्यांचा कित्ता गिरवील तर त्यांच्याइतका नाहीं तरी चांगला सशक्त व बलवान होईल असा त्यांच्या चरित्रावरून निष्कर्ष निघूं शकतो.

# राधा-कृष्ण-विनोद.

( लेखकः-माधव आप्पाशास्त्री पारखी, पुणें. )

कोऽयं द्वारि, हरिः, प्रयादुपवनं शाखामृगस्यात्र किम्, कृष्णोऽहं दयिते, बिभेमि सुतरां कृष्णादहं वानरात्, राधेऽहं मधुसूदनो, व्रज लतां तामेव पुष्पान्वितम् इत्थं निर्वचनीकृतो दयितया ह्रीणो हरिः पातु वः ॥

—कस्यापि.

बाल्यावस्थेंत असतांना श्रीकृष्णानें गोकुळांत अनेक क्रीडा करून गोकुलवासिजनांना संतोष दिला हें सर्वश्रुतच आहे. मथुरेमध्यें कृष्णाचें विशेष प्रेम कोणावर असेल तर तें राधेवरच होय. एकदां कृष्ण राधेच्या मंदिराकडे आला असतां, राधेनें मंदिर लावून घेतलें आहे असें कृष्णाच्या नजरेस आलें. साहजिकपणें दार उघडण्याबद्दल कृष्णानें राधेस सांगितलें. त्यावेळीं राधा-कृष्णाचा जो प्रेमसंवाद झाला तो कवीनें चटकदारपणें वरील श्लोकांत वर्णिला आहे.

राधा—[ कः अयं द्वारि ] कोण आहे? दाराशीं कोण आहे?

कृष्ण—[ हरिः ] मी आहें, मी हरी आलों आहें, दार उघड लवकर. ( हरिः=कृष्ण )

राधा—[ प्रयात् उपवनं, शाखामृगस्य अत्र किम् ] कोण आहे? हरी आहेस? मग माकड असशील तर रानांत पाला खाण्याकरितां निघून जा! येथें माझ्या-पाशीं काय बाई माकडाचें काम? ( हरिः=माकड )

कृष्ण—[ कृष्णः अहं दयिते ] प्रिये, अग मी वानर नव्हे, मी कृष्ण आहें, आतां तरी दार उघड.

राधा—[ बिभेमि सुतरां कृष्णात् अहं वानरात् ] काय काळवीट आहेस? आणि मला दार उघडा वयास सांगत आहेस? अगबाई, मला तर काळ-विटाची आणि त्याचप्रमाणें माकडाची फारच भीति वाटते! बाबारे, येथून लवकरच चालता हो कसा म्हणजे माझी भीति जरा कमी होईल! ( कृष्णः= काळविट )

कृष्ण—[ राधे, अहं मधुसूदनः ] राधे, इतकीं तुला खुणेचीं नांवें सांगितलीं तरी अजूनही मला ओळखलें नाहींस? बरें आहे, आतां तुला आणखी एक माझें नांव सांगतों म्हणजे चटकन ओळख पटेल. हें बघ राधे, आतां तरी दार उघड, मी मधुसूदन आलों आहें. ( मधुसूदनः=कृष्ण )

राधा—[ व्रजलतां ताम् एव पुष्पान्विताम् ] किती चमत्कारिक आहेसरे तूं तरी! एकदां म्हणतोस कीं "मी माकड आहें," दुसऱ्यांदा म्हणालास "मी काळविट आहें आणि आतां काय म्हणे "मी भ्रमर आहें!" जरी तूं भ्रमर असलास तरी तुझें येथें काय काम? ज्या ठिकाणीं प्रफुल्ल अशी एकादी वेली असेल तिच्यावर जाऊन बस म्हणजे तुला मध सेवन करावयास मिळेल, येथें कशाला रे बाबा आलास? येथें काय एकादी फुललेली वेली आहे वाटतें?

वाचकहो, अशाप्रमाणें राधेकडून वाक्चातुर्यानें पराजित केला गेल्यामुळें लज्जित झालेला भगवान् श्रीकृष्ण तुमचें सर्व प्रकारें रक्षण करो.

---

# पांच मिनिटांत पृथ्वी प्रदक्षिणा.

एवढ्या जलदीनें कोण प्रदक्षिणा करतो ? सांगा पाहूं. छे, तुम्हाला त्याचें उत्तर देतां येत नाहीं. बरं तर बघूं या.

एकदां दोन माणसें फिलिपाईन्स बेटांत एका किनाऱ्यावर बसलीं होतीं. त्यांच्या समोर एक टेबल होतें आणि त्या टेबलावर दोन यंत्रें होतीं. त्या यंत्रांतून एका कागदाच्या पट्टीवर काळ्या शाईनें कांहीं लिहिलें जात होतें. मधून मधून सरळ लिहिण्याऐवजीं त्या पट्टीवर वांकड्याच ओळी उठत.

त्यांच्या दोन्ही यंत्राचा संयोग लंडन शहराबरोबर झाला होता. एक यंत्र तांब्याच्या तारेनीं पासिफिक महासागरांतून, उत्तर अमेरिकेकडून, अटलांटिक महासागरांतून लंडनला जोडलें होतें, आणि दुसरें हिंदी महासागराकडून आफ्रिकेच्या किनाऱ्याला बळसा घालून भूमध्यसमुद्रांतून लंडन शहरीं नेलें होतें. जेव्हां या दोन्ही यंत्रांतील तारांचा संयोग होई तेव्हां सारें जग या यंत्राच्या टप्प्यांत येई.

हे दोघे तारमास्तर जवळ जवळ बसले होते व ते ४।५ मिनिटांत सगळ्या जगांत बातमी पाठवूं शकत. सगळें जग तारायंत्रानें वेढलें गेल्यामुळें त्यांना विद्युत्वेगानें सगळ्या जगभर ५ मिनटाच्या आंत प्रवास करता येई.

ही बातमी इतक्या लवकर प्रवास करते कीं, जर मध्यें अडथळा नसेल तर अमेरिकेसारख्या दूरच्या देशांत तारेनीं बातमी पाठविणें हें आपल्या घराशेजारील मित्राकडे मनुष्याच्या हातीं बातमी पाठविण्यापेक्षां अधिक लवकर होईल. आपण अशी कल्पना करूं कीं, मुंबईमध्यें जवळ जवळ दोनशें ऑफिसें आहेत त्यांना एकमेकांशीं, संभाषण करावयाचें आहे. तेव्हां जगभर जाऊन येणाऱ्या तारेनीं संभाषण करणें चांगलें ? कां मनुष्याच्याहातीं निरोप पाठविणें चांगलें ? अर्थात तारेनीं. ही तार साऱ्या जगभर फिरून पुनः त्या दुसऱ्या ऑफिसांत जाते, पण तेवढ्या वेळांत मनुष्य कांहीं बातमी पोहोचवूं शकत नाहीं. तेव्हां जगभर तारेनीं प्रवास करणें हें गाडीनें समोरासमोर प्रवास करण्यापेक्षां फार सोपें.

लंडन शहरांतून १२ वाजतां एक बातमी शेजारच्या ऑफिसांत पाठविण्याचें ठरलें असें आपण समजूं व एका माणसाच्या हातांत तीच बातमी लिहून दिली. आतां दोघांच्याहि प्रवासास सुरुवात झाली.

आपली बातमी निघाली ती झाडी, शेतें, शहरें ओलांडीत ओलांडीत इंग्लंडच्या दक्षिणेला आली. आणि तेथें वेस्टन शहराजवळ पाण्यांत घुसली. हा १४० मैलांचा प्रवास तिनें १ सेकंदांत केला. आपला प्रतिस्पर्धी गाडीवाल्याला हाका मारीतच उभा आहे.


समुद्रांत घुसण्यापूर्वीं तेथील तारमास्तर ही बातमी पहिल्या प्रथम उतरून घेई आणि पुनः दुसऱ्या यंत्रानें पाठवीत असे. परंतु आतां ती पद्धत बंद झाली आहे. आतां थेट बातमी पाठवितां येते. १४० मैलांचा प्रवास करून आल्यावर आपल्या बातमीचा वेग कमी होतो, ती दमते. परंतु येथें पुनः तिला नवा जोर मिळतो व ती अधिक जोरानें धांवूं लागते. ती बातमी पाण्यांतून पोहत पोहत आर्यलैंडच्या किनाऱ्यालगत आली. या गांवाचें नांव

वॉटरव्हिल असें आहे. हें गांव सृष्टिसौंदर्याचें माहेर घर आहे. पण सृष्टीसौंदर्य पहायला आपल्याला वेळ नाहीं. त्या माणसाच्सा अगोदर आपल्याला गेलें पाहिजे ना ? ह्या फेरीमध्यें कोळी मासे कसें पकडत आहेत पहा. त्यांच्या निळे झगे घातलेल्या बायका डोळ्याला हात लाऊन उभ्या आहेत. ते मासे कसें चित्रविचित्र रंगाचे आहेत आणि नाचत उडत आहेत पहा, ह्या लोकांचें जिवीत कष्टमय आहे. त्यांना एक जाळें माशांचें सांपडलें तर त्याचा पैसाच पैसा होईल. कोळ्याला इंग्रजी भाषेचा गंध सुद्धां नाहीं. आतांपर्यंत आपण ३२० मैलांचा प्रवास केला, चला आपण पुढें जाऊं. आपली तार आतां पाण्यांत घुसली. ती पहा गाढ अंधकारांत आणि शांत अशा प्रदेशांत चालली आहे. समुद्राच्या तळाशीं किती तरी चित्रविचित्र प्राणी आहेत याची तुम्हाला कल्पना नाहीं. एखाद्या वेळीं समुद्रांतील माशाला तारायंत्राची तार म्हणजे दुसरा एकादा प्राणी आहे असें वाटतें. तो त्याजवर हल्ला करतो आणि ती तोडून टाकतो. मग तारेची गती खुंटते, तिची दुरुस्ती झाल्याखेरीज उपयोग नसतो. आटलांटिक महासागरांत जशी आपली बातमी चालली तशी ती काळ्याभोर अशा पाण्यांबरोबर संयुक्त होऊं लागली. आपली तार पाण्याच्याखालीं दोन मैलांवरून जाऊं लागली आहे. या ठिकाणचि खडूंची व पाल्यांच्या मातीची उत्पत्ति होते आतां आपण न्यू फौंडलंडच्या किनाऱ्यानजीक आलों. या ठिकाणीं कॉड नांवाची मासळी पकडण्याकरितां ठिकठिकाणचे लोक येतात. येथून आपली तार कान्सोला जाते. या ठिकाणचा देखावा सुंदर व रानटी आहे. या ठिकाणीं रेड इंडियन्सनी संख्या २००० हजार आहे त्यांचा उत्तम प्रकारचे धनुष्य व बाण करता येतात. या ठिकाणीं गोरे वसाहतवाले पूर्वीं असत; पण आतां ते जंगलांत जाऊन राहिले आहेत. ते लांकडे तोडण्याचा धंदा करतात. या ठिकाणीं इतकी दाट झाडी आहे कीं मनुष्याला ५० मैलांपर्यंत सूर्याचें किरण न लागतां प्रवास करता येतो.

आयर्लंडचा किनारा सोडून आपण १७९६ मैल आलों. या ठिकाणीं पुनः विद्युत्वेग कमी झाला. परंतु आतां जमीनीवरील प्रवाहानें पुनः तो वाढला आहे; तेव्हां आतां आपण नोवास्कोशी याहून न्यू ब्रुन्सवुईकला आलों. या ठिकाणीं लाकडाच्या रांध्यापासून कागद तयार करण्याचे कारखाने आहेत. याखेरीज येथें मोठमोठीं जंगले व पाणथळ जागा असून तेथें रेडइंडीयन्स व हरिणें वगैरे सांपडतात. या रानटी प्रदेशांतून आपली तार एका क्षणाच्या आंत सुधारलेल्या गौरकाय लोकांच्या प्रदेशांत गेली. या ठिकाणचें जंगल तोडण्यांत येऊन त्या जमीनिचे पुष्कळ लहान लहान तुकडे करण्यांत आले. त्या ठिकाणीं खेडीं वसलीं व त्या खेड्यांचीं मोठीं शहरें बनलीं हाच अमेरिका देश होय.

येथें इटली मधले लोक राहिले होते. ते रंगानें काळे होते व इंग्लिश लोकांपेक्षां संख्येनीं अधिक होते. येथें आतां जगांतील सर्वांत मोठे असे उद्योगधंद्याचे कारखाने सुरू असून तेथील लोक अतोनात संपत्ति मिळवीत आहेत. पूर्वींच्या वसाहत करणाऱ्यांना या ठिकाणीं यावयास किती दिवस लागले असतील याची कल्पना करवत नाहीं पण आतां आपण एका मिनिटांत येथें आलों आणि तो निरोप्या आतां गाडी येईल म्हणून वाट पहात आहे. आपण ३५६२ मैलांचा प्रवास केला. पण या ठिकाणीं आपला थोडासा वेळ मोडेल. कारण येथील मनुष्य तार उतरून घेतो व दुसऱ्या माणसाला पुढें पाठविण्यास देतो, पण तोंपर्यंत गगनगामी इमारती तरी

पाहूं. त्यांच्या आंतमध्यें लोक पहा कसें गडबडीनें नुसते इकडे तिकडे हिंडत आहेत ते. त्यांच्या तोंडावर तजेला असा मुळीच नाहीं. एखादा नवीन मनुष्य येथें आला तर येथील गडबडगुंडा पाहून त्याला नुसतें वेड लागावयाचें. न्यूयॉर्क शहरांत आगगाड्या रस्त्यावरून व रस्त्याखालून जात असतात. ट्रामगाड्यांचा तर खणखणाट विचारूं नका, आणि मोटारींचें तर नांवच काढायला नको. जगांतील




तारेनीं कसा प्रवास केला हें दाखविणारी रेषा.

मोठ्या बंदरापैकीं न्यूयॉर्क हें एक बंदर आहे. चला आपली बातमी पुढें गेली. ती पीट्सबर्गला पोहोंचली. येथें कोळशाच्या, पेट्रोलच्या लोखंडाच्या व पोलादाच्या खाणी आहेत. येथून आपली तार शिकागोला जाऊन थडकली. शिकागो हें व्यापारांत दुसऱ्या प्रतीचें बंदर आहे, या ठिकाणीं जितक्या रेलवे आहेत तितक्या जगांत दुसरीकडे कोठेंहि नाहींत. येथें गव्हाचा व्यापार अतोनात चालतो त्याचप्रमाणें मांसाचा व्यापारहि चालतो. येथें दररोज सकाळीं दोन चार लोक जमतात व जगांतील मांसाचे व गव्हाचे भाव ठरवतात. तथापि शिकागोची धान्यावरील सत्ता आतां थोडी थोडी उडूं लागली आहे.

आपली तार आतां मिसोरी नदी ओलांडून ओमारा शहरीं आली. हें शहर नेब्रास्का संस्थानांत आहे. येथील लोक शेतकरी आहेत. हवा उष्ण असल्यामुळें शेतकरी मका पिकवतात व त्यावर गुरें पोसतात. यांची सारी शेती पावसावर अवलंबून आहे.

आपण आतां रॉकी मौंटन्स नांवाच्या ठिकाणीं आलों. येथें डेनवर नांवाचें गांव असून तेथें सोन्या रुप्याच्या खाणी आहेत. तेथून कूच करीत आपण कॅलीफोर्निआला आलों व एका सेकंदांत सॅनफ्रॅन्सीस्कोला पोहोचलों. न्यूयॉर्कपासून सॅन्फ्रॅन्सिस्को ३००० मैल आहे. लंडनपासून येथपर्यंत आपला ६५०० मैलांचा प्रवास सुमारें मिनिटांत झाला. तिकडे तो आपला प्रतिस्पर्धी नुकताच गाडींत चढत आहे. येथें पुन्हां तार बदलते. तथापि याला फार वेळ लागत नाहीं.

येथून तार पुनः समुद्रांत शिरते. हाच पासिफिक महासागर होय. सॅन्फ्रासिस्कोहून जी तार निघाली ती थेट सॅन्डविच बेटांत येऊन थडकली यांपैकीं एका बेटांत ज्वालामुखी पर्वत असून तो फार मोठा आहे. येथील लोक पूर्वीं फार रानटी होते. परंतु ते आतां सुधारूं लागले आहेत. ते मोठे आनंदी वृत्तीचे व रंगेल असे आहेत. त्यांची वस्ती नारळाच्या झाडाजवळ असते. ते भाकरीचें फळ खातात. त्यांचें मुख्य ठिकाण होनोलूलू नांवाचें आहे. होनोलूलू म्हणजे मृत्युलोकींचें नंदनवन आहे. त्यासारखें सुंदर ठिकाण जगांत दुसरें नाहीं. हें एक बंदर असून

त्या ठिकाणीं चिनी जपानी वगैरे व्यापारी येतात.

या पुढील ठिकाण फार गमतीचें आहे. त्याचें नांव सँडआयलंड असें आहे. या ठिकाणीं कांहीं वर्षांपूर्वीं नुसती वाळू होती. त्या ठिकाणीं रानटी पक्षी रहात असत. परंतु आतां तेथें पोंवळ्याचे थर दिसत आहेत. हें बेट फार लहान आहे.

येथून आपली तार चोरट्या लोकांच्या बेटांत चालली. येथें स्पेन देशांतील लोक रहातात. त्या ठिकाणींच प्रथम मॅगेलीन नांवाचा प्रसिद्ध प्रवाशी राच्या भांड्यांत स्वयंपाक करतात व शेजारच्या रानांत जाऊन लांकडें तोडून आणतात. येथील लोक फार दयाळू व उदार आहेत. स्पेनच्या लोकांनीं त्यांना फार वाईट रीतीनें वागविलें. त्यांचें मुख्य बेट गुआम नांवाचें आहे. हें अमेरिकेच्या ताब्यांत असून अमेरिकन लोक त्यांना सुधारण्याचा प्रयत्न करीत आहेत. ते फार गरीब असल्यामुळें चोरी करण्याकडे त्यांची अझूनहि प्रवृत्ती होते. या ठिकाणीं धरणी कंपाचे धक्के कधीं कधीं बसतात.



आयलंडच्या किनाऱ्यावरील एक रमणीय गांव.

आला होता. त्या प्रवाशाचा उद्देश जगभर प्रवास करून जग वाटोळें आहे असें सिद्ध करण्याचा होता. तेथील मूळच्या रहिवाशांनीं मॅगीलनच्या जहाजांतील एवढ्या वस्तु चोरल्या कीं, त्यांनीं त्या बेटाला चोरांचें बेट असें नांव दिलें. तेथील लोक मोठी चमत्कारिक भाषा बोलतात तिला कामोरो असें नांव आहे. तेथील पुष्कळ लोक बांबूंच्या झोंपड्यांतून रहातात. तेथील स्त्रिया खाप-

या पुढें आपली तार फिलिपाईन्स बेटांत आली. आपण आतां निम्मा प्रवास केला. आपण दोन पूर्णांक एक द्वितीयांश मिनिटांत इंग्लंड, आयर्लंड, अमेरिका, आटलांटिक पासिफिक वगैरे महासागर ओलांडले आणि तो निरोप्या आतां कोठें गाडींत बसून निघाला. या ठिकाणीं पुनः तार उतरून घेऊन दुसऱ्याच्या हातांत पुढें पाठविण्यास द्यावी

लागते. हें मॅनिला शहर आहे, तें व्यापाराकरितां फार प्रसिद्ध आहे.

फिलिपाईन्स मधल्या रहिवाशांना फिलिपिनोज म्हणतात. यांच्यापैकीं बरेचशे मूळ मलाया जातीचे आहेत. परंतु इतर जाती रानटी असून त्या नग्नप्राय स्थितींत रानावनांतून भटकत असतात.



आपली तार फिलिपाईन्स मध्यें पोंहोचली असतां तेथील मुली कामांत गुंतल्या आहेत.

त्यांची शरीरयष्टी ठेंगू असते व ते अद्याप विषारी बाणांनीं लोकांचीं मुंडकीं उडवितात व खातात. पुष्कळ फिलिपिनोज शेतकी करतात. ते तांदुळ पिकवतात व साखर तयार करतात. त्यांची शेती उत्कृष्ट प्रकारची आहे, ते लोक जरा आळशी आहत, त्यामुळें तेथील व्यापार चीनी लोकांनीं बळकावला आहे. शिवाय तेथें अरब व मलायामधील लोकहि आहेत. तेथील कांहीं रस्ते मोठमोठे आहेत; परंतु इमारती मजल्या दोन मजल्याच्या वर नसतात. कारण भूकंपाची धास्ती असल्यामुळें मोठाल्या इमारती कोसळण्याची भीति वाटते. हीं बेटें अमेरिकेच्या ताब्यांत असल्यामुळें ते आपण रानटी लोकांना सुधारण्याचें काम करीत आहेत असें म्हणतात..

मॅनीलाहून जी तार निघाली ती थेट चीन मध्यें आली. मॅनीला व हाँगकाँगमध्यें ७४३ मैल अंतर आहे व आगबोटीला तें अंतर तोडण्यास दोन पूर्णांक एक द्वितीयांश दिवस लागतात. थोड्या वर्षांपूर्वी हाँगकाँग एक ओसाड प्रदेश होता. परंतु तो ब्रिटिशांच्या ताब्यांत आल्यापासून त्याचें महत्त्व वाढलें. हाँगकाँग हें एक मोठें बंदर झालें आहे. त्या ठिकाणीं सगळ्या जातीचे लोक दृष्टीस पडतात. तेथें लोकांची इतकी दाटी आहे कीं, चीनचे पुष्कळ लोक होडींत घरें करून रहातात व घरभाडें वांचवतात.

हाँगकाँगहून जी तार निघाली ती बोर्नीओला आली. या ठिकाणीं बरेच रानटी लोक व मलायांतील लढवय्ये आहेत. रानटी लोक खुजे आहेत, ते जंगलांत रहातात व बांबूचे बाण करून त्याला विष लावून शिकार करतात. तेथें डायक्स नांवाची दुसरी एक जात आहे. ती निष्ठुर व रक्त प्राशनास आतुर अशी आहे. किनाऱ्यावर सुधारलेले मलायी लोक रहातात. बोर्नीओला सुलतानचो वस्ती आहे. हें सारें शहर पाण्यावर आहे. शहरांतील मुख्य रस्त्यावर जहाजें नांगरून पडलेलीं असतात. बाजारांतील प्रत्येक दुकान होडींत असतें. दुकानावर

स्त्रिया बसतात व त्यांच्या डोकीला मोठाल्या पानाच्या टोप्या असतात. कांहीं पुरुष अगदीं नागवे असतात व तशा स्थितींतच होड्या वल्हवतात; परंतु स्त्रिया आपल्या अंगावर चित्रविचित्र रंगाचे कपडे घालतात.

येथून पुढचें ठिकाण सिंगापूर. ब्रिटिशांच्या ताब्यांत येण्यापूर्वी हें एक खडकाळ ठिकाण होतें. पण आतां त्याला अभूतपूर्व महत्व आलें आहे. येथें चीन लोकांची वस्ती अतिशय आहे. ते लोक बहुतेक मोलमजुरी करतात. चीनी लोकांचा जसजसा सुधारलेल्या लोकांबरोबर परिचय होऊं लागला तसतसा त्यांनीं आपल्या वागण्यांत फरक केला. येथील बहुतेक चिनी लोकांनीं आतां आपल्या शेंडीस फांटा दिला आहे.

येथून डच लोकांच्या ताब्यांतील जावामध्यें आपली तार आली. या ठिकाणीं ज्वालामुखी पर्वतांची रांग दृष्टीस पडते. मूळचे रहिवासी पाण्यावर रहातात आणि युरोपिअन लोक घरें दारें करून यांच्यापासून २ मैल दूर रहात आहेत. येथें झाडी पुष्कळ आहे व रस्त्यांतून दुतर्फा झाडें लावलेलीं दृष्टीस पडतात. प्रत्येक बंगल्याजवळ व घराजवळ फळझाडें असतात. सिंगापूरपेक्षां जावा बेटांत जास्त ठिकाणचे लोक एकत्र झालेले आहेत. डच लोकांनीं मलायी लोकांना शेतकी कशी करावी याचें शिक्षण दिलें आहे त्यामुळें हे लोक उद्योगी झाले आहेत. जावाबेटावर हिंदूंची सत्ता फार दिवस होती. १४७८ त तें आरबांच्या ताब्यांत गेलें.

येथून आपली तार हिंदी महासागरांतील पोंवळ्यांच्या बेटांत आली. त्यांचें नांव कोकोस बेटें असें आहे. ह्या बेटांच्या आसपास नारळाचीं झाडें दिसतात. येथून तार एकदम ४२७२ मैलांचा टप्पा करते व दक्षीण आफ्रिकेला पोहोंचते. मध्यंतरीं एक रॉडरीग्स बेट लागतें. तें फार सुंदर आहे. एका ज्वालामुखी पर्वताच्या शिखरावर हें बेट असून त्या आफाट समुद्रांत याकडे पाहून फार मजा वाटतें. या बेटाचा पृष्ठभाग अगदीं अकुंचित आहे. या ठिकाणीं ज्वालामुखी पर्वतांतून निघणाऱ्या तप्त-



माल्टा हें तटबंदीचें बंदर असून तें ब्रिटिशांच्या ताब्यांत आहे.

रसाचा सांठा ठिकठिकाणीं दिसतो. या बेटाभोंवती पोंवळ्याचा किनारा आहे. हें बेट इतकें भयाण व उदास दिसतें कीं, त्या ठिकाणीं माणसाची वस्ती पाहून आश्चर्य वाटतें. लोक या ठिकाणीं कसें येऊन राहिले असतील याची कल्पना करवत नाहीं. येथें प्रथम एक फ्रेंच गृहस्थ आला. त्याचें व सरकारचें धार्मिक बाबतींत जमेनासें झाल्यामुळें

त्याला फ्रान्समधून हांकलून लावण्यांत आलें. तो १६९१ त येथें आला. तेथें त्याला पुष्कळ कांसव आढळले. तो ते खाऊं लागला. हें बेट सध्यां ब्रिटिशांच्या ताब्यांत आहे. येथील शेतांत उत्तम प्रकारची लागवड करतात व धान्य चांगलें पिकतें. येथें कासव पकडतात व त्याच्या मांसाचा व्यापार करतात.

जिंकण्यांत आलें. येथून पुढें नाताळमधलि दर्बान शहरीं आपली तार गेली.

दर्बानच्या आंतमध्यें सोन्याच्या खाणी असल्यामुळें दर्बान बंदराला महत्व आलें. दक्षिण आफ्रिकेच्या युद्धांत येथें मोठे अनर्थ व रक्तपात झाले. परंतु आतां तेथें पूर्ण शांतता नांदत असून सर्व जातीचे लोक तेथील वसाहतींत काम करीत आहेत.



सारावाक मध्यें हे चमत्कारिक पक्षी असतात.

येथून ४०० मैलांवर मॉरिशस बेट आहे. तेंहि ज्वालामुखी पर्वतापासूनच निर्माण झालें आहे. येथें साखरेची लागवड करतात. आपल्या देशांतील लोक व आफ्रिकेंतील लोक, गोरे वसाहतवाले पकडून नेतात व त्यांना कामास लावतात. त्यांना अतिशय निष्ठुरपणें वागविण्यांत येतें. हें बेट १८१० मध्यें

दर्बान जेथें आहे तेथील किनारा उष्ण व सुपीक असल्यामुळें त्याठिकाणीं ज्वारी, चहा, व फळें पुष्कळ पिकतात. शिवाय आंतमध्यें गुरें पुष्कळ असल्यामुळें तींहि येथें येतात. १०० वर्षांपूर्वी झूलू लोकांनीं येथील गोऱ्या व काळ्यावसाहतवाल्यांना हांकलून लावण्याचें ठरविलें होतें; त्यांचा पुढारी

स्वतःला नेपोलियन इतके मोठे मानीत होता. परंतु त्यांचा पराभव होऊन ते गोऱ्या लोकांचे गुलाम बनले. नाताळमध्येंच म. गांधींनी गोऱ्यावसाहतवाल्यांशीं सत्याग्रहाची मोहीम केली होती.

आपण आतां मोझांबिक मधून चाललों आहों. हें शहर पोर्तुगीज लोकांनीं वसविलें. तथापि तेथील व्यापार दर्बान इतका नाहीं. हें पूर्वीं हस्तीदंत शोधणाऱ्यांचें वस्तीचें ठिकाण होतें. येथें सिंह व पाणहत्ती जंगलांतून, नद्यांतून आढळतात. ह्या जमिनींवर सध्यां चांगली लागवड होत आहे.

आपण आतां झांझीबारला आलों. येथें अरबांची वस्ती आहे. येथील सुलतान आफ्रिकन लोकांना पकडत असे व गुलाम म्हणून विकत असे परंतु तो काळ आतां गेला.

येथून तार एडनला गेली. एडन हें तांबड्या समुद्राच्या तोंडाशीं असून हिंदुस्थानांत जाणाऱ्या बोटींचें संरक्षण करूं शकतें.

पुढील ठिकाण सुवेझ होय. याची माहिती सर्वांना आहेच.

येथून तारेचा पाण्यांतील प्रवास संपला. आपली तार आतां वाळूंतून व इजिप्तमधील शेतांतून आलेक्झांड्रीयाला जाते. तेथें पुष्कळ मोठा व्यापार चालतो. हें शहर ॲलेक्झांडरनें वसविलें होतें.

येथून पुनः तार पाण्यांत शिरते व माल्टाला जाते. माल्टा हें तटबंदी केलेलें बंदर आहे. येथील लोकांचे पूर्वज इटली मधील होते.

याच्या पुढील ठिकाण जिब्राल्टर आहे. येथें ब्रिटिशांचा तोफखाना आहे व त्याची नजर भूमध्य व अटलांटिक महासागरांतील आगबोटीवर असते. तो एक स्पेनचा तुकडा आहे व स्पेननें हा तुकडा फ्रेंचांना ब्रिटिशांच्या विरुद्ध मदत करून गमावला. येथील तोफखाना एवढा प्रचंड आहे कीं, तो जगांतील कोणत्याहि सामर्थ्यवान आरमाराला थांबवूं शकतो. येथून आपली तार लंडनला जाऊन पोंहोचली. आपल्या तारेनीं १२६८४ मैलांची पृथ्वी प्रदक्षिणा ५ मिनिटांच्या आंत केली तरी आपला प्रतिस्पर्धी बातमीदार आला नाहीं; पण हा दारावर आवाज कसला आला ? होय, तोच दार ठोठावीत आहे. असो, एकंदरींत आपण ही शर्यत जिंकली.

---

## पेशवाईतील शिक्षण.

चीरंजीव राजश्री रघुनाथ यासी प्रति बाळाजी बाजीराव प्रधान आशीर्वाद. उपरि येथील कुशल ता. १७ जमादिलावल जाणून स्वकीये कुशल लिहीत जाणें. विशेष. तेथून जाते समयीं जें सुचलें तें तुम्हांस सांगितलें आहे. त्याचें स्मरण निरंतर मनांत असूं देत जाणें. रघुवंश व विदुरनीत, चाणाक्य व जें तुम्हास येत असेल त्याची नेमपूर्वक चिंतणिका करून थोडेंबहुत शास्त्री यांजवळ नित्य म्हणत जाणें. विराटपर्वापासून पुढें भारत रिकामपणीं वाचीत जाणें. नेमेंकरून शंभर दोनशें दंड निरंतर काढीत जाणें. केवळ घोडीं फेरावयास छंदास न लागणें. वजनी, कैली घेरीज, वरावर्द करावयाचा सराव बहुत करणें. चिरंजीव भाऊची मर्जी बहुत प्रकारें रक्षण करीत जाणें. जे आज्ञा करतील तेंच काम करावें. बहुतकरून भाऊबरोबरच जेवीत जाणें. घोडीं वेगळीं बांधीत न जाणें. क्षुद्र

मनुष्यांशीं सहवास कोणें प्रकारें हि न करणें मातुश्री बाई, ताई, अनुबाई यांसी एका दोहों दिवशीं अर्ध घटकाभर जाऊन बसत जाणें. शरीर-प्रकृत नीट नाहीं यास्तव औषध कांहीं नेमेंकरून घेत जाणें. भाऊसमागमें घोडीं फेरावयास जात जाणें. कालानुरूप, वयास उचित, योग्य वेष करीत असावें. देवपूजा थोडी, परंतु एकांतीं, न बोलतां करीत जाणें. इतकें हि नेमें करून करावें आणि गर्व न करावा. निरंतर साधनवृत्तीनें वडिलांची आज्ञा प्रसन्नतेनें मानावी. सावध वर्तावें. सर्व जें मनेंकरून समजेल तें समजावें. वडिलांची मर्जी उत्तम असलिया पुसावें. शिष्यधर्में असलिया फार उपयोग आहे. चिरंजीव जनार्दन बहुत कामहि करून पढतात. हे हरएक गोष्टींत अधिक जाहल्यास तुम्हीं मान्य पुरुष यांस असें व्हाल. विशेष काय लिहिणें ? येथील वर्तमान तर उदेपुराजवळ पंच-वीसा दिवसांत पावलों. श्रीकृपेनें मेहनत करून दिल्लीचे सुमारें जात आहों. जसें पुढील वर्तमान येत जाईल तैसी योजना होईल हे आशीर्वाद.

---

## तपासणी.

ज्या शाळांना सरकारी ग्रँट मिळते, त्या शाळा दरवर्षीं सरकारी अधिकाऱ्याकडून तपासल्या जातात ज्या शाळांचें राष्ट्रीय स्वरूप आहे त्यांच्यावर अर्थातच सरकारची देखरेख नसते. प्रत्येक शाळेवर कोणातरी तज्ज्ञ व अनुभवी गृहस्थाची देखरेख असणें जरूर असतें. शाळेंत शिक्षक व इतर अधिकारी जें काय काम करतात तें कसें केलें जातें, त्यांत काय काय सुधारणा होणें जरूर आहे, शाळेला कोणत्या कोणत्या गरजा आहेत वगैरे गोष्टींकडे लक्ष देण्यास अर्थातच अशा प्रकारची तपासणी पाहिजे. परंतु त्या तपासणीचा उद्देश छिद्रान्वेषी स्वरूपाचा नसावा. दुर्दैवानें आमच्या देशांत अशी स्थिति आहे, असें मोठ्या दुःखानें म्हणावें लागतें.

शाळाखात्यांतील अधिकाऱ्यांना जास्त अनुभव व जास्त ज्ञान असल्यामुळें सरकारकडून त्यांची नेमणूक शाळा तपासण्याच्या कामाकडे होते, परंतु हा अधिकार म्हणजे सासुबाईपणाचा हक्क गाजविणें असें ह्या गृहस्थांना वाटत असतें. कोणत्या शाळेंत काय कमी आहे एवढेंच पाहाण्याचें जणू काय आपलें काम आहे अशी त्यांची समजूत झालेली असते; मग इतर गोष्टी कितीहि समाधानकारक असल्यातरी त्याकडे लक्ष देण्यास हे लोक बांधले गेलेले नसतात. एखाद्या मुलाच्या हातांत बारीक पेन्सिल सांपडली, किंवा त्याचा सदरा मळका असला, अथवा मास्तर जोरानें ओरडला कीं ह्या अधिकाऱ्यांना जो काय अवर्णनीय आनंद होतो तो सांगतां पुरवत नाहीं. नेमक्या तेवढ्याच गोष्टीचा उल्लेख त्यांच्या रिपोर्टांत सांपडावयाचा. मग त्या शाळेनें कितिहि चांगली प्रगति केलेली असो या-खेरीज ह्या अधिकाऱ्यांना आपलें खाजगी वैर साधून घ्यावयास याच वेळीं सवड सांपडते. एखादा मास्तर अधिकाऱ्याच्या घरीं गेला नसला किंवा त्यांच्या बरदास्तींत कमीपणा दिसून आला तर त्याचा परिणाम गरीब शिक्षकावर किती होतो हें सांगणें नको.

मामलेदार साहेबांची स्वारी फिरतीवर गेली म्हणजे गांवच्या पाटील कुळकर्ण्यांची कोण त्रेधा उडते हें सर्वांना माहीत आहे. तसाच प्रकार ह्या शिक्षण अधिकाऱ्यांच्या बाबतींत होतो.

ह्या नियमाला अपवाद नसतात असें नाहीं परंतु बहुतेक अनुभव वरील प्रकारचाच येतो. अमेरिकेसारख्या देशांतील तपासणीसांची जर आपण कळकळ व शिक्षणविषयक प्रेम पाहिलें तर येथील लोकांना लज्जेनें माना खालींच घालावयास पाहिजेत. त्यांना नुसता सासूपणाचा हक्क गाजवावयाचा नसतो. त्यांना शाळेमध्यें शिकणारीं मुलें हीं भावी पिढीचे आधारस्तंभ आहेत असें वाटतें व त्या दृष्टीनें ते काम करीत असतात. त्यांची मुलाबरोबर वागणूक अत्यंत प्रेमळ असते, व शिक्षक–वर्गाला ते आपल्या भाऊबहिणीप्रमाणें प्रेमानें वागवून त्यांच्या मार्गांतील चूका दाखवीत असतात. आमची युनिव्हर्सिटि ज्याप्रमाणें वर्षाच्या काठीं एकदां परीक्षा घेतली कीं मोकळी होते, त्याप्रमाणेंच आमचेकडील अधिकारी वर्षांतून एकदां गरीब बिचाऱ्या शिक्षकांवर ताशेरा झाडला कीं वर्षभर मोकळे. त्या शिक्षकाचें दैवहि यांच्याच हातांत असल्यामुळें व कमी अधिक पगार मिळणें त्यांच्यावरच अवलंबून असल्यामुळें आमचा शिक्षकवर्ग लाचार असतो.

ही येथील वस्तुस्थिती आहे. आतां शिक्षणखातें सोपीव झालें आहे असें सरकार म्हणतें. शिक्षणमंत्र्याला जरी इकडचा डोंगर तिकडे करून टाकण्याइतकी सुधारणा आपल्या खात्यांत करतां आली नाहीं तरी अंतर्गत कारभारामध्यें त्याचा हात धरणारा कोणी नसल्यामुळें त्याला तेवढें रान मोकळें आहे. त्या करितांच शिक्षणखात्यांत वाकबगार असलेला माणूस मंत्री असावयास पाहिजे असतो, परंतु अशी कोणतीच सुधारणा अद्याप झालेली दिसून येत नाहीं.

शिक्षणखात्यांतील प्रत्येक मनुष्यानें खादी वापरावी, असा ठराव होणें इष्ट असलें व पुढें मागें होण्यासारखा असला तरी सध्यांचे शिक्षणमंत्री तेवढ्या धडाडीचे नाहींत, तेव्हां आम्ही त्याविषयीं बोलूं इच्छीत नाहीं. परंतु आजोबाच्या किंवा पंजोबांच्या वेळीं जो शिक्षणक्रम असे तो आम्हांवरहि लादला जावा हें मात्र विपरीत दिसतें. सर्व हिंदुस्थान म० गांधींच्या चळवळीनें खडबडून जाऊन राष्ट्रीय शिक्षणाचे अंतीम टोक गांठीत असतां येथील शिक्षणखातें अद्याप जुन्या चिंध्यांमध्यें लोळत पडून स्वतःस धन्य मानून घेत आहे. सामाजिक सुधाराणांचा प्रश्न निघाला म्हणजे त्या मात्र तुम्ही जोरानीं करा असें सांगण्यांत येतें; कारण त्याविषयीं आमच्यांतच लढा माजवावयाचा असतो. परंतु शिक्षणखातें किंवा इतर राजकीय प्रश्नांत कांहीं सुधारणा करावयाच्या असल्यास त्याकरितां सरकार बरोबर झगडावयाचें असल्यामुळें यांना मूग गिळून बसण्याखेरीज दुसरा मार्गच नसतो.

प्राथमिक शिक्षण सक्तीचें व मोफत करणें जितकें जरुरीचें किंवा अस्पृश्यवर्गांना सुशिक्षित करून त्यांचा दर्जा वाढविणें जितकें अवश्य त्याहिपेक्षां जास्त अवश्यकता सध्यांचा शिक्षणक्रम दुरुस्त करून शिक्षणखात्याच्या अधिकारी वर्गाला कार्यक्षम व कार्यदक्ष करणें होय. हें जोंवर होत नाहीं तोंवर अशिक्षितांना चुकीच्याच मार्गानें शिक्षण द्या असें म्हणणें इष्ट नाहीं. असो आजच्या लेखामध्यें आम्ही ह्या अधिकाऱ्यांच्या कार्यक्षेत्रांत सुधारणा घडवून येण्याकरितां काय काय केलें पाहिजे हें दाखविणार आहोंत. शाळेच्या अधिकाऱ्यांना टीकेचा फटकारा मारून आंग झाडून जाणें चांगलें नाहीं. त्यांनीं आपण दिलेल्या सूचना कितपत पाळल्या जातात हें पहाणें जरूर आहे. त्याकरितां देखरेख करणाऱ्या अधिकारी वर्गांत जास्त लोकांचा

समावेश करावा लागेल, त्यास गत्यंतर नाहीं. परंतु त्याखेरीज खात्यांत सुधारणा होणें शक्य नाहीं. त्याचप्रमाणें पाश्चात्त्य संस्कृतीचा सांगाडा घेऊन त्यांत आपल्या संस्कृतीचा प्राण घालून शिक्षणक्रमाची रूपरेषा आंखली पाहिजे. सध्यांच्या शाळांतून जो अभ्यासक्रम चालू आहे तो पाश्चात्त्याकडून आंखला गेला असल्यामुळें तो बराच चुकलेला आहे ही गोष्ट कोणीहि कबूल करील. त्यामुळें मुलांना मानसिक व शारिरिक बाबतींत किती दुष्परिणाम भोगावे लागतात, हें सांगण्याची जरुरी नाहीं.

ही ओरड आज बरेच दिवस चालत असल्यामुळें त्याकडे दुर्लक्ष करण्याचा अधिकारच आपणांस आहे असें सरकारला वाटतें. तसेंच नुसत्या टीका करणें सोपें. मोघम सूचना कोणाहि जबाबदार माणसाला करतां येतात वगैरे त्यांची यावर ठोकळ उत्तरें आहेत.

परंतु ज्यांना ह्या शिक्षणक्रमाचा कंटाळा आला आहे त्यांना राष्ट्रीय शिक्षणाचा मार्ग मोकळा आहे. आणि तोच राष्ट्राच्या उन्नतीस कारणीभूत होईल असें आम्हांस वाटतें.

शाळेवर देखरेख करणारांनीं कोणकोणत्या गोष्टीकडे लक्ष दिलें पाहिजे एवढें सांगून आम्ही वाचकांची रजा घेतों.

१ मुलांच्या मानानें शाळेची जागा पुरेशी आहे किंवा नाहीं.

२ उजेड किती व कसला आहे.

३ खोलीचें उष्णतामान.

४ खिडक्यांचा आकार, ठेवण, व त्यांची अवस्था.

५ फळ्यांची संख्या, जागा वगैरे.

६ नकाशे किती व कसे आहेत.

७ सामुग्री कशी आहे.

८ पाण्याचा पुरवठा.

९ खेळण्याची जागा व तिचा उपयोग कितपत होतो.

१० धुण्याची, कपड्यांची, गुंड्यांची, आरशाची वगैरे व्यवस्था.

११ विद्यार्थी मुलांच्या मानानें वर्गाची जागा.

१२ प्रत्येक शिक्षकाला किती काम पडतें.

१३ वर्गवारी योग्य कां अयोग्य.

१४ मुलांचे कपडे, स्वच्छता व खोडी.

१५ शाळेच्या सामानाची नासधूस मुलांकडून किती होते, शाळेचे नियम कितपत पाळले जातात, शिक्षकांशीं मुलांचें वर्तन दुसऱ्या विद्यार्थ्यांबरोबर वर्तन.

१६ बौद्धिक दर्जा, श्रेष्ठ, मध्यम कां कनिष्ठ.

१७ आरोग्य शारीरिक व्यंगें, सांथी, वाईट खाणें वगैरे.

१८ उत्तरें देण्याची रीत

१९ शाळेच्या अभ्यासांत एकंदर प्रगती.

२० मुलांच्या जवळ पुस्तकें असतात कां नाहीं.

२१ शिक्षकः पाठ तयार करून येतात किंवा नाहीं.

२२ शिकविण्यास योग्य कां अयोग्य.

२३ विद्यार्थ्यांबरोबर वर्तन.

२४ नेहमींचें काम व्यवस्थीत रीतीनें करण्याकडे प्रवृत्ती आहे किंवा नाहीं.

२५ समारंभ वगैरे बाबतींत कितपत पुढाकार घेण्यांत येतो.

वरिष्ठाकडून ज्या सूचना करण्यांत येतात त्या आज्ञापक स्वरूपाच्या नसाव्यात. शिक्षक जेव्हां अतिशय त्रासलेला असतो किंवा जेव्हां मुलें जवळ असतात तेव्हां सूचना करूं नयेत शिक्षक जर मनापासून काम करीत असेल तर अद्वातद्वा टीका करून त्याला नाराज करूं नये. गौण गोष्टीकडे

मामलेदार साहेबांची स्वारी फिरतीवर गेली म्हणजे गांवच्या पाटील कुळकर्ण्यांची कोण त्रेधा उडते हें सर्वांना माहीत आहे. तसाच प्रकार ह्या शिक्षण अधिकाऱ्यांच्या बाबतींत होतो.

ह्या नियमाला अपवाद नसतात असें नाहीं परंतु बहुतेक अनुभव वरील प्रकारचाच येतो. अमेरिकेसारख्या देशांतील तपासणीसांची जर आपण कळकळ व शिक्षणविषयक प्रेम पाहिलें तर येथील लोकांना लज्जेनें माना खालींच घालावयास पाहिजेत. त्यांना नुसता सासूपणाचा हक्क गाजवावयाचा नसतो. त्यांना शाळेमध्यें शिकणारीं मुलें हीं भावी पिढीचे आधारस्तंभ आहेत असें वाटतें व त्या दृष्टीनें ते काम करीत असतात. त्यांची मुलाबरोबर वागणूक अत्यंत प्रेमळ असते, व शिक्षक—वर्गाला ते आपल्या भाऊबहिणीप्रमाणें प्रेमानें वागवून त्यांच्या मार्गातील चूका दाखवीत असतात. आमची युनिव्हर्सिटि ज्याप्रमाणें वर्षाच्या काठीं एकदां परीक्षा घेतली कीं मोकळी होते, त्याप्रमाणेंच आमचेकडील अधिकारी वर्षांतून एकदां गरीब बिचाऱ्या शिक्षकांवर ताशेरा झाडला कीं वर्षभर मोकळे. त्या शिक्षकाचें दैवहि यांच्याच हातांत असल्यामुळें व कमी अधिक पगार मिळणें त्यांच्यावरच अवलंबून असल्यामुळें आमचा शिक्षकवर्ग लाचार असतो.

ही येथील वस्तुस्थिती आहे. आतां शिक्षणखातें सोपीव झालें आहे असें सरकार म्हणतें. शिक्षणमंत्र्याला जरी इकडचा डोंगर तिकडे करून टाकण्याइतकी सुधारणा आपल्या खात्यांत करतां आली नाहीं तरी अंतर्गत कारभारामध्यें त्याचा हात धरणारा कोणी नसल्यामुळें त्याला तेवढें रान मोकळें आहे. त्या करितांच शिक्षणखात्यांत वाकबगार असलेला माणूस मंत्री असावयास पाहिजे असतो, परंतु अशी कोणतीच सुधारणा अद्याप झालेली दिसून येत नाहीं.

शिक्षणखात्यांतील प्रत्येक मनुष्यानें खादी वापरावी, असा ठराव होणें इष्ट असलें व पुढें मागें होण्यासारखा असला तरी सध्यांचे शिक्षणमंत्री तेवढ्या धडाडीचे नाहींत, तेव्हां आम्ही त्याविषयीं बोलू इच्छीत नाहीं. परंतु आजोबाच्या किंवा पंजोबांच्या वेळीं जो शिक्षणक्रम असे तो आम्हावरहि लादला जावा हें मात्र विपरीत दिसतें. सर्व हिंदुस्थान म० गांधींच्या चळवळीनें खडबडून जाऊन राष्ट्रीय शिक्षणाचे अंतीम टोक गांठीत असतां येथील शिक्षणखातें अद्याप जुन्या चिंध्यांमध्यें लोळत पडून स्वतःस धन्य मानून घेत आहे. सामाजिक सुधाराणांचा प्रश्न निघाला म्हणजे त्या मात्र तुम्ही जोरानीं करा असें सांगण्यांत येतें; कारण त्याविषयीं आमच्यांतच लढा माजवावयाचा असतो. परंतु शिक्षणखातें किंवा इतर राजकीय प्रश्नांत कांहीं सुधारणा करावयाच्या असल्यास त्याकरितां सरकार बरोबर झगडावयाचें असल्यामुळें यांना मूग गिळून बसण्याखेरीज दुसरा मार्गच नसतो.

प्राथमिक शिक्षण सक्तीचें व मोफत करणें जितकें जरुरीचें किंवा अस्पृश्यवर्गांना सुशिक्षित करून त्यांचा दर्जा वाढविणें जितकें अवश्य त्याहिपेक्षां जास्त अवश्यकता सध्यांचा शिक्षणक्रम दुरुस्त करून शिक्षणखात्याच्या अधिकारी वर्गाला कार्यक्षम व कार्यदक्ष करणें होय. हें जोंवर होत नाहीं.तोवर अशिक्षितांना चुकीच्याच मार्गानें शिक्षण द्या असें म्हणणें इष्ट नाहीं. असो आजच्या लेखामध्यें आम्ही ह्या अधिकाऱ्यांच्या कार्यक्षेत्रांत सुधारणा घडवून येण्याकरितां काय काय केलें पाहिजे हें दाखविणार आहोंत. शाळेच्या अधिकाऱ्यांना टीकेचा फटकारा मारून आंग झाडून जाणें चांगलें नाहीं. त्यांनीं आपण दिलेल्या सूचना कितपत पाळल्या जातात हें पहाणें जरूर आहे. त्याकरितां देखरेख करणाऱ्या अधिकारी वर्गांत जास्त लोकांचा

समावेश करावा लागेल, त्यास गत्यंतर नाहीं. परंतु त्याखेरीज खात्यांत सुधारणा होणें शक्य नाहीं. त्याचप्रमाणें पाश्चात्त्य संस्कृतीचा सांगाडा घेऊन त्यांत आपल्या संस्कृतीचा प्राण घालून शिक्षणक्रमाची रूपरेघा आंखली पाहिजे सध्यांच्या शाळांतून जो अभ्यासक्रम चालू आहे तो पाश्चात्त्याकडून आंखला गेला असल्यामुळें तो बराच चुकलेला आहे ही गोष्ट कोणीहि कबूल करील. त्यामुळें मुलांना मानसिक व शारिरिक बाबतींत किती दुष्परिणाम भोगावे लागतात, हें सांगण्याची जरुरी नाहीं.

ही ओरड आज बरेच दिवस चालत असल्यामुळें त्याकडे दुर्लक्ष करण्याचा अधिकारच आपणांस आहे असें सरकारला वाटतें. तसेंच नुसत्या टीका करणें सोपें. मोघम सूचना कोणाहि जबाबदार माणसाला करतां येतात वगैरे त्यांची यावर ठोकळ उत्तरें आहेत.

परंतु ज्यांना ह्या शिक्षणक्रमाचा कंटाळा आला आहे त्यांना राष्ट्रीय शिक्षणाचा मार्ग मोकळा आहे. आणि तोच राष्ट्राच्या उन्नतीस कारणीभूत होईल असें आम्हांस वाटतें.

शाळेवर देखरेख करणारांनीं कोणकोणत्या गोष्टीकडे लक्ष दिलें पाहिजे एवढें सांगून आम्ही वाचकांची रजा घेतों.

१ मुलांच्या मानानें शाळेची जागा पुरेशी आहे किंवा नाहीं.

२ उजेड किती व कसला आहे.

३ खोलीचें उष्णतामान.

४ खिडक्यांचा आकार, ठेवण, व त्यांची अवस्था.

५ फळ्यांची संख्या, जागा वगैरे.

६ नकाशे किती व कसे आहेत.

७ सामुग्री कशी आहे.

८ पाण्याचा पुरवठा.

९ खेळण्याची जागा व तिचा उपयोग कितहोतो.

१० धुण्याची, कपड्यांची, गुंड्यांची, आरशाची वगैरे व्यवस्था.

११ विद्यार्थी मुलांच्या मानानें वर्गाची जागा.

१२ प्रत्येक शिक्षकाला किती काम पडतें.

१३ वर्गवारी योग्य कां अयोग्य.

१४ मुलांचे कपडे, स्वच्छता व खोडी.

१५ शाळेच्या सामानाची नासधूस मुलांकडून किती होते, शाळेचे नियम कितपत पाळले जातात, शिक्षकांशीं मुलांचें वर्तन दुसऱ्या विद्यार्थ्यांबरोबर वर्तन.

१६ बौद्धिक दर्जा, श्रेष्ठ, मध्यम कां कनिष्ठ.

१७ आरोग्य शारीरिक व्यंगें, सांथी, वाईट खाणें वगैरे.

१८ उत्तरें देण्याची रीत

१९ शाळेच्या अभ्यासांत एकंदर प्रगती.

२० मुलांच्या जवळ पुस्तकें असतात कां नाहीं.

२१ शिक्षकः पाठ तयार करून येतात किंवा नाहीं.

२२ शिकविण्यास योग्य कां अयोग्य.

२३ विद्यार्थ्यांबरोबर वर्तन.

२४ नेहमींचें काम व्यवस्थीत रीतीनें करण्याकडे प्रवृत्ती आहे किंवा नाहीं.

२५ समारंभ वगैरे बाबतींत कितपत पुढाकार घेण्यांत येतो.

वरिष्ठाकडून ज्या सूचना करण्यांत येतात त्या आज्ञापक स्वरूपाच्या नसाव्यात. शिक्षक जेव्हां अतिशय त्रासलेला असतो किंवा जेव्हां मुलें जवळ असतात तेव्हां सूचना करूं नयेत शिक्षक जर मनापासून काम करीत असेल तर अद्वातद्वा टीका करून त्याला नाराज करूं नये. गौण गोष्टीकडे

नेहमीं दुर्लक्ष करावें. सूचना करावयाच्या त्या अगदीं थोडक्या असाव्यात व गोंधळून सोडून टाकणाऱ्या शब्दांत नसाव्यात.

ही ठोकळ रूपरेषा आहे. याखेरीज प्रत्येकाला आपापल्या बुद्धीनुसार किती तरी गोष्टी दिसतात व सूचतात, त्याप्रमाणें वागत गेल्यास शाळा सुधारेल. परंतु त्या सूचना अमलांत आणल्या जातात कां नाहीं हें पाहिल्याखेरीज त्यांचा उपयोग नाहीं.

---

# पाटीवरील लेखन.

मधु म्हणजे अगदीं खेळाडू. त्याला मास्तरांनीं कांहीं करावयास सांगितलें म्हणजे तो चित्रें काढी, नाहीं तर झोंप घेई. एकदां मधूला मास्तरांनीं गणीत घातलें. तें त्याला करण्याचा अगदीं कंटाळा आला. त्याला झोंप येऊं लागली आणि गणीत काढावयाच्या ऐवजीं त्यानें चित्र काढावयास सुरवात केली. त्यानें एक वाटोळें कडें काढलें, त्याला डोळे लावले, तोंड नाक, कान वगैरे काढले, आणि तो चित्राला नथ वगैरे दागीने घालावयास लागला. इतक्यांत चरचर आवाज होऊं लागला मधूला वाटलें कीं, हें चित्र आतां आपल्याशीं बोलायला लागणार म्हणून भीति वाटून तो चित्राला पाणी लाऊं लागला पण तें चित्र म्हणालें, "थांब मला पुसूं नको" शेवटीं मधूनें विंचार केला कीं, हें चित्र आपलें काय करणार, राहीना बिचारें. असें म्हणून त्यानें पाणी टाकून दिलें. तें पाहून चित्रानें त्याचे फार आभार मानले व तें म्हणालें, "आतां सांग पाहूं मी कोठून आलें!"

मधु म्हणाला, "मींच तर तुला उत्पन्न केलें."

"छे तूं नाहीं"

"होय मीच. जास्त गडबड करशील तर मी तुला पुसून टाकीन."

"मी चित्राविषयीं म्हणत नाहीं. मी पाटी विषयीं म्हणतों. कारण मी पाटीसाहेब आहें आणि मी कोठून आलें तें सांग."

"तूं दुकानांतून आलीस." असें मधु ओरडून म्हणाला.

"दुकानांत पाट्या होतात कां?"

"बरं तर सांग तूं कोठून आलीस तें,"

"मी फार दुरून आलें" पाटी म्हणाली. "मी फार जुन्या वंशांतली आहें आणि माझी कहाणी मोठी मनोरंजक आहे."

"तर मग मला ती सगळी सांग पाहूं फक्त लांबलचक चऱ्हाट वळूं नकोस आणि फार गडबड करूं नकोस."

पाटी म्हणाली, "ऐक, मी सारें सांगतें, मी कशी बनलें आणि कोठून आलें. तुला पाट्या कशा होतात हें ठाऊक नसावें."

"पाट्या काय? पाटीच्या पाट्या होतात?"

"होय, पण पाटी म्हणजे तरी काय?"

"पाटी म्हणजे पाटी."

"छे पाटी म्हणजे पाटी नव्हे, त्यांत आणखी किती तरी गोष्टी असतात.

पाटीमध्यें पुष्कळ गोष्टी असतात. सिलिका

ज्याची कांच करतात तें, ॲल्युमिनम ज्याची पुष्कळ भांडीं करतात तें, सोडा, पोट्याश, चुना, लोखंड वगैरे जिनसा मिसळून पाट्या करतात."

"पण ह्या जिनसा कोण मिसळतो ?"

"नद्या आणि समुद्र."

"हें कांहीं तरीच. पाट्या तर खोल खोल खाणींतून येतात."



स्लेटपाटी दगडाचा डोंगर.

"थांब मी तुला सारें सांगतें. लाखो वर्षांपूर्वीं एका मोठा पर्वत होता. त्याच्या शिखरावर पाऊस व धुकें पडे. ह्या पावसाचे लहान लहान ओढे बनत व ते हळू हळू वहात जात. पुढें त्यांच्या नद्या होत. ह्या नद्या वगैरे वाहूं लागल्या म्हणजे वहातांना त्यांचे लहान लहान पाट होत, पुढें खोरी बनत, खोल खोल दऱ्या होत. जातां जातांना या नद्या पर्वतांचे खडक वाहून नेत व समुद्रांत मिसळत. ही माती समुद्राच्या तळाशीं जाई व तेथें त्याची चिकण माती होई. पुष्कळ वर्षें असें चाललें होतें. पर्वत दिवसे दिवस वाहून जात आणि त्याचे मोठमोठाले थर समुद्रांत बनत. कित्येक मासे या मातींतच मिसळून तेथें मरून पडत."

"पण ह्या पर्वताचे खडक कोठें नेतात ?" मधु म्हणाला. पाटी हंसून म्हणते. "बाबा ! तूं कोठल्याहि नदीची माती पहा. आणि मी काय म्हणतें हें तुला पटेल. ही पर्वतांतील माती वहात जात असे. त्यामध्यें सिलिका, ॲल्युमिनम, लोखंड, पोट्याश, सोडा, चुना वगैरे द्रव्यें होतीं. तीं सारीं समुद्राच्या तळाशीं सांठलीं. त्या वेळीं जगांत लहान मुले व मुली नव्हतीं. तुला त्याची आठवण नसेल. पण मला ठाऊक आहे. पण मी पर्वतावर होतों आणि मला सारे आठवत आहे. ही माती जमत असतां पृथ्वी थंड होत होती आणि पृथ्वी गार होऊं लागली तशी ती माती आकुंचन पावूं लागली. आणि अशा रीतीनें समुद्राचा तळ अगदीं घट्ट झाला. अखेरीस तो समुद्राच्या पोटांतून वर येऊं लागला व पुढें त्याचे मोठमोठे पाट्याचे पर्वत बनले."

"पण पाट्यांचे डोंगर खडकाळ असतात मातीचे नसतात" असें मध्येंच मधु म्हणाला. "होय, पण ही माती घट्ट होतहोत खडक बनली. आणि मी पूर्वीं मातीची होतें ती खडकाची झालें. मी पहिल्यानें डोंगराच्या माथ्यावरून सूर्य, चंद्र तारे वगैरे पहात असे, पण पुढें जणू काय तुरुंगांत टाकल्याप्रमाणें पुष्कळ वर्षें मला कांहींच दृष्टि पडलें नाहीं."

"पण पाटीबाई तुमचें वय काय ?" "माझं

वय युगेच्यायुगें आहे. मी जेव्हां समुद्रांतून वर आलें तेव्हां माझ्या भोंवतीं ज्वालामुखी पर्वत जळत होते आणि सगळें जग बर्फानें अच्छादलें होतें.

"पण खरंच कां तूं समुद्राच्या तळाशीं होतीस? कां तूं स्वप्नांत आहेस?"

"तूं जर खाणींत जाऊन पहाशील तर माझ्या बोलण्यावर तुझा विश्वास बसेल. तेथें माझ्या भाऊ-बहिणी आणि वाडवडिल आहेत."

"तर मग तूं इतकी सपाट व गुळगुळीत कशी झालीस तें सांग बघूं?"

"तें सांगणें फार कठीण आहे. जेव्हां ह्या थरावर दाब पडूं लागला तेव्हां त्या मातीचे थर बनले. तूं थोडेसें मेण घे आणि तें दोन सपाट पट्ट्यांमध्यें दाब, म्हणजे त्याचे कसे थर होतात तें दृष्टीस पडतील."

"बरं, तुझा आणखी काय उपयोग होतो?"

"मला घरावर कौलाऐवजीं ठेवतात. त्यामुळें घरांचें चांगलें संरक्षण होतें."

"याशिवाय दुसरा उपयोग?"

"दुसरा उपयोग तर तुला ठाऊक आहे. तुम्ही माझ्यावरच लिहितां."

"बरें तुला पाटी होणें आवडतें कां?"

"हो हो. पण तुम्ही चरचरं आवाज करूं लागला किंवा गणीत आणि उजळणी चुकीची करूं लागला म्हणजे मला आवडत नाहीं. आम्हाला हुशार मुलांच्या पाट्या होणें आवडतें."

## आपण काय प्यावें?

जगामध्यें जगायचें म्हणजे पहिली अवश्यक वस्तू हवा होय. हवेशिवाय लहान मूलसुद्धां जगूं शकणार नाहीं. तेव्हां जीवनाला पहिली अवश्यक वस्तू म्हणजे हवा होय. आणि त्या करितांच आपणास नाक दिलेलें आहे.

हवेनंतर दुसरी महत्वाची वस्तू म्हणजे पाणी होय. सर्व प्राणाधारक वस्तू पाण्यांत रहातात व त्यांना वाढण्यास हवा लागते. पाणी वायुमिश्रीत असलें म्हणजे जीवनाची धारणा होते. पाण्यांतील वायु ऑक्सिजन असावयास पाहिजे. सोडावॉटरमध्यें असणारा कारबॉनिक ॲसिड गॅस नको.

ज्या वस्तूंचें आपलें शरीर बनलें आहे त्या वस्तू जर आपण मोजल्या तर त्यांच्या पैकीं ¾ पाणी आहे असें आपणांस आढळून येईल, म्हणजे आपला देह पाण्यांत रहातो असें म्हणावयास हरकत नाहीं. तें पाणी गोडें नसून समुद्राच्या खाऱ्यापाण्यासारखें असतें, परंतु त्याचा खारटपणा समुद्राच्या खाराइतका नसतो.

एकूण आपलें शरीर वायुमिश्रीत खाऱ्यापाण्याचें बनलें आहे व त्याला वारंवार नवा नवा पाण्याचा पुरवठा लागतो असें म्हणावयास हरकत नाहीं. आपलें अन्नाशिवाय पुष्कळवेळ चालतें. कांहीं लोक

आठ आठ दिवस अन्नाशिवाय राहूं शकतात; परंतु पाण्याशिवाय मात्र मनुष्य राहूं शकत नाहीं. आपल्या शरीरांतून पाणी सारखें जात असल्यामुळें आपणास पाणी लागतें; हें पाणी जर शरीरांतून जात नसतें तर नव्या पाण्याची जरूरी लागली नसती. परंतु शरीरांतून पाणी जाणें हीहि शरीर-वाढीची एक अवश्यक बाब आहे.

शरीराला जसें पाणी लागतें तसें वनस्पतींनांहि लागतें. जर आपण फुलें तोडून पाण्यांत ठेवलीं तर तीं पुष्कळ वेळ टवटवीत रहातात. त्यांच्यांतून पाण्याचा झरा वहात असला म्हणजे झालें. हा पाण्याचा झरा आपल्या शरीरांतून सारखा वहात रहावा म्हणूनच आपण पाणी पितों.

झाडांचीं मुळें पाणी शोषून घेतात व तें वर जातें; आणि आपण तोंडानीं पीतों व तें खालीं जातें. आपल्या शरीरांतील रक्ताचा झरा म्हणजे वायुमय पाण्याचाच झरा होय. रक्ताला पोटांतून पाण्याचा पुरवठा होतो व फुफुसांतून हवेचा पुरवठा होतो.

रक्तामध्यें जें मीठ जातें तें अन्नामधून जातें. आपल्या शरीरांत असणारें पाणी नेहमीं झऱ्याप्रमाणें वहावें कां लागतें याचा आपण विचार करूं. आपल्या प्रत्येक श्वासोच्छ्वासावरोबर पाण्याचा अंश आपल्या पोटांत जातो. आरशासमोर श्वासोच्छ्वास केला असतां ही गोष्ट लक्षांत येईल. आपल्या कातडींतून पाणी सारखें जात असतें. अंगाला घाम नसतांहि पाणी बाहेर पडत असतें. हें पाणी फार मोठ्या प्रमाणांत मूत्राशयाकडून शोषलें जातें. मूत्राशय रक्तांतून पाणी शोपत असतें या सर्वांचा उद्देश काय ?

आपल्या शरीराला जितकी उष्णता लागते तितकीच उष्णता त्याला मिळावी म्हणून शरीराचा प्रयत्न चालू असतो. आपण ध्रुवाजवळ असलों किंवा भूमध्यरेषेवर असलों तरी आपल्या शरीराचें उष्णतामान ९९ अंशापेक्षां जास्त असतां कामा-नये. नाहींतर आपण आजारी पडूं. आपण जरी बर्फांत सांपडलेलों किंवा धगधगणाऱ्या विस्तवाजवळ असलों तरी उष्णतामानांत फरक होता कामा-नये. ह्या गोष्टीकडे नेहमीं लक्ष दिलें पाहिजे. शरीरांतून पाणी गेलें म्हणजे आपल्या शरीराचें उष्णतामान चढत नाहीं. ताप नाहींसा होण्याकरितां घामाची अवश्यकता किती असते याचा विचार केला असतां आमच्या म्हणण्याची सत्यता पटेल. व्यायाम केला म्हणजे शरीराची उष्णता वाढते त्यामुळें घाम जाऊं लागतो व आपल्याला तहान लागते.

थंड हवेमध्यें आपली कातडी काम करीत नाहीं त्यामुळें आपल्या शरीरांतून फार थोडे पाणी जातें, कारण थंडीमुळें शरीरांतून पाणी जाण्यास सवड नसते. आपल्या मेंदूमध्यें कांहीं बारीक ठिपके आहेत, ते आपल्या रक्ताचें उष्णतामान नेहमीं पहात असतात, व कमजास्त मानानें ते कातडीला शरीरांतून रक्त नेण्यास हुकूम सोडीत असतात.

आपल्या शरीरांत कांहीं विषारी द्रव्यें उत्पन्न होतात व तीं द्रव्यें जर बाहेर गेलीं नाहींत तर आपण मरूं. हीच गोष्ट वनस्पतींच्या व जनावरांच्या शरीराची; परंतु एकाचें विष दुसऱ्याचें अमृत असतें. आणि या नियमान्वयें आपलें वीष वनस्पतींचें अमृत होतें. कांहीं विषारी द्रव्यें आपल्या श्वासोच्छ्वासावरोबर बाहेर जाऊं शकतात; परंतु कांहीं घामावाटेंच जावीं लागतात.

आपण अंग धुतों, तोंड धुतों, परंतु हीं दोन्ही जरी धुतलीं नाहींत तरी मनुष्य वर्षानुवर्षें राहूं शकेल. परंतु शरीराच्या आंतील भागाचें तसें नाहीं तें नेहमीं धुतलेंच पाहिजे, आणि ते धुण्याकरितां आपण पाणी पितों.

पाणी प्याल्यावर तें रक्तामधून शरीराच्या निरनिराळ्या भागाकडे जातें. तें जेथें जेथें जातें तेथें तेथें त्याला विषारी पदार्थ आढळून येतात ते विषारी पदार्थ या पाण्याबरोबर मिसळतात व कातडीवाटें जें पाणी बाहेर जातें त्या बरोबर निघून जातात. पुष्कळ लोक निरोगी स्थितींत असतात; परंतु त्यांना आपण निरोगी कां आहों याचें कारण कळत नाहीं.

आरोग्य बिघडण्याचें मुख्य कारण म्हणजे या विषाचा निकाल न होणें होय. हें विष शरीरांत सांठूं लागलें म्हणजे रोग पडतात. हें विष बहुतकरून सांध्यामध्यें सांठतें आणि म्हणून तापामध्यें सांधे दुखूं लागतात. या विषामुळेंच संधीवातासारखे रोग होतात.

आपलें आंतील शरीर धुवून टाकण्यास फक्त पाण्याचीच जरुरी असते ही गोष्ट ध्यानांत ठेवावी. तहान म्हणजे रक्ताचा अधिक पाण्याकरितां आक्रोश होय. पुष्कळ लोक व्यायाम वगैरे कांहीं कांहीं घेत नसल्यामुळें त्यांना खरी तहानच लागत नाहीं, त्यामुळें ते दुसरीं पेयें पीतात.

अगदीं शुद्ध पाणी बेचव असतें. ज्या पाण्याचा उगम डोंगरांत होतो व जे लहान लहान झऱ्यांनीं वहात येतें आणि पुष्कळशा औषधीं मिसळून व हवा लागून गार झालेलें असतें तें पाणी पिण्यास उत्तम असतें. परंतु असें पाणी मिळण्याचें फारच थोड्यांच्या नशीबीं असतें. कित्येक ठिकाणच्या पाण्यांत रोगाचे जंतु असतात असें पाणी उकळल्याशिवाय प्यालें तर अपाय होतो. ज्यांच्या घरीं नळ्यांतून पाणी येतें त्यांना एक धास्ती असते. हे नळ कधीं कधीं गंजतात व ते पाण्याबरोबर मिसळतात. तसलें पाणी पोटांत गेलें तर मनुष्यावर विषप्रयोग होतो. तेव्हां नळाचें पाणी थोडेसें वाहूं द्यावें व मग पिण्यास घ्यावें.

परंतु ह्या सर्व संकटांतून सुटावयाचें असेल तर ताजी फळें खावींत. त्यांमध्यें पुष्कळ पाणी असतें. सर्व फळांत द्राक्षें उत्तम. त्याच्या खालोखाल संत्री व नारिंगें असतात. ह्या फळाबरोबर क्षारही असतो, त्यामुळें त्यांचा दुहेरी उपयोग होतो. पाण्याबरोबर रोगाचे जंतू मिसळूं नयेत म्हणून कांहीं लोक चहा, कॉफी सारखीं विषारीं पेयें घेतात. चहा व कॉफी फार वेळ उकळत राहिलीं म्हणजे त्यांत टॅनिन नांवाचें विष उतरतें. चहा कांहीं विशिष्ट पद्धतीनें घेतला म्हणजे तो अपायकारक होत नाहीं. उलट त्या योगानें मेंदूला एक प्रकारची तरतरी आणणारें उद्दीपक औषध मिळतें असें म्हणतात. परंतु सर्वांत उत्तम मार्ग म्हणजे चहा किंवा कॉफीखेरीज उकळलेलें ऊन पाणी पिणें होय. त्या योगानें बिलकूल अपाय होत नाहीं.

दूध हें एक प्रकारचें अन्नच आहे; तेव्हां त्याचें पाण्यापेक्षां अन्न म्हणून जास्त महत्व आहे.

चहा, कॉफीपेक्षां कोको घेतला तर कमी अपाय होतो असें म्हणतात.

आतां आपण निरनिराळ्या सोडावॉटरसारख्या पेयांचा विचार करूं; साध्या अशुद्ध पाण्यापेक्षां हीं पिणें चांगलें असें कांहींजण म्हणतात. परंतु यापेक्षां फळें खालीं तर उत्तम. या बाजारच्या लिंबूच्या बाटलीपेक्षां लिंबाचा रस दिला तर मरणारीं माणसें व मुलें सुद्धां जगतात.

मोठ्या माणसांना रक्तपित्त नांवाचा रोग जडतो पुष्कळ वर्षेंपर्यंत ध्रुवावर जाण्याचा जो प्रयत्न फसला तो या रक्तपित्तामुळें होय. पुष्कळ लिंबें खालीं तर ध्रुवावर सहज जाता येतें. ताज्या लिंबाचा रस काढून तो जर एक प्यालाभर घेतला तर त्याच्या अंगांत पुष्कळ रोग हटवण्याची शक्ती आहे.

उन्हाळ्यांत फार उकडतें. पाण्यांत बर्फ घालून

पाणी प्यावें असें आपणास वाटतें, व अशा प्रकारचें पाणी प्यालें तर कांहीं एक अपाय होत नाहीं.

तहान लागली असतां कांहीं लोक दारु वगैरे पीतात; परंतु तो निवळ मूर्खपणा आहे; तेव्हां आपल्याला मुख्य गरज पाण्याची असते. व शुद्ध स्वच्छ पाणी प्यालें म्हणजे सारे रोग नाहींसे होतात व प्रकृती चांगली रहावी म्हणून पाण्याखेरीज इतर कोणतीहि पेयें पिऊं नयेत.

---

## धोंडीवाघ व बापु गोखला.

बापु गोखला व त्याचे चुलते धोंडोपंत गोखले असे दोघे एकदां पुण्याहून दूर असलेल्या एके गांवीं स्वारी शिकारीस गेले होते. कांहीं काळ स्वारीवर घालविल्यावर व इष्ट हेतू साध्य झाल्यामुळें त्यांनीं आपला फौजफांटा स्वदेशीं लाऊन दिला. पुढें थोड्या दिवसांनीं ते दोघेजण पुण्यास परत यावयास निघाले. त्या वेळीं पेंढारी व इतर बाजारबुणगें इकडे तिकडे हिंडत, लोकांवर छापे घालीत व लुटारूपणा करीत. असाच एक पेंढारी धोंडी वाघ या नांवाचा होता. त्याचा व धोंडोपंत गोखल्यांचा वैर असल्यास न कळे. परंतु त्या दोघांची गांठ पडून चकमक झडली आणि दुर्दैवानें त्या झटपटींत धोंडोपंतांचा पराभव होऊन त्यांत ते प्राणास मुकले. बापु गोखल्यानेंहि आपणाकडून शक्य तेवढी शिकस्त करून त्या धोंडीवाघाला मारण्याचा प्रयत्न केला, परंतु त्या प्रयत्नांत त्यांनाच दुखापत झाली. त्या तसल्या कठीण प्रसंगीं आपल्या चुलत्याचा अंत्यविधि बापूंनीं तेथेंच केला. त्यांनीं आजूबाजूचीं लांकडें गोळा करून आणलीं व चुलत्यांना अग्नि दिला. वास्तविक प्रेताचें दहन करण्यास मंत्राग्नीची जरूर असतांहि त्या काळीं भटभिक्षुक कोणी नसल्यामुळें राहिलेले सारे विधि पुण्यास गेल्यावर आपण करूं असें त्यांनीं ठरविलें. बापु पुण्यास येऊन पोहोंचले व त्यांनीं हें दुःखकारक वर्तमान आपल्या चुलतीस कळविलें. तेव्हां तिनें त्यांची फार निर्भर्त्सना केली. ती म्हणाली, तुझा चुलता ठार मारला गेला असता तूं एखाद्या अबलेप्रमाणें हें वर्तमान मला सांगावयास येतोस याची तुला लाज वाटत नाहीं. जा येथून काळें कर. ज्या चांडाळानें तुझ्या चुलत्याला मारलें त्याचें शिर घेऊन येशील तरच मला तोंड दाखीव; नाहीं तर त्यांच्याबरोबर तूंहि मेलास तरी हरकत नाहीं." हे शब्द ऐकतांच बापूंना डसल्याप्रमाणें बोचले. त्यांना मेल्यापेक्षां मेलें झालें. ते आपल्या आपल्या चुलत्याचें और्ध्वदेहिक वगैरे कांहींहि करण्याचें भानगडींत पडले नाहींत. त्यांनीं आपला मोर्चा तसाच धोंडीवाघावर वळवला व त्याला ठार केलें. नंतर त्यानें त्याचें शिर आपल्या भाल्याला टोंचून आणलें व ते आल्या चुलतीस दाखविलें. धोंड्यावाघाचें शीर लक्ष्मीबाईनें ( धोंडोपंतांच्या पत्नीनें ) पाहिलें तेव्हां त्या बाईचा प्रदीप्त क्रोधाग्नी शमन पावला आणि नंतर तिनें आपल्या नवऱ्याची उत्तरक्रिया करण्यास परवानगी दिली. यावरून बापूगोखल्याचें शौर्य व तत्कालीन स्त्रियांचा करारीबाणा व निश्चय आपल्या ध्यानांत येतो.

---

# वीणा पक्षी.

मोराचा पिसारा आपण पाहिला आहे. तो पाहून आपण ईश्वरी कृतीचें कौतुक करतों. आज अशाच एका पक्षाची माहिती आपणास करून ध्यावयाची आहे. त्याला वीणा पक्षी म्हणतात. त्याचा पिसारा इंग्रजींत ज्याला ( Lyre ) लायर नांवाचें वाद्य म्हणतात त्यासारखा असतो. हे पक्षी ऑस्ट्रेलिया, वेल्स ह्या दोन ठिकाणींच सांपडतात. ह्या पिसाऱ्याचा रंग लालसर पिंगट असतो. स्त्रीपेक्षां पुरुषाचा पिसारा चांगला दाट व शोभिवंत असतो. मोराच्या मादीला जसा पिसारा नसतो तसाच वीणा पक्षाच्या मादीलाहि नसतो.



वीणा पक्षी.

ह्या पक्षाचा आवाज मोठा मंजूळ असतो व त्यांच्यांतील विशेष गुण म्हणजे ते वाटेल त्या पक्षाची गाण्यामध्यें हुबेहूब नक्कल करूं शकतात. हा पक्षी गातांना मोराप्रमाणें आपला पिसारा उभारतो, पंख जमिनीवर टाकतो आणि जणूं काय ताल धरण्याकरितां जमीन नखानें उकरतो. हा रात्रंदिवस गात असतो. ह्यांच्या गाण्याला हिंवाळ्यांत भरती येते. लहान पक्षी पिसें येईपर्यंत आपला कंठ उघडीत नाहीं. त्यांना चौथ्या वर्षीं पिसें फुटतात. ते लहान लहान किडे खातात. हे आपलीं घरटीं काटक्याचीं करतात आणि त्या काटक्यांमध्यें बारीक तंतू व शेवाळ घालतात. ह्या घरट्याला छप्पर असून आंत शिरण्यास लहानसा झरोका असतो. मादी एकच अंडें घालते व तें काळसर रंगाचें असतें. अंड्यांतून पिलूं बाहेर आल्यावर सहा आठवडे घरट्यांतच रहातें. प्रत्येक नरपक्षाला दोन तीन माद्या असतात व त्या आपलीं अंडीं निरनिराळ्या घरट्यांत घालतात.

हे पक्षी आपलीं घरटीं रस्त्याजवळ बांधतात. परंतु तीं फार उंचावर म्हणजे १००।१५० फूटावर असतात. हा पक्षी मोराप्रमाणेंच सुंदर नृत्य करतो.

# भट्टी पक्षी.

ह्या पक्षाचें घरटें भटीच्या आकाराचें असल्यामुळें याली भट्टी पक्षी असें म्हणतात. त्यांची चोंच डोक्यापेक्षां लहान असते. त्याला १२ पंख असतात व त्याचे पाय भक्कम असतात. प्याराग्वे



सुतार पक्षी.

युराग्वे वगैरे देशांत एक तांबडा भटी पक्षी असतो तो फार माणसाळलेला असून त्याचा आवाज खणखणीत आहे. हा आपलें घरटें मनुष्याच्या वस्ती जवळ बांधतो.

वर्षाऋतु संपण्याच्या वेळीं हा पक्षी आपलें घरटें बांधूं लागतो तो घरट्याला माती वापरतो व घोड्याचे केस किंवा बारीक तंतू मध्यें घालून घरट्याला मजबुती आणतो. हें घरटें तडकत नाहीं. ह्या घरट्याचा आकार भट्टीसारखा असतो; मात्र आंत जाण्याचें दार अगदीं चिंचोळें असतें. हें घरटें चांगलें उघड्यावर असतें. ह्या घरट्यामध्यें एक भींत घालून त्याचे दोन भाग केलेले असतात.

या दुसऱ्या भागांत हा पक्षी आपलीं अंडीं ठेवतो. ह्या भट्टीचा व्यास एक फूट असतो व तिचें वजन ८।९ पौंड असतें. हें घरटें फांदीवर असतें, व ती फांदी जोरानीं हलवल्याखेरीज २।३ वर्षें पडून फुटत नाहीं.

नर व मादी दोघे जण आळीपाळीनें अंड्यावर बसून तें उबवतात. यांचीं पिलें फार चिव चिव करतात.

हे पक्षी दरवर्षीं नवीं नवीं घरटीं बांधतात. दुसरें घरटें पहिल्या घरट्यावरच बांधण्यांत येतें.

ह्या पक्षाचा पिसारा पिंगट व मातट रंगाचा असतो, त्यांत किंचित् लालसर छटा मारते. नर मादीच्या रंगांत फरक नसतो.

# हिऱ्याची गांठोडी.

कांहीं वर्षांपूर्वीं एक गरीब मुलगा होता. त्याचे आईबाप वारले. त्याची ही दुःखद स्थिती पाहून एका श्रीमान गृहस्थाला करुणा आली व त्यानें त्याला आपल्या घरीं नेलें. तो म्हणाला, " नेहमीं सच्छील असावें, व प्रामाणिकपणानें वागावें म्हणजे जगांत मोठेपणा प्राप्त होतो. "

त्यानें त्या मुलाला शाळेंत घातला व त्याचें थोडेसें शिक्षण झाल्यावर त्याला एका कारखान्यांत उद्योग शिकण्याकरितां ठेऊन दिलें. त्याचें शिक्षण पुरें झाल्यावर तो मुंबईस एका मोठ्या हुद्यावर गेला. ४।५ वर्षें मुंबईस काढल्यावर तो आपल्या गांवीं रजा घेऊन गेला. त्यानें पुष्कळ लौकिक कमावला होता तरी म्हणण्यासारखा त्याच्याजवळ पैसा नव्हता. तो आपल्या पालकाला भेटावयास गेला. परंतु पालक वारला असें त्याला कळलें. त्या कारणानें त्याला फार दुःख झालें. ज्या घरांत तो पूर्वीं लहानाचा मोठा झाला होता त्या घरांत त्याच्या पालकाचे नातेवाईक येऊन राहिले होते. परंतु ते सदासर्वदा रागावलेले असत. कारण त्यांना वाटत होतें तेवढे पैसे त्यांच्या चुलत्यानें ठेवले नव्हते. म्हणून त्यांनीं जें जें चुलत्याचें सांपडेल तें तें विकण्यास सुरवात केली; हें पाहून आनंदरावाला फार वाईट वाटलें व आपल्या पालकाच्या कांहीं वस्तू स्मरणाकरितां खरेदी कराव्यात असा विचार करून तो सौदाच्या ठिकाणीं गेला. तेथें त्या दयाळू वृद्ध गृहस्थाची तसबीरहि विकावयास आलेली पाहून अतोनात दुःख झालें. आपल्या उपकर्त्याच्या जेवढ्या आवडत्या वस्तू होत्या तेवढ्या त्यानें विकत घेतल्या आणि त्यांत ती तसबीरहि आली. परंतु ह्या खरेदींत त्याचे सारे पैसे संपले. त्याच्याजवळ खाण्यापुरतेहि पैसे उरले नाहींत, तथापि त्याचें त्याला कांहींच वाटलें नाहीं. त्यानें ती तसबीर आपल्या खोलींत नेली व तेथें टांगून ठेवली. परंतु तिची दोरी इतकी जुनी झाली होती कीं, तसबीर टांगतांक्षणींच खालीं आपटली व तिचे तुकडे तुकडे झाले. ते तुकडे गोळा करण्याकरितां तो तसबीर हातांत घेऊं लागला इतक्यांत त्याला तसबीरीच्या आंत हिऱ्याची गांठोडी सांपडली. त्या गांठोडींत एक पत्र असून तें त्या म्हातार्‍यानेंच लिहिलेलें होतें. पत्रांत खालील मजकूर होताः-

"माझे नातेवाईक सारे कृतघ्न आहेत हें मी जाणून आहें. ते माझी तसबीरहि विकतील याबद्दल मला संशय नाहीं. जो मनुष्य मजवर प्रेम करीत असेल तोच ही तसबीर विकत घेईल व अर्थात ही गांठोडी त्याचीच होईल. "

अशा प्रकारें आनंदराव हा त्या संपत्तीचा योग्य वारस झाला. त्यानें त्या हिऱ्याचे पैसे केले, व आपल्या सारख्या साऱ्या पोरक्या मुलांकरितां एक घर बांधलें व त्यांची तेथें रहाण्याची व जेवणाची व्यवस्था केली

---

# + गर्विष्ट अधेली

एका माणसाच्या खिशांतली अधेली चुकून गटारांत पडली. त्या अधेलीवर एक मळकी चिंधी होती. आपल्यावर असली चिंधी पाहून त्या अधेलीला वाटलें कीं आपला अपमान झाला व ती त्या चिंधीला अद्वातद्वा बोलूं लागली. ती म्हणाली, चल हो चालती, गलीच्छ कुठली, लाज नाहीं वाटत,

तुझ्याकडे पाहून मला शरम वाटते. पण ती चिंधी फार शहाणी व धिमी होती. तिनें यावर कांहीं उत्तर देऊं नये, तिला असें वाटे, कीं, सुदैवानें एखादा दिवस भाग्याचा येईल व या स्थितींतून निघून चांगल्या स्थितींत जाऊं.

तसा दिवस आला. ती चिंधी एका भिकाऱ्यानें उचलली आणि कागदाच्या कारखान्यांत पाठवून दिली. पुढें त्या चिंधीचा उत्तम कागद करण्यांत आला व त्याची एक हजाराची नोट बनविण्यांत आली.

ती नोट म्हणते, " देवा मी तुझे किती आभार मानूं. मी घाणेरडी चिंधी असतां तूं मला एवढ्या योग्यतेस चढविलेस. आतां मी त्या अधेलीकडे जातें व एवढ्या थोड्यावेळांत वस्तूमध्यें काय बदल होऊं शकतो तें सांगतें.

इतक्यांत त्या नोटीची व अधेलीची गांठ पडली. नोट म्हणते, " मजकडे पहा ! आणि कोणाचाहि द्वेष करूं नयें हें शीक. "

" कोणीहि किती कमनशीबी असला तरी चक्रनेमी—क्रमानें त्याला भाग्योदयाचा काळ येतो, ही गोष्ट विसरूं नकोस. "

---

# श्रीमंत होणारा मनुष्य.

एक मनुष्य डोक्यावर तेलाचे दोन रांजण घेऊन चालला होता. त्यानें आपल्या समोरून एक सरडा जातांना पाहिला. त्यानें तात्काळ आपलीं भांडीं खालीं ठेवलीं व त्या सरडाचा पाठलाग करण्यास सुरवात केली. परंतु तो धांवत धांवत एका बिळांत जाऊन लपला. त्याबरोबर या तेल्यानें जमीन खणण्यास सुरवात केली. थोडी जमीन खणतांच त्याला एक सोन्याचा व रुप्याचा असे दोन हंडे सांपडले.

तो म्हणाला, " मला चार भांडीं नेतां यावयाचीं नाहींत आणि आतां हें द्रव्य मिळालें असल्यामुळें तेलाला कोण विचारतो. "

असें म्हणून त्यानें तेल ओतून दिलें व रांजण फोडून टाकले. नंतर सोन्यारुप्याचे हंडे घेऊन तो चालू लागला, परंतु आपल्या डोक्यावर सोन्यारुप्याचे हंडे जर कोणी पाहिले तर आपल्याला पकडतील अशी भीति वाटून त्यानें ते हंडे एका दुकानांत ठेवले. दुकानदाराला आतां परत येतों. थोडा वेळ याकडे लक्ष द्या, असें तो म्हणाला.

परंतु त्या हंड्यांत सोनें रुपें आहे असें सांगितलें तर हंडे परत मिळणार नाहींत असा संशय आल्यावरून त्यांमध्यें तेल आहे असें तो म्हणाला.

संध्याकाळच्या वेळीं तो परतला. परंतु आपण कोणाजवळ हंडे ठेवले हें त्याला समजेना. ज्या ज्या दुकानीं तो गेला त्या त्या दुकानचे लोक म्हणूं लागले कीं आमच्या दुकानीं तेलाचे रांजण कोणी ठेवले नाहीत; अशाप्रकारें पैसाहि गेला आणि तेलहि गेलें.

# मनुष्य व ढग.

दोन माणसें आपल्या बायकामुलांना घरीं ठेऊन श्रीमंत होण्याकरितां बाहेर निघालीं. बाहेर पडल्यावर एकानें दुसऱ्याला ठार मारावयाचें ठरविलें व त्याला मरेपर्यंत बडविलें. तो मनुष्य प्राण सोडता सोडतां म्हणाला, " बाबारे मला ठार मारतांना तुला वाटलें असेल कीं मला खून करतांना कोणी पाहिलें नाहीं, परंतु तो पहा ढग. त्यानें सारें पाहिलें आहे व तो माझ्या बायकोला सारी हकीगत सांगेल "

तो खुनी माणूस हंसून म्हणतो, काय बेटा मूर्ख आहे. म्हणे ढग बायकोला सांगेल. त्यानें मित्राच्या जवळील सारा पैसा चोरला व तेथून निघून घरीं गेला. गांवीं गेल्यावर तो लोकांना म्हणाला कीं माझी व मित्राची बाहेर पडतांच चुकामुक झाली. आतां तो कोठें आहे मला माहीत नाहीं.

कांहीं दिवस गेल्यावर तो एकदां बाहेर वाऱ्यांत बसला होता. इतक्यांत डोक्यावरून कांहीं ढग चालले होते त्याकडे पाहून त्याची पूर्वस्मृती जागृत झाली व तो स्वतःशींच पुटपुटला.

" काय बेटा म्हणे ढग सांगेल, जणूं काय ढगाला बोलतांच येतें किनई "

हें त्याचें मनोगत भाषण व हंसणें त्याच्या बायकोनें ऐकलें व तिनें ह्या म्हणण्याचा उद्देश काय हें काढून घेण्याकरितां त्याचा पिच्छा पुरवला. अखेरीस तिच्या जवळून शपथ घेऊन त्यानें सारी हकिगत तिला सांगितली

पुढें कांहीं दिवस गेल्यावर तिला ही गोष्ट गुप्त ठेवतां येईना, तेव्हां तिनें ती आपल्या एका मैत्रिणीला सांगितली

अशा रीतीनें जातां जातां ती गोष्ट त्या मेलेल्या माणसाच्या बायकोला समजली.

तेव्हां तिनें शिपायाला वर्दी दिली. शिपायानें त्याला पकडलें. त्यानें गुन्हा कबूल केला व पुढें त्याला शिक्षा झाली.

तेव्हां एकूण ढगानें खून कसा उघडकीस आणला तो पहा.

---

# ब्राह्मण व तलवारी.

एक राजा होता. तो जेव्हां जेव्हां आपल्या शिपायांकरितां तलवार घेई तेव्हां तेव्हां त्या अगोदर एका ब्राह्मणाकडून तपासून आणावी. तो ब्राह्मण लुच्चा होता. जो लोहार त्याला लांच देई त्याच्याच तलवारी तो पसंत करी.

एकदां एका लोहारानें ब्राह्मणाला लांच न देतां तलवार पसंत करवून घेण्याचें ठरविलें. त्यानें आपल्या तलवारीला चांगलें तिखटाचें पाणी लावलें. जेव्हां ब्राह्मणांनीं ती तलवार कशी काय आहे हें पहाण्याकरितां नाकाजवळ नेली, तेव्हां त्याला जोरानें शिंक आली आणि ती तलवार त्याच्या नाकावर आपटून त्याचें नाक कापलें.

अशाप्रकारें त्याचें नाक कापल्यामुळें त्या तलवारीला धार नाहीं असें त्याला म्हणवेना.

# जादूचा पक्षी.

एक प्रवाशी इराणमध्यें प्रवास करीतां करीतां खैबर घाटांतील एका अप्रसिद्ध अशा शहरीं आला. त्यानें एका परप्रांतीय दरवेशाचा पोशाख केला होता व त्या पोशाखांत तो हिंडत फिरत असे. परंतु खैबरमध्यें आल्यापासून त्याच्यावर एक संकट ओढवलें. त्यानें आपला उंट आपल्या एका मित्राच्या घराबाहेर बांधला होता. त्याला शेख म्हणत. तो रंगानें काळा असून शहरांत प्रमुख म्हणून समजला जाई. त्या शेखानें याच्याकरितां कॉफी वगैरे तयार केली, व हा दरवेशी त्याला दूरदूरच्या गोष्टी सांगू लागला. कांहीं वेळ संभाषण झाल्यावर तो दरवेशी उटला व आपला उंठ तबेल्यांत बांधण्याकरितां आणूं लागला. परंतु इतक्यांत त्याला उंटावरील सारें सामान चोरीस गेलें आहे असें आढळून आलें. त्याचे सारे पैसे चोरांनीं नेले, एवढेच नव्हे, परंतु त्याच्या प्रवाशाच्या हकिगतींनीं लिहिलेल्या साध्या वह्याहि चोरांनीं लांबवलेल्या त्याला आढळून आल्या.

दरवेशी शेखला म्हणतो, "बाबारे घात झाला. चोरांनीं माझें सारें द्रव्य नेलें व त्याबरोबर दुःसाध्य रोग बरे करणाऱ्या साऱ्या औषधींहि पळविल्या." "तर मग आपण हकीम व दर-वेशीहि आहां काय?" असें मोठ्या आतुरतेनें शेखनीं विचारलें.

"माझी बायको आजारी आहे व तिला कोणा तरी चांगल्या हकीमाच्या औषधाची जरूरी आहे."

दरवेशी म्हणाला, "मला जर माझी हरवलेली पिशवी मिळेल तर मी तिला खात्रीनें बरें करीन." पण ह्या अप्रसिद्ध ठिकाणीं चोर कसा धुंडून काढावयाचा हा मोठा प्रश्न आहे."

शेख हंसून म्हणतो, "आपल्याला जादूगिरीची कांहीं माहिती आहे काय?"

"नाहीं, बिलकूल नाहीं आमच्या देशांत जादू-टोणा करणें म्हणजे मोठा अपराध समजतात."

"ठीक, मला त्याची थोडी माहिती आहे. त्या योगानें मी बरोबर चोर कोण आहे हें ओळखून काढीन."

असें म्हणून त्यानें आपल्या हाताखालच्या अधिकाऱ्याला हाक मारली व शहरांतील साऱ्या अट्टल चोरांनापकडून आणण्याचें फर्मावलें.

एका तासाच्या आंत त्यानीं निरनिराळ्या आकाराचे व रंगाचे २० चोर धरून आणले.

शेख त्यांना म्हणाला, "मोरोक्कोमधील हे मौलानासाहेब आहेत. हे व मी कॉफी पीत असतां कोणी तरी त्यांची चोरी केली. रात्रीच्या वेळीं काळोखामध्यें यांच्या उंटावरील पिशवी कोणी तरी सोडली व आपण पकडले जाणार नाहीं या समजुतीनें त्यानीं ती लांबवली. परंतु मौलाना-साहेबांना मंत्र तंत्र चांगलें येत असल्यामुळें त्यांनीं खरा चोर कोण आहे याचा पत्ता लावला आहे. त्यांच्या मंत्रसिद्धीनें जो खरा चोर आहे तो ताब-डतोब बेशुद्ध होईल व प्राणास मुकेल, आणि

मोलाना साहेबांना आपली पिशवी व द्रव्य मिळेल. परंतु त्यांची व माझी मैत्री असल्या कारणानें त्यानीं चोरी हुडकून काढण्याची एक नवीन तऱ्हा सुचवली आहे. सारे दिवे विझवा व तो जादूचा कोंबडा आणा."

असा हुकूम होतांच त्याच्या सार्‍या शिपायांनीं तलवारी काढल्या व दरवाजांतून कोणी पळून जाऊं नये म्हणून रस्ते रोखले. इतक्यांत एक माणूस पांढरा जादूचा कोंबडा घेऊन आला. शेख म्हणाला, "तुमच्यांपैकीं प्रत्येकानें या कोंबड्याच्या पंखाला घट्ट धरून अशी शपथ घ्यावी कीं, या चोरींत आपला कांहींहि संबंध नाहीं. ह्या कोंबड्याला जेव्हां चोराचा हात लागेल तेव्हां संतापानें ओरडेल."

एका मागून एक चोर दोघा दोघा शिपायांकडून त्या कोंबड्याजवळ नेले गेले; व त्यांना आपण चोरी केली नाहीं अशी शपथ घ्यावयास लावली. सर्वजणांनीं शपथा घेतल्या, तरी कोणत्याहि प्रकारचा आवाज ऐकू आला नाहीं.

शेख रागावून म्हणाला, "कोणी हातवीत हलवाल तर त्याला ठार मारलें जाईल. चला सारे दिवे लावा."

दिवाणखान्यांत दिव्याचा चकचकाट झाल्यावर शेख सगळ्या चोरांच्या हाताकडे पाहूं लागला. तेव्हां त्याला एका मनुष्याखेरीज बाकी सर्वांच्या हाताला पांढरा रंग लागलेला आढळून आला. हा पांढरा रंग असून तो कोंबड्याच्या पंखाला लावला होता. ज्या मनुष्याच्या हाताला रंग नव्हता तोच चोर असें शेखनें ठरविलें.

शेख म्हणाला, "तूंच चोरी केलीस म्हणून तूं कोंबड्याला हात लावायला भ्यालास. तुझा अपराध कबूल कर व माझ्या माणसांना बरोबर नेऊन गाठोडें देऊन टाक, नाहींतर तुझी मान उडवीन." तो चोर भीतीनें अर्धा मेला झाला होता, त्यानें गाठोडें परत केलें. शेखच्या बायकोला नुसतें अपचन झालें असल्यामुळें शेखनीं तिला ताबडतो बरें केलें.

---

## ब्रह्मदेशांतील गोष्ट.

### बुद्ध व खार.

सत्यान्वेषणाकरितां बाहेर पडलेला बुद्ध निराश होऊन परतला. इतक्यांत त्यानें एक खार पाहिली. ती खार आपली शेपटी पाण्यांत बुचकळत होती व जमीनीवर पाणी शिंपडत होती.

बुद्ध म्हणाला, "तूं हें काय करीत आहेस?"

तिनें उत्तर दिलें, "महाराज, मी हें तळें रिकामें करीत आहें."


"पण तुला तें कधींहि शक्य होणार नाहीं. तूं त्यांतून जरी लाखो वेळां पाणी बाहेर काढलेस तरी त्यांतलें पाणी संपणार नाहीं."

खार म्हणाली, "बरं तर मी आपला उद्योग सोडणार नाहीं."


बुद्ध तिच्यापासून धडा शिकला व त्यानें सत्याचा शोध चालू ठेवला.

---


# अविचाराचा परिणाम.




बरी सांपडली खाऊन टाकतों आतां.




झडप घातली.



फजिती पण फजिती !



पश्चात्ताप.



जीवावर बेतली होती.

# शालापत्रकाची चढाओढ.

मागील खेपेस दिलेल्या कोड्यांस बरींच उत्तरें आलीं आहेत. परंतु तीं सारीं चूक आहेत. कोड्याचें उत्तर " नकाशा " असें आहे. लहान मुलांकरितां जी गोष्ट ठेविली होती त्याकरितां कांहीं जणांकडून गोष्टी लिहून आल्या. परंतु सर्वांत वसंत बलवंत सुळे, या मुलानें लिहिलेली गोष्ट चांगली आहे. मुलगा फक्त ११ वर्षांचा असल्यामुळें त्यानें चांगलाच प्रयत्न केला आहे, त्याला प्रल्हाद अथवा भांगेंत तुळस हें पुस्तक बक्षीस दिलें आहे.

## नवें कोडें.

### सर्वांकरितां

हें शब्दाचें कोडें आहे. स्वर व व्यंजनें हीं निरनिराळीं विभागलीं आहेत. उदाहरणार्थः—

त्र् अ अ श् अ ल् अ अ प् अ क् अ

| कुपण नं.५ सर्वांकरितां |
|---|

हीं सर्व व्यंजनें व स्वर एकत्र केले असतां " शालापत्रक " असा शब्द होतो. शब्द बनवितांना तें विशेषनाम असलें किंवा शब्दसमुच्चय असला तरी चालेल.

### खालील तीन शब्द सोडवा.

१ ब् र् न् अ अ इ ग् औ अ ज् र्.

२ क्ष् त् अ अ क् ह अ अ अ व् न् म् अ अ अ.

३ अ अ प ई र् अ ज् अ अ ट क्.

### लहान मुलांकरितां.

मी चार अक्षरी हत्यार आहें. तिसरें व चौथें अक्षर मिळून वजन किंवा वाघ होतो. पहिल्या व दुसऱ्या अक्षराचा गणितांत उपयोग होतो. तर मी कोण ?

कुपणाशिवाय आलेल्या उत्तरांचा विचार केला जाणार नाहीं.

| कुपण नं. ६ बालवाचकां-करितां |
|---|

## लहान मुलांकरितां उपयुक्त अशीं पुस्तकें.

नवी आवृत्ति ] **सचित्र अक्षरबोध.** [ नवी आवृत्ति

या पुस्तकांत 'अ' पासून 'ज्ञ' पर्यंत स्वर आणि व्यंजनें हीं सर्व निरनिराळ्या भपकेदार रंगांत तें अक्षर नांवाच्या प्रथम अक्षरानें दर्शविणाऱ्या चित्रांसह दाखविलेलीं असून १ पासून १० पर्यंत अंकहि ल पद्धतीनें दाखविलेले आहेत. पुस्तकाचा स ईज क्राऊन चतुर्थांशाइतका मोठा ७×९ इंच ठेवला असल्या- अक्षरें व चित्रें फारच सुबक व मोठीं अशीं झालीं आहेत. एकंदर पुस्तक इंग्रजींतील सचित्र रंगीत बी. सी. डी. शिकण्यास उपयोगी अशा पुस्तकाच्या धर्तीवर तयार केलें असल्यामुळें हें पुस्तक लहान ांस फारच आवडून त्यावरून तीं आपला धडा सहज शिकतात. किं. ८८.

## उजळणीचें पुस्तक.

ह्यांत सर्व मुळाक्षरें चित्रयुक्त दिलीं असून मोडी व बालबोध बाराखड्या तयार करण्याची सम- थोडक्यांत करून दिली आहे. नंतर मोडी व बालबोध सोपे शब्द मुलांना सहज ओळखण्यासारखे दिले त. पुढें १० अंक सचित्र दिले असून त्यांबरोबरच मुलांस बेरीज व वजाबाकीची समजूत टिंबांच्या आकृ- व गोट्यांच्या चौकटीच्या सहाय्यानें घालून दिली आहे. नंतर पाढ्यांची समजूत दिली असून शेवटीं ळणी दिली आहे. एकंदरींत हें पुस्तक नवीन तऱ्हेनें मुलांना शिकविण्यास फार उपयुक्त असें झालें आहे द ग्लेज किं. ८१८६

भाग १ ते ६ ] **चिमुकल्या गोष्टी.** [ भाग १ तें ६

ह्या गोष्टींत रोज व्यवहारांत घडणाऱ्याच गोष्टी दिलेल्या आहेत, पण त्या इतक्या मोहक, मनोरंजक ार्मिक लिहिल्या आहेत कीं, त्या गोष्टींतील तत्त्वबोध गोष्टी वाचतां वाचतांच मुलांच्या मनावर सहज ा जातो. पुस्तक वळीक टाइपांत सुंदर जाड व ग्लेज कागदावर छापिलेलें असून प्रत्येक गोष्टीचे प्रारंभीं ानकाचें सुंदर चित्र दिलेलें आहे. एकंदर ह्या गोष्टीचे सहा भाग आहेत. प्रत्येक भागांत दहा गोष्टी सचित्र ात, प्रत्येक भागास किं ८४.

## जोडाक्षर-विरहित वाचनपाठ.

हें पुस्तक नुकत्याच अक्षर ओळख झालेल्या मुलांमुलींकरितांच लिहिलेलें आहे. पुस्तकांत एकंदर १७ ी अगदीं सोप्या भाषेंत, व एकहि जोडाक्षर न येऊं देतां लिहिल्या आहेत. प्रत्येक गोष्टीचे आरंभीं कथा- चें मूर्तिमंत चित्र दिलें असल्यामुळें गोष्ट वाचण्याचे अगोदरच त्यांतील सारांश मुलांचे सहज लक्षांत किं. अवघी चार आणे.

**मिळण्याचें ठिकाण**—म्यानेजर—चित्रशाळा प्रेस, पुणें.

॥ ॐनमः श्रीरामचंद्राय ॥

# आर्यमहौषधालय मु० पो० आंजर्ले.

**कोकणप्रांतांतील अगदीं ताज्या व शुद्ध वनस्पतींचीं जगत्प्रसिद्ध निर्दोष व रामबाण औषधें.**

**कंदर्पमंजरी पाक**—हा अपूर्व पाक गरिबांपासून तों अमीरउमरावांपर्यंत सर्वांसही अत्यंत उपयोगी असून किंमत माफक ठेविली आहे. यांत मौक्तिक, प्रवाळ लोह, माक्षिक, कस्तूरी, अंबर इ० अत्युच्च गुणकारक पदार्थ असून शिवाय बदाम, पिस्ते, अक्रोड चारोळी, केशर, वेलची, पंजाबी सालममिश्री, सफेतमुसळी, पत्री, गोक्षुर, शतावरी, आस्कंद, वंशलोचन वगैरे ( ८० ) उपयुक्त वनस्पति घातलेल्या आहेत. यानें पथ्यावांचून गुण येतो. यापासून कोणत्याही कारणांनीं होणारा व कसाही प्रकारचा शुक्रस्राव, नपुंसकत्व, मूळव्याधि, रक्तदूषणामुळें त्वगरोग, स्त्रियांची धुपणी व गर्भाशयस्थ दोष या भावना त्यांच्या एकंदर उपविकारांसह तत्काल बऱ्या होऊन धातुवृद्धि होते, व शरीर कणखर आणि तेजस्वी बनतें. २० तो० ड० २ रुपये एकदम ३ डबे घेणारास ५ रुपये.

**स्वर्णधात्री तेल**—हें चारोळी, बदाम, कंकोळ, एला, बहुविध वनस्पतींचीं सत्वें व उपयुक्त तेलें अशा अनेक पदार्थांनीं बनविलें असल्यानें याच्या मर्दनापासून अपस्मार, उन्माद, वेड, चक्कर इ० रोगांस जलद आराम पडतो केंसांस चोळल्यानें केंस काळेकुळकुळीत, तजेलदार, सडकलांब व मृदु होऊन मेंदु शांत आणि रोगरहित बनतो. यानें मस्तकाचें टक्कल जातें. हें अंगास चोळून स्नान करीत गेल्यानें शरीराचा दुर्गंध जातो. खरूज, गजकर्ण, शिबें, तसेंच तळपाय, तळहात, डोळे व मस्तक यांचा दाह हे विकार खास बरे होऊन निद्रा चांगली येते, आणि नेत्ररोग दुरुस्त होतात. बा० किं० १ रु०

**दंतरक्षक पूड**—ही दांत व हिरड्या यांचे सर्व विकार तत्काल दुरुस्त करून दांत स्वच्छ व मजबूत करण्यांत प्रतिज्ञेची आहे. ड. ६ आणे.

**सुरंगी, मालती, कल्हार, गुलबहार, दणाणा, लक्ष्मीविलास** इ० बादशाही अति उंची अत्तरें व त्याचप्रमाणें गुलाब, हिना, केवडा, चमेली, जाई वगैरे सुगंधी अत्तरें आणि केंसांस लावण्याचीं हरएक प्रकारचीं सुवासिक तेल माफक दरानें पूर्ण खात्रीचीं मिळतील.

**सूचना**:—वरील औषधें व अत्तरें वगैरे पूर्ण खात्रीचीं असल्यामुळें आज पंचवीस वर्षांत त्यांचा लक्षावधि लोकांस अप्रतिम उपयोग झाला म्हणून त्यांचा नेहमीं फारच खप होत आहे. अनुभवानंतर पूर्ण खात्री पटलेव. औषधें माहितीचे खर्च्यासह रोखीनें अगर व्ही. पी. नें पाठवूं. प्याकिंग व टपाल खर्च वेगळा. घाऊक घेणारांस कमिशन भरपूर. सर्व औषधांच्या आणि आरोग्यरक्षणाच्या माहितीचें सचित्र मोठें पुस्तक देऊं. आमचीं औषधें वगैरे मागविणें तीं खालील बिनचूक पत्यावर मागवावीं.

**कृष्णशास्त्री बिवलकर, वैद्य.**

मराठी
# बालपत्रक

येथें शब्द नोहीं शिष्यासी । हें अवघें सद्गुरूपाशीं ।
सद्गुरु पालटी अवगुणांसी । नाना यत्नें करोनी ॥
जें कांहीं आपणास ठावें । तें हळु हळु शिकवावें
शहाणें करून सोडावें । सकळा जनां ॥ १ ॥

रामदास.

पुस्तक ३४. मे जून सन १९२३. अंक ५।६

## नेपोलियन बोनापार्ट.

इ. स. १७६७ मध्यें कार्सिका नांवाचें बेट फ्रेंचांनीं जिंकून घेतलें. त्याची राजधानी अजॅशिओ येथें इटालींतील रहिवाशी चार्लस बोनापार्ट नांवाचा देखणा, हुशार, व फार प्राचीन काळापासून प्रसिद्ध असलेल्या घराण्यांत जन्मलेला इसम वकील होता. त्या वेळीं त्याची स्थिती चांगली नव्हती. त्याच्या बायकोचें नांव लिटिशिया होतें. त्या बेटांतील त्या काळच्या स्त्रियांमध्यें ती फार सौंदर्यवान व हुशार स्त्री होती. तें कुटुंब अजॅशिओ येथें आपल्या घरीं राहात होतें. त्यांचें समुद्र किनाऱ्याजवळ खेड्यांतहि एक लहान घर होतें. तेथें ती मंडळी उन्हाळ्यांत राहत असत. त्यांना ता. १५ आगष्ट स. १७६९ रोजीं नेपोलियन बोनापार्ट नांवाचा दुसरा मुलगा झाला. नेपोलियनच्या जन्मापूर्वी फक्त दोनच महिने तें बेट फ्रेंचांनीं जिंकून घेतलें होतें. तें बेट जिंकलें जाण्यापूर्वीं तेथें फार अस्वस्थता माजली होती व स्वदेशाच्या रक्षणाकरितां पॅओली नामक सेनापती-बरोबर त्याचा बाप जिवापाड मेहनत करीत होता. त्याची आई सुद्धा त्याच्या बापाबरोबर स्वदेशाच्या रक्षणाकरितां घोड्यावर बसून वाटेल तिकडे मजला मारीत होती. तिला स्वतःच्या जीविताची मुळींच पर्वा नसे इतकें तिचें मातृभूमीवर प्रेम होतें. नेपोलि-

यनच्या जन्मानंतर थोड्यावर्षांनीं त्याचा बाप निवर्तला. त्याला पांच मुलगे व तीन मुली होत्या. त्यांचीं नांवें:— (१) जोसेफ, (२) नेपोलियन, (३) ल्युसिअन, (४) लुई, (५) जीरोम, व (६) एलिझा, (७) पॅओलाइन, व (८) कॅरोलाइन. नवऱ्याच्या मरणानंतर मुलांच्या पालनपोषणाची जबाबदारी लिटिशियावर पडली. तिची सांपत्तिक स्थिती चांगली नव्हती तरी तिची बुद्धिमत्ता फार दांडगी होती. त्या सर्व भावंडांपैकीं नेपोलियनच्या मनांत आपल्या आईविषयीं फार आदर व प्रेम होतें. आपलें वैभवाच्या शिखरास पोंचण्याचें सर्व श्रेय तो आपल्या मातेच्या शारीरिक, बौद्धिक व नैतिक शिक्षणास देत असे. त्याच्या मनावर त्या शिक्षणाचा इतका परिणाम झाला होता कीं तो नेहमीं म्हणे 'मुलाचें भावी शील चांगलें अथवा वाईट होणें हें सर्वस्वी त्याच्या आईवरच अवलंबून असतें.'

त्याला वैभव प्राप्त होतांच त्यानें आपल्या आईला शक्य त्या रीतीनें सुखी केलें; व तो बादशहा होतांच स्त्रीशिक्षणाकरितां सर्व फ्रान्सभर त्यानें मुलींच्या शाळा स्थापन केल्या. तो असें म्हणे कीं 'फ्रान्स देशाला वैभव शिखराला चढविण्याला चांगल्या आया बनविण्याबांचून दुसऱ्या कोणच्याहि गोष्टीची गरज नाहीं.'

त्याची आई फार कडक शिस्तीची व निस्पृही असे. पुढील हकीकतीवरून ही गोष्ट वाचकांच्या ध्यान्यांत येईल. त्या मुलांचा मामा खाऊन पिऊन सुखी होता परंतु फार कंजूष असे. नेपोलियनच्या कुटुंबाची स्थिती त्याच्या बापाच्या मृत्यूनंतर फार खालावली होती. हीं मुलें कधीं मधीं आपल्या मामाजवळ खाऊ वगैरे करितां पैसे मागत व त्यांचा मामा आपल्याजवळ पैसे नसल्याचें त्यांना नेहमीं सांगे. एके दिवशीं त्या मुलांनीं खेळतांना कट करून आपली धाकटी बहीण पॅओलाइन हिच्याकडून आपल्या मामाची पैशाची पिशवी उधळून पैसे अस्ताव्यस्त फेंकून दिले व तीं सर्व भावंडें गमतीनें हांसूं लागलीं. इतक्यांत अवचित त्यांची आई तेथें आली. ती येतांच मुलें गप्प झालीं. ह्या कृत्याबद्दल ती मुलांना फार रागें भरली व त्यांच्याकडून तिनें ते पैसे गोळा करविले.

तिच्या बाणेदार व निस्पृही स्वभावाची पुढील प्रमाणें दुसरी एक गोष्ट आहे.

नेपोलियन फ्रान्सचा बादशहा झाल्यावर सेंट क्लाउड येथें बागेंत आपल्या दरबारांतील कांहीं नोकरचाकरांसह फिरत असतांना त्याची व त्याच्या आईची तेथें भेट झाली. तेव्हां त्या देशांतील पद्धती प्रमाणें मोठ्या माणसाच्या हातानें लहान माणसानें चुंबन घेण्याच्या रीतीप्रमाणें नेपोलियननें आपला हात आपल्या आईपुढें केला तेव्हां आपल्या बादशहा झालेल्या मुलाची तिळमात्र पर्वा न करतां त्या निस्पृही व बाणेदार स्त्रीनें उत्तर दिलें, "हें माझ्या लाडक्या, छे असें नव्हे. जन्मदात्या आईच्या हाताचें चुंबन घेणें हेंच तुझें कर्तव्य असून तेंच तुला केलें पाहिजे."

लहानपणीं नेपोलियन आपल्या आईच्या तोंडून तिच्यावर बेतलेल्या संकटाची हकीकत नेहमीं ऐकत असे. पुढें सेंट हेलेना बेटांत कैदी असतांना तो म्हणाला, "माझ्या आईचें मजवर इतकें प्रेम आहे कीं ती मजकरितां आपल्या अंगावरील चिरगूटहि विकण्यास कमी करणार नाहीं."

"माझ्या आईला माझा बाप मेल्यावर कोणी सल्लागार नसतांना व तिला कोणाचा आश्रय नसतांना तिच्यावर कुटुंबाची जबाबदारी येऊन पडली व ती जबाबदारी पार पडण्यास ती पुरून उरण्याजोगी होती. ती फार दूरदर्शी असल्यानें स्त्रीजातीला व तिच्या वयोमानाला अशक्य असलेल्या ठाकठिकीनें तिनें संसारगाडा चालविला. आपणामध्यें वाईट

विचारांना तिनें थाराच मिळूं दिला नाहीं. सर्व चांगल्या गुणांची तिनें आमच्यामध्यें जोपासना केली. तिला खोट्याचा तिटकारा होता व यत्किंचितहि आज्ञाभंग तिला खपत नसे. आमच्या बारीक सारीक अपराधाबद्दल सुद्धां ती आम्हाला शिक्षा करी. नुकसानीची अथवा श्रमाची तिला मुळींच पर्वा नसे. ती सर्व निमुटपणें सोशी व धारिष्टानें प्रत्येक प्रसंगाला तोंड देई. पुरुषाप्रमाणें तिच्यांत उत्साह असून स्त्रियाप्रमाणें तिच्यांत शांती व प्रेम होतें."

मातेवर प्रेम असणाऱ्या प्रत्येकाबद्दल नेपोलियनला मोठा आदर वाटे; ही गोष्ट पुढील हकीकतीवरून कळून येईल:—

इ. स. १८०४ मध्यें नेपोलियनच्या हातीं इंग्लिशांचे कांहीं लोक कैदी सांपडले होते. इंग्लंड आणि फ्रान्स ह्यांमध्यें तीस मैल रुंदीची इंग्लिश खाडी आहे. हे कैदी त्या खाडीच्या कांठावर असलेल्या एका गांवांत होते. त्यांच्यापैकीं एका कैद्यानें खाडी ओलांडून जाण्याकरितां झाडाच्या डाहाळ्या एकत्र बांधून त्यांची सांगड करून तीवर बसून खाडींत उतरण्याच्या तो बेतांत असतांना एका फ्रेंच सैनिकानें त्याला पकडून नेपोलियनकडे आणिलें व झालेली सर्व हकीकत त्याला कळविली. झाडाच्या टाहळ्यांनीं केलेल्या सांगडीवरून खाडी ओलांडणें अशक्य असतांना सुद्धां आपल्या जीवाची पर्वा न करतां ज्याअर्थीं हा इसम खाडी ओलांडून जाण्यास उत्सूक झाला आहे, त्याअर्थीं कोणा स्त्रीवर त्याचें प्रेम असून तिला भेटण्यास तो जात असावा असें नेपोलियनला वाटून त्यानें त्याला विचारलें, " अशा होडींतून खाडी ओलांडितां येईल असें तुला वाटतें काय ? "

त्या सैनिकानें उत्तर दिलें, " महाराज, आपली परवानगी असेल तर मी आतांच त्या होडींत बसून जाईन. "

" तर मग इतक्या उत्सुकतेनें तूं आपल्या देशास जाण्यास तयार आहेस त्याअर्थीं तेथें तुला कोणा बाईची भेट घ्यावयाची आहे काय ? असा नेपोलियननें त्याला प्रश्न केला.

त्या सैनिकानें उत्तर दिलें, "महाराज, मला माझ्या आईला भेटावयाचें आहे. ती म्हातारी असून पंगु आहे. "

त्या सैनिकाचे हे शब्द नेपोलियनच्या कानीं पडतांच त्याला प्रेमाचें भरतें आलें. तो म्हणाला, " तुझी व तुझ्या आईची खात्रीनें भेट होईल. जिनें आपल्या मुलाला इतका प्रेमळपणा व इतकी कर्तव्यदक्षता शिकविली ती स्त्री इतर स्त्रियांपेक्षां खास श्रेष्ठ असणार. तिला ही पैशाची पिशवी मजकडून देणगी म्हणून दे; असें म्हणून नेपोलियननें त्या सैनिकास तावडतोब फ्रेंच जहाजावर बसवून त्यावर तहाचें निशाण लावून त्या सैनिकाला आपल्या आईस भेटण्यास जाण्याकरितां इंग्लिश जहाजावर पोंचता केला.

नेपोलियनला लहानपणापासून खेळाची मुळींच आवड नव्हती. त्याला सतत अभ्यासाची आवड होती. आपलीं भावंडें खेळांत गुंतलीं असतांना त्यांचा डोळा चुकवून एकांतांत असलेल्या एका गुहेंत जाऊन तो तासांचे तास अभ्यासांत गढून जाई. नेपोलियनची गुहा ह्या नांवानें ती गुहा अद्याप प्रसिद्ध आहे. तो एकांतप्रिय असून तापट स्वभावाचा होता. कोणालाहि मेचून राहणें त्याला खपत नसे. संगतीची अथवा खेळाची त्याला आवड नसे. तो आपल्या भावंडांना विशेष प्रिय नव्हता तरी तीं सर्वजण त्याला श्रेष्ठ मानीत. त्याचा चुलता म्हणे जोसेफ जरी नेपोलियनहून मोठा होता तरी नेपोलियनचेंच

सर्वांवर मोठें वजन होतें. तो फार बाणेदार होता. कसल्याहि शिक्षेची त्याला पर्वा नसे. तो ती मुका-ट्यानें सोशी. एकदां दुसऱ्या इसमाच्या अपराधा-बद्दल नेपोलियनला अन्यायानें शिक्षा झाली. परंतु आपल्या मित्राचा विश्वासघात करणें बरें न वाटून त्यानें ती शिक्षा निमुटपणें सोशिली. त्याला जें [illegible] दिलें [illegible] त्यानें तीन दिवस [illegible] त्या मित्राबद्दल त्यानें दुसरी शिक्षा भोगिली [illegible] तो त्याचा [illegible] होता असेंहि नव्हतें. तर त्यानें फक्त बाणेदारपणानेंच ही शिक्षा भोगिली. तो तडफड्या स्वभावाचा असल्यामुळें त्याला रागहि तावडतोब येई, परंतु तो लगेच शांतहि होत असे. त्याच्याठाई निष्ठुरता नसून सूडाची कल्पनाहि नव्हती.

नेपोलियन बापाचा फार आवडता होता. तो त्याच्या मांडीवर बसून आपल्या देशांतील शूर लोकांचीं लढाईंतील वर्णनें आपल्या बापाच्या तोंडून नेहमीं ऐकत असे; व आपले लहानपणाचे खेळ सोडून त्या लढाया तो खेळे व त्यांतच त्याला मोठें समाधान वाटे.

कार्सिका बेट फ्रेंचांनीं जिंकल्यावर काउंट मिरबो नामक सरदाराला फ्रेंच सरकारानें कार्सिका बेटावर गव्हर्नर नेमिलें. त्याची व बोनापार्ट घराण्याची फार मैत्री जमली. त्याला छोटेखानी नेपोलियन विषयीं फार प्रेम वाटू लागलें. हा मोहकपणा नेपोलियनच्या ठाईं शेवटपर्यंत फार विलक्षण होता. त्याच्याकडे एकदां जो कोणी जाई तो त्याला मोहून जाई. शत्रु व मित्र ह्या दोघांचे असेच होई. इतका विलक्षणपणा त्याच्या मोहकपणांत होता. नेपोलियनचे बालपणांतील विचार व त्याची भाषणशैली ह्या गुणांनीं त्या गव्हर्नरचें त्याच्यावर प्रेम जडलें व नेपोलियन फार मोठा पुरुष होईल असें त्यानें त्या वेळीं केलेलें भविष्य पुढें तंतोतंत खरें झालें.

पांच सहा वर्षांचा असतांना नेपोलियनला शाळेंत घातलें. त्याची शाळेंतील एका लहान मुलीबरोबर मैत्री जडली. तीं दोघें हातांत हात घालून शाळेंत इकडे तिकडे फिरत तेव्हां इतर मुलें त्यांची चेष्टा करीत, व कांहीं वेळां चेष्टा इतक्या निकरावर जाई कीं दुसरीं कितीहि मुलें हातांत काठ्या दगड घेऊन त्याच्यावर आलीं तरी त्या सर्वांवर मोठ्या आवेशानें तुटून पडून तो त्यांना पळवून लावी. हें त्याचें धैर्य लहानपणापासून शेवटपर्यंत कायम होतें. आपल्या घरासमोरील बागेंत गवतावर पडून तो सतत अभ्यासांत गढलेला असे. तो आपल्या कपड्या लत्त्यासंबंधी फार निष्काळजी असे.

दहा वर्षांचा असतांना काउंट मिरबोनें त्याला पॅरिसजवळ ब्राएनी येथें लष्करी शाळेंत घातला. त्या वेळीं आईला सोडून जातांना त्याला झालेल्या दुःखाची विस्मृती आजन्म होणें अशक्य असल्याचें त्यानें पुढें चाळीस वर्षांनीं बोलून दाखविलें. इतकें त्याला आईविषयीं प्रेम होतें.

तो फार हुशार व मेहनती विद्यार्थी म्हणून त्या शाळेंत त्याचें नांव झालें. त्या शाळेंतील इतर मुलगे घरचे सुखी असून चैनी असत व नेपोलियनची गरिबी असल्यानें दुसऱ्या मुलांनीं त्याच्या चेष्टा कराव्या व त्याचा मत्सर करावा. ह्यामुळें धनिक लोकांसंबंधीं नेपोलियनच्या मनांत अखेरपर्यंत तिटकारा राहिला. पुढें ऐश्वर्यसंपन्न झाल्यावर—लोकांनीं त्याला फ्रांसचा बादशहा केल्यावर तीस वर्षांनीं—त्यानें बोलून दाखविलें कीं विशिष्ट कुळांत जन्म झाल्यानें फक्त मोठेपणा प्राप्त होणें योग्य नसून बुद्धिसामर्थ्यानें मोठेपणा प्राप्त होणें योग्य आहे.

हे विचार त्याच्या डोक्यांत लहानपणापासून घोळत असल्यानें तो नेहमीं इतर सोबत्यांपासून अलग राहून एकांतांत बसून पुस्तकांत व नकाशांत गढलेला असे. त्याचे इतर सोबती खेळांत गुंतले असतांना तो आहोरात्र अभ्यासांत गढलेला असे.

ह्यामुळें सर्वांच्या मनांत त्याच्याविषयीं अत्यंत प्रेम उत्पन्न होत असे. गणीत विषयाची त्याला फारच आवड होती. ऐतिहासिक व राजकीय विषयांवरील पुस्तकें त्यानें अधाशासारखीं फन्ना पाडिलीं होतीं. काव्याचीहि त्याला फार आवड असे. ह्या सतत अभ्यासाच्या संवईनें त्याच्या मनाची एकाग्रता चांगली होत असे. सतत अभ्यासाच्या संवईनें त्याच्या शरीरप्रकृतीवर वाईट परिणाम झाला. तो आपल्या बरोबरीच्या लोकांशीं आपल्याच तंत्रानें वागे व त्याला कडक शिस्तीची फार आवड होती. ह्या गुणांनीं तो आपल्या गुरूंचा फारच आवडता झाला. त्याला कामाची सतत आवड असल्याचें व कोणीहि मनुष्य कांहीं कामानिमित्त एकवार त्याच्याकडे गेला असतां त्याची त्याला कायमची आठवण रहात असल्याचें पुढील गोष्टीवरून ध्यानांत येईल.

इ. स. १७८४ मध्यें ब्राएनी येथें नेपोलियन शाळेंत असतांना एके दिवशीं भयंकर थंडी पडून जिकडे तिकडे बर्फ पडलें. त्यामुळें बाहेरचा सर्व व्यवहार बंद झाला व घरांत करमेनासें झालें. तेव्हां नेपोलियननें शाळेंतील सर्व मुलें जमवून बर्फाचा उत्तम किल्ला आपल्या देखरेखीखालीं करविला. तो किल्ला पाहून निष्णात सेनापतींनीं सुद्धां त्याची तारीफ केली. नंतर त्यानें मुलांच्या दोन टोळ्या बनवून सैन्याच्या दोन बाजू बनविल्या व दोन्हीकडचें सेनापतित्व आपण पतकरून एका सैन्याकडून दुसऱ्या सैन्यावर हल्ला करवून दुसऱ्या सैन्याकडून पहिल्याचा प्रतिकार करविला. त्याला हुकमाची अमान्यता बिलकूल खपत नसे. ती लढाई ऐन भरांत आली असतां त्या बालसैन्यांतील एका कल्पित अधिकाऱ्यानें नेपोलियन सेनापतीचा हुकूम मानण्याची थोडी टाळाटाळ केली. ही गोष्ट नेपोलियनच्या ध्यानांत येतांच सपाट्यासरसा त्यानें त्याला खालीं पाडिला. बर्फ इतकें घट्ट झालें होतें कीं, त्याच्या कपाळास खोफ पडली. त्या खोकेचा वण त्याच्या कपाळावर कायमचा राहिला. नेपोलियन पुढें बादशहा झाल्यावर ह्यावरील इसमाची फार कठीण स्थिति होऊन तो बादशहाला भेटावयास गेला. नेपोलियनला पहिल्यानें त्याची ओळख पटली नाहीं. म्हणून लहानपणच्या एकाद्या प्रसंगाची आठवण देण्यास त्यानें त्याला सांगितलें. तेव्हां तो गृहस्थ म्हणाला, "महाराज, आपणच आपल्या हातानें माझ्या कपाळावर खोफ पाडिली होती." हे शब्द कानीं पडतांच ब्राएनी येथील प्रसंगाची नेपोलियनला आठवण होऊन त्या गृहस्थाची त्याला ओळख पटून त्यानें त्याला पाहिजे होती ती मदत दिली.

ह्या वरील गोष्टींत नेपोलियनच्या ठाईं असलेली उद्योगप्रियता, कडक शिस्तीची आवड, विलक्षण बुद्धिमत्ता व गरिबांना संकटसमयीं मदत करण्याविषयीं असलेली विलक्षण कळकळ हीं स्पष्ट दिसून येतात.

नेपोलियन फार शूर होता; व सैनिकांच्या बरोबरीनें स्वतः तो शेकडों लढाया लढला. ह्यामुळें सैनिकांना तो फार प्रिय होता. जें काम तो स्वतः करूं शके तेंच तो इतरांना करावयास सांगे. ऐन आणीबाणीच्या प्रसंगीं तो स्वतः संकटांत शिरून आपला जीव धोक्यांत घालून घाबरलेल्या सैनिकांना स्फुरण चढवी. ह्याविषयीं पुढील गोष्टीवरून खात्री पटेल.

ता. १७ मे स. १७९६ रोजीं आस्ट्रिया याच्या सैन्याची व नेपोलियनच्या सैन्याची लोदी येथें लढाई झाली. त्या ठिकाणीं नदीवर पूल होता. लोदी गांवांत ऑस्ट्रियाचें सैन्य होतें. नेपोलियनचें सैन्य नदीपलीकडे होतें. नदीपलीकडून नेपोलियनच्या सैन्यांवर शत्रूच्या तोफांचा मारा चालू होता. दरम्यान पूल असून तो फार अरुंद होता

व तो मोडकळीस आलेला होता. अशा स्थितींत नेपोलियनचें सैन्य पुलावरून जाण्यास कचरूं लागलें व सन्यांत बराच गोंधळ उडाला. हें पाहतांच नेपोलियन हातांत निशाण घेऊन सैन्याच्या आघाडीस होऊन पुलावरून चालूं लागून सेनापतीच्या मागें चला असें सैनिकांस म्हणतांच सर्व सैनिकांस एकदम स्फुरण चढून ते त्या पुलावरून शत्रूचा मारा चालू असतांना पलीकडे गेले व शत्रूच्या सैन्याची दाणादाण उडून नेपोलियनला मोठा विजय मिळाला. त्या धाडसाच्या कृत्यानें सैनिकांचें नेपोलियनवर फार प्रेम जडालें व सैन्यांतील नाईक असें त्यांनीं त्याला टोपण नांव दिलें. तो पुढें बादशहा झाल्यावर सुद्धां त्याच टोपण नांवानें त्याला हाक मारीत.

नेपोलियन ब्राएनी येथें शाळेंत आला त्या वेळीं फ्रांसमध्यें जिकडे तिकडे धर्माचा लोप झाला होता. देवळें बंद पडलीं होतीं. सर्व धर्मसंस्कारांचा लोप झाला होता. अशा परिस्थितींत नेपोलियन लहानाचा मोठा झाला होता. तरी सुद्धां तो सत्ताधीश होतांच त्यानें पुनः धर्मस्थापना केली; मंदिरें खुलीं केलीं, पूजाअर्चा सुरू केल्या, प्रार्थनेला लोक देवळांतून जाऊं लागलें. देवळाच्या घंटांचे आवाज जिकडे तिकडे दुमदुमूं लागले. नेपोलियन बादशहा झाल्यावर त्यानें रोम येथील पोप धर्मगुरूकडून आपणाला व आपली बायको जोसेफाईन हिला धार्मिक विधीनें राज्याभिषेक करविला. उपाध्यांची दर एक मंदिरावर नेमणूक केली. शाळांत धार्मिक शिक्षणाकरितां उपाध्यायांची नेमणूक त्यानें केली.

नेपोलियनला कर्तव्यदक्षतेची फार आवड होती. स. १७९६ मध्यें मॉंट्रआच्या किल्याभोंवतीं ऑस्ट्रियाच्या सैन्याला नेपोलियननें वेढा घातला होता. तेथील स्थिति फार कठीण झाली होती. म्हणून पहारेवाल्या संत्र्यांना एका विवक्षित ठिकाणीं कोणालाहि जाऊं न देण्याकरितां सक्त हुकूम होते. त्या हुकमांची अंमलबजावणी कशी होत आहे हें पहाण्याकरितां नेपोलियन स्वतः रात्रीच्या अंधारांत त्या ठिकाणावरून जाऊं लागला. कोणी तरी इसम जात असल्याची चाहूल लागतांच त्या पहारेकऱ्यानें बंदूक रोखून त्या जाणाऱ्या इसमास उभें करविलें व पुढें पाऊलहि टाकूं दिलें नाहीं. नेपोलियननें उत्तर दिलें "मी सेनापति आहें." त्या पहारेकऱ्यानें उत्तर दिलें "आपण जरी प्रत्यक्ष आमचे छोटेखानी नाईक असला तरी आपणांस ह्या वेळीं येथून जाण्यास मनाई आहे." नेपोलियन येथून मुकाट्यानें मागें फिरला. दुसऱ्या दिवशीं त्या पहारेकऱ्याविषयीं चवकशी करून त्याची आज्ञाधरकपणा व कर्तव्यदक्षतेबद्दल तारीफ करून नेपोलियननें त्याला वरिष्ठ दर्जाला चढविलें.

इ. स. १८०५ मध्यें इंग्लंड, रशिया, ऑस्ट्रिया ह्यांना फ्रांसमध्यें स्थापिलेल्या प्रजासक अंमलाची भीति वाटून इंग्लंडनें रशिया व ऑस्ट्रिया ह्यांना आपल्या बाजूस वळवून फ्रांसवर मोहीम करण्यास सांगितलें. त्यांना नेपोलियनवर अकस्मात घाला घालावयाचा असल्यामुळें त्यांनीं युद्धाचा पुकाराहि केला नाहीं. ऑस्ट्रियाचा परराष्ट्रीय वकील पॅरिस येथें स्वस्थ राहिला. आपल्या हालचालीचा नेपोलियनला बिलकूल सुगावा लागूं नये म्हणून शक्य ती खबरदारी घेतली होती. जनरल फ्रॅंक नांवाच्या सेनापतीच्या हाताखालीं ऐंशीं हजार ऑस्ट्रियाचें सैन्य होतें व आलेकझांडर बादशहाच्या हाताखालीं एक लक्ष साठ हजार सैन्य असून तीं दोन्ही सैन्यें फ्रांसच्या सरहद्दीवर चालून येण्यास निघालीं. त्या वेळीं नेपोलियन हजारों मैल अंतरावर बलोन येथें आरमाराच्या व्यवस्थेंत गुंतला होता. त्याला युद्धाचा सुगावा नसल्याचें शत्रूला वाटलें. परंतु त्याला सर्व

हालचालीची इत्थंभूत माहिती होती. ऑस्ट्रियाच्या सैन्यानें झपाट्यानें मजला मारून फ्रांसचा दोस्त असलेल्या बव्हेरिआच्या राजाला तक्तावरून काढून फ्रांसविरुद्ध लढण्यास लाविलें.

सोसाट्याच्या वाऱ्याप्रमाणें र्‍हाईन व डॅन्यूब नद्या ओलांडून नेपोलियन आल्याचें समजतांच ऑस्ट्रियाच्या सैन्याची गाळण उडाली. आपल्या सर्व सैन्यानीशीं नेपोलियननें त्याच्या पिछाडीवर जाऊन त्यांचा ऑस्ट्रियाशीं दळणवळणाचा मार्ग बंद करून त्यांची येणारी चीजवस्त रोखून धरून रशियाच्या सैन्याशीं त्यांची गांठ पडूं दिली नाहीं. नेपोलियनचें सैन्य जणूं ढगांतूनच खालीं उतरल्याप्रमाणें शत्रूच्या सैन्याला भासलें. त्याची गाळण उडून तें सैरावैरा धांवत सुटलें. परंतु त्यांना कोठेंच पळून जातां येईना. नेपोलियनच्या सैन्यानें त्यांना अशा रीतीनें घेरिलें कीं, त्यांना जागेवरून हलणें मुष्किलीचें झालें. सबब निराश होऊन त्यांनीं आपलीं हत्यारें खालीं ठेविलीं, व नेपोलियनच्या हातीं सामानाच्या गाड्या, दारूगोळा, तोफा, घोडे वगैरे सर्व आलें. प्रतिकार करणें शक्य नव्हतें. हा विजय रक्ताचा विंदूहि न सांडूं देतां नेपोलियननें मिळविला. कडक थंडींतील वादळाच्या रात्री पावसांत ओलाचिंब होऊन चिखलानें बरबटलेला नेपोलियन सर्व रात्रभर शत्रूचा पाठलाग करीत चालला होता. सैनिक भीतीनें अर्धवट मेल्यासारखेच झाले होते. नेपोलियनचा बेत पूर्ण शेवटास गेला.

फक्त वीस दिवसांत एकहि निकराची लढाई न होतां ऑस्ट्रियाच्या ऐंशीं हजार सैन्याचा फडशा पडला.

एके दिवशीं कैद्यांच्या घोळक्यांतून जात असतांना नेपोलियनचे चिखलानें भरलेले व फाटके कपडे पाहून ऑस्ट्रियाच्या सैन्यांतील एका अधिकाऱ्याला फारच आश्चर्य वाटलें, कीं आपल्या यःकश्चित शिंगाड्याचा पोषाक सुद्धां किती तरी चांगला असतो.

एकदां आठवडाभर मुसळधार पाऊस पडत असतांना नेपोलियन अहोरात्र ओल्याचिंब पोषाखांत पायांतील बूट सुद्धां न काढतां अथवा विसाव्याकरितां क्षणभरहि न पडतां सतत कामांत गुंतला होता.

स. १७९७ मध्यें इटलींत ऑस्ट्रियाचें वीस हजार सैन्य जनरल उम्सिरच्या हातीं असलेलें मॉंटचूआच्या किल्ल्यांत नेपोलियननें घेरिलें. ऑस्ट्रियाच्या सैन्याच्या मदतीला दुसरें बरेंच सैन्य होतें; परंतु नेपोलियननें त्याचा फडशा पाडून किल्ल्यांत सांपडलेल्या सैन्याजवळची दरएक चीजवस्त संपल्यामुळें त्या सैन्यास शरण यावयास लाविलें. जनरल उर्म्सर सत्तर वर्षांचा असून पुष्कळ लढाया जिंकिलेला शूर सेनापति होता. तो मँटूआ येथें नेपोलियनला शरण आल्या वेळीं आपणांविषयीं शत्रूच्या मनांत आदर उत्पन्न करविण्याकरितां त्या सेनापतीला कांहींहि त्रास होऊं न देतां त्याला नेपोलियननें परत जाऊं दिला, व त्याचा मान राखण्याकरितां त्याला त्याच्या पसंतीनें दोनशें घोडे, पांचशें सैनिक व सहा तोफा देऊन त्याला परत पाठवून दिला; व बाकीच्या सैनिकांना कैदी केले.

१८०२ मध्यें नेपोलियननें रशियाच्या पॉल बादशहाला आपलासा करून घेतला; व प्रशिया, डेनमार्क, आणि स्वीडन ह्यांच्याशीं मैत्री करून इंग्लंडविरुद्ध संघ केला कारण एकटें इंग्लंड यूरोपखंडाच्या तहाच्या आड येत होतें. अशा रीतीनें युद्धांत गुंतला असतांना नेपोलियननें फ्रांस देशाची कर्जातून सुटका केली, फ्रांसमध्यें पेटी स्थापन केली, रस्तेलुटीचा पक्का बंदोबस्त केला, सर्व फ्रांसभर शांतता स्थापिली, आल्प्स पर्वतावरून मोठाले दळणवळणाचे मार्ग तयार केले, आल्प्सपर्वताच्या माथ्यावर दवाखाने स्थापिले, तटबंदी नसलेल्या गांवांना तटबंदी केली, मोठाले कालवे खोदून पूल बांधिले, मोठाले रस्ते

तयार केले, व आपल्या अलौकिक बुद्धिमत्तेचें कायमचें स्मारक म्हणून बराच वेळ टिकणारे कायदे बनविले.

नेपोलियननें बुशर्निअस नामक सरदाराच्या जोसेफाईन नामक विधवेशीं स० १७९४ मध्यें लग्न लाविलें. तिला पहिल्या घरचा एक मुलगा व एक मुलगी अशीं दोन मुलें होतीं. मुलाचें नांव यूजिन व मुलीचें नांव हॉटेन्स होतें. इटलीचें राज्य नेपोलियनाला प्राप्त झाल्यावर त्यानें यूजिनाला इटलीचा राजा केलें. जोसेफाईनपासून त्याला औरस संतति न झाल्यामुळें त्याच्या मागून फ्रांसच्या गादीवर बसण्याला वारस पाहिजे असा फ्रेंच प्रजाजनांचा फार आग्रह पकडल्यावरून नेपोलियननें जोसेफाईनचा घटस्फोट करून तिला स्वतंत्र नेमणूक करून देऊन मालमेझन येथील राजवाड्यांत तिला ठेविलें. घटस्फोटानंतर सुद्धां त्या दोघांच्या प्रेमांत काडइतकेंहि अंतर पडलें नाहीं. ती त्याच्याशीं शेवटपर्यंत सलागार मित्र ह्या नात्यानें वागली. पुढें ऑस्ट्रियाची राजकन्या मराया लुई हिच्या बरोबर ता. ११ मे १८१० रोजीं नेपोलियनचें लग्न लागलें. पुढें कांहीं दिवसांनीं नेपोलियन विरुद्ध काहूर उठवून दोस्तांनीं त्याचे सेनापति फितूर केले, व फ्रांसांत नेपोलियनविषयीं सर्वत्र असंतोष पसरविला. तेव्हां प्रजेच्या कल्याणाकरितां फ्रांसबरोबर चालू असलेलें युद्ध थांबविण्यास दोस्त तयार झाल्यावर नेपोलियन आपण होऊन फ्रांसचें तक्त सोडून एल्बा बेटांत जाऊन राहिला. ही गोष्ट स. १८१४ मध्यें झाली. नेपोलियन एल्बा येथें गेल्यावर सुमारें एक महिन्यानें ता. २९ मे १८१४ रोजीं मालमेझन येथील राजवाड्यांत जोसेफाईनचा अंत झाला. एल्बा बेटांत जाण्यापूर्वी नेपोलियननें तिला पत्र पाठवून कळविलें होतें. मरणसमयीं तिनें बादशहाची तसबीर आणवून प्रेमानें तिच्याकडे पाहून आपल्या उराशीं घट्ट धरिली; व अंतकाळीं तिनें पुढील प्रमाणें परमेश्वराची करुणा भाकिली:—

" हे जगन्नियंत्या प्रभो, नेपोलियनच्या जिवांत जीव असेपर्यंत आपली त्याच्यावर कृपा असूं द्या. त्याचे हातून हजारों अपराध जरी घडले असले तरी त्यानें सोशिलेल्या अगणित हालअपेष्टांनीं त्या अपराधांचें क्षालन झालें नाहीं काय? त्याच्या अंतःकरणांत लोककल्याणाची केवढी ज्योत पेटली आहे हें आपण पाहत आहांतच; तर मग आपण माझी एवढी विनंति मान्य कराच व मला शेवटपर्यंत माझ्या नवऱ्याविषयीं व माझ्या मुलांविषयीं कळवळा असल्याचे आपण साक्षी व्हा. "

नेपोलियन एल्बा बेटांत गेल्यावर फ्रांसांत पुनः बंडाळी माजत चालल्याची हकीकत नेपोलियनच्या कांनीं जातांच त्याला ती गोष्ट असह्य होऊन ता. ७ मार्च १८१५ रोजीं एल्बामधून तो फ्रांसमध्यें परत आला. फ्रेंचांचें त्याच्यावर एवढें प्रेम होतें कीं, त्याच्याबरोबर कांहींहि सैन्य नसतांना त्याला कांहीं अडथळा न देतां जागोजाग त्याचें थाटाचें स्वागत होत होत लक्षावधि बायका-पुरुषांच्या घोळक्यांत रक्ताचा एक थेंबहि न सांडतां ता. १० मेला दुपारीं चार वाजतां तो पॅरीस येथें येऊन पोंचला. पुनः दोस्तांचें सैन्य एकवटून त्याच्या विरुद्ध उठलें. ता. १६ जून १८१५ रोजीं वॉटर्लू येथें जंगी लढाई होऊन नेपोलियनचा पूर्ण पराभव झाला. नेपोलियनच्या एका सेनापतीच्या निरर्थक हलगर्जीपणामुळें हा पराभव झाला. ह्या वेळीं त्याला कायमचें तक्त सोडावें लागलें. आपण होऊन तो इंग्लिशांच्या स्वाधीन झाला. तेव्हां त्यांनीं त्याला कैदी करून सेंट हेलेना बेटांत तुरुंगांत ठेविला. तेव्हां सहा वर्षें तुरुंगवास भोगून ता. ५ मे १८२१ रोजीं त्याचा शेवट झाला व त्याच्या शवाचें तेथेंच दफन करण्यांत आलें.

त्यानें मरणापूर्वीं उपाध्यायाकडून धार्मिक विधि उरकून घेतला होता. त्याला मृत्युपूर्वीं वात झाला असतांना त्याच्या तोंडचे शेवटचे शब्द "फ्रान्स, सैन्य, सेनापति, व जोसेफाईन" हे होते. त्याचें जोसेफाईनवर इतकें प्रेम होतें कीं, अंत कालपर्यंत त्याला तिचा विसर पडला नाहीं.

नेपोलियनला कैदी करून सेंटहेलेना बेटांत नेल्या दिवसापासून बरोबर २५ वर्षें ३ दिवसांनीं ता. १८ आक्टोबर १८४० रोजीं फ्रेंचांच्या निकडीच्या मागणीवरून नेपोलियनच्या अस्थि घेऊन पॅरीसला येण्याकरितां सेंटहेलेना येथून जहाज निघालें. तें जहाज ता. १४ डिसेंबर १८४० रोजीं इंग्लिश खाडींतून फ्रांसच्या पहिल्यानें लागणाऱ्या लिवोई बंदरात येऊन पोहोंचलें. ता. १५ डिसेंबर १८४० रोजीं मोठ्या थाटानें लक्षावधी लोकांच्या घोळक्यांत सीन नदीमधून प्यारीस येथें येऊन पोहोंचलें. मुद्दाम तयार केलेल्या भव्य रथांत त्याच्या अस्थींची सर्व शहरभर मोठ्या थाटानें मिरवणूक काढून त्या नेपोलियननें स्वतः तयार करविलेल्या "चर्च ऑफ इन्व्हॅलिडस" नामक स्मशानभूमींत थडग्यांत ठेविल्या. नेपोलियनची जिवंतपणीं हीच इच्छा होती व फ्रेंच राष्ट्रानें ती त्याची इच्छा पूर्ण केली.

नेपोलियनला सेंटहेलेना बेटांत कैदी करून नेल्यावर त्याची बायको ऑस्ट्रियाची राजकन्या मराया लुई व तिचा पांच वर्षांचा लहान मुलगा हीं दोघें ऑस्ट्रियाच्या बादशहाच्या कैदेंत होतीं.

नेपोलियन बरोबर एक फ्रेंच सैनिक सेंटहलेनो बेटांत राहण्यास गेला होता. तो नेपोलियनच्या मृत्यूनंतर त्याच्या थडग्यापाशीं रहात होता व त्याच्या अस्थि फ्रांसमध्यें परत आणिल्या तेव्हां त्या अस्थींबरोबर तो परत फ्रांसमध्यें आला व त्याच्या मृत्यूनंतर नेपोलियनच्या थडग्याशेजारीं त्याचें थडगें बांधिलें.

नेपोलियन फार विद्याव्यासंगी असून निरभिमानी, कलाभिज्ञ, तत्त्ववेत्ता, धार्मिक व प्रेमळ होता.

त्याची विशेष कर्तबगारी म्हणजे फ्रेंच राष्ट्रानें सुरवातीपासून त्याला पैसाअडका कांहीं दिला नव्हता. त्याला सैनिकहि कसलेले दिले नसून नव्या भरतीचे होते. त्यांना कपडालत्ता नव्हता. जेवणाखाणास नव्हतें. असें असूनहि त्यानें एवढे पराक्रम केले व बाहेरच्या पैशानें फ्रेंच राष्ट्र संपन्न केलें. एवढ्या बिकट स्थितींत अनंत उपकार करून त्यानें फ्रेंच राष्ट्राला आपलें कायमचें ऋणी करून टाकिलें.

नेपोलियन अत्यंत मायाळू असल्यानें जिंकिलेल्या शत्रूला पुनः पुनः सोडून देई व तेच ते शत्रू पुनः पुनः त्याच्याविरुद्ध उठून त्याला आपलें सर्व आयुष्य घालवावें लागलें. त्याला शांततेचा असा काळच मिळाला नाहीं. व ऐन युद्धप्रसंगीं शेकडों लोकोपयोगी कामें करून त्यानें आपलें कायमचें स्मारक बनविलें. फ्रेंच लोक आज जें स्वातंत्र्य अनुभवीत आहेत तें मिळविण्याकरितां नेपोलियननें आपलें सर्व आयुष्य खर्ची घातलें.


# अभिनव काव्यमाला भाग ३

या पुस्तकाची दुसरी आवृत्ति छापून विक्रीस तयार आहे. किं. १ रु. ट. ह. व व्ही. पी. खर्च निराळा.

म्यानेजर- चित्रशाळा प्रेस, पुणें

# " श्रीक्षेत्र औदुम्बर. "

( लेखकः—नागेश दत्तात्रय हर्डीकर )

( १ ) आमचा सातारा जिल्हा अनेक पर्वत अनेक पवित्र नद्या, सुंदर वनश्री व पवित्र देवालयांनीं युक्त आहे. त्यामध्यें श्रीदत्ताचीं जीं तीन स्थानें महाराष्ट्रांत प्रसिद्ध आहेत, त्या सर्वांत श्रीक्षेत्र औदुम्बर येथील स्थान अत्यंत रम्य शांत पवित्र आहे.

( २ ) हें स्थान मद्रास सदर्न मराठा रेल्वेच्या भिलवडी स्टेशनपासून सुमारें ३।३॥ मैल लांब आहे. स्टेशनवर औदुम्बरास जाण्यास टांगे गाड्या मिळतात. औदुम्बरास स्टेशनपासून दोन मार्गांनें जातां येतें. एक मार्ग भिलवडीगांवांतून दुसरा मार्ग श्रीभुवनेश्वरीमधून. दुसरा मार्ग स्टेशनपासून जरी थोडा जवळ असला तरी नांवेचा बराच त्रास होतो, म्हणून पहिल्या मार्गानें म्हणजे भिलवडीवरून जाणें अधिक श्रेयस्कर व सोईचें आहे.

( ३ ) इतर सर्व क्षेत्रांप्रमाणें येथें भटजी लोक असून ते यात्रेकरूंची राहण्याची व जेवण्याची सोय करतात. ह्याशिवाय श्रीमंत सांगलीकर रावसाहेब बापट ह्यांच्या धर्मशाळा व अन्नछत्र आहेत, त्यांतून सेवेकरी लोकांस अन्न मिळतें.

( ४ ) "शके १८३० चे सुमारास श्रीदत्ताचा तिसरा अवतार वऱ्हाडांत कारंजनगरांत झाला. आठ वर्षें घरीं राहून मौजीबंधन झाल्यावर श्रींनीं काशीक्षेत्रीं जाऊन संन्यास केला; नृसिंहसरस्वती असें नांव धारण केलें. नंतर जनोद्धाराकरितां तीर्थयात्रा करित करित ते या क्षेत्रास आले. येथें चातुर्मास राहून त्यांनीं स्नानसंध्या केली; कोल्हापुरच्या मूढ ब्राह्मणास विद्या दिली. ही कथा गुरुचरित्र अध्याय सत्रांत आहे. तेथें विद्याप्रसाद झालेल्या ब्राह्मणाचे वंशज हल्लीं कोल्हापुरास धर्माधिकारी या नांवानें प्रसिद्ध आहेत. येथून श्रींची स्वारी श्रीक्षेत्र नृसिंहवाडी येथें गेली. जाते वेळीं श्रींनीं या ठिकाणीं आपल्या पादुका ठेविल्या व "या क्षेत्रा आपला निरंतर वास राहील असा आशिर्वाद दिला. हा या क्षेत्राचा प्राचीन इतिहास झाला."

( ५ ) (अ) औदुम्बर हें स्थान श्रीकृष्णानदीचे कांठीं असून औदुम्बरवृक्षांनीं अगदीं भरून गेलें आहे; त्यामुळें भर उन्हाळ्यांत सुद्धां हें ठिकाण अत्यंत रम्य व शांत असते.

(ब) श्रीदत्ताचें देवालय अगदीं नदीकांठावर असून देवालयापासून नदीपर्यंत सुंदर घांट आहे. श्रीचे देवालयामागें औदुम्बरवृक्ष आहे. येथें एकानें खणिलें असतां मातीचे ढिगाऱ्यांतून रक्ताच्या चिरकांड्या उडाल्या. त्यावेळेपासून तेथें कोणी खणींत नाहीं अशी आख्यायिका येथील लोक सांगतात. सकाळीं ८ वाजल्यापासून १२ पर्यंत श्रीचे पादुकांवर स्नान करून ओलेत्यानें पाणि घालण्याची मुभा आहे. नंतर श्रींची पूजा बांधितात. श्रीचे पुजारी वंशपरंपरचे असून श्रींचे नैवद्यास नेमणूक आहे. सायंकाळीं श्रींची आरती करितात व दर शनिवारीं पालखी काढतात.

(क) येथें संध्याकाळीं आरतीचे वेळीं भुतानें पछाडलेल्या माणसाचे अंगांत येतें व तें माणूस देवास

वाटेल त्या शिव्या देतें. येथें एका बाईनें अंगांत आलेल्या भरामध्यें डोहांत उडी घेतली असें सांगतात.

(ड) येथील कृष्णाबाईचा डोह फार मोठा असून त्यांत मोठमोठे मासे आहेत. दाणे व चुरमुरे टाकल्यानंतर ते खाण्यासाठीं आलेल्या माशांची मोठी मौज दिसते. पावसाळ्यांत महापूर आला म्हणजे देऊळ पाण्यांतच असतें. सबब यात्रेकरूंनीं पावसाळ्यांत येऊं नये.

(ई) माघ वद्य पंचमी, गुरुद्वादशी व दत्तजयंती हे तीन वार्षिक उत्सव आहेत. शिवाय दर शनिवारीं व पौर्णिमेस येथें थोडी यात्रा भरते. या दिवशीं पालखीचा समारंभ असतो.

(ग) येथें मुंजी फार थोडक्या खर्चांत होतात. त्याचा फायदा पुष्कळ लोक घेतात.

( ६ ) ह्या क्षेत्राचें जेवढें वर्णन करावें, तेवढें थोडकेंच आहे. हें क्षेत्र पाहून परमेश्वराचे अतर्क्य लीलेबद्दल मन अगदीं गुंग होऊन जातें.

शेवटीं प्रत्येकानें हें स्थळ अवश्य एकदां जाऊन पहावें एवढेंच सांगून पुरें करीतों.

---

# दीपगृहें.

( लेखक—ग. म. केळकर. )

सर्व देशांशीं दळणवळण दोन प्रकारांनीं चालतें. खुष्कीनें म्हणजे जमिनीवरून आणि जलमार्गानें म्हणजे पाण्यांतून. त्याशिवाय हल्लीं वातनौकांचाही मार्ग चालू झाला आहे. तरी तो अद्याप पूर्णत्वाला पोंहचलेला नाहीं. या तीहींपैकीं जलमार्ग हा कमीखर्चाचा. कारण, समुद्रावर रस्ते, पूल वगैरे बांधावे लागत नाहींत. तरी तो जास्त त्रासाचा आणि संकटाचा आहे. कारण समुद्रांत वारंवार तुफानें, भोंवरे, बर्फाचे डोंगर असतात; यामुळें प्राणहानि आणि मालाचें नुकसान वारंवार होतें. त्यासाठीं अनेक शोधकांनीं निरनिराळीं साधनें योजिलीं आहेत. त्यांपैकीं दीपगृहांची थोडीशी माहिती शालापत्रकासाठीं सादर करितों.

दीपगृहें म्हणजे खडकावर, बंदरावर रात्रीच्या वेळीं खडकबंदर दाखविण्यासाठीं जो दिवा लावितात त्यास दीपगृह किंवा दीपस्तंभ म्हणतात.

दीपगृहाची कल्पना सुमारें ४०० वर्षांची आहे. त्यापूर्वीं खडकावर जाळ करित असत. यापेक्षां सुधारलेलें दीपगृह मागें भूमध्यसमुद्रावर अलेकझांड्रिया शहराजवळ एक पंचधातूंचा पुतळा दोन खडकांवर उभारलेला होता. तो एवढा मोठा होता कीं, त्याखालून मोठमोठीं जहाजें पार निघून जात. त्याचा एक हात वर केल्यासारखा होता. त्यावर जाऊन जाळ करीत असत. कारण तो भाग सर्वांत उंच होता. तो पुतळा पुढें धरणीकंपानें पडला, त्या वेळीं त्याचे तुकडे करून विकले.

जमिनींवरील दीपगृहें बांधण्यापेक्षां खडकावर बांधणें फार कठिण पडतें. कारण भरतीच्या वेळीं

त्याजवर पाणी चढतें म्हणजे त्या वेळीं काम चालत नाहीं. आणि केलेलें कामही पुष्कळ वेळां फुकट जातें. तसेंच तेथें सुरूंग लावण्याचीही सोय नसते. कारण खडकाला भेगा पडण्याची भीति असते. दीपगृहाचें पायाचें काम फार मजबूत करावें लागतें. कारण समुद्राच्या लाटांनीं फुटण्याची फार भीति असते. एकादे वेळीं लाट इतकी जोराची असते कीं, ३॥ टन वजनाचा धोंडा जोरानें आपटावा इतका पाण्याचा जोर असतो. पाया पासून ४०-५० फूट पावेतों सर्व काम भरीव करावें लागतें. त्यांत सिमीट घालून प्रत्येक दगड पक्का करितात. वरील काम पोकळ असतें. आंत सिंसे ओततात, आंतून वर जाण्यासाठीं तेथें दोन तीन मजले असतात, व त्यांत लोकांस राहण्याची सोय असते. आंतून वर जाण्यासाठीं एक वाटोळा जिना असतो. आणि अगदीं वर दिवा लावण्याची सोय केलेली असते. दिव्याला तेलच वापरतात; दिव्याच्या कांचा जाड असतात. ज्याप्रमाणें घरांत दिव्यावर पतंग येतात त्याप्रमाणें या दीव्यावर मोठमोठे पक्षी रात्रीं झडप घालतात. या करितां वर तारांचे आवरण घालितात. कांहीं ठिकाणीं दीपगृहाचा दिवा उमगण्यासाठीं दिवा फिरतां ठेवितात. दिव्याचे पाठिमागें किनारा असल्यास त्या बाजूला धातुचा किंवा कांचेचा तुकडा ठेवितात म्हणजे प्रकाश जास्त प्रखर पडतो. अलींकडे इंग्लंडच्या पूर्व किनाऱ्यावर दोनतीनशें मैलावर हेलीगोलँड म्हणून एक लहानसें जर्मन लोकांचे बेट आहे, तेथील दीपगृहांत विजेचा दिवा लावतात. कांहीं ठिकाणीं गलबतावर दिवा ठेऊन दीपगृह करीतात. कांहीं ठिकाणी मेघ, धूकें, पाऊस यामुळें दिवा दिसत नाहीं त्यावेळीं तेथें शिटी, घंटा वगैरे व्यवस्था करीतात. आता इंग्लंडच्या किनाऱ्यावरील एकदोन दीपगृहांचा अत्यल्प इतिहास सांगून हा लेख संपवितों.

इंग्लंडच्या दक्षिण टोकाकडे प्लिमौथ नावाचें बंदर आहे; या बंदरा पासून सुमारें १२॥ मैलांवर एडिस्टोन खडक आहे. त्यांवर इ. स. १६९६ मध्यें विनस्टेनले गृहस्थानें प्रथम दीपगृह बांधिलें तें १७०३मध्यें मोठ्या वादळांत पडलें. त्यानंतर हें काम रुडियर्ड साहेबांनीं हातीं घेतलें. आणि त्यानीं लांकडाचे दीपगृह उभें केलें. तेहीं इ. स. १७५५ नांत जळून गेलें. आणि त्याच काळीं स्मीटननें लागलेंच तें काम आपलें हातीं घेतलें; आणि तें उत्तम प्रकारें पार पाडलें. तें अद्याप तसेंच चांगल्या स्थितींत आहे.

स्केरीहोर हें स्कॉटलंडच्या पश्चिमकिनाऱ्यावर आहे. हें रॉबर्ट स्टेविनच्या मुलानें बांधलें त्याला इ. स.१८३८ मध्यें सुरवात झाली. त्याच सालीं तेथें एक चाळ बांधण्यांत आली. ती आणि पुढें कामास सुरवात झाली. त्यावेळीं मजबूत म्हणून घातलेल्या लोखंडी कांबीही वाहून गेल्या, आणि एक लोहाराची ऐरणही कोणीकडच्या कोणीकडे वाहून गेली. हें काम पुरें होण्यांस सुमारें तीन वर्षें लागलीं आणि इ. स. १८४२ त हें काम पुरें झालें. हें दीपगृह १३८ फूट उंच आहे. पुढें १ वर्षानें दिवा लावण्याची व्यवस्था झाली. त्याचा प्रकाश ३० मैल जातो.

हें दीपगृहाचें काम सरकार आपलेकडे ठेवितें आणि दीपगृहें बांधून झाल्यावर तें सरकार सर्व ठिकाणीं कळवितें. इंग्रजी राज्यांत दर १६ मैलास एक दीपगृह पडतें. मुंबई जवळ कुलाबादांडीला एक फिरता दिवा आहे तो रत्नागिरीहून मुंबईला जातांना दृष्टिस पडतो.

# लाख रुपयांची अक्कल.

पूर्वी एका खेड्यांत एक गरिब ब्राह्मण रहात असे. त्याला नारायण नांवाचा मुलगा होता. तो चांगला बुद्धिमान असून शाळेंतील इतर मुलांना व शिक्षकांना फार आवडत असे. परंतु पुढें कर्मधर्म संयोगानें लवकरच त्याचा बाप वारला; त्यामुळें घरांतील सर्व जबाबदारी त्याच्यावर पडली. तेव्हां त्याला अर्थातच शाळेला रामराम ठोकून कांहीं तरी पोटाचा धंदा पाहणें भाग पडले. त्याप्रमाणें त्यानें एका शहरांत जाऊन न्यायकचेरींत उमेदवारी पत्करली; परंतु उमेदवारीवर निर्वाह होत नाहीं असें दिसल्यावर त्यानें उमेदवारी सोडली आणि दुसरा कांहीं तरी धंदा करण्याचें ठरविलें. त्यानें मग पेठेंत एक दुकान भाड्यानें घेतलें आणि त्यावर पुढीलप्रमाणें पाटी लाविली. "येथें अक्कल माफक दरानें विकत मिळेल."

नुसत्या पाटीनें काम भागणार नाहीं असें वाटून तो "येथें अक्कल माफक दरानें विकत मिळेल" असें म्हणून मोठ्यानें ओरडत असे, वाटेनें येणारे जाणारे लोक वरील शब्द ऐकून हंसत, व त्याची थट्टा करीत; परंतु त्यानें मात्र तिकडे लक्ष न देतां आपला क्रम सुरू ठेविला.

पुढें असा क्रम चालला असतां एकदां एक श्रीमंताचा मुलगा त्या वाटेनें जात होता त्यानें ते शब्द ऐकले, व त्याच्याकडे जाऊन 'अक्कल कशी शेर विकतां?' म्हणून विचारलें. 'शेरावर विकत नसते' म्हणून दुकानदार म्हणाला. बरें, हें घ्या दोन पैसे आणि द्या अक्कल. नंतर त्यानें एक लहानसा कागद घेतला आणि त्यावर "दोघांचें भांडण चाललें असतां आपण तेथें पहात उभें राहूं नये" असें लिहिलें, आणि त्या कागदाची घडी करून त्याच्या हातरुमालांत गुंडाळून दिली. रुमाल घेऊन तो मुलगा घरीं गेला, आणि बापाला म्हणाला, "बाबा, ही पहा दोन पैशांना अक्कल विकत आणली आहे." बापानें रुमाल उघडला व कागदावर लिहिलेलीं अक्षरें वाचून म्हणाला, "हें रे काय? यांत काय मोठेसें झालें? प्रत्येकाला हें माहीतच आहे. जा परत आणि ही चिठ्ठी देऊन पैसे परत आण" असें म्हणून मुलाला घेऊन तो श्रीमंत गृहस्थ दुकानाकडे आला, आणि त्याला म्हणाला, "अरे लबाडा, तूं माझ्या मुलाला फसवितोस काय? घे ही चिठ्ठी आणि आण परत दोन पैसे. नाहींतर पोलिसाला बोलावून तुला पकडतों." हें ऐकून तो ब्राह्मणाचा मुलगा म्हणाला, "मी तुमच्या मुलाला घे म्हणून जुलूम कोठें केला होता? त्यानें विकत मागितल्यावरून मी त्याला अक्कल विकत दिली. तरी तुम्हाला नको असल्यास परत घेतों. मात्र मी सांगेन त्याप्रमाणें तुम्ही लिहून दिलें पाहिजे." नंतर तो मूर्ख श्रीमान् पैशाच्या आशानें ठीक आहे म्हणाला. मग तो ब्राह्मणाचा मुलगा म्हणाला, "दोघे भांडतांना पहात रहाणें शहाणपणाचें असून त्याप्रमाणें माझा मुलगा पहात राहील" असें लिहून द्या. नंतर त्या श्रीमान् गृहस्थानें वरीलप्रमाणें लिहून दिलें व २ पैसे परत मिळाल्याबद्दल आनंद मानीत घरीं परत आला.

या गोष्टीस कांहीं महिने लोटल्यावर एके दिवशीं त्या गांवच्या राजाच्या दोघां राण्यांनीं आपल्या दासींना विणण्याची सुई आणावयास बाजारांत पाठविलें. त्या दोघी दासी एकाच दुकानांत गेल्या व सुई मागूं लागल्या. त्या दुकानांत एकच सुई होती. आणि द्या दासी मला पाहिजे, मला पाहिजे म्हणून ओरडून भांडूं लागल्या. त्याबरोबर तो दुकानदार दुकान सोडून बाहेर गेला। परंतु त्या दासींचें भांडण मात्र सुरूं होतेंच. त्याच सुमारास त्या श्रीमान्

गृहस्थाचा मुलगा त्याच वाटेनें चालला होता. त्यानें तें भांडण ऐकलें, आणि भांडण ऐकत उभा राहणें योग्य नाहीं असें मनांत आलें परंतु बापानें त्या ब्राह्मणाच्या मुलाला लिहून दिले त्या कराराप्रमाणें उभे राहणें प्राप्त असें वाटून तो मुद्दाम ह्या दासींच्याकडे गेला. ह्याला पाहातांच एक दासी म्हणाली, " बरें झालें, हें पहा मुला ही कशी मला मारती आहे, उद्यां तशी साक्ष बाईसाहेबांच्या पुढें दिली पाहिजे." दुसरी दासीही तसेंच म्हणाली, मग लवकरच तेथून सर्व मंडळी आपापल्या घराकडे गेली. घरीं गेल्यावर दासींनीं आपापल्या राणीला भांडणाची हकिगत सांगितली. ती ऐकून दोघीही राण्या एकमेकींवर रागावल्या व राजाकडे तक्रार घेऊन गेल्या. इतक्यांत दासींनीं त्या श्रीमान् गृहस्थाच्या मुलाला बोलावून आणले आणि सांगितलें कीं आमच्या वर्तानें साक्ष न दिल्यास तुला फासी देऊं. हें ऐकून तो मुलगा घाबरला, व घरीं जावून बापाला कसें करावें म्हणून विचारूं लागला. परंतु बापालाही कांहीं तोड सुचेना. शेवटीं ते दोघे बापलेक अक्कलविक्या ब्राह्मण मुलाकडे गेले व त्याला तोड विचारूं लागले. तेव्हां तो ब्राह्मण मुलगा म्हणाला, "अहो, मी सांगेन परंतु त्याला ६०० रुपये फी पडते." मग त्या बापलेकांनीं त्याचें म्हणणें कबूल केलें आणि फी दिली. "राजानें कांहींही विचारल्यास वेड्याचें सोंग पांघरून भलतेंच उत्तर द्या म्हणजे तुमचें काम होईल. त्याप्रमाणें त्या मुलाला राजापुढें उभा केल्यावर तो वेड्याप्रमाणें बरळू लागला. शेवटीं राजानें कंटाळून रागानें त्याला बाहेर हाकलून दिले. तो मुलगा आनंदानें उड्या मारीत घरीं आला. परंतु त्याच्या बापाला अशी भीति पडली कीं, माझ्या मुलानें वेड पांघरलें होतें असें राजाला समजल्यास तो कदाचित् मुलाचा शिरच्छेद करील. ह्याहीं संकटांतून पार पाडण्यास कांहीं उपाय विचारावा म्हणून तो गृहस्थ या ब्राह्मणाच्या मुलाकडे गेला आणि त्याला पुष्कळशी फी देऊन पूर्वीप्रमाणें कांहीं नवी तोड विचारली. तेव्हां त्यानें सांगितलें कीं, " ज्यावेळीं राजे साहेबांची स्वारी खुषींत असेल त्यावेळीं त्यांना खरा प्रकार सांगा, म्हणजे तुम्हाला ते क्षमा करतील." त्याप्रमाणें राजा खुषींत असतां त्या मुलानें जाऊन खरा प्रकार राजाला सांगितला, त्या बरोबर राजा हसला आणि त्याला माफी दिली. यानंतर लवकरच राजानें त्या ब्राह्मणाच्या मुलाला बोलावले व त्याला शहाणपण विकतां कां म्हणून विचारले. तेव्हां तो मुलगा म्हणाला, " हें काय विचरतां! आपल्या सारख्यांना नाहीं द्यावयाचे तर कोणाला द्यावयाचें ! मात्र फी एक लाख रुपये पडेल." राजानें एक लाख रुपये दिल्यावर त्यानें एका कोऱ्या कागदावर " पूर्ण विचार करून कोणतीही गोष्ट करावी," असें लिहून दिलें. राजानें वरील वाक्य वाचलें त्याबरोबर त्याला हें वाक्य मोठे महत्त्वाचे वाटलें आणि लगेच वाड्यांतील प्रत्येक लहान मोठ्या भांड्यावर वरील वाक्य कोरून ठेविलें. जातांना पुन्हां त्या मुलांची चांगली संभावना करून निरोप दिला.

पुढें लवकरच राजा तापानें अजारी पडला. प्रधानाच्या मनांत राजाबद्दल दुर्बुद्धि उत्पन्न झाल्याकारणानें प्रधानानें एकें दिवशीं राजवैद्यास औषधांत विष मिसळून देणेंबद्दल सांगितलें. त्याप्रमाणें वैद्यानें औषध देतांना त्यांत विष मिसळून औषधाचा पेला सहज पुढें केला. राजाची नजर पेल्यावर लिहिलेल्या वाक्याकडे गेली.

जवळ वैद्य उभा होता, त्याला वाटले राजाच्या लक्षांत आपली लबाडी आली असावी. त्याबरोबर वैद्यानें खरा प्रकार सांगून राजाची माफी मागितली. मग राजानें लगेच प्रधानास बोलावून आणून तें औषध

त्यालाच पिण्यास सांगितलें. त्यावर प्रधानानें आपला अपराध कबूल करून क्षमा मागितली. परंतु राजानें त्याच्या म्हणण्याकडे यत्किंचित् लक्ष न देतां त्यांचा शिरच्छेद केला आणि तसेंच त्या वैद्याची अप्रतिष्ठा करून हद्दपार केले. आणि त्या ब्राह्मण मुलाची खरी किंमत ओळखून त्याला आपला प्रधान केला.

---

## ऋणको व धनको.

एकदां एका गृहस्थाला पैशाची जरुरी लागली म्हणून त्यानें आपल्या मित्राजवळ कांहीं पैसे मागितले. मित्र भला होता. त्यानें त्याच्या जवळून पैसे पावल्याबद्दल पावती घेऊन पैसे दिले. कांहीं दिवस गेल्यावर तो धनको आपले पैसे मागण्याकरितां मित्राकडे गेला. त्या मित्रानें ती पैशाची पावती घेऊन तिचे तुकडे तुकडे केले आणि तें शेगडींत टाकून दिले. तो धनकोच्या अंगावर मोठ्यानें ओरडला व म्हणाला; " चल चालता हो, मी तुझे पैसे बिलकूल घेतले नाहींत. "

तो बिचारा तडक तसाच न्यायाधिशाकडे गेला आणि आपली सारी कहाणी सांगू लागला. न्यायाधिशानें त्या लबाड माणसाला बोलावून आणले व काय हकीगत झाली ती विचारली.

न्यायाधीशः–" तूं ती पावती कां फाडलीस ? "

ऋणको " महाराज, भलतच काय विचारतां आपण ? मी मुळींच पावती फाडली नाहीं. त्यांना मला कांहीं उसने दिले नव्हते. "

हें ऐकून न्यायाधिशानें धनकोला आपल्या जवळ बोलावले व त्या पावतीचा आकार केवढा होता हें विचारलें. ती एक वीत होती. हें ऐकून त्यांनीं त्याला भर कोर्टांत ती दोन वीत होती असें सांगण्यांत सांगितले.

न्यायाधीश ( ओरडून ):—ती पावती किती लांब होती ?

धनकोः—दोन वीत लांब होती साहेब. " किती खोटें सांगतो " ऋणको ओरडून म्हणतो. " छे ती विती पेक्षां लांब नव्हती. जो माणूस पावतीची लांबी खोटी सांगतो तो काय खोटें सांगणार नाहीं ?"

न्यायाधीशः–" किती हुशार आहेस तूं ! बाबा जर तूं ती पावती लिहिली नाहींस तर तुला तिचा आकार कसा माहित झाला ? तूं त्याचे पैसे सव्याज दिले पाहिजे. "

# कोंड.

## सर्वांकरितां.

| | | | | | |
|---|---|---|---|---|---|
| गोटा | यवी | लमा | क | यरा | जल |
| र | लेख | नेह | ळटी | तप | नखा |
| दम | गो | रु | जअ | लम | गां |
| हंम | लीअ | स | स | धी | था |
| स | घो | रो | दा | मे | दादा |
| लला | तीमो | नीजी | जीरां | नौ | इभा |

ह्या घरांमध्यें हिंदुस्थानातील १४ कॉंग्रेसच्या सुप्रसिद्ध पुढाऱ्यांची नांवें आहेत. एका ओळीनें पेन्सील फिरविल्यास सारीं नांवें ओळखतां येतात, क्रम सुटतां कामा नये. उत्तरास बक्षीस नाहीं.

# बारा भाऊ

एका राजाला बारा मुलें होतीं; परंतु मुलगी मुळींच नव्हती. त्यामुळें राजाला फार वाईट वाटे. एकदां तो राणीला म्हणाला कीं, जर मला मुलगी झाली तर मी या साऱ्या मुलांना रानांत हाकलून देईन; आणि माझें सारें राज्य, धनदौलत त्या मुलीला अर्पण करीन. हें ऐकून राणीला फार वाईट वाटलें व ती मोठमोठ्यानें रडूं लागली.

कांहीं दिवसांनीं राणीला एक मुलगी झाली. ती फार सुंदर होती. अशी रुपवान मुलगी पाहून राजानें आपल्या साऱ्यां मुलांना हाकलून दिलें. तीं मुलें रानांत भटकूं लागलीं. फिरतां फिरतां त्यांना एक गवताची झोंपडी दिसली. ती फार सुरेख होती. त्या झोंपडीच्या चहूं बाजूला बगीचा होता. आंत माणूस कोणी नव्हतें. ही सर्व व्यवस्था पाहून त्यांनीं येथेंच रहाण्याचें ठरविलें.

त्यांचा जो शेवटचा भाऊ होता तो अगदीं लहान असल्यामुळें कांहीं काम करूं शकत नसे. म्हणून तो दिवसभर घर सांभाळीत असे व कांहीं किरकोळ काम करीत असे. बाकीचे ११ भाऊ सकाळीं उठत, दिवसभर शिकार करीत व रात्रीच्या वेळीं घरीं येत. अशाप्रकारें दिवस घालवतां घालवतां त्यांचीं १० वर्षें गेलीं.

इकडे राजकन्या बरीच मोठी होत होती. ती रूपानें जशी सुंदर होती तशी स्वभावानें सुशील व [illegible]ागी होती. जो जो तिजकडे पाही तो तो मोहित होऊन जाई.

न ३

एकदां राजानें आपले सारे कपडे उन्हांत घालण्याकरितां बाहेर काढले होते. त्या कपड्यांत बारा लहान अंगरखेहि होते. राजकन्येनें जेव्हां हे बारा अंगरखे पाहिलें तेव्हां ती आईला हे बारा अंगरखे कोणाचे आहेत, म्हणून विचारूं लागली. आई रडत रडत म्हणाली. "बाळ! हे तुझ्या भावांचे आहेत त्या भावांना तुझ्या वडिलांनीं रानांत पाठविले आहे. त्यांची काय स्थिति आहे देव जाणे! ते जिवंत आहेत कां नाहींत कोणांस ठाऊक?" राजकन्येनें हें ऐकून म्हटले "आई अशी कां रडतेस? मी आतां जाऊन माझ्या भावांना घेऊन येते.

दुसरें दिवशीं सकाळीं ती उठली व आपल्या भावांच्या शोधार्थ निघाली. तिनें तत्पूर्वीं आपल्या भावांना कधींहि पाहिले नव्हते व कोठल्या जंगलांत ते आहेत याचीहि तिला माहिती नव्हती. तिनें पुष्कळ दिवस इकडे तिकडे चौकशी केली; परंतु व्यर्थ. अखेरीस तिला एक झोंपडी दिसली. त्या झोंपडीसमोर एक मुलगा बसला होता. त्या मुलाजवळ जाऊन ही थोडें पिण्याकरितां पाणी मागूं लागली. त्या मुलीकडे पाहून तो मुलगा फार आश्चर्यचकित झाला व मनांतल्या मनांत म्हणूं लागला "काय सुंदर मुलगी आहे." तो म्हणाला. "मुली तूं कोण व कोठून आलीस?" मुलगी म्हणाली. "मी राजकन्या असून माझ्या बारा भावांना राजानें रानांत हाकलून दिले आहे म्हणून मी त्यांच्या शोधार्थ हिंडत आहे.

त्या लहान मुलाला कळून चुकलें कीं, ही आपली

बहीण आहे. म्हणून त्यानें तिला मोठ्या आदरानें व ममतेनें वागविलें.

तेथेंच बसून बहिण व भाऊ हळूहळू गप्पागोष्टी सांगूं लागले. मुलगा म्हणाला, " हें पहा, एक मात्र कठीण आहे. जेव्हां आमच्या वडिलांनीं आम्हांला घरांतून हाकलून लावलें तेव्हांपासून जी कोणी स्त्री दिसेल तिला ठार मारावें असें ठरविलें आहे. तरी पण आम्ही तुला मारणार नाहीं." थोडा वेळ विचार करून तो मुलगा पुनः म्हणतो, " येथें एक तळघर आहे त्यांत जाऊन तूं लप " असें म्हणून त्यानें आपल्या बहिणीला तळघरांत लपविलें.

पुनः तो परत आला व आपल्या कामाला लागला इतक्यांत सायंकाळ होऊं लागली. त्याचे सारे भाऊ हातांत धनुष्यबाण घेऊन परत आले. दिवसभर श्रम करून आल्यामुळें त्यांना भूक फार लागली होती. येतांक्षणींच त्यांनीं खायला मागितलें. त्याबरोबर त्या लहान भावानें त्यांना जेवावयास वाढलें. ते जेवावयास बसल्यावर लहान भाऊ म्हणतो, " आज एक गंमत तुम्हांला सांगावयाची आहे." सर्वजण मोठ्या आतुरतेनें काय काय म्हणून विचारूं लागले. तो लहान भाऊ म्हणाला, " प्रथम तुम्ही कोणत्याहि स्त्रीला मारणार नाहीं असें कबूल करा."

तें ऐकून सर्वांनीं या गोष्टीस संमती दिली.

तेव्हां त्यानें आपल्या लहान बहिणीला तळघरांतून बाहेर काढलें. तिला पाहून सर्वजण म्हणाले " किती सुंदर मुलगी आहे ही ! कुठें मिळाली रे ही तुला ?"

जेव्हां त्यांना ही आपली बहीण आहे असें समजलें तेव्हां ते सारेजण तिला डोक्यावर घेऊन नाचूं लागले. त्यांचा आनंद गगनांत मावेना.

आतां ही त्यांची बहीण घरांतील कामकाज पाहू लागली. धाकटा भाऊ जंगलांत हिंडे, व लांकूडफाटा व इतर सामुग्री घेऊन येई. अशाप्रकारें ते सारेजण आनंदांत दिवस घालवीत होते. एके दिवशीं हिंडतां हिंडतां ही मुलगी कांहीं सुंदर फुलझाडांजवळ आली. तेथली ती सुंदर टवटवीत व सुवासिक फुलें पाहून तिला वाटलें कीं, आपण यांतलीं कांहीं फुलें तोडावीं. असा विचार मनांत येऊन तिनें कांहीं फुलें तोडलीं.

ज्या घरांत हीं फुलें होतीं तें घर एका हडळीचें होतें. त्या घरांत ही हडळ रहात नव्हती; परंतु जाते वेळीं तिनें आसपासच्या वस्तूवर जादूटोणा करून ठेवला होता. तीं फुलें तोडतांच त्या मुलीजवळ एक म्हातारी आली व म्हणाली " हें काय ! हें काय ! तूं कोणाचीं फुलें तोडलीस ? हीं फुलें तोडतांच तुझ्या भावांवर जादूची क्रिया होऊन ते कावळे बनले गेले "

त्यावेळीं तिनें आपले सारे भाऊ कावळे झालेले व काव काव ओरडत असलेले पाहिलें.

राजकन्येला हें पाहून फार वाईट वाटलें व ती मोठ्यामोठ्यानें रडूं लागली. तें पाहून ती म्हातारी म्हणाली, हें पहा मी एक सांगते तसें करशील तर तुझे सारे भाऊ पुनः मनुष्य होतील. तें काम फार कठीण आहे. काय, तूं करशील काय ? "

" होय " असें चटकन राजकन्येनें उत्तर दिलें.

ती म्हातारी म्हणाली, " तूं सात वर्षेपर्यंत कोणाशीं बोलायचें नाहीं अगर हासायचें नाहीं, असें जर करशील तर तुझे भाऊ पुनः मनुष्य होतील."

राजकन्येनें हें कबूल केलें. त्या दिवसापासून तिनें मौनव्रत स्वीकारलें. ती आपली दरवाजाजवळ बसे व आपला वेळ घालवी.

अशाप्रकारें कांहीं वर्षें घालविल्यावर कोणी एक राजा शिकार करतां करतां तेथें आला. त्यानें या सुंदर मुलीला पाहिलें व तो अगदीं मोहून गेला. त्यानें तिला मजबरोबर लग्न करतेस कां म्हणून [अपूर्ण]

रलें, परंतु ती उत्तर देईना. तिनें मानेनें नुसतें "हो" असें म्हटलें. राजानें तिला आपल्या घोड्यावर बसविलें व आपल्या राज्यांत नेलें. तेथें दोघांचा विवाह झाला. लग्न झाल्यावर देखील ही मुलगी कोणाबरोबर बोलत नसे. सर्वजण हिला मुकी म्हणत. त्या राजाची दुसरी एक राणी होती. ती हिच्यावर फार जळफळत असे. ती रोज राजाला म्हणे, "आपण कसलें हें लग्न केलेंत ! ह्या मुलीला बोलतां येत नाहीं, कीं हसतां येत नाहीं. ही कोणी तरी चेटकी आहे. हिला येथून हाकलून द्या."

कांहीं दिवसपर्यंत राजा या म्हणण्याकडे लक्ष देत नव्हता. या राजकन्येच्या मौनव्रताची सात वर्षें भरत आलीं. एकदां सारे लोक राजाला म्हणाले, "महाराज ही नवी राणी चेटकी आहे. ही काय करील याचा नेम नाहीं. हिला घरांतून घालवून द्या."

राजा म्हणाला, "ठीक आहे, मी सांगतों तसें करा. रानांतून लांकडें घेऊन या. चिता रचा व हिला जाळून टाका."

हें ऐकतांच सारे लोक गेले व त्यांनीं लांकडें आणलीं व तयारी केली. त्यांनीं चिता पेटवली व राणीला आंत टाकण्याची वेळ आली.

त्यावेळीं सात वर्षें पुरीं भरलीं व १२ कावळे काव काव करीत त्या ठिकाणीं आले आणि त्यांचे सुंदर १२ राजपुत्र झाले.

त्यांनीं ती आग विझवली व राजाला सारी हकीकत सांगितली. राजा फार खुष झाला. त्यांनीं राणीचा मोठा आदरसत्कार केला व त्या बारा भावांना आपल्या वडिलांच्या राज्यांत मानमरातबानें पोहोंचते केलें.

---

## लपलेला चोर.

एकदां एका माणसानें आपल्या घरांत येऊन लपलेला चोर पाहिला. तो चोर चांगला धष्टपुष्ट होता आणि मालक अगदीं काटकुळा होता. आपण जर या चोराबद्दल आरडाओरड केली तर हा आपल्यावर चांगला सूड उगवील हें लक्षांत आणून मालकानें त्या चोराला हाकलून लावण्याची एक युक्ति काढली. त्यानें आपल्या बायकोला पाण्याचा एक पोहरा आणावयास सांगितलें. तो त्या पोहऱ्यांतील पाणी चहूंकडे टाकूं लागला.

त्यांतील कांहीं पाणी चोराच्या अंगावर शिपडलें जाण्याची त्यानें खबरदारी घेतली.

"हें काय करतां आहां !" असें आश्चर्यचकीत होऊन त्याच्या बायकोनें विचारलें. त्यावर नवऱ्यानें तिच्या अंगावर खूप पाणी शिंपडलें. तिची आतां पूर्ण खात्री झाली कीं, आपल्या नवऱ्याला वेड लागलें आहे. म्हणून तशीच ती धांवत गेली आणि शेजाऱ्यांना मदतीस बोलावूं लागली.

ते म्हणाले "तूं आपल्या बायकोच्या अंगावर पाणी कां शिंपडीत आहेस ?"

नवरा म्हणाला, "काय, ती तक्रार करते काय ? त्या फरताळाआड लपलेल्या चोराच्या अंगावर मी इतकें पाणी शिंपडलें तरी तो हूं कां चूं करीत नाहीं आणि हिचीच एवढी तक्रार कां ?" त्याच्या शेजाऱ्यांना सारा प्रकार तात्काळ कळून आला. त्यांनीं त्या चोराला पकडला, चांगला चोपला, आणि तुरुंगांत टाकला.

---

# प्रामाणिक शेतकरी.

एकदां दोन प्रवाशी फिरतां फिरतां एका शेतकऱ्याच्या घरीं आले, आणि रात्रभर राहाण्यास जागा मागूं लागले. शेतकरी सज्जन होता, त्यानें दोघांचें स्वागत उत्तम प्रकारें केलें. सकाळ झाल्यावर ते वांटसरू आपापल्या मार्गानें निघून गेले. तथापि जातांना ते एक बाजरीचें पोतें विसरले.

त्या शेतकऱ्यानें प्रवाशांची पुष्कळ दिवसपर्यंत मोठ्या आतुरतेनें वाट पाहिली. अखेरीस ते परत येणार नाहींत अशी खात्री वाटून त्यानें आपल्या चाकरांना ती बाजरी पेरण्यास सांगितलें. आणि बाजरी पिकल्यावर त्यानें ती भरून ठेवली.

जवळ जवळ वर्ष उलटून गेल्यावर ते वांटसरू परत शेतकऱ्याकडे आले. "आपण बहुत करून त्या बाजरीकरतां आलां असाल?" असा प्रश्न शेतकऱ्यानें विचारला. "छे! छे!" प्रवाशी म्हणाले, "आम्ही ती गोष्ट अगदीं विसरून गेलों. ती बाजरी आतां किडून गेली असेल नाहीं बरें?" शेतकरी म्हणाला "छे, तुमची बाजरी मी अगदीं जपून ठेवली आहे." नंतर त्यानें त्यांना आपल्या कोठारांत नेलें व त्या बाजरीच्या अनेकपट बाजरी त्यांना दिली.

---

# विचार करण्यालायक वचनें.

१ सद्भाग्यापेक्षां सत्कीर्ति मिळवा, आणि सोन्यारुप्याऐवजीं प्रेम संपादन करा.

२ ज्यांचें अंतःकरण शुद्ध झालें आहे ते पुरुष धन्य होत; कारण त्यांना ईश्वरप्राप्ति खात्रीनें होईल.

३ दुराचारापासून दूर सरा, सत्कर्म करा आणि सुख व शांतीच्या मागें लागा.

४ एका माणसाला दोन धन्यांची मर्जी सांभाळतां येत नाहीं.

५ माणसांची आज्ञा पाळण्याऐवजीं ईश्वराची आज्ञा पाळा.

६ आपल्यापेक्षां श्रेष्ठ असणाऱ्या माणसांची संगती धरा.

७ सज्जनांना अंधकारांतसुद्धां उजेड दिसतो.

८ दुसऱ्यांना खूष करावयाचें असल्यास तुम्ही स्वतःस विसरले पाहिजे.

९ स्वतंत्र होण्याकरितां मनुष्य पैशाच्यामागें लागतो. परंतु अधिक बंधनांत पडतो. त्याऐवजीं त्यानें आपलें वर्तन सुधारावें.

१० सत्यप्रीती ही स्वतःच्या मताच्या प्रीतीहून फार भिन्न आहे.

११ मनुष्याच्या दारावर सुसंधी सारखा आघात करीत असते. त्याला इच्छा होईल तेव्हां त्यानें तिला आंत घ्यावें.

१२ जें अत्यंत वाईट चाक असतें त्याचाच जगांत मोठा आवाज होतो.

# पांच माकडांची गोष्ट.

एकदां पांच माकडांनीं मिळून एक नीटनीटकें घर बांधलें. तें घर पाहून सर्वांना आनंद होत असे. परंतु त्या घरांत निजण्या बसण्याचेंसामानसुमान नसल्यामुळें त्या घराचा व्हावा तसा उपयोग होत नव्हे. तेव्हां सर्वांनीं जरुर तें सामान आणण्याचा विचार चालविला.

प्रथम सर्वांत उपयुक्त वस्तू म्हणजे बिछाना. तीं माकडें सर्व काम करून दमलीं होतीं तेव्हां सहाजिकच त्यांना निजण्याची इच्छा झाली. पहिलें माकड म्हणतें, "आपल्याला जंगलांत जाऊन लांकडें तोडून आणलीं पाहिजे. त्यांच्या तुळ्या बनविल्या पाहिजेत. तेव्हां मजबरोबर कोण येतो?"

दुसरें माकड म्हणतें, "छे, मी नाहीं. मी फार दमलों आहे."

तिसरें म्हणतें, "मी लंगडा आहे."

चवथें म्हणतें, "मी अशक्त आहे."

पांचवें म्हणतें, "मला फार झोंप येत आहे."

हा सर्व रागरंग पाहून पहिलें माकड जंगलांत गेलें, तेथील लांकडें त्यानें तोडलीं आणि पलंगाकरितां लांकडें आणलीं. त्यानें तीं सारीं लांकडें तासलीं, त्यांची नीटनेटकी व्यवस्था केली व मग म्हणालें, "आतां आपल्याला तारेचा पलंग करण्याकरितां तारा आणाव्या लागतील. त्या कोण आणील?"

हें ऐकतांच त्या चौघांनीं पूर्वीप्रमाणें तक्रारी सांगितल्या. तेव्हां तें पहिलें माकड नाइलाजानें बाजारांत गेलें, आणि तारा घेऊन आलें.

पुढें त्यानें त्या साऱ्या तारा नीट विणल्या व म्हणालें, "आतां यावर टाकण्यास आपल्याला बिछाना पाहिजे, तेव्हां त्याकरितां भुसा कोण घेऊन येतो?"

हा प्रश्न ऐकतांच त्या चारी माकडांनीं पूर्वीप्रमाणेंच उत्तरें दिलीं.

त्यामुळें तें गरीब माकड तसेंच शेतांत गेलें व धान्याचा भुसा घेऊन आलें. तो भुसा त्यानीं नीट एका पोत्यांत घातला, व तें पोतें पलंगावर टाकलें.

पुढें तें माकड म्हणालें, "आतां आपल्याला उशी पाहिजे. तेव्हां पिसें गोळा करून कोण आणतो?"

पहिलें माकड म्हणतें, "छे बुवा, आपण दमलों आहों."

दुसरें म्हणतें, "आपला पाय मोडला आहे."

तिसरें म्हणतें, "आपण अशक्त झालों आहे."

चवथें म्हणतें, "मला झोंप येत आहे."

तेव्हां तें पहिलें माकड पुनः बाहेर गेलें, व पिसें गोळा करून घेऊन आलें. नंतर त्यानें त्याची छानदार उशी केली.

ती उशी गादीवर टाकून तें माकड म्हणतें, "आतां सारी तयारी झाली. फक्त आपल्याला पांघरुणाकरीतां एक चांगली घोंगडी पाहिजे, तेव्हां मेंढीची लोंकर आणून उबदार कांबळें कोण विणील?" ह्यालाहि त्यांनीं पूर्वीचीच उत्तरें दिलीं.

"बरें तर" असें म्हणून तें माकड गेलें आणि त्यानें सारी सामुग्री आणली व त्याचें कांबळें विणलें.

पुढें तें कांबळें गादीवर टाकून माकड विचारतें,

"आतां यावर कोण निजणार?" हें ऐकतांच दुसरें माकड म्हणतें, "मी निजणार" तिसरें लंगडें म्हणतें, "मी निजणार."

चवथें अशक्त माकड म्हणतें, "मी निजणार."

आणि पांचवें झोंपाळू माकड म्हणतें, "मी निजणार."

हें ऐकून पहिलें माकड म्हणतें, "छे! छे! मी तुम्हांला निजूं देणार नाहीं, कारण मी एकट्यानें सारें काम केलें आहे; तुम्ही कांहींच केलें नाहीं." असें म्हणून त्यानें त्या मऊ बिछान्यावर उडी मारली आणि आपल्या अंगावर उबदार पांघरूण ओढून घेतलें, आणि सर्व रात्रभर शांतपणें गाढ झोप घेतली.

# शृंगेरी.

शृंगेरी येथें श्रीमज्जगद्गुरुंची गादी असून हें ठिकाण दक्षिण हिंदुस्थानांत आहे. आपल्या देशांत जीं पवित्र ठिकाणें मानलीं जातात त्यापैकीं शृंगेरी हें एक आहे. शृंगेरीस दर वर्षी पुष्कळ प्रवाशांची गर्दी होते. हें ठिकाण सृष्टीसौंदर्याकरितां किंवा शिल्पकलेबद्दल प्रसिद्ध नसून धार्मिक पिठ म्हणून याला महत्त्व आहे. शृंगेरी हें खेडें तुंगभद्रा नदीवर वसलें आहे. हें खेडें म्हणजे एक लांबच लांब रस्ता असून तो शृंग-गिरि नांवाच्या टेकडीला वळसा घालून करण्यांत आला आहे. शृंगेरीमध्यें १२० देवळें असून तेथील प्रत्येक देवळांत पूजाअर्चा चालू असतें. खेड्याच्या वरच्या भागीं मठ असून त्याच्या आसपास पुष्कळ देवळें आहेत. गुरुजींची वस्ती ९ महिने नदीपलीकडे असलेल्या बंगल्यांत असते व तीन महिने ते या खेड्यांत येऊन रहातात. ऐतिहासिक दृष्ट्या शृंगेरी म्हणजे एक महत्त्वाचें ठिकाण आहे.

दशरथ राजानें केलेल्या यज्ञाच्या वेळीं असलेला गुरु जो ऋष्यशृंग तो या ठिकाणीं गुरु होण्यापूर्वी रहात असे, आणि त्यानें या ठिकाणींच मोठा यज्ञ केला. ऋष्यशृंग हा आईखेरीज जन्म पावला व कोणत्याहि स्त्रीचे दर्शन न घेतां वाढला. तेथील जवळच्या एका राज्यांत दुष्काळ पडला होता. तेव्हां त्या ठिकाणच्या राजाला असें सांगण्यांत आलें कीं, जर ऋष्यशृंग त्याच्या शांता नांवाच्या मुलीबरोबर लग्न करील तर पर्जन्यवृष्टी होऊन सर्वत्र अबादानी होईल. हें ऐकून त्या राजानें आपल्या देशांतील सुंदर सुंदर स्त्रिया त्याचें चित्त आकर्षण करण्याकरितां पाठविल्या. या स्त्रिया पाहून तो फार मोहून गेला व त्यानें त्या स्त्रियांबरोबर लोमपाद राजाच्या राज्यांत जाण्याचें व त्याच्या मुलीबरोबर लग्न लावण्याचें कबूल केलें.

लग्नानंतर दशरथ राजानें ऋष्यशृंगाकडून यज्ञ करविला.

परंतु आठव्या शतकापासून या ठिकाणाला विशेष महत्त्व प्राप्त झालें; आद्यशंकराचार्यांनीं या

ठिकाणीं आपला मठ स्थापन केला. श्रीसरस्वतीनीं शंकराचार्यांना येथें मठ स्थापण्यास सांगितलें असें म्हणतात. शंकराचार्य हे अद्वैत वेदांताचे पुरस्कर्ते होते. या आपल्या तत्त्वज्ञानाचा सर्व देशभर प्रसार व्हावा म्हणून त्यांनीं चारहि दिशेला मठ स्थापिले. मठ कोठें स्थापन करावेत याविषयीं विचार करीत असतां ते तुंगानदीच्या कांठीं आले. तेथें त्यांनीं एका प्रसूत होत असलेल्या बेडकीवर आपली फडा उभारून सावली करीत असलेला नाग पाहिला. हा प्रकार पाहून आचार्य थक्क झाले व त्यांनीं हें ठिकाण मठस्थापनेकरितां पसंत केलें.

ही कथा पुढील पिढीला कळावी म्हणून त्या नदीच्या कांठीं या देखाव्याचें एक देऊळ बांधलें गेलें.

आठव्या शतकांत या गादीची स्थापना झाली व त्या गादीवर अद्यापपर्यंत कोणानाकोणा आचार्यांची स्वारी अधिष्ठित होत असते. आद्यशंकराचार्यांपूर्वीं या ठिकाणीं एक बुद्धांचा मठ होता. ह्या मठांतील भिक्षूंचा वाग्युद्धांत आचार्यांनीं पाडाव केला व तेथें आर्यधर्माची स्थापना केली.

येथील बुद्धाच्या मूर्तीचा विध्वंस न करतां ती येथून एका दूरच्या ठिकाणीं ठेवण्यांत आली. या मठाला कायमच्या जमिनी लाऊन दिल्या असून त्या जमिनीच्या उत्पन्नावर मठाचा कार्यभाग होतो या ठिकाणीं जैनांचीं सुद्धां देवालयें आहेत. अन्यधर्मीय राजांनीं या मठाला कोणत्याहि प्रकारचा अपाय केला नाहीं. टिपू सुलतानाला ह्या मठाविषयीं आदर असे व हा मठ आपल्या राज्यांत असल्यामुळें त्याला अभिमान वाटे.

तेथील एका टेकडीवर मल्लीकार्जुनाचें देऊळ आहे. हें लिंग स्वयंभू आहे असें म्हणतात. हें लिंग फार दिवस लोकांच्या लक्षांत आलें नाहीं. परंतु एका चमत्कारिक प्रकारामुळें त्याचें अस्तित्व उघडकीस आलें. एका गवळ्याची गाय या टेकडीवर चरावयास जाई परंतु संध्याकाळीं ती आपलें दूध काढूं देत नसे. असें वारंवार पाहून तो गवळी एके दिवशीं त्या गाईबरोबर गेला व सर्व दिवसभर तिच्या मागोमाग राहिला. त्या गाईनें आपलें सारें दूध एका दगडावर ओतलें. त्या दगडाकडे तो निरखून पाहूं लागला तेव्हां त्याला तें लिंग आहे असें समजून आलें. त्यानें ही बातमी राजाला सांगितली त्याबरोबर राजानें तेथें एक देऊळ बांधलें व त्या देवळाकरीतां सालीना ५००० रुपये सारा येणारी जमीन इनाम म्हणून बाजूला ठेवली. या खेरीज त्या गवळ्याला राजानें मोठें बक्षीस व जहागीर दिली. आसपासचे लोक या देवाला नवस करतात. व तो दुष्काळाचे वेळीं पावतो असें म्हणतात.

या खेरीज त्या टेकडीवर गणपतीचें एक देऊळ आहे. आचार्यांना कोठेंहि गणपतीची मूर्ति न सांपडल्यामुळें त्यांनीं हळदीनें एका दगडी खांबावर गणपतीची प्रतिमा काढली. ही प्रतिमा खरोखरच मोठी व स्पष्ट होऊं लागली. हें पाहून आचार्य आश्चर्यचकीत झाले. आतां त्या प्रतिमेकडे पाहिलें तर ती उठावदार दिसते. ज्या ठिकाणीं हा गणपती आहे तो दगडाचा भाग वाजवला तर पोकळ आवाज येतो व बाकीच्या भागाचा कणखर आवाज येतो.

या मठाचा संबंध विजयानगरच्या राज्याशीं होता असें म्हणतात. कारण त्या राजाचा प्रधान माधव हा आद्यआचार्यांचा शिष्य होता.

कांहीं वर्षांपूर्वीं सध्याच्या आचार्यांचे गुरु समाधिस्त झाले. गुरुंनीं मरतेंससयीं सांप्रतच्या आचार्यांसच गादीवर बसवावे अशी इच्छा प्रदर्शित केली. ते जरी वयानें लहान होते तरी म्हैसूरच्या महाराजांनीं गुरुजींच्या इच्छेप्रमाणें त्यांनाच मठाधिपती केलें.

आचार्यांना एकदां सर्व देशभर प्रवास करावा लागतो. या प्रवासांत त्यांची ठिकठिकाणीं पूजाअर्चा होते, त्यांना गुरुदक्षिणा मिळते व मोठमोठे उत्सव होतात. या गुरुदक्षिणेपैकीं कांहीं भाग गोरगरिबांना वाटण्यांत येतो व कांहीं मठाकरितां खर्च होतो. आचार्यांच्या अंगावर मोठमोठे सोन्यामोत्याचे दागिने असतात. शृंगेरीच्या मठाधिपतींना पेशव्यांनीं दागिने दिले होते असें म्हणतात. हे आचार्य जन्मभर अविवाहित रहातात. ते संन्यासवृत्तीनें असतात आणि ब्रह्मचर्याचें कडक रीतीनें पालन करतात.

---

# वाघाच्या तोंडावर पट्टे कां असतात ?

वाघानें एकदां एक ससा झाडाखालीं बसलेला पाहिला व त्यानें सशाला तूं काय करतोस, असें विचारलें.

ससा म्हणाला, " मी माझ्या आजाच्या घंटेवर पाळत ठेवीत आहे. "

" ती घंटा कोठें आहे ? " वाघानें विचारलें.

सशानें एका झाडावरच्या वाटोळ्या वस्तूकडे बोट दाखविलें व म्हणाला,

" ती पहा झाडावर आहे. आपली इच्छा असेल तर आपण ती वाजवा ! परंतु अगोदर मला दूर जाऊं द्या. कारण आजोबांच्या घंटेचा आवाज ऐकला कीं मला रडूं कोसळतें. "

असें म्हणून तो ससा पळाला.

पुढें वाघ झाडावर चढला आणि ससा दूर गेलेला पाहून त्यानें त्या घंटेला आपल्या पंजांनीं एक टोला लगावला. परंतु त्याबरोबर ती घंटा फुटली व लवकरच वाघाला कळून आलें कीं, ती घंटा नसून गांधीलमाशांचें पोळें आहे. पोळें फुटतांच हजारों माशा बाहेर आल्या व त्यांनीं वाघाला अर्धमेलें करून टाकलें.

त्या वेळेपासून वाघाच्या तोंडावर पट्टे आहेत असें म्हणतात.

---

# जादूचे तीन प्रयोग.

### प्रयोग पहिला.

दोन सारख्या आकाराचे कांचेचे प्याले घ्यावेत. एकामध्यें पाणी घ्यावें व दुसऱ्यामध्यें पाण्यापेक्षां कमी विशिष्टगुरुत्व असलेलें रंगीत पातळ द्रव्य घ्यावें.

प्याले अगदीं सारख्या आकाराचे असावेत व ते अगदीं कांठोकांठ भरावेत. नंतर एक पोस्टाचें कार्ड घ्यावें; व तें पाणी असलेल्या प्याल्यावर ठेवावें. कार्ड घट्ट धरून पाण्याचा प्याला उलटा करून तो रंगीत प्याल्यावर घट्ट बसवावा. दोन्ही प्याल्यांच्या कडा एकमेकांवर घट्ट बसल्या म्हणजे तें कार्ड हळूच काढून घ्यावें.


लगेच दोन प्याल्यांतील पदार्थ आपल्या जागा बदलूं लागतात. रंगीत पदार्थाचा एक लहानसा

कारंज जणूं काय उडत आहे असें वाटतें. या दोन पदार्थांचें मिश्रण व्हावयाचें नाहीं. कांहीं वेळानीं दोन्ही द्रव-पदार्थ उलट झालेले दिसून येतील.

याचें कारण शोधून काढणें कठीण नाहीं. पाणी रंगीत पदार्थापेक्षां जड असल्यामुळें खालीं जाऊं लागतें.

### प्रयोग २ रा.

पूर्वीप्रमाणेंच दोन प्याले घेऊन त्यांत पाणी भरावें आणि ते एकमे[कावर] कावर पालथे घालावे, पुढें पुर्वीप्रमाणेंच कार्ड काढून घ्यावें, किंवा दोन्ही प्याले पाण्यांत बुडवून त्यांचे कांठ एकमेकांवर ठेऊन वर घ्यावेंत.



नंतर वरचा प्याला किंचित हलवावा व दोहोंमध्यें थोडी भेग राहील अशी व्यवस्था करावी. पूर्वीप्रमाणेंच एकादे रंगीत पातळ द्रव्य घ्यावें. ( तांबडें रॉकेल तेलासारखें ) तें द्रव्य प्यालयाच्या वरच्या भागावर ओतावें. ओतणें सुरू झालें म्हणजे त्या रंगीत पदार्थाचा कांहीं भाग मोकळ्या जागेंत शिरून वरच्या प्याल्यांत जाईल

### प्रयोग ३ रा .

या प्रयोगास दोन ग्लास व पाणी लागतें. एक ग्लास टेबलावर ठेवावा, व त्यांत उकळणारें पाणी घालावें. त्यावर एक पोस्टकार्ड ठेवावें. नंतर दुसरा रिकामा ग्लास त्या कार्डावर उलटा ठेवावा. थोड्या वेळानीं खालच्या ग्लासांतील साऱ्या वाफा कार्डामधून निघून वरच्या ग्लासांत जातील. कार्डामध्यें बारीक बारीक छिद्रें असल्यामुळें अशा प्रकाची अदलाबदल होऊ शकते. परंतु दुसरा एखादा लांकडासारखा पदार्थ मध्यें ठेवला तर एका ग्लासांतील वाफ दुसऱ्या ग्लासांत जाणार नाहीं.

---

## गोट्या कशा कराव्या.

तीन मोठाले चमचे मीठ घेऊन तें एका पत्र्यावर घालून चुलीवर ठेवावें. आणि पुष्कळ जळजळीत होईपर्यंत तसेंच राहूं द्यावें.

एक मोठा चमचा मैदा घ्यावा व तितकेंच कोमट पाणी त्यांत मिसळावें. मीठ फार कढत झालें म्हणजे तें या मिश्रणांत टाकून द्यावें. हें मिश्रण सारखें थंड होईपर्यंत ढवळावें व तें हाताला चिकट लागेपर्यंत मळावें. पुढें त्यांतून एक गोळा घ्यावा व त्याला गोटीचा आकार द्यावा. साऱ्या मिश्रणाच्या गोट्या केल्यावर त्या ऊबदार जागीं एक दोन दिवस ठेऊन द्याव्यात. हवेंतील ओलावा मिठाला लागला म्हणजे गोटी फुटते, याकरितां त्या गोटीवर थोडेसें मेण लावावें. हें मेण लावल्यावर गोट्या आणखी एक दिवस वाळत ठेवाव्यात.

---

# मुंग्याभक्षक प्राणी.

हा प्राणी आपली उपजीविका मुंग्या व इतर किडे खाऊन करतो म्हणून त्याला वरील नांव पडलें आहे. ह्या प्राण्याच्या अंगावर फार केस असतात, याचें तोंड व डोकें लांबट असतें, याची जीभ किड्यांसारखी असते आणि दातांचा पत्ताच नसतो. याच्या तोंडाला एक भोंक असून त्यामधून हा प्राणी आपली जीभ बाहेर काढतो, व भक्ष्य खातो. याची शेपूटहि फार लांब असतें. याच्या पुढील पायाचें मधलें बोट फार लांब असतें. त्याचा पंजा मोठा असतो व पुढें वाकवलेला असतो.



काढतो. ह्याला एकलकोंडे रहाण्याची संवय असते. हे मुंग्याच्या वारुळावर हल्ला करून त्यांचें भक्षण करतात. मुंग्या बाहेर येतांच हा प्राणी त्यांचा एकदम स्वाहा करतो. याची जीभ विद्युत्गतीनें आंत व बाहेर जात येत असते.

मादी आपलें पिलूं पाठीवर घेऊन हिंडते. हें पिलूं पुष्कळ महिनेपर्यंत आपल्या आईच्या अंगावर असतें. हा प्राणी निरुपद्रवी असतो. परंतु त्याला फार छळले तर तो आपल्या पुढच्या पंजांनीं माणसाला घट्ट आवळून धरतो. याला ठार मारणें फार कठीण आहे.



या प्राण्यांची दुसरी एक जात आहे. ती जात आकारानें फार मोठी असते. त्याचे अवयव वर वर्णन केल्याप्रमाणेंच परंतु जरा मोठ्या प्रमाणांत असतात एवढेंच. त्याचे डोळे फार बारीक असतात, आणि कान लहान व उभे असतात. त्याच्या शरीराचा पुढचा भाग चिंचोळा असतो.

हे प्राणी दक्षिण व मध्य अमेरिकेंत सांपडतात. परतु ते रात्रीच्या वेळीं बाहेर पडत असल्यामुळें क्वचित् दृष्टीस पडतात. यांची वस्ती नदीच्या कांठीं ओलसर जागीं असते. हा प्राणी सारा दिवस झोंपेंत

कारण त्याची कातडीं अगेदा मजबूत असतें. त्यांच्या डोक्यांवर केवढाहि आघात केला तरी त्यांना त्यापासून फारशी इजा होत नाहीं. यापेक्षां एक लहान जात आहे याला 'टामांडुआ' असें म्हणतात. हा प्राणी वरील प्राण्यांच्या निम्मा असतो. हा प्राणी निवळ रात्रींचर नाहीं. तो दिवसाहि हिंडतो फिरतो. हा मुंग्याखेरीज मध खातो असें म्हणतात. हा पुष्कळ ठिकाणीं दृष्टीस पडतो. तो झाडाच्या टोंकावर जाऊन बसतो. याचा कोणी पाठलाग करूं लागले तर तो उड्या मारून पळून जातो.

यांची तिसरी एक जात आहे. ह्या जातीचा प्राणी घुशीपेक्षां मोठा नसतो. याचे केस वगैरे फार मऊ रेशमासारखे असतात. याला दोन बोटाचा प्राणी असें म्हणतात. हा अत्यंत ऊष्ण प्रदेशांत सांपडतो. हा २०० फूटांच्या डोंगरावर चढून जातो. हा सहजासहजी कोणाच्या दृष्टीस पडत नाहीं. सर्व दिवसभर हाहि निजून रहातो. याला आपल्या शेपटीच्या मदतीनें फार जलद चढतां येतें. आपलें भक्ष्य पकडल्यावर तो तें आपल्या पंजांनीं तोंडांत टाकतो.



# मयूरासनांतील हिरा.

१६५८ च्या सुमारास अवरंगजेब बादशहानें स्वतःकरितां मयूरासन तयार केलें. यालाच तकत्—इ— ताउस म्हणत. याचा आकार मोरासारखा होता व याच्या पिसाऱ्यांत दोन चकाकणारे हिरे होते. त्यापैकीं एक कोहिनूर होता असें म्हणतात परंतु त्यावर कोणाचा विश्वास नाहीं. दुसरा हिरा कोहिनूर नांवाचा होता. याचा आकार कबुतऱ्याच्या अंड्याएवढा होता व त्याचा रंग पिवळा असून तो चकाकत असे. अशाप्रकारें १०० वर्षें गेल्यावर इराणच्या नादीरशहानें दिल्लीवर स्वारी केली. त्यांनीं हें मयूरासन बळकावलें. तो हें आसन व हा हिरा सर्वांना मोठ्या अभिमानानें दाखवीत असे. प्रसिद्ध फ्रेंच प्रवाशी टॅव्हर्निअर यानें हा हिरा पाहिला होता. त्यानें या हिऱ्याच्या पाण्याची व त्याच्या तेजाची अपरंपार स्तुति केली.

पुढें नादीरशहाचा खून झाला. त्यावेळीं दिल्लीच्या जवळ एक फ्रेंच लष्करी अधिकारी होता. त्यानें या हिऱ्याची कीर्ति ऐकली होती. तो अधिकारी चोरटा होता.

एके दिवशीं रात्रीं मोठा सोसाट्याचा वारा व पाऊस पडत असतां हा राजवाड्यांत फकीराच्या वेषानें गेला. रात्रीच्या वेळीं सामसूम असलेली पाहून त्यानें हा हिरा मयूरासनांतून उपटून घेतला व तेथून पळ काढला.

पुढें हा चोरटा मद्रासेस गेला व तेथें त्यानें कोहिनूर हिरा ३०००० रुपयांस एका इंग्रज गृहस्थास विकला.

त्या गृहस्थाला आपला चांगला लाभ झाला ही गोष्ट माहित होती व हा चोरीचा माल असावा अशीहि त्याची खात्री झाली. नंतर हा इंग्रज विलायतेस गेला व तेथें त्यानें तोच हिरा १८०००० रुपयांस एका यहुद्याला विकला.

त्या सुमारास खोजे राफेल नांवाचा प्रख्यांत जवाहिरी इंग्लंडमध्यें होता. हा आमस्टार्डमचा व्यापारी असे. त्याला ही वातमी कळतांक्षणींच त्यानें तो हिरा पुष्कळ पैसा देऊन खरेदी केला. त्यानें त्याबद्दल काय दिलें हें माहीत नाहीं.

त्यावेळीं प्रिन्स ऑर्लाफ हा रशियाच्या राणीच्या प्रीतींतून उतरला होता व आमस्टार्डमला येऊन राहिला होता.

हा ऑर्लाफ फार देखणा असल्यामुळें रशियाच्या राणीचें प्रेम त्याजवर जडलें. पुढें त्या राणीला ऑर्लाफपासून एक मुलगा झाला. हा ऑर्लाफ रशियावर राणीच्या तर्फे बरीच वर्षे राज्य करीत होता.

परंतु या राणीला अखेरीस त्याचा तिटकारा आला व तिचें प्रेम एका दुसऱ्या माणसावर बसलें. त्यामुळें ऑर्लाफला तेथून निघणें भाग पडलें. या प्रकारामुळें तो अतिशय रागावला व त्यानें सर्व युरोपभर प्रवास केला. त्याला अशी आशा वाटत होती कीं, आपण एक दिवस पुनः राणीची मर्जी संपादन करून त्या नव्या माणसाला चांगली अद्दल घडवूं.

या वेळीं तो जवाहीर तेथें आला आणि ऑर्लाफली राणीला हिऱ्याचें किती वेड आहे हें माहीत असल्यामुळें त्यानें त्याजपासून तो हिरा खरेदी केला. त्यानें त्या हिऱ्याबद्दल १३॥ रुपये दिले व वर्षास ६०००० रुपये देत जाऊं असें क़बूल केलें.

हा हिरा घेऊन तो राणीकडे गेला. त्यावेळीं राणीला त्या नव्या माणसाचा तिटकारा आला असल्यामुळें तिनें ऑर्लाफचे आगतस्वागत केलें. तिनें तो हिरा पाहातांच तिला ऑर्लाफचें अधिकच वेड लागले व तो पुनः आपल्या पूर्वपदावर अधिष्ठीत झाला. पुढें हा हिरा स्त्रियाच्या राजदंडांत बसविण्यांत आला. हा हिरा जगांतील अत्यंत मौल्यवान हिऱ्यांपैकीं एक आहे असें म्हणतात.

ऑर्लाफचे सद्भाग्य फार दिवस टिकलें नाहीं. त्याच्या प्रतिस्पर्ध्यानें युक्त्या प्रयुक्त्या लढवून त्याला कायमचा तेथून काढून लावला.

ह्या ऑर्लाफचे पुढें फार हाल झाले व तो वेडांतच मरण पावला.

गेल्या महायुद्धांत झारशाही नष्ट झाली. त्याबरोबर त्या राजदंडाचीहि वासलात लागली. आतां तो हिरा कोठें आहे कोणास ठाऊक ? एखादा हिरा सबंध राजवंशाच्या नायनाट करतो म्हणतात तो अशाप्रकारें होय.

## ढगाच्यावर काय ?

आपल्याला हवेंतून दिसतें व पाण्यांतूनहि दिसतें. परंतु हवेचें व पाण्याचें मिश्रण झालें म्हणजे मात्र आपल्याला कांहींच दिसत नाहीं.

अशा प्रकारचीं मिश्रणें लाखों आहेत. ढग, धुकें वगैरे या मिश्रणाचेच प्रकार आहेत कित्येक ढगांचें वजन कोट्यावधी मण असतें. एवढें पाणी हवेंत इतक्या उंचावर धरलें जातें ही किती आश्चर्याची गोष्ट आहे बरें !

सूर्याच्या उष्णतेमुळें समुद्रांतील पाण्याची वाफ होते. ती वाफ हलकी असल्यामुळें हवेंत जाते. हवेमध्यें गार वाऱ्याचे प्रवाह चालू असतात, त्या प्रवाहाबरोबर ही वाफ संलग्न होतें व तिचे लहान

लहान थेंब बनतात ह्या असंख्य थेंबांनाच आपण ढग असें म्हणतों.

ढग बनतांच तो खालीं येऊं लागतो. ढगांतील जलकण कल्पना करतां येणार नाहीं इतके सूक्ष्म








असतात. तथापि हें जलकण एकमेकांपासून फार दूर अंतरावर असतात.

आपण पृथ्वी सोडून हवेंत जाऊं लागलों म्हणजे हवा विरळ व थंड होत जाते त्यामुळें वाफेला आपला ओलसरपणा सांभाळून वर जात रहाणें शक्य होत नाहीं. पृथ्वीपासून सुमारें तीन ते पांच मैलांपलीकडे ढग असणें शक्य नसते. कोणाही वैमानिकाला ही गोष्ट विचारल्यास तो याचें उत्तर देऊं शकेल.

आपण आकाशांत वीज चमकतांना पाहतों. ही वीज ढगाच्या योगानें उत्पन्न होते हेही आपणांस ठाऊक आहे. पांच मैलांपलीकडे ढग नसल्यामुळें तेथें विद्युत् नसते ही गोष्ट सिद्ध होते. जेव्हां वैमानिक



ढगांपलीकडे जातो तेव्हां त्याला वजेपासून बिलकूल भय नसतें. त्याचप्रमाणें आपले कपडे भिजतील किंवा एंजीन भिजेल हीही भीति त्याला उरत नाहीं.

तथापि त्याच्या मार्गांत इतर पुष्कळ अडचणी असतात. मुख्य अडचण म्हणजे तेथील हवा विरळ असते ही होय. त्यामुळें पांच मैलांच्या पलिकडे प्रवास करणे म्हणजे जीवावरचें काम असतें. तथापि वैमानिक आठ मैलांपर्यंत प्रवास करूं शकतात. मात्र त्यांना मदतीस ऑक्सीजन अथवा प्राणवायु द्यावा लागतो इतकेच.

वैमानिक तीन मैलांपलीकडे जाऊं लागला

म्हणजे मूर्च्छा येऊ नये म्हणून ऑक्सीजन घेऊ लागतो. त्याच्या एंजीनाची गतीसुद्धां ऑक्सीजनाच्या अभावीं कमी कमी होऊं लागते. तेव्हां त्याच्या एंजीनाला व त्याला स्वतःला जिवंत रहातां यावें म्हणून ऑक्सीजनचा उपयोग करण्यांत येतो.

ह्या ऑक्सीजनचा पुरवठा व्हावा म्हणून विमानाबरोबरच एक यंत्र असतें. या यंत्राच्या सहाय्यानें मॅक्रेडी नांवाचा वैमानिक ४०, ८०० फूट किंवा आठ मैल विमानांतून जाऊन आला. हा हवेंत १ तास ४७ मिनिटें होता. ३९००० फूट गेल्यावर ह्याच्या ऑक्सीजनच्या यंत्रावर बर्फ सांठूं लागलें.

तथापि तो तसाच ४१००० फूटापर्यंत गेला. इतके दूर गेल्यामुळें त्याचें विमान बंद झालें व तो सावकाश खालीं आला. त्याचा पोषाख मोठा विचित्र होता. त्याच्या अंगावर दाट लोंकरीचा कोट असून डोळ्याला मोठा चष्मा व डोक्याला शिरस्त्राण होतें. चष्म्यावर बर्फ चढू नये म्हणून त्याला एक औषध लावलें होतें. त्याचा सारा पोषाख विद्युन्मय होता. वर जाऊन आलेला प्रवाशी खालीं आल्यावर अगदीं बेशुद्ध होतो. आपण काय करतो यांची त्याला शुद्ध नसते. तसेंच त्याच्या कातडींतही बराच फरक पडतो.

ढगांवर काय आहे याविषयीं जिज्ञासा असणाऱ्यांनीं खालील गोष्टी ध्यानांत धराव्या.

समुद्र सपाटीजवळ पाणी २१२ अंशांवर उकळतें, व हवेचा दाब प्रत्येक चौरस इंचावर १५ पौंड असतो. पृथ्वीपासून १२ मैलांवर पाणी १०१ अंशावर उकळते व दाब चौरस इंचाला १ पौंड असतो. तेरा मैलांच्या पलीकडे आपलें रक्तच उकळूं लागेल अर्थात् तें पहाण्यास आपण जिवंत राहिलें पाहिजे.

---

## दगडी शाळा.

हा खेळ घरांतल्या घरांत खेळतां येतो. मात्र त्या ठिकाणीं जिन्याच्या पायऱ्या असल्या म्हणजे झाले. जितक्या पायऱ्या असतील तितकी मुलें हा खेळखेळण्यास असलीं तरी चालतात. मात्र एक मुलगा मास्तर म्हणून निराळा असावा लागतो.

सुरवातीला सारीं मुलें खालच्या पायरीवर बसतात, आणि शिक्षक त्यांच्यासमोर हातांत एक दगड घेऊन उभा रहातो. हा सगळ्यांत खालचा वर्ग होय. शिक्षक आपल्या हातांत एक बारीकसा दगड लपवतो, व मुठी मिटून कोणत्या हातांत दगड आहे हें मुलांना विचारतो. त्यांनीं जर बरोबर ओळखले तर त्याला वरच्या वर्गांत म्हणजे वरच्या पायरीवर बसण्यास सांपडतें. आणि चुकीचें उत्तर दिलें तर तो पूर्वीच्याच जागीं रहातो. अशाप्रकारें जो मुलगा सर्वांच्या अगोदर वरची पायरी गांठतो त्याचा जय झाला असें मानण्यांत येते व पुढच्या खेपेला तो शिक्षक होतो. हा खेळ मोठा मौजेचा असून मुलें तो आनंदानें खेळतात.

---

# मीठ कसें तयार करतात.

सरकारानें मिठावरील कर दुप्पट केल्यापासून या प्रश्नाकडे सर्व लोकांचें लक्ष लागलें आहे. आज आपण मीठ कसें तयार करतात तें पाहूं. आपण जें मीठ रोज खातों तें कसें तयार केलें जातें याची माहिती फार थोड्या लोकांना असते. तथापि मिठाच्या कोंडी-



मध्यें पाणी सांठवल्यापासून त्याचें खडे होईपर्यंतची सारी कृती मोठी गंमतीची आहे. मिठाची उत्पत्ति सूर्यापासून व समुद्राच्या पाण्यापासून होते. मुंबई-मध्यें पुष्कळ दलदलीचा भाग असल्यामुळें व खाड्या असल्याकारणानें इतर ठिकाणांपेक्षां येथेंच मिठ तयार करणें सोईचें आहे. मुंबईच्या मिठाचाच साऱ्या हिंदुस्थानभर प्रसार केला जातो.

मीठ कोठें तयार करावयाचें हें प्रथम शेतकरी ठरवितो व नंतर मजूर वगैरे घेऊन येतो. हे मजूर अगदीं अडाणी असून चालत नाहीं. त्यांना त्या कामाची माहिती असावी लागते असले. मजूर बहुत-करून सुरतेकडून येतात. त्यांच्याबरोबर मिठाच्या मोसमापुरतां वायदा करावा लागतो. हा मोसम नोव्हेंबरपासून जूनपर्यंत असतो. ऑक्टोबर महिना सुरू झाला म्हणजे हे मजूर आपल्या बायकामुलां-सह व सामानसुमानासह मोठ्या जमावानें येऊं लागतात. आणि कांहीं दिवसांनीं ओसाड दिसणारी जमिन आपल्या मेहनतीनें पांढरी शुभ्र करून सोडतात.

प्रथम समुद्राचें पाणी सांठविण्याकरितां एक मोठी टाकी बांधतात. त्या टाकीमध्यें समुद्राचें पाणी घेतां यावें म्हणून लहान लहान पाट तयार करतात. पुढें त्या टाकीचें पाणी कोंड्यांत घेतां यावें म्हणून लहान लहान बंधारे घालून कोंड्या तयार करतात. समुद्राचें पाणी टाकींत घेतल्यावर तें दुसऱ्या एका टाकींत सोडतात. ह्या दुसऱ्या टाकींत तें पाणी कोंडींत सोडण्यास योग्य होईपर्यंत ठेवतात. ह्या कोंडीची लांबी ४५ फूट रुंदी १५ फूट व खोली ६। इंच असते. ही कोंडी तयार करण्यास ३० पासून ४० रुपयेपर्यंत खर्च येतो. ह्या कोंड्या अर्थातच टाकीच्या खालच्या भागीं असाव्या लागतात.

कोंडींत पाणी सोडल्यावर सूर्याच्या उष्णतेनें अदमासे आठ दिवसांनीं तें घट्ट होऊं लागतें. परंतु मीठ होऊ देण्यापूर्वीं दोन वेळ हें घट्ट झालेलें पाणी ढवळण्यांत येतें व तें समभागांत आहे किंवा नाहीं, तसेंच तें गळून जातें कीं काय वगैरेबद्दल काळजी घेण्यांत येतें. पाण्याला सूर्याची उष्णता लागू लागली म्हणजे त्यावर स्फटीकासारखे पापुद्रे येतात; हे पापुद्रे काढून टाकले जातात. अशाप्रकारें सारें पाणी संपेपर्यंत पापुद्रे काढण्याची कृती चालू असते.

मीठ तयार करण्याची ही साधी रीत झाली. परंतु सर्व हिंदुस्थानांत निरनिराळ्या प्रकारचें मीठ खाणारे लोक असल्यामुळें ह्यांच्याकरितां कृतीमध्यें कमजास्तपणा करावा लागतो. कलकत्याला जें मीठ लागतें तें मुंबईच्या लोकांना चालत नाहीं. व मुंबईस जें चालतें तें मद्रासेस चालत नाहीं. म्हणून मीठ तयार करणाऱ्याला आपलें कौशल्य दाखवावें लागतें. मुंबईच्या लोकांना पांढरें शुभ्र मीठ लागतें. म्हणून कोंड्यामध्यें गवताच्या दोऱ्या करून टाकाव्या लागतात. त्या चाळणीप्रमाणें आडव्या व उभ्या विणलेल्या असतास. या दोऱ्यामुळें मीठ पांढरें शुभ्र होतें.

एखादां ओढा झुळझुळ वाहूं लागला व त्याचें पाणी गवताला अगर दुसऱ्या कशाला अडकलें तर पांढरा शुभ्र फेस कसा तयार होतो हें आपण पहातों. तशाच प्रकारचा पांढरा फेस या गवताच्या दोऱ्यामुळें येऊन पांढरें मीठ तयार होतें.

मीठाचे पुष्कळ प्रकार आहेत. व प्रत्येक प्रकारच्या मीठाची वेगवेगळी कृती आहे. दूरदेशी मीठ पाठवावयाचें असेल तर तें बारीक करीत नाहींत. मीठ तयार होण्यापूर्वीं तें चाळण्यांमधून चाळावें लागतें. चाळलेल्या मिठाच्या मोठमोठ्या राशी करून ठेवतात.

या मिठागराभोंवतीं सरकारी पहारा असतो. कारण प्रत्येक वस्तू चोरणारे कोणीनाकोणी असतातच मिठाचें वजन एका अधिकाऱ्याच्या देखरेखीखालीं होत असतें. मिठाचीं पोतीं भरल्यावर त्याचें पुनः वजन करण्यांत येतें.

पावसाळा सुरू झाला म्हणजे या मिठाच्या कोंड्यावर गवताचें झांकण टाकतात व कोणीतरी रखवालदार त्यांचें राखण करण्यास ठेवतात.

मुंबईचीं मिठागरें अगदीं शांत असतात. तेथें गडबड वगैरे कांहीं नसते. या आगरांत होड्यांतून जावें लागते मिठाच्या राशी लहानशा टेकडी एवढ्या दिसतात. हें मीठ होड्यांतूनच जमीनिवर आणतात.

मिठाच्या पूर्वेतिहासाकडे पाहिले तर आपल्या देशाखेरीज इतर देशांतील त्याच्या इतिहासाची माहिती फारशी नाहीं आपल्या आर्यवैद्यकांमधून सैंधवाविषयीं भरपूर पुरावा सांपडतो. तेव्हां आपण पहिल्यासून मीठ खात आलों आहो. मात्र युरोपमधील व इतर देशांतील लोकांना मीठ खावयास न मिळाल्यामुळें ते त्याची भरपाई खारे मासे, मांस व फळफळावळें खाऊन करीत.

अगदीं मूळच्या माणसाला मिठाची माहिती नव्हती असें म्हणतात. जेव्हां अन्न शिजविण्याची कल्पना उद्भूत झाली तेव्हां मनुष्य मिठाविषयीं चौकशी करूं लागला. मांसभक्षक प्राण्यांना मीठ लागत नाहीं, त्याचप्रमाणें वानर व फळफळावळ खाणाऱ्या पक्षांनाहि मीठ लागत नाहीं. परंतु तृणाहारी प्राण्यांना मीठ लागतें.

जगांत अद्यापपर्यंत मीठ न खाणारे लोक आहेत.

ज्यांना मीठ म्हणजे एक प्रकारची मेजवानी वाटते असेहि लोक आफ्रिकेसारख्या देशांत आहेत.

# आपल्या गांवचा इतिहास.

मनुष्य हा जिज्ञासु प्राणी आहे. सृष्टीच्या काळाच्या अगाध भांडारांमध्यें असलेल्या गूढ गोष्टींचा शोध तो एकसारखा करीत असतो पृथ्वीच्या पोटांत काय आहे व ती अस्तित्वांत येऊन किती काळ लोटला असावा याविषयीं भूगर्भशास्त्रवेत्त्यांचे प्रयत्न सतत चालू आहेत. आपल्या वर दिसणाऱ्या निळ्या आकाशामध्यें असलेल्या अनंत गोलांचें आकारमान काय आहे, त्यांच्या गति कशा आहेत व त्या कोणत्या दुसऱ्या शक्तीनें मर्यादित केल्या गेल्या आहेत यांविषयीं खगोलशास्त्रज्ञांचे प्रयत्नहि अव्याहत चाललेले आहेत. त्याचप्रमाणें पृथ्वीच्या पृष्ठभागावर मनुष्यप्राणी पहिल्यानें कधीं संचार करूं लागला, आरंभीं त्याची स्थिती कशी होती व पुढें तीमध्यें फरक होत जाऊन तो सध्यांच्या स्थितिप्रत येऊन कसा पोंचला याविषयींचें ज्ञान मिळविण्याचे प्रयत्नसुद्धां सतत चालू आहेत. परंतु गतकालाची हकीकत संगतवार मिळत नसल्यामुळें मोठमोठ्या विद्वान लोकांमध्यें तिच्या सत्यनिष्पत्तिबद्दल वाद सारखे चालू आहेत व ते तसेच पुढेंहि चालू राहतील.

मूल जन्माला आल्यावर त्याला लौकरच अहंभावाची कल्पना प्राप्त होते. ही अहंभावाची अथवा ममत्वाची कल्पना बहुतेक सर्व माणसांमध्यें कमी-अधिक प्रमाणानें वास करीत असलेली आपल्याला आढळून येते. विश्व-कुटुंबीपणाचा आव माणसानें कितीहि आणला तरी त्याच्या अंतःकरणाच्या गाभ्यामध्यें ह्या आपलेपणाची ज्योत सतत तेवत असते. जो मनुष्य फक्त स्वतःच्या सुखाकडे लक्ष देतो व आपल्या आईबापांच्या अगर सोयऱ्या धायऱ्यांच्या उपयोगी पडत नाहीं, त्याला अप्पलपोटेपणाबद्दल दोष देण्यास आम्ही तयार होतों, पण त्याला दोष देण्यास सिद्ध होण्याचें कारण आमचा अप्पलपोटेपणा हेंच होय. बरें, दुसरा एक इसम आपल्या कुटुंबाच्या उपयोगीं पडतो पण आपल्या जातिबांधवाविषयीं कोणताहि स्वार्थत्याग करण्यास तयार नसेल तर अशा माणसाला त्याचीं सोयरींधायरीं चांगलें म्हणतील पण त्याचे जातिबांधव खात्रीनें त्याला दोषच देतील. ही विचारपरंपरा अशीच चालू ठेविल्यास ज्याला आपण स्वदेशाभिमान असें सोज्वळ नांव देतों, तोही एक प्रकारचा आप्पलपोटेपणा अगर स्वार्थीपणाच आहे असें आपल्याला आढळून येईल.

बंगाली बाबू, पंजाबी शीख आणि आम्ही महाराष्ट्रीय लोक हे सर्व एकाच देशांतील रहिवासी असल्यामुळें आपलें परस्परावर प्रेम असावें, अगर आहे, हें म्हणणें जितकें सोपें आहे, तितकें तशी भावना होणें सोपें नाहीं. बंगाली बाबू आणि महाराष्ट्रीय लोक यांविषयीं भिन्न भाव असण्याचें कारण, आपल्या मनामध्यें वास करीत असलेला आपलेपणा हेंच होय. आपलेपणाचे गुणावगुण ठरविणें, हा अलाहिदा प्रश्न होईल; पण त्याची सरास फारखत करून घेणें जवळ जवळ अशक्य आहे.

आपलेपणाची कल्पना असल्यावर कीर्तीची हांव अगर इच्छा असणें हीहि गोष्ट ओघानेंच प्राप्त होते. कीर्तीची इच्छा नसण्याचा मनुष्यानें जरी कितीहि दिमाख दाखविला तरी शेंकडा नव्याण्णव लोक मृगजलवत् संचार करणाऱ्या या परीच्या मागें लागलेले असतात; पण ही बया सहसा मागें वळून पहात नाहीं व आपला कृपाकटाक्ष तर अगदीं क्वचितच फेंकते

तेव्हां जिज्ञासा, आपलेपणा आणि कीर्तीची आवड ह्या तिन्ही भावना पुष्कळ माणसांमध्यें वास करीत असतात, ही गोष्ट गृहित धरून पुढील जरा चमत्कारिक कल्पना शालापत्रकाच्या वाचकांपुढें मांडण्यांत येत आहे. तिच्यांत कांहीं तथ्य असून निदान एक दोघांनीं जरी ती अमलांत आणण्याचा प्रयत्न केला तरी हा लेख लिहिण्याचें सार्थक झाल्यासारखें वाटणार आहे.

हिंदुस्तानचा इतिहास आपल्याला आवडतो पण महाराष्ट्राचा जास्त आवडतो, त्यांतही महाराष्ट्राच्या ज्या भागांत दैववशात् आमचा जन्म झाला असेल त्या भागाचा इतिहास अतिशय आवडतो. याच न्यायानें आपल्या गांवचा इतिहास आपणाला अत्यंत प्रिय असला पाहिजे. पण तो इतिहास आहे कोठें ?

तो भूतकालाच्या गुहेंत दडी मारून बसला आहे. त्याला तेथून खेंचून चव्हाट्यावर आणणें व त्याच्याकडे कौतुकानें पहात रहाणें आणि त्याला पुनः दडी मारूं न देणें, हें आपणांकडे आहे. आपल्या गांवांत असलेलें शिवाचें मोडकें देऊळ कोणीं बांधलें, कधीं बांधलें, त्याला खर्च काय आला होता, त्या वेळीं गांवांतील कोणतीं घराणीं प्रमुख होतीं वगैरे गोष्टींची माहिती, लंडन शहरांतील सेंट-पॉलच्या प्रार्थनामंदिराच्या माहितीपेक्षां अधिक महत्वाची व बोधप्रद आहे. पण हें ज्ञान आपणांस होणार कसें ?

जर आपल्या वाडवडिलांनीं गांवांत होणाऱ्या गोष्टींची हकीकत संगतवार लिहून ठेवण्याचा परिपाठ ठेवला असता तर आपल्याला आपल्या गांवची पूर्वपिठिका समजली असती; पण जेथें देशाचा इतिहास लिहिण्याची मारामार तेथें गांवचा इतिहास लिहिणार कोण ?

तो आम्ही लिहिणार. जी गोष्ट आपल्या वाडवडिलांनीं न केल्यामुळें आपल्याला वाईट वाटतें ती गोष्ट निदान आम्ही तरी पुढील पिढीसाठीं करून ठेवणार. ती केल्यानें स्वार्थहि साधेल व परमार्थहि साधेल. तरी या दिशेनें प्रयत्न कसे करण्यांत यावे व त्यांपासून कोणकोणते फायदे होण्यासारखे आहेत, तें पुढें थोडक्यांत दिलें आहे.

गांवाचा इतिहास लिहावा असा जरी विचार ठरला तरी तो प्रयत्न करणाराच्या अंगीं एक प्रकारची योग्यता असली पाहिजे. ती तशी नसल्यास त्यापासून व्हावा तसा फायदा होणार नाहीं. आरंभशूरत्व हा दुर्गुण मोठमोठ्या विद्वान आणि प्रसिद्ध लोकांमध्यें असलेला जर सामान्य लोकांना दिसून येतो, तर सामान्य लोकांमध्यें तो अधिक प्रमाणानें वास करीत असेल असें धरून चालण्यास कांहीं हरकत नाहीं. जी गोष्ट शेवटास नेण्याचें सामर्थ्य आपल्या आंगीं नाहीं, तिला आरंभच न करणें हा शहाणपणा होय. आपल्या गांवचा इतिहास लिहिण्यास आज सुरवात केली व उद्यां त्या गोष्टीचें विस्मरण झालें तर त्यापासून कांहींसुद्धां फायदा न होतां उलट तोटा मात्र होईल. असा मनुष्य स्वतःला हास्यास्पद करील व आपल्या बरोबर प्रस्तुत लेखकाला आणि कल्पनेलाहि हास्यास्पद करील. तरी आरंभ करण्यापूर्वींच असल्या कार्याला लागणारी चिकाटी स्वतःच्या आंगीं आहे अगर नाहीं, या गोष्टीचा प्रत्येक तरुणानें आपल्याशीं विचार करावा.

चिकाटी इतकाच दुसरा आवश्यक गुण सत्याची आवड हा होय. जी गोष्ट देशाच्या इतिहासाला लागू पडते ती गांवच्या इतिहासालाही लागू पडेल. धर्माभिमान, जात्याभिमान, देशभिन्नत्व यांमुळें मोठमोठ्या इतिहासकाराची दृष्टी जर अंध होते व त्यांना विपरीत गोष्टी दिसूं लागतात तर गांवांतील पक्षभेदामुळें सामान्य माणसाला खरी गोष्ट समजून घेऊन ती जशीच्या तशी लिहून ठेवणें खात्रीनें जड

जाईल. तरी गांवचा इतिहास लिहिण्यास सुरवात करतांना सत्याला काडीमात्र न सोडण्याचा लेखकाचा निश्चय असला पाहिजे.

उपरिनिर्दिष्ट दोन गुण अंगीं असून शिवाय शुद्ध व संगतवार लिहिण्यास आवश्यक इतकें भाषेचें ज्ञान लेखकाला असलें, म्हणजे बस आहे. या बाबतींत मराठी सहाव्या इयत्तेपर्यंत शिक्षण झालेलें असून शिवाय बऱ्याचशा ग्रंथांचें वाचन झालेलें असावें, अशीहि मर्यादा घालतां येईल.

तेव्हां कोणतीहि गोष्ट करण्याची इच्छा होऊन ती पार पाडण्यास लागणारी योग्यता अंगीं असल्यास नंतर त्या गोष्टीला प्रत्यक्ष सुरवात कशी करावी हा प्रश्न आपणापुढें उभा राहतो. तरी या संबंधें पुढीलप्रमाणें आरंभ करण्यास हरकत नाहीं.

बहुतेक गांवांत पिढीजाद कुळकर्ण्यांचीं घराणीं, दुसरीं खानदानीचीं घराणीं व जोशी आणि उपाध्ये यांचीं जीं घराणीं आज तागायत जीव धरून हयात आहेत, त्यांच्याकडे तपास केल्यास, गेल्या पन्नास पाउणशें वर्षांची बरीचशी माहिती मिळण्यासारखी असते. शिवाय गांवांतील वृद्ध माणसांना विचारलें असतां, गांवांतील घडामोडीसंबंधीची प्रत्यक्ष पाहिलेली पुष्कळच माहिती तीं सांगूं शकतात. तेव्हां इच्छा असल्यास व कसून प्रयत्न झाल्यास गेल्या शंभर वर्षांची बरीच माहिती गोळा करणें जिज्ञासु इतिहासकाराला अशक्य नाहीं.

गतकाळाची माहिती गोळा करून ती संगतवार लिहून काढली पाहिजे. ती लिहितांना सत्यासत्याचा चांगला विचार करावा. लिहिलेली माहिती गांवांतील चार जाणत्या गृहस्थांना दाखवून त्यावर त्यांचा अभिप्राय घ्यावा. तदनंतर तिच्या तीन चार प्रती करून त्या सुरक्षित राहतील अशा ठिकाणीं ठेवाव्या. एक प्रत चांगल्या पेटींत घालून ती गांवांतील सार्वजनिक देवालयांत ठेवावी व दुसरी गांवांतील शाळेंत ठेवावी. प्रत्येक प्रतिबरोबर गांवचा साधारण नकाशा जोडणें शक्य असल्यास तोही जोडावा.

देवळांतील प्रत कोणाही जिज्ञासूला वाचण्यास मिळावी व शाळेंतील प्रत वरच्या मुलांकडून वाचवून घ्यावी. शिवाय लेखकानें एक प्रत स्वतःजवळ ठेवून दर वर्षास गांवांत होणाऱ्या गोष्टींचा तिच्या शेवटीं समावेश करावा. या प्रतिवरून दुसऱ्या प्रती दर पांच दहा वर्षांनीं दुरुस्त कराव्या व हा क्रम सतत चालू ठेवण्याचा गांवांतील सर्व लोकांनीं मिळून प्रयत्न करावा.

हा वेळपावेतो गांवचा इतिहास लिहिण्याची इच्छा कां व्हावी तें सांगून तिला मूर्त स्वरूप कसें देतां येईल तें सांगितलें. आतां असें केल्यापासून कोणकोणते फायदे होण्यासारखे आहेत त्याचा विचार कर्तव्य आहे.

गांवचा इतिहास लिहिणाराची कीर्ति आसपासच्या पंचक्रोशींत खात्रीनें पसरेल ही गोष्ट ठाम आहे. तेहां कीर्तीची हांव, जी प्रत्येक माणसांमध्यें कमीअधिक प्रमाणानें वास करीत असते, ती कांहीं अंशीं पूर्ण होईल. यदाकदाचित कीर्तीची हांव नसेल तर ज्या भूमीमध्यें जन्म झाला, तिची अल्पशी सेवा आपल्या हातून झाली या जाणिवेनें लेखकाला खात्रीनें समाधान होईल असें आमच्या अल्प समजुतीला वाटतें शिवाय लेखनाची आवड एकदां लागली म्हणजे पुढें व्यासंग वाढून त्यापासून मोठमोठे फायदे होण्याचाही संभव आहे.

हे तुरुत फलदायी फायदे म्हणतां येणार नाहींत. पण गांवचा इतिहास लिहिणारा जर एखादा हुशार विद्यार्थि असेल तर त्याचा हा स्तुत्य प्रयत्न पाहून त्याचे विद्याव्यासंगी व गुणग्राही ग्रामबंधु त्याला द्रव्य-सहाय्य करण्यास खात्रीनें पुढें येतील.

प्रस्तुत कल्पना नवीन आहे, तरी तिच्याबद्दल

विचार करून ती व्यवहार्य आहे असें वाटल्यास त्याप्रमाणें आपआपल्या गांवचा इतिहास लिहिण्याचा वाचकांनीं अवश्य प्रयत्न करावा, अशी विनंति करून हा अल्पसा लेख पुरा करतों.

---

# शिक्षकांस सूचना.

युनायटेड स्टेट्स मधील शिक्षकांना तेथील शाळा खात्यांचे अध्यक्ष एलियट यानीं दिलेल्या सूचना उपयुक्त असल्यामुळें विचारार्ह आहेत.

प्रत्येक मुलानें आपलें काम कसोशीनें, दीर्घोद्योगानें व आनंदानें करावें म्हणून त्याचें चित्त अभ्यासाकडे वेधणें जरूर आहे.

प्रत्येक मुलाला आसपासच्या वस्तू पहाण्याची व त्याचें यथार्थ वर्णन करण्याची संवय कशी लागेल याबद्दल काळजी घ्या.

दररोज मुलांच्या अवलोकनशक्तीला चलन कसें मिळेल व इतर नैसर्गिक देणग्यांचा उपयोग कसा करून घेतां येईल याकडे लक्ष द्या.

प्रत्येक मुलाला ड्रॉइंग, गाणें, वाजवणें, वगैरेचे शिक्षण द्या.

प्रत्येक मुलाच्या अंगांत आळस न येतां तो चळवळ्या कसा होईल याकडे लक्ष द्या. प्रत्येक मुलाला शिस्तीचें महत्त्व समजावून सांगा आपण एकट्यानें शिस्त पाळली तर त्या शिस्तीचा परिणाम साऱ्या वर्गावर कसा होतो हें त्याला समजलें पाहिजे.

सारख्या प्रकारचे विषय एकदम शिकवावेत. अंकगणित, बीजगणित, व भूमीति, इतिहास, भूगोल, प्रवास व चरित्रें, लेखनवाचन वगैरेचें शिक्षण दररोज एके वेळीं द्यावें. सहा वर्षांपासून अठरा वर्षेपर्यंत सर्व मुलामुलींना एका प्रकारचें शारीरिक शिक्षण द्यावें.

सर्व विद्यार्थांना शेतकीच्या खाण्यापिण्याच्या व आरोग्याच्या शिक्षणाची मूलतत्त्वें समजतील अशी खबरदारी घ्या. तसेच मुलाला धंदेशिक्षण व मुलीला घरगुती काम शिकविण्याची व्यवस्था करावी. आरोग्यविषयक शिक्षणांत सांथीपासून समाजाचा बचाव कसा होईल व त्याचें अज्ञान कसें नाहींसें होईल याचा अंतर्भाव करावा.


नवीन विषय शिकवावयाचे असल्यास वर्गाचें शिक्षण कमी करावें, वर्गांतील मुलें कमी करावीत शाळेचा वेळ वाढवावा व सुट्या कमी कराव्यात मुलांनीं आपला अभ्यास नीट करावा म्हणून त्यांच्यांत चढाओढ उत्पन्न करून बक्षिसाची लालूच दाखवावी.

शाळेच्या वातावरणांत प्रेमाचें आशेचें व आपल्या कर्तव्याचें वारें खेळत असावें. भीतीला किंवा आपलपोटेपणाला सवड देऊं नये.


अशा प्रकारच्या शाळांना जास्त खर्च लागेल. परंतु त्याकरितां डगमगून जाऊं नये. सार्वजनिक पैशाचा विनियोग त्याकडे जास्त जास्त करावा. गाणें व ड्राईंग हे जरी मौजेचे विषय वाटत असले तरी त्यांना अत्यंत महत्त्व आहे. निरनिराळ्या विषयाची अल्पशी जरी माहिती झाली तरी त्यायोगानें मुलाला आपल्या आवडीचा विषय कोणता याची निवड करता येते. व मग पुढील आयुष्यांत तो त्यांतच पारंगत होतो. कोणताहि विषय मुलाला आवडूं लागला म्हणजे त्यांत त्याला आनंद होतो. कोणत्याहि कामांत आनंद असल्याशिवाय मनुष्याला बरें वाटत नाहीं.

---


# शहाणें कुत्रें




कसला काळा डाग हा !



हां ही बरी झारी आहे. उचलान काय.



चांगलाच अडकला




पण पाणी कसें पडणार, वा दोरी सांपडली.



आतां कसें अंग स्वच्छ झालें !

# कोंबडा अरवला नाहीं म्हणून दिवस उगवायचा थोडाच थांबतो.



एका म्हातारीचा एक कोंबडा होता. पहांट झाली म्हणजे हा कोंबडा झोंपडीवर उभा राही. व तेथून कूं कूं कूं, असें करी. त्या म्हातारीची थोडी शेतकी असल्यामुळें तिच्याजवळ गडीमाणसें असत. कोंबडा अरवतांच ती सर्वांना उठवी व कामास लावी. त्या बायका व गडी सारा दिवसभर दमलेले असत. म्हणून पहांटेस कोंबडा अरवला कीं त्यांना झोप मोडल्याबद्दल राग येई. एकदां त्या बायका एकत्र जमल्या व याला काय उपाय योजावा याचा विचार करूं लागल्या. तेव्हां त्यांनीं त्या कोंबड्याची मान छाटून टाकण्याचें ठरविलें. त्यांचा बेत पार पडल्यावर म्हातारीला पहिले एकदोन दिवस वेळ समजण्यास अडचण पडली. परंतु तिसऱ्या दिवसांपासून ती अवेळींच उठे व



चांगलें चांदणें पडलें असतां गड्यांना कामाला लावी. अशाप्रकारें आपण करायला गेलों एक झालें भलतेंच असें त्यांना झाले





## खुशालराव व राजेसाहेब.

एकदां एक खुशालराव हिंडावयास चालले असतां त्यांची व राजाची गांठ पडली. राजेसाहेबांनीं त्यांच्या वाळलेल्या शरीरयष्टीकडे पाहून अंगांत बळ किंवा ताकद नसल्याबद्दल दूषण दिलें.

परंतु ते खुशालराव हुशार होते. ते म्हणाले, " राजेसाहेब, माझ्या अंगांत ताकद नाहीं. तरी मी आपणास शनिवार वाड्यापासून पर्वतीवर खास उचलून नेईन." या दोन ठिकाणांमध्यें ३।४ मैलाचें अंतर होतें. त्यामुळें राजेसाहेबांना ही गोष्ट अशक्य वाटली, व ते हंसले. शेवटीं दोघांमध्यें याबद्दल चार लोकांसमक्ष पैज ठरली व दिवसहि मुकरर झाला.

ठरलेला दिवस आला. शनिवार वाड्याजवळ लोकांची गर्दी ही पैज पहाण्याकरितां जमली. राजा म्हणतो, " काय खुशालराव झाली का तयारी ? "

" होय, पण तो आपला आंगरखा काढा

आपल्या पैजेंत आपल्या आंगरख्याला नेईन असें कधीं कबूल केलें होतें ?"

थोडी कुरकुर करून राजेसाहेबांनीं आंगरखा काढला. मग खुशालराव म्हणाले, "आपला जोडा, पागोटें, धोतर वगैरे सारे कपडे उतरवा. मी ते नेण्याचें मुळींच कबूल केलें नाहीं." राजा म्हणाला 'होय, बाबा तूं पैज जिंकलीस यांत कांहीं संशय नाहीं.' असें म्हणून राजानें त्याला ठरलेलें बक्षीस दिलें.

---

## शालापत्रकाची चढाओढ

### कोड्याचीं उत्तरें सर्वांकरितां.

१ औरंगजेब

२ महत्त्वाकांक्षा

३ जरिपटका

### लहानमुलांकरितां समशेर.

उत्तरें बरोबर पाठविणारांचीं नांवें.

१ नांदेडकर डब्ल्यू. डी. ( ३ बरोबर )

२ आलेगांवकर पं. रा. ( २ ).

३ वसंत बळवंत सुळे ( २ ).

४ रा. त्रि. केणेकर ( २ ).

### लहान मुलें.

१ वसंत बळवंत सुळे.

२ वसंत वासुदेव बाबासुंदर.

३ गणेश गोविंद पटवर्धन.

४ वासुदेव त्रिंबक केणेकर.

५ मधुसुदन आनंदराव चित्रे.

बाकीचीं उत्तरें कुपनाशिवाय आलीं असल्यामुळें त्याचा विचार करण्यांत आला नाहीं.

वसंत वासुदेव नाईक यांचें उत्तर बरोबर आहे पण ते १५ वर्षांच्या वर असावेत असा आम्हाला संशय येतो.

### बक्षीसें.

नांदेडकर डब्ल्यू डी यांस अर्वाचीन महाराष्ट्र.

१ साक्रेतीस चरित्र.

२ ध्रुव व चिलिया.

३ शलिंपरं भूषणं.

४ लक्ष्मीपूजन अथवा भाऊबिजेची ओवाळणी.

५ चिमुकलें रामायण.

या अनुक्रमानें त्यांना बक्षिसें मिळालीं आहेत.

### नवीं कोडीं सर्वांकरितां.

( मागील अंक पहा )

खालील अवयवांचे शब्द बनवा.

( १ ) क् इ व् र् ज् अ अ न् अ अ अ स्

( २ ) ल्, इ, श्, य्, यू, द् अ अ अ व् व् अ अ इ व्.

( ३ )अ र् र् अ न् अ अ ग् ध् अ अ श्

( ४ )न् व्, इ, श् ज् अ अ र् अ अ अ् अ अ

### मुलांकरितां

मी चार अक्षरी शब्द असून माझीं पहिलीं दोन अक्षरें घेतलीं तर शरीसंबंधीं बोध होतो व दुसरीं दोन घेतलीं तर आपल्या पूर्वींच्या ग्रंथाविषयीं उल्लेख होतो. चारी शब्दांचा अर्थ शारीरिक शास्त्र असा होतो तर तो शब्द कोणता ?

---

REGISTERED. B. NO. 179.




पुस्तक ३४. जुलै सन १९२३. अंक ७.

अनुक्रमणिका.

| विषय. | पृष्ठ |
|---|---|
| विश्वविद्यालयं. | १२१ |
| राजा व शहाणा प्रधान. | १२३ |
| सुटी अजी संपली ( कविता. ) | १२४ |
| अबूचा पहाड. | १२५ |
| कागदी कांसव कसा पोंहतो. | १२६ |
| रविंद्रनाथ टागोर. | १२७ |
| रबर. | १२९ |
| एक खेडवळ व तिघे चोर. | १३२ |
| नलिनीताईची गोष्ट. | १३३ |
| उत्तम गवई. | १३५ |
| मौज मजा आणि गंमत ( चित्रें ) | १३६ |
| विश्वासाचें फळ. | १३७ |
| शालापत्रकाची चढाओढ. | १३८ |
| बक्षिसें. | १३९ |
| जादूचे प्रयोग. | १४० |

मुद्रक व प्रकाशक—रा. रा. शंकर नरहर जोशी चित्रशाळा प्रेस, १०२६ सदाशिव पेठ, पुणें सिटी.

# रंगीत इसाप-नीति.

यांत एकंदर इसापनीतींतील आठ अगदीं सोप्या गोष्टी मोठ्या व जाड टाइपांत दिलेल्या असून प्रत्येक गोष्टीसमोर त्यांतील रहस्य दाखविणारें रंगीत सुंदर चित्र दिलेलें आहे. चित्रें पाहूनच मुलांना गोष्टींतील तात्पर्य कळतें. किं० ८६. ट. ह. ८८६.

# सचित्र इसाप-नीति.

[ उत्तरार्ध. ]

[ नवीन भाषांतर भाग २ रा. ]

वरीलप्रमाणेंच हा दुसरा भाग विक्रीस तयार आहे. याचीं सुमारें २०० पानें छापलीं असून यांत २५० गोष्टी आहेत. चित्रांची संख्या १५० पर्यंत आहे. किं. १८४

दोन्ही भाग एके ठिकाणीं बांधलेलें सुंदर पुस्तक किं० रु. २

# विद्यार्थ्यांकरितां नाटिका.

शीलं परं भूषणम्.

ही नाटिका प्रसिद्ध कवि–शिरोमणि नारायण वामन टिळक यांनी केवळ लहान मुलांकरतांच लिहिलेली आहे. यांत शृंगाररस मुळींच नाहीं एवढेंच नव्हे, तर स्त्रीची भूमिका या नाटकांत आणलेलीच नाहीं. शिवाय नाटकाचा विषय नैतिक विचारानें पूर्ण भरलेला असल्यामुळें शाळांतून वार्षिक संमेलनाचे वेळीं मुलांकडून ह्या नाटकाचा प्रयोग करविण्यास तें योग्य आहे. नाटकाचा विषय धनाची योग्यता आहे किंवा ज्ञानाची योग्यता जास्त हा आहे. पुस्तकांत चार सुंदर चित्रें कथानकास अनुसरून दिलेलीं आहेत; किं० ८४.

म्यानेजर--चित्रशाळा प्रेस, पुणें.

---

# चिमुकलें भारत व रामायण.

महाभारत व रामायण हे आपले राष्ट्रीय ग्रंथ आहेत. यांत आपला प्राचीन इतिहास असून प्रपंच साधून परमार्थ कसा जोडावा हें उत्तम दाखविलें आहे. व्यावहारिक बोधाच्या ह्या केवळ खाणी आहेत. आबालवृद्ध स्त्री–पुरुषांना या ग्रंथांचें ज्ञान होणें अगत्याचें आहे. प्रौढांकरितां आमचीं लोकप्रिय '**भारती युद्ध**' व '**रामचरित्र**' हीं पुस्तकें आहेत. आतां बारातेरा वर्षांच्या मुलांमुलींकरितां '**चिमुकलें भारत**' व '**चिमुकलें रामायण**' हीं दोन पुस्तकें अनुक्रमें आम्हीं **रामकृष्णवाक्सुधेचे** प्रसिद्ध लेखक रा. **कृष्णाजी गोविंद किनरे** व रा. **विद्याधर वामन भिडे** बी. ए. यांजकडून मुद्दाम लिहविलीं आहेत. पुस्तकाची भाषा फारच **मोहक** व **सोपी** आहेत. वाचतांवाचतांच मुलांच्या मनावर त्यांतील रहस्य ठसावें म्हणून **उपदेशपर वाक्यें** जाड टाइपांत घातलीं आहेत, आणि कथानकांच्या अनुरोधानें हाफटोन प्रोसेसनें तयार केलेलीं **भारतांत आठ व रामायणांत सात अशीं सुंदर चित्रें** घातलीं आहेत. भारताचीं पृष्ठें १७३ व रामायणाचीं पृष्ठें ८२. छपाई बांधणी सुबक. किं० ८६, व रामायण किं० ८४.

म्यानेजर—चित्रशाळा प्रेस, पुणें शहर.

# मराठी शालापत्रक


येथें शब्द नाहीं शिष्यासी । हें अवघें सद्गुरूपाशीं ।
सद्गुरु पालटी अवगुणांसी । नाना यत्नें करोनी ॥
जें कांहीं आपणास ठावें । तें हळु हळु शिकवावें ।
शहाणे करून सोडावें । सकळा जनां ॥ १ ॥

रामदास.


पुस्तक ३४. जुलै सन १९२३. अंक ७


## विश्वविद्यालय.

विश्वविद्यालयें हीं पूर्वीं कधींहि स्थापन केलीं गेलीं नव्हतीं. त्यांची वाढ आपोआप होत गेली. मनुष्यांची ज्ञानलालसा जसजशी वाढूं लागली तसतशी त्यांना परस्परांच्या मदतीची आवश्यकता वाटूं लागली. आणि त्यामुळेंच सर्व जिज्ञासू एखाद्या गांवीं ज्ञानार्जनासाठीं येऊन राहूं लागले. त्या गांवीं एखादी शाळा असे व त्या शाळेचा संबंध देवळाशीं असे. पाश्चात्य देशांत १२ व्या शतकाचे सुमारास विश्वविद्यालयाचें नांव ऐकूं येऊं लागलें. या ठिकाणीं मिळणारें शिक्षण एकाच देशाच्या विद्यार्थ्यांकरितां नसे. आणि या शिक्षणाचें स्वरूप विशिष्ट प्रकारचें असे. त्या काळीं धर्म, कायदा व वैद्यकी यांपैकीं एकामध्यें प्राविण्य मिळवावें लागे. वैय्यक्तिक धर्माचा विचार न करतां लोकांना स्वतःच्या बुद्धिनुसार कोणत्या तरी एका विषयाचा सांगोपांग अभ्यास करावासा वाटे. धर्माच्या कक्षेंत जीं विद्यालयें येत त्यांमध्यें असला अभ्यास करण्यास सवड नसे. त्यामुळें धर्मा-

त्रिकारी सुरवातीला या विश्वविद्यालयांचा द्वेष करूं लागले.

बाराव्या शतकाच्या अखेर पाश्चात्य देशांत ३ विश्वविद्यालयें होतीं. पारिस हें धार्मिक अध्ययनाकरितां, बोलोन हें कायद्याकरितां व सॅलेनो हें वैद्यकाकरितां प्रसिद्ध होतें. ह्या विश्वविद्यालयांना पोपची किंवा राजाची संमती लागे. अशा प्रकारची विश्वविद्यालयें पुढें कांहीं कांहीं ठिकाणीं निघूं लागलीं.

कांहीं विशिष्ट अध्ययनाकरितां एकत्र जमणाऱ्या माणसांच्या संघांना विश्वविद्यालय म्हणतात. त्या काळचें विश्वविद्यालय म्हणजे विश्वातील विद्यार्थ्यांचें विद्यालय होतें. परंतु ही व्याख्या हल्लीं आकुंचीत झाली आहे हें आपणास ठाऊक आहे. मध्ययुगामध्यें विश्वविद्यालयाचे दोन पंथ होते. एक बोलोनमधील व दुसरा पारिसमधील. बोलोनांतील विश्वविद्यालय हें विद्यार्थ्यांचें व पारिसमधील शिक्षकांचें होतें असें म्हणण्यास हरकत नाहीं बोलोना येथें विद्यार्थी एकत्र जमत व ते आपल्या शिक्षणाकरितां प्रोफेसर्स पैसे देऊन आणीत. या विश्वविद्यालयाचें नियामकमंडळ विद्यार्थ्यांचें असें. या विद्यालयाचे दोघे प्रमुख अधिकारी असत. व त्यांची निवड विद्यार्थ्यांकडूनच केली जाई. हें विश्वविद्यालय म्हणजे एक विशिष्ट कलाविषयक ठिकाण असून तेथें जमणारे सर्व विद्यार्थी प्रौढ असत. या विद्यार्थ्यांना आपणांस काय पाहिजे हें ठाऊक असें व तें कसें प्राप्त करून घ्यावयाचे याचेहि ज्ञान असें.

पारिसमधील विश्वविद्यालय प्रोफेसरांचें होतें. सारी सभा त्यांच्या हातांत होती. तेथील विद्यार्थी वयानें बोलोन विश्वविद्यालयापेक्षां कमी वयाचे असत. या विद्यार्थ्यांना अपरिपक्व असें मानण्यांत येई. त्यांचा मुख्य अधिकारी चॅन्सेलर असे. ह्याला बाह्य कामकाजाची सत्ता असे. तथापि थोडे दिवसांनीं रेक्टरच्या हातीं ही सारी सत्ता आली. कारण पैशाचे व्यवहार करण्याचे त्याजवर सोपविलें गेल्यामुळें त्याला अधिकार देणें भाग पडलें. युरोपमधील विश्वविद्यालयाचा इतिहास म्हणजे पारिसमधील विश्वविद्यालयाचा इतिहास होय.

हें विश्वविद्यालय नॉटरडॅममधील शाळेंतून वाढीस लागलें असें म्हणतात. या विश्वविद्यालयाच्या संस्थापनाविषयीं वाद आहे. कोणी म्हणतात, तें ११४० मध्यें स्थापलें गेलें व कोणी म्हणतात त्याची ११७० मध्यें स्थापना झाली. पारिसमधील विद्यालयाला ज्या सवलती आहेत त्या सवलती इतर विद्यालयांनाहि आहेत. तेथील विद्यार्थ्यांना कर द्यावे लागत नसत, लष्करांत जावें लागत नसे, आणि ते दिवाणी कायद्यांच्या कक्षेंत येत नसत. हे कर त्यावेळीं फार जबर असत. त्यामुळें हे कर माफ होणें म्हणजे खरोखर एक प्रकारचें मोठें उत्पन्न असण्यापैकींच होतें. दिवाणी बाबतींत जर त्यांचा हांतून एकादा गुन्हा झाला तर त्याची चौकशी नेहमींच्या दिवाणी कोर्टाकडून न होतां त्यांच्याकडून आपसांतच होत असे. अशाप्रकारें निरनिराळ्या सवलती व हक्क यांना असत. हे विद्यार्थी बहुतेक सारे धर्मोपदेशक असत. त्यांना कोणत्याहि समारंभाचे वेळीं पुढील जागा मिळत असे. पगार, रहाणें वगैरे बाबतींत त्यांची बरीच बडेजावी होती.

ऑक्सफर्डचें विश्वविद्यालय ११६७ त अस्तित्वांत आलें व १२०९ मध्यें केंब्रीजचें विश्वविद्यालय स्थापन झालें. ह्या दोन्ही विद्यापिठांतील शिक्षणपद्धती व व्यवस्था पॅरिस मधील विद्यालयाचे धर्तीवर आहे. येथील विद्यार्थ्यांकरितां शिष्यवृत्त्या ठेवण्यांत आल्या असून त्यांच्या जेवणाखाण्याची व्यवस्था करण्यांत आली आहे.

पॅरिसमधील विश्वविद्यालयाचें काम शिकविण्याचें असें व केंब्रिज आणि ऑक्सफर्डमधील

विश्वविद्यालयांनीं नुसत्या परीक्षा घेण्याचें काम व पदव्या देण्याचे काम स्वीकारलें. तेथील कॉलेजांतून शिक्षणाचें काम होई.

स्कॉटलंडमधील विश्वविद्यालयांत शिकविण्याचें काम चालें. परंतु कांहीं ठिकाणीं विश्वविद्यालयाचें अस्तित्त्व नाकारण्यांत येऊन शिक्षण व पदवी दानाचें काम कॉलेजांनींच ताब्यांत घेतलें. जर्मनींतील विश्वविद्यालयांची वाढ फार नंतरची होय त्यांनीं फ्रान्सचें अनुकरण केलें. त्यांचें कार्य परीक्षा घेण्याचें नसून शिक्षण देण्याचें होतें. स्कॉटलंड व जर्मनींत विद्यार्थ्यांऐवजीं प्रोफेसरांच्या रहाण्या व जेवण करितां वर्गण्या गोळा करीत. तथापि त्यांना स्वराज्यदा, कमी फी पडूं लागल्यामुळें विद्यार्थ्यं ठिक मिळे.

दृष्टीच्या विश्वविद्यालयांची कल्पना वेगळी आहे. प्रोफेसर शिकवितात व स्वतः शिकतात. ...ान परिपक्क झालें आहे असे प्रोफेसर्स ...यामुळें विद्यार्थ्यांना शिकविण्याचें काम, स्वतः शिकावयाचें आहे अशाकडे सोप... असतें.

ब्रिटीश विश्वविद्यालयें म्हणजे शिक्षण तयार करण्याचीं केंद्रें होत. म्हणजे हळूहळू तीं आपल्या पूर्वपदावर जाऊं लागलीं असें म्हणावयास हरकत नाहीं. या विद्यालयांतून स्त्रियांना पदव्या मिळत नसत, परंतु हल्लीं ही आडकांठी उरली नाहीं. आपल्याकडील विश्वविद्यालयें ऑक्सफर्ड, केंब्रीजच्या धर्तीवर आहेत.

युरोपमध्यें फार प्राचीन काळीं जशीं तीन विद्यालयें होतीं तशीं आपल्याकडे नालन्दा व तक्षशिला, विक्रमशीला हीं तीन विद्यालयें भरभराटींत होतीं. सरकारच्या प्रत्यक्ष देखरेखीखालीं चालणारीं विद्यालयें सोडून दिलीं तर बनारसला असणारें हिंदु विश्वविद्यालय, अलिगडला असणारें मुस्लीम विश्वविद्यालय हीं पारिसच्या धर्तीवर आहेत असें म्हणण्यास हरकत नाहीं. ह्या दोन विद्यालयांत धार्मिक शिक्षण मिळतें व तीं जातीविशिष्ट आहेत. ही गोष्ट उघड आहे. याखेरीज राष्ट्रीय चळवळ सुरूं झाल्यापासून जीं टिळक विश्वविद्यालयासारखी विद्यालयें अस्तित्त्वांत येत आहेत त्यांतहि शिक्षण देण्याचें ध्येय प्रामुख्यानें पुढें ठेवण्यांत आलेलें आहे. अशी एकंदर विश्वविलयाच्या उत्पत्तीची व धोरणाची हकीगत आहे.

# राजा व शहाणा प्रधान.

इंग्रज सरकारच्या राजा हिंदुस्थानांत राज्य करीत ...ला मागिरीमध्ये एके दिवशीं त्यानें आपल्या मर्जीतल्या ... प्रधानाचें तोंड उतरलेलें पाहून त्याला असें होण्याचें ...र्वीच्या पराचारलें.

यास लाज ... म्हणाला, "महाराज मला एका ज्योतिषाच्या पहाडतलें आहे कीं माझें मरण जवळ आलें आहे. तेव्हां माझ्या मृत्युनंतर माझ्या कुटुंबाचें कसें होईल याची मला काळजी लागली आहे."

राजा म्हणाला, "अगदीं भिऊं नकोस. मी त्यांची काळजी घेईन." परंतु राजाला आपला प्रधान मरणार याबद्दल खरोखर आनंद वाटला.

कारण प्रधान मेल्यावर त्याची सारी संपत्ती आपल्याला मिळेल अशी त्याची खात्री होती.

एक दोन दिवसांनीं राजानें प्रधान आजारी आहे अशी बातमी ऐकली, व लवकरच तो मेला असें एकानें त्याला कळविलें. हें ऐकतांच राजानें आपल्या शिपायांना प्रधानाच्या घरीं जाऊन त्याची सारी मालमत्ता जप्त करून आणण्याचा हुकूम दिला. त्यांनीं त्याप्रमाणें त्याच्या पेट्या आणल्या. राजाला फार गर्दी झाल्यामुळें त्यानें घाईनें एक पेटी उघडली, आणि आंत त्याला आपला जिवंत प्रधान आढळला. राजा म्हणाला " अरे तूं तर मेला होतास, आतां येथें कसा आलास ? " प्रधान म्हणाला, " महाराज, मी मरणार होतों; परंतु माझ्या मृत्यूनंतर आपण सारी मालमत्ता लांबवाल या विचारानें मी मरण्याचें तूर्त रहित केलें आहे. "

हें प्रधानाचें उत्तर ऐकून राजाला मेल्यापेक्षां मेलें झालें. त्या दिवसापासून त्याचें वर्तन सुधारलें, व सर्व देशाला या प्रधानाच्या मृत्यूचा फायदा मिळाला.

---

## " सुटी अजी संपली. "

( जानकीसुत वांई )

बाळां ऊठ क्षणीं उगा गमूं नको शाला अजी ऊघडी।  
झाली बा, गुरु पूज्य वाट बघती ना जाऊं देई घडी।  
अभ्यासि निज चित्त लावि बहुंसे वेळां बरी लाभली।  
घेई ग्रंथ समग्र जा झडकरी सुट्टी अजी संपली ॥१॥

पृच्छा शिक्षक हा जधिं करिल त्यां बा सांग जें सत्य तें ।  
खेळामाजीं तुवा कसा दवडीला त्वत्काळ तो सत्यते ।  
हो वां पात्रहि कोण मंडळी तुझी कार्यांत नादावली।  
घेई ग्रंथ समग्र जा झडकरी सुट्टी अजी संपली ॥२॥

आतां जाऊं कसा असें पुससि कां? बा काळकां लोटिला।  
केला कां नहीं पाठ आजवरी त्वां कां जासि ओहोटिला।  
घे घे बा अती दक्षता पुनरपी मुद्रा  
घेई ग्रंथ समग्र जा झडकरी सुट्टी अ

बैठे खेळुनी खेळ सांग सखया संपा  
साध्या वाचुनी गोष्टी मोहक अशा धीं वे  
दे बा, सोडुनी बोध हित न जयीं तीं  
घेई ग्रंथ समग्र जा झडकरी सुट्टी अजी

भासें हीत तुला तईं वसतसें उ  
सांगूं काय अधिक हेंचि जयती  
बाळा ह्या पुढती न अल्प दवड  
घेई ग्रंथ समग्र जा झडकरी सुट्ट

# अबूचा पहाड.

आपला देश म्हणजे सृष्टीसौंदर्याचें आगर आहे. लांब लांब नद्या, उंच उंच डोंगर, खोल खोल दऱ्या, दाट जंगलें हीं आपल्या देशाखेरीज इतरत्र क्वचितच दिसून येतील. अबूचा पहाड हा असाच सृष्टी सौंदर्याचें माहेरघर आहे. हा रजपूतांचा प्रदेश असून तो फार डोंगराळ व रानटी आहे. या डोंगरांत त्यांचे स्वसंरक्षणाकरितां ठिकठिकाणीं किल्ले दृष्टीस पडतात. मोंगलाईत त्यांनीं मुसलमानांविरुद्ध याच डोंगरी किल्ल्यांचा आश्रय करून आपल्या देशाचा बचाव केला होता. रजपुतांनीं गाजवलेल्या पराक्रमाचीं वर्णनें तेथील प्रत्येक ठिकाणीं ऐकू येतात.

इंग्रज सरकारच्या गुलामगिरीमध्यें जरी या प्रदेशांतील संस्थानीक असले तरी त्यांना आपण पूर्वींच्या पराक्रमी पूर्वजांचे वंशज आहोंत हें सांगण्यास लाज न वाटतां अभिमान वाटत असतो. अबूचा पहाड हा अरवली पर्वताच्या रांगेपैकीं एक असून अबूच्या पहाडावर तेथील राज्यकारभार चालतो. उन्हाळ्यामध्यें फार उष्णता होऊं लागली म्हणजे साहेब लोक या ठिकाणीं येऊन रहातात. तेथें त्यांचें सैन्यहि असतें. आपल्या देशामध्यें जीं कोरीव कामें आहेत त्यांचे उत्कृष्ट नमुने या ठिकाणीं दृष्टीस पडतात.



देलवाडा येथील जैन प्रतिमा.

हें गांव फार लहान आहे. परंतु त्याच्या आसपास प्रवास करण्यास फार सोईचीं व करमणूकीचीं ठिकाणें आहेत. शिवाय तेथें देवळें अनेक असल्यामुळें हा प्रदेश फारच पहाण्यालायक आहे.

येथें एक सुंदर सरोवर आहे त्याच्या कांठीं इंग्रज व रजपूत लोकांचे बंगले आहेत. सूर्यास्ताच्या वेळीं तेथील शिखरावर उभे राहिलें म्हणजे दृष्टीस अत्यंत नयनमनोहर देखावा दिसतो. सूर्य अस्तास जाण्याच्या वेळची शोभा फारच बहारीची असते. येथें मुख्य पहाण्यालायक ठिकाण म्हणजे दिलवाडा येथील मंदिरें होत. हीं देवळें संगमरवरी दगडाचीं

बांधलेलीं असून त्यावेळीं हिंदी शिल्पकला किती कळसास पोंहोचली होती याची साक्ष पटवतात. हीं चार मंदिरें असून तीं सुमारें हजार वर्षांपूर्वी एका श्रीमंत व्यापाऱ्यानें धार्मिक भावनेनीं बांधलीं. यांच्या बाहेरील भाग एवढें मन आकर्षण करीत नाहीं. परंतु आंतील कोरीव काम पाहिलें म्हणजे अक्कल गुंग होऊन जाते. येथील कामासारखें उत्कृष्ट काम जगांत दुसरीकडे कोठेंहि नाहीं. देवळाचा संगमरवरी दगड वर सांपडला नाहीं, तो खालून शेंकडो मैलांवरून आणून उंच पहाडावर न्यावा लागला. या देवळापैकीं अगदीं अलिकडचें देऊळ बांधण्यास चौदा वर्षें व कोट्यावधी रुपये लागले. सर्वांत जुनें देऊळ विमलशहानें १०३२ मध्यें बांधलें. या देवळाचें शिखर अत्यंत उंच असून त्या मध्यें नाना प्रकारचीं चित्रें कोरलीं आहेत. देवळाच्या आंत मांडी घालून बसलेली अशी एक जैन मूर्त आहे. ही मूर्त काळ्या गुळगुळीत दगडांची केली असून या मूर्तीच्या चेहऱ्यावर शांततेचा छाप दिसून येते.

आठ जन्मानंतर मनुष्याला मुक्ति मिळते अशी जैनांची समजूत आहे. आठ जन्मांपर्यंत दम धरावयास पुष्कळ सोशिकपणा व शांति लागते ती ह्या मूर्तीच्या तोंडावर दिसून येते.

अबूचा पहाड हा एकंदरींत फारच प्रेक्षणीय प्रदेश आहे. या ठिकाणीं दरवर्षी हजारों प्रवाशी येतात. त्या ठिकाणीं हवा अत्यंत थंड व पाणी अत्यंत गार असल्यामुळें उन्हाळ्यासारख्या दिवसांत तेथें जाऊन रहाणें फारच आनंददायक असतें.

---

## कागदी कांसव कसा पोहतो.

एक कागद घेऊन त्याचा आकृती १ मध्यें दाखविल्याप्रमाणें कासव कापावा. मध्यभागीं एक वाटोळें भोंक करून ते [illegible]पर्यंत आकृती २ मध्यें



दाखविल्याप्रमाणें भिडवावें. एका उथळ भांड्यांत थोडें पाणी ओतून त्यांत तुमचा कासव सोडा. त्या कासवाचा खालचा भाग सारा भिजावा परंतु वरचा भाग कोरडा असावा.

तुमच्या साऱ्या मित्रांना कासवाला गती देण्याविषयीं सांगा. ते सर्व दमले म्हणजे तुम्ही एक तेलाचा थेंब घेऊन तो टाकांनीं अगर बोटांनीं हळूच त्याच्या डोक्यांवर सोडा म्हणजे कांसव भराभर पुढें धांवूं लागेल

याचें कारण खालीलप्रमाणें आहे, तेल पाण्यावर नेहमीं पसरण्याचा प्रयत्न करतें. कासवाचें डोकें कोरडें असल्यामुळें तेल फक्त एकाच म्हणजे मागच्या दिशेकडे जाऊं लागेल परंतु कांसव त्या तेलाच्या विरुद्ध दिसेला म्हणजे पुढें जाऊं लागेल. अशा प्रकारें पाण्यावर कांसव पोहूं शकतें.

---

# रविंद्रनाथ टागोर.

आपल्या हिंदुस्थानास भूषणभूत झालेल्या या कवीच्या चरित्राचा वाचकांना अल्पसा परिचय करून देण्याचें योजिलें आहे.

यांचें व्हाईसरॉय पर्यंत वजन असे. ते एक दोन वेळां विलायतेस गेले होते. तेथें खुद्द राणींनीं त्यांची भेट घेतली व यांचा गौरव केला असें म्हणतात.

द्वारकानाथ हे आपल्या कवींचे आजोबा होत. यांनीं इंग्रजी विद्येचें थोडेसें अध्ययन केलें होतें त्यांना आरबी, फारशी या भाषा येत होत्या व त्यांनीं कायद्याचा अभ्यासही केला होता. पुढें ते व्यापारांत शिरले. तेथें त्यांची अत्यंत भरभराट झाली. नंतर त्यांनीं एक बँक काढली. त्यामध्यें त्यांना अलोट संपत्ती मिळाली. त्यांचें धर्माकडेहि तितकेंच लक्ष होतें असें म्हणतात. ते दर वर्षाला १० लाखाचा धर्म करीत. ते संपत्तीमान होते. तसे विद्वानहि



रविंद्रनाथ टागोर.

इ. स. १८४६ त ते वारले. यांना तीन मुलें होतीं. त्यांपैकीं वडील मुलगा देवेंद्र होय. हेंच रविंद्राचें वडील. यांचें लक्ष सदासर्वकाळ ईश्वराकडे असे. त्यांचें लक्ष वडीलार्जित संपत्तीकडे बिलकूल नसे. त्यामुळें वडिलांचा धंदा बुडाला. त्यांना तत्त्वज्ञानाचें व तपश्चर्येचें फार वेड असे. ते दोन वर्षें हिमालयांत जाऊन तपश्चर्या करीत बसले होते. त्यांनीं तत्त्व बोधिनि नांवाची सभा स्थापन केली व शांतिनीकेतन नांवाचा आश्रम स्थापन केला.

तें. त्यांनीं आपल्या कडील शास्त्रांचा व कलांचा उत्कर्ष व्हावा म्हणून निरनिराळ्या संस्था स्थापल्या.

रविंद्रबाबूंचा जन्म १८३१ मध्यें झाला. यांना ६ भाऊ व ५ बहिणी होत्या. त्यांचा वडील भाऊ द्विजेंद्र हा

मुक्त पुरुष आहे. त्यांना आत्मसाक्षात्कार झालेला आहे.

अशा प्रकारें रविंद्रबाबूंच्या पूर्वजांकडे नजर टाकली तर ते सारे निवृत्ती मार्गाचे होते असें स्पष्ट दिसून येतें. तेव्हां अशा कुलामध्यें रविंद्रनाथासारखा अलौकिक पुरुष उत्पन्न झाल्यास त्यांत नवल नाहीं. यांची बुद्धिमत्ता दांडगी असल्यामुळें शाळेंतील मोजलेलें शिक्षण घेण्याचा प्रसंग यांच्यावर आला नाहीं. ते स्वतःच पुस्तकें वाचीत व ज्ञान संपादन करीत. त्यांना एकांतांत बसून विचार करण्याची फार आवड होती. कविता करण्याचा नाद त्यांना पहिल्यापासून असे. परंतु बालपणच्या कविता लोकांचें चित्त इतकें वेधूं शकल्या नाहींत. ते विलायतेस कायद्याचा अभ्यास करण्याकरितां एकदां गेले होतें; परंतु तेथून लागलाच परत आले.

शान्तिनिकेतन हें कलकत्त्यापासून सुमारें १०० मैल दूर असलेल्या बोलपूर नांवाच्या गांवीं आहे. तेथें हा आश्रम आहे या आश्रमांत अनेक विद्यार्थी शिकत आहेत. या ठिकाणीं बसून बाबूमहाशय पारमार्थिक विचार करतात व पुस्तकें लिहितात. शहरापासून हा आश्रम दूर असल्यामुळें तेथें पावित्र्य व शांतता वास करीत आहे. वेदकालीन ऋषींचें आश्रम जसे असत तसा हाहि एक आश्रम आहे. येथें नुसतें निरस बौद्धिक शिक्षण दिलें जात नाहीं. धार्मिक शिक्षणाकडे व शीलसंवर्धनाकडे त्यांचे सारें लक्ष असतें. या आश्रमाला प्रत्येकानीं शक्य असल्यास एकदां जाऊन भेट द्यावी.

रविंद्रनाथाचें कवितालेखन हळूंहळूं वाढत चाललें. त्यांत उज्वल प्रतिभा असल्यामुळें लोकांचें लक्ष त्यांच्या कवितांनीं वेधलें. त्यामध्यें मुख्यतः पारमार्थिक विचारांचा अन्तर्भाव असल्यामुळें लोकांना त्यांचें लेखन फार पसंत पडलें. अशा प्रकारें त्यांची कीर्ति वाढत वाढत पाश्चात्य देशांपर्यंत जाऊन पोहोंचली. त्या देशांत जगांतील प्रतिभा संपन्न विद्वानाला नोबलप्राईज दरवर्षीं देत असतात हें नोबलप्राईज टागोर बाबूंना १९१३ सालीं मिळालें. तें बक्षिस१ लक्ष २० हजार रुपयाचें अततें. ही सारी रक्कम बाबूंनीं आपल्या आश्रमाला देऊन टाकली. बाबूंनीं आतां पर्यंत अनेक कविता, नाटकें व कादंबऱ्या प्रसिद्ध केल्या आहेत. त्यांपैकीं गीतांजली ही अत्यंत श्रेष्ठ दर्जाची आहे.

टागोर बाबूंना गाण्याचा फार नाद आहे. ते आपल्या कविता रचतात व गातात. रविंद्रनाथ टागोर यांनीं सर्व जगभर प्रवास केला आहे. ते ज्या ज्या ठिकाणीं गेले त्या त्या ठिकाणीं अत्यंत लोकप्रीय झाले. जर्मनी अमेरिका वगैरे देशांतील लोकांना रविंद्रनाथ म्हणजे आपलेच कवी आहेत असें वाटते. त्यांच्याबद्दल तिकडे जितकी जिज्ञासा आहे तितकी आपल्याकडे नाहीं; त्यानीं आपल्या प्रवासामुळें हिंदुस्थानचें नांव चिरस्मरणीय करून ठेवलें आहे. हिंदुस्थान देशाच्या तत्त्वज्ञानाबद्दल व सात्विकतेबद्दल इतर देशांतील लोकांना आदर वाटावयास यांच्या सारखेच महात्मेच कारणीभूत होतात. टागोर बाबू जेथें जेथें जात तेथें तेथें त्यांच्या भोंवतीं बेसुमार गर्दी होई. त्यांचीं तिकीट लाऊन केलेलीं व्याख्यानें ऐकण्यासहि पुष्कळ लोक जात. रविंद्रनाथांनीं आतां एक विश्वभारती नांवाची संस्था काढली आहे. या संस्थेंत जगांतील निरानिराळे विद्वान लोक येतात व ज्ञान प्राप्त करून घेतात. याच्या शाखा सर्व जगभर पसरविण्याचा त्यांचा उद्देश आहे. तो केव्हां सफल होईल तें खरें. अशा प्रकारें रविंद्रबाबू पूर्ण निस्वार्थ बुद्धीनें आपल्या देशाच्या उन्नतीकरितां झटत आहेत. त्यांना सगळें जग आनंदमय व्हावें असें वाटतें.

सध्यां सर्वत्र जी मारामारी, हाणाहाणी चालू आहे, ती त्यांना नको आहे. सगळ्यांनीं गोडी गुलाबीनें व आनंदानें रहावें म्हणचे त्यांतच ईशप्राप्ती व पूर्णावस्था आहे असें त्यांचें मत आहे.

---

# रबर.

सध्यांच्या काळीं आपल्या वापरण्यांत रबर फार येतो. जेथें तेथें रबराचा उपयोग होतो. रबराच्या किती वस्तू होतात याचा पत्ताच नाहीं. सायकली, मोटारी, यांचें जीवन तर रबरावर अवलंबून आहे. अशा या उपयुक्त वस्तूची माहिती आपणास असावी म्हणून आपण त्याचा थोडासा विचार करूं. या वर्षेपर्यंत तसेंच पडून राहिलें.

पुढें कोर्टेझ नांवाच्या एका गृहस्थानें आशिया खंडांत रबराचा कसा उपयोग करतात ही माहिती युरोपियन लोकांना दिली. परंतु त्यांनीं त्यापासून फारसा फायदा करून घेतला नाहीं. या रबराचे प्रथम त्यांनीं कोट केले. परंतु ते कोट उन्हाळ्यांत




मलयांतील रबराच्या झाडांचा चीक काढीत आहेत.

रबराची माहिती लोकांनाकोलंबसाच्या वेळेपर्यंत नव्हती. कोलंबसानें जेव्हां अमेरिकाखंड शोधून काढलें तेव्हां या वस्तूचा शोध त्याला लागला. त्यानें ही वस्तू एक आश्चर्यकारक चीज म्हणून आपल्या बरोबर स्पेन देशांत नेली परंतु त्याचा काय उपयोग करावा ही माहिती कोणालाच नसल्यामुळें रबर शंभर वितळत व हिवाळ्यांत आवळत. अखेरीस या रबराचें काय करावें हें त्यांना कळेना तों वेळपर्यंत या वस्तूला रबर असें नांवहि नव्हतें परंतु एका गृहस्थानें हा गोळा पेन्सिलीनें लिहिलेल्या एका कागदावर घांसला त्याबरोबर तो लिहिलेला मजकूर पुसला गेला. तेव्हां या वस्तूला “ पुसणारी ” असें म्हटलें गेले.

हीं झाडें उगवतच होतीं; परंतु त्यांचा नीटसा उपयोग कसा करावा हें लोकांच्या ध्यानांत येईना. शेवटीं गुडइयर नांवाच्या गृहस्थानें रबराला बोटल तितका घट्ट अगर मऊ करण्याची कृती शोधून काढली.

ही कृती करतांना रबरांत थोडें सल्फर घालावें लागतें. गेल्या पन्नास वर्षांत रबराचा तर फारच उपयोग होऊं लागला आहे. त्याच्या ३३००० वस्तू केल्या जातात असें एकान शोधून काढलें आहे.



जावांतील रबराचें झाड.

परंतु अॅमेझानच्या रबराइतके त्यांत गुणधर्म नाहींत.

ब्रिटिश लोक पक्के व्यापारी असल्यामुळें त्यांना कांहीं दिवसांनीं रबराला फार महत्त्व येईल ही गोष्ट पटली आणि त्यांनीं अमेरिकेंत आपला एक माणूस रबराची चौकशी करण्यास पाठविला. त्यानें सारी चौकशी केली एवढेंच नव्हे तर येतांना आपल्या बरोबर रबराचें बींहि आणलें.

उष्ण कटिबंधांत रबराच्या झाडांची उत्पत्ती होते रबराच्या झाडाची लागवड करण्यापूर्वीं रबराचा चीक गोळा करणें म्हणजे जीवावरचें काम असे. अर्धाशेर रबर मिळविण्यास सबंध प्राणाची आहुति द्यावी लागे. अॅमेझॉन नदीच्या कांठीं असलेल्या दलदलीच्या जागीं ही झाडें असत. आफ्रीका वगैरे ठिकाणीं हीं झाडें आहेत,

पुढें ब्रिटिश लोकांनीं हें बीं सिंगापूर, मलाया, सिलोन वगैरे ठिकाणच्या बागेंत पेरलें. नंतर अनेक प्रयोग करून त्यांनीं असें सिद्ध केलें कीं रबराच्या झाडांची उत्पत्ती अमेरिकेंत जशी होते तशीच आशिया खंडांत होण्यास हरकत नाहीं.

हें इंग्लिशांचें उदाहरण पाहून इतर अमेरिकेंतील व युरोप मधील लोक रबराचीं झाडें तिकडे लावूं

लागले व वसाहती करूं लागले त्यांनीं तेथील जंगलें सारीं पादाक्रांत केलीं असून दलदलीचा प्रदेश कोरडा ठणठणीत केला आहे.

या साऱ्या लागवडीवर ब्रिटिशांचा ताबा आहे.



रबराचा रस ओतणें चालू आहे.

अमेरिकेंतील लोक तेथील ७० टक्के रबर नेतात. एकंदर आशिया खंडांत ३५ लक्ष एकर अगर ५५०० चौरस मैल जमीन रबराच्या झाडांनीं व्यापली आहे व ती जागा ब्रिटिशांची आहे.

अमेरिकेचीहि तेथें ७० मैल जागा असून त्यावर रबराची लागवड करतात.

रबराचें झाड लवकर वाढतें. तें पांच वर्षांचें झालें म्हणजे चीक काढण्यास योग्य होतें. हा चिक झाडाला भेगा पाडून काढतात. ताडीच्या झाडाला ज्याप्रमाणें मडकीं बांधून त्यांत रस गळतो त्याप्रमाणें रबराच्या झाडाला लहान प्याले बांधून रस गाळण्यांत येतो. या रसाला दूध म्हणतात. कारण चीक निघतां क्षणींच अगदीं पांढरा असतो. परंतु हवेच्या योगानें तो पिवळा पडतो. चीक काढल्याबरोबर तो घट्ट केला पाहिजे, नाहीं तर तो खराब होतो पूर्वींच्या रानटी पद्धतीप्रमाणें तो काढतां क्षणींच चुलीवर ठेवीत असत.



रबराच्या झाडाचीं पानें व बीं.

रबराचा चीक काढतांच तो घट्ट वगैरे करण्याचें काम हल्लीं शास्त्रीय पद्धतीनें होत असून त्याकरितां रसायन शास्त्रांतील तज्ज्ञ नेमले आहेत. या चिकांत शेंकडा ३५ रबर असतें व ५८ पाणी असतें.

अमेरिकेंतून रबराला आशियांत आणावयास बारा वर्षें लागलीं. कांहीं वर्षांपूर्वी जगाला ५०००० टन रबर लागे व तें सारें अमेरिकेंतून येई; परंतु आतां त्याच्या सहापट रबर लागतें व तें सर्व आशियाकडून येतें. तथापि अमेरिकेंतहि हा उद्योग चालूच आहे; परंतु त्याला फारशी ऊर्जितावस्था नाहीं.

# एक खेडवळ व तिघे चोर.

एकदां एक शेतकरी आपल्या गाढवावर बसून बाजाराला चालला होता. त्याच्यामागें एक बकरा होता, त्याला दोरी बांधली असून ती दोरी गाढवाच्या जीनाला अडकवली होती. तो खेडवळ चाललेला पाहून तिघा चोरांनीं त्याला लुबाडण्याचा बेत केला.

एक म्हणतो, "चांगलें सावज सांपडलें आहे. मी त्यांचा बकरा पहा कसा त्याच्या न कळत चोरून आणतो तो."

"आणि मी" दुसरा चोर म्हणतो, "तुझ्या पेक्षां कांहीं तरी अजब करून दाखवितों. मी त्याचें गाढव त्याच्या परवानगीनें घेतों आणि त्याला माझे उपकार मानावयास लावतों."

तिसरा म्हणतो, "यांत काय मोठें. मी तुम्हा दोघांपेक्षांहि कांहीं तरी जास्त करून दाखवितो. मी त्याचा कोटच घेतो व मला मित्र म्हणावयाला लावतो"

अशा प्रकारें तिघांनीं बेत करून त्या शेतकऱ्याला लुबाडण्याचे ठरविलें.

पहिला चोर हळूच त्याच्या मागें गेला. त्यानें त्या बकऱ्याच्या गळ्यांतली घंटा काढली व गाढवाच्या शेपटीला बांधली व बकरा पळवून नेला. त्या खेडवळाला घंटेचा आवाज सारखा येत असल्यामुळें आपला बकरा कोणी नेला असेल असा संशयहि आला नाहीं. बराच वेळ गेल्यावर तो खेडवळ मागें वळून पाहूं लागला तेव्हां त्याला आपला बकरा दिसला नाहीं. त्याबरोबर त्याला फार आश्चर्य वाटलें. तो इकडे तिकडे पळूं लागला. परंतु बकरा कोठेंच दिसेना. इतक्यांत दुसरा चोर तेथें आला. तो म्हणाला, 'महाराज मी आतांच एक बकरा या रस्त्यानें जातांना पाहिला, तो तुमचाच असावा. आपण त्याचा पाठलाग करा, तोपर्यंत मी तुमचें गाढव सांभाळतों. त्या खेडवळांनीं त्या चोराचे मनःपूर्वक आभार मानले व तो बकऱ्यामागें गेला. इकडे तो चोर लागलाच गाढवावर बसला व पळून गेला.

त्या शेतकऱ्यांनीं आपला बकरा शोध शोध शोधला पण त्याचा पत्ता लागेना. अखेरीस तो निराश होऊन परतला. पण पूर्वीच्या जागीं येतो तों त्याला आपलें गाढवहि पळवून नेल्याचें आढळून आलें. तो त्या दोघांवर अत्यंत रागावला व आपण असा मूर्खपणा केला म्हणून स्वतःवरहि संतापला

"बरं तर" "तो म्हणतो" आतां जो कोणी मला फसवायला येईल त्याची मी बिलकूल डाळ शिजूं देणार नाहीं. मी आतां चांगला सावध होतो! असें म्हणत तो पुढें चालला होता इतक्यांत त्याला कोणी रडत असल्याचा आवाज ऐकूं आला, तो तेथें गेला व त्याला एक मनुष्य विहिरी जवळ रडत बसलेला आढळला. हा तिसरा चोर होता. खेडवळ म्हणतो "कारे बाबा तूं कां रडतो? तुला काय वाटते कीं, जगांत आपण एकटेच दुःखी प्राणी आहोत? मी आतां बाजाराला चाललो होतो तों दोघा चोरांनीं माझा बकरा व गाढव पळवून नेले?"

"अं: त्यांत काय मोठें? त्यांची काय किंमत! मी जडजवाहिराची पेटी घेऊन चाललो होतो आणि नेण्याच्या श्रमामुळें थकलो म्हणून ती पेटी या विहिरीच्या कांठावर ठेवली होती. इतक्यांत ती पेटी आंत पडली आणि माझी सारी संपत्ती नाहींशी झाली. ती पेटी तळाशी जाऊन पडली आहे."

त्या खेडवळानें विहिरींत डोकावले, पण त्याला आंत कांहीं दिसेना.

तो म्हणाला "तूं आंत उडी मारून पेटी कां वर आणीत नाहींत."

चोर म्हणतो "बाबारे! काय सांगू तुला. मला उडी मारता येत नाहीं. आणि पोहताहि येत नाहीं! जर कोणी पाणबुड्या मला मिळाला आणि त्यानें ती पेटी वर आणली तर मी त्याला त्यांतली निम्मी संपत्ती देईन."

"खरोखर निम्मी देशील? तर मी उतरतो आणि पेटी काढतो" त्या चोराला फार हर्ष झाला तो म्हणाला "खात्रीनें मी तुला निम्मे जवाहीर देईन."

आपल्या गाढवापेक्षा व बकऱ्यापेक्षां आपल्याला जास्त द्रव्य मिळणार असें पाहून त्या शेतकऱ्याला फार आनंद झाला व त्यानें त्याचे फार आभार मानले.

नंतर त्यानें आपला कोट काढला व तो त्या चोराजवळ दिला. पुढें त्यानें आंत उडी मारली व सारी विहिर धुंडाळली पण त्याला कांहीं सांपडेना. ही बातमी तो वर सांगायला आला पण त्याला आपला कोट लांबवला एवढेंच कळून चुकले.

---

## ->> नलिनिताईची गोष्ट. <<-

आमची नलिनि एका गरीब लांकूडतोड्याची मुलगी होती. एके दिवशीं संध्याकाळीं फुलें तोडीत असतां तिला एक उंदीर दिसला. तो उंदीर पांढरा स्वच्छ होता. नलिनीनें त्या उंदराला पकडण्याचा बेत केला व त्याला धरले. ती म्हणाली "किति छान आहे हा! मी याला घरीं नेईन, आणि पिंजऱ्यांत ठेऊन देईन." इतक्यांत तो उंदीर म्हणतो "नको नलिनि नको. मला तुझ्या घरीं नेऊं नकोस. तें दुष्ट मांजर मला केव्हां मारून खाईल याचा नेम नाहीं. मला येथेच सोड. मी साऱ्या उंदरांची राणी आहे आणि तुझ्या दयाळुपणाबद्दल मी तुला बक्षीस देईन."

नलिनि विचारते "तूं काय देशील मला?"

ती म्हणाली "तूं काय मागशील तें देईन. तूं फक्त या झाडाजवळ येत जा, तीन टिचक्या मारीत जा म्हणजे मी वर येऊन तुझी इच्छा पूर्ण करीन."

" बरं तर. " नलिनि म्हणते " माझ्या वडीलांची लहान झोपडी आहे तिचे टुमदार घर बनव. "

" जा तूं घरीं जा म्हणजे तुला घर झालेलें दिसून येईल " असें उंदरानें उत्तर दिलें. नलिनीनें उंदराला बिळांत सोडलें व आपल्या घरचा रस्ता पकडला.

घरीं येतांच तिला आपल्या गचाळ घराच्या जागीं एक छानदार घर झालें असल्याचें दिसून आलें. त्या घरा भोंवतीं चांगलीं बाग, फळझाडें, गाईचे गोठे, घोड्याचे तबेले व पुष्कळ जनावरें असलेलीं तिला दिसलीं. पुढें तिचा बाप घरीं आला व त्याला हा नवीन झालेला बदल पाहून फार आश्चर्य वाटलें.

त्याच गांवांत एक धडधाकट शेतकरी रहात असे. तो त्याच दिवशीं संध्याकाळीं नलिनीकडे आला व आपल्याबरोबर लग्न करण्यास तिला विनवूं लागला; परंतु आतां ती पूर्वींची नलीनी राहिली नव्हती. ती फार गर्विष्ट व शिरजोर झाल्यामुळें तिनें त्या शेतकऱ्याचा धिःकार केला व त्याला हाकून लावलें.

आपण त्या उंदराच्या राणी कडून एवढी अल्प देणगी मागून घेतल्याबद्दल नलिनिला वाईट वाटलें व ती पुनः तिच्याकडे गेली व त्या झाडावर तीन टिचक्या मारिल्या. त्या बरोबर ती बाहेर आली

" तुला काय पाहिजे? " असें तिनें नलिनीला विचारलें.

नलिनि म्हणाली " तूं दिलेलें घर फार लहान व घाणेरडें आहे. त्याच्या ऐवजीं मला एका सरदारा एवढें घर, पैसाअडका, उंची कापड, चाकर नोकर, गाडी घोडा वगैरे दे. "

" ठीक आहे, जा " असें त्या उंदरानें उत्तर दिलें. नलिनी घरीं येतें तों चाकर नोकर तिची वाट पहात असलेले तिला आढळून आले. ती फार श्रीमंत झाली होती. एक सरदाराचा मुलगा तिला मागणी घालावयास आला. परंतु नलिनीची किंमत चढू लागली. तिनें त्याच्या बरोबर लग्न करण्याचें नाकारलें तिला एखाद्या मोठ्या जहागीदाराबरोबर लग्न करण्याची इच्छा झाली. म्हणून ती पुनः उंदराच्या बिळाकडे गेली व टिचकी वगैरे मारून उंदीर वर आल्यावर म्हणू लागली.

" मला जहागीरदारीण व्हावयाचे आहे व रहाण्याला एक मोठी थोरली इमारत पाहिजे आहे. "

" बरं तर जा. तुझ्या इच्छेप्रमाणें होईल " असें म्हणून तिला परत लावून देण्यांत आलें.

अशा प्रकारें नलिनी जहागिरदारीण झाली. लागलीच एक जहागीरदार तिला मागणी घालण्या करितां आला; परंतु त्यांतहि तिचें समाधान होईना. तिला राणी होण्याची इच्छा झाली. ती पुनः उंदराकडे गेली व आपल्या घराचा राजवाडा कर म्हणून विनवूं लागली. तेव्हां उंदराच्या राणीनें उत्तर दिले.

" पहा नलिनी पहा! तूं फार शिरजोर होऊं लागलीस. जा आतां ही माझी शेवटचीच देणगी आहे. "

त्याच दिवशीं एक राजपुत्र त्या अरण्यांत शिकारीस आला. तो हरिणाची शिकार करीत असतां त्याला एक भव्य राजवाडा दिसला. तो त्या राजवाड्याकडे चालला असतां त्याला उंची पोषाख केलेली व सुस्वरुप दिसणारी नलिनी भेटली. राजाचें मन एकदम तिजवर बसलें व त्यानें तिला आपली राणी होण्याविषयीं म्हटले.

अखेरीस नलिनीची इच्छा पुरी झाली.

जगांत कोणत्याहि गोष्टीची कमतरतां तिला उरली नाहीं. तिच्या भोंवतीं मोठमोठ्या स्त्री पुरुषांचा जमाव होऊं लागला. लग्नाची तयारी अभूतपूर्व अशी

चालली होती. लग्नाची वेळ जवळ येत चालली. आतां वधूवरांचें लग्न लागणार इतक्यांत नलिनी म्हणाली "जरा थांबा जरा थांबा माझें थोडेसें काम राहिलें आहे, तेवढें करून येतें."

असें म्हणून ती तेथून निसटली व उंदराच्या बिळाजवळ आली. ती अधिकारी वाणींत उंदराच्या राणीला म्हणूं लागली कीं एक महाराणी आली आहे, तिला भेटावयास तूं वर ये.

उंदराची राणी आतां फार संतापली ती म्हणाली "अद्याप तुझें समाधान झालें नाहीं?" नलिनी म्हणाली, "आतां मला एकच देणगी दे म्हणजे झालें. मी जें जें काय म्हणेन तें तें माझ्या नवऱ्यानें ऐकावें म्हणजे मीच राज्य कर्त्री होईन."

"अझून तुझें लग्न झालें नाहीं तोंच इतकी तूं उन्मत्त झालीस. लग्नापूर्वीं तूं किती तरी सुशील व आज्ञाधारक मुलगी असावयास पाहिजे. जा आतां घरीं जा आणि शहाणपणा शिक."

नलिनी घरीं निघाली. तिला भीति वाटूं लागली तिचे सारे उंची कपडे जाऊन त्या ठिकाणीं चिंध्या असलेले जुनें कपडे दिसूं लागले. राणीची क्षणैक गादी सोडून ती पुनः खेड्वळ मुलगी बनली. नवा राजवाडा जाऊन त्याठिकाणीं जुनी झोंपडी दिसूं लागली. मोठ्या आश्चर्याची गोष्ट म्हणजे जेव्हां तिचा बाप परत आला तेव्हां त्याला त्याबद्दल कांहींच वाटलें नाहीं. शेजारच्या लोकांनाहि आश्चर्य वाटेनासें झालें "तर मग हें सारें स्वप्न होतें कीं काय?" असें ती स्वतःला म्हणूं लागली. त्या लहानग्या उंदरानें सगळ्यांच्या मनावर अशा प्रकारचा भास उत्पन्न केला कीं, त्यांना त्या बदल झालेल्या गोष्टीचा विसर पडला. परंतु नलिनी यापासून चांगला धडा शिकली. ती सुखभावी व सद्गुणी मुलगी झाली. तिची पूर्वींची वृत्ती मावळली. तिनें त्या पहिल्या शेतकऱ्या बरोबरच लग्न लावलें. त्या स्थितींत तिचें समाधान राणीलाहि हेवा वाटण्याजोगें होतें.

---

## उत्तम गवई.

एका गाणसाला आपला गळा फार उत्तम आहे असे वाटे. याकरितां त्यानें आपला आवाज कमावून एके दिवशीं सर्वांना आपल्या गाण्यानें चकीत करून सोडण्याचें ठरविलें. याकरितां तो एका खेडेगांवीं जाई व तेथील एका टेकडीवर बसून गात असे.

तो बसत असे त्याच्या समोर एका परटीणीची झोंपडी असे. जेव्हां जेव्हां हा माणूस गाण्यास सुरवात करी तेव्हां तेव्हां ही बाई रडूं लागे. त्याचें गाणें थांबतांच हिचेंहि रडणें थांबे.

तो गवई म्हणे, "माझ्या गाण्यानें एका गरीब बाईच्या अंतःकरणांत कालवाकालव होते हें काय थोडें आहे."


एके दिवशीं हा गवई त्या बाईकडे गेला व तिच्या रडण्याचें कारण विचारूं लागला. त्याचा उद्देश एवढाचे होता कीं, तिच्या तोंडून आपल्या गाण्याची थोरवी ऐकावी.


ती म्हणाली, "बाबारे! जेव्हां जेव्हां मी तुझें गाणें ऐकतें तेव्हां तेव्हां माझ्या नुकत्याच मेलेल्या गाढवाची आठवण होऊन मला रडूं येतें. तें गाढव अगदीं आपल्याप्रमाणें गात असे"

---

# ८ मौज मजा आणि गंमत.

एक लांकडाचा लांब तुकडा घ्यावा आणि त्याला करवती प्रमाणें खांचा पाडाव्या. त्या लांकडाच्या टोंकाला एक टाचणी टोंचावी. या टाचणीमध्यें दोन कार्डें लावावीं. नंतर पेन्सील अगर लाकडाचा तुकडा घेऊन या खांचांतून जोरानें फिरवावा म्हणजे तीं कार्डें जोरानें फिरूं लागतात.







इंग्रजी आंकडे कसे निघाले.



जगांतील लांब दाढीचीं माणसें.

# विश्वासाचें फळ.

एका शेतकऱ्याला एक कोल्हा दिसला. त्यानें एक काठी घेतली व म्हटलें, " चोरा चल निघ चालता हो. "




हें ऐकून त्या कोल्ह्याला रडूं आलें. तो म्हणाला, " माझें दैवच वाईट. जो तो मला वाईट शब्द वापरतो. सारें जग माझ्या उलट झालें आहे. मी जन्मल्यापासून एकहि मनुष्य माझ्याशीं गोड शब्दांनीं बोलला नाहीं. " हें ऐकून त्या शेतकऱ्याला वाईट वाटलें व रडूं कोसळलें



तो म्हणाला, " बरं तर, मी तुझी परीक्षा करतों. तुला माझ्या घरीं खायला चांगलें अन्न व रहायला घर मिळेल. माझ्या बदकावर व कोंबड्यावर तूं देखरेख कर. कोणी रानटी पशू आला तर त्याला हांकून लाव. "

हें ऐकून त्या कोल्ह्याला फार आनंद झाला. तो म्हणाला. " मी तुमची नोकरी फार प्रामाणिकपणें करीन. "





कोल्ह्यानें सुमारें १५ दिवस आपलें काम चांगलें केलें. पण पुढें त्याची बुद्धि पालटली. त्यानें एके रात्रीं वीस कोंबड्या खाल्लया आणि जंगलांत यःपलायन केलें.

शत्रूवर कधींहि विश्वास ठेऊं नये.

---

# शालापत्रकाची चढाओढ.

**पान ९६ मधील कोड्याचें उत्तर.**

१ गांधी
२ मेथा
३ दादाभाई नौरोजी
४ दास
५ अजमलखान
६ लजपतराय
७ टिळक .
८ नेहरु
९ सरोजीनी
१० मोतीलाल घोस
११ महंमदअली
१२ गोखले
१३ मालवीय
१४ टागोर

**उत्तरें बरोबर पाठविणारांचीं नांवें.**

१ वसंत वासुदेव बाबासुंदर [ मांडवगण ]
२ श्रीपत लक्ष्मण विलणकर [ मुंबई ]
३ पंढरीनाथ रामकृष्ण आलेगांवकर [ खडकी ]
४ वि. गं. चंद्रात्रे [ खाकुर्डी ]
५ गणेश महादेव केळकर केळये [ रत्नांगिरी ]
६ भगवान जनार्दन पांडेकर [ सोलापूर ]
७ दत्ता अनंत पै मडगांव [ गोंवा ]
८ स. कृ. डगांवकर [ हरिपूर हरदा ]
९ वामन दाजी नांदेकर अलंपूर

**पान १२० वरील कोड्याचीं उत्तरें. सर्वांकरितां.**

१ सार्वजनीक
२ विश्वविद्यालय
३ शारंगधर
४ ज्ञानेश्वर

**उत्तरें बरोबर पाठविणारांचीं नांवें.**

१ दत्ता अनंत पै मडगांव गोवा [ १ ]

२ गणेश महादेव केळकर [ ४ ] केळये रत्नागिरी
३ वसंत वासुदेव बाबासुंदर [ ३ ]
४ राजाराम बाबाजी पोतदार मोर्वे [ कुलाबा ] ३
५ पंढरीनाथ रामकृष्ण आलेगांवकर खडकी ३
६ पु. दा. जोशी इचलकरंजी [ ३ ]
७ सदाशिव कृष्ण डगांवकर हरिपूर हरदा [ ३ ]
८ यशवंत पांडुरंग पागनिस कारवे [ बेळगांव ] ३
९ वामन दाजी नांदेडकर अलंपूर

**लहान मुलांकरितां.**

उत्तर आयुर्वेद.

**नांवें**

१ मनोहर बाळाजी सरवटे, मुंबई.
२ पांडुरंग यशवंत पागनिस कारवे, [ बेळगांव ]
३ सदाशिव लक्ष्मण दातार, पुणें.

---

## बक्षीसें.

१ दत्ता अनंत पै यांस अर्वाचिन महाराष्ट्र.

२ गणेश महादेव केळकर यांस विद्वत्त्व कवित्त्व वक्तृत्व.

३ मनोहर बाळाजी सरवटे यांस ध्रुव चिलीया.

४ पांडुरंग यशवंत पागनीस यांस चिमुकलें रामायण.

५ स. ल. दातार यांस शीलंपरं भूषणं.

### मुलांकरितां.

**माझें पहिलें अक्षर**

हरिणांत आहे पण गाढवांत नाहीं.

माझें दुसरें अक्षर पुस्तींत आहे पण कित्त्यांत नाहीं.

माझें तिसरें अक्षर नागपुरांत आहे पण मुंबईत नाहीं.

माझें चवथें अक्षर नुपूरांत आहे साखळींत नाहीं.

माझें पांचवें अक्षर शालापत्रकांत आहे, कागदांत नाहीं.

आणि पांचीं अक्षरें मिळून मी एक राजधानी बनतों तर मी कोण ?

### सर्वांकरितां.

खालील अवयवांचे शब्द बनवा.

१ अ त् ई, ग्, अ ग् अ, श् त् अ अ भ् त् अ त् ई म् र्

२ अ र्, अ अ, ह् ई, क, स्, अ अ त् आ.

३ अ, अ, म्, ह्, ई, प् प्, र् आ, त् स् अ

| कूपन. |
|---|
| |

| सर्वांकरितां कूपन. |
|---|
| |

---

**दुरुस्ती:**—मागील खेपेस ' नेपोलियन बोनापार्ट ' व ' आपल्या गांवचा इतिहास ' या विषयांच्या लेखकांचीं नांवें राहिलीं होतीं. तीं अनुक्रमें रामचंद्र त्र्यंबक लेले व महादेव विष्णु दांडेकर अशीं समजावींत.

# जादूचे प्रयोग.

**प्रयोग १ ला.**

हा प्रयोग करणारांनीं लोकांना सांगावें कीं, माझे हातपाय गच्च आवळून टाका. मी तोंडांतली आंगठी तुम्ही सांगाल त्या बोटांत घालतों.

पुढें जादुगारानें प्रेक्षकांपैकीं कोणाचे तरी चार पांच रुमाल मागून घ्यावेत व स्वतःला लोकांकडून खुर्चीला आवळून घ्यावें. नंतर त्याच्या तोंडांत एक प्रेक्षकांतूनच मागून घेतलेली आंगठी ठेवावी.

पुढें त्याच्या तोंडांतली आंगठी बोटांत गेली आहे असें आढळून येईल. खुर्चीला बांधलेल्या गांठी जागच्याजागीं असतात.

**हें कसें झालें.**

तोंडांत आंगठी घातल्यावर एक झिरझिरीत पडदा अथवा पांघरूण त्याच्यावर घालावें जादूगार आपल्या तोंडांतली आंगठी मांडीवर पाडतो व तेथून ती सरकत सरकत खुर्चीवरून बोटाकडे जाते. त्याकरितां खुर्ची थोडीशी मागें सरकवावी लागते; परंतु त्यांत कांहीं कठीण नाहीं.



अशारीतीनें ती आंगठी त्याच्या बोटांत जाऊन बसते आणि कोणालाही संशय येत नाहीं.

**प्रयोग २ रा.**

हा प्रयोग लोकांना फार आश्चर्यकारक वाटेल. परंतु तो अगदीं सोपा आहे. जादुगार एक ३½ इंच व्यासाचें कडें लोकांना दाखवतो. पुढें त्या जादुगाराचे हात एका दोरीनें बांधून टाकण्यांत यतात. मात्र दोन मनगटांच्या मध्यें थोडीशी दोरी असावी. पाहिजे असल्यास त्याला पुनः खुर्चीला बांधून टाकावें; परतु त्याची जरूरी नाहीं. पुढें तें कडें त्याच्या डोक्यावरठेवावें व पडदा पाडावा. लागलाच पडदा उचलावा व तें कडें हात बांधलेल्या दोरींत अडकवलेलें दिसून येतें



**हें कसें**

हें करण्याची युक्ती फार सोपी आहे. त्यानीं दुसरें तेवढेंच कडें अगोदर हातांत घालून ठेवावें. कडें कोटाच्या अस्तन्यांनीं झांकून गेलेलें असतें. पडदा पडतांच हें कडें सरकवावें म्हणजे दोरींत जाऊन आडकतें

# लहान मुलांकरितां उपयुक्त अशीं पुस्तकें.

नवी आवृत्ति ] **सचित्र अक्षरबोध.** [ नवी आवृत्ति

या पुस्तकांत 'अ' पासून 'ज्ञ' पर्यंत स्वर आणि व्यंजनें हीं सर्व निरनिराळ्या भपकेदार रंगांत तें अक्षर नांवाच्या प्रथम अक्षरानें दर्शविणाऱ्या चित्रांसह दाखविलेलीं असून १ पासून १० पर्यंत अंकहि वरील पद्धतीनें दाखविलेले आहेत. पुस्तकाचा साईज क्राऊन चतुर्थांशाइतका मोठा ७×९ इंच ठेवला असल्या-मुळें अक्षरें व चित्रें फारच सुबक व मोठीं अशीं झालीं आहेत. एकंदर पुस्तक इंग्रजींतील सचित्र रंगीत ए बी सी डी शिकण्यास उपयोगी अशा पुस्तकाच्या धर्तीवर तयार केलें असल्यामुळें हें पुस्तक लहान मुलांस फारच आवडून त्यावरून तीं आपला धडा सहज शिकतात. किं. ८८.

## उजळणीचें पुस्तक.

ह्यांत सर्व मुळाक्षरें चित्रयुक्त दिलीं असून मोडी व बाळबोध बाराखड्या तयार करण्याची समजूत थोडक्यांत करून दिली आहे. नंतर मोडी व बालबोध सोपे शब्द मुलांना सहज ओळखण्यासारखे दिले आहेत. पुढें १० अंक सचित्र दिले असून त्यांबरोबरच मुलांस बेरीज व वजाबाकीची समजूत टिंबांच्या आकृतींनी व गोट्यांच्या चौकटीच्या सहाय्यानें घालून दिली आहे. नंतर पाढ्यांची समजूत दिली असून शेवटीं उजळणी दिली आहे. एकंदरींत हें पुस्तक नवीन तऱ्हेनें मुलांना शिकविण्यास फार उपयुक्त असें झालें आहे कागद ग्लेज किं. ८।८६

भाग १ ते ६ ] **चिमुकल्या गोष्टी.** [ भाग १ ते ६

ह्या गोष्टींत रोज व्यवहारांत घडणाऱ्याच गोष्टी दिलेल्या आहेत, पण त्या इतक्या मोहक, मनोरंजक व मार्मिक लिहिल्या आहेत कीं, त्या गोष्टींतील तत्त्वबोध गोष्टी वाचतां वाचतांच मुलांच्या मनावर सहज ठसला जातो. पुस्तक वळीक टाइपांत सुंदर जाड व ग्लेज कागदावर छापिलेलें असून प्रत्येक गोष्टीचे प्रारंभीं कथानकाचें सुंदर चित्र दिलेलें आहे. एकंदर ह्या गोष्टीचे सहा भाग आहेत. प्रत्येक भागांत दहा गोष्टी सचित्र आहेत; प्रत्येक भागास किं ८४.

## जोडाक्षर-विरहित वाचनपाठ.

हें पुस्तक नुकत्याच अक्षर ओळख झालेल्या मुलांमुलींकरितांच लिहिलेलें आहे. पुस्तकांत एकंदर १७ गोष्टी अगदीं सोप्या भाषेंत, व एकहि जोडाक्षर न येऊं देतां लिहिल्या आहेत. प्रत्येक गोष्टीचे आरंभीं कथा-नकाचें मूर्तिमंत चित्र दिलें असल्यामुळें गोष्ट वाचण्याचे अगोदरच त्यांतील सारांश मुलांचे सहज लक्षांत येतो. किं. अवघी चार आणे.

मिळण्याचें ठिकाण—म्यानेजर—चित्रशाळा प्रेस, पुणें.

॥ ॐनमः श्रीरामचंद्राय ॥

# आर्यमहौषधालय मु० पो० आंजर्ले.

**कोकणप्रांतांतील अगदीं ताज्या व शुद्ध वनस्पतींचीं जगत्प्रसिद्ध निर्दोष व रामबाण औषधें.**

**कंदर्पमंजरी पाक**—हा अपूर्व पाक गरिबांपासून तों अमीरउमरावांपर्यंत सर्वांसही अत्यंत उपयोगी असून किंमत माफक ठेविली आहे. यांत मौक्तिक, प्रवाळ लोह, माक्षिक, कस्तूरी, अंबर इ० अत्युच्च गुणकारक पदार्थ असून शिवाय बदाम, पिस्ते, अक्रोड चारोळी, केशर, वेलची, पंजाबी सालममिश्री, सफेतमुसळी, पत्री, गोक्षुर, शतावरी, आस्कंद, वंशलोचन वगैरे (८०) उपयुक्त वनस्पति घातल्या आहेत. यानें पथ्यावांचून गुण येतो. यापासून कोणत्याही कारणांनीं होणारा व कशाही प्रकारचा शुक्रस्राव, नपुंसकत्व, मूळव्याधि, रक्तदूपणामुळें त्वगरोग, स्त्रियांची धुपणी व गर्भाशयस्थ दोष या भावना त्यांच्या एकंदर उपविकारांसह तत्काल बंद्या होऊन धातुवृद्धि होते, व शरीर कणखर आणि तेजस्वी बनतें. २० तो० ड० २ रुपये एकदम ३ डबे घेणारास ५ रुपये.

**स्वर्णधात्री तेल**—हें चारोळी, बदाम, कंकोळ, एला, बहुविध वनस्पतींचीं सत्वें व उपयुक्त तेलें अशा अनेक पदार्थांनीं बनविलें असल्यानें याच्या मर्दनापासून अपस्मार, उन्माद, वेड, चक्कर इ० रोगांस जलद आराम पडतो. केंसांस चोळल्यानें केंस काळेकुळकुळीत, तजेलदार, सडकलांब व मृदु होऊन मेंदु शांत आणि रोगरहित बनतो. यानें मस्तकाचें टक्कल जातें. हें अंगास चोळून स्नान करीत गेल्यानें शरीराचा दुर्गंध जातो. खरूज, गजकर्ण, शिबें, तसेंच तळपाय, तळहात, डोळे व मस्तक यांचा दाह हे विकार खास बरे होऊन निद्रा चांगली येते, आणि नेत्ररोग दुरुस्त होतात. बा० किं० १। रु०

**दंतरक्षक पूड**—ही दांत व हिरड्या यांचे सर्व विकार तत्काल दुरुस्त करून दांत स्वच्छ व मजबूत करण्यांत प्रतिज्ञेची आहे. ड. ६ आणे.

**सुरंगी, मालती, कल्हार, गुलबहार, दणाणा, लक्ष्मीविलास** इ० बादशाही अति उंची अत्तरें व त्याचप्रमाणें गुलाब, हिना, केवडा, चमेली, जाई वगैरे सुगंधी अत्तरें आणि केंसांस लावण्याचीं हरएक प्रकारचीं सुवासिक तेलं माफक दरानें पूर्ण खात्रीचीं मिळतील.

**सूचना:**—वरील औषधें व अत्तरें वगैरे पूर्ण खात्रीचीं असल्यामुळें आज पंचवीस वर्षांत त्यांचा लक्षावधि लोकांस अप्रतिम उपयोग झाला म्हणून त्यांचा नेहमीं फारच खप होत आहे. अनुभवानंतर पूर्ण खात्री पटेलच. औषधें माहितीचे खर्च्यासह रोखीनें अगर व्ही. पी. नें पाठवूं. प्याकिंग व टपाल खर्च वेगळा. घाऊक घेणारास कमिशन भरपूर. सर्व औषधांच्या आणि आरोग्यरक्षणाच्या माहितीचें सचित्र मोठें पुस्तक देऊं. आमचीं औषधें वगैरे मागविणें तीं खालील बिनचूक पत्त्यावर मागवावीं.

**कृष्णशास्त्री बिवलकर, वैद्य.**

REGISTERED. B.NO. 179.




पुस्तक ३४. आगस्ट सन १९२३. अंक ८.

अनुक्रमणिका.


| विषय. | पृष्ठ. |
|---|---|
| मुलांवरील जबाबदारी. .... .... | १४१ |
| सिंहान्योक्ति (कविता)..... .... | १४३ |
| तिघे असंतुष्ट. .... .... | १४४ |
| आज्ञाधारक मुलगा. .... .... | १४६ |
| परका भाव न धरणें. .... .... | १४७ |
| उन्हानें अन्न कसें शिजवितात. .... | १४९ |
| हें चमत्कारिक प्राणी कोण ? (चित्रें) .... | १५१ |
| निग्रो लोकांसंबंधी माहिती. .... | १५२ |
| चिनी गोष्टी. / वाण कसें आले. .... .... | १५३ |
| भांडणाचा परिणाम. .... .... | १५४ |
| चहाचें आधण. .... .... | १५५ |
| जमनालाल बजाज. .... .... | १५६ |
| चुटके. .... .... .... | १५८ |
| शालापत्रकाची चढाओढ. .... | १५९ |



## चित्रमय जगत् १९२३
# आगस्टचा अंक.

यांत येणारे विषय.

प्राचीन प्रातिनिधिक संस्था, फारसी पत्रसंग्रह, सेईर-मुताखरीन, स्ट्रासबूर्गमधील पास्टूरचा जन्म-दिवस, कूचला, पंचांगसंबंधी तडजोड, डबल-बार, नवजीवन (चालू कादंबरी). वगैरे विषय सचित्र येऊन विचार-संग्रह, शास्त्रीय-चमत्कार, राजकीय सद्य:-स्थिति, व नागपूरचीं चित्रें या अंकांत येतील. रा. रा. सी. के. दामले रा. द. वि. आपटे, व रा. गो. स. सरदेसाई सरदार किबेसाहेब इत्यादि लेखकांचेंही लेख येतील. **चित्रमय जगत् कोणत्याही महिन्यापासून सुरू करितां येतें.** वार्षिक वर्गणी ट. ह. सह, ग्लेझ प्रतीस ५॥ रु. व रफ प्रतीस ट. ह. सह ३॥ रु. किरकोळ अंकास ट. ह. अनुक्रमें ८१२ व ८८ पडतील. **म्यानेजर—चित्रमय जगत् पुणें शहर.**


मुद्रक व प्रकाशक—रा. रा. शंकर नरहर जोशी चित्रशाळा प्रेस, १०२६ सदाशिव पेठ, पुणें सिटी.

# रंगीत इसाप-नीति.

यांत एकंदर इसापनीतींतील आठ अगदीं सोप्या गोष्टी मोठ्या व जाड टाइपांत दिलेल्या असून प्रत्येक गोष्टीसमोर त्यांतील रहस्य दाखविणारें रंगीत सुंदर चित्र दिलेलें आहे. चित्रें पाहूनच मुलांना गोष्टींतील तात्पर्य कळतें. किं० ८६. ट. ह. ८८६.

# सचित्र इसाप-नीति.

[ उत्तरार्ध. ]

[ नवीन भाषांतर भाग २ रा. ]

वरीलप्रमाणेंच हा दुसरा भाग विक्रीस तयार आहे. याचीं सुमारें २०० पानें आहेत असून यांत ३५० गोष्टी आहेत. चित्रांची संख्या १५० पर्यंत आहे. किं. १८

दोन्ही भाग एके ठिकाणीं बांधलेलें सुंदर पुस्तक किं० रु. २

# विद्यार्थ्यांकरितां नाटिका.

शीलं परं भूषणम्.

ही नाटिका प्रसिद्ध कवि-शिरोमणि नारायण वामन टिळक यांनीं केवळ लहान मुलांकरितांच लिहिलेली आहे. यांत शृंगाररस मुळींच नाहीं एवढेंच नव्हे, तर स्त्रीची भूमिका या नाटकांत आणलेलीच नाहीं. शिवाय नाटकाचा विषय नैतिक विचारानें पूर्ण भरलेला असल्यामुळें शाळांतून वार्षिक संमेलनाचे वेळीं मुलांकडून हा नाटकाचा प्रयोग करविण्यास तें योग्य आहे. नाटकाचा विषय धनाची योग्यता जास्त किंवा ज्ञानाची योग्यता जास्त हा आहे. पुस्तकांत चार सुंदर चित्रें कथानकास अनुसरून दिलेलीं आहेत; किं० ८४.

म्यानेजर--चित्रशाळा प्रेस, पुणें.

# चिमुकलें भारत व रामायण.

महाभारत व रामायण हे आपले राष्ट्रीय ग्रंथ आहेत. यांत आपला प्राचीन इतिहास असून प्रपंच साधून परमार्थ कसा जोडावा हें उत्तम दाखविलें आहे. व्यावहारिक बोधाच्या ह्या केवळ खाणी आहेत. आबालवृद्ध स्त्री-पुरुषांना या ग्रंथांचें ज्ञान होणें अगत्याचें आहे. प्रौढांकरितां आमचीं लोकप्रिय 'भारती युद्ध' व 'रामचरित्र' हीं पुस्तकें आहेत. आतां बारातेरा वर्षांच्या मुलांमुलींकरितां 'चिमुकलें भारत' व 'चिमुकलें रामायण' हीं दोन पुस्तकें अनुक्रमें आम्हीं रामकृष्णवाक्सुधेचे प्रसिद्ध लेखक रा. कृष्णाजी गोविंद किनरे व रा. विद्याधर वामन भिडे बी. ए. यांजकडून मुद्दाम लिहविलीं आहेत. पुस्तकाची भाषा फारच मोहक व सोपी आहेत. वाचतांवाचतांच मुलांच्या मनावर त्यांतील रहस्य ठसावें म्हणून उपदेशपर वाक्यें जाड टाइपांत घातलीं आहेत, आणि कथानकांच्या अनुरोधानें हाफटोन प्रोसेसनें तयार केलेलीं भारतांत आठ व रामायणांत सात अशीं सुंदर चित्रें घातलीं आहेत. भारताचीं पृष्ठें १७२ व रामायणाचीं पृष्ठें ८२ छपाई बांधणी सुबक. किं० ८६, व रामायण किं० ८४.

म्यानेजर—चित्रशाळा प्रेस, पुणें शहर.

मराठी
शालापत्रक

येथें शब्द नाहीं शिष्यासी । हें अवघें सद्‌गुरूपाशीं ।
सद्‌गुरु पालटी अवगुणांसी । नाना यत्नें करोनी ॥
जें कांहीं आपणास ठावें । तें हळु हळु शिकवावें ।
शहाणे करून सोडावें । सकळा जनां ॥ १ ॥

रामदास.

पुस्तक ३४. ऑगस्ट सन १९२३. अंक ८

## मुलांवरील जबाबदारी.

शिक्षकांच्या ताब्यांत लहान मुलें असतात. तीं फार गडबड करतात. त्यांना गोंगाट करूं न देणें एवढेंच काम बहुतेक शिक्षकांना करावें लागतें.

गुरें जशीं गुराख्याच्या ताब्यांत दिलीं म्हणजे मालक सुटतो तद्वतच पोरें शाळेंत अडकवलीं म्हणजे पालकहि मोकळा होतो. ही दृष्टी पालक व शिक्षक यांची आरंभीं कांहीं दिवस असते. परंतु मुलगा शाळेंत जाऊन थोडासा वळणाला लागला म्हणजे निवळतो व शिक्षकाच्या वरची नुसती त्याला ताब्यांत ठेवण्याची जबाबदारी सुटते. या पुढें शिक्षणाला सुरवात होते. प्रत्येक शिक्षकाला असें वाटत असतें कीं मुलांना कांहीं कळत नाहीं, त्यांच्याकरितां प्रत्येक गोष्ट मीच करणें जरूर आहे. आणि ही समज फारशी चुकीची आहे असें नाहीं. लहान मुलांना शाळेची शिस्त लावणें हें फार कठिण काम आहे. त्यांना स्वतःच्या इच्छेप्रमाणें वागूं दिलें तर ते अनर्थ करून सोडतील. मुलावरच सारी जबाबदारी सोंपविल्यानें तीं वर्गाची व्यवस्था उत्कृष्ट प्रकारची राखूं शकतात असा अनुभव आला आहे. मात्र हीं मुलें अगदींच अर्भकें नसावींत.

पुष्कळ वेळां असें होतें कीं, शिक्षकाला मुलांची विचारसरणीच कळत नाहीं. शिक्षक आपल्या कडून शिकविण्याची शिकस्त करीत असतो, आणि मुलांवर त्याचा कांहींच परिणाम दिसून येत नाहीं, असा अनुभव येतो. अशा वेळीं शिक्षक निरुत्साही बनतो. नव्या वर्गांत मुलगा आल्यावर शाळेची

खोली, पुस्तकें, शिक्षक, नवा अभ्यास व नवें वळण या साऱ्या गोष्टींमुळें तो गोंधळून जातो. या कारणानें तो अगदीं मूर्ख आहे असें शिक्षकाला वाटतें. परंतु वस्तुस्थिति तशी नसते.

घरून शाळेंत आल्यावर किंवा एका वर्गांतून दुसऱ्या वर्गांत गेल्यावर पूर्वींचे संस्कार लवकर नाहींसे होत नाहींत. त्यामुळें असला प्रकार होतो. तेव्हां शिक्षकांनीं आपणास काय शिकवावयाचें आहे हें थोडा वेळ बाजूला ठेवून मुलांच्या संवयींचें व पूर्वी उमटलेल्या ठशांचें परिशीलन करावें. हें परिशीलन केल्यावर मग पूर्वींच्या पद्धतीला अनुसरून पुढील शिक्षण द्यावें.

सध्यां आपल्याकडे नव्या व जुन्या पद्धतीचा झगडा चालू असल्यामुळें ही गोष्ट तर वारंवार दृष्टीस पडते. शिवाय एका भाषेचें शिक्षण संपून दुसऱ्या भाषेचें शिक्षण सुरू झालें म्हणजे ही निरुत्साहमय स्थिति अनुभवास येते. अशा प्रसंगीं जुन्या पायावर नवी इमारत बांधण्याची कुशलता जर शिक्षकांत असेल तर त्याचा प्रयत्न फार खुलून दिसेल. मुलांनीं स्वतः कांहीं गोष्टी करण्यांत फार फायदे आहेत.

त्यांना या योगानें कामाची गोडी लागते व आपलेपणा उत्पन्न होतो स्वतः केलेल्या गोष्टी दुसऱ्यांना सांगतांना मुलें आपण कोठें आहोंत व कोण आहोंत हें विसरतात. त्यांना आपल्या प्रत्येक कृतीबद्दल अभिमान वाटूं लागतो. घरीं एकादें झाड जर मुलांनीं लावलें असलें तर त्यांना त्याबद्दल किती आनंद व अहंपणा वाटत असतो हें सांगावयास नको तेव्हां त्यापासून वाईट परिणाम होतील अशी भीति वाटावयास नको.

मुलांना अशी स्वतंत्रता दिली तर गोंधळ होईल असें कांहीं जण म्हणतील. परंतु कांहीं काळ पर्यंत गोंधळ झाला तरी शेवटीं त्याचा परिणाम चांगला झाल्यावांचून रहाणार नाहीं. मुलांवर कांहीं जबाबदारी सोंपविल्याशिवाय त्यांना शाळेचा ओढा लागत नाहीं. शिक्षकाच्या गैरहजिरींत वर्गावर लक्ष ठेवणाऱ्या विद्यार्थ्याला शाळेबद्दल जी आस्था वाटते ती प्रत्येकाला वाटूं लागली पाहिजे. मुलांना आपल्यावर शाळा अवलंबून आहे असें समजलें म्हणजे त्यांचे शाळेवर, शिक्षकावर व अभ्यासावर प्रेम जडतें.

आतां मुलांवर कोणकोणती जबाबदारी टाकतां येईल तें पाहूं. प्रत्येक वर्गामध्यें कांहीं हुशार मुलें असतात. व कांहीं अभ्यासांत पुढें गेलेलीं मुलें असतात. या हुशार मुलांपैकीं, व जास्त अभ्यास झालेल्या मुलांपैकीं प्रत्येकाला मागासलेल्या मुलांच्या अभ्यासाकडे लक्ष देण्यास सांगावें म्हणजे प्रत्येक हुशार मुलाला मास्तर बनवून त्याच्या ताब्यांत चार चार पांच पांच मुलें द्यावींत. या योगानें हुशार मुलें आपली मास्तरकी कायम टिकविण्याकरितां जास्त झटतील एवढेंच नव्हे तर रेंगाळलेलीं मुलें मास्तर होण्याची संधी मिळावी म्हणून जास्त अभ्यास करूं लागतील. अर्थात वर्गावरील शिक्षकाला स्वस्थ बसून चालणार नाहीं. त्याला त्या वर्गावर देखरेख करावी लागेल. शिवाय हे प्रयोग सर्व वेळ करून भागेल असेंहि नाहीं. कांहीं तास पुढील शिक्षण देण्यांतहि शिक्षकाला घालविले पाहिजेतच.

या प्रयोगांत एक मौज दृष्टीस पडेल ती अशी. लहान मुलें गणित समजाऊन सांगतांना नव्या कल्पना कशा काढतात, नवी रीत कशी योजतात, वगैरे प्रकार पाहण्यालायक होतील. या योगानें मुलांची कल्पनाशक्ती वाढेल. ही मास्तरकी मुलांवर सोंपवली म्हणजे तीं शिरजोर व हट्टी बनतील असा आरोप येण्याचा संभव आहे. परंतु शिक्षकाचा धाक असला व क्रमाक्रमानें सर्वांवरच शिक्षक होण्याची पाळी आली म्हणजे असला वाईट परिणाम दिसून येणार नाहीं

वर्गांतील सेक्रेटरी नेमायचा तो सर्व मुलांचीं मतें घेऊन एक मतानें निवडावा व त्याचा हुकूम सर्वांनीं पाळावा.

वर्गांतील साऱ्या सामानाचा ताबा मुलांकडे असावा. वर्गांत लहान वाचनालय असावें व त्याची व्यवस्था ठेवणें, पुस्तकें नीट लावणें वगैरे कामें मुलांकडेच सोंपवावींत. या योगानें त्यांना पुढील आयुष्यांत काम करण्याची संवय लागते.

शाळेंत निरनिराळे उत्सव, समारंभ वगैरे पुष्कळ होतात, त्याची सारी जबाबदारी मुलांवरच सोंपवावी.

मुलांकडे ड्रील वगैरे शिकविण्याचें काम द्यावें. तसेंच निरनिराळे खेळ तालीम वगैरे करणाऱ्यावर एक मुलगा नेमावा. दुसऱ्या मुलाच्या ताब्यांत वर्गाची स्वच्छता राखण्याचें काम द्यावें. तिसऱ्या मुलाकडे मुलांचे कपडे व स्वच्छता याकडे पाहण्याचें काम सोंपवावें. चौथ्या मुलाकडे वर्गाच्या खिडक्या नीट आहेत किंवा नाहींत वारा किती येतो, ऊन कोठून येतें, वगैरे पहाण्याचें काम द्यावें. पांचव्या मुलाकडे मुले वर्गांतून बाहेर जातांना व आंत येतांना रांगेनीं जातात किंवा नाहीं हें पहाण्याचें काम द्यावें. एका मुलाकडे पेन्सिली पुरविण्याचें, मुलांच्या पाट्या वह्या वगैरे नीट आहेत किंवा नाहींत हें बघण्याचें काम द्यावें. दुसऱ्या एखाद्याकडे सुटींत मुलांवर देखरेख ठेवण्याचें काम सोंपवावें

अशा प्रकारची जबाबदारी मुलावर सोंपवली तर बरेच फायदे होतील असें अनुभवान्ती कळून येईल. मुलें कांहीं काळ दुसऱ्यावर अवलंबून राहूं शकतात; परंतु एकदां त्यांना स्वतंत्र हें व्हावें लागतेंच ही गोष्ट लक्षांत बाळगून मुलावर थोडी थोडी जबाबदारी सोंपवावी.

---

## ‘सिंहान्योक्ति’

लेखकः—दत्तात्रेय गणेश काळे, न्यू इंग्लीश स्कूल, जळगांव.

(शार्दूल०)

१

मोठे हत्ति जरी वनांत असती कीर्तीविणें आयु रे ! ॥
सारे घालविती जगीं यश तुझें सर्वत्र आहे हरे ! ॥
गेले प्राण जरी जिवंत जगतीं आहेस तूं कीर्तिनें ॥
“कीर्तीचा क्षण एक उत्तम, नको नामाविणें तें जिणें॥”

२

नाहीं ठाऊक ‘पारतंत्र्य’ तुजला ना नीचवृत्ती तुझी ।
“हांजी हांजि” तुला न माहित असे गंभीरवृत्ती अती ।
जावो प्राणहि आज “ब्रीद” अपुलें केव्हांहि ना सोडिसी ।
धन्य प्राणि जगांत कीर्ति रुचिरा संपादिली जे अशी ॥ २ ॥

---

**अभिनव काव्यमाला भाग ३**

या पुस्तकाची दुसरी आवृत्ति छापून विक्रीस तयार आहे. किं. १ रु. ट. ह. व व्ही. पी. खर्च निराळा.

म्यानेजर—चित्रशाळा प्रेस, पुणें.

# तिघे असंतुष्ट.

एक व्यापारी होता. तो कापड विकी; पण तें इतकें स्वस्त विकी कीं, त्याच्या येथें गिऱ्हाइकांची नेहमीं गर्दी असे. तथापि तो व्यापारी दिवसेंदिवस कंगाल बनत चालला. म्हणून त्यानें दूरच्या एकाद्या देशांत जाऊन नशीब काढण्याचें ठरविलें.

तो फार लांब गेला नव्हता इतक्यांत त्याला एक सुतार भेटला. ते दोघेहि एकेच ठिकाणीं चालले असल्यामुळें दोघांनीं मिळून जाण्याचें ठरविलें.

हळूंहळूं दोघांची मैत्री झाली आणि ते एकमेकाला आपण कां बाहेरगांवीं जात आहोंत हें सांगूं लागले. आणि आश्चर्याची गोष्ट ही कीं, ते दोघेहि एकाच कारणामुळें निघाले होते. सुतार म्हणाला, " बाबारे मी तुझ्यासारखाच असंतुष्ट आहें. सगळ्या जगांत माझ्यासारख्या चांगला सुतार नाहीं. पण जो तो माझें काम पाहून नाक मुरडतो म्हणून, मी देशांतर करण्याचें ठरविलें आहे. "

सुमारें तासानें त्यांना एक लांकूडतोड्या भेटला. तोहि तिकडेच चालला होता. तो म्हणाला, " मी लांकडे तोडून तोडून म्हातारा झालों. माझी पाठ वांकली, तरी पोटाला पोटभर मिळत नाहीं; म्हणून मी परदेशाला निघालों आहे. "

अशाप्रकारें हे तिघेजण चालले होते. बराच वेळ चालल्यावर ते दमले, व एका रस्त्याच्या बाजूला बसले. ते आपल्या सुखदु:खाच्या गोष्टी बोलत बसले असतां एक म्हातारी आली व तीहि त्यांच्या जवळच बसली.

त्यांचें तें भाषण ऐकून म्हातारी म्हणते, "बाबांनो जर आपल्या इच्छेप्रमाणें सारें घडून येईल तर मोठा अनर्थ होईल. आपण ज्या स्थितींत आहों त्याच स्थितींत समाधान मानून घेतलें पाहिजे. "

" तुला काय थेरडे ठाऊक आहे, तूं जग कसें आहे हें सुद्धां पाहिलें नाहींस आणि लागलीस लांबलांब गप्पा मारायला. जर मला जें काय पाहिजे तें मिळेल, तर मी श्रीमंत होईन. " असें व्यापारी म्हणाला.

म्हातारी म्हणते, "तुला काय हवे ? " व्यापारी म्हणतो ' मी जें काय ओढीन तें लांब झालें पाहिजे म्हणजे मला स्वस्त कपडा विकतां येऊन श्रीमंत होता येईल. "

" आणि " लांकूडतोड्या म्हणाला, " मी ज्यावर घाव घालीन त्याचे तुकडे झाले पाहिजेत. माझा स्पर्श होतांच लांकूड फुटलें म्हणजे काय पैसाच पैसा. "

सुतार म्हणतो, " तुम्ही दोघांनीं आपलें म्हणणें कळविलेंत. आतां मला काय पाहिजे तें मी सांगतों मी जें काय एकत्र जोडीन तें इतकें घट्ट झालें पाहिजे कीं, कशानेंहि अलग होता कामा नये. मग माझा धंदा किती सुंदर चालेल, आणि मी किती श्रीमान् होईन ! "

ह्या आमच्या मागण्या फार साध्या आहेत; पण त्या पुऱ्या होत नाहींत. देवाच्या दयेनें जर त्या पुऱ्या झाल्या तर सुखाला तोटाच नाहीं. " व्यापारी म्हणाला. "

म्हातारी म्हणते, " तुम्ही चुकत आहां या गोष्टीचा तुम्ही विचार केला नाहीं. तुमची इच्छा जर परिपूर्ण झाली तर तुम्ही फार दुर्दैवी प्राणी

म्हाल. " तिघेही ओरडून म्हणतात. " कांहीं तरीच वेडगळा सारखें बोलते ही ! "

" बरं तर " म्हातारी जातां जातां म्हणते " जा तुमच्या इच्छा पूर्ण होतील. "

ती जाऊं लागली तसें तिजकडे साशंक वृत्तीनें हे सारें पाहूं लागले.

" गंमती म्हातारी आहे बुवा ! तिनें जर खरच आपल्याला वर दिला असला तर काय मजा होईल. " सुतार म्हणतो.

" चला तर बघूं याच काय होतें तें " लांकूडतोड्या म्हणतो.

तो लागलाच उठला व त्यानें एका मोठ्या लांकडाच्या खोडावर हात मारला, त्या बरोबर त्या लांकडाचे दोन तुकडे झाले. हें पाहून ते सारे जण आश्चर्यचकीत झाले.

सुतार म्हणतो, ' अरे होय खरेच ! हें पहां मी दोन तुकडे एकत्र ठेवले तें किती घट्ट झाले आहेत तें ! "

व्यापारी म्हणतो, " बरं तर मी पहातों " असें म्हणून त्यानीं एक कापडाचा तुकडा बाहेर काढला व तो ओढूं लागला. त्या बरोबर तो ताणावा तितका लांब होऊं लागला हें पाहून सारे जण मोठ्या आनंदानें नाचूं लागले व आतां आपण श्रीमंत होणार असें म्हणूं लागले.

आनंदानें बेहोष झालेला तो व्यापारी नाचत उडत असतां व तोंडावरून हात फिरवीत असतां त्यानें आपलें नाक ओढलें. त्या बरोबर तें नाक लांबचलांब होत चाललें.

कांहीं वेळ आपलें नाक लांब झालें आहे या गोष्टीवर त्याचा विश्वास बसेना. त्यांनीं पुनः पुनः नाकाला हात लावून पाहिला व नाक खरेंच लांब झालें आहे असें पाहून त्यांनीं आपण स्वप्नांत आहोंत कीं काय हें पहाण्याकरितां स्वतःला चिमटा घेतला.

परंतु संशयाला जागाच नव्हती, कारण ही गोष्ट दुसऱ्या दोघांनींहि पाहिली.

लांकूड तोड्याला हा प्रकार पाहून इतकें हंसूं आलें कीं, शेवटीं तो रडूं लागला, आणि या रडण्याच्या भरांत त्यानें आपला हात मांड्यावर आपटला त्याबरोबर त्या मांड्या वेगळ्या झाल्या आणि त्याला हालता येईना.

सुतारालाहि हा प्रकार पाहून दुःख आवरेना. त्यानें " अरे अरे " म्हणत म्हणत एका हातावर दुसरा हात आपटला त्याबरोबर दोन्ही हात घट्ट बसले.


आतां व्यापारी म्हणतो, " कायरे आपण मूर्ख ! आपण घरीं जाऊन जर कामधंदा करूं लागलों असतों तर असा प्रसंग आपल्यावर येता ना ? खरंच त्या म्हातारीचेंच म्हणणें बरोबर होतें ? ती आतां आपल्याला भेटेल तर किती बरें होईल? " थोडा वेळ दुःख केल्यावर व पूर्वींची स्थिती किती चांगली होती अशी त्यांची खात्री पटल्यावर ती म्हातारी आपल्याकडे येत आहे असें त्यांना दिसलें. त्या बरोबर त्यांचा आनंद गगनांत मावेना. त्यानें म्हातारीजवळ आपला वर परत घे अशी याचना केली. त्या म्हातारीनें त्यांना समाधान मानून उद्योग करीत जा असा उपदेश केला, आणि पूर्वीप्रमाणेंच त्यांचे अवयव करून त्यांना सोडून दिले.

## दिंडी.

लोकमान्यांचें चित्र पाहण्याच्या
जाय हेतूनें सदनिं सोबत्याच्या
कवी कोणी मग बोलिला तयाला
चित्र तव कां देतोस बघायाला ॥ १ ॥
चित्र कोठें बोलिला मित्र कांते
पेटी माझीं ठेविलें अणुन देतें
आज त्याचें कां स्मरण होय कांत
मित्र मागे बघण्यास हाच हेत ॥ २ ॥
शब्द ऐसे पडतांच तिच्या कानीं
जणूं खवळे वाघीण घोर रानीं
इश्य बाई परक्यास चित्र देणें
वृथा ऐसे कासया श्रमहि घेणें ॥ ३ ॥
प्रिये तुजसी सांगतों गोष्ट एक
लक्ष देवोनी शांत मनें ऐक
तुझ्या माझ्यास्तव झटे मित्र नित्य
तया परका मानणें इष्ट काय ॥ ४ ॥
जरी परका तूं मानसी तयातें
त्याच दृष्टीनें बघिल तोहि तूतें
लोक अवघा गे दिल्या घेतल्याचा
होय अनृत कां सांग संत वाचा ॥ ५ ॥
एकमेकाची गरज एकमेका
लागते हें ठाऊक तुजं नसे कां?
अग्निमाजीं बहु तेजपुंज ठेला
तेज देण्याला मदत हवी त्याला ॥ ६ ॥
ओळखावें जग आपणा वरून
मदत करणें हा धडा घे शिकून
दांड वीतींची खांच भरायाला
गरज अन्नाची लागते अम्हाला ॥ ७ ॥
नद्या मोठाल्या पर्वता वरून
येति खालीं कीं नीट ऊतरून
अंबुधीनें जर मदत केलि नाहीं
कुडी प्राणाविण तेविं नदी गे ्हीं ॥ ८ ॥
एक भावें राहून मदत करणें
एकमेका हें सांगती शहाणे
मोहराच्या मैत्रिनें सूत पाही—
अग्नि मध्यें तें मुळींच जळत नाहीं ॥ ९ ॥
शब्द माझे हे चित्तीं धरी नीट
कधी त्यांचा गे मानुं नको वीट
कृपा होवो तुजवरी ईश्वराची
चित्र आणी दे मूर्ति तूं गुणांची ॥ १० ॥
चित्र दिधलें मग कविस न्यावयाला
कवी घेवोनी सदनिं परत आला
म्हणे वृक्षीं कटु राहतोहि वेल
गुणावरुनी कीं होय जगीं मोल ॥ ११ ॥
पुंन: ऐशा मज देइ न प्रसंगा
हींच विनती तव पदीं पांडुरंगा
ठेवि छाया मजवरीं तव कृपेची
दुजें कांहीं इच्छी न, हेंच याची ॥ १२ ॥

# उन्हानें अन्न कसें शिजवितात.


वास्तविक पाहूं जातां जगांतील सारी उष्णता ९ कोटी मैल अंतरावर असलेल्या सूर्यापासून येते. ही उष्णता लाकूड, कोळसा, गॅस, तेल वगैरे




जब ही वक्राकृति पॅराबोलाची आहे.

द्रव्यांच्या स्वरूपानें येते. हीं द्रव्यें उष्णता शोषून घेतात, मग ती शोषणक्रिया लवकर होवो किंवा उशीरां होवो. पण खर्चाशिवाय उन्हानें जर आपलें अन्न लकवर शिजलें तर किती चांगलें होईल हें तुम्हाला ठाऊक आहे कां?

डॉ. ॲबट या नांवाचा एक वॉशिंग्टन मधील शास्त्रज्ञ आहे.



पॅराबोलिक आरसे.

त्यांनीं स्वतःकरितां अन्न शिजविण्याचें एक यंत्र तयार केलें आहे. त्या यंत्रांत सूर्याचीं किरणें एकत्र होतात व त्या योगानें उष्णता मिळून अन्न शिजतें.

हें यंत्र त्यांनीं १९२० सालीं पूर्णावस्थेस आणलें.

त्या यंत्रांत काय खुबी आहे तें आपण पाहूं. सूर्याचे सारे किरण एका बिंदूजवळ प्रथम आणले जातात. ते एका बिंदूजवळ कसे येतात हें तुम्ही विचाराल. हे बिंदु एकत्र आणण्यास एक प्रकारचे आरसे योजतात. या केंद्र बिंदूजवळ (फोकस) एक नळी असते. या नळींत रॉकेल तेल अगर पेट्रोल ओततात. ही नळी एका टाक्याला जोडली असते व त्या टाक्याच्या आंत चूल असते. तेल तापलें म्हणजे तें वहात वहात चुलीकडे जातें व त्याच्या उष्णतेवर स्वैपाक करितां येतो. तेल गार झालें कीं, तें पुनः केंद्रबिंदुजवळ येतें व पुनः टाक्यांत जातें. अशा प्रकारें या तेलाच्या उष्णतेनें सारे पदार्थ शिजतात. तेल एकदां तापलें म्हणजे तें सूर्य मावळल्यावरहि कढत रहातें.


किरण केंद्रीभूत होण्यास एक विशिष्ट प्रकारचा आरसा उपयोगात आणतात. सूर्याचीं किरणें समांतर रेषेंत खालीं येतात हें आपणा सर्वांस ठाऊक आहेच. तीं किरणें सपाट आरशावर पडलीं म्हणजे तीं परावृत्त होतात, तथापि तीं समांतरच रहातात. लहानपणीं कवडासा पाडण्याचा खेळ सारीं मुलें खेळतातच. परंतु हीं किरणें सपाट आरशावर न पडतां वांकडया आरशावर पडलीं तर तीं एके ठिकाणीं गोळा तरी होतात

किंवा पसरलीं तरी जातात. अंतर्गोल आणि बहीर्गोल असे दोन जातींचे आरसे असतात. दिव्याच्या मागें प्रकाश मोठा पडावा म्हणून अंतर्गोल तबकड्या बसविलेल्या पुष्कळांनीं पाहिल्या असतील. त्याचप्रमाणें लहान मुलें कागद वगैरे बहीर्गोल कांचेनीं कसें जाळतात हेंहि पुष्कळांनीं पाहिलें असेल.

ही सूर्याची शक्ति केंद्रीभूत करण्यास अन्तर्गोल आरसे लागतात. परंतु त्यापेक्षां पॅराबोलाच्या ( आकृति पहा ) आकाराचे आरसे असले तर सूर्यशक्ति अधिक केंद्रीभूत होते म्हणून तेच या कामीं उपयोगांत आणतात. ज्या तेलांनीं भरलेल्या नळीवर सूर्यकिरण पडतात ती नळी काळी करतात. कारण काळा पदार्थ उष्णता अधीक शोषतो.

एक पांढरा व एक काळा असे दोन कापडाचे तुकडे घ्यावेत, आणि दोन बर्फाचे तुकडे घ्यावेत. या बर्फाच्या दोन तुकड्यांवर अनुक्रमें काळा व पांढरा तुकडा ठेवावा आणि त्यावर ऊन पडूं द्यावें. ज्या तुकड्यावर काळें कापड असेल तो तुकडा लवकर विरघळेल व पांढरा तुकडा असलेला बर्फ मागाहून विरघळेल. उन्हांत छत्री घेऊन गेलें असतां उष्णता किती लागते याचा अनुभव सर्वांना आहेच.


डॉ. ॲबटचें यंत्र सूर्याचा प्रकाश जसा फिरेल



अन्न शिजविण्याचें यंत्र

तसें फिरते. ही बदल आपोआप होते. या यंत्रांत एक दुर्गुण आहे. ज्या ठिकाणीं सूर्य प्रकाशत असेल तेथेंच याचा उपयोग होतो. शिवाय पावसाळ्यांत तर याचा कांहींच उपयोग होत नाहीं. तथापि इतर ऋतूंत हें यंत्र उपयोगी आहे यांत शंका नाहीं.


# हे चमत्कारीक प्राणी कोण ?



कासदबगळा.




साळघुवड.



उंदीरहरीण.



बैलमासा.



झिप्रासुसर.



सिंहदेत.

# नीग्रो लोकांसंबंधीं थोडी माहिती.

[ लेखक—अनंत गणेश नातू, देऊळवाडा, रत्नागिरी. ]

आफ्रिका खंडाच्या मध्यभागांत जे लोक रहातात, त्यांना नीग्रो असें म्हणतात. आमच्या हिंदुस्तानांत नीग्रो लोक फारच क्वचित् आढळतात. आणि म्हणूनच एकादा नीग्रो आम्हांला मुंबईसारख्या ठिकाणीं दृष्टीस पडला, तर आम्ही त्याच्याकडे टक लावून पाहात राहातों. नीग्रो लोक फारच कुरूप दिसतात. त्यांचा रंग फारच काळा असतो; केंस फारच अस्ताव्यस्त असतात; त्यांचीं नाकें चपटकीं आणि ओंठ फार जाड असतात. अमेरिकेंत आणि इतर देशांतमुद्धां निग्रो लोकांची वस्ती बरीच झालेली आहे. तरी त्यांचें मुख्य राहण्याचें ठिकाण म्हणजे मध्य आफ्रिका हें होय. ते राहातात तो भाग दाट अरण्यांनीं, उंच पर्वतांनीं, आणि नद्यांनीं भरलेला आहे. बहुतेक नीग्रो लोकांना लिहावयाला व वाचावयाला अद्याप येत नाहीं, तथापि ते आपल्या देशाचे फार अभिमानी आहेत, आणि त्यांना आपला देश सोडून जाणें आवडत नाहीं.

एखादा नीग्रो तरुण जर तुम्ही पाहाल तर त्याचे डोळे वाटोळे आणि पाणिदार असे दिसतील आणि त्याचे दांत पांढरे व स्वच्छ असे दिसतील. त्याच्या केसांना केंस असें म्हणण्यापेक्षां काळी लोंकर असें म्हटलें असतां अधीक शोभेल. नीग्रो लोक फार उंच असतात, व त्यांना मुळींच पोंग नसतें. तें अंगावर कधींहि वस्त्र घेत नाहींत. सकाळपासून संध्याकाळपर्यंत ते अरण्यांत उघडे फिरत असतात. नीग्रो लोकांत अशी एक चाल आहे कीं, रोज सकाळीं ते आपल्या लहान मुलांना थंड पाण्यानें स्नान घालतात व अंग पुसण्याऐवजीं त्यांनां गवतावर निजवितात. या कारणामुळेंच त्यांचीं मुलें बळकट व निरोगी असतात आतां थोडेंसें त्यांच्या घरांसंबंधीं वर्णन करूं. यांच्या झोंपड्या लांबून मधमाशांच्या पोळ्याप्रमाणें दिसतात. झोंपड्यांच्या भिंती अतिशय सखल असतात, व त्या चिकण मातीच्या बनविलेल्या असतात. यांच्या सबंध झोंपडीला मिळून एक दार असतें. अशा पांच पन्नास झोंपड्या मिळून त्यांचें एक लहानसें खेडेगांव बनतें. या सबंध गांवाभोंवतीं एक मोठी उंच भिंत असते, व भिंतीमुळें त्यांचें वन्य पशूंपासून रक्षण होतें. पुष्कळ नीग्रो लोक अद्यापि अशिक्षित आहेत, तथापि त्यांच्यांत दिवसेंदिवस सुधारणा होत आहे. तेथील एकाद्या गांवांत जर आम्ही गेलों तर आम्हांला त्यांचीं मुलें मारामाऱ्या करीत असलेलीं दृष्टीस पडतील. त्या मुलांना लांकडांचीं बोथट हत्यारें दिलेलीं असतात व त्या हत्यारांनीं ते एकमेकांशीं खोटी लढाई खेळत असतात. आम्हांला खो, खो, आट्यापाट्या इत्यादि खेळ खेळण्यांत जसा आनंद वाटतो, तसाच त्यांना ती खोटी लढाई खेळण्यांत आनंद वाटतो. जीत्याच नीग्रो मुलें फार उद्योगी असतात. तीं ढाली, शिरस्त्राणें, भाले वगैरे फार सफाईदार रीतीनें बनवितात आणि त्याचप्रमाणें पशुपक्ष्यांना पकडण्याकरितां ते सुंदर जाळीं विणतात. नीग्रो लोक व मुलें दुसऱ्याला मदत करण्याला नेहमीं तत्पर असतात. प्रत्येक नीग्रो, मुलांना चटया विणावयास शिकवितो व त्याच चटया त्यांना निजावयास उपयोगी पडतात.

जसजसा नीग्रो मुलगा मोठमोठा होऊं लागतो, तसतसा तो स्वतः होडी घेऊन मासे मारण्यास जाऊं लागतो. मुलांना झाडाच्या खोडापासून होडी तयार

करण्याचें शिक्षण देण्यांत येतें. नीग्रो लोकांना गोष्टी ऐकणें व गाणें ऐकणें याचा फार नाद असतो. उन्हाळ्याच्या दिवसांत संध्याकाळच्या वेळीं हे लोक झाडाखालीं बसून मनसोक्त गातात व गाणें ऐकणारे इतके तल्लीन होऊन जातात कीं, ते आनंदानें डोलू लागतात. एकंदरींत नीग्रो लोक फार उद्योगी व स्वातंत्र्यप्रिय असे आहेत. इतकें लिहून मी ही छोटी हकीकत पुरी करतों.

---

# चिनी गोष्टी.

## कर.

एकदां राजानें आपल्या राज्यांतील कर पुष्कळ वाढविले परंतु ते कर कमी करण्याबद्दल विनंती करण्याचें धैर्य कोणांत नव्हतें. एका खुषामतगारानीं ही गोष्ट राजाजवळ काढण्याचें ठरविलें.

एकदां तो खुषामतगार राजाबरोबर बाहेर हिंडावयास गेला. तेव्हां त्यानें राजाचें लक्ष आकाशांतील दूरच्या ढगाकडे वळविलें.

राजा म्हणाला, " चला तर आपण सारे राजवाड्यांत परत फिरूं. "

खुषमस्कऱ्या म्हणतो " ते ढग आपल्या शहरांत येऊं शकणार नाहींत, आपल्याला भीती वाटण्याचें कारण नाहीं. "

'कां बरं, ते कां येणार नाहींत ?" राजा विचारतो.

" अहो तुमच्या गांवांत येऊन जबर कर द्यायला त्यांच्या जवळ पैसे कोठें आहेत ! "

राजानें पुढें चौकशी केली व कर कमी केले.

---

## बाण कसे आणले.

एकदां एक लढाई सुरू झाली. आणि दुसऱ्या बाजूच्या सेनापतीजवळ बाण उरले नाहींत. परंतु शत्रुपक्षाजवळ पुष्कळ बाण आहेत ही गोष्ट सेनापतीला माहित होती. तेव्हां त्यानें शत्रूजवळून बाण पळवण्याची युक्ति योजिली.

त्यांनीं गवताचीं पुष्कळ माणसें बनवलीं व त्यांना बोटीवर उभे केले, आणि बोटींत चार पांच सजीव माणसें बसवून त्यांच्या जवळ एक मोठी घंटा दिली ही घंटा ऐकून विरुद्ध बाजूंनी शत्रूवर बाणांचा वर्षाव केला. परंतु ते बाण गवताच्या शिपायांना लागल्यामुळें त्याचें फारसें नुकसान झालें नाहीं. अशा रीतीनें बोटींत पुष्कळ बाण आले व त्यांनीं तेथून बोटी हांकारल्या.

# भांडणाचा परिणाम.



गणू आणि राणू अशी दोघे मुलें होतीं. तीं नेहमीं एकमेकांबरोबर भांडत. या गोष्टीचें तिऱ्हाइतांना सुद्धां आश्चर्य वाटूं लागलें. पुष्कळ दिवसपर्यंत ते परस्परांशीं संभाषण सुद्धां करीत नसत. त्यांच्या बापांनीं त्यांना एकदां खर-



बुजाकरितां एकमेकांच्या उरावर बसतांना पाहिलें. त्यांचे केंस उपटणें झाल्यावर बाप आला व त्यानें एक मातीचा घडा जमीनिवर आपटला. त्या घड्याचे तुकडे तुकडे

झाले. हें पाहून मुलें स्तब्ध बसलीं व त्यांच्याकडे पाहूं लागलीं.

मूर्खांनो नीट पहा हा फुटका घडा तुम्हांला कांहीं तरी धडा शिकवील.





बाबानो ! मोडणें हें घडण्यापेक्षां फार सोपें आहे ! मित्राचें शत्रू होणें फार सोपें आहे. पण शत्रूचें मित्र होणें फार कठीण आहे.

मुलांनीं त्या गोष्टीचा विचार केला व भांडण्याचें सोडून दिलें.

---

## ८ चहाचें आधण.

एका चिनी गृहस्थानें आपल्या मित्राला चहाला घरीं बोलावलें. परंतु कपाटांत चहाची पूड नव्हती व गांव लहान असल्यामुळें गांवांतहि चहा मिळण्यासारखा नव्हता. म्हणून त्यांनीं आपल्या चाकराला आसपास कोठें पूड मिळाली तर आण म्हणून पाठविलें.

चुलीवर आधण ठेवलें. पाणी लागलीच उकळूं लागलें तरी चाकराचा पत्ता नाहीं. पुनः त्याच भांड्यांत आणखी गार पाणी ओतलें तरी चाकर परत आला नाहीं. अशाप्रकारें पुष्कळ वेळां पाणी ओतावें लागलें.

ह्या कटकटीला कंटाळून त्याची बायको म्हणते, " आतां तुमच्या मित्राला चहा देण्याचे ऐवजीं हें उकळलेलें पाणीच आंघोळीला द्या म्हणजे झालें."

# + जमनालाल बजाज.

शेठ जमनालाल बजाज यांच्या चरित्राचा परिचय करून देण्याचें आज योजिलें आहे. शेठ जमनालाल यांचें नांव आज वऱ्हाड नागपुराकडे दुमदुमून राहिलें आहे. कारण त्यांनीं नागपूरच्या सत्याग्रहांत पुढारीपणा स्वीकारला म्हणून सरकारनें त्यांच्यावर रुष्ट होऊन त्यांना शिक्षा दिली आहे. अशा थोर पुरुषांची माहीती होणें जरूर आहे.



शेठजींचा जन्म इ० स० १८९० मध्यें जयपूर संस्थानांत झाला. ह्यांना एका श्रीमंत घराण्यांत दत्तक देण्यांत आलें असून यांची संपत्ती अलोट आहे. यांच्या घराण्याची दानशूरतेबद्दल फार ख्याती होती.

शेठ जमनालाल १७ वर्षांचें असतांच ही सारी इस्टेट त्यांच्या ताब्यांत आली तेव्हांपासून ते इस्टेटीची व उद्योगधंद्याची देखरेख करीत आहेत.

श्री. जमनालाल हे व्यापारांत फार हुशार असल्यामुळें त्यांनीं आपल्या संपत्तींत भर टाकली. त्यांचें व्यापारी वर्गात फार वजन आहे.

देशांत उद्योगधंद्यांचें पुनरुज्जीवन व्हावें व आपल्याला परक्या लोकांकडे पाहण्याचा प्रसंग येऊं नये म्हणून त्यांनीं कारखाने व कंपन्या स्थापल्या. त्यांचें वय २१ वर्षांचें असतांच त्यांनीं देशसेवेस सुरवात केली.

त्यांनीं विद्यार्थ्यांकरितां वर्धास मारवाडी विद्यार्थीगृह स्थापलें व त्यांचा खर्च स्वतःच चालविला. पुढें त्यांनीं मारवाडी शिक्षणमंडळ काढलें व याच मंडळामार्फत मारवाडी हायस्कूल बांधलें. त्यांनीं मुंबईचें मारवाडी विद्यालय स्थापन करण्याकरितां आर्थिक व शारीरिक श्रम पुष्कळ केले. अखेरीस दुसऱ्या कितीतरी संस्थांना त्यांनीं मदत केली आहे, व ते करीत आहेत.

हा शेठजींचा दिवसेंदिवस होत असलेला उत्कर्ष पाहून सरकारनें त्यांना रावबहादूर पदवी दिली. या पदवीला शेठजी प्रथम थोडेसे भुलले. परंतु पुढें लवकरच त्यांची व महात्माजींची गांठ पडून ते या सरकारी पाशांतून सुटले. महात्माजींनीं त्यांना दिव्य उपदेश केला, व राष्ट्राकरितां झटण्याकरितां सांगितलें. शेठजींनी गांधींना मला आपला पांचवा मुलगा समजा अशीं विनंती केली. आणि शेठजींचें आजवरचें वर्तन महात्माजींच्या मुलाला साजेसेंच आहे.

महात्मागांधींच्या सहवासापासून जमनालाल यांच्या वर्तनांत फार फरक पडला. त्यांची आधींच उदार असलेली वृत्ती अधिक उदार झाली. आणि एकवेळ अशी येईल कीं, ज्या दिवशीं शेठजी साऱ्या संपत्तीला लाथ मारून फकीर बनतील.

हिंदी भाषा साऱ्या हिंदुस्थानांची देशभाषा व्हावी म्हणून यांनीं मुंबईस एक " गांधी हिंदी पुस्तकभांडार " सुरू केलें. या भांडाराला त्यांनींच पैसे दिले. याखेरीज हिंदी पुस्तकांना, वर्तमानपत्रांना त्यांनीं बरीच मदत केली.

नागपूर येथें इंडियन नॅशनल कांग्रेस भरली असतां शेठजींची स्वार्थत्यागी वृत्ती पाहून तेथील लोकांनीं यांना स्वागतमंडळाचे अध्यक्ष निवडले होते. असहकारितेचा चळवळ सुरु झाल्यापासून त्यांनीं कांग्रेसला एक लाखावर मदत केली आहे. ही त्यांची देणगी व प्रामाणीकपणा ओळखून शेठजींना हिंदी राष्ट्रानें खजीनदार नेमले.

त्यांनीं आपली जबाबदारी किती उत्कृष्टपणें पार पाडली आहे हें सांगण्याची जरूरी नाहीं.

महात्माजी तुरुंगांत गेल्यापासून त्यांनीं अखील भारतीय खादी भांडार स्थापून त्याकरितां पुष्कळ प्रवास व दगदग सोसली. ते वर्कींग कमिटीचे सभासद होते.

पुढें नागपूरचा सत्याग्रह सुरुं झाला. या सत्याग्रहाला शेठ जमनालाल यांच्यापेक्षां दुसरा लायक गृहस्थ मिळणें शक्य नव्हतें. शेठजींनीं तेथील झेंड्याची चळवळ किती उत्कृष्टपणें चालविली होती हें सांगावयास नको. अशा प्रकारें ते देशसेवा करीत असतां सरकारानें त्यांना अचानक उचलले व तुरुंगांत टाकले.

त्यांना मॅजिस्ट्रेट पुढें केल्यावर त्यांनीं जें धीरोदात्त वर्तन केलें तें खरोखर त्यांच्या कीर्तीला साजेसें आहे. त्यांनीं सरकार जवळ जास्तींत जास्ती शिक्षा मला द्या अशा प्रकारची विनंती केली.

असो; आतां शेठजी तुरुंगांत आहेत. त्यांना १ वर्ष १०॥ महिन्यांची शिक्षा झाली आहे. त्यांच्याजवळ एवढा पैसा असून त्यांनीं जें हालआपेष्टा भोगण्याचें व्रत अंगीकारलें तें खरोखर अनुकरणीय आहे यांत शंका नाहीं.

# चुटके.

बाप— ( मुलाला ) अरे मी तुझ्या येवढा होतों तेव्हां खोटें कधीं बोलत नसे.

मुलगाः— मग बाबा तुम्ही खोटें बोलायला सुरवात केव्हां केलीत?

---

मास्तरः— हें पहा तुला नीट समजलंना, मी तुला कां छड्या मारतों तें?

विद्यार्थीः— होय मास्तर. कारण तुम्ही चांगले सशक्त आहांत आणि मी काटकुळा आहें म्हणून!

---

मास्तरः— शेताची व्याख्या सांग.

हुषार मुलगाः—चहूंकडून गहाणखतानें वेढलेली जागा.

---

नातूः— आजोबा तुम्हाला दांत आहेत कांहो?

आजोबाः— नाहींरे बाबा, सारे पडले.

नातूः— तर मग मी खेळावयास जातों तोंपर्यंत ह्या खारका संभाळा हं

---

आईः—तूं पुन्हां त्या मोरआवळ्याला हात लावलास नाहीं कां?

मुलगाः— नाहीं आई, त्या फडताळाचें दार आपोआप उघडलें आणि—

आई— मग तूं त्या दाराला कां म्हणाला नाहींस, "चांडाळा मागें सर म्हणून"

मुलगा— आई मी तसेंच म्हणालों, पण तो आवळा टणकन उडाला आणि माझ्या तोंडांत जाऊन लपला, त्याला मी काय करूं.

---

"कांहो तुमच्या काडी मोडण्याच्या खटल्याचा निकाल इतक्या लवकर कसा लागला!"

"कारण न्यायाधीश हे माझ्या बायकोचे पहिले यजमान होते म्हणून."

( इंग्रजी चुटका. )

"आतां माझे दूरचे नातेवाईक शिल्लक राहिले"

"कां आपले जवळचे नातेवाईक सारे गतायु झालें वाटतें?"

"नाहीं हो, ते सारे श्रीमंत झाले आहेत."

---

निष्काळजी मास्तर साऱ्या शाळेला निजवितो.

---

शिक्षकाचें वाचन थांबलें म्हणजे तो फोनोग्राफ होतो.

---

चांगल्या शाळेचा परिणाम प्रत्येक घरांत दृष्टीस पडतो.

---

शिक्षणाकरितां खर्च केलेल्या प्रत्येक रुपयाचें व्याज सोनेरी असतें.

---

"बाबा, तुम्ही परवां म्हणालातना कीं आपल्यापेक्षां लहान मुलांना मारणें बरोबर नाहीं म्हणून?"

"होय असें करणें चूक आहे एवढेंच नव्हें तर यांत भागुबाईपणाहि आहे."

"तर मग बाबा, हें तुम्ही एका कागदावर लिहा आणि मास्तरांना कळवा. त्यांना हा नियम ठाऊक आहे असें मला वाटत नाहीं."

---




मोटारवालाः— ( ओरडून बैलगाडीस ) अरे थांब, त्या घोड्याच्या मागून माझी गाडी जाऊंदे.

बैलगाडीवालाः— मला कुठं थांबायला वेळ आहे.

मोटार:—मग त्याला कसं जाऊं दिऊस ?
बैलगाडी:— अरे बाबा, त्याचा घोडा माझ्या गाडींतलं गवत खात होता म्हणून काढली पी तुझी गाडी काय खाणार !

---

# शालापत्रकाची चढाओढ

नवीन कोड्यांतील चित्रें.

शालापत्रकाच्या चढाओढींत पुष्कळ गृहस्थ व विद्यार्थी भाग घेतात; परंतु त्यांना चढाओढीचे नियम माहीत नसल्यामुळें त्यांचे प्रयत्न फुकट जातात. तेव्हां त्यांनीं आमचा जानेवारीचा अंक पहावा. प्रत्येक उत्तराबरोबर कूपन असलें तरच त्या उत्तराचा विचार केला जातो. ही सर्वांत मुख्य अट आहे. मुलांकरितां जीं कोडीं देण्यांत येतात तीं १५ वर्षांच्या आंतील मुलांनीं सोडवावयाचीं असतात, व आपण १५ वर्षांचे आंत आहों अशाबद्दल पालकाची चिठ्ठी सोबत जोडावयाची असते. एखादा मुलगा १५ वर्षांचें वर आहे असा संशय आम्हाला आला तर आम्ही त्याच्या उत्तराचा विचार करीत नाहीं. मुलांकरितां व सर्वांकरितां प्रत्येकी पांच पांच बक्षीसें ठेवलीं आहेत. दिवसेंदिवस चढाओढींत भाग घेणाऱ्या वर्गणीदारांची संख्या वाढूं लागल्यामुळें आमच्यावर पहिल्या पांच जणांनाच बक्षीसें देण्याचा प्रसंग येणार आहे.

तेव्हां उत्तरें लवकर पाठवींत जावींत. २० तारखेच्या पुढें येणाऱ्या उत्तरांचा विचार केला जाणार नाहीं.

पान १३९ मधील कोड्याचें उत्तर.

**सर्वांकरितां.**

१ श्रीमद्भगवद्गीता.
२ असहकारिता.
३ प्रतापसिंह.

उत्तरें बरोबर पाठविणारांचीं नांवें.

१ पंढरीनाथ रामकृष्ण आलेगांवकर, (रुडकी.)
२ दत्ता अनंत पै (मडगांव-गोंवा.)

३ राजाराम बाबाजी पोतदार मोर्वें ( कुलाबा. )
४ वासुदेव शांताराम सबनीस ( तुर्केवाडी. )
५ तुकाराम गोपाळ सबनीस ( उमरखेड यवतमाळ. )

**मुलांकरितां.**

उत्तर हस्तिनापूर.

**नांवें.**

१ माधव गणपत पांडे ( उमरखेड यवतमाळ. )
२ लक्ष्मण सखाराम तेंडोलकर, तेंडोली ( रत्नागिरी. )
३ सदाशिव लक्ष्मण दातार ( पुणें. )
४ वासुदेव शांताराम सबनीस ( तुर्केवाडी. )
५ वामन परशराम कुंटे सुसनेर ( ग्वाल्हेर. )
६ रामकृष्ण नारायण साळी आर्वी ( वर्धा. )
७ रामचंद्र महादेव सुर्वे.
८ खुशाल पूर्णाजी यावले दारापूर ( उमरावती. )
९ अप्पा विठू हरेर बेनाडी ( कागल. )
१० कमलाकर द्वारकानाथ माहगांवकर (यवतमाळ)
११ तुकाराम गोपाळ सबनीस उमरखेड ( यवतमाळ. )

पैकीं, सर्वांकरितां असलेल्या कोड्यांत ५ वे व मुलांकरितां असलेल्या कोड्यांत ६ पासून ११ पर्यंतच्या उत्तरांत कूपन नसल्यामुळें उत्तरें बरोबर असूनहि त्यांना बक्षिसें नाहींत.

**बक्षिसें.**

**सर्वांकरितां ( अनुक्रमें )**

१ विनोद महदाख्यायिका.
२ समर्थांचें चरित्र.
३ विद्वत्त, कवित्त्व व वक्तृत्व.
४ अर्वाचिन महाराष्ट्र.

**मुलांकरितां ( अनुक्रमें )**

१ शीलं परं भूषणं.
२ ध्रुव व चिलया.
३ चिमुकलें रामायण.
४ लक्ष्मीपूजन अथवा भाऊबिजेची आठवण.
५ चिमुकलें भारत.

**नवी कोडी—सर्वांकरितां.**

सोबतचीं चित्रें मुद्दाम चुकीचीं काढलीं आहेत; त्यांत काय चूक आहे तें सांगा ?

**मुलांकरितां.**

माझें पहिलें अक्षर बिगुलांत आहे सनईंत नाहीं.

माझें दुसरें अक्षर रुग्णालयांत आहे दवाखान्यांत नाहीं.

माझें तिसरें अक्षर कर्तृत्त्वांत आहे नालायकींत नाहीं.

माझें चवथें अक्षर मालकांत आहे चाकरांत नाहीं.

माझें पांचवें अक्षर हर्षांत आहे दुःखांत नाहीं.

आणि सहावें अक्षर अफगाणिस्थानांत आहे रशियांत नाहीं.

आणि सहा अक्षरें मिळून मी एक शास्त्रीय नियम बनतों. तर मी कोण ?

| ऑगस्ट<br>कूपन<br>१९२३ | | कूपन<br>सर्वांकरितां<br>ऑगस्ट १९२३ |
|---|---|---|

## लहान मुलांकरितां उपयुक्त अशीं पुस्तकें.

नवी आवृत्ति ] **सचित्र अक्षरबोध.** [ नवी आवृत्ति

या पुस्तकांत 'अ' पासून 'ज्ञ' पर्यंत स्वर आणि व्यंजनें हीं सर्व निरनिराळ्या भपकेदार रंगात त तें अक्षर नांवाच्या प्रथम अक्षरानें दर्शविणाऱ्या चित्रांसह दाखविलेलीं असून १ पासून १० पर्यंत अंकहि वरील पद्धतीनें दाखविलेले आहेत. पुस्तकाचा साईज क्राऊन चतुर्थांशाइतका मोठा ७×९ इंच ठेवला असल्या-मुळें अक्षरें व चित्रें फारच सुबक व मोठीं अशीं झालीं आहेत. एकंदर पुस्तक इंग्रजींतील सचित्र, रंगीत ए बी सी डी शिकण्यास उपयोगी अशा पुस्तकाच्या धर्तीवर तयार केलें असल्यामुळें हें पुस्तक लहान मुलांस फारच आवडून त्यावरून तीं आपला धडा सहज शिकतात. किं. ८८.

## उजळणीचें पुस्तक.

ह्यांत सर्व **मुळाक्षरें चित्रयुक्त** दिलीं असून मोडी व बालबोध **बाराखड्या** तयार करण्याची सम-जूत थोडक्यांत करून दिली आहे. नंतर मोडी व बालबोध **सोपे शब्द** मुलांना सहज ओळखण्यासारखे दिले आहेत. पुढें १० अंक सचित्र दिले असून त्यांबरोबरच मुलांस बेरीज व वजाबाकींची समजूत टिंबांच्या आकृ-तींनी व गोट्यांच्या चौकटीच्या सहाय्यानें घालून दिली आहे. नंतर पाढ्यांची समजूत दिली असून शेवटीं उजळणी दिली आहे. एकंदरींत हें पुस्तक नवीन तऱ्हेनें मुलांना शिकविण्यास फार उपयुक्त असें झालें आहे कागद ग्लेज किं. ८।८६

भाग १ ते ६ ] **चिमुकल्या गोष्टी** [ भाग १ ते ६

ह्या गोष्टींत रोज व्यवहारांत घडणाऱ्याच गोष्टी दिलेल्या आहेत, पण त्या इतक्या मोहक, मनोरंजक व मार्मिक लिहिल्या आहेत कीं, त्या गोष्टींतील तत्त्वबोध गोष्टी वाचतां वाचतांच मुलांच्या मनावर सहज ठसला जातो. पुस्तक वळीक टाइपांत सुंदर जाड व ग्लेज कागदावर छापिलेलें असून प्रत्येक गोष्टीचे प्रारंभीं कथानकाचें सुंदर चित्र दिलेलें आहे. एकंदर ह्या गोष्टीचे सहा भाग आहेत. प्रत्येक भागांत दहा गोष्टी सचित्र आहेत, प्रत्येक भागास किं ८४.

## जोडाक्षर-विरहित वाचनपाठ.

हें पुस्तक नुकत्याच अक्षर ओळख झालेल्या मुलांमुलींकरितांच लिहिलेलें आहे. पुस्तकांत एकंदर १७ गोष्टी अगदीं सोप्या भाषेंत, व एकहि जोडाक्षर न येऊं देतां लिहिल्या आहेत. प्रत्येक गोष्टीचे आरंभीं कथा-नकाचें मूर्तिमंत चित्र दिलें असल्यामुळें गोष्ट वाचण्याचे अगोदरच त्यांतील सारांश मुलांचे सहज लक्षांत येतो. किं. अवघी चार आणे.

**मिळण्याचें ठिकाण**—म्यानेजर—चित्रशाळा प्रेस, पुणें.

॥ ॐनमः श्रीरामचंद्राय ॥

# आर्यमहौषधालय मु० पो० आंजर्ले.

**कोकणप्रांतांतील अगदीं ताज्या व शुद्ध वनस्पतींचीं जगत्प्रसिद्ध निर्दोष व रामबाण औषधें.**

**कंदर्पमंजरी पाक—**ह्या अपूर्व पाक गरिबांपासून तों अमीरउमरावांपर्यंत सर्वांसही अत्यंत उपयोगी असून किंमत माफक ठेविली आहे. यांत मौक्तिक, प्रवाळ लोह, माक्षिक, कस्तूरी, अंबर इ० अत्युच्च गुणकारक पदार्थ असून शिवाय बदाम, पिस्ते, अक्रोड चारोळी, केशर, वेलची, पंजाबी सालममिश्री, सफेतमुसळी, पत्री, गोक्षुर, शतावरी, आस्कंद, वंशलोचन वगैरे (८०) उपयुक्त वनस्पति घातल्या आहेत. यानें पथ्यावांचून गुण येतो. यापासून कोणत्याही कारणांनीं होणारा व कशाही प्रकारचा शुक्रस्राव, नपुंसकत्व, मूळव्याधि, रक्तदूषणामुळें त्वगरोग, स्त्रियांची धुपणी व गर्भाशयस्थ दोष या भावना त्यांच्या एकंदर उपविकारांसह तत्काल बऱ्या होऊन धातुवृद्धि होते, व शरीर कणखर आणि तेजस्वी बनतें. २० तो० ड० २ रुपये एकदम ३ डबे घेणारास ५ रुपये.

**स्वर्णधात्री तेल—**हें चारोळी, बदाम, कंकोळ, एला, बहुविध वनस्पतींचीं सत्वें व उपयुक्त तेलें अशा अनेक पदार्थांनीं बनविलें असल्यानें याच्या मर्दनापासून अपस्मार, उन्माद, वेड, चक्कर इ० रोगांस जलद आराम पडतो. केंसांस चोळल्यानें केंस काळे कुळकुळीत, तजेलदार, सडक लांब व मृदु होऊन मेंदु शांत आणि रोगरहित बनतो. यानें मस्तकाच टक्कल जातें. हें अंगास चोळून स्नान करीत गेल्यानें शरीराचा दुर्गंध जातो. खरूज गजकर्ण, शिवें, तसेंच तळपाय, तळहात, डोळे व मस्तक यांचा दाह हे विकार खास बरे होऊन निद्रा चांगली येते, आणि नेत्ररोग दुरुस्त होतात. बा० किं० १। रु०

**दंतरक्षक पूड—**ही दांत व हिरड्या यांचे सर्व विकार तत्काल दुरुस्त करून दांत स्वच्छ व मजबूत करण्यांत प्रतिज्ञेची आहे. ड. ६ आणे.

**सुरंगी, मालती, कल्हार, गुलबहार, दणाणा, लक्ष्मीविलास** इ० बादशाही अति उंची अत्तरें व त्याचप्रमाणें गुलाब, हिना, केवडा, चमेली, जाई वगैरे सुगंधी अत्तरें आणि केंसांस लावण्याचीं हरएक प्रकारचीं सुवासिक तेले माफक दरानें पूर्ण खात्रीचीं मिळतील.

**सूचनाः—**वरील औषधे व अत्तरें वगैरे पूर्ण खात्रीचीं असल्यामुळे आज पंचवीस वर्षांत त्यांचा लक्षावधि लोकांस अप्रतिम उपयोग झाला म्हणून त्यांचा नेहमीं फारच खप होत आहे. अनुभवानंतर पूर्ण खात्री पटलच औषधे माहितीचे खर्ड्यासह रोखीनें अगर व्ही पी. नें पाठवूं प्याकिंग व टपाल खर्च वेगळा. घाऊक घेणारास कमिशन भरपूर. सर्व औषधांच्या आणि आरोग्यरक्षणाच्या माहितीचें सचित्र मोठें पुस्तक देऊं. आमचीं औषधें वगैरे मागविणें तीं खालील बिनचूक पत्त्यावर मागवावीं.

**कृष्णशास्त्री बिवलकर, वैद्य.**

REGISTERED. B.NO. 179.




पुस्तक ३४. सप्टेंबर सन १९२३. अंक ९.

| विषय. | पृष्ठ. |
|---|---|
| मेक्सिकोंतलि सार्वत्रिक शिक्षण | १६१ |
| राजकन्या व डुक्कर. | १६४ |
| दोन मिनिटांत तीन रंग. | १६५ |
| गिरनार. | १६६ |
| कांहीं बोधप्रद वचनें. | १६७ |
| एक गमतीची गोष्ट. | १६८ |
| जुन्या काळचीं घड्याळें. | १६९ |
| एका परिसाची कथा. | १७१ |
| पोहोणारा वैद्य. | १७३ |
| शरश्चंद्र दास. | १७४ |
| पावसाची मापणी. | [illegible] |
| प्राण्यासंबंधी माहिती. } शाळापत्रकाची चढाओढ. | [illegible] |
| काचः काचो मणिर्मणिः. | १७९ |
| विविध माहिती. | १८० |

मुद्रक व प्रकाशक—रा. रा. शंकर नरहर जोशी, चित्रशाळा प्रेस, १०२६ सदाशिव पेठ, पुणें सिटी.

## लहान मुलांकरितां उपयुक्त अशीं पुस्तकें.

नवी आवृत्ति ] **सचित्र अक्षरबोध.** [ नवी आवृत्ति

या पुस्तकांत 'अ' पासून 'ज्ञ' पर्यंत स्वर आणि व्यंजनें हीं सर्व निरनिराळ्या भपकेदार रंगांत व तें अक्षर नांवाच्या प्रथम अक्षरानें दर्शविणाऱ्या चित्रांसह दाखविलेलीं असून १ पासून १० पर्यंत अंकहि वरील पद्धतीनें दाखविलेले आहेत. पुस्तकाचा स ईज काऊन चतुर्थांशाइतका मोठा ७×९ इंच ठेवला असल्यामुळें अक्षरें व चित्रें फारच सुबक व मोठीं अशीं झालीं आहेत. एकंदर पुस्तक इंग्रजींतील सचित्र रंगीत ए बी सी डी शिकण्यास उपयोगी अशा पुस्तकाच्या धर्तीवर तयार केलें असल्यामुळें हें पुस्तक लहान मुलांस फारच आवडून त्यावरून तीं आपला धडा सहज शिकतात. किं. ८.

## उजळणीचें पुस्तक.

ह्यांत सर्व मुळाक्षरें चित्रयुक्त दिलीं असून मोडी व बालबोध बाराखड्या तयार करण्याची समजूत थोडक्यांत करून दिली आहे. नंतर मोडी व बालबोध सोपे शब्द मुलांना सहज ओळखण्यासारखे दिले आहेत. पुढें १० अंक सचित्र दिले असून त्यांबरोबरच मुलांस बेरीज व वजाबाकीची समजूत टिंबांच्या आकृतींनी व गोट्यांच्या चौकटीच्या सहाय्यानें घालून दिली आहे. नंतर पाढ्यांची समजूत दिली असून शेवटीं उजळणी दिली आहे. एकंदरींत हें पुस्तक नवीन तऱ्हेनें मुलांना शिकविण्यास फार उपयुक्त असें झालें आहे. कागद ग्लेज किं. ८१८६.

भाग १ ते ६ ] **चिमुकल्या गोष्टी.** [ भाग १ ते ६

ह्या गोष्टींत रोज व्यवहारांत घडणाऱ्याच गोष्टी दिलेल्या आहेत, पण त्या इतक्या मोहक, मनोरंजक व मार्मिक लिहिल्या आहेत कीं, त्या गोष्टींतील तत्त्वबोध गोष्टी वाचतां वाचतांच मुलांच्या मनावर सहज ठसला जातो. पुस्तक वळीक टाइपांत सुंदर जाड व ग्लेज कागदावर छापिलेलें असून प्रत्येक गोष्टीचे प्रारंभीं कथानकाचें सुंदर चित्र दिलेलें आहे. एकंदर ह्या गोष्टींचे सहा भाग आहेत. प्रत्येक भागांत दहा गोष्टी सचित्र आहेत, प्रत्येक भागास किं ८४.

## जोडाक्षर-विरहित वाचनपाठ.

हें पुस्तक नुकत्याच अक्षर ओळख झालेल्या मुलांमुलींकरितांच लिहिलेलें आहे. पुस्तकांत एकंदर १७ गोष्टी अगदीं सोप्या भाषेंत, व एकहि जोडाक्षर न येऊं देतां लिहिल्या आहेत. प्रत्येक गोष्टीचे आरंभीं कथानकाचें मूर्तिमंत चित्र दिलें असल्यामुळें गोष्ट वाचण्याचे अगोदरच त्यांतील सारांश मुलांचे सहज लक्षांत येतो. किं. अवघी चार आणे.

मिळण्याचें ठिकाण—म्यानेजर–चित्रशाळा प्रेस, पुणें.

मराठी
शालापत्रक

येथें शब्द नाहीं शिष्यासी । हें अवघें सद्गुरूपाशीं ।
सद्गुरु पालटी अवगुणांसी । नाना यत्नें करोनी ॥
जें कांहीं आपणास ठावें । तें हळु हळु शिकवावें ।
शहाणें करून सोडावें । सकळा जनां ॥ १ ॥

—रामदास.

पुस्तक ३४. सप्टेंबर सन १९२३. अंक ९

# मेक्झिकोंतील सार्वत्रिक शिक्षण.

शिवाजीच्या वेळीं शिक्षणाचें महत्त्व फारसें नव्हतें. प्रत्येक मुलाला अगर मुलीला लिहितां वाचतां आलें पाहिजे, अशी त्या वेळीं आवश्यकता नव्हती. आजकालची परिस्थिति तशी नाहीं. सुधारणेच्या राक्षसी प्रगतीमुळें सारें जग दृष्टीच्या टप्यांत आलें आहे. जगांतील कोणत्याहि भागांत कांहीं घडामोड झाली तर त्याचे परिणाम साऱ्या जगाला भोगावे लागतात.

प्रत्येक मनुष्याला ज्ञानलालसा असते. अमेरिकेंत काय चाललें आहे, जपान काय करतो, इंग्लंड काय म्हणतें, फ्रेंच जर्मनीचा लढा कोठवर आला, लॉसेनच्या तहाचें काय झालें, हिंदुस्थानांत असहकारितेची चळवळ कोणत्या थरावर आली, वगैरे गोष्टींचें ज्ञान होणें मनुष्याला अवश्य वाटूं लागतें. जेवणें, खाणें, पिणें, वगैरे प्रकारांतीलच माहिती मिळविणें हा एक प्रकार होतो. वास्तविकपणें ह्या माहितीपासून प्रत्येक जगांत कांहीं क्रांती घडवून आणतां येईल असें नाहीं. परंतु ज्ञानलालसा ही एक अजब गोष्ट असल्यामुळें मनुष्य स्वाभाविकपणें जिज्ञासू असतो.

ही जिज्ञासा तृप्त होण्यास वाचतां येणें अवश्य आहे. मनुष्य साक्षर झाला म्हणजे त्याला जगांत आपला काय दर्जा आहे, आपल्याला या जगांत हक्क किती आहेत याचें ज्ञान होतें.


शिवाजीच्या वेळीं जगांतील घडामोडींचें ज्ञान प्रत्येक मनुष्याला होणें जरूर नसे. राष्ट्रांतील जो मुख्य माणूस असे त्याला जासूदाच्या द्वारां गुप्त

हालचाली व बातम्या कळल्या म्हणजे काम भागे. परंतु लोकशाहीच्या दिवसात सारा प्रकार वेगळा असतो.

राजकीय उन्नति हा सार्वत्रिक शिक्षणाचा प्रधान-हेतु असतो. परंतु खरें ज्ञान ज्याला म्हणतात तें मात्र सर्वांना सारख्याच सुलभतेनें प्राप्त होणें शक्य नाहीं. सक्तीच्या व मोफत शिक्षणाचा मूळ हेतु म्हणजे कामचलाऊ शिक्षण मिळविणें एवढाच आहे.

सुधारलेल्या काळांत शिक्षणाचें महत्त्व अत्यंत असतें ही गोष्ट ध्यानांत बाळगून तें कसें प्राप्त शिक्षण कसें प्राप्त करून घ्यावयाचें हाहि एक देशापुढें प्रश्न आहे.

हा प्रश्न कसा सोडवतां येईल हें आपण पाहूं. मेक्सिकोमधील लोकांपुढें असलाच प्रश्न होता. सरकार परकीय असल्यामुळें तेथील मुलांच्या शिक्षणाचा प्रश्न त्यांना जीव्हाळ्याचा वाटेना. परंतु लोकांना तर शिक्षणाची तीव्र जरूरी होती. तेव्हां त्यांनीं स्वयंसेवक शिक्षक बनविले. ज्यांना वरचें म्हणजे दुय्यम प्रतीचें शिक्षण मिळत होतें, व ज्यांना असल्या देशकार्याकरितां थोडासा वेळ मिळत होता,



विद्यार्थि शाळेंत शिकत आहेत.

करून घेतां येईल हा प्रश्न शिल्लक रहातो. शिक्षण देण्याचें काम सरकारचें आहे; परंतु ज्यांच्या दुर्दैवानें इंग्रज सरकारसारखें परकी सरकार लाभलें असतें, त्यांना आपल्या शिक्षणाची आपणच व्यवस्था करावी लागते.

हल्लीं जरी मोफत व सक्तीचें शिक्षण देण्याचा ठराव कागदावर पास झाला आहे, तरी त्याच्या अमलबजावणीस फार दिवस लागतील. शिवाय जें त्या कायद्याच्या कक्षेंतून वयामुळें निसटतील त्यांना त्यांनीं आपलीं नांवें स्वयंसेवकाच्या यादींत नोंदवलीं. या स्वयंसेवकांचें एक मंडळ स्थापण्यांत आलें व त्याचा अध्यक्ष एक प्रमुख गृहस्थ झाला. या स्वयंसेवकांना जागेची जरूरी होती. परंतु जी जागा मिळेल तिचा उपयोग करून घ्यावयाचें, या मंडळीनें ठरविलें. एखाद्याचें घर रिकामें असलें अगर त्याची जागा मोठी असली तर तो ती मोठ्या खुषीनें या पवित्र कार्याकरितां देई. एखादा सार्वजनिक बाग मोकळी असली तर तिचाही उपयोग या कार्याकडे होऊं

लागला. देवळेंही शिकवण्याच्या कामांत उपयोगांत आणलीं गेलीं. अशा प्रकारें गेल्या वर्षीं त्यांनीं १ लाखांवर मुलांना शिक्षण दिलें.

प्रत्येक स्वयंसेवकाला मध्यवर्ती संस्थेकडून एक दाखला मिळे. हा दाखला घेऊन तो स्वयंसेवक ठराविक जागीं जातो. शिकविण्यास लागणारें सामान त्याच्या बरोबर देण्यांत येतें. त्या जागेवर गेल्यावर हस्तपत्रिका काढून तो मुलांना गोळा करतो व त्यांना शिकवण्यास सुरवात करतो.

मेक्झिकोमधील लोकांना हें शिक्षणाचें महत्व कळूं लागलें आहे ही आनंदाची गोष्ट आहे. तेथें प्रत्येक सुशिक्षित माणसाचें आद्य कर्तव्य म्हणजे इतरांना शिक्षण देणें हें समजलें जातें. परंतु कांहीं लोकांना हें कर्तव्य करण्यास सवड सांपडत नाहीं, असे लोक आपल्याजवळ असलेली शिक्षणोपयोगी सामुग्री अगर द्रव्य देऊन या ऋणांतून मुक्त होतात. या मंडळाच्या गरजा अर्थातच पुष्कळ आहेत. कित्येक शाळांत मुलांना बसण्याला बांकें नसतात, लिहिण्यास फळे नसतात, शिकवण्यास पुस्तकें नसतात अगर इतर साधनें नसतात. हीं पुरवण्याचें काम धनाढ्य लोक आपल्या अंगावर घेतात.

कोणतेही कठीण काम एकजुटीनें कसें पार पडूं शकतें, याचें हें उत्तम उदाहरण आहे परंतु तें पार पडण्यास मार्गदर्शक व इच्छा ही अवश्य आहे. पुणें शहरांत विद्यार्थी वर्ग पुष्कळ असल्यामुळें येथेंही एक अशी कमिटि नेमण्यांत येऊन तिच्याद्वारें असलाच प्रयत्न होणार होता. परंतु तो तितकाच राहिला. रात्रीच्या वेळीं प्रत्येक खेड्यांतील सुशिक्षित वर्गांनीं असे वर्ग काढण्याचें ठरविलें तर पुष्कळ काम होण्यासारखें आहे. शहरांतहि शिक्षणाकरितां पुष्कळ विद्यार्थी येत असतात. त्यांना दरवर्षीं ३-४ महिने सुट्टी मिळते, व ते आपापल्या घरीं जातात. अशावेळीं जर त्यांनीं आपलें खेड्यांतील आशिक्षित बंधु एकत्र जमविले व त्यांना फुरसतीनें शिक्षण दिलें तर पुष्कळ कार्यभाग होण्यासारखा आहे. या एकत्र जमण्यांत नुसता शिक्षण देणें हाच एक विशिष्ट हेतू असूं नये. राजकारणाच्या चार गोष्टी त्यांना समजाऊन दिल्या व त्यांच्यांत देशप्रीति उत्पन्न केली, तर राष्ट्राची प्रगती केल्याचें बरेंच श्रेय लागेल. नुसतें साक्षर होऊन हल्लीं भागत नाहीं. तर राजकारणाचे विषय समजण्याची पात्रता अंगांत यावी लागते तरच त्या शिक्षणाचा फायदा होतो; तेव्हां चर्चेच्या स्वरूपानें त्यांना जरी साधारण राजकारणाची माहिती करून दिली तरी पुष्कळ झालें असें म्हणतां येईल

हें शिक्षण देण्याचें काम निरपेक्ष बुद्धीनें केलें जात असल्यामुळें, शिक्षकांना स्वतः आपण एक पवित्र कार्य करतों एवढेंच समाधान असतें मेक्झिकोमध्यें या स्वयंसेवकांचें अभिनंदन करावें म्हणून एक राष्ट्र—दिन पाळण्यांत येतो. या दिवशीं तेथील सारे लोक एकत्र जमतात व ज्यांनीं ज्यांनीं आपल्या देशबांधवांवर शिक्षणद्वारां उपकार करून ठेवले आहेत त्यांचे त्यांचे आभार मानतात.

मेक्झिकोमध्यें आशिक्षित लोकांचा भरणा फार आहे, व अज्ञानरूपी अंधकार नष्ट करून टाकण्याचें कामहि कठीण आहे. सध्यांचा प्रयत्न म्हणजे नुसती सुरवात होय. मनुष्य जसजसा शिकत जाईल, तसतसा तो लोकशाहीला पात्र होत जाईल. शिक्षणावर लोकशाहीचें यशापयश अवलंबून असल्यामुळें शिक्षणाचा प्रसार जसा होईल तसा राजकारणाचा एक मोठा प्रश्न सुटेल असें म्हणण्यास हरकत नाहीं.

# राजकन्या व डुकर.

एका राजाला तीन मुली होत्या तो राजा फार दूर रहात असे. त्याचा राजवाडा एका वडाच्या झाडाखालीं असे. त्या झाडाला ७७ फांद्या होत्या व प्रत्येक फांदीवर ७७ कावळे रहात.

एकदां तो राजा बाहेर चालला होता. तो आपल्या मुलींना म्हणाला " मी बाजारांत जात आहें, तुम्हांला येतांना काय आणूं ? "

थोरली मुलगी म्हणाली " मला सोनेरी पोषाख पाहिजे. "

दुसरी म्हणाली " मला रुपेरी पोषाख हवा " आणि तिसरी मुलगी म्हणाली " मला बोलतीं द्राक्षें पाहिजेत, हंसतें डाळींब व मंजूळ आवाज करणारीं बोरें आणा. " राजानें दोघी मुलींकरितां सोनेरी व रुपेरी कपडे आणले; परंतु त्याला लहान मुलीनें मागीतलेल्या जिनसा मिळाल्या नाहींत.

धाकटी मुलगी त्याची फार आवडती होती. मागितलेल्या जिनसा न मिळाल्यामुळें राजाला फार वाईट वाटलें.

रस्त्यानीं येतांना राजाची गाडी मातींत रुतली. राजानें गाडी बाहेर काढण्याचा पुष्कळ यत्न केला परंतु ती बाहेर निघेना त्यानें गाडीला ८।१० घोडे अधिक लावले तरी गाडी हलेना.

अशाप्रकारें हताश होऊन काय करावें याचा विचार करीत राजा बसला असतां तिकडून एक घाणेरडें डुक्कर आलें. डुकरानें ते घोडे, ती सोनेरी गाडी, तो राजा वगैरे पाहून एक किंकाळी फोडली.

तो म्हणाला " राजा, तुझी धाकटी मुलगी मला दे, म्हणजे मी तुझी गाडी बाहेर काढतों. "

राजानें पुढचा मागचा विचार न करितां "हो " म्हटलें. तें पाहून डुक्कर त्या गाडीजवळ गेलें व त्यानें एका मुसंडीसरशी रुतलेली गाडी वर काढली. घरीं आल्यावर राजानें आपल्या दोघा मुलींना उंची उंची पोशाख दिले; परंतु धाकट्या मुलीकडे पाहून त्याला रडूं कोसळलें, त्यानें तिच्याकरितां कांहीं आणलें नाहीं एवढेच नव्हे; तर तिला एका घाणेरड्या डुकराला देऊन टाकण्याचें कबूल केलें.

दुसरें दिवशीं सकाळीं तें घाणेरडें डुकर एक हात गाडी ढकलीत ढकलीत राजवाड्याजवळ आलें. तें म्हणालें " राजा, चल आण तुझी मुलगी ",

राजानें आपल्या मुलीकरितां आपले प्राणहि दिले असते; पण आतां करतो काय ! त्यानें त्या डुकराला फसविण्याचा विचार केला आणि एका गरीब मुलीला उंची पोषाख घालून डुकराजवळ पाठविलें. पण तें डुकर म्हणालें.

" छे ही तुझी मुलगी नाहीं. मी तुझ्या मुली करतां आलों. "

नंतर राजानें आपल्या मुलीच्या अंगावर फाटक्या चिंध्या घातल्या. तिचें तोंड काजळानीं काळें केलें व डुकराजवळ तिला दिलें. पण तें डुक्कर अशानें फसलें नाहीं त्यानें त्या मुलीला आपल्या हात गाडींत घातलें व आनंदानें उड्या मारीत तिला चालविलें.

गरीब बिचारी राजकन्या ! ती मोठमोठ्यानें रडूं लागली. तिच्या डोळ्यावाटें अश्रूंच्या धारा येऊं लागल्या. तें डुक्कर तिला घेऊन चाललेंच होतें. राजकन्येला मूर्च्छा येऊन ती आंत पडली होती. इतक्यांत डुकरानें गाडी थांबवली, व तिला एका गलिच्छ जागीं उतरविलें.

राजकन्या त्या जागीं उतरली, परंतु खाण्याकडे अगर तेथें पडलेल्या गवताच्या बिछान्याकडे तिचें लक्ष जाईना. ती रात्रभर स्फुंदून स्फुंदून रडत होती व तशीच झोंपीं गेली.

सकाळीं उठून पहाते तों आपण एका मोठ्या किल्ल्यांत असून सोनेरी बिछान्यावर निजलों आहों व वरती सोनेरी छत आहे असें तिला दिसलें.

तोंडावर सूर्य किरणें पडलीं असतां ती डोळे चोळीत चोळीत उठली. तों एक सुस्वरूप तरुण पुरुष आपणाकडे येत असलेला तिला आढळला. तो म्हणाला " राजकन्ये! कशी काय तुला झोंप आली?"

तिनें स्वतःला चिमटा घेतला व आपण झोंपेंत नाहीं अशी खात्री झाल्यावर ती आश्चर्यानें म्हणाली " आपण कोण?"

" मी राजपुत्र असून तुझें पाणीग्रहण करण्याचें इच्छेनें आलों आहें. मला एका दुष्ट चेटकीनें तिच्या मुलीबरोबर विवाह केला नाहीं म्हणून शाप दिला होता. त्या शापानें मी डुक्कर बनलों. परंतु तुझ्या पुण्याईनें मी पुनः माणूस झालों आहे. हें राज्य माझें असून तुला मी तें दाखविण्यास नेतों.

नंतर ती राजकन्या बाहेर गेली. तेथें तिच्या दासी उभ्या होत्या. त्यांनीं तिला निरनिराळी अत्तरें लावून न्हावू घातले व चांगले कपडे दिले.

इतक्यांत राजपुत्र तिला बागेंत घेऊन जावयास आला. त्या बागेंतील द्राक्षें तिज बरोबर बोलूं लागलीं. ती म्हणाली " राजकन्ये, ये आम्हाला तोड व आमची चव घे." डाळींबें तिजकडे पाहून हसूं लागलीं व बोरें मंजुळ आवाज करूं लागलीं. ती बाग सगळ्या जगांतील बागेंत सुंदर होती.

राजपुत्र म्हणाला " ही माझी बाग आहे."

राजकन्या लज्जेनें आरक्त होऊन खालीं पाहूं लागली. ती त्या राजपुत्राला म्हणाली कीं, ही बातमी आपण माझ्या वडिलाकडे पोहोंचवा. इतक्यांत एक शुभ्र राजहंस तेथें आला व राजकन्येची चिठ्ठी घेऊन गेला.

लवकरच राजकन्येच्या दोघी बहिणी व राजा सोनेरी रथांत बसून तेथें आले.

नंतर त्यांचें लग्न लागलें. लग्नसोहळा फारच अप्रतीम होता. त्याचें वर्णन करणें आमच्या शक्ति बाहेर आहे. नंतर ते दोघेजण आनंदानें राहूं लागले.

---

# दोन मिनिटांत ३ रंग.

## एक चुटका.

( अनंत गणेश नातू, रत्नागिरी )

[ स्थळः—वामनरावांचें घर. वामनरावांची पत्नी रखमाबाई ही घरांत तांदूळ निवडीत बसली आहे. वामनराव घरीं येऊन सुमारें पंधरा मिनिटें झालीं आहेत. ]

वामनरावः—अग, म्हटलं जरा इकडे येऊन जा. जरूरीचें काम आहे.

रखमाबाईः—एकसारखं मेलं माणसाला छळायचं तरी किती? मनुष्य गरीब गावलं म्हणून आपलं चालत.

वामनः—तसं नव्हे, हा मीं किरमिजि शालू आणला.

रखमा०—( तुरुतुरु चालत येऊन ) हा का छान आहे हो. काय पडलं याला?

वामन०—छे! छे! तशांतला कांहीं भाग नाहीं. शेजारच्या गोविंदरावांनीं घेऊन तो मजकडे दिला आहे. घरीं जातांना ते घेऊन जातील.

रखमा०—( रागानें घरांत जात असतां. ) मेलं फुकटचं माणूस गावलं म्हणून अशी एकसारखी चेष्टा करायची कीं काय? इकडे त्या शेजारच्या त्राटिकाकाकूंसारखी बायको मिळायला पाहिजे होती.

# गिरनार.

जैन लोकांना आपलीं देवळें उंच डोंगरांच्या शिखरावर बांधण्याची हौस पहिल्यापासून आहे. ती हौस कां असावी याचें कारण सांगतां येत नाहीं परंतु कांहीं असलें तरी त्यांची आवड प्रशंसनीय आहे यांत शंका नाहीं.

गिरनार हा पारसनाथाप्रमाणें एक पवित्र डोंगर आहे. हा डोंगर जुनागड गांवाजवळ असून त्याची तेथील मंदीरांबद्दल फार प्रसिद्धि आहे

हीं देवळें २००० वर्षांचीं जुनी आहेत. अशोकाचा अंमल सुरु होण्यापूर्वींच या देवळांची स्थापना झाली. हा डोंगर ३५०० फूट उंच आहे.

जुनागडापासून कांहीं अंतरावर भावनाथाचें मंदीर आहे, आणि येथूनच वर चढणीस सुरुवात होते. वर जाण्यास जुना एक रस्ता शिल्लक आहे. परंतु या रस्त्यानें चढण्यास फार त्रास होतो. नवा एक दगडाच्या पायऱ्याचा रस्ता बांधला आहे, तो रस्ता चांगला असून चढण्यास कमी त्रास होतो. वर जाण्यास डोल्याहि मिळतात.

चढावयास सुरवात झाल्यावर सृष्टिसौंदर्याचा अप्रतिम देखावा दिसूं लागतो सुमारें ४८० फूट चढून गेलें म्हणजे विश्रांती घ्यावी लागते. तेथें जाईपर्यंत घाम फार येतो व माणूस दमतो. तथापि रमणीय देखाव्यामुळें थकवा कमी होतो.

दुसरें थांबण्याचें ठिकाण १००० फूटांवर आहे, तेथपर्यंत रस्ता चांगला आहे. परंतु पुढील रस्ता कठीण आहे. पुढें ४०० फूट गेलें म्हणजे माणूस उंच कड्याच्या पायथ्याशीं येतो.

या ठिकाणीं पूर्वी चढून जाणें म्हणजे जीवावरचें काम होतें; परंतु आतां तेथें लोखंडी खांब वगैरे ठोकल्यामुळें जाणें फारसें कठीण नाहीं. हिंदुलोक चढण्याच्या कामांत अगदीं सोशिक व कसलेले असतात. पुढें गेल्यावर एक दातासारखा मोठा थोरला सुळका दिसतो. तो डोंगरांतून फुटून निघाला आहे.

ह्या सुळक्याच्या शिखरावरून पूर्वीं लोक उड्या टाकीत व आयुष्यांतून सुटत.

येथून देवळाच्या भिंती दिसूं लागतात. एखाद्या परक्या माणसाला हे किल्ल्याचे तट आहेत असें वाटण्याचा संभव आहे. परंतु कोरींव काम दिसूं लागतांच हा संशय दूर होतो. ह्या भिंती देवळाचें व आंतील संपत्तीचें संरक्षण करण्याकरितां बांधल्या आहेत

प्रवाशी वर पहातो व किती चढावयाचें आहे याचा विचार करतो. जातां जातां सभोंवतालच्या प्रदेशाकडे सारखें पहात रहावें असें वाटतें. अखेरीस तो वेशीपाशीं येतो. ही वेस दगडी असून मजबूत आहे.

आंत जातांच पांढरीं देवळें दिसूं लागतात. या देवळावर घुमट आहेत व त्यावर कोरींव काम फारच

छान केलें आहे. येथेंच प्रवास संपत नाहीं. तेथून पुढें ६०० फूटावर गेलें म्हणजे अंबामातेचें देऊळ लागतें. या देवळाला जातांना रस्त्यांनीं पुष्कळ बैरागी योगी, साधू देवळें धर्मशाळा वगैरे लागतात.

अंबामातेच्या देवळाकडे जाण्यापूर्वीं प्रथम यात्रेकरू विश्रांती घेतात. विश्रांतीसाठीं तेथें संस्थानिकांनीं एक धर्मशाळा बांधली आहे.

अंबामातेच्या देवळावरून दिसणारा देखावा पाहून मनुष्य आनंदानें वेडा होतो. देवीच्या दर्शना-करितां नुक्तेंच लग्न झालेलीं जोडपीं येतात.

यानंतर शेजारचीं देवळें पाहण्यांत कांहीं लोक वेळ घालवतात तर कांहीं विश्रांती घेतात. तेथील कांहीं मूर्ति मोठ्या आकाराच्या असल्यामुळें मोठ्या गंमतीच्या दिसतात. एका गुहेंत एक निजलेली मोठी मूर्त आहे. त्या मूर्तिकडे व सभोंवतालच्या देखाव्याकडे पाहूनच भीती वाटते. प्रत्येक गुहेंत कोरींव काम असतेंच. या देवळांची संख्या पुष्कळ आहे.

असो, अशा प्रकारें निरानिराळीं देवळें पहाणें झाल्यावर मनुष्य परत फिरतो.

सूर्य थोडा कलता झाला म्हणजे परत फिरणें बरें. परंतु त्याच दिवशीं परत फिरल्यास त्रास फार होतो.

गिरनार पर्वत चढून उतरणें म्हणजे अत्यंत श्रमाचें काम आहे, म्हणून दुसऱ्या दिवशीं उतरणें चांगलें. तथापि चालण्याची दगदग फार झाली, तरी वर जाऊन आल्यावर श्रमाचें चीज होतें.

---

# कांहीं बोधपर वचनें.

१ ज्याप्रमाणें भगवान सूर्य हा उदयाच्या व अस्ताच्या वेळीं रक्तवर्ण असतो, त्याप्रमाणेंच मोठे-लोक हे संपत्ति किंवा विपत्ति प्राप्त झाली असतां आपली एकरूपता दाखवितात.

२ ज्याच्याजवळ क्षमेचें दिव्य शस्त्र आहे त्याला दुर्जन काय त्रास देणार ? तृण नसल्या जागीं जर अग्नि पडला तर तो लगेच विझतो. तृण असलें तरच प्रज्वलित होणार. त्याप्रमाणेंच जिथें क्षमा आहे तिथें दुर्जनाचें काय चालणार ?

३ उच्च मनाचे लोक सत्कृत्य करण्यांत नेहमीं आनंद मानतात, दुसऱ्यानें आपला मोबदला फेडावा हा त्यांचा हेतू नसतो.

४ प्राण्याच्या ठायीं वसत असलेली दया जें फल देतें, तें सर्व वेद देत नाहींत, सर्व यज्ञ देत नाहींत आणि सर्व तीर्थांचे अभिषेक पण देत नाहींत.

५ सर्व प्राणिमात्रांवर दया ठेवावी, परंतु सर्वां-बरोबर परिचय ठेवणें इष्ट नाहीं.

६ जो भूतदयेंत मोठा तोच खरोखरच मोठा समजला पाहिजे.

७ केवळ शास्त्राचा आश्रय घेऊन विषयाचा निर्णय करतां कामा नये; अथवा करूं नये. कारण युक्तिविरहित विचारानें धर्माची हानि होते.

८ जगांतील सर्व पदार्थांचें एकाद्याला संपूर्ण ज्ञान असलें, पण त्याच्या ठिकाणीं दयेचा वास नसला तर प्रभूसमक्ष त्याला या ज्ञानाचा काय उप-

योग होणार ? प्रभूसमक्ष त्याचा न्याय तर त्याच्या कर्मानुसारच होणार.

९ महाजनांचा संसर्ग उन्नतिकारक नाहीं असें कोण म्हणूं शकेल ? कमलिनीच्या पत्रावर पडलेला पाण्याचा बिंदु हा मुक्ताफल होत नाहीं काय ?

---

## एक गमतीची गोष्ट.

( लेखक--अनंत गणेश नातू, देऊळवाडा, रत्नागिरी. )

एका राजाला तीन पुत्र होते. त्याचें त्या पुत्रां-वर विलक्षण प्रेम असे. तो राजा फार वृद्ध झाला होता. एकदां विचार करतां करतां, राजा मनांत म्हणाला, " मला तीन पुत्र आहेत पण त्यांतील राज्य करण्यास लायक कोणता हें मला शोधून काढलें पाहिजे." विचार करतां करतां, त्याला युक्ति सुचली. एके दिवशीं त्यानें त्या तिघा राजपुत्रांना एके ठिकाणीं बोलावून आणलें व तो त्यांना म्हणाला, " प्रिय बालकांनो, मला एक गोष्ट तुम्हांला सांगा-वीशी वाटते. ती [illegible]शी तुम्हांला चमत्कारिक भासेल. तुम्हां तिघ[illegible] अतिशय आळशी ठरेल त्यालाच माझ्या पश्चात गादीवर बसण्याचा हक्क राहील."

हें ऐकल्याबरोबर सर्वांत वडील पुत्र म्हणाला, " तर मग बाबा, मलाच सर्व राज्य मिळणार; कारण मी इतका आळशी आहें कीं, एकादे वेळीं मी बिछान्यावर पडलों असतां जर माझ्या डोळ्यांत अश्रू आले, तर ते पुसल्याशिवाय मी तसाच निजतों."

" ऊं:, हें तर कांहींच नव्हे " मधला पुत्र बोलूं लागला, " मी याच्यापेक्षां कितीतरी पटीने आळशी आहें. मीं शेकावयास विस्तवाजवळ बसलों असतां जर माझे पाय चुकून भाजूं लागले तर मी बराच वेळ केवळ आळसामुळें ते वर ओढीत नाहीं. यावरून गादीवर बसण्याचा हक्क माझाच आहे."


थोड्या वेळानें तिसरा म्हणाला, " तर मग खात्रीनें मीच राजा होणार; कारण माझी योग्यता सर्वांपेक्षां जास्त आहे. समजा कीं, मी फांसावर चढलों आहें. इतक्यांत कोणी मजजवळ तीक्ष्ण तरवार फांसाचा दोर कापण्याकरितां आणून दिली तरी, मी त्या तरवारीनें फांस तोडणार नाहीं. कांहीं झालें तरी मरेन, पण दोर कापण्याचें श्रम कोण घेतो ? "

तिघांचीं भाषणें ऐकून राजा मनांत फार खट्टू झाला. नंतर लौकरच राजानें आपल्या नात्यांतला एक योग्य मनुष्य निवडला व त्याला आपल्या पश्चात राज्य चालविण्याचा अधिकार दिला.

मुलांनो, तुम्हांला यांत कांहीं घेण्याजोगें वाटल्यास घ्या.

# जुन्या काळचीं घड्याळें.

जेव्हां घड्याळें शोधून काढलीं नव्हतीं तेव्हां वेळ मोजण्यास कोणतीं साधनें होतीं हा एक प्रश्न आहे. तथापि त्यांना वेळेचें ज्ञान होत होतें ही



वेळ ओळखण्याची मेणबत्ती.



दोरीचें घड्याळ.

गोष्ट मात्र खरी आहे. कदाचित् त्यांना मिनिटें सेकंदें वगैरे कळत नसतील. परंतु तासांचें ज्ञान होत होतें हें मात्र खास.

दिवसां दिवस मोजण्याचें काम सूर्याच्या योगानें होई. रात्रीं चंद्र अगर तारका यांच्या हालचालींवरून दिवस सांगता येईल. त्यांना खरी अडचण पावसाळ्यांत भासे. कारण त्या वेळीं सूर्य, चंद्र, तारा वगैरे ढगा आड लपलेले असत. असो, तेव्हां आपण त्यांच्या एकेक साधनाचा विचार करूं.


पहिलें घड्याळ कांठीचें असें. जमिनींत एक कांठी पुरून ठेवीत. आणि त्या कांठीची सावली जेथपर्यंत पडे तेथपर्यंत एक खूण करीत. पुढें सावली जशी कमी जास्त होई तशी त्या सावलीच्या योगानें वेळ समजली जाई. परंतु या योगानें फक्त दिवसां ऊन असतांना वेळ समजे. रात्रीच्या वेळीं त्याचा उपयोग नसे. रात्रीच्या वेळीं वेळ कळण्यास दुसरी एक युक्ती योजीत ते रात्रीकरितां मेणबत्त्यांचे सारखे भाग करीत व त्यांना तासा तासांच्या अंतरानें काळे रंग देत. रात्र झाली म्हणजे त्या मेणबत्त्या पेटवीत. त्यांचा प्रत्येक भाग एक तासभर जळे, अशा प्रकारें रात्रीची वेळ समजे.

रात्रीची वेळ समजण्यास दुसरीहि एक युक्ती योजीत. एक दोरी घेऊन तिचे सारखे भाग दोरीला गांठी देऊन करीत व ती खालून पेटवीत. चिनकोरियामध्यें याचा प्रचार अद्यापहि आहे.

याखेरीज तीन प्रकारचीं दुसरीं घड्याळें असत. एकाला घटकेचें घड्याळ, दुसऱ्याला वाळूचें घड्याळ व तिसऱ्याला उन्हाचें घड्याळ म्हणत.

पाण्याचें घड्याळ पुष्कळांनीं पाहिलेंच आहे.

एका घंगाळांत पाणी घालून आंतमध्यें घटकापात्र सोडतात. या पात्राच्या बुडाशीं एक भोंक असतें.



पाण्याचें घड्याळ.

त्या भोंकांतून थोडें थोडें पाणी त्या घटकापात्रांत चढतें. तें पात्र पाण्यानें भरलें म्हणजे पुन: रिकामें करून आंत सोडीत व झालेल्या घटका भिंतीवर मांडून ठेवीत. असलीं घड्याळें मुंजच्या वेळीं घटका मोजण्याचे वेळीं उपयोगांत आणतात.


वाळूचीं घड्याळेंहि अद्याप पोलीस चौकीवर व जुन्या देवळांतून दिसून येतात. त्याकरितां एक कांचेचें भांडें उपयोगांत आणतात.

हें भांडें मध्यें चिंचोळें असून दोन्ही बाजूंस फुगीर असतें. वरचीं व खालचीं तोंडें बंद असतात. एका भागांतील वाळू दुसऱ्या भागांत गेली म्हणजे तें भांडें उरफाटें करतात व वेळ मांडून ठेवतात. असा क्रम सतत चालू असतो.

उन्हाचें घड्याळ कसें करतात, हें प्रथम सांगितलेंच आहे.

उन्हाच्या घड्याळाकरितां एक चौकोनी जागा घेतात. तेथें एक वर्तुळ काढतात, व त्यावर वेळां दर्शवितात. कांठीची सावली त्यावर जसजशी पडेल तसतसा वेळ समजतो.

या प्रत्येक घड्याळांत कांहीं ना कांहीं दोष असल्यामुळें नवीन घड्याळाचा जन्म झाला ही गोष्ट सांगावयास नकोच.



उन्हाचें घड्याळ.


# अभिनव काव्यमाला भाग ३

या पुस्तकाची दुसरी आवृत्ति छापून विक्रीस तयार आहे. किं. १ रु. ट. ह. व व्ही. पी. खर्च निराळा.

म्यानेजर—चित्रशाळा प्रेस, पुणें.

# एका परिसाची कथा.

वसंत ऋतूंतील अगदीं उन्हाळ्याचे दिवस होते, अशावेळीं एक साधू थकून भागून सकाळच्या सुमारास हरद्वार शहरांत आला. हरद्वारला येण्याकरितां त्याला पुष्कळ प्रवास करावा लागला होता. रस्त्यांनीं जातां जातां त्याला एक चांगलें घर दिसलें; त्या घराजवळ येऊन त्यांनीं अंग टेकण्यास परवानगी विचारली. परवानगी मिळाल्यावर त्यानें आपली झोळी तेथें टेकली व एका कोपऱ्यांत आपली कांठी, पथारी वगैरे ठेवली.

त्या घराचा मालक एक कापडाचा व्यापारी होता. त्यानें त्या साधूकडे पाहिलें. तो म्हणाला "बावाजी कोठून आलात आपण?" "मी शिवालिक पहाडांतून आलों" असें त्यानें उत्तर दिलें. "बाबारे! मोठ्या दगदगीचा प्रवास आहे. किती क्रूर श्वापदें तेथें आहेत. माझ्या प्राणाची शाश्वती नव्हती, पण माझ्या झोळींत असलेल्या जादूच्या दगडानें माझे प्राण वांचले. तो दगड मौल्यवान नाहीं, पण त्याचा गुण अमोलिक आहे. तो धन्याला साऱ्या संकटांतून वांचवितो."

थोडा वेळ गेल्यावर तो साधू आपल्या जागेवरून उठला व सारें सामान तेथेंच ठेऊन नदीवर स्नानास गेला. तो व्यापारी त्याच्या मागोमाग चालला, व हा वैरागी खरोखरच नदीवर गेला आहे, अशी त्याची खात्री पटल्यावर घरीं परतला. त्यानें त्याची झोळी तपासली. आंत त्याला एक अत्यंत तेजस्वी, कबूतराच्या अंड्याएवढा, लालभडक असा मणी सांपडला. त्यांनीं तो चहूंकडून तपासून पाहिला. नंतर त्यानें आपली तिजोरी उघडली व तींत नेऊन तो ठेऊन दिला.

हा साधू इकडे नदींत ईश्वराची प्रार्थना करण्यांत गुंग झाला होता, इतक्यांत त्याला धक्का बसल्यासारखें झालें. तावडतोब तो पाण्याच्या बाहेर आला व अंग पुसून घरीं निघाला. घरीं आल्यावर व्यापाऱ्याकडे पाहून म्हणतो, "राजश्री माझ्या झोळींतला तो मणी द्या पाहूं"

"बावाजी! काय भलतेंच बोलता हें? मी आपल्या झोळीला हातसुद्धां लावला नाहीं"

"तरिपण दुसऱ्याची वस्तू घेणें चांगलें नाहीं."

"मी आपली वस्तू घेतली नाहीं, मजजवळ चोरीचा आळ घालणें चांगलें नाहीं"

"काय चांगलें नाहीं? बरं तर राहूं दे, तो मणी तुजजवळच राहूं दे. तो तुला सुख देईल पण माझा शाप ऐक. तुझें लग्न होणार नाहीं. तूं सारखा द्रव्याचा विचार करीत राहशील. आणि त्यामुळें तुझा निर्वंश होईल"

"चुकलों चुकलों महाराज, मीच तो चोरला. घ्या, तो परत घ्या आणि मला शापमुक्त करा"

"नको नको असूं दे. मला तूं उन्हाच्या वेळीं सावलीची जागा दिलीस त्याबद्दल मी तुझा आभारी आहें. मी आतां समोरच्या आंब्याच्या झाडाखालीं जातों"

असें म्हणून तो आपलें सामान उचलून इतर वैराग्यांत जाऊन मिसळला व ध्यानांत मग्न झाला.

"वाहवारे साधू" व्यापारी म्हणतो, या

साधूला वाटेंत कीं, आपल्या शापामुळें याचें वाटोळें होईल, पण अशा कावळ्याच्या शापांनीं कोठें ढोरें मरतात ? मी त्याच्या शापाबिपाला बिलकूल भीत नाहीं. "

असें म्हणून त्यानीं तो लाल तिजोरींतून काढला. तो म्हणाला " हा लाल जर विकला तर याचें अगणित द्रव्य येईल. हा किती भरतो पाहूं या " नंतर तो मोजण्याकरितां त्यानें आपला लोखंडी गज काढला, त्याचें माप वगैरे पाहून तो खूष झाला व पुनः तिजोरींत ठेवणार इतक्यांत त्याला गज सोनेरी झालेला दिसून आला त्यानें तो लाल दुसऱ्या लोखंडी पट्टयांना लावला व त्या साऱ्या सोनेरी झाल्या. काय आश्चर्य आहे बुवा ! हें सारें सोनें मी आतां सोनाराकडे नेतों व त्याची परीक्षा करतों" असा विचार करून त्यानें ते सोनें सोनाराकडे नेलें. तो सोनाराला म्हणाला. "सोनार दादा मला हे दोन तुकडे सांपडले आहेत ते कसले आहेत पहा बरें " सोनारानें त्याची परीक्षा केली व ते सोन्याचेच आहेत असें सांगितलें. त्याबरोबर त्याच्या तोंडावर हास्य चमकूं लागलें. त्यानीं त्याला विचारलें " तूं म्हणतोस हें खरें ना, कां यांत कांहीं खोटें आहे ? "

' छे यांत लबाडी कसली ? आणि मला खोटें सांगून काय मिळणार ? तुम्हाला पाहिजे तर मी हें सारें सोनें विकत घेतों, मग तर माझें म्हणणें पटेल कीं नाहीं ? " असें म्हणून त्यानीं तें सोनें वजन केलें व त्याबद्दल त्याला पैसे दिले.

त्या व्यापाऱ्याला हें पाहून फार आनंद झाला व उद्यां परत मी आणखी सोनें आणीन असें म्हणून तो तेथून निघाला.

घरीं गेल्यावर त्यानें सारें लोखंड जमा केलें व त्याला तो परीस लावून त्याचें सोनें बनविलें त्या सोन्याचा एक मोठा ढीग त्याच्या जवळ झाला.

दुसरें दिवशीं त्यानीं तें सोनें गाढवाच्या पाठीवर ठेवलें व गाढवाला त्या सोनाराकडे हांकून नेलें सोनारानें त्याबद्दल त्याला ५००० रुपये दिले. या रुपयांचें त्यानीं लोखंड विकत घेतलें व त्याचें पुनः सोनें केलें अशा प्रकारें लोखंडाचें सोनें करण्याचा त्याचा सपाटा चालू होता. थोडे दिवसांनीं त्याच्याजवळ इतकें सोनें झालें कीं, त्याच्या घरांत सोनें ठेवावयास जागाच उरली नाहीं. तेव्हां सोनें सुरक्षीत रहावें म्हणून त्यानें दूर एक जागा खरेदी केली. त्या जागेला चहूंकडून मजबूत भिंती बांधिल्या आणि आंत स्वतःकरितां एक बंगला व मोठ मोठ्या सात विहरी खणल्या. ह्या विहरींत तो आपला खजिना ठेवी.

हळूंहळूं त्याच्या संपत्तीची बातमी चहूंकडे फैलावली व दिल्लीच्या बादशाहाच्या कानावर आली.

बादशाहाला एकदां द्रव्याची गरज लागली म्हणून त्यानीं आपल्या वजिराला या व्यापाऱ्याकडे पाठविलें. ह्या व्यापाऱ्यानें पैसे देण्याचें कबूल केलें, एवढेच नव्हे तर आपण फार राजनिष्ठ आहोंत हें दाखविण्याकरितां त्यानें वजीराला असेंहि सांगितलें कीं, जर तुम्ही दिल्लीपासून हरद्वारपर्यंत गाड्या उभ्या कराल तर त्या साऱ्या मी सोन्यानीं मोडेपर्यंत भरून देईन.

वजीरानें झालेली हकीगत राजाला सांगितली हाकिगत ऐकून राजाला आनंद झाला. परंतु आपल्यापेक्षां अधिक श्रीमान हा कोण याबद्दलही रागहि आला. त्यानें आपल्या वजिराला बोलावून आणिलें व सांगितलें कीं, त्या व्यापाऱ्याला आपल्या भेटीस घेऊन ये.

वजीरानें निमंत्रण पाठविलें व तो व्यापारी

आपल्या सोनेरी पालखींत बसून राजवाड्यांत आला. तेथें त्याचें स्वागत करण्यांत आलें.

थोड्या वेळांनीं वजीर तेथें आला व म्हणाला आपली भेट घेण्याची इच्छा आहे, तेव्हां आपण तिकडे चला. रस्त्यानीं जातां जातां राजाचें वैभव किती मोठें आहे हेंही त्यास दाखविण्यांत आलें.

राजा एका सोनेरी तक्तावर सोनेरी हुक्का ओढीत बसलेला या व्यापाऱ्यानें पाहिला. त्यावरोबर त्याच्या अंगाचा थरकांप होऊं लागला. त्यानें राजाला लवून मुजरा केला, व जवळच उभा राहिला.

राजा म्हणाला "ये ये असा मजजवळ ये. दूर उभा कां ? माझा व तुझा धर्म एक नसला तरी मी तुला माझा भाऊ समजतों ये. असा माझ्या उजव्या बाजूला बैस."

तो व्यापारी वर जाऊन बसला. राजा त्याजबरोबर संभापण करूं लागला, आणि बोलतां बोलतां त्या लालाची व सोन्याची सारी हकीगत त्याजवळून काढून घेतली. लागलाच त्यानें एक कागद काढला व त्यावर कांहीं लिहून तो कागद त्यानें वजीराजवळ दिला. अशा प्रकारें दोघांचें संभाषण चालू असतां राजाचे घोडेस्वार हरद्वारला त्या व्यापाऱ्याच्या बंगल्याचा झाडा घ्यावयास निघाले.

कांहीं वेळांनीं तो व्यापारी घरीं जाण्यास निघाला; पण राजा त्याला उठूं देईना. तो म्हणाला "पान वीन खा, मग सावकाश जा." असें म्हणून राजानें आपल्या हुजऱ्याकडून आगाऊ तयार करवून ठेवलेला पानाचा डबा आणवला. डब्यांतील कातगोळ्या सुवासिक असून राजानें त्या वीषमिश्रीत केलेल्या होत्या. मात्र आपण त्या कातगोळ्या न घेण्याची राजानें खबरदारी घेतली.

थोड्या वेळांनीं त्या गोळ्यांचा परिणाम व्यापाऱ्यावर होऊं लागला व तो मृत्युपंथास लागला. आतां त्या बादशाहाच्या चेहेऱ्यांतील मार्दव जाऊन तो उग्र व मत्सरी दिसूं लागला. हळूं हळूं त्या व्यापाऱ्याची प्राणज्योत मावळली, व तो मरण पावला. इकडे घोडेस्वार हरद्वारला आले. व राजाच्या आज्ञेनें त्यांनीं त्या व्यापाऱ्याच्या मिळकतीचा कबजा घेतला; परंतु त्यांची सोन्याच्या बाबतींत मात्र पूर्ण निराशा झाली. कारण विहिरींत ठेवलेले सारें सोनें आतां नष्ट होऊन त्याचे दगड बनले. त्यांनीं तो परीस सांपडावा म्हणून पुष्कळ खटपट केली, पण व्यर्थ. विहिरींत त्यांना मोठमोठे साप विंचू दिसूं लागले. त्यांची पूर्ण निराशा झाल्यामुळें ते तसेंच दिल्लीस परतले. राजाला ही बातमी लवकरच कळली आणि त्यानें सोनें सोनें करीत प्राण सोडला.

अशा प्रकारें त्या साधूचा शाप खरा झाला.

## पोंहोणारा वैद्य.

एका वैद्यानें एका रोग्याचा प्राण घेतला अशा समजुतीनें त्याला त्या रोग्याच्या नातलगांनीं बांधून टाकला. त्याला दुसरे दिवशीं शिक्षा करावी असा त्यांचा बेत होता. परंतु वैद्य रात्रीच्या वेळींच पळून गेला, आणि नदी पोहून घरीं पोंहोचला.

घरीं पोंहोचल्यावर त्याला आपला मुलगा वैद्यकीचीं पुस्तकें वाचीत बसलेला आढळला. हें पाहून वैद्य म्हणतो:—

"अरे तूं हीं पुस्तकें वाचूं नकोस, अगोदर पोहावयास शीक. पोहावयास आल्याखेरीज वैद्य होऊन उपयोग नाहीं."

# शरच्चंद्र दास

यात्रा करणारे लोक मोठे धाडशी असतात. या प्रवाशी लोकांना अशा प्रदेशांत जावें लागतें कीं जेथें त्यांची कोणाशीं ओळख नसते किंवा जेथें त्यांची भाषाहि कोणाला कळत नाहीं. शिवाय आपला प्राण केव्हां जाईल याचीहि भीति दरघटकेला वाटत असते. परंतु प्रवास करणाऱ्या शूर पुरुषांना याची बिलकूल पर्वा नसते. एवरेस्त पर्वताचें दुर्लंघ्य शिखर गांठणारे व आपल्या प्राणावर उदार होणारे पाश्चात्त्य प्रवाशी किंवा ध्रुवप्रदेशाची सफर करणारे अमेरिकेंतील धाडशी पुरुष आपलीं नांवें जगाच्या इतिहासांत कायमचीं लिहून ठेवतात. कोलंबस हा धाडशी प्रवाश्यांत अग्रगण्य समजला पाहिजे. अशाप्रकारें धाडशी प्रवाशी पाश्चात्त्य देशांतच फक्त आहेत व आपल्या देशांत नाहींत असें नाहीं.

अशाच एका प्रवाशाची हकीगत आज आम्हीं सांगणार आहों. हा प्रवाशी बंगाली गृहस्थ असून त्याचें नांव शरच्चंद्रदास असें आहे.

शरद्बाबू यांना सुदैवानें तिबेटमधील लासा येथील पवित्र क्षेत्रांत यात्रा करण्याचा सुयोग आला होता. हें सद्भाग्य आजपर्यंत इकडील लोकांपैकीं अगदीं थोड्याच लोकांच्या वांट्यास आलें आहे. जगांत तिबेट म्हणजे असा एक देश आहे कीं, जेथें जाणें म्हणजे निसर्गाबरोबर युद्ध करणें आहे, एवढेंच नव्हे तर तेथील लामालाहि पराभूत करणें होय. इतरत्र सर्व ठिकाणीं परका माणूस आला तर त्याला आंत येण्यास फारशी बंदी नसते; परंतु तिबेटमध्यें परक्या मनुष्यावर अत्यंत करडी नजर आहे.

जर एखादा माणूस लपूनछपून तिबेटांत गेला तर तेथील सरकार त्याला हुडकून काढून बाहेर हांकलून देतात व त्याचे हालहाल करतात. परंतु या सरकारी धोरणास न जुमानतां प्रवाशांचा प्रयत्न नेहमीं तिबेटांत यात्रा करण्याचा चालू असतो. या प्रयत्नवाद्यांपैकीं कोणीहि अद्याप लासापर्यंत पोहोंचलें नाहीं. या धाडशी लोकांपैकीं बहुतेक सर्वांना परत हांकलून लावण्यांत आलें. त्यांच्यापैकीं कांहीं चोरांच्या टोळीकडून लुटले जाऊन ठार झाले व कांहीं कठीण पर्वत चढतां चढतांच मृत्युमुखीं पडले.

हा प्रवास शरद्बाबूंनीं पूर्ण केला याबद्दल त्यांचें अभिनंदन करणें जरूर आहे. या बाबूंचा जन्म चितगांव जिल्ह्यांत झाला. हे गृहस्थ बंगाली कायस्थ आहेत. हे कलकत्ता येथील प्रेसिडेन्सी कॉलेजांत शिकत असतां सरकारनें यांना दार्जिलींग येथें एका नव्या हायस्कूलचे हेडमास्तर म्हणून पाठविलें. या शाळेंतच एक सिकिमचा बुद्धलामा शिक्षक म्हणून काम करीत होता. त्यांच्या जवळ शरद् बाबू भूतानी व तिबेटी भाषा शिकूं लागले पुढें सुदैवानें यांना सिकिम येथें यात्रा करण्याचा सुयोग आला. तेथून पुढें तिबेटपर्यंत प्रवास करून यावा अशी त्यांना इच्छा उत्पन्न झाली.

शरद्बाबूंनीं आपली तिबेटांत प्रवास करण्याची इच्छा ज्या ज्या इंग्रज गृहस्थाजवळ बोलून दाखविली त्यांनीं त्यांनीं यांना वेड्याच्या कोटींत काढलें कारण तिबेटचा प्रवास म्हणजे साधी गोष्ट नव्हे. अशा प्रकारें सरकारी अधिकाऱ्यांकडून त्यांची

निराशा झाल्यामुळें त्यांनीं आपला मनोदय त्या सिकीमच्या लामाजवळ प्रकट केला. हा लामा सिकीममधील आपल्या मठापासून तिबेटांत जात येत असे. त्यानीं ही गोष्ट कबूल केली. तो म्हणाला मी तुमच्याकरितां तिबेटच्या प्रवासाचा परवाना आणतों व तुमच्या बरोबरहि येतों. दरम्यान एका इंग्रज गृहस्थाच्या शिफारशीनें बाबूंना तिबेटच्या प्रवासाची परवानगी मिळाली व त्या लामानींहि एक परवाना आणला.

शेवटीं बाबू महोदयांनीं लागलाच गुप्त वेष धारण केला व सिकीमच्या मठामधून तिबेटास प्रयाण केलें. बरोबर त्यांचा मित्र होताच व सामान घेण्यासाठीं एक कुलीहि मिळाला.

प्रवासांत बाबूंना अत्यंत त्रास भोगावे लागले. हिमालय पर्वत ओलांडून जातांना त्यांचे झालेले हाल वर्णन करणें कठीण आहे त्या बर्फाच्छादित पहाडांतून जिवंतपणीं जाणें किती कठीण आहे याची कल्पना ज्याचे त्यानेंच करावी. अखेरीस १८ दिवसपर्यंत वाट चालतां चालतां ते तिबेटांतील ताशीहिम्पो नांवाच्या शहरीं आले. आपण तिबेटांत पोहोचूं किंवा नाहीं याबद्दल त्यांना नेहमीं भीति वाटत असे परंतु त्यांनीं इतकी सावधानता राखली कीं, मोठे मी मी म्हणणारे पोलीस अधिकारी सुद्धां त्यांना ओळखू शकले नाहींत. ते या गुप्त वेषांत सहामहिने पर्यंत तेथें राहिले. तिबेटांतील लासाच्या दलाई लामाच्या खालोखाल ताशीहिम्पोमधील ताशीलामाचा दर्जा मानण्यांत येतो.

या ताशीमालाच्या मुख्य प्रधानाबरोबर शरदूबाबूचें बरेंच दळणवळण व मैत्री होती. त्यांनीं त्यांच्याकरितां प्रवासाचा परवाना दिला होता. शरदूबाबू ताशीहिम्पोला यांच्याच मठांत राहिले होते. ते त्या प्रधानाला संस्कृत व हिंदी शिकवीत असत.

पुढें शरदूबाबू तिबेटांतून इकडे सुरक्षीत परत आले. ही बातमी जेव्हां इंग्रज सरकारला कळली तेव्हां त्यांनीं त्यांना परत खर्च देऊन दुसऱ्यांदा तिकडे पाठविलें.

या खेपेस ते तेथें एक वर्ष राहिले व त्यांना या वेळीं लासा शहर पहाण्यास सांपडलें. ते लासाला २० दिवस होते. तिबेटी अधिकाऱ्यांनीं यांचा फार सन्मान केला. हे जेव्हां परत इकडे आले तेव्हां ही बातमी तेथील सरकारला समजली. व त्यांनीं ज्या ज्या लोकांचा यांच्याशीं संबंध आला होता त्यांना त्यांना जबर शिक्षा केली. इतक्या वेळपर्यंत त्यांना ज्या परम मित्रांनीं मदत केली. त्यालाहि नदींत बुडवून टाकण्यांत आले. त्या वेळेपासून तिबेटच्या सरकारानें सरहद्दीवर करडा पहारा बसविला. अशाप्रकारें तिबेटांत जाणें आतां यापुढें फारच कठीण झालें आहे. शरदूबाबूंनीं तिबेटांत जाऊन पुष्कळ नव्या-नव्या गोष्टी बरोबर इकडे आणल्या आहेत. त्यांनीं तिबेटांतील पुष्कळ जुनी पुस्तकेंही आणलीं आहेत. त्यावरून बुद्धधर्मासंबंधीं बऱ्याच नव्यानव्या गोष्टी उघडकीस येतील. त्यांच्या प्रवासावरून त्यांच्या धैर्याची व चिकाटीची चांगलीच कल्पना करतां येते.

# पावसाची मापणी.


( ले०—ग. म. केळकर. )

मुलांनीं आपण लोकांच्या तोंडून व वर्तमानपत्रांतून असें ऐकतों कीं, यंदा रत्नागिरी जि. त १०० इंच पाऊस पडला, पुण्याला १० इंच पडला, साताऱ्याला ३० इंच पडला, कालचा पाऊस २ इंच पडला. तरी हा पाऊस कसा मोजतात ती माहिती आज देत आहें.

रत्नागिरीस पाऊस १०० इंच झाला. म्हणजे आपण अशी कल्पना करूं कीं रत्नागिरी हें सपाट क्षेत्र ( जागा ) आहे. आणि त्यावर जो पाऊस पडेल त्याचें पाणी वाहून गेलें नाहीं, किंवा जमिनींत जिरलें नाहीं, किंवा त्या पाण्याचें बाष्पीभवन झालें नाहीं म्हणजे त्या पाण्याचा थर त्या सपाट जमिनीवर १०० इंच खोलीचा होईल.

परंतु असें पाणी जमिनीवर सांठवितां येणार नाहीं. म्हणून एक पाऊस मोजण्याचें यंत्र करितात. त्याची थोडीशी माहिती शालापत्रकाचे वाचकांसाठीं देत आहें. आपण आतां अशी कल्पना करूं कीं, पावसाची एक मोठी सर आली. तर त्यांत आपले घरांतील एक रिकामा उघड्या तोंडाचा राकेलचा डबा पावसांत ठेवावा. म्हणजे त्यांत जें पाणी सांचेल त्याची खोली जितके इंच भरेल तितके इंच पाऊस पडला असें समजावें. मात्र तें पाणी लागलेंच मोजलें पाहिजे; कारण नाहींतर त्याची वाफ होऊन जाते. म्हणून तें लागलेंच मोजिलें पाहिजे.

याच तत्त्वावर पावसाच्या मापणींचीं यंत्रें करितात. परंतु त्यांत पाण्याची वाफ होऊं नये अशी व्यवस्था ठेवावी लागते.




पाऊस मोजण्याचें यंत्र.

खालीं चित्रांत दिल्याप्रमाणें अ एक डबा आहे; आणि त्या डब्यांत, ' ब ' हें फनेल आहे. मात्र फनेलाचें तोंड खालच्या तोंडाएवढेंच मोठें असतें आणि त्या फनेलाची ' क ' ही नळी डब्याच्या बुडापावेतों नेलेली आहे. म्हणजे आतां फनेल नसतां जेवढें पाणी आंत गेलें असतें तेवढेंच पाणी आतांही आंत जाईल; मात्र नळीचें तोंड लहान असल्यामुळें बाकीचे पाण्याला हवा लागावयाची नाहीं, कारण सर्व बंद आहे. आणि म्हणून पाणी आंत तसेंच राहील. हीं यंत्रें कांचेचींही असतात. आतां आपणांस पाऊस मोजतां येईल.

मात्र कोणी आतां अशी शंका घेईल कीं, पाऊस जर अगदीं थोडा पडला तर कसा मोजितात. तर त्या वेळीं जमलेलें पाणी मोजण्यासाठीं एक नळी

असते. बाटलींत एक इंच खोलीचें पाणी जमलें असें समजा. तें 'उ' या बारीक नळींत ओतलें म्हणजे ती नळी भरते असें समजा. म्हणजे नळींतला पाऊस एक इंच झाला. या नळीवर १०० खुणा असतात. १/१०० भागाला सेंट म्हणतात.

---

## प्राण्यासंबंधीं माहिती.

१ मुंग्या आपल्यापेक्षां ६०० पट उंचीचीं घरें बांधतात.

२ मनुष्याला आपल्या वजना इतकें अन्न खाण्यास ३ महीने लागतात. सुरवंट आपल्या वजनाच्या ६००० पट १ महिन्यांत खातो.

३ न्यूगिनीमध्यें एक पक्षी आहे तो चावला तर सर्व अंगाची आग होते. डोळे जातात. वाचा जाते मग आंकड्या येतात, मग प्राण जातो.


४ बेलजमधील कुत्रे गाड्या ओढतात

५ आणि जर्मनीतील कबुतरांस बातमी पोहचविण्यासाठीं जासुद ठेवितात. त्यांस २४ तास उपाशी ठेविले तर ते दर ताशीं १०० मैल जातात. नेहमींचा त्याचा वेग ३०।३२ मैलांचा असतो.

---

## शालापत्रकाची चढाओढ.

### नवी कोडीं.





---

कुपन

सर्वांकरितां

सप्टेंबर

कुपन

बालवाचकांकरितां

सप्टेंबर

पान १५९ मधील कोड्यांचीं उत्तरें

## सर्वांकरितां

१ सायकलला सांखळी नाहीं एवढीच यांत चूक आहे. बाकीचे भाग गाडी वेगांत असल्यामुळें दिसत नाहींत, ही बरोबर असलेली गोष्ट चूक म्हणून पुष्कळांनीं लिहून पाठवली आहे.

२ पतंगाच्या बाजूलाच निशाण उडलें पाहिजे.

३ सुकाणूच्या बाजूला होडी न जातां विरुद्ध दिशेला जात आहे.

सारीं उत्तरें कोणाचींच बरोबर नाहींत तेव्हां बक्षीसेंहि कोणाला नाहींत.

## मुलांकरितां

### उत्तरः—गुरुत्वाकर्षण

उत्तरें बरोबर पाठविणारांचीं नांवें

११।१८।२०।२१।३० वक्षीसें मिळविणारीं

१ सदानंद निळकंठ सोहोनी घाटकूपर
२ वामन परशराम कुंटे बमारी
३ सदाशिव त्रिंबक पुरंदरे पुणें
४ विश्वनाथ पुरुषोत्तम जोशी मु. इचलकरंजी
५ रामचंद्र नारायण जोशी चौक [ कुलाबा ]
६ विष्णु रामचंद्र माटे [ सोलापूर ]
७ रजतकुमार
८ रामचंद्र त्रिंबक केणेकर सितावर्डी, नागपूर
९ जयसिंहराव मानसिंहराव कदम
१० विनायक महादेव गाडगीळ [ हैद्राबाद ]
**११ गोविंद शिवराम कुलकर्णी मसुरे रत्नागिरी**
१२ आनंदराव सदाशिव दणाईत म्हापसे–गोवा
१३ कमलाकर द्वारकानाथ माहागांवकर यवतमाळ
१४ रामचंद्र महादेव सुर्वे मुंबई
१५ महादेव लक्ष्मण म्हसवडे पुणें
१६ पांडुरंग रामचंद्र वांगीकर सांगोले
१७ सदाशिव कृष्ण शाहाणे
**१८ रामचंद्र सखाराम तेंडोलकर तेंडोली ( रत्नागिरी )**
१९ वैजनाथ गोविंद देशमुख उमरखेड.
**२० सदाशीव धोंडो सबनीस बेळगांव**
**२१ श्रीकृष्ण जनार्दन सहस्रबुद्धे केळ्ये रत्नागिरी**
२२ माधव गणपत पांडे उमरखेड यवतमाळ.
२३ पांडुरंग यशवंत पागनीस
२४ रामचंद्र यशवंत आगवेकर कऱ्हाड
२५ व. ब. सुळे नाशीक
२६ भिकचंद रूपचंद गुजर तासगांव [ सातारा ]
२७ सत्यगौंड निगौंडा पाटील शिरगुपी
२८ आप्पा विठू हरेर वेनाडी
२९ महिपत तानाजी बागूल सटाना [ नाशीक ]
**३० दत्तात्रय सदाशिव गुमास्ते चरी कुलाबा**
३१ शेखशहाबुद्दीन दावलभाई पुणें

## ( सर्वांकरितां. )

३२ वि. ग. पोतदार तळें कुलाबा ( २ )
३३ एन्. जी. म्हलरे दादर मुंबई, ( २ )
३४ कमलाकर द्वारकानाथ माहागांवकर यवतमाळ ( २ )
३५ शिवराम गोविंद कुलकर्णी मसुरे रत्नागिरी ( २ )
३६ नागेश दत्तात्रय हर्डीकर कऱ्हाड सातारा ( २ )
३७ गोविंद गजानन राजाध्यक्ष कारवे बेळगांव ( २ )
३८ राजाराम बाबाजी पोतदार मास्तर मोर्वे कुलाबा ( १ )
३९ बाळकृष्ण अनंत बाळे पुरोहित मडगांव-गोवा ( १ )
४० गोविंद हरी फडके नेरळ कुलाबा ( १ )
४१ कृष्णाजी रामचंद्र देशपांडे उमरखेड यवतमाळ ( १ )
४२ सुंदरराव भास्कर वैद्य ठाकुरद्वार मुंबई ( १ )
४३ रामचंद्र धोंडो देवळे पुणें ( १ )
४४ तुकाराम गोपाळ सबनीस उमरखेड यवतमाळ ( १ )
४५ आनंतराव सदाशिव दणाईत म्हापसे गोवा ( १ )
४६ रामचंद्र त्रिंबक केणेकर सीतावर्डी नागपूर ( १ )

कंसातील आंकडा किती उत्तरें बरोबर आहेत तें दाखवितो.

## बक्षीसें

१ चिमुकलें रामायण
२ ध्रुव व चिलिया.

३ लक्ष्मीपूजन.
४ विमुकलें भारत.
५ शिलं परं भूषणं.

## नवीकोडीं

### सर्वांकरितां

वरील चित्रें मुद्दाम चुकीचीं काढलीं आहेत. त्यांत काय चूक आहे तें सांगा.

### मुलांकरितां.

खालीं ५ शब्द दिले आहेत. त्यांपैकीं प्रत्येक शब्द घेऊन एक एक म्हण करून दाखवा. जो एकापेक्षां जास्त म्हणी करून दाखविल त्याला अर्थातच बक्षीसें मिळतील. परंतु पांच म्हणीपेक्षां जास्त म्हणी पाठवावयाच्या असल्यास निराळें कूपन लागेल हें लक्षांत ठेवावें.

**उदाहरण**—चोर
चोर तो चोर वर शिरजोर
चोर गेला जागा झाला.

वगैरे यांत चोर या शब्दाला विभक्ती प्रत्यय लावल्याखेरजि म्हणी बनविल्या आहेत. म्हणजे चोराच्या मनांत चांदणें वगैरे म्हणी घेतल्या नाहींत चोर शब्द सुरवातीस यावा असें नाहीं.

**म्हणी बनवाः**— १ बैल.
२ सूप.
३ दुणा.
४ इंद्र.
५ सुई.

जुलै महिन्यांतील कोडी बरोबर पण उशीरां मिळाली त्यांचीं नांवें

१ मनोहर बाळाजी सरवटे
२ रामचंद्र नारायण जोशी.
३ अहंमदअली महंमद सरदार.
४ बाबूराव गोविंद गोखले.
५ बाळकृष्ण अनंत बाळे.
६ वसंत वासुदेव वाचासुंदर.
७ कृष्णाजी रामचंद्र देशपांडे.
८ ग. म. केळकर
९ ना. स. भिडे.
१० लक्ष्मण यशवंत पागनीस.

कूपन नसणारांचीं नांवें यापुढें छापण्यांत येणार नाहींत.

## काचः काचो मणिर्मणिः



एकदां एक गारगोटी व हिरा मातींत पडला होता. खंडू नांवाचा एक शेतकरी तेथून जात असतां त्यानें तो हिरा पाहिला व उचलला. पुढें त्यानें तो सावकाराला देऊन आपली गहाण जिन्नस सोडवून आणली. त्या मारवाडयानें तोच हिरा महंमद राजाला विकला.

पुष्कळ दिवसांनीं राजा अंबारींत बसून चालला होता इतक्यांत त्याच्या डोक्यांतील हिऱ्यानें खालीं पडलेल्या गारगोटीकडे पाहून दांत विचकले व म्हणाला " पहा मी कसा आहें तो. "

दुसरे दिवशीं खंडू आपली गाडी घेऊन तेथून चालला होता; तेव्हां ती गारगोटी म्हणाली " मित्रा






उचलली. तो म्हणाला, "मला गोठा बांधावयाचा आहे तेव्हां माझीच सेवा तूं कर म्हणजे झालें.

एकूण काय, गारगोटी ती गारगोटी व हिरा तो हिरा.

मी त्या मूर्ख हिऱ्यापेक्षां दसपट चांगली आहें. मला सुद्धां त्या राजाकडे घेऊन चल. मी त्याची सेवा करीन. खंडू हंसला व त्यानें ती गारगोटी



# विविध माहिती.

उंट घोड्याच्या चौपट ओझें नेतो.

रेशमाचा किडा ४००० वार रेशीम घालतो.

कोळी चार वर्षें जगतो; व कांहीं कोळी १२ वर्षें जगतात.

नाईल नदींत एक जातीचे मासे आहेत. त्यांना हात लावला म्हणजे विजेच्या झटक्यासारखा धक्का बसतो.

विजेच्या पंख्यांनीं ओलें गवत वाळवतात.

जगांत तीन मोठीं वाचनालयें आहेत. ब्रिटिश म्यूझिअममध्यें ४० लाख पुस्तकें आहेत. पॅरिसमधील वाचनालयांत ३० लाख व अमेरिकेंतील वाचनालयांत ५ लाख आहेत !

मराठी शालापत्रक.

# रंगीत इसाप-नीति.

यांत एकंदर इसापनीतींतील आठ अगदीं सोप्या गोष्टी मोठ्या व जाड टाइपांत दिलेल्या असून प्रत्येक गोष्टीसमोर त्यांतील रहस्य दाखविणारें रंगीत सुंदर चित्र दिलेलें आहे. चित्रें पाहूनच मुलांना गोष्टींतील तात्पर्य कळतें. किं० ८६. ट. ह. ८८६

# सचित्र इसाप-नीति.

[ उत्तरार्ध. ]

[ नवीन भाषांतर भाग २ रा. ]

वरीलप्रमाणेंच हा दुसरा भाग विक्रीस तयार आहे. याचीं सुमारें २०० पानें असून यांत ३५० गोष्टी आहेत. चित्रांची संख्या १५० पर्यंत आहे. किं. १८४

दोन्ही भाग एके ठिकाणीं बांधलेलें सुंदर पुस्तक किं० रु. २

# विद्यार्थ्यांकरितां नाटिका.

शीलं परं भूषणम्.

ही नाटिका प्रसिद्ध कवि-शिरोमणि नारायण वामन टिळक यांनीं केवळ लहान मुलांकरतांच लिहिलेली आहे. यांत शृंगाररस मुळींच नाहीं एवढेंच नव्हे, तर स्त्रीची भूमिका या नाटकांत आणलेलीच नाहीं. शिवाय नाटकाचा विषय नैतिक विचारानें पूर्ण भरलेला असल्यामुळें शाळांतून वार्षिक संमेलनाचे वेळीं मुलांकडून ह्या नाटकाचा प्रयोग करविण्यास तें योग्य आहे. नाटकाचा विषय धनाची योग्यता जास्त किंवा ज्ञानाची योग्यता जास्त हा आहे. पुस्तकांत चार सुंदर चित्रें कथानकास अनुसरून दिलेलीं आहेत; किं० ८४.

म्यानेजर--चित्रशाळा प्रेस, पुणें.

---

# चिमुकलें भारत व रामायण.

महाभारत व रामायण हे आपले राष्ट्रीय ग्रंथ आहेत. यांत आपला प्राचीन इतिहास असून प्रपंच साधून परमार्थ कसा जोडावा हें उत्तम दाखविलें आहे. व्यावहारिक बोधाच्या ह्या केवळ खाणी आहेत. आबालवृद्ध स्त्री-पुरुषांना या ग्रंथांचें ज्ञान होणें अगत्याचें आहे. प्रौढांकरितां आमचीं लोकप्रिय 'भारती युद्ध' व 'रामचरित्र' हीं पुस्तकें आहेत. आतां बारातेरा वर्षांच्या मुलांमुलींकरितां 'चिमुकलें भारत' व 'चिमुकलें रामायण' हीं दोन पुस्तकें अनुक्रमें आम्हीं रामकृष्णवाक्सुधेचे प्रसिद्ध लेखक रा. कृष्णाजी गोविंद किनरे व रा. विद्याधर वामन भिडे बी. ए. यांजकडून मुद्दाम लिहविलीं आहेत. पुस्तकाची भाषा फारच मोहक व सोपी आहे. वाचतांवाचतांच मुलांच्या मनावर त्यांतील रहस्य ठसावें म्हणून उपदेशपर वाक्यें जाड टाइपांत घातलीं आहेत, आणि कथानकांच्या अनुरोधानें हाफटोन प्रोसेसनें तयार केलेलीं भारतांत आठ व रामायणांत सात अशीं सुंदर चित्रें घातलीं आहेत. भारताचीं पृष्ठें १७३ व रामायणाचीं पृष्ठें ८२. छपाई बांधणी सुबक. किं० ८६, व रामायण किं० ८४.

म्यानेजर—चित्रशाळा प्रेस, पुणें शहर.

॥ ॐ नमः श्रीरामचंद्राय ॥

# आर्यमहौषधालय मु॰ पो॰ आंजर्ले.

**कोंकणप्रांतांतील अगदीं ताज्या व शुद्ध वनस्पतींचीं जगत्प्रसिद्ध निर्दोष व रामबाण औषधें.**

**कंदर्पमंजरी पाक**—हा अपूर्व पाक गरिबांपासून तों अमीरउमरावांपर्यंत सर्वांसही अत्यंत उपयोगी असून किंमत माफक ठेविली आहे. यांत मौक्तिक, प्रवाळ लोह, माक्षिक, कस्तूरी, अंबर इ॰ अत्युच्च गुणकारक पदार्थ असून शिवाय बदाम, पिस्ते, अक्रोड चारोळी, केशर, वेलची, पंजाबी सालममिश्री, सफेतमुसळी, पत्री, गोक्षुर, शतावरी, अ.स्कंद, वंशलोचन वगैरे (८०) उपयुक्त वनस्पति घातलया आहेत. यानें पथ्यावांचून गुण येतो. यापासून कोणत्याही कारणांनीं होणारा व कशाही प्रकारचा शुक्रस्राव, नपूंसकत्व, मूळव्याधि, रक्तदूषणामुळें त्वगरोग, स्त्रियांची धुपणी व गर्भाशयस्थ दोष या भावना त्यांच्या एकंदर उपविकारांसह तत्काल बऱ्या होऊन धातुवृद्धि होते, व शरीर कणखर आणि तेजस्वी बनतें. २० तो॰ ड॰ २ रुपये. एकदम ३ डबे घेणारांस ५ रुपये.

**स्वर्णधात्री तेल**—हें चारोळी, बदाम, कंकोळ, एला, बहुविध वनस्पतींचीं सत्वें व उपयुक्त तेलें अशा अनेक पदार्थांनीं बनविलें असल्यानें याच्या मर्दनापासून अपस्मार, उन्माद, वेड, चक्कर इ॰ रोगांस जलद आराम पडतो. केंसांस चोळल्यानें केंस काळे कुळकुळीत, तजेलदार, सडक लांब व मृदु होऊन मेंदु शांत आणि रोगरहित बनतो. यानें मस्तकाचें टक्कल जातें. हें अंगास चोळून स्नान करीत गेल्यानें शरीराचा दुर्गंध जातो. खरूज गजकर्ण, शिबें, तसेंच तळपाय, तळहात, डोळे व मस्तक यांचा दाह हे विकार खास बरे होऊन निद्रा चांगली येते, आणि नेत्ररोग दुरुस्त होतात. बा॰ किं॰ १। रु॰

**दंतरक्षक पूड**—ही दांत व हिरड्या यांचे सर्व विकार तत्काल दुरुस्त करून दांत स्वच्छ व मजबूत करण्यांत प्रतिज्ञेची आहे. ड. ६ आणे.

**सुरंगी, मालती, कल्हार, गुलबहार, दणाणा, लक्ष्मीविलास इ॰** बादशाही अति उंची अत्तरें व त्याचप्रमाणें गुलाब, हिना, केवडा, चमेली, जाई वगैरे सुगंधी अत्तरें आणि केंसांस लावण्याचीं हरएक प्रकारचीं सुवासिक तेलें माफक दरानें पूर्ण खात्रीचीं मिळतील.

**सूचना:**—वरील औषधें व अत्तरें वगैरे पूर्ण खात्रीचीं असल्यामुळें आज पंचवीस वर्षांत त्यांचा लक्षावधि लोकांस अप्रतिम उपयोग झाला म्हणून त्यांचा नेहमीं फारच खप होत आहे. अनुभवानंतर पूर्ण खात्री पटेलच. औषधें माहितीचे खर्चासह रोखीनें अगर व्ही. पी. नें पाठवूं. प्याकिंग व टपाल खर्च वेगळा. घाऊक घेणारांस कमिशन भरपूर. सर्व औषधांच्या आणि आरोग्यरक्षणाच्या माहितीचें सचित्र मोठें पुस्तक देऊं. आमचीं औषधें वगैरे मागविणें तीं खालील बिनचूक पत्त्यावर मागवावीं

**कृष्णशास्त्री बिवलकर, वैद्य.**

REGISTERED. B.NO. 179.




पुस्तक ३४. आक्टोबर सन १९२३. अंक १०.


| विषय. | पृष्ठ. |
| --- | --- |
| शिक्षणाचीं साधनें. | १८१ |
| एक राक्षस व राजा. | १८४ |
| चुटके. | १८६ |
| कोल्हा आणि बकरा. ( कविता ) | १८७ |
| एक मननीय चरित्र. | १८८ |
| सूडाचा सूड. | १९१ |
| विविध माहिती. | १९[illegible] |
| कोजागिरी अथवा को जागर्ति ? | १९[illegible] |
| दसऱ्याची अल्प भेट. / आंकड्यांची मौज. | १९[illegible] |
| स्वप्नें खरीं ठरतात काय ? | १९[illegible] |
| गिर्यारोहण. | [illegible] |
| गर्वाचा परिणाम. | [illegible] |
| शाळापत्रकाची चढाओढ. | २० |


मुद्रक व प्रकाशक—रा. रा. शंकर नरहर जोशी चित्रशाळा प्रेस, १०२६ सदाशिव पेठ, पुणें सिटी.

॥ ॐ नमः श्रीरामचंद्राय ॥

# आर्यमहौषधालय मु० पो० आंजर्ले.

**कोंकणप्रांतांतील अगदीं ताज्या व शुद्ध वनस्पतींचीं जगत्प्रसिद्ध निर्दोष व रामबाण औषधें.**

**कंदर्पमंजरी पाक**—हा अपूर्व पाक गरिबांपासून तों अमीरउमरावांपर्यंत सर्वांसही अत्यंत उपयोगी असून किंमत माफक ठेविली आहे. यांत मौक्तिक, प्रवाळ लोह, माक्षिक, कस्तूरी, अंबर इ० अत्युच्च गुणकारक पदार्थ असून शिवाय बदाम, पिस्ते, अक्रोड चारोळी, केशर, वेलची, पंजाबी सालममिश्री, सफेतमुसळी, पत्री, गोक्षुर, शतावरी, आस्कंद, वंशलोचन वगैरे ( ८० ) उपयुक्त वनस्पति घातल्या आहेत. यानें पथ्यावांचून गुण येतो. यापासून कोणत्याही कारणांनीं होणारा व कशाही प्रकारचा शुक्रस्राव, नपूंसकत्व, मूळव्याधि, रक्तदूषणामुळें त्वगरोग, स्त्रियांची धुपणी व गर्भाशयस्थ दोष या भावना त्यांच्या एकंदर उपविकारांसह तत्काल बऱ्या होऊन धातुवृद्धि होते, व शरीर कणखर आणि तेजस्वी बनतें. २० तो० ड० २ रुपये. एकदम ३ डबे घेणारास ५ रुपये.

**स्वर्णधात्री तेल**—हें चारोळी, बदाम, कंकोळ, एला, बहुविध वनस्पतींचीं सत्वें व उपयुक्त तेलें अशा अनेक पदार्थांनीं बनविलें असल्यानें याच्या मर्दनापासून अपस्मार, उन्माद, वेड, चक्कर इ० रोगांस जलद आराम पडतो. केंसांस चोळल्यानें केंस काळे कुळकुळीत, तजेलदार, सडक लांब व मृदु होऊन मेंदु शांत आणि रोगरहित बनतो. यानें मस्तकाचें टक्कल जातें. हें अंगास चोळून स्नान करीत गेल्यानें शरीराचा दुर्गंध जातो. खरूज, गजकर्ण, शिबें, तसेंच तळपाय, तळहात, डोळे व मस्तक यांचा दाह हे विकार खास बरे होऊन निद्रा चांगली येते, आणि नेत्ररोग दुरुस्त होतात. बा० किं० १। रु०

**दंतरक्षक पूड**—ही दांत व हिरड्या यांचे सर्व विकार तत्काल दुरुस्त करून दांत स्वच्छ व मजबूत करण्यांत प्रतिज्ञेची आहे. ड. ६ आणे.

**सुरंगी, मालती, कल्हार, गुलबहार, दणाणा, लक्ष्मीविलास इ०** बादशाही अति उंची अत्तरें व त्याचप्रमाणें गुलाब, हिना, केवडा, चमेली, जाई वगैरे सुगंधी अत्तरें आणि केंसांस लावण्याचीं हरएक प्रकारचीं सुवासिक तेलें माफक दरानें पूर्ण खात्रीचीं मिळतील.

**सूचना:**—वरील औषधें व अत्तरें वगैरे पूर्ण खात्रीचीं असल्यामुळें आज पंचवीस वर्षांत त्यांचा लक्षावधि लोकांस अप्रातिम उपयोग झाला म्हणून त्यांचा नेहमीं फारच खप होत आहे. अनुभवानंतर पूर्ण खात्री पटेलच. औषधें माहितीचे खर्चासह रोखीनें अगर व्ही. पी. नें पाठवूं. प्याकिंग व टपाल खर्च वेगळा. घाऊक घेणारास कमिशन भरपूर. सर्व औषधांच्या आणि आरोग्यरक्षणाच्या माहितीचें सचित्र मोठें पुस्तक देऊं. आमचीं औषधें वगैरे मागविणें तीं खालील बिनचूक पत्त्यावर मागवावीं.

**कृष्णशास्त्री बिवलकर, वैद्य.**

मराठी
# शालापत्रक

येथें शब्द नाहीं शिष्यासी । हें अवघें सद्गुरूपाशीं ।
सद्गुरु पालटी अवगुणांसी । नाना यत्नें करोनी ॥
जें कांहीं आपणास ठावें । तें हळु हळु शिकवावें ।
शहाणें करून सोडावें । सकळा जनां ॥ १ ॥

—रामदास.

32 20/2
५/१/23

पुस्तक ३४. आक्टोबर सन १९२३. अंक १०

## शिक्षणाचीं साधनें.

जसजसी राष्ट्राची प्रगती होत जाते तसतशी नव्या नव्या कल्पना प्रादुर्भूत होतात. नवे नवे शोध लागतात व नवीं नवीं साधनें अस्तित्वांत येतात. प्रगतिप्रिय मनुष्यप्राणी पूर्वापार चालत आलेल्या रूढींना आचार विचारांना चिकटून राहत नाहीं. एवढेंच नव्हे तर तो आपल्या बुद्धिसामर्थ्यानें कांहीं तरी नवीन गोष्टी हरघटकेला बनवित असतो. मानसिक बाबतींत जसा हा फरक होतो तसा बाह्य गोष्टींतहि हा फरक दिसून येतो. एक काळ असा होता कीं, त्यावेळीं मनुष्य या ईश्वरानिर्मित पृथ्वींत अंगावर कोणतेंहि पांघरुण न घेतां इतस्ततः स्वैर संचार करीत असे. पण हळू हळू थंडी वाऱ्यापासून व उन्हांपासून आपलें संरक्षण व्हावें म्हणून त्याला अंगावर कांहीं तरी घालणें जरूर वाटूं लागलें. या कृतीस पाहिजे तर शारीरिक कमकुवतपणा म्हणा किंवा अंग उघडें टाकण्याची लाज वाटूं लागली म्हणा पण तो जनावरांचीं कातडीं आपल्या अंगाभोंवतीं गुंडाळूं लागला हें खरें. तो काळ जाऊन पुढें मनुष्य अंगावर झाडांचा पाला बांधू लागला. याच पासून झाडाची साल अंगाला गुंडाळण्याची कल्पना निघाली. वल्कलें वगैरेंचा काळ याच सुमाराचा आहे. हीं वल्कलें विणत असत व तीं आपल्या रेशमी कपड्यापेक्षां दिसण्यांत सुंदर व चांगलीं असत असें म्हणतात. पुढें लोंकरीचें विणकाम करून त्याचीं वस्त्रें अंगावर घालण्याचा काळ आला. त्यानंतर रेशमाचीं व कापसाचीं वस्त्रें लोक अंगावर घालूं लागलें. अशा-

प्रकारें नग्न स्थितींतून कापसाचीं वस्त्रें अंगावर घालीं-पर्यंत किति वर्षें गेलीं असतील याचा विचार करण्या-जोगा आहे. कापसाचीं वस्त्रें एकदां घालण्याचें ठरविल्यावरहि त्यांत किति फेरफार झाले असले पाहिजेत. अंगावरील उपरण्यापासून तों शर्ट, कोट पर्यंत यावयास बरींच वर्षें लागलीं. ही प्रगति आतां खुंटली नसून ती तशीच अव्याहत चालू आहे. पुढें या कपड्याच्या बाबतींत काय काय फेरफार होतील हें दिसेलच.

कपड्याचीं बाब आपण एक उदाहरणादाखल घेतली. अशीच प्रत्येक बाब आहे. हल्लींचीं घड्याळें छत्र्या, जोडे, घरें वगैरे कशीं अस्तित्वांत आलीं यांच्या रूपांतराचा इतिहास जर लिहिला गेला तर खरोखरच मनोरंजक होईल. पूर्वींच्या काळची धाटणी जर आज एखाद्यानें पत्करली तर समाज त्याच्याकडे पाहून कसा हासेल व त्याची फजिति उडवील हें सांगावयास नको. जुन्या काळचें चाकाच्या आकाराचें पागोटें घालून एखादा माणूस मुंबईसारख्या शहरांत हिंडूं लागला तर लोक त्याच्याकडे पाहून एक विदूषक म्हणून पाहून हासतील व त्याला नको नको करून सोडतील. पण कांहीं वर्षांपूर्वीं हल्लींच्या अपटुडेट पोषाख घालणाराची तीच स्थिति झाली असती. असो. प्रस्तुत आपण शिक्षणाविषयीं विशेषतः शिक्षणामध्यें कसा फेरफार होत गेला याचा विचार करणार आहों.

खुद्द ज्ञानाचा विचार केला, तर ज्ञान स्थिर आहे हें सांगावयास नको. ऋषिकालीं जे सिद्धांत प्रमाणभूत म्हणून मानण्यांत येत ते आज अप्रमाण समजण्यांत येत नाहींत एवढेंच नव्हेतर कित्येक गोष्टी पूर्वींच्या अनुरोधानें आपणास दुरुस्त कराव्या लागतात शास्त्राचें मात्र असें नाहीं शास्त्रज्ञान हें स्थीर नसून चल आहे. एके काळीं सूर्य पृथ्वीं भोंवतीं फिरतो, असें मानीत; पण ती कल्पना कालपरत्वें त्याज्य ठरून पृथ्वीच सूर्याभोंवतीं फिरते असें सिद्ध झालें आहे. आपले पूर्वज आपल्यापेक्षां कमी सुधारलेले होते असें कांहींना मानावयाचें असेल तर ते मानोत, पण ज्ञानाच्या बाबतींत आपण त्यांच्यापेक्षां कमी आहोंत ही गोष्ट मात्र सत्य आहे. तूर्त आपणांस त्यासंबंधीं विचार कर्तव्य नाहीं. आपण हें ज्ञान कसें प्राप्त करून देत याचा येथें विचार करणार आहों.

आज शिक्षणाची अवश्यकता बऱ्याच अंशानें पोट भरण्याकरितां भासते. पण त्या वेळीं ज्ञान हें परमार्थप्राप्तीचें साधन म्हणून संपादन करीत, त्यामुळें ज्याला या शिक्षणाची अवश्यकता असे तोच तें संपादन करण्यास येई. वेदांतील ऋचांचा उपयोग यज्ञाकरितां होई व यज्ञ या पर्जन्याचें साधन म्हणून केला जाई. शिवाय ऐहिक कर्में चित्तशुद्धीकरितां करावीं लागत असल्यामुळें पारमार्थिक दृष्ट्या त्याचा उपयोग होई. तेव्हां हे जे यज्ञक्रियेंतील मंत्र तंत्र तें पुस्तक रूपानें न मिळतां गुरुमुखांतून श्रवण करावें लागत म्हणूनच त्यांना श्रुती असें म्हणत. हें ज्ञान फार पवित्र असल्यामुळें भलत्याच्या कानीं पडलें तर त्याची पवित्रता व सामर्थ्य नष्ट होऊन इष्टफल-प्राप्ती होत नाहीं, अशी त्यांची समज असल्यामुळें तें आपल्या शिष्यांना एकांतांत देत. तेव्हां शिक्षणाचें पहिलें साधन हे डोळे नसून कान होते. कानांनीं जें ऐकलें जाईल तें डोक्यांत सांठवावें व यज्ञयागादि क्रिया कराव्या अशी प्रथम योजना होती. कदाचित् त्या काळीं लेखनसामुग्रीची व्यवस्था नसल्यामुळें श्रवणद्वारां शिक्षण संपादन करावें लागत असेल. ही पद्धत बरेच दिवस चालू होती. रामायण, महाभारत-काळीं भूर्जपत्रावर व केळीच्या पानावर लिहीत असत असें दिसतें. तथापि तेव्हांहि महाभारत सगळें पाठ म्हणणारे लोक होते असें सांगतात. कांहीं कांहीं राजे महाराजे आपल्या यशाची आठवण कायम रहावी म्हणून शिलालेख ताम्रपट अगर विजयस्तंभ

उपयोगांत आणीत. परंतु यांचा उपयोग मोठे ग्रंथ लिहिण्याकडे होत नसे. याकाळीं श्रवणद्वारां शिक्षण घेण्याचें थांबून लेखनद्वारां तेंच घेण्याचा उपक्रम सुरू झाला. त्यावेळची लेखनसामुग्री फारशी उपलब्ध नसल्यामुळें कागद कशाचा व कसा केला जात असे वगैरे सांगणें कठीण आहे. यूरोपमध्यें फार जुन्या काळचे लेख कांतड्यावर लिहीत असत. परंतु आपल्याकडे तसे लेख होते किंवा नाहीं हें नक्की सांगवत नाहीं. मात्र ख्रिस्तीशकाच्या सुमाराला सर्वत्र लेखनसामुग्री होती असें म्हणण्यास हरकत दिसत नाहीं. सध्यांचा कागद उपयोगांत येण्यापूर्वींच्या कागदाचें स्वरूप ज्याला जुन्नरी कागद म्हणतात त्यांत दृष्टीस पडतें. पण हा जुन्नरी कागद येण्याच्या अगोदर त्याचीं काय काय रूपान्तरें झालीं हें सांगवत नाहीं. लिपी अगर भाषा कोणती होती याचा स्वतंत्र रीतीनें पुष्कळ विचार झाल्यामुळें त्याबद्दल लिहिणें नको.

छापण्याची कला अमलांत आल्यावर शिक्षणांत एक मोठी क्रांती घडून आली.

इंग्रजी राज्य सुरू होण्यापूर्वीं सर्व शिक्षण कागदावर स्वतः लिहून दिलें जात असे. पण छापण्याची कला आल्याबरोबर पुस्तकें निघूं लागलीं व स्वतः लिहिण्याचें कंटाळवाणें काम थांबलें. त्यामुळेंच शिक्षण सुलभ व सर्वत्र होऊं लागलें.

लहान मुलें प्राथमिक शिक्षण धुळपाट्यावर घेत. एका लांकडी पाटीवर बोटकरी घांसीत व तो चुरा सारखा पसरीत. नंतर त्यावर काडीनें लिहीत पुढें स्लेटपाट्या व पेन्सिली आल्या. ही सुधारणा जसजशी होत गेली तसतसा त्रास कमी पडूं लागला. पुढें शिक्षणाकरितां ते काय काय करूं लागले हें सांगावयास नको. पुस्तकांत चित्रें आलीं. किंडर गार्टनची पद्धत सुरू झाली वगैरे वगैरे गोष्टी लोकांपुढें आहेतच. आतां यापुढें शिक्षणक्रमांत एक सुधारणा करावयाची घाटत आहे. ती म्हणजे सिनेमाच्याद्वारां सारें शिक्षण देणें ही होय. आजपर्यंत मोठमोठ्या शहरीं बायस्कोपच्याद्वारां प्रवासाची वगैरे माहिती देत. परंतु सिनेमेटोग्राफचा उपयोग साऱ्या शिक्षणाकरितां करण्याचा प्रघात होय. हे प्रयोग अमेरिकेंत लवकरच सुरू होतील व त्यांच्या मुलांना थोडक्या खर्चांत व मोठ्या प्रमाणावर शिक्षण घेण्याचे कामीं उपयोग होईल असें वाटतें. मात्र शरीरप्रकृतीवर काय काय दुष्परिणाम घडतील हें आज सांगवत नाहीं.

अशा प्रकारें ५००० वर्षांपूर्वीं साधनांच्या अभावीं श्रवणद्वारां अध्ययन करणाऱ्या जुन्या काळच्या ऋषींपासून तों सिनेमासारख्या गमतीच्या साधनानें शिक्षण संपादन करणाऱ्या विसाव्या शतकांतल्या सर्व मुलांपर्यंत कसकसा फरक पडत गेला हें आपण पाहिलें. यावरून मनुष्य किति प्रगतिप्रिय व सुलभतेचा भोक्ता आहे हें लक्षांत येतें.

---


# अभिनव काव्यमाला भाग ३

या पुस्तकाची दुसरी आवृत्ति छापून विक्रीस तयार आहे. किं. १ रु. ट. ह. व व्ही. पी. खर्च निराळा.

म्यानेजर—चित्रशाळा प्रेस, पुणें.

प्रकारें नग्न स्थितींतून कापसाचीं वस्त्रें अंगावर घालीं-पर्यंत किति वर्षें गेलीं असतील याचा विचार करण्याजोगा आहे. कापसाचीं वस्त्रें एकदां घालण्याचें ठरविल्यावरहि त्यांत किति फेरफार झाले असले पाहिजेत. अंगावरील उपरण्यापासून तों शर्ट, कोट पर्यंत यावयास बरींच वर्षें लागलीं ही प्रगति आतां खुंटली नसून ती तशीच अव्याहत चालू आहे. पुढें या कपड्याच्या बाबतींत काय काय फेरफार होतील हें दिसेलच.

कपड्यांची बाब आपण एक उदाहरणादाखल घेतली. अशीच प्रत्येक बाब आहे. हल्लींचीं घड्याळें छत्र्या, जोडे, घरें वगैरे कशीं अस्तित्वांत आलीं यांच्या रूपांतराचा इतिहास जर लिहिला गेला तर खरोखरच मनोरंजक होईल. पूर्वीच्या काळची धाटणी जर आज एखाद्यानें पत्करली तर समाज त्याच्याकडे पाहून कसा हांसेल व त्याची फजिति उडवील हें सांगावयास नको. जुन्या काळचें चाकाच्या आकाराचें पागोटें घालून एखादा माणूस मुंबईसारख्या शहरांत हिंडूं लागला तर लोक त्याच्याकडे पाहून एक विदूषक म्हणून पाहून हांसतील व त्याला नको नको करून सोडतील. पण कांहीं वर्षांपूर्वीं हल्लींच्या अपटुडेट पोषाख घालणाराची तीच स्थिति झाली असती असो. प्रस्तुत आपण शिक्षणाविषयीं विशेषतः शिक्षणामध्यें कसा फेरफार होत गेला याचा विचार करणार आहों.

खुद्द ज्ञानाचा विचार केला, तर ज्ञान स्थिर आहे हें सांगावयास नको. ऋषीकालीं जे सिद्धांत प्रमाणभूत म्हणून मानण्यांत येत ते आज अप्रमाण समजण्यांत येत नाहींत एवढेंच नव्हेतर कित्येक गोष्टी पूर्वीच्या अनुरोधानें आपणास दुरुस्त कराव्या लागतात शास्त्राचें मात्र असें नाहीं शास्त्रज्ञान हें स्थीर नसून चल आहे. एके काळीं सूर्य पृथ्वीं भोंवतीं फिरतो, असें मानीत; पण ती कल्पना कालपरत्वें त्याज्य ठरून पृथ्वीच सूर्याभोंवतीं फिरते असें सिद्ध झालें आहे. आपले पूर्वज आपल्यापेक्षां कमी सुधारलेले होते असें कांहींना मानावयाचें असेल तर ते मानोत, पण ज्ञानाच्या बाबतींत आपण त्यांच्यापेक्षां कमी आहोंत ही गोष्ट मात्र सत्य आहे. तूर्त आपणांस त्यासंबंधीं विचार कर्तव्य नाहीं. आपण हें ज्ञान कसें प्राप्त करून देत याचा येथें विचार करणार आहों.

आज शिक्षणाची अवश्यकता बऱ्याच अंशानें पोट भरण्याकरितां भासते. पण त्या वेळीं ज्ञान हें परमार्थप्राप्तीचें साधन म्हणून संपादन करीत, त्यामुळें ज्याला या शिक्षणाची अवश्यकता असे तोच तें संपादन करण्यास येई. वेदांतील ऋचांचा उपयोग यज्ञाकरितां होई व यज्ञ या पर्जन्याचें साधन म्हणून केला जाई. शिवाय ऐहिक कर्में चित्तशुद्धीकरितां करावीं लागत असल्यामुळें पारमार्थिक दृष्ट्या त्याचा उपयोग होई. तेव्हां हे जे यज्ञक्रियेंतील मंत्र तंत्र तें पुस्तक रूपानें न मिळतां गुरुमुखांतून श्रवण करावें लागत म्हणूनच त्यांना श्रुती असें म्हणत. हें ज्ञान फार पवित्र असल्यामुळें भलत्याच्या कानीं पडलें तर त्याची पवित्रता व सामर्थ्य नष्ट होऊन इष्टफलप्राप्ती होत नाहीं, अशी त्यांची समज असल्यामुळें तें आपल्या शिष्यांना एकांतांत देत. तेव्हां शिक्षणाचें पहिलें साधन हे डोळे नसून कान होते. कानांनीं जें ऐकलें जाईल तें डोक्यांत सांठवावें व यज्ञयागादि क्रिया कराव्या अशी प्रथम योजना होती. कदाचित् त्या काळीं लेखनसामुग्रीची व्यवस्था नसल्यामुळें श्रवणद्वारां शिक्षण संपादन करावें लागत असेल. ही पद्धत बरेच दिवस चालू होती. रामायण, महाभारतकाळीं भूर्जपत्रावर व केळीच्या पानावर लिहीत असत असें दिसतें. तथापि तेव्हांहि महाभारत सगळें पाठ म्हणणारे लोक होते असें सांगतात. कांहीं कांहीं राजे महाराजे आपल्या यशाची आठवण कायम रहावी म्हणून शिलालेख ताम्रपट अगर विजयस्तंभ

उपयोगांत आणीत. परंतु यांचा उपयोग मोठे ग्रंथ लिहिण्याकडे होत नसे. याकाळीं श्रवणद्वारां शिक्षण घेण्याचें थांबून लेखनद्वारां तेंच घेण्याचा उपक्रम सुरू झाला. त्यावेळची लेखनसामुग्री फारशी उपलब्ध नसल्यामुळें कागद कशाचा व कसा केला जात असे वगैरे सांगणें कठीण आहे. यूरोपमध्यें फार जुन्या काळचे लेख कांतड्यावर लिहीत असत. परंतु आपल्याकडे तसे लेख होते किंवा नाहीं हें नक्की सांगवत नाहीं. मात्र ख्रिस्तीशकाच्या सुमाराला सर्वत्र लेखनसामुग्री होती असें म्हणण्यास हरकत दिसत नाहीं. सध्यांचा कागद उपयोगांत येण्यापूर्वींच्या कागदाचें स्वरूप ज्याला जुन्नरी कागद म्हणतात त्यांत दृष्टीस पडतें. पण हा जुन्नरी कागद येण्याच्या अगोदर त्याचीं काय काय रूपान्तरें झालीं हें सांगवत नाहीं. लिपी अगर भाषा कोणती होती याचा स्वतंत्र रीतीनें पुष्कळ विचार झाल्यामुळें त्याबद्दल लिहिणें नको.

छापण्याची कला अमलांत आल्यावर शिक्षणांत एक मोठी क्रांती घडून आली.

इंग्रजी राज्य सुरू होण्यापूर्वीं सर्व शिक्षण कागदावर स्वतः लिहून दिलें जात असे. पण छापण्याची कला आल्याबरोबर पुस्तकें निघूं लागलीं व स्वतः लिहिण्याचें कंटाळवाणें काम थांबलें. त्यामुळेंच शिक्षण सुलभ व सर्वत्र होऊं लागलें.

लहान मुलें प्राथमिक शिक्षण धुळपाट्यावर घेत. एका लांकडी पाटीवर वीटकरी घांसीत व तो चुरा सारखा पसरीत. नंतर त्यावर काडीनें लिहीत पुढें स्लेटपाट्या व पेन्सिली आल्या. ही सुधारणा जसजशी होत गेली तसतसा त्रास कमी पडूं लागला. पुढें शिक्षणाकरितां ते काय काय करूं लागलें हें सांगावयास नको. पुस्तकांत चित्रें आलीं. किंडर गार्टनची पद्धत सुरू झाली वगैरे वगैरे गोष्टी लोकांपुढें आहेतच. आतां यापुढें शिक्षणक्रमांत एक सुधारणा करावयाची घाटत आहे. ती म्हणजे सिनेमाच्याद्वारां सारें शिक्षण देणें ही होय. आजपर्यंत मोठमोठ्या शहरीं बायस्कोपच्याद्वारां प्रवासाची वगैरे माहिती देत. परंतु सिनेमेटोग्राफचा उपयोग साऱ्या शिक्षणाकरितां करण्याचा प्रघात होय. हे प्रयोग अमेरिकेंत लवकरच सुरू होतील व त्यांच्या मुलांना थोडक्या खर्चांत व मोठ्या प्रमाणावर शिक्षण घेण्याचे कामीं उपयोग होईल असें वाटतें. मात्र शरीरप्रकृतीवर काय काय दुष्परिणाम घडतील हें आज सांगवत नाहीं.

अशा प्रकारें ५००० वर्षांपूर्वीं साधनांच्या अभावीं श्रवणद्वारां अध्ययन करणाऱ्या जुन्या काळच्या ऋषींपासून तों सिनेमासारख्या गमतीच्या साधनानें शिक्षण संपादन करणाऱ्या विसाव्या शतकांतल्या सर्व मुलांपर्यंत कसकसा फरक पडत गेला हें आपण पाहिलें. यावरून मनुष्य किति प्रगतिप्रिय व सुलभतेचा भोक्ता आहे हें लक्षांत येतें.

---


# अभिनव काव्यमाला भाग ३

या पुस्तकाची दुसरी आवृत्ति छापून विक्रीस तयार आहे. किं. १ रु. ट. ह. व व्ही. पी. खर्च निराळा.

म्यानेजर--चित्रशाळा प्रेस, पुणें.

# एक राक्षस व राजा.

एक मोठें जंगल होतें. त्या जंगलांत एक राक्षस व त्याची बायको रहात असे. एकदां ती राक्षसी आपल्या नवऱ्याला म्हणाली कीं, पुष्कळ दिवस झाले मीं माणसाचें मांस खाल्लें नाहीं तर मला नर-मांस आणून द्या. राक्षसानें ठीक आहे असें उत्तर दिलें.

या जंगलाबाहेर एक राजा राज्य करीत असे. त्या ठिकाणी त्यांचें राजधानींचें शहर असून तेथें पुष्कळ लोक राहात असत. त्या राजाच्या दरबारांत मोठ मोठे पंडीत होते. एके दिवशीं हा राक्षस एका माणसाचें मुंडकें हातांत घेऊन दरबारांत आला. त्याला पाहिल्यावर दरबारांतील सारीं माणसें भिऊन गेलीं. राक्षस राजासमोर जाऊन उभा राहिला. राजा खड्या आवाजांत त्याला विचारतो " तूं कोण आहेस आणि येथें कशाकरितां आलास ?"

राक्षस म्हणतो " मी या जंगलाचा राजा आहें. मी या तुझ्या दरबारांत किती शहाणे लोक आहेत हें पाहण्याकरितां आलों आहें. तूं राज्य करण्यास योग्य आहेस किंवा नाहींस एवढेंच पहाण्याचा माझा हेतू आहे. तू जर मी विचारतों या प्रश्नाचें नीट उत्तर दिलें नाहींस तर तुला आणि तुझ्या दरबारां-तील साऱ्या लोकांना भक्षण करून हें राज्य हिसकावून घेईन.

राजा म्हणतो, विचार, काय तुला विचारावयाचें आहे तें."

राक्षसानें तें मुंडकें आपल्या डोळ्यासमोर धरून म्हटलें " हें ज्या मनुष्याचें मुंडकें आहे, त्याची किंमत काय आहे सांगा."

राक्षसाचा हा प्रश्न ऐकून सारे लोक गोंधळून गेले.

हें पाहून राजा म्हणतो, " ठीक, एक महिन्यानें या प्रश्नाचें उत्तर मिळेल."

राक्षस म्हणाला, " एक महिना पुरा होतांच मी येईन, उत्तर तयार ठेव."

असें सांगून राक्षस निघून गेला. राजाला मोठा प्रश्न पडला. त्यानें दरबारांतील साऱ्या पंडितांना एकत्र बोलावलें व म्हटलें " तुम्हीं सारे जण फुकट बसून खातां, काम करीत नाहीं, कांहीं नाहीं. या राक्षसाच्या प्रश्नाचें नीट उत्तर द्या, नाहीं तर तुम्हां साऱ्यांची कत्तल उडविण्यांत येईल."

हे निर्वाणीचे शब्द ऐकून सारे पंडीत घाबरून गेले. त्यांनीं आपले सारे ग्रंथ पालथे घातले. व्याकरण, ज्योतिष, वगैरे सारीं शास्त्रें त्यांनीं धुंडलीं पण त्यांना राक्षसाच्या प्रश्नाचें उत्तर मिळेना. शेवटीं २८ दिवस उलटून रात्रीची वेळ आली. उद्यां जर आपण उत्तर दिलें नाहीं तर आपली मान शाबूद रहाणार नाहीं, हें ओळखून सारे पंडीत त्या शहरांतून पळून जाऊं लागले.

त्यांच्यांत एक लहान पंडीत होता. त्याच शिक्षण वगैरे सारें यथास्थित झालें होतें; पण इतर बुद्धयांमध्यें त्याला मान मिळत नसे, त्यामुळें तो एका कोपऱ्यांत पडून राहिला होता.

राजाला सकाळच्या प्रहरीं सारे पंडीत पळून गेले आहेत अशी बातमी लागली. त्या बरोबर त्यानें आपले घोडेस्वार चोंहीकडे धाडून त्यांना पकडून आणलें. छोट्या पंडीताशिवाय साऱ्यांना

पकडून कैदेंत टाकण्यांत आलें व त्यांच्यावर खडा पहारा बसविण्यांत आला राजानें जेव्हां त्या पंडीतांना, राक्षसाच्या प्रश्नाचें उत्तर विचारलें तेव्हां ते सारेजण आपल्याला पोथींत उत्तर सांपडलें नाहीं असें म्हणूं लागले.

राजा चूप बसला. त्यानें त्यांना ठार मारलें नाहीं, कारण हे सारे त्या राक्षसाच्या हांतून मरणार हें त्याला ठाऊक होतें, मग स्वतःकडे जीवहत्येचें पातक कां घ्या असा त्यानें विचार केला.

धाकटा पंडीत ज्या राक्षसाच्या जंगलांत गेला असल्यामुळें त्याला पकडण्यांत आलें नाहीं. तो दुपारच्या वेळीं त्या जंगलांत शिरला. जंगल फार दाट होतें; तेथें कोणाला मार्ग सांपडणें शक्य नव्हतें.

चहूंकडून हिंस्र पशूंचें ओरडणें ऐकूं येत होतें. तो थोडा पुढें गेला; तेथें त्याला वाघाची आरोळी ऐकूं आली. हा आवाज ऐकतांच त्याच्या काळजाचें पाणी पाणी झालें, त्याचें तोंड काळवंडलें व जीव उडून गेला. इतक्यांत त्यानें एक हरिण आपल्या समोरून धांवत जातांना पाहिला. या हरिणामागून वाघ येत असेल या भीतीनें तो पंडीत एका झाडावर चढला. इतक्यांत त्याच झाडाजवळ हरीण व वाघ आला. हें पाहून पंडीतजी थरथर कापूं लागले.

पुढें सध्याकाळ झाली. तरी पंडीतजी वरच. रात्रींच्या वेळीं त्या किर्र झाडीमधून भयानक आरोळ्या ऐकूं येऊं लागल्या. तेव्हां रात्र येथेंच काढावी असें ठरवून पंडितांनीं आपलें धोतर सोडलें व अर्ध्या धोतरांनीं स्वतःला झाडाच्या फांदीला बांधून घेतलें न जाणो रात्रीच्या वेळीं खालीं पडलों बिडलों तर पंचाईत, या विचारांनीं त्यांनीं वरील बेत केला.

मध्यरात्र उलटून गेली. त्या वेळीं तो राक्षस व त्याची बायको त्या झाडाजवळ येऊन आपसांत कांहीं बोलूं लागले. हा आवाज ऐकतांच पंडीतांनीं आपले कान तिकडे वळविले.

राक्षसी:—उद्यां तर तुम्ही राजदरबारांत जाणार!

राक्षस:—राजा आणि त्याचे दरबारी मूर्ख आहेत. त्यांच्यापैकीं माझ्या प्रश्नाचें कोणीही उत्तर देऊं शकणार नाहींत, म्हणून मी त्या सर्वांना मारून खाईन.

राक्षसी:—अन् त्यांनीं उत्तर दिलें तर?

राक्षस:—मी येथून निघून जाईन, कारण बुद्धिवान् लोकांच्या शेजारीं राहूं नये.

राक्षसी:—पण त्या माणसाची काय किंमत असावी हें मला सुद्धां समजत नाहीं.

राक्षस:—छे! मी तें आतां नाहीं सांगणार. उद्यांच्या दिवस थांब. कोणी ऐकलें तर सारा डाव हुकेल.

राक्षसी:—नाहीं, मला तुम्ही आतांच सांगितलें पाहिजे. येथें कोणी नाहीं आतां सांगाच. नाहींतर मी तुमच्याशीं बोलणार नाहीं.

पंडीत वरून कान टवकारून ऐकूं लागला.

राक्षस:—बरं तर ऐक. ज्याची किंमत काढावयाची त्याच्या कानांत एक सळई घालावी. ही सळई जर पोटांत गेली तर त्याची किंमत एक लाख रुपये समजावी. जर दुसऱ्या कानांत गेली तर त्याची किंमत शंभर रुपये समजावी व तोंडांत गेली तर त्याची कवडीहि किंमत नसते.

राक्षसी:—हें काय मला यांतलें कांहीं समजलें नाहीं. सारी फोड करून सांगा

राक्षस:—जो माणूस एखादी गोष्ट ऐकून पोटांत सांठवून ठेवतो त्याची किंमत एक लाख रुपये. जो या कानानें ऐकून त्या कानानें सोडून देतो त्याची किंमत शंभर रुपये व जो ऐकल्याबरोबर तोंडावाटें ती गोष्ट सांगत सुटतो त्याची किंमत एक कवडीही नाहीं.

हें ऐकून ती राक्षसी खूप हंसली. त्यांना आपल्या डोक्यावर एक माणूस बसला आहे ही गोष्टहि समजली नाहीं.

पुढें सकाळ होतांच हा पंडित हळूंच खालीं उतरला व घरीं आला. तेथें स्नान वगैरे करून राजदरबारांत गेला. जाऊन पहातो तों राजा अगदीं भिऊन गेला आहे असें त्याला आढळलें. पंडीत राजाजवळ जाऊन म्हणाला राजा भिऊं नको. मी त्या प्रश्नाचें उत्तर तयार ठेवलें आहे.

दुपारचे वेळीं तो राक्षस अक्राळविक्राळ रूप धारण करून तेथें आला. त्या बरोबर या पंडीतांनीं दूर उभे रहाण्यास फर्माविलें. पुढें त्या राक्षसाच्या प्रश्नाचें उत्तर देण्यांत येऊन त्याची हकालपट्टी करण्यांत आली. त्या राजाला किती आनंद झाला असेल तो आम्ही काय सांगावा. त्या दिवसापासून त्या पंडिताला मुख्य जागा देण्यांत येऊन त्याचा गौरव करण्यांत आला.

---

## चुटके.

शिक्षकः—पुन्हां उशीरां आलास तर उशीरां आल्याचें कारण लिहून आण, विसरूं नको.

मुलगा:—कोणापासून ?

शिक्षक:—वडिलापासून.

मुलगा:—मास्तर, आमच्या बाबांना कारणच सांगता येत नाहीं. नाहीं तर उशीरां आल्याबद्दल आई त्यांना कधींच रागे भरली नसती.

---

मालकः—सांगून ठेवतों ऐक. माझें भाडें चुकतें केल्याशिवाय तुला येथून हालूं देणार नाहीं.

भाडेकरी:—देव पावला ! मी तरी अशीच कायमची जागा पहात होतों.

---

शिक्षक:—मुलांनो, लक्षांत ठेवा, शहाण्यांच्या कोशांत " नापास " हा शब्दच नसतो.

( थोड्या वेळानें एक मुलगा डोकें उचलतांच )

शिक्षक:—काय, जोगळेकर काय ?

मुलगा.—मी म्हणणार होतों कीं, कोशांत जर तो शब्द नसला तर प्रकाशकाला एक पत्र पाठवून चूक दुरुस्त करून घ्यावी.

---

" कायरे वसंता तूं सारखा सकाळपासून संध्याकाळपर्यंत बडबड कां करतोस." ? "कारण, रात्रीं झोपेमुळें मला वेळ मिळत नाहीं म्हणून."

---

एका बाईनें आपल्या मोलकरणीच्या लग्नाकरितां २० रुपये दिले. या मुलीचें एका ठेंगू माणसांबरोबर लग्न झालें. त्याला पाहून आश्चर्यानें मालकीण विचारते. " गंगू कितिग लहान नवरा हा ! "

"मग बाईसाहेब २० रुपयांत केवढा नवरा येईल ?"

---

" डॉक्टर मला काय झालें आहे, हें तुम्ही अगदीं स्पष्ट शब्दांत सांगितलें पाहिजे " असें मोठे हुद्देकरी म्हणाले.

" महाराज " खुर्चीला टेकून डॉक्टर म्हणतात, " आपल्याला थोड्या कामाचा व फार पैशाचा रोग जडला आहे. "

---

# कोल्हा आणि बकरा.

बहु उष्ण अशा दिवशीं कांतारामधिं प्रवास एकत्र ॥
होते करित एकदां कोल्हा, बकरा असे उभय मित्र ॥ १ ॥
उन्हानें पीडित परि आढळले ते बहूत तान्हेले ॥
न दिसे कोठें पाणी, म्हणूनी दोघे सभोंवतीं फिरले ॥ २ ॥
अंतीं पाहुनी सुंदर, स्वच्छ अशा एकल्या झऱ्यालागीं ॥
खंदक तळांत दोघे विचार विरहीत उतरले वेगीं ॥ ३ ॥
भागे तहान जेव्हां पडले परि ते बहूत चिंतेंत ॥
एकहि वाट न आढळे चढण्या, केले किती तरी बेत ॥ ४ ॥
तैं तो कपटी स्वार्थी कोल्हा वदला बहूत आनंदें ॥
युक्ति एक मम मनीं उगवूं पाहीं अतांच, सांगूं दे ॥ ५ ॥
जरि राहशील द्विपदीं ठेवुनि त्वद् पुढिल पाय भिंतींत ॥
शकेन वरिं पोंचाया चढुनी तुजवरीत मीं पहा खचित ॥ ६ ॥
जातां तिथें एकदां शिंगांप्रति तव धरोनिया हातीं ॥
सायासाविण घेईन तुजलागीं ओढुनी कसा वरती ॥ ७ ॥
साधा भोळा बकरा न परि उमगला तयाचिया कपटा ॥
उचलायासि स्वतःला तो न बळी सर्व डाव हा खोटा ॥ ८ ॥
कोल्हें जसें सुचविलें तैसा राही उभा तया ठाईं ॥
चढुनि शिरावरीं त्याच्या तो कोल्हा तत्क्षणीं वरीं जाई ॥ ९ ॥
तैं त्यासि म्हणे बकरा ठरली जी मदत ती मला देईं ॥
नाकारी करूनि तया ताडन अति दुष्टशाहि वचनांहीं ॥ १० ॥
तूं मूर्ख असासि मोठा जरि असतें तुजसि किंचितहि ज्ञान ॥
तरि मानितास कधिंहि न दवडिन मम वांचण्या तुझे प्राण ॥ ११ ॥
आतां तरि यापुढतीं होईं शहाणा श्रवोनि उपदेश ॥
जरि नशिबें तुज आली संधी यातुनिया सुटायास ॥ १२ ॥
भोळा बकरा जरि तळिं खळ कोल्हा वरि दिसेल सुज्ञास ॥
कोल्ह्यासि नीच मानुनि बरवा मानील त्यास तो खास ॥ १३ ॥

अनंत कुमार.

मडगांव—गोंवा

# एक मननीय चरित्र.

( ले०—एक परिचित. )

गुणी जनांचें गुणवर्णन करणारा विद्यमान राष्ट्रांत जर एखादा देश असेल तर तो अमेरिका होय. अनेक आपत्तींतून व संकट परंपरेंतून तावून सुलाखून मनुष्य निघावा मात्र तोंच वर्तमानपत्रांच्या बातमीदारांची त्याच्या आप्तेष्टांच्या किंवा खुद्द त्याच्या घरीं, किंवा त्याच्या कारखान्यांत खडान् खडा माहिती काढण्यासाठीं झिंबड झाली नाहीं, असें कधीं व्हायचें नाहीं. असो; इतकी प्रस्ताविका करून मि. **फ्रँक वुलवर्थ** ह्या नवकोट नारायण अमेरिकनाच्या चरित्राकडे वळतों. ह्याच्या चरित्रास आधारभूत म्हणजे एक दोन अमेरिकन जर्नलस व टिट्बिट्स हीं आहेत हें कृतज्ञपणें मला कबूल केलें पाहिजे.

१ दररोज पुरी सहा आणे देखील मजुरी मिळणें प्रथम ज्यास दुरापास्त झालें, पण आपल्या धंद्यांत चिकाटी धरून ज्यानें जवळ जवळ बारा कोट रुपयांची गजांत लक्ष्मी संपादन केली, तो फ्रँक वुलवर्थ १९१९ च्या साल अखेर ख्रिस्तवासी झाला. घरांत मूळची बापाची गरीबी असल्यामुळें त्याचें बालपण तुटपुंज्या शिक्षणाचें झालें. त्या स्थितींत फ्रँक ह्यास पितृसुख कितपत लाभलें असेल त्याचा आपण आपल्या मनाशींच विचार केलेला बरा. आमच्या चरित्र नायकाच्या जन्मभूमीजवळ ह्यावेळीं फोर्ड कं० सारखे जगविख्यात मोटारींचे कारखाने असल्यामुळें त्याच्या मनाला दररोज टोंचणी होत असे कीं, काढावे तर असे कारखाने काढावे आणि मिळवावी तर अशी संपत्ती मिळवावी पण 'उत्पद्यंते विलीयंते दरिद्राणां मनोरथाः" अशी स्थिति कांहीं काळ झाली. असो; एके दिवशीं त्याच्या महत्त्वाकांक्षी मनाला असा हुरूप आला कीं, आज कांहीं होवो, पण एखाद्या जंगी कारखान्यांत नौकरी धरून तेथेंच तत्परतेनें काम करावयाचें. ह्या प्रेरणेनें मन उद्दीपन झाल्यावर त्याच्या गांवाच्या अमळ जवळ असलेल्या जेम्स मूरे नांवाच्या एका सुप्रसिद्ध हरहुन्नरी दुकानदाराच्या येथें नौकरीच्या उद्देशानें तो गेला. ह्या वेळेचा त्याचा पोशाख म्हणजे आपल्याकडील जवळ जवळ गोंधळ्याचा अथवा बाळसंतोसाचा होता म्हटलें तरी चालेल. शर्टला नाहींत धड बटणें, कोटाला ना धड कॉलर, आणि तोहि बगलेंत फाटलेला. डोक्याला दोन ठिकाणीं फाटलेली ईव्हीनिंग कॅप. ( रात्रीची टोपी ) मग अशा स्थितींत किंमतवान् हॅटची अपेक्षा तो कशी करणार ! घरून तो ज्या दिवशीं निघाला त्या दिवशीं त्याला येथून तेथून खिडक्यां असलेला बूट पण तो देखील वेळेवर सांपडला नाहीं. असो; मुरे ह्याच्या वाटरटाऊन येथील दुकानीं प्रवेशतांच फ्रँकची संभावना झाली ती अशी:—

" कारे फ्रँक, तूं तर भणंग आणि भंगड दिसतोस. दारूनें कितीदां झिंगून पडतोस ? असा अष्टविश्वे दारिद्री व अभागी माणूस मला नको" त्यावर फ्रँकनें विनयानें उत्तर केलें, " महाराज, माझे संबंधीं आपलें कांहींहि मत झालेलें असो, मी तसा खास नाहीं. आपले येथें नौकरी करण्याची माझी फार इच्छा आहे. त्यास प्रत्युत्तरादाखल मूरे साहेब

म्हणाले " माझ्या एथें तुला नौकरी नाहीं. फुकट रहात असशील तर उद्यां विचार करून ये. " त्यावर खट्टू मन झालेला बिचारा फ्रँक काय उत्तर देणार ! " प्रथमग्रासे मक्षिकापातः " असा अनिष्ट प्रसंग आमचे चरित्र नायकावर ओढवला. पण त्यास गांगरून जाणारा असा कच्चा दीलाचा हा नव्हता. त्यानें हुषारीनें खाडकन् उत्तर केलें " ठीक आहे. तत्रापी मला एवढेंच आपणास विचारावेंसें वाटतें कीं फक्त दोन वेळच्या शिदोरींची तरी सोय होईलना " त्यावर मूरेसाहेब एकदम उद्गारले " जा ठीक आहे. पहाता येईल. नक्की आठ वाजतां कामावर ये बरें. "

( २ ) ह्यानंतर आमच्या चरित्रनायकाच्या उद्योग-पर्वास आरंभ होतो म्हटलें तरी चालेल. तो भाग असा; मूरेसाहेबास दुकानांत छानछुकी व टापटीप फारशी आवडत नसे. आपल्या मिठ्ठा वाणीनें तो गिऱ्हाइकांस एका क्षणांत आपलासा करी. रोखीनें किंवा उधारीनें प्रसंग पडेल तसा त्याच्या पदरांत माल बांधी. हें फ्रँकला सर्व मान्य होतें. पण त्याची उत्कट इच्छा ही होती कीं, आपलें दुकान म्हणजे टापटिपीचा व स्वच्छतेचा एक नमुनाच लोकांना दिसावा, पण हें व्हावें कसें ? कारण फ्रँक यास बराच काळपर्यंत केवळ चौकीदाराचेंच काम करावें लागलें. खुद्द दुकानांतून अस्सल मालाची विक्री आपल्या हांतून व्हावी म्हणून दुकानदाराच्या पुढें पुढें त्यानें कितीदा तरी केलें, पण तो सुयोग लवकर कांहीं जुळेना; मात्र चौकीदाराच्या कामाऐवजीं दिवसांतून एकदां दोनदां दुकानांतील भाग स्वच्छ करण्याचा म्हणजेच झाडण्याचा, व धुण्याचा मान त्यास मिळूं लागला. आणि येथेंच त्याच्या कर्तव्य-तत्परतेचा विशेष मालकास दिसून आला. तो असा कीं, स्वच्छ केलेली जागा, पुसलेलीं कपाटें तशीं झालीं आहेत कीं नाहींत हेंच जणुकाय पाहण्यासाठीं मुरेसाहेबाच्या आसिस्टंटनें प्रतिदिनीं एक एक परिट घडीचा रुमाल देऊन तो प्रथम जसा दिला तसाच दिसला पाहिजे अशी ताकीद दिली. तो कडक नियम फ्रँकनें तंतोतंत पाळला हें सांगणें नकोच. असे कसोटीचे प्रसंग त्याच्यावरून कितीदां तरी गेले. आणि त्या सर्वांतून तो कुशलतेनें पार पडला. इतकेंच नव्हें तर त्या दुकानांत त्याच्यावरील जे अनेक अधिकारी होते त्यांची देखील आपल्यावर त्यानें इतराजी होऊं दिली नाहीं. एके दिवशीं असा योग जुळून आला कीं ऐन दुपारचे वेळीं मुरेसाहेबास आराम खुर्चीवर झोंप लागली, इतर मंडळी सणानिमित्त म्हणून अल्प काळ रजेवर गेली होती. ह्यावेळीं एका गिऱ्हाइकानें ' मला ४१ नंबरी सूत पाहिजे ' म्हणून पृच्छा केली. पण हें नंबरचें खटलें काय आहे, तसेंच प्रत्येक मालावर गुणावगुणाप्रमाणें नंबर असतो कीं काय, ही गोष्ट या वेळीं त्याच्या गांवींहि नव्हती. गिऱ्हाईक येऊन बसलेलें पहातांच मालकाच्या निद्रेचा भंग करण्याचा बिकट प्रसंग फ्रँकवर ओढवला; आणि तसें करतांच मुरेसाहेब त्याच्या अंगावर रुयेःकरून चवताळून आले पण त्यानें कृपाच केली कीं फ्रँक-साहेबास मारिलें नाहीं. माल आणि नंबर, वजन आणि त्याची घडण अथवा ठेवण ही व्यवस्था कोणत्या उद्देशानें असते, ह्यांतील व्यापारी रहस्य काय आहे, हें सर्व मुरे साहेबानें आमच्या चरित्र-नायकास तांत्रिक रीतीनें शिकविलें. अशा शिकव-णुकीचा तो भोक्ताच असल्यामुळें त्यानें हें सर्व २।३ वेळा आपल्या स्मरणपुस्तकांत टिपून ठेविलें. व पुढें मालकाचा त्याच्यावर दिवसेंदिवस विश्वास बसूं लागल्यामुळें त्यास आंत, बाहेर वावरण्याची व विक्री करण्याची रात्रंदिवस परवानगी मिळाली. त्याचें काम धडाडीनें सुरू झालें. तथापि मुरेसाहेबास फ्रँकचें काम चांगलेसें पसंत पडेना. त्याच्या दुकानाची उत्तरोत्तर भरभराट होऊं लागली, फ्रँकसाहेबास धंद्यां-तल्या खुब्या कळूं लागल्या, पुढें कांहीं दिवसांनीं

परस्परांत थोडा मतभेद आल्यानें मुरेसाहेबाच्या दुकानास राम राम ठोकणें त्यास जरूर पडलें. त्यानंतर नौकरीच्या बाबतींत इजा, बिजा, तिजा होऊन आमच्या चरित्रनायकानें एक स्वतंत्र दुकान काढून याचें नांव " **उठाव पांच आना चीज** " असें ठेविलें. ही एक नवीन टूम होती. तिचा सर्वत्र युरोपभर व अमेरिकेभर फैलाव झाला. येथें एक महत्त्वाची गोष्ट ध्यानांत ठेविली पाहिजे कीं, नवीन दुकान काढण्याची जेव्हां फ्रँकच्या मनांत कल्पना आली तेव्हां २।३ वेळां ह्या मुरेसाहेबानेंच ८०० ते १२०० रु. चा माल उधारीवर देऊन त्यास उत्तेजित केलें. याला म्हणावें गुणग्राहकता. असो. फारच थोड्या काळांत ह्या दोन्ही खंडांत वुलवर्थ कंपनीच्या नांवाचीं ६।७ हजार दुकानें निघालीं व ह्या सर्वांच्या भांडवलाचा आंकडा ७।८ कोटींवर गेला. आपल्या अगणींत संपत्तीचा विनियोग तरी कसा करावा, हें धन ठेवावें तरी कोठें हीच फ्रँक साहेबास या वेळीं विवंचना पडली होती कीं काय हें एक देव जाणें; आणि म्हणूनच त्यांनीं आपल्या जन्मभूमीजवळ १३२ पुरुष उंचीची, जगांत इतर इमारतींस लाजविणारी अशी नयन मनोहर भव्य इमारत उठवून दिली. ह्या इमारतीला ४॥ कोट रु. खर्च आला असें तज्ज्ञ सांगतात.

एकदां एका बातमीदारानें फ्रँकसाहेबास विचारलें कीं, आपल्या यशाची गुरुकिल्ली कोणती हें सांगाल काय ? त्यास आमच्या चरित्रनायकानें खालील उत्तरें दिलीः—

( १ ) नौकरी करीत असतांना घड्याळाचें काट्यांकडे मीं कधींहि पाहिलें नाहीं.

( २ ) हुरूप, हुषारी आणि घाम ह्या त्रयींतून मी नित्य गेल्यानें माझा कार्यभाग होई.

( ३ ) पुष्कळ वेळां आठवण दगा देते. तिजवर शहाण्यानें विश्वास ठेवूं नये. जें जें महत्त्वाचें असेल तें तें टिपून ठेवावें, ह्याचा उपयोग प्रसंगीं फारच उत्तम होतो—नव्हें हें खऱ्या उत्कर्षाचें लक्षण आहे.

( ४ ) रोजनिशी सतत लिहीत गेल्यास चुकांचा उमज पडून मनुष्य आपल्या कामांत वाकबगार होतो.

( ५ ) फार मन मोकळें करून बोलण्यानें आपण आपल्या स्वातंत्र्यास आंचवतों; ही संवय घातुक आहे.

( ६ ) नशीब असें कांहीं नाहीं.

( ७ ) ह्या कर्मांच्या बाजारांत स्वतःच्या गोष्टींना नेहमीं उठाव देण्यास शिका

वाचकहो हा लेख कल्पनेच्या बाहेर लांबला म्हणून आतां लेखणी आवरतों. तथापि आपणास हात जोडून एवढीच विनंति करितों कीं, आतांचा शैथिल्यांत घालविण्याचा बिलकूल काळ नाहीं. फ्रँकसाहेबाचे चरित्रापासून कितीतरी गोष्टी शिकण्यासारख्या आहेत; त्या शिकून आपला अभ्युदय करून घ्या. हें मला यथामती दाखवावयाचें होतें तें मीं केलें घेणाऱ्यानें ह्या चरित्रापासून थोडें जरी घेऊन आपला जीवितक्रम सुधारला तर मी माझ्या लेखाचें सार्थक झालें असें समजेन.

# सूडाचा सूड.

पुष्कळ दिवसांपूर्वीं अरबस्थानांत लहान मोठीं राज्यें होतीं. त्यांपैकीं एका राज्याचें नांव हीर असें होतें. तें मोठें राज्य असून अरबस्थानाच्या पूर्वेस होतें. तेथील राजाचें नांव जजीमा असें होतें आपणांस स्थानाच्या उत्तरेस दुसरें एक ह्याहि... होतें. त्या राजाचें नांव ... आहेत. आणि विशे- दोघांचें युद्ध झालें ... दृष्टीनें त्यांतून बरेंच घेण्या- होऊन तो ... आतां दिसून येईल. कोजागिरीचा या...तिहास कोणी लिहून काढील तर तो हवाच राज... पण माझ्या अल्प वाचनानें व सांगीव व ...िव गोष्टी ज्या परंपरेनें म्हणून श्रुत झाल्या आहेत ...या संक्षेपानें देण्याचें आज योजीत आहें.

एकदां सरस्वती आणि लक्ष्मी ह्यांचा विनोदपूर्ण पण कडाक्याचा वादविवाद सुरू असतांना सरस्वतीनें म्ह० विद्यादेवीनें आपल्या भगिनीस म्ह० लक्ष्मीस संपत्तीस विचारिलें कीं, तूं माझ्या उपासकांचा छळ करित्येस हें तुझ्या शालिनत्वाला शोभत नाहीं. तुम्ही आम्ही जर बहिणी बहिणी तर तुमचीं आमचीं भांडणें विकोपास न गेलेलीं बरीं. ह्यावर लक्ष्मीनें उत्तर केलें कीं, नाहीं कोण म्हणेल, पण ह्या त्रिगुणात्मक जगांत कित्येक प्रसंगीं साध्या गोष्टीला देखील बरेंच महत्त्व चढत असून तुमच्या आमच्यांत लावालावीं करणाऱ्या भक्तांमध्यें निष्कारण वाद माजून राहिला आहे. ह्यावर सरस्वती म्हणाली, खरें भांडण तुमच्या आमच्या भक्तांत नसून तुझ्या मात्स- जागा नव्हती. शिवाय दोघांचा विवाह पूर्ण मतै-क्यानें ठरला होता. जब्बानें ...नक सकटें आणून त्यास महालांत ... ...मदत करत्येस, त्याचा प्रपंच सुखाचा चालविण्यास तुझी जशी मदत व्हावी तशी कांहीं होत नाहीं. हें काय तुझें सौजन्य झालें ? चालत्या गाड्यास खीळ घालणें हेंच तुझ्या शालिनतेचें लक्षण असेल तर माझें कांहीं म्हणणें नाहीं. असो; तुला एवढेंच सुचवायचें आहे कीं, माझ्या भक्तांस फार कसोटीस न लावितां त्यांचा योगक्षेम तूं चालवावास.

ह्यावर लक्ष्मीदेवीनें म्ह० संपत्तीनें मोठ्या तोऱ्यानें उत्तर दिलें कीं, तुझे खरे उपासक आधीं थोडे; बरें, जे खरोखरी तसें असतात, त्यांस मीं अव्हेरिलें आहे असें मुळींच नाहीं. अमूक एक जीव—मग तो स्त्री असो वा पुरुष असो—शिकण्याच्या इतक्या इयत्तेपर्यंत जाऊन तो विद्या शिकला आणि त्याचा चरितार्थ चालला नाहीं असें कधीं तरी झालें आहे काय ? तो जितक्या प्रतीची विद्या शिकेल तितक्या प्रतीची नौकरी अथवा तितक्या दर्जाचा धंदा चालविण्याची त्याची शहामत असणार हें उघड आहे. मूळांत विहिरींतच पाणी नाहीं तर मग पोहऱ्यांत तें कोठून येणार ? मानमान्यता मिळवायला व उच्च प्रतीचा धंदा चालवायाला तुझी आराधनाहि तशा उच्च प्रतीचीच केली पाहिजे ना ? माझा भक्त अक्षरशून्य असू शकेल. मी नाहीं कोठें म्हणतें ? आणि म्हणूनच कीं काय

त्यानें त्याचें नाक कापण्याची व गांवांतून धिंड काढण्याची शिक्षा त्याला दिली.

पुढें हा म्हातारा तेथून निघाला व जब्बाच्या दरबारांत येऊन पोहोंचला. जब्बाला या म्हाताऱ्याचें अंग त्यांत नव्हतें ही गोष्ट ठाऊक होती. तिनें त्याला आपल्या दरबारीं ठेऊन घेतला. कुसैर मोठा हुशार असल्यामुळें त्यांनीं हळूंहळूं आपला पगडा तिच्यावर बसवला. तिनें विचार केला कीं, शत्रूचा माणूस फुटून आपल्याकडे आला आहे. तेव्हां याची बढती

२।२ ५०० ... पल्याला शत्रूचीं बिंगें अधिक कळतील

चा माल उधारीवर देऊन ... जब्बाच्या विश्वासास

म्हणावें गुणग्राहकता. असो. फारच थोड्या काळा

ह्या दोन्ही खंडांत वुलवर्थ कंपनीच्या नांवाचीं ६।७ हजार दुकानें निघालीं व ह्या सर्वांच्या भांडवलाचा आंकडा ७।८ कोटींवर गेला. आपल्या अगणीत संपत्तीचा विनियोग तरी कसा करावा, हें धन ठेवावें तरी कोठें हीच फ्रँक साहेबास या वेळीं विवंचना पडली होती कीं काय हें एक देव जाणें; आणि म्हणूनच त्यांनीं आपल्या जन्मभूमिजवळ १३२ पुरुष उंचीची, जगांत इतर इमारतींस लाजविणारी अशी नयन मनोहर भव्य इमारत उठवून दिली. ह्या इमारतीला ४॥ कोट रु. खर्च आला असें तज्ज्ञ सांगतात.

एकदां एका बातमीदारानें फ्रँकसाहेबास विचारलें कीं, आपल्या यशाची गुरुकिल्ली कोणती हें सांगाल काय? त्यास आमच्या चरित्रनायकानें खालील उत्तरें दिलीं:—

तेथें उत्कृष्ट योद्धे होते, त्यांना जमा केले व प्रत्येकाला एकेका पेटींत घालून त्या पेट्या उंटावर लादल्या. अशा प्रकारें गुप्तपणानें ते सारे शत्रूच्या राजधानीकडे निघाले.

कुसैरनें दुरूनच आपला क्षेम समाचार राणीला कळविला व म्हटलें कीं, यावेळीं माझ्या बरोबर एक हजार उंट आहेत. त्या उंटांसह मी लवकर येतों. जब्बाला ही हकीगत ऐकून मोठा आनंद झाला व ती उंच बुरुजावर चढून तो येत असलेला तांडा पहावयास गेली. तिनें या काफिल्याला अडथळा करूं नये अशा प्रकारची आज्ञा तावडतोब पाठविली.

... आपली स्थिति एका क्षणानें काय होणार आहे

आपण अ... ... नव्हती. जेव्हां हा काफला किल्या-

घातुक आहे.

... पेट्यांतील योद्धे भराभर

( ६ ) नशीब असें काहा ...

... जाळपोळ करीत

( ७ ) ह्या कर्मांच्या बाजा ...

... क बेसावध

गोष्टींना नेहमीं उठाव देण्यास शिका.

... येईना.

वाचकहो हा लेख कल्पनेच्या ...

लांबला म्हणून आतां लेखणी आवरतों. तथापि

आपणास हात जोडून एवढीच विनंती

करितों कीं, आतांचा शैथिल्यांत घालविण्याचा बिलकूल काळ नाहीं. फ्रँकसाहेबाचे चरित्रापासून किती तरी गोष्टी शिकण्यासारख्या आहेत; त्या शिकून आपला अभ्युदय करून घ्या. हें मला यथामती दाखवावयाचें होतें तें मीं केलें घेणाऱ्यानें ह्या चरित्रापासून थोडें जरी घेऊन आपला जीवितक्रम सुधारला तर मी माझ्या लेखाचें सार्थक झालें असें समजेन.

# कोजागिरी अथवा को जागर्ति ?

लेः—( वि. य. मो. )

' को जागर्ति ' ह्या दोन संस्कृत शब्दांपासून कोजागिरी हा शब्द रूढ झाला आहे, असें व्याकरणकार म्हणतात. को=कोण, जागृती=जागृतावस्थेंत आहे, जागा आहे, ह्या अर्थपूर्ण असलेल्या वाक्याची मांडणी कशी झाली असावी हा एक मोठा मनोरंजक इतिहास आहे. त्यापासून आपणांस बऱ्याच गोष्टी शिकण्यासारख्या आहेत. आणि विशेषतः तरुणांना मुमुक्ष ह्या दृष्टीनें त्यांतून बरेंच घेण्यासारखें आहे हें आतां दिसून येईल. कोजागिरीचा साधार इतिहास कोणी लिहून काढील तर तो हवाच आहे, पण माझ्या अल्प वाचनानें व सांगीव व ऐकीव गोष्टी ज्या परंपरेनें म्हणून श्रुत झाल्या आहेत त्या संक्षेपानें देण्याचें आज योजीत आहें.

एकदां सरस्वती आणि लक्ष्मी ह्यांचा विनोदपूर्ण पण कडाक्याचा वादविवाद सुरू असतांना सरस्वतीनें म्ह० विद्यादेवीनें आपल्या भगिनीस म्ह० लक्ष्मीस संपत्तीस विचारिलें कीं, तूं माझ्या उपासकांचा छळ करित्येस हें तुझ्या शालिनत्वाला शोभत नाहीं. तुम्ही आम्ही जर बहिणी बहिणी तर तुमचीं आमचीं भांडणें विकोपास न गेलेलीं बरीं. ह्यावर लक्ष्मीनें उत्तर केलें कीं, नाहीं कोण म्हणेल, पण ह्या त्रिगुणात्मक जगांत कित्येक प्रसंगीं साध्या गोष्टीला देखील बरेंच महत्त्व चढत असून तुमच्या आमच्यांत लावालावी करणाऱ्या भक्तांमध्यें निष्कारण वाद माजून राहिला आहे. ह्यावर सरस्वती म्हणाली. खरें भांडण तुमच्या आमच्या भक्तांत नसून तुझ्या मात्सर्यां आहे, पहा. माझा उपासक थोडें कळूं लागल्यापासून विद्या शीक, शीक शिकतो, हाडाचीं काडें व रक्ताचें पाणी करून आपलें ध्येय गांठावयास जातो तों, मध्येंच तूं त्याच्यावर अनेक संकटें आणून त्यास नाउमेद करत्येस, त्याचा प्रपंच सुखाचा चालविण्यास तुझी जशी मदत व्हावी तशी कांहीं होत नाहीं. हें काय तुझें सौजन्य झालें ? चालत्या गाड्यास खीळ घालणें हेंच तुझ्या शालिनतेचें लक्षण असेल तर माझें कांहीं म्हणणें नाहीं. असो; तुला एवढेंच सुचवायचें आहे कीं, माझ्या भक्तांस फार कसोटीस न लावितां त्यांचा योगक्षेम तूं चालवावास.

ह्यावर लक्ष्मीदेवीनें म्ह० संपत्तीनें मोठ्या तोऱ्यानें उत्तर दिलें कीं, तुझे खरे उपासक आधीं थोडे; बरें, जे खरोखरी तसें असतात, त्यांस मीं अव्हेरिलें आहे असें मुळींच नाहीं. अमूक एक जीव–मग तो स्त्री असो वा पुरुष असो–शिकण्याच्या इतक्या इयत्तेपर्यंत जाऊन तो विद्या शिकला आणि त्याचा चरितार्थ चालला नाहीं असें कधीं तरी झालें आहे काय ? तो जितक्या प्रतीची विद्या शिकेल तितक्या प्रतीची नौकरी अथवा तितक्या दर्जाचा धंदा चालविण्याची त्याची शहामत असणार हें उघड आहे. मूळांत विहिरींतच पाणी नाहीं तर मग पोहऱ्यांत तें कोठून येणार ? मानमान्यता मिळवायला व उच्च प्रतीचा धंदा चालवायाला तुझी आराधनाहि तशा उच्च प्रतीचीच केली पाहिजे ना ? माझा भक्त अक्षरशून्य असूं शकेल. मी नाहीं कोठें म्हणतें ? आणि म्हणूनच कीं काय

प्रसंगोपात् त्याला तुझ्या भक्तापुढें नमावेंहि लागतें. पण मूळांत तुझ्या भक्ताची स्थिती असते दांभिक आणि धरसोडीची. बरें, जो खराखुरा भक्त असतो तो निस्पृहच राहतो. एतावता काय कीं, दांभिक म्हणून जो असतो त्यांचा 'एक धड ना माराभर चिंध्या' असा प्रकार होऊन त्यास शाश्वती अशी कोठेंच राहत नाहीं. आणि जो पाणिदार निस्पृह असतो त्याला कशाचीच जरूरी नसते. पण त्याची दिगंत कीर्ती झालेली तूंच पाहतेस ना ? हें बक्षीस त्यास काय कमी झालें ! तूं जसें मला शेवटचें म्हणून सुचविलेंस तसेंच मीहि तुला सांगतें कीं, स्थळ व वेळ पाहून तुझे भक्त चालणार नाहींत तर त्यांची ह्या भवचक्रांत अशीच तिरपीट उडून जाईल. तुझ्या भक्तांना यदाकदाचित् माहीत नसेल म्हणूनच बजावून सांगतें कीं, तुझा निस्सीम भक्त कोण आहे; कोण किती वेळ जागरण करून अभ्यास करतो, जीवमात्रांना ज्या उत्तमोत्तम जागृतावस्थेची जरूरी असते, त्या अवस्थेंतून तो खरोखरी जात आहे कीं नाहीं हें पहाण्याकरितांच मी रात्रंदिवस त्यांच्या द्वारीं हिंडत असतें. आणि तो माझा फिरण्याचा काल नेहमींचा जरी असला तरी आश्विन मासाच्या शुद्धपक्षांत विशेषें करून असतो, हें तुझ्या भक्तांनीं जरूर ध्यानांत ठेवावें.

असो, ज्याला जागृतावस्थेंत राहून विद्या संपादन करावयाची नसेल, त्याला माझ्या धनाची जोड मी काय म्हणून द्यावी ? द्यावें तसें घ्यावें, पेरावें तसें उगवावें हा न्याय उघडच आहे.

ह्या संवादावरून चाणाक्ष वाचकांच्या लक्षांत येईलच कीं आपल्या आर्यावर्तांत ऋतुपरत्वें अनेक सणांची मांडणी असून तिची योजना मोठ्या कुशल बुद्धीनें केलेली दिसते. धर्मशास्त्राचा वैद्यशास्त्राशीं मेळ घातला असून त्या त्या ऋतूंतून इच्छित कार्यें घडून यावीं म्हणून ही सर्व रचना आहे, आणि ह्या सर्वांच्या मूळाशीं "शरीरमाद्यं खलु धर्म साधनं" अथवा 'शरीरसौंदर्य तर मनःसौंदर्य" ह्या तत्त्वा पाया आहे ! ह्यांतील आपण रहस्य समजून घ्यावें, दुसरें काय ? सबंध वर्षांतील ऋतूंचें अवलोकन केलें असतां हें चट्कन ध्यानांत येण्याजोगें आहे कीं आश्विन मासाच्या शुद्धपक्षांत आपत्तीनें वेढलेला वर्षाऋतु जाऊन सुबत्तेस प्रारंभ झालेल्या शरदृऋतूंचें आगमन होत असतें. नवान्न गृहणास ह्याच वेळीं सुरुवात झालेली असते. विजयादशमीच्या सुमुहूर्तावर मांगलिक शृंगारवीरादी कृत्यास ह्याच वेळीं प्रारंभ झालेला असतो. चतुष्पादांना मुबलक चारापाणी मिळण्याची निसर्गानें ह्याच वेळीं तरतूद करून ठेवलेली असते, तेव्हां हा काल शरीरास व मनास किती उत्तेजक असेल हें आतां नव्यानें कां सांगावयास पाहिजे ? ह्या सुसमयास जीवांना जागरुकता प्राप्त व्हावी म्हणून आपल्या ऋषीवर्यांनीं 'को जागर्ति' च्या अथवा 'कोजागिरीच्या' सणाची योजना केलेली दिसते. ह्या सणाचा धागादोरा योगवाशिष्ठाच्या काळापासून पूर्वेतिहास लावून देत आहे. प्रभु रामचंद्र अनेक ऋषींना पाचारण करून ह्या शरदृऋतूंत विशेषतः आश्विन शुद्ध १५ मेच्या सुमारास "कोजागर्ति" च्या सणास आरंभ करून अनेक विषयावर चर्चा करवीत असत. योगवाशिष्ठासारखा सुआचार प्रवर्तक ग्रंथ वाचला असतांना हें सहजीं ध्यानांत येण्यासारखें आहे. एकट्या महाराष्ट्रांतच नव्हे तर बंगदेशांत ( बंगाल्यांत ) सरस्वतीच्या दुसऱ्या नामाभिधानाखालीं संज्ञिल्या जाणाऱ्या माता कालीकेचें पूजन सतत १५ दिवस ह्या कालांत चाललेलें असतें ह्यावरून या सणाच्या मार्मिक योजनेची सर्वांना साक्ष पटण्याजोगी आहे.

शेवटीं, शालापत्रकाच्या वाचकांस म्ह० विशेषतः शिक्षकवर्गास विनयपूर्वक हेंच सुचवावेसें वाटतें कीं, ह्या सणाचें महत्त्व जितक्या मार्मिकतेनें त्यांना आपल्या, शिष्यवृंदापुढें मांडता येईल तितक्या मार्मिकतेनें त्यांनीं मांडावें. प्रस्तुत काल मूळांत बुद्धिमान्, पण जड झालेल्या जीवांना जागृति द्यावयाचा आहे, ती जितकी ज्यास्त देता येईल तितकी द्यावी हें श्रेयस्कर आहे. सध्यां वाण दुसरी कशाची नसून योजकांची आहे.

---

## दसऱ्याची अल्पभेट

### असहकारितेचा दसरा.

कवी:—रामकृष्ण नारायण फडणीस—जळगांव.

( चाल:—असार जीवित केवळ माया० )

हृदयमंदिरीं घटस्थापना स्वराज्य देवीची करुनी ॥
असहकार हा पाठ सप्तशिति करुं या मूर्ति धरुनि मनीं ॥
राष्ट्रिय शिक्षण स्वदेशि चळवळ बहिष्कार परदेशिवरीं ॥
देशभक्तिची वाट आंखिली साधुवरें ती धरूं बरी ॥
पवित्रहृदयें स्वार्थत्यागतप आचरूं यातें उज्वलसें ॥
कलिकाळाला सारिल मागें तेज मुखीचें सत्यच हें ॥
स्वाभिमान उद्योगप्रियता, धैर्य शौर्यधी श्रीसुमनें ॥
वासिक चारू सद्गुण सारे करुं एकत्रित संघ गुणें ॥
सुपुष्पमाला नव आभरणें वाहूं मोदें भगवतिला ॥
नटवूं सजवूं देवी आपुली, लावुनिया स्वातंत्र्य-टिळा ॥
दडपशाहिची सीमा झाली, उल्लंघूं शुभ मुहूर्तिं या ॥
स्वराज्यदेवी-पूजन मोदें करूं सर्व अजि मिळूनिया ॥
सुवर्ण-भूमी नांव सार्थ किती स्वाराज्यीं मग दावुं जगीं ॥
सोनें देवूं, सोनें घेवूं, येतां ऐशीं प्रेम सुगी ॥

---

## आंकड्यांची मौज.

१२३४५६७८९× ९+१०=१११११११११
१२३४५६७८९×१८+२०=२२२२२२२२२२
१२३४५६७८९×२७+३०=३३३३३३३३३३
१२३४५६७८९×३६+४०=४४४४४४४४४४
१२३४५६७८९×४५+५०=५५५५५५५५५५
१२३४५६७८९×५४+६०=६६६६६६६६६६
१२३४५६७८९×६३+७०=७७७७७७७७७७
१२३४५६७८९×७२+८०=८८८८८८८८८८
१२३४५६७८९×८१+९०=९९९९९९९९९९

---

# स्वप्नें खरीं ठरतात काय ?

एक गिरणींतील मजूर एंजीनाच्या धक्क्यानें मरण पावला. ही गोष्ट त्याच्या एका दूर राहणाऱ्या मित्रानें इतरांना सांगितली. तो म्हणाला, हा माणूस मरणार आहे असें मला स्वप्न पडलें होतें. हें स्वप्न खरें आहे किंवा नाहीं हें पाहण्याकरितां त्याच्या बरोबर इतर मंडळी निघाली व गिरणींत येऊन पहातात तों हा माणूस खरोखरच मेला आहे असें त्यांना आढळलें.

एक बाई आपल्या घराचा मालक रात्रीं आला नाहीं म्हणून अत्यंत काळजींत होती, इतक्यांत तिचा मुलगा पुढें येऊन म्हणतो, " आई काल माझ्या स्वप्नांत आपल्या घरचा मालक मेला असें दिसलें " पुढें चौकशी करतां ही गोष्ट खरी ठरली.

याहिपेक्षां दुसरें एक मोठ्या गमतीचें स्वप्न आहे.

एका बाईला नवऱ्याचा खून केला म्हणून कैदेंत ठेवलें होतें. तिच्या गुन्ह्याची चौकशी व्हावयाची होती. मध्यंतरीं तिला एक स्वप्न पडलें व त्या स्वप्नांत, आपल्या नवऱ्याला कोणा माणसानें मारलें असें तिला दिसलें. त्याबरोबर ती न्यायाधीशाकडे गेली, व त्या मनुष्याचें नांव सांगून या मनुष्यानेंच माझ्या नवऱ्याला ठार मारलें असें म्हणू लागली. त्या न्यायाधिशावर या सांगण्याचा बराच परिणाम होऊन त्यांनीं तात्काळ त्या मनुष्याची चौकशी करण्यास सांगितलें.

पुढें तो माणूस पकडून आणला गेला व त्यानें सर्व अपराध कबूल केला अर्थात् त्या बाईची सुटका झाली.

एका मुलाच्या स्वप्नांत सारखे चार नंबर येत. त्याला याचा अर्थ कळेना. परंतु आपण लॉटरींत पैसे भरावेत अशी त्याला बुद्धि सुचली, व त्यानें पै पैसा करून कांहीं रुपये जमविले व लॉटरींत घातले. अर्थातच त्यानें स्वप्नांत दिसणाऱ्या नंबराचीं तिकीटें विकत घेतलीं. जेव्हां तिकीटाचा निकाल लागला तेव्हां या चार नंबरांना बक्षीसें मिळून त्या मुलाला तीन लाख रुपये मिळाले.

दोन मुलें—भाऊ आणि बहिण—रात्रीच्या वेळीं कोठेंशीं नाहींशीं झालीं. त्यांच्याकरितां सारें जंगल शोध शोध शोधण्यांत आलें पण मुलें आढळलीं नाहींत. त्या शोधणारांपैकीं, एकाला स्वप्न पडलें कीं, तीं मुलें जंगलांतील एका खड्ड्यांत अडकून पडलीं आहेत. त्याबरोबर तो तेथें गेला व त्याला त्या खड्ड्यावर पाचोळा लाकडें वगैरे पडलेलीं दिसलीं. त्यानें तीं दूर दूर सारलीं. तेव्हां तेथें मुलें गाढ झोंपलेलीं त्याला दिसून आलीं. मुलें थंडीनें अगदीं काकडून गेलीं होतीं. पण लवकरच त्यांना उबदार पांघरुणें घालण्यांत आलीं.

अशाप्रकारें कांहीं कांहीं स्वप्नांचे प्रकार आढळून येतात, पण त्यांवरून स्वप्नें खरीं अगर खोटीं हें निश्चित सांगता येत नाहीं.

# गिर्यारोहण.

पाश्चात्य देशांतील लोक मोठे धाडसी असतात व दरवर्षीं आल्प्ससारख्या पर्वतावर चढण्याकरितां लोकांच्या झुंडीच्या झुंडी जात असतात. आपला जीव धोक्यांत घालून यापासून काय प्राप्ती होते असें कांहीं जण विचारतील. परंतु पर्वतावर चढल्यावर



१ एका कड्यावरून दुसऱ्या कड्यावर उडी.

२ कठीण सुळक्यावर कसें चढतात.

जो एक प्रकारचा आनंद होतो, तो अवर्णनीय असल्यामुळें माणसाची सहाजिक प्रवृत्ती त्याकडे होत असते.

वर चढण्याचे प्रकार निरनिराळे आहेत. पूर्वकालीन लोक याकडे फारसें लक्ष घालीत नसत. वर चढणें म्हणजे मृत्युमुखीं पडणें अशी तत्कालीन लोकांची समजूत असे. गेल्या शतकांत वर चढण्याकडे माणसाची प्रवृत्ती होऊं लागली, एखाद्या पर्वतावर आपण प्रथम पाऊल टाकलें ही महत्त्वाकांक्षा कांहीं लोकांना असल्यामुळें जीवाची पर्वा न करतां दोऱ्या लावून हे लोक चढत. आपल्याकडे दोऱ्या लावून चढण्याची पद्धत पूर्वापार होती. वरतीं एखादी घोरपड लावावयाची व तिच्या आधारानें दोराला धरून वर जावयाचें. हा मार्ग इतिहासाची माहिती असणाऱ्यांना माहीत आहे. तानाजीनें तर आपलें नांव या बाबतींत अजरामर करून ठेवलें आहे. आपण पाश्चात्त्यांपेक्षां अधिक धाडशी व डोंगर चढण्यांत अधिक लवकर सुरवात केली असें इतिहासावरून दिसतें असो.

जे पर्वत दुर्गमनीय त्यावर अगोदर जावयाचें अशी चढाओढ या लोकांत असे. शास्त्रीय शोधाकरितां व प्रवासाच्या हौसेकरितांहि बरेच लोक वर जात. गेल्या कांहीं वर्षांत डोंगर चढणें म्हणजे एक खेळच झाला आहे. वर गेल्यानें कांहीं संकट प्राप्त होतें अगर जीव जातो अशा ज्या कल्पना आहेत, त्या या कसलेल्या लोकांनीं खोट्या ठरविल्या आहेत. ज्याला वर जाण्याची कला पूर्णपणें अवगत आहे तो कधींहि दगावणार नाहीं असें ते म्हणतात. पर्वत चढणें म्हणजे एक शास्त्र झालें आहे. अवघड चढ चढून जाता यावें म्हणून शिक्षण देणाऱ्या कांहीं शाळाहि निघाल्या आहेत.

वर चढण्यास मुख्यत: दोन प्रकारचीं संकटें येतात.

पहिलें संकट म्हणजे बर्फ व दुसरें संकट म्हणजे कडा हें होय. बर्फ पडला असतां त्यांतून कसें निसटावें हें शिक्षणानें समजतें; पण कड्याचें संकट टाळण्यास शिक्षण उपयोगीं पडत नाहीं. त्याला उपजतच शक्ती लागते. कड्यांवरून चढून जाणें म्हणजे प्रत्यक्ष मृत्यूशीं झगडणें होय. या झगड्यांत मनुष्याला आपली सारी शक्ती एकवटावी लागते.प्रथम कडा चांगला कोणता वाईट कोणता हें आपल्या बुद्धीनें ठरवावें लागतें. या कड्यांतील खडक ठिसूळ आहे किंवा काय अथवा त्यांत पाय द्यायला जागा आहे किंवा नाहीं हें स्वत:च पहावयाचें असतें. पुढें आलेला खडक आपलें वजन तोलूं शकेल किंवा कसें हें शास्त्र शिकवूं शकत नाहीं. वर चढणारा माणूस पहिलवान असावा लागतो. त्याला लोंबकळत यावें लागतें. व वर अंग सरकवतां यावें लागतें. उंच डोंगरावर गेल्यावर अमुक खडक पडेल कीं काय याची परीक्षा करावी लागते. डोंगराचे सारे कडे कमी अधिक दिवसांत कोसळणारे असतात. सृष्टीनियमाप्रमाणें त्याचे तुकडे तुकडे व्हावयाचे असतात. आणि ही क्रिया सतत चालू असते. मोठाले पर्वत चढावयाचे असतात तेव्हां या ज्ञानाची अवश्यक्ता असते.

चढण्याला कोणता बर्फ चांगला कोणता वाईट वगैरेंची माहिती प्रत्यक्ष प्रयोगानें देण्यांत येते. कांहीं बर्फाचे थर अगदीं फसविणारे असतात. त्यावर विसंबून राहून चालत नाहीं. पुढें आलेला बर्फाचा कडा अगदीं फसविणारा असतो. नुकत्याच पडलेल्या बर्फावरून कधींच चढू नये.

मोठाले पर्वत सर करावयाचे असले म्हणजे त्याची तयारी अगाऊच करून ठेवतात. एकदां आल्पस पर्वताचा एक कडा चढण्यास अगदीं अशक्य असा मानला गेला होता. प्रसिद्ध पर्वत चढणारा व्हीपर यानें या कड्यावर सर्व वर्षभर बर्फ असतें असें पाहिलें. बर्फ कमींत कमी ४५ अंशाच्या चढणीवर राहू शकतें असा नियम आहे, त्यापेक्षां कमी अंशाचा कडा असेल तर घसरून पडतें. तेव्हां व्हीपरनें सुळक्यासारखा असलेला कडा चढतां येईल असें ठरविलें. त्यानें त्या पर्वताच्या भूगर्भाचें अध्ययन



२ आल्प्समधील चढण्यास कठीण असलेलें टोंक

केलें व चढण्यास सुरवात केली. व अनेक वेळां त्याला माघार घ्यावी लागली; पण अखेरीस त्यांनीं तें शिखर गांठलें.


स्वित्झरलँडचे लोक या कामांत फार कसलेले

आहेत. अमेरिकेंत दुर्लंध्य असे ५० कडे होते. पण त्यांनीं स्वित्झर्लंडहून लोक आणवून त्यांतील बहुतेक सर केले.

वर चढणाऱ्या मंडळींबरोबर दोर असतात व त्या दोरांच्या सहाय्यानें ती वर जातात. चढण्यापेक्षां उतरणें फार कठीण असतें. एखादें पाऊल चुकलें अगर एवढीशी चूक झाली कीं, मृत्यु यावयाचा अशी स्थिती असते. वरच्या प्रदेशावर गेलें म्हणजे वादळ. वारा, वगैरेंचा सारखा मारा होत असतो. पर्वतावर स्वारी करून येणें म्हणजे प्रत्यक्ष मृत्यूशीं झगडून येण्यासारखेंच असतें. अद्याप हिमालयपर्वत या पर्वतावर आरोहण करणाऱ्यांना सर करावयाचा आहे. तेथें किती त्रास व अपघात होतात व एकंदर खटाटोपाचा निकाल काय लागतो हें आपणांस दिसेल.

## गर्वाचा परिणाम.


एक घोडा व गाढव एका रस्त्यावरून चाललें होतें. घोड्याच्या पाठीवर कांहीं नव्हतें; पण बिचारा गाढव ओझ्यानें अगदीं लादला होता.




“ दादा ! ” गाढव म्हणतें “ मला थोडी मदत करतोस कां ? ”



“ हा मूर्खा ! तुला आपणांमधील फरक कळत नाहीं ? तुझा उपयोग नुसतीं ओझीं वहाण्याकरितांच



आहे; पण मला राजा विकत घेईल व थाटानें मजवर बसेल. छे ! मी असें तुजसारखीं गलिच्छ ओझीं-



वाहण्याकरितां थोडाच जन्मलों आहें. ” असें घोडा म्हणाला. थोडेसें पुढें गेल्यावर गाढवानें कांहीं विचार

कुपन

सर्वांकरितां

आक्टोबर १९२३.

कुपन

मुलांकरितां

ऑक्टोबर १९२३.

केला व ओरडून म्हटलें " बाबा ज्याअर्थी तूं मला मदत करीत नाहींस त्याअर्थी मी आतां मरतों. " असें म्हणून तें गाढव रस्त्यावर पडलें. हें पाहून त्या मालकांनीं मोठा आक्रोश केला व शिव्या दिल्या. नंतर त्यानें तें सारें ओझें घोड्याच्या पाठीवर टाकलें व गाढवाला चालतां येईना म्हणून त्यालाहि त्याच्या पाठीवर टाकलें. अशाप्रकारें गाढवाची चैन होऊन घोड्याचा गर्व उतरला.

---

## शालापत्रकाची चढाओढ.

### मागील कोड्याचीं उत्तरें.

सर्वांकरितां.

१ घड्याळांत ५। वाजले आहेत, पण धाकटा काटा ५ वरच आहे. मोठा काटा १२ मिनीटें चालला म्हणजे धाकटा काटा १ मिनीट चालतो; याप्रमाणें तो १। मिनीट पुढें जावयास पाहिजे पण चित्रांत तो ५ वरच दाखविला आहे.

२ ह्या चित्रांतील चूक कळण्यास तराजूचें उदाहरण घेऊं. ज्या पारड्यांत जास्त सामान असतें तें पारडें खालीं जातें. या नियमानें जहाजाचा वर उचललेला भाग वाऱ्याच्या जोरामुळें खालीं जावयास पाहिजे पण तो वर आहे.

**मुलांकरितां.**

अति शहाणा त्याचा **बैल** रिकामा.
**बैल** गेला झोंपा केला.
**बैल** गाभणा नववा महिना, वगैरे.
भरल्या गाड्याला **सूप** जड नाहीं.
**सूप** फडफडणें, वगैरे.
हेकड कुणबी **दुणा** रावे.
उभा **इंद्र** करणे, इंद्रसभा भरणें.
समुद्रांत **सुई** शोधणें
नाकावांचून **सुई** नव्हे, विद्येवांचून माणूस नव्हे.

**सर्वांकरितां.**

श्रीधर गोविंद देवळे. ( १ )
पांडुरंग रामचंद्र वांगीकर. ( १ )
शांताराम पुरुषोत्तम पाठारे ( १ )

**बालवाचक.**

**१ पांडुरंग रामचंद्र वांगीकर**
२ रामचंद्र यशवंत वांगीकर ( २ )
३ निलकंठ कृष्ण शहाणे ( ३ )
४ यशवंत नाथाजी तांबवे ( ३ )
५ रामकृष्ण नारायण साळी ( ३ )
**६ वासुदेव त्रिंबक केणेकर** ( ४ )
७ बाळष्ण अनंत बाळे ( १ )
**८ निळकंठ सदाशीव देव**

नंबर १, ६, व ८ यांना अनुक्रमें:—
१ शीलपर भूषण.
२ चिमुकलें रामायण.
३ लक्ष्मीपूजन
हीं पुस्तकें बक्षीस दिलीं आहेत.

## नवीं कोडीं.

### सर्वांकरितां.

खालीं तीन नांवें दिलीं आहेत; त्यांतील स्वर गाळले आहेत. तेव्हां तीं नांवें कोणतीं हें ओळखा ! त्यांत आडनांवेंहि आहेत.

उदाहरण

क क मरल

उत्तर:— कमलाकर.

१ श व व व स र.

२ व न द र श.

३ त र ज क न ग.

### मुलांकरितां.

खालील वाक्यें शिक्षकांनीं फळ्यावर लिहिलीं व म्हटलें यांत जनावरांचीं नांवें आहेत; तेव्हां सारीं मुलें गोंधळून गेलीं. त्यांना त्याचीं उत्तरें देतां येईना. तुम्हाला देतां येतात कां पहा.

उदाहरणः—

या कुरणाला गडी त्रासला. यांत कुत्रा असें निघतें.

वाक्यें.

१ सासवडचा गुळ पिंवळा असतो.

२ तिच्यावर ही मोठीच आपत्ती कोसळली.

३ सदू काणा असला तरी साळसूद आहे.

टीपः—कंसांतील आंकडा बरोबर उत्तरें दाखवितो.


## लहान मुलांकरितां उपयुक्त अशीं पुस्तकें.

## नवी आवृत्ति ] सचित्र अक्षरबोध. [ नवी आवृत्ति

या पुस्तकांत 'अ' पासून 'ज्ञ' पर्यंत स्वर आणि व्यंजनें हीं सर्व निरनिराळ्या भपकेदार रंगांत व तें अक्षर नांवाच्या प्रथम अक्षरानें दर्शविणाऱ्या चित्रांसह दाखविलेलीं असून १ पासून १० पर्यंत अंकहि वरील पद्धतीनें दाखविलेले आहेत. पुस्तकाचा साईज क्राऊन चतुर्थांशाइतका मोठा ७×९ इंच ठेवला असल्यामुळें अक्षरें व चित्रें फारच सुबक व मोठीं अशीं झालीं आहेत. एकंदर पुस्तक इंग्रजींतील सचित्र [illegible] न ए बी सी डी शिकण्यास उपयोगी अशा पुस्तकाच्या धर्तीवर तयार केलें असल्यामुळें हें पुस्तक लहान मुलांस फारच आवडून त्यावरून तीं आपला धडा सहज शिकतात. किं. ८.

## भाग १ ते ६ ] चिमुकल्या गोष्टी. [ भाग १ तें ६

ह्या गोष्टींत रोज व्यवहारांत घडणाऱ्याच गोष्टी दिलेल्या आहेत, पण त्या इतक्या मोहक, मनोरंजक व मार्मिक लिहिल्या आहेत कीं, त्या गोष्टींतील तत्त्वबोध गोष्टी वाचतां वाचतांच मुलांच्या मनावर सहज ठसला जातो. पुस्तक ब्लॅक टाइपांत सुंदर जाड व ग्लेज कागदावर छापिलेलें असून प्रत्येक गोष्टीचे प्रारंभीं कथानकाचें सुंदर चित्र दिलेलें आहे. एकंदर ह्या गोष्टीचे सहा भाग आहेत. प्रत्येक भागांत दहा गोष्टी सचित्र आहेत. प्रत्येक भागास किं. ४.

**मिळण्याचें ठिकाण**—म्यानेजर—चित्रशाळा प्रेस, पुणें.

मराठी शालापत्रक.

# रंगीत इसाप–नीति.

यांत एकंदर इसापनीतींतील आठ अगदीं सोप्या गोष्टी मोठ्या व जाड टाइपांत दिलेल्या असून प्रत्येक गोष्टीसमोर त्यांतील रहस्य दाखविणारें रंगीत सुंदर चित्र दिलेलें आहे. चित्रें पाहूनच मुलांना गोष्टींतील तात्पर्य कळतें. किं० ८६. ट. ह. ८८६.

# सचित्र इसाप-नीति.

[ उत्तरार्ध. ]

[ नवीन भाषांतर भाग २ रा. ]

वरीलप्रमाणेंच हा दुसरा भाग विक्रीस तयार आहे. याचीं सुमारें २०० पानें आहेत असून यांत २५० गोष्टी आहेत. चित्रांची संख्या १५० पर्यंत आहे. किं. १८१

दोन्ही भाग एके ठिकाणीं बांधलेलें सुंदर पुस्तक किं० रु. २

# विद्यार्थ्यांकरितां नाटिका.

शीलं परं भूषणम्.

ही नाटिका प्रसिद्ध कवि–शिरोमणि नारायण वामन टिळक यांनी फार लहान मुलां करितांच लिहिलेली आहे. यांत शृंगाररस मुळींच नाहीं एवढेंच नव्हे, तर स्त्रीची भूमिका या नाटकांत आणलेलीच नाहीं. शिवाय नाटकाचा विषय नैतिक विचारानें पूर्ण भरलेला असल्यामुळें शाळांतून वार्षिक संमेलनाचे वेळीं मुलांकडून ह्या नाटकाचा प्रयोग करविण्यास तें योग्य आहे. नाटकाचा विषय धनाची योग्यता जास्त किंवा ज्ञानाची योग्यता जास्त; हा आहे. पुस्तकांत चार सुंदर चित्रें कथानकास अनुसरून दिलेलीं आहेत; किं० ८४.

म्यानेजर––चित्रशाळा प्रेस, पुणें.

---

# चिमुकलें भारत व रामायण.

महाभारत व रामायण हे आपले राष्ट्रीय ग्रंथ आहेत. यांत आपला प्राचीन इतिहास असून प्रपंच साधून परमार्थ कसा जोडावा हें उत्तम दाखविलें आहे. व्यावहारिक बोधाच्या ह्या केवळ खाणी आहेत. आबालवृद्ध स्त्री–पुरुषांना या ग्रंथांचें ज्ञान होणें अगत्याचें आहे. प्रौढांकरितां आमचीं लोकप्रिय ‘ भारती युद्ध ’ व ‘ रामचरित्र ’ हीं पुस्तकें आहेत. आतां बारातेरा वर्षांच्या मुलांमुलींकरितां ‘ चिमुकलें भारत ’ व ‘ चिमुकलें रामायण ’ हीं दोन पुस्तकें अनुक्रमें आम्हीं रामकृष्णवाक्सुधेचे प्रसिद्ध लेखक रा. कृष्णाजी गोविंद किनरे व रा. विद्याधर वामन भिडे बी. ए. यांजकडून मुद्दाम लिहविलीं आहेत. पुस्तकाची भाषा फारच मोहक व सोपी आहे. वाचतांवाचतांच मुलांच्या मनावर त्यांतील रहस्य ठसावें म्हणून उपदेशपर वाक्यें जाड टाइपांत घातलीं आहेत, आणि कथानकांच्या अनुरोधानें हाफटोन प्रोसेसनें तयार केलेलीं भारतांत आठ व रामायणांत सात अशीं सुंदर चित्रें घातलीं आहेत. भारताचीं पृष्ठें १७३ व रामायणाचीं पृष्ठें ८२. छपाई बांधणी सुबक. किं० ८६, व रामायण किं० ८४.

म्यानेजर––चित्रशाळा प्रेस, पुणें शहर.

REGISTERED. B. NO. 179.




पुस्तक ३४. नोव्हेंबर सन १९२३. अंक ११.

विषय. पृष्ठ.


| | |
|---|---|
| एक प्रसिद्ध शास्त्रज्ञ. | २०१ |
| गेनु माळी. ( गोष्ट ) | २०४ |
| दीर्घकाल झोंपी गेलेले लोक. | २०७ |
| मला कोण होता येईल ? | २०८ |
| " कारण मिमांसा " अथवा " तो श्रीमंत कसा झाला " | २०९ |
| दीनोद्धार. ( नाटक ) | २१० |
| एका फकिराची मागणी. | २१३ |
| चुटके. | २१४ |
| जगांतील १० मोठे शास्त्रज्ञ. | २१५ |
| शालापत्रकाची चढाओढ. | २१८ |
| शास्त्रीय गंमत. | २१९ |


मुद्रक व प्रकाशक—रा. रा. शंकर नरहर जोशी, चित्रशाळा प्रेस, १०२६ सदाशिव पेठ, पुणें सिटी.

# रंगीत इसाप-नीति.

यांत एकंदर इसापनीतींतील आठ अगदीं सोप्या गोष्टी मोठ्या व जाड टाइपांत दिलेल्या असून प्रत्येक गोष्टीसमोर त्यांतील रहस्य दाखविणारें रंगीत सुंदर चित्र दिलेलें आहे. चित्रें पाहूनच मुलांना गोष्टींतील तात्पर्य कळतें. किं० ८६. ट. ह. ८८६

# सचित्र इसाप-नीति.

[ उत्तरार्ध. ]

[ नवीन भाषांतर भाग २ रा. ]

वरीलप्रमाणेंच हा दुसरा भाग विक्रीस तयार आहे. याचीं सुमारें ३०० पानें असून यांत ३५० गोष्टी आहेत. चित्रांची संख्या १५० पर्यंत आहे. किं. १८१

दोन्ही भाग एके ठिकाणीं बांधलेलें सुंदर पुस्तक किं० रु. २

# विद्यार्थ्यांकरितां नाटिका.

शीलं परं भूषणम्.

ही नाटिका प्रसिद्ध कवि-शिरोमणि नारायण वामन टिळक यांनीं केवळ लहान मुलां करितांच लिहिलेली आहे. यांत शृंगाररस मुळींच नाहीं एवढेंच नव्हे, तर स्त्रीची भूमिका या नाटकांत आणलेलीच नाहीं. शिवाय नाटकाचा विषय नैतिक विचारानें पूर्ण भरलेला असल्यामुळें शाळांतून वार्षिक संमेलनाचे वेळीं मुलांकडून ह्या नाटकाचा प्रयोग करविण्यास तें योग्य आहे. नाटकाचा विषय धनाची योग्यता आहे किंवा ज्ञानाची योग्यता आहे हा आहे. पुस्तकांत चार सुंदर चित्रें कथानकास अनुसरून दिलेलीं आहेत; किं० ८१.

म्यानेजर--चित्रशाळा प्रेस, पुणें.

---

# चिमुकलें भारत व रामायण.

महाभारत व रामायण हे आपले राष्ट्रीय ग्रंथ आहेत. यांत आपला प्राचीन इतिहास असून प्रपंच साधून परमार्थ कसा जोडावा हें उत्तम दाखविलें आहे. व्यावहारिक बोधाच्या ह्या केवळ खाणी आहेत. आबालवृद्ध स्त्री-पुरुषांना या ग्रंथांचें ज्ञान होणें अगत्याचें आहे. प्रौढांकरितां आमचीं लोकप्रिय 'भारती युद्ध' व 'रामचरित्र' हीं पुस्तकें आहेत. आतां बारातेरा वर्षांच्या मुलांमुलींकरितां 'चिमुकलें भारत' व 'चिमुकलें रामायण' हीं दोन पुस्तकें अनुक्रमें आम्हीं रामकृष्णवाक्सुधेचे प्रसिद्ध लेखक रा. कृष्णाजी गोविंद किन्रे व रा. विद्याधर वामन भिडे बी. ए. यांजकडून मुद्दाम लिहविलीं आहेत. पुस्तकाची भाषा फारच मोहक व सोपी आहे. वाचतांवाचतांच मुलांच्या मनावर त्यांतील रहस्य ठसावें म्हणून उपदेशपर वाक्यें जाड टाइपांत घातलीं आहेत, आणि कथानकांच्या अनुरोधानें हाफटोन प्रोसेसनें तयार केलेलीं भारतांत आठ व रामायणांत सात अशीं सुंदर चित्रें घातलीं आहेत. भारताचीं पृष्ठें १७३ व रामायणाचीं पृष्ठें ८२. छपाई बांधणी सुबक. किं० ८६, व रामायण किं० ८४.

म्यानेजर—चित्रशाळा प्रेस, पुणें शहर.

मराठी
# शालापत्रक

येथें शब्द नाहीं शिष्यासी । हें अवघें सद्‌गुरूपाशीं ।
सद्‌गुरु पालटी अवगुणांसी । नाना यत्नें करोनी ॥
जें कांहीं आपणास ठावें । तें हळु हळु शिकवावें ।
शहाणें करून सोडावें । सकळा जनां ॥ १ ॥

—रामदास.

पुस्तक ३४. नोव्हेंबर सन १९२३. अंक ११

## एक प्रसिद्ध शास्त्रज्ञ.

जगाच्या इतिहासांत ज्यांनीं आपलीं नांवें चिरस्मरणीय करून ठेवलीं त्यांनीं आपला मार्ग अत्यंत कठीण अशा अवस्थांतून काढला अशी इतिहास साक्ष देईल. आपण आज अशाच एका मोठ्या पुरुषाचें चरित्र पहाणार आहों. हा मोठा पुरुष मायकेल फराडे होय. याचा बाप लोहार होता. हा १७९१ मध्यें जन्मला. याची आई एका शेतकऱ्याची मुलगी होती.

याच्या आईबापांना लिहतां वाचतां येई, त्या पलिकडे बुद्धिची देणगी त्यांना नव्हती. त्यांचा मुलगा मात्र अलौकिक बुद्धिमत्तेचा होता.

याच्या आयुष्याला अगदीं हलक्या प्रकारें सुरवात झाली. याच्या घराशेजारीं रोबो नांवाचा एक पुस्तकविक्या रहात होता. या रोबोला एक नोकर पाहिजे होता. आणि फराडेला नौकरी पाहिजे होती. त्यामुळें दोघांचाही कार्यभाग झाला.

रोबो छापील कागद घरीं आणी, त्याच्या घड्या पाडी, पुस्तकें बांधी व तीं विक्रीस ठेवी. या पुस्तकाच्या धंद्यांतच ज्ञान भरलें आहे अशी लहानग्या मायकेलची समजूत होती. हा तेरा वर्षांचा झाला तेव्हां त्या पुस्तकविक्यानें त्याला कांहीं मोबदला न घेतां आपला धंदा शिकविण्याचें ठरविलें. मायकेलही हा धंदा शिकूं लागला व आठवर्षेंपर्यंत तो तेथेंच राहिला. या वेळांत त्यानें थोडें फार ज्ञान संपादन केलें. विद्युत् अद्याप बाल्यावस्थेंत होती. या विद्युत विषयाचीं कांहीं पुस्तकें बांधीत असतां त्याला

त्याचें वेड लागलें व त्यांनीं स्वतः एक लहानशी विजेची बॅटरी तयार केली.

एकदां मायकेल विजेवर एक पुस्तक वाचीत होता. इतक्यांत एक गिऱ्हाईक आलें व याचा हा व्यवसाय पाहून त्यानें याला हंफ्रे डेव्हीच्या व्याख्यानाचीं कांहीं तिकिटें दिलीं. यावेळीं मायकेलचें वय २१ वर्षांचें होतें. तो व्याख्यानाला गेला व व्याख्यात्यानें जें जें काय सांगितलें त्याचें टिपण करून घेतलें आणि हें टिपण त्यांनीं आपल्या पुस्तकास जोडलें.

पुढें फराडेनीं आपण घेतलेलें टिपण व लिहिलेलें हस्तलिखीत पुस्तक त्यांच्याकडे पाठविलें व शास्त्रीय ज्ञान संपादन करण्याकरितां नौकरीस राहण्याची इच्छा प्रदर्शित केली.

मायकेलचें पत्र पाहून डेव्हीचें अंतःकरण द्रवलें व त्यानें त्याला नौकरी देण्याचें कबूल केलें. शास्त्रीय शोधामध्यें किती अडचणी आहेत व किती हाल अपेष्टा भोगाव्या लागतात याचें चित्र त्याच्या पुढें उभारण्यास डेव्हीसाहेब विसरले नाहींत. परंतु मायकेलचा निश्चयच झाला होता त्यामुळें तो याला घाबरला नाहीं.

पुढें मायकेल हा प्रयोगालयांत दुय्यमाचें काम करूं लागला. त्याला महिना ५० रुपये मिळत. लवकरच मायकेल हा आपल्या धन्याला उत्कृष्ट प्रकारें मदत करूं लागला. डेव्हीच्या व्याख्यानाचे वेळीं मायकेल टिपणें काढून देई आणि कित्येक प्रसंगीं स्वतःच व्याख्यानें देत असे. मायकेलला डेव्हीच्या खासगी शागीर्दाचें कामहि करावें लागे. तथापि मायकेलचें धन्यावर अत्यंत प्रेम असल्यामुळें त्यांनीं हलक्या कामाची पर्वा बाळगली नाहीं. डेव्हीची बायको मात्र मायकेलचा अत्यंत द्वेष करी व त्याला वाईट रीतीनें वागवी.

एकदा एका खाणावळींत हें सारें कुटुंब उतरावयास गेलें असतां डेव्हीच्या पत्नीनें मायकेल हा एक चाकर आहे असें खाणावळवाल्यास सांगून त्याचें ताट नोकरांत मांडावयास लावलें. पुढें मालकाला मायकेलचा दर्जा कळल्यावर त्यानें त्याची क्षमा मागितली व बाईसाहेबांकडे लक्ष न देतां त्याला जेवावयास चांगल्या ठिकाणीं बसविलें. परंतु मायकेल हा असा अपमान आपल्या धन्याकडे पाहून गिळत असे. या त्यांच्या प्रवासांत मायकेलनें एक मोठा शोध लावला. हिरा हा कोळसा आहे असें त्याला कळून आलें व त्यानें एक दिवस सूर्य प्रकाशानें हिरा जाळून दाखविला.

पुढें हा लंडनला आला व आपल्या शोधाचें काम करूं लागला. कांहीं दिवसांनीं हा एके काळीं हुजऱ्या व शागीर्द असलेला मायकेल शास्त्रज्ञानांचा राजा झाला.

फराडेनें विद्युत व रसायनशास्त्र या दोहोंत आपली प्रगती केली. तो कोणतीहि नवी वस्तू अथवा प्रयोग पाहिला म्हणजे याचा अर्थ काय, असा स्वतःला प्रश्न करी आणि त्याचें उत्तर मिळेपर्यंत तो स्वस्थ बसत नसे. ३० वर्षांच्या आंत त्यांनीं आपलें नांव सर्वतोमुखीं केलें.

त्याच्या इतके प्रयोग कोणीच केले नाहींत. त्यांनीं आपले सारे प्रयोग टिपून ठेवावेत त्यांपासूनच उपलब्ध झालेल्या ज्ञानाची नोंद करावी व त्यांवर विचार करावा असें चालविलें होतें. एकंदर त्याला १६०४१ नव्या गोष्टी आढळून आल्या. हल्लींच्या शास्त्रज्ञांना प्रयोगांकरितां उपकरणांची अत्यंत उत्कृष्ट सोय आहे. परंतु त्याला हा लाभ झाला नव्हता.

त्यांनीं कांहीं उपकरणीं स्वतःच बनवलीं, त्याच्या हाताखालील गृहस्थ अंडरसन म्हणून होता. तोहि फार हुशार असे. त्यानें आपलें सर्वस्व फराडेला अर्पण केलें होतें. फराडेचा जो विजय तो आपला विजय अशी त्याची समजूत होती.

फराडेनें पहिली वस्तू शोधून काढली ती बेंझोल होय. या वस्तूचा रंगाचें कामीं केवढा उपयोग होतो हें सांगावयास नको. तो रासायनिक द्रव्यें घेई, त्यांचें पृथ्यक्करण करीं व मूलभूत द्रव्यांचें मिश्रण करून नवीन द्रव्य बनवीं. अशाप्रकारें त्याचे शोध सुरू झाले व त्यामुळें शास्त्रज्ञांमध्यें मोठी गडबड उडाली, एवढेंच नव्हे तर व्यापारी वर्गालाहि या शोधामुळें फायदा होऊं लागला व तेहि अस्वस्थ झाले. फराडेच्या नवीन शोधामुळें विद्यार्थीवर्ग शास्त्राकडे वळला आणि त्याचा अनुयायीवर्ग मोठा झाला.

हंफ्रे नंतर रॉयल इन्स्टिटयूटवर फराडेची नेमणूक झाली हें सांगावयास नकोच. हंफ्रे वारंवार मायकेल विषयीं मोठ्या अभिमानानें बोलत असे.

फराडेनीं जे जे शोध लावले ते ते सारे कळणें अशक्य आहे. त्याला शास्त्रांत प्रगती केलेला माणूसच पाहिजे होता. त्याचा मोठा शोध म्हणजे लोहचुंबकापासून विज उत्पन्न करणें हा होय. कोणत्याही धातूंतून विद्युत् जात असतां, ती धांतू जर आपण लोहचुंबकाचे सुईजवळ ठेवली, तर ती सुई वास्तविक ज्या दिशेकडे असावयास पाहिजे, त्याच्या उलट दिशेस जाते असें फराडेनें पाहिलें व त्याविषयीं पुष्कळ प्रयोग केले. या शोधामुळें लोहचुंबकापासून विद्युत् उत्पन्न होऊं लागली. तत्पूर्वीं घर्षणानें व रासायनिक क्रियेनें वीज उत्पन्न करीत असत. त्यांनीं चष्म्याकरितां काच कशी तयार करतात याचा शोध लावला व लोकांना दृष्टी दिली असें म्हणावयास हरकत नाहीं. पाण्याला थोडीशी उष्णता लावली म्हणजे ती वायुरुप होते असें त्यांनीं पाहून फोटोग्राफीचा शोध लावला. इमारती कशा बांधाव्या वगैरे संबंधींहि त्यांनीं बरेच शोध लावले. एकदां सरकारनीं त्याला कोळशाच्या खाणींत स्फोट कां होतात याचें कारण शोधून काढण्यास विनंती केली तो खाणींत गेला व त्यानें दुसऱ्यांना न आढळून आलेलें असें एक कारण दाखवून दिलें.

फराडेपेक्षां मोठा शास्त्रज्ञ झाला नाहीं असें म्हणणें अयोग्य नाहीं. त्याचीं भाषणें फार गमतीचीं व बोधप्रद असत. लहान लहान मुलेंसुद्धां त्याचीं भाषणें ऐकावयास जात. ५० वर्षांचा असतांनाच या साऱ्या दगदगीमुळें त्याची प्रकृती ढासळली व त्याला विश्रांती घेणें जरूर पडलें. दोन वर्षांच्या विश्रांतीनंतर त्याची प्रकृती सुधारली. म्हातारपणीं याला पेन्शन मिळावें म्हणून कांहीं मित्रांनीं सरकारकडे याची शिफारस केली व लॉर्ड मेलबोर्नला भेटावयास सांगितलें. लॉर्ड मेलबोर्नला राजकारणाशिवाय कोणत्याहि गोष्टीचें ज्ञान नव्हतें. त्यांनीं फराडेला म्हटलें "वाङ्मयाला व शास्त्राला पेन्शन देणें म्हणजे मूर्खपणा आहे." हें उत्तर ऐकून फराडेला किति वाईट वाटलें असेल याची वाचकांनींच कल्पना करावी.

मेलबोर्न जरी उद्धट होता तरी त्याचें अंतःकरण कोंवळें होतें. जेव्हां मेलबोर्नच्या मित्रांनीं फराडेची सारी किर्ती त्याच्या कानांवर घातली, तेव्हां मेलबोर्नला आपल्या कृत्याचा पश्चाताप वाटला व तो म्हणाला "मला फराडे हा ज्योतिष शास्त्रवेत्ता आहे असें वाटलें." त्यांनीं फराडेला एक पत्र लिहून त्याची क्षमा मागितली. अखेरीस फराडेनें मोठ्या कष्टानीं वर्षाचें ४॥ हजार रुपये पेन्शन व एक घर सरकाराकडून घेण्याचें कबूल केलें. तो १८६७ सालीं वारला. तो साधा व प्रेमळ असे. ईश्वराची तो नीत्य करुणा भाकी. कोणी गरीब माणूस त्यांच्याकडे आला तर तो त्याला मदत करी. त्याला मुलबाळ वगैरे कांहीं नव्हतें. तो जसा आला तसा गेला. पण त्यानें जगाच्या ज्ञानांत व संपत्तींत येवढी भर टाकली ! हंफ्रेडेव्ही म्हणत असे 'मी एक मोठा शोध लावला आणि तो म्हणजे मायकेल फराडे हा होय.'

# + गेनु माळी.

लें० वि. य. मोकाशी.

'गृहस्था आम्हां कुटुंबवंता, । दरिद्रातुल्य दुसरी व्यथा । ये संसारीं असेना ॥ ३५ ॥
दरिद्रें उदास पुत्रदारा । दरिद्रें सुहृद पाठीमोरा, । दरिद्रें नैषधयुधिष्ठिरां । रानोरान भवंडिलें ॥ ३७ ॥'

मुक्तेश्वर–आदिपर्व.

असाच संध्यासमय होता आणि मी माझ्या एका मित्रासमवेत मुंबई येथील खंबाला हिलवरून एका बागेच्या कोपऱ्यावर येऊन ठेपलों होतों. माझी त्याबागेच्या धन्याची जरी चांगलीच तोंड-ओळख होती तरी ह्या वेळीं बागेंत शिरण्याचें मला कारण नव्हतें, पण तेथील द्वारासन्निध त्या बागेचे मालक आपल्या कन्येसह गार्डींत बसलेले व त्यांचे समोर त्या बागेचा माळी—म्ह० आमच्या चरित्रनायक गेनु हात जोडून उभा असलेला आणि ह्या माळ्याच्या सुमारें एक किंवा दोन हातांवरच एक पोलीस शिपाई मागें पुढें पाऊलें टाकीत अर्धवट सस्मित, अर्धवट क्रोधाविष्ट मुद्रेनें माळ्याकडे पाहून लीलेनें काळ घालवीत असलेला हा देखावा पुढें दिसल्यामुळें मीं आंत जाण्याचें धाष्टर्य केलें. असो; अशी स्थिति दहा-पांच सेकंदें चालली होती; तोंच शिपायीबुवा बागेच्या मालकांकडे वळून म्हणाले 'शेटजी, लकडीशिवाय मकडी वठणीस येत नाहीं' असा आमच्या पोलिशी खात्याचा नियम आहे. आपण आपल्या साध्या भोळ्या स्वभावावर जाल तर ह्या गुन्ह्याचा शोध लागणार नाहीं. आपल्या बंगल्यांतून बातमी कळतांच ह्याचा शोध लावावा म्हणून आलों. जवळ जवळ अर्धा घंटा होत आला, हा तुमचा माळी चकार शब्दहि काढीत नाहीं. दिसतोयं कोंकण्यासारखा बावळट पण कृति दिसते दिल्लीच्याहि सोद्यावरची. साहेब आतां वेळ घालवूं नका. याला माझ्या ताब्यांत द्या, म्हणजे घोडा कसा चौफेरी रिंगणावर घेतों पहा. " बोटानें व डोळ्यानें किंचित् खुणवून पोलीसास मध्येंच थांबवून शेटजी म्हणाले "हें पहा शिपाई बोवा, माझ्या सहीची चिठ्ठी तुम्हास आली होती कां ? वास्तविक मीं कांहीं तुम्हास बोलाविलें नाहीं. बंगल्यांतील कोणीतरी बायका माण-साच्या निरोपावरून तुम्ही आलेले दिसतां. कोर्टांतून मी सरळ येथें आलों आहें. तेव्हां हें गुन्ह्याचें प्रक-रण काय आहे हें आधीं मला नीट समजावून घेतलें पाहिजे. आपण येण्याची निष्कारण तसदी घेतलीत. (शेटजी बहुधा सर्वांना 'तुम्ही तूं' च्या ऐवजीं 'आपण' ह्या शब्दांनीं संबोधित असत, इतके ते विनयशील होते.) माझ्याकडून वर्दी आल्याखेरीज ठाण्याहून कोणीहि येऊं नये हें बरें. जा आपण परत आतां" अशी यथास्थित संभावना झाल्यावर शिपाई-बुवांनीं अगदीं ओशाळगत होऊन तेथून पाय काढला.

असो; शिपाई जातांच शेटजींची कन्या आपल्या वडिलांकडे आपणास कांहीं बोलावयाचें ह्या हेतूनें पाहूं लागली. तोंच शेटजी मजकडे वळून म्हणाले 'तुम्हा बातमीदार लोकांनीं पोलीसांच्या लुडबुडीपणाचे प्रसंग बरेच पाहिले असतील नाहीं बरें ? मग मी म्हणालों, तो बोलला हें ठीकच आहे. कर्तव्याच्या बाहेर तो होता असें कांहीं नाहीं. थोडा ज्यास्त प्रसंग केला इतकेंच. आपणासारख्या श्रीमंतांच्या घरांतून थोडी बातमी चौकीवर प्रथम आल्याशिवाय हा कां आला असेल ? शिवाय आपलें संघट्टण थोरामोठ्यांशीं हें तो हुषार पोलीस जाणूनच असलाच पाहिजे. कांहींही असो त्यानें आपल्या हुषारीची तडफ दाख-विली खरी.' हें माझें बोलणें संपलें न संपलें तोंच

जवळ असलेली शेटजींची प्रेमाबाई नांवाची कन्या आपल्या पित्यास उद्देशून म्हणाली " बाबा, काय हे पोलीसांचे खेटे आणि बंगल्याभर काय आज हा धिंगाणा. आपल्या गेनबानें असा काय गुन्हा केला कीं त्याला आपल्यासमोर चोरासारखा डांबून उभा केलात ! मुलें चुरचुर करून बोलत आहेत कीं, हिरव्या सोनचाफ्याच्या पांच सहा हुंड्या आज दुपारीं बागेंतून नाहींशा झाल्या आणि त्याचे ग्यानबानें पैसे केले. मला बाई नाहीं हें खरं वाटत. लहानपणीं मी आणि सच्चिदानंद सोन्या–मोत्याच्या दागिन्यानें जणुकाय मढविलेलें असूं पण जोंपर्यंत ह्या ग्यानबाची आम्हांवर नजर असे तों पर्यंत आमच्या अंगावरचा एक दागिनाही हलला नाहीं. आईनं नेहमीं म्हणावं कीं, गेनुमाळी मुलांबरोबर असला कीं सर्वांनीं निश्चिंत असावं. मुलांच्या केंसाला धक्का लागायचा नाहीं, कीं बंगल्यांतून सुतळीचा तुकडाहि जायचा नाहीं. असा हा गेनु प्रामाणिक असून आज काय कोणी हें मेल्यानं बालंट त्याच्या विरुद्ध उठविलं आहे कोण जाणे. इतक्या पावसाळ्यांचा माणूस आणि अशी क्षुल्लक चोरी करील अशी कल्पनाहि मला करवत नाहीं. इतक्यावर कोणाच्या पोटांतलं कोणी जाणावं? कदाचित् गेनूची साठींतली बुद्धी नाठी झाली असेल. बाबा तुम्हीं केव्हांपासून स्वस्थ कसें बसलात ! कांहींच कां बोलत नाहीं ?' असो, इतकें हें मुलीचें बोलणें ऐकल्यावर गंभीर मुद्रेनें शेटजी ग्यानबाकडे वळून म्हणाले, ' ग्यानबा, आजपर्यंचें तुझें वर्तन ज्ञानोबासारखें असतांना तुला ही अशी दुर्बुद्धी कशी सुचली रे. मन मोकळें करून सांग. तिळमात्र भिऊं नकोस. एके काळीं तीनशें चारशें रुपयांच्या उत्पन्नाचा हा लहानसा बाग होता तोंच आज मला वर्षास हजार दोन हजार रुपये सालीना देत आहे; हें सर्व तुझ्या मेहनतीचें फळ आहे. असा तूं कष्टाळु व प्रामाणिक असतांना अशाप्रकारच्या चोरीचा आळ तुझ्यावर यावा हें केवळ दैवदुर्विलसित होय. बोल खराखुरा प्रकार बोल. माझी खात्री पटेल तर तुझे सर्व अपराध माफ करीन हें पक्कं अश्वासन आहे, समज "

यावर गेनूनें हात जोडून उत्तर केलें कीं, " धनीसाहेब, मला त्या ज्ञानोबाच्या खेटराचीहि सर येणार नाहीं. कोठें त्यानें दिगंत कीर्ति मिळविली आणि पांचपंचवीस रुपड्यांसाठीं कोठें मी आपल्या नांवाची आज घाण करून घेतली. कशास कांहीं तरी मेळ ! आजपर्यंत नेकीनें काम केलं, आपल्या घरांतलि सुतळीचा तुकडाहि हलला नाहीं ह्या गोष्टी खऱ्या असतील, पण मी म्हणतों, कुत्रं देखलि इतकंच इमानें इतबारें धन्याशीं वागतंच कीं नाहीं. आपण म्हणतां मी बाग उठवून दिला, पण ह्यांत विशेष मीं काय केलं ! कोणीही मेहनती माणूस धन्याच्या मिठाशीं असाच जागला असता. खरें नांव मिळविलें कोणी तर अखेर साधली त्यांनीं. ( कपाळावर हात मारून घेऊन ) " हा गेन्या केवळ बायकामुलांच्या भरीसाठीं धडपडला आणि असं नांव घालवून बसला, असंच आतां जग म्हणेल कीं नाहीं !" त्यास मध्येंच थांबवून शेटजींनी विचारिलें ' गेनू, असें संदिग्ध बोलूं नकोस. खरी खुरी हकीकत सांगण्यास कोणाची भीती आहे? ( मजकडे वळून ) " आजपर्यंत माझ्या खाजगी गोष्टी केव्हांही मीं चव्हाट्यावर जाऊं दिल्या नाहींत. पोलीस, कोर्ट–दरबार हे सामान्य लोकांचे मार्ग होत. आजपर्यंत मीं माझें शील सोडलें नाहीं कीं दानत बिघडवून घेतली नाहीं. ' ( पुनः गेनूकडे वळून) " असा मी असतांना तुला कशाची भीती." त्यावर गेनूनें उत्तर केलें, 'त्या धाकट्या गण्याचं एकदम लग्न उभारलं आणि घरांतील लहान थोरांनीं पैशासाठीं मला क्याव क्याव करून सोडलं आणि हीं दोन रोपटीं विकून पैशे करावेसं वाटलं. साहेब, केवळ पंचवीस रुपयानं लग्न आडलं होतं. कसंहि

करा, जीव आपला विकून द्या, पण आज पंचवीस रुपये आणल्याखेरीज घरांत पाऊल टाकू नका असे घरांतून तगाद्यावर तगादे येऊं लागले. व्याह्याच्या घरीं साखरपुडा न्यावयाचा अगदींच अडलं, त्यावांचून साडीचं म्हणा कीं, चोळी–बांगडीचं म्हणा अगदीं काम खुंटूनच गेलं. बरं, मला फाटक्याला पांच पंचवीस तरी कोण उसनं देणार ? आणि त्या उसनवारीसाठीं मी घाणपाण तरी काय ठेवणार. संकटाच्या फेऱ्यानं मी असा चोहोंकडून वेढलों गेलों, एवढीशी रक्कम आतां कोठून उभारावी असा सारखा विचार मनांत घोळूं लागला आणि अखेरीस जोडलेलं लग्न मोडूं नये म्हणून मीं हीं झाडें विकलीं. आतां ह्या गेन्याचं डोकं मारा, कीं कांहींहि करा. माझ्या हातून चूकलं खरं, काय न व्हायचं तें होऊन गेलं, तार कीं मारा. मी आपल्यापुढं उभा आहें. माझी कच्चींबच्चीं हींच आपलीं लेंकरें हें समजून काय करावयाचें तें करा. सचोटीनें वागणारा हा तुमचा गेन्या घसरला खरा. '' गेनूचा हा कबुली–जबाब ऐकून शेटजींस कसेंसेंच वाटलें असावें असें त्यांच्या मुद्रेवरून मला स्पष्ट दिसून आलें. ते कांहीं तरी आतां बोलणार होते, पण मध्यंतरींच त्याची कन्या त्यांस ह्मणाली '' बाबा, आपल्या सारख्याच्या पदरीं असतांना केवळ चोळी बांगडी करण्यासाठीं ह्मणून अशा वांकड्या मार्गांत आपल्या ग्यानबाचं पाऊल पडावं हें मला गैर न दिसतां प्रसंगप्राप्तच दिसतं. सोन्यांमोत्यांत खेळणाऱ्या आमच्या सारख्या लोकांना गरिबांच्या गरजांची खरोखरी कल्पना नसते, असं आतां मला स्पष्ट वाटूं लागलं आहे. माझ्या अंगावरील साडीच्या अर्ध्या किंमतींत ह्याच्या मुलीची चोळी–बांगडी सुखानं होते अं ! धन्य हे गरीब ! ह्यांच्या गरजा किती थोड्यांत भागणाऱ्या असतात ह्याची कल्पना मला आतां चांगलीच आली. आम्हांला किती तरी लागतं तरी आम्हीं सदां असंतुष्टच. ह्या वेळीं शेटजींनी मुलीस ' विचारलें आपण आतांच बँकेंतून लहानसा चेक पटवून आलों आहों. देवजी मूळचंदची बाकी दिल्यानंतर आतां तुझ्या पाकिटांत काय शिल्लक आहे पहा बरं. ' प्रेमाबाईंनी नोटा मोजतांच ''सारे अडीचशें शिल्लक आहेत '' म्हणून उत्तर दिलें. शेटजी स्वतःचा खिसा चापचून लागले तों तीनेंच पौंड हातीं लागले. ही रक्कम गेनूच्या हातीं मुलीकडून त्यांनीं ठेवविली. आणि टांगा हांकतांना शेटजी गेनूस म्हणाले 'माझ्या मुलीची तुझ्या मुलीला मूलबाळ होईपर्यंत चोळीबांगडीस अडीचशांची रक्कम दरवर्षीं मिळत जाईल. आणि ज्या माझ्या गाडिखान्यांत तूं आतां रहात आहेस व जेथें तुझ्या मुलीचें उद्या कार्य होणार आहे ती वंशपरंपरा तुला बहाल केली आहे. पस्तीस वर्षांत तूं एकदा अप्रामाणिक वागलास-तेंहि तसाच तुजवर प्रसंग प्राप्त झाला म्हणून-तेव्हां आजपर्यंतच्या सचोटीचें हें बक्षीस समज. जा, पूर्ववत हुषारीनें व दक्षतेनें कामास लाग. ' असें बोलून शेटजी कन्येसह टांग्यांतून बंगल्याच्या बाहेर पडले.

गेनुमाळी आपल्या कामास लागला. पुढचा प्रकार काय झाला हें मला कांहीं माहीत नाहीं. मात्र माझा स्नेही मला जातां जातां म्हणाला '' दीर्घकाळ नौकरी प्रामाणिकपणानें केली म्हणजे देव माणसाच्या मदतीस धांवून येतो हें खरें बोवा. ''

# दीर्घकाल झोंपी गेलेले लोक.

मागच्या खेपेस आपण स्वप्नाचे कांहीं प्रकार पाहिले. आतां आपण दीर्घकाल झोंपी गेलेल्या लोकांच्या कांहीं हकीकती पाहूं. रीपव्हॅन वींकल हा २० वर्षेपर्यंत झोपीं गेला होता असें एक कल्पनिक कथानक वॉशिंगटन आयर्व्हीन नांवाच्या लेखकांनीं निवेदन केलें आहे. परंतु असे प्रकार खरोखरच घडतात ही माहिती त्या लेखकाला नव्हती असें वाटतें. नुकतीच एक पॅरिसमध्यें गोष्ट घडून आली. तेथें एक स्त्री दोन वर्षेपर्यंत झोंपीं गेली होती. व नंतर ती मरण पावली. ही स्त्री कपडे साफसूफ करीत होती. इतक्यांत तिची एक मैत्रीण आली व थट्टेनें म्हणाली, " धांव धांव, तुला पकडण्याकरितां लोक येत आहेत. " हें ऐकतांच ती जमिनीवर धाड्‌कन पडली व दोन वर्षेपर्यंत झोपीं गेली.

तिची झोंप दोन वर्षांनीं संपली निद्रितावस्थेंत डॉक्टर तपासणीस येत व तिला उठविण्याचा प्रयत्न करीत. परंतु त्यांना यश आलें नाहीं. शेवटीं त्यांनीं ती जिवंत रहावी म्हणून उपचार चालविले. तिला ते दुधानें व कांजीनें सकाळ संध्याकाळ धूत व हृदय क्रिया चालू रहाण्यास थोडें दूध घशांत घालीत.

दोन वर्षेपर्यंत तिला या प्रकारानें जीवंत ठेवण्यांत आलें. तिचें शरीर पांढरें फटफटीत झालें होतें, आणि रक्तहि पांढरें व चिकट असें झालें होतें. तिच्या अंगांतील सारें मांस झडून नुसतीं हाडें शिल्लक राहिलीं होतीं. दूरदूरचे डॉक्टर्स तिला पहाण्याकरितां येत. दोन वर्षांनीं ती थोडी हालचाल करूं लागली. प्रथम तिनें एक हात उचलला, नंतर डोळे उघडले; पण बोलण्याची शक्ती तिला नव्हती. वीस मिनिटेंपर्यंत सारे डॉक्टर्स मोठ्या आशेनें ती जीवंत होईल म्हणून वाट पहात होते. २० मिनीटांनीं तिचे ओंठ हालूं लागले व तिनें मोठ्या कष्टांनीं कांहीं शब्द उच्चारले आणि प्राण सोडला.

सहा महिनेपर्यंत निद्रितावस्थेंत काळ घालविणारे स्त्रीपुरुष बहुधा जिवंत रहात नाहींत असा अनुभव आहे.

याला एक रशियांतला माणूस अपवादादाखल भेटला. हा सात महिनेपर्यंत निजला होता. त्यानें दहा वर्षें खाणींत काम केलें होतें. त्याचें वय ४० वर्षांचें होतें व तो चांगला सशक्त होता. त्याला तीन तीन, चार चार दिवस सारखी झोंप येत असे.

तो १८९३ सालीं शेतावर काम करीत असतां झोंपीं गेला. त्याची बायको जवळ होती. त्याला तिनें घरीं नेऊन निजविलें. तिला वाटलें कीं, दोन चार दिवसांनीं हा जागा होईल, पण जेव्हां एक आठवडाभर तो निजून राहिला तेव्हां ती घाबरली. ती जवळच्या एका वैद्याकडे गेली. तो वैद्य आला; पण त्याचा कांहीं इलाज चालेना. त्यानें पांच महिने त्याच्यावर देखरेख ठेवली व नंतर त्याला दुसऱ्या गांवीं जावयाचें असल्यामुळें तो निघून गेला. नंतर दुसऱ्या वैद्यानें दोन महिनेपर्यंत त्याच्यावर पहारा ठेवला. या सात महिन्यांत त्याला अन्नपाणी वगैरे कांहीं देण्यांत आलें नाहीं

सात महिन्यांनीं पाठीवर पडलेला हा गृहस्थ डाव्या कुशीवर वळलेला दिसून आला. त्याबरोबर वैद्याला बोलावणें पाठविण्यांत आलें. वैद्यांनीं तपासणी करून शरीरांत औषध घातलें. त्याचा चांगला परिणाम झाला.

त्यानें डोळे उघडले, हातपाय ताणले व अंथरुणांतून उठण्याचा प्रयत्न केला पण अंगांत शक्ती नसल्यामुळें त्याला तसेंच पडून रहावें लागलें. सुमारें १५ दिवस शुश्रूषा केल्यावर तो कामास जाऊं लागला.

अशा प्रकारचीं पुष्कळ उदाहरणें आहेत. परतु झोंपेनंतर जगल्याचें वरील एकच उदाहरण आढळतें.

# + मला कोण होता येईल ?

( ले०— वि. य. मो. )

**नाम० गोखले**:—' कॅबिनेट मिनिस्टर ' होऊन आपल्या देशाची कामगिरी करावी अशी माझी आकांक्षा आहे.

**सुप्र० कादंबरीकार आपटे**:—समाजास सन्मार्गदर्शक असा विख्यात कादंबरीकार व्हावें अशीच माझी इच्छा आहे.

बा. मा. आंबेकरकृत

आपटे चरित्र ( पृ. ९२।९३.

वरील मित्रद्वय परस्परांशीं हितगुज बोलत असतां आपलें गुह्यांतलें गुह्य बोलले आहेत आणि ते स्फूर्तिदायक उद्गार वरील प्रकाशकानें प्रकाशांत आणिलें आहेत ही त्यांची वाखणण्याजोगी समाजावर उपकृती आहे. मथळ्यावरील उद्गार खाजगी रूपांतले प्रथमतः भासत असले तरी निःसंशय ते सार्वजनीक स्वरूपाचे होत. कारण, एकतर हीं माणसें सामान्यस्थितींत वाढलीं गेलीं होतीं; त्यांच्यावर एखाद्या लक्ष्मीपुत्राची मेहेरनजर होती असेंहि नव्हतें, किंवा वाडवडिलार्जीत एखादा ठेवा त्यांना आधारभूत होता अशांतलीही गोष्ट नव्हती. पण अशा स्थितींतून डांकेवर कसें काढतां येतें हें त्यांनीं आपल्या साध्या राहणीनें व उच्च ध्येयानें जगाच्या चांगलेंच निदर्शनास आणिलें. वाक्पटुत्व हें कांहीं सहजासहजीं येत नाहीं, कीं, कादंबरीचें लेखन—निपुणत्व लेखणी हातांत घेतली कीं आपलें हस्तगत झालें आहे अशांतला कांहीं प्रकार नाहीं. एकानें ' धन्य हा शारदा पुत्र ' म्हणून पाश्चात्त्यांकडून घेतलें तर दुसऱ्यानें ' धन्य हा महाराष्ट्राचा ' स्कॉट ' म्हणून स्वबांधवांकडून म्हणवून घेतलें. ह्या धन्यवादांस आधार कशाचा होता ? त्यांच्या ह्या मोठेपणाची जननी कोण होती ? हें पाहूं जाता आपणांस काय आढळून येईल ? एकानें ' ब्लु-बुकस व पार्लमेंटरी रिपोर्टस आणि त्याबरोबरच देशाची खडानूखडा माहिती काढण्यांत व तिचें परिशीलन करण्यांत कोणी परिश्रम घेतले असतील हें ते स्वतःच जाणोत. तसेंच फ्रेंच भाषेचें वाङ्मय वाचण्यांत व मानवी स्वभावाचें सूक्ष्म निरीक्षण करण्यांत आपटे ह्यांनीं कोण परिश्रम घेतले असतील हें एक त्यांच्या दृढ व्यासंगासच माहीत. इतरांस ह्या गोष्टी समजाव्या कशा ? ज्याचें दुःख त्याला ठाऊक असतें इतरास त्याची कल्पना येत नाहीं, सुप्रसिद्ध रोमन इतिहासकार गिबननें प्रथम हातांत लेखणी घेतली तेव्हांची त्याची कबूली काय होती ? तो आपल्या स्नेह्यास खाजगी संभाषणांत म्हणाला होता कीं ' At the outset every thing was in dark ' —लेखनास प्रारंभ करितांना प्रथम सर्वत्र अंधेर होता— अशा कबूलीचा मनुष्य स्वस्थ बसला असतां तर ' रोमन पातशाहीचा ' सुश्राव्य इतिहास जगास वाचावयास मिळाला असतां काय ?

असो; रानड्यांचें विद्वत्त्व टिळकांचें राजकारणपटुत्त्व शास्त्रीबोवांचें निबंधमालेंतून दृगोचर झालेलें भाषाप्रभुत्व, कौन्सिल हॉल दणाणून सोडणारें व प्रतिस्पर्धियांना गर्भगळीत करणारें फेरोजशहा मेथांचें अपूर्व वक्तृत्व ह्या सर्वांची जननी कोण होती. ह्या गोष्टी त्यांच्या बुद्धिमत्तेला

काय सहजासहजी प्रसवल्या ! कां त्यांच्या मस्तकांवर शारदा देवीनें आपला वरदहस्त ठेविला आणि आपोआप त्यांना कीर्तीनें माळ घातली. वरील महाशयांची कीर्ती अथवा प्रसिद्धी जी झाली त्याच्या मूळाशीं केवळ कामास लागतांना स्फूर्तीच कारणीभूत झालेली होती काय ? नाहीं, नाहीं. कर्तव्यतत्परतेच्या भावनांनीं त्यांचें मन उद्दीपित झालेलें असेल, पण त्यांच्या स्फूर्तीमान झालेल्या मनास दुसऱ्या कशाची मदत होती काय? ह्या प्रश्नास होय, असेंच उत्तर येईल. ती मदत दुसरी कशाची नसून त्यांच्या कामाबरोबर घाम निघाला होता हीच एक मदत अथवा जोड त्यांच्या कामास होती. मूलतः कामास प्रारंभ करतांना वरील श्रेष्ठ पुरुषांस आपण असे राजकारणी पुरुष होऊं, असे समाजनेते होऊं, असें वाटलें असेल काय ? वास्तविक मूळांत फारच थोड्या गोष्टींचा आधार आपणांस असतो. पण ह्या आधारास आपल्या चिकाटीनें मनोहर स्वरूप देण्याचा प्रयत्न करावयाचा असतो. आपणांपैकीं पुष्कळांना कामास आरंभ कसा करावा हेंच कळत नसतें. आधीं कामाची आंखणी करावयाची असते, तदनंतर त्याच पद्धतीची जोड द्यावयाची असते, त्याबरोबर अंगीकृत कार्य करण्यास चिकाटीनें पार पाडून न्यावयास शिकावयाचें असतें. पुष्कळ वेळां कोणत्या गोष्टीस आरंभ करावा हेंच सुचत नाहीं आणि ह्याच वेळीं बिकट परिस्थिति दत्त म्हणून पुढें येते; तेव्हां ह्यावेळीं मन गांगरूं न देतां स्फूर्तीनें आपल्या आवडत्या विषयास अथवा धंद्यास एकदम प्रारंभ करावा; तोंच त्याबरोबर मार्ग सुचूं लागतात आणि आपण न कळत एक एका स्थित्यंतरांतून निभावून जातों. अशा स्थितींतून आपण बराच काळ जाण्याची तयारी ठेवली म्हणजे विशिष्ट कालावकाशांत आपण अमूक झालों हें जनतेच्या दृष्टी पडते. 'मला कोण होता येईल' ह्या प्रश्नाचें उत्तर येथेंच आपणांस पहावयास मिळेल. असा कोणताच विषय नाहीं काय, कीं जो तुम्हाला आवडत नाहीं? असा कोणताच धंदा नाहीं काय, कीं ज्याविषयीं तुमच्या मनांत अंधुक अशी कल्पना आली नाहीं ? तुम्हास कोणतातरी एक विषय अथवा धंदा आवडतो हें खास; तेव्हां त्यांतच सर्वस्व वेंचा म्हणजे आपोआप मती चालेल, कीर्ति मिळेल आणि त्यांबरोबर संपत्तीहि धांवत येईल.

---

## "कारण मिमांसा" अथवा "तो श्रीमंत कसा झाला"

**कारण**—काम करीत असतांना त्याला वेळेचें भान कधींच रहात नसे.

**कारण**—आपल्या वचनास तो नेहमींच जागला.

**कारण**—हातीं घेतलेलें काम अर्धमुर्धें त्यानें कधींच सोडलें नाहीं.

**कारण** दुसऱ्यावर विसंबून तो कधींच राहिला नाहीं

**कारण**—त्याच्या सर्व कार्यास वक्तशीरपणाची जोड होती.

**कारण**—" मी विसरलों बरं " असें तो कधींच म्हणाला नाहीं.

**कारण**—दुसऱ्यापासून आपणास कांहीं शिकायचें आहे हें तो कधीं विसरला नाहीं.

**कारण**—स्वतःच्या घोडचुकांची जाणीव होतांच त्यांपासून बोध घेण्यास तो शिकला.

**कारण**—आपलें काम बरें, कीं आपण बरें, हेंच ध्येय त्यानें मनश्चक्षुपुढें ठेविलें होतें.

---

( शाळेंतील मुलांकरितां प्रयोग. )

# दीनोद्धार.

( ले० गुणवंत रामचंद्र देशपांडे, बाळापूर. )

### प्रवेश १ ला.

( स्थळः—सडकेवरच्या कंदिलाजवळ मध्यरात्रीचा सुमार. )

सुमतिलालः—( थोडा वेळ पुस्तक वाचल्यावर. ) काळ्या भीषण रात्रीं खवळलेल्या समुद्राच्या पर्वतप्राय लाटांवर आयुष्याचे क्षण मोजित बसलेल्या, अथवा मार्ग चुकून एखाद्या प्रचंड खडकावर आदळूं पहाणाऱ्या नौकेला काळजींतून मुक्त करणाऱ्या दीपस्तंभाचें वर्णन लक्षांत ठेवण्याला मला मुळींच सायास पडणार नाहींत. शाळेंत मातीचा ग्लोब पहातांच सर्व पृथ्वी, स्वतःवरील पर्वत, नद्या आणि समुद्र, यच्चयावत् प्रकारचे प्राणी ह्यांसह आपल्या चिमुकल्या मेंदूत फिरूं लागते. त्याचप्रमाणें ह्या सडकेवरच्या कंदीलाकडे पाहून माझी आतां स्थिति झाली. ह्या पुस्तकांतल्या दीपस्तंभांत आणि काळाच्या विशाल समुद्रांत हेलकावे खात असलेल्या आमच्या नशिबाच्या नावेला आपल्या प्रकाशानें मार्गदर्शक होणाऱ्या ह्या सडकेवरच्या कंदिलांत मला किंचित् देखील फरक दिसत नाहीं. ह्या विपत्कालांत मजवर निर्व्याज मनानें जर कोणी प्रेम व उपकार करीत असेल तर हा सडकेवरचा दीपस्तंभ. माझ्यासारख्या कित्येकांनीं त्यांच्या हीन स्थितींत ह्याच दिव्याच्या प्रकाशांत कीर्तीचें अमरत्व प्राप्त करून देणाऱ्या ज्ञानामृताचे पहिले घोट घेतले. ह्या दिव्यांत जरी आकाशांतल्या ताऱ्याचें तेज आणि सौंदर्य नसलें तरी अनादि अनंत अशा काळाच्या नभःपटलावर कीर्तिप्रभेनें अखंड झळकणारे तारे मात्र ह्यानें निर्माण केले हें किती मनोहर सत्य आहे. चारचौघां सारख्याच साडेतीन हात अस्थिमांसमय पण ज्या एखाद्या विशिष्ट शरीराच्या पायधुळीच्या कणाकणाला आत्मबलानें पृथ्वीमोल प्राप्त होते त्यांच्या वृत्तीला श्रेष्ठ संताकडून दीपाची सार्थ उपमा देण्यांत येते.

घरीचिया उजेड करावा । परावीया अंधार पाडावा । हा भेद नाहींच ठावा दीपा जैसा ॥

( ठोके पडतात. )

( मोजतो. ) एक, दोन, दोन वाजले. आज बराच वेळ झाला. काय करावें. अभ्यास करतां करतां भलत्याच विचारांच्या ओघांत मन वाहूं लागतें.

( पोलीसशिपायाच्या वेषांत एक चोर प्रवेश करतो )

चोरः—चोरी करणें देखील मोठें कसबाचें काम आहे. मनुष्य जन्मतःच चोर असतो, कारण चोरीच्या कृत्यांतच तर त्याच्या जन्माचें मूळ असतें. पण रूढीच्या शिक्कामोर्तबामुळें ही चोरी चोरीच्या सदरांत येत नाहीं इतकेंच. चोरी करणें किती बुद्धिमत्तेचें काम आहे हें ती टिळक गोखल्यासारख्यांना सुद्धां करतां आली नाहीं यावरूनच सिद्ध होण्यासारखें आहे. शाळेंत लहानपणीं बिचाऱ्यांना पेन्सीली, रबर दौती चोरणें सुद्धां साधलें नाहीं. अस्तु. मृच्छकटिकांतल्या शर्विलकानें घराला पाडलेल्या भोंकाची सुद्धां चारुदत्तानें काय तारिफ केली आहे! आतां कोठें ते मर्दपणाचे दिवस राहिले. आतां मोटार मधून चोर फिरतात. चोरी आहे पण तींतलें कौशल्य गेलें. ही कां सुधारणा आहे! मी एवढा चलाख म्हणवतोंना पण आतांच अर्ध्यातासापूर्वीं त्या मारवाड्याच्या बेंबींत पाय अडकून अडकला जात होतों.

आली होती चांगली गच्छंतीची वेळ, पण निसटलों झालें प्रभुकृपेनें. ह्या कंदिलापाशीं हा कोण बरें ( जरा न्याहाळून पाहून ) हा लहान मुलगा येथें पुस्तक वाचीत एवढ्या रात्रीं कां बरें उभा ?

माझ्या वेषावरून हा मला पोलीसचा शिपाईच समजणार आहे. याला काय माहित अस्मादिक एखादा शर्विकाचे कीर्तिमान वंशज असून ह्या अंधाऱ्यारात्रीं चोरीसाठीं हिंडत आहेत. ( उघड. ) ए मुला, काय करतोस रे येथें एवढ्यारात्रीं.

सुमतिलालः—मी शाळेंतला एक गरीब विद्यार्थी आहें. उद्यांचा अभ्यास करतों.

चोरः—मग ! ही जागा आहे वाटतें अभ्यासासाठीं ? आणि वेळ कोण झाला ! तुला घरीं अभ्यास करायला काय झालें ? वेड्या पोरा, रात्रीं अपरात्रीं सडकेवर असा तुला आमच्या एखाद्या अधिकाऱ्यानें पाहिला तर नसतें लचांड तुझ्या भोंवतीं येईल. अभ्यास राहील एका बाजूलाच बाबा. ( स्वगत. ) ह्याला प्रमाण मूर्तिमंत मीच.

सुमतिलालः—तुम्हाला कल्पना नाहीं म्हणून तुम्ही असें बोलतां. मला तेल विकत घेण्यास पैशे नाहींत. काय करूं ?

चोरः—म्हणजे ?

सुमतिलालः—गेल्या तापाच्या सांथींत माझे वडील व मोठा भाऊ हे गेले. पैसा एक जवळ नाहीं. त्यावेळीं दागिना म्हणजे आईच्या गळ्यांतलें फक्त मंगळ सूत्रच काय तें! काय करणार ! एका श्रीमंताच्या घरीं आई दळण कांडण—मजूरी करते आणि जेमतेम पोटापुरते मिळवितें. मी शाळेंत जातों.

चोरः—अरेरे, मग तूं त्याच श्रीमंताचे घरीं नौकरी कां धरिली नाहींस ? तुझ्या जोगें एखादें काय त्याच्या घरीं सांपडणार नाहीं कां ? उगाच कशाला रक्त आटवितोस. एवढें काय शिक्षणावांचून खोळंबलें आहे ? ( स्वगत ) आम्हीं नाहीं कां एखाद्या कमिशनराइतका पगार पाडीत असें रात्रीं हिंडून, आम्हीं तर ए. बी. डी. ची शिर्डी डोळ्यानें देखील पाहिली नाहीं.

सुमतिलालः—माझ्या आईची तशी इच्छा नाहीं. कष्टानें मनुष्य मरतो थोडाच. काळ सतत सारखा रहात नाहीं. उपवासानंतर पारणें केव्हांतरी फिटेलच. असेल ईश्वरी इच्छा तर हेही दिवस जातील. अल्पसंतोष, मनाची अढळ शांति आणि निष्पाप अखंड श्रम हीं दैवाच्या खडतर जाज्वल्य देवतेची पुजासामुग्री होय असें माझी आई नेहमीं म्हणत असते. बाबांच्या मृत्यूपासून तिच्या मनावर असा परिणाम झाला कीं मला नौकर म्हणून कोणाचा होऊं द्यावयाचा नाहीं असा तिचा कृतनिश्चय आहे.

चोरः—( स्वगत. ) किती गोड बोलतो आहे हा मुलगा. अरेरे मी सर्व जन्म ह्या चौर्यकर्मांत घालविला पण कवडीचें ज्ञान मिळविलें नाहीं. धिःकार असो आमच्या कुत्र्यासारख्या जिण्याला ( उघड ) खरें आहे बाळ. तुझ्या आईसारख्या सर्वांच्या माता जर इतक्या जाणत्या असल्या तर आमच्यासारखीं दीडदमडीवर गोंडा घोळणारीं माणसें औषधास देखील मिळणार नाहींत. बाळ तूं राहतोस कोठें. ?

सुमतिलालः—ह्या जवळच्याच घरांत.

चोरः—तुझी शाळेंतल्या फीची वगैरे काय व्यवस्था आहे मग ?

सुमतिलालः—त्याच फिकीरींत मी आहें. तेवढी मदत मला पाहिजे. माझ्या मास्तरांनीं मधून मधून फी भरली पण त्यांच्या पाठीमागें देखील स्वतःचा खर्च आहेचना ? शिवाय दरवर्षीं फी वाढतेच आहे. त्यासाठीं मी त्या रावबहादूर गोकर्णाकडे जाणार आहें. त्यांची माझी तीनचारदां बाहेर भेट झाली. घरीं ये म्हणून त्यांनीं सांगितलें.

चोरः—कोण ! रा. ब. गोकर्ण. खूप आसामी शोधून काढली. अरे ती निष्फळ थाप. तो गृहस्थ ह्या साहेबलोकांनाच काय तो वळेल. त्यांच्या गळ्यांत

घालण्याकरितां अति दुर्मिळ अशा गुलाबकावलीच्या फुलांची माळ म्हटलें तरी ती तो आणेल. पण गरिबांसाठीं मात्र त्याचे जवळ सुतळीचा तोडा नाहीं. गरीबांच्या घरावर नांगर फिरवून तर त्यानें एवढीं पैशाचीं रोपें वाढविलीं आहेत. अरे बाबा. ह्या दिवसांत लकडीशिवाय मकडी वळत नाहीं. चारदां रात्रीं त्याच्या घरीं त्याच्या तोंडांत बोळे घालून त्याच्याचकडून पैशे काढले. बसला गुपचूप मुग गिळून. करतो काय ! हाक ना बोंब. पुरावा जर नसला तर न्यायाधीश स्वतः चोरी करून देखील आपल्या स्वतःवर कलम चालवूं शकत नाहीं.

सुमतिलालः—करीलही कदाचित् मदत; त्यांनीं मनावर घेतलें तर. बाळासाहेबांना भेटतों.

चोर.—बाळासाहेब त्यांचें चिरंजीव ! ते तर बापसे बेटा सवाई. दारू प्यायला हवी असेल किंवा जुगाराचे फांसे टाकावयाचे असतील तर बाळासाहेब तुझ्याशीं बोलतील एरव्हीं नाहीं. त्यांचेवर तर पोलिसची नजर आहे. ( स्वगत ) आणि आमच्या वर काय नाहीं.

चोरः—हो; आहेत पण त्यांना संगती उत्तम आहेना ! त्याचा मुरलीधररावांचा एक जिवश्च कंठश्च मित्र आहेना ! त्यानें त्यांना सर्व कला शिकविल्या. दर रविवारीं त्या भाग्यामारुतीजवळच्या बोळांतल्या एका घरांत त्यांचा क्लब भरत असतो मारे पार्ट्या झोडतात. भांगच पेले चालतात आणि फांशाचे डाव सुरु असतात. रा. ब. गोकर्णांचा मुलगा म्हणून अधिकारी तिकडे दुर्लक्ष करितात ( शिटी ऐकूं येते ) ( स्वगत ) ही खऱ्याच पोलिसाची शिटी दिसते. आतां पळालेंच पाहिजे. अहाहा ! बारा वर्षें भगवद्गीता आणि दासबोध वाचून जो परिणाम व्हावयाचा नाहीं तो ह्या अनाथ विद्यार्थ्याकडे पाहून एका क्षणांत माझ्या हृदयावर झाला ! एवढे श्रम जर मी लहानपणीं अभ्यासांत घेतले असते तर अंधारांत लोकांचीं कुलुपें फोडून पोटाची भर भरण्याचा प्रसंग मजवर खचित आला नसता. मी चांगल्या सुशिक्षित आईबापांचा, पण लाडानें शेफारलेला मुलगा. माझें सर्व आयुष्य व्यर्थ गेलें. माझ्या हृदयांत कोण खळबळ उडत आहे. पापाच्या अंधारे कोठडींत खिचपत पडलेल्या माझ्या सद्सद्विवेक बुद्धीवर ह्या मुलाच्या मुखावरील सात्विक तेजाच्या गोड किरणांचा वर्षाव होतांच चांदण्यांत मोकळ्या मनानें डुलणाऱ्या चंद्रविकासी कमलिनीप्रमाणें ती शोभू लागली. निष्पाप मनाच्या कोंवळ्या मुला, मी कोण आहे हें कळतांच तुझा भीतीनें थरकांप होईल. लोकांच्या अंगाचा थरकांप होण्यासारखा मी काय लांडगा अगर वाघ आहे ! मी लांडगा नाहीं, वाघ नाहीं, राक्षसही नाहीं ! एक हलकट चोरटा आहें ! धिःकार असो मला ! याला सांगूं कां हें ! हृदयाच्या पाकळ्या उघडून नुकत्याच खुलू पहाणाऱ्या कोमल वनवासी फुलावर वीज पडून तें खाक होईल. पण नाहीं. त्याला सांगितलेंच पाहिजे. निश्चयाला शब्दाचें रूप दिल्याशिवाय त्यांत स्थैर्य येणार नाहीं.

हृदयांतील पापाचा मुडदा येथें पाडलाच पाहिजे. ( उघड ) तुला पाहून किती आनंद झाला हें दाखवावयाला मज गरिबाजवळ साधन नाहीं. मी चोर असलों—असा दचकूं नको. बिलकूल घाबरूं नकोस. मी खरोखरीचा शिपाई नसून रात्रीं घरें फोडणारा चोर आहें. मीं हें वेषांतर केलें आहे. मी चोर असलों तरी मला हृदय नाहीं असें नाहीं. हें घे ( रुपये देतो ) आणि फी भर. नाहीं म्हणूं नकोस. तुला पहातांच मला माझ्या कृतकर्माचा पश्चात्ताप झाला व मीं यामुळें चोरीचा धंदा सोडण्याचा निश्चय केला.

सुमतिलाल:—मी तुमच्याजवळून हें घेऊं इच्छित नाहीं.

चोर:—नाहीं, नाहीं, भिऊं नकोस. मला वाईट वाटेल, हें घे. ( जातो )

सुमतिलाल:—हा काय चमत्कार ! हा खरोखरच चोर असेल कां ? मला मात्र हा ईश्वरच भेटला. आतां येथें उभें रहावत नाहीं. आश्चर्य आणि भीतीनें मी घाबरून भांबावून गेलों आहें. ( जातो. )

( अपूर्ण. )

# एका फकिराची मागणी.

एका फकीरानें एका सुलतानाचें काम चांगल्या-प्रकारें केलें, म्हणून सुलतान खूष झाला व तुला काय पाहिजे तें माग असें म्हणूं लागला. फकीर म्हणाला " एक कुत्रा द्या शिकारीला. "

फकिराला पुष्कळ मागावयाचें होतें; परंतु त्यानें अगदीं हलक्या गोष्टीपासून सुरवात केली.

सुलतान म्हणाला " अरे द्या याला एक कुत्रा. "

" आणि शिकारीस जातांना बसण्याकरितां एक घोडा " द्या असें फकिर म्हणाला.

" याला एक घोडाहि द्या " सुलतान म्हणाला.

" पण मी शिकारीस गेलों तर कुत्रा हातांत कोण धरील ? त्याकरितां मला एक चाकर द्या "

सुलतान म्हणाला " द्या याला एक चाकर. द्या. "

" पण मी आणलेली शिकार शिजवून घालण्या-करीतां एकादी बाई पाहिजे. "

" द्या याला एक बाई "

फकीर म्हणाला " महाराज या आपल्या देणग्यांबद्दल मी आपला फार अभारी आहें. पण ह्या चाकरनोकरांना मी कोठें ठेवूं ? त्याकरितां मला एक घर द्या "


सुलतान म्हणाला " याला एक घर द्या. "

पण महाराज हें घर मला कसें राखतां येईल ! चोरांनीं फोडलें तर काय करूं ! "

" तें राखण्याकरितां तुला दहा गांव पाहिजे असतील " सुलतान म्हणाला.

" होय महाराज. एक
द्याच. "

हें ऐकतांच
त्याच्या म
टाकण
क





न्यूटन.

याच पद्धतीनें त्यांनीं निरनिराळें प्राणी कापून पहा-वेत व आपले सिद्धांत बसवावेत असें चालविलें होतें.

# चुटके.

## दाता–भिकारी दोघेही खूप.

भिकाऱ्याचा पोरः–(शेटजीचे पाठीमागें ओरडत,) धर्नीसाब, गरिबाची दया येऊं द्या कांहीं. भुकेनं मरतोया बगा.

शेटजीः–(ऐटीनें) अरे बंगल्यापर्यंत चल तर खरा; अशी चकचकीत आणेली देतों कीं यंव्य.

भिकाऱ्याचा पोरः–शेटजी, चकचकीत आणेली ऐवजीं मळकट पावली दिली तरी चालेल.

(शेटजींनी भरकन् एक ढबु फेंकल्यावर) "तुरुतदान महा पुन्" म्हणत पोरानें धूम ठोकली.

शेटजींना वाटलें कीं आपला अर्धा आणा वांचला ठीक झालें.

× × ×

## कोर्टांतील प्रसंग.

मॅजिस्ट्रेट –( आरोपीस ) तुझें निर्वाहाचें साधन

कोणतें ?

आहेना ! त्याचा‍ आणि पांच सहा मुलें व एक दोन मित्र आहेना ! त्यानें त्य...

दर रविवारीं त्या भांग्यामारुती

...वर असून उत्तर

एका घरांत त्यांचा क्लब भरत अस...

झोडतात. भागंचे पेले चालतात आणि ...सें जवळ

सुरु असतात. रा. ब. गोकर्णाचा मुलगा ...पुढें

अधिकारी तिकडे दुर्लक्ष करितात ( शिटी ऐकूं येते )

( स्वगत ) ही खऱ्याच पोलिसाची शिटी दिसते

आतां पळालेंच पाहिजे. अहाहा ! बारा वर्षे भगवद्गीता आणि दासबोध वाचून जो परिणाम व्हावयाचा नाहीं तो ह्या अनाथ विद्यार्थाकडे पाहून एका क्षणांत माझ्या हृदयावर झाला ! एवढे श्रम प...

...ण्य

नकोस. ( पोलिसांकडे वळून ) न्यारे याला, जेथून आणलें तेथेंच ठेवा.

आरोपीः–( हंसऱ्या मुद्रेनें ) देव पावला, वकीलाचा खर्च वांचला.

( कोर्टांत हंशा होऊन आरोपीस शिक्षा झाली हें सांगणें नको. )

× × ×

## एक नामाभिधान प्रसंग.

तेलंगणांतील एक ज्योतिषी फिरत फिरत एका बड्या शहरीं गर्भ श्रीमंताच्या घरीं नांव ठेवण्याच्या वेळीं गर्दींत घुसून ओझरतां ओझरतां बालकाकडे पाहून म्हणूं लागले.:—

" माय बहीणींहो, बंधुगणहो, " माझ्या समोर पाळण्यांत हें जें अर्भक आहे त्याच्या सुलक्षणांवरून पाहतां जेहेत्ते अशी भाविष्यवाणी करता येते कीं, हा बालक वेदांत भाष्यकार विद्यारण्यस्वामी होईल, न जाणो गणीती भास्कराचार्यहि होईल, न जाणो जस्टिष रानडेहि होईल, आणि हें चुकलेंच तर लोकमान्य टिळक महाराज होईल. ( तेथेंच पाळण्याजवळ असलेल्या वृद्धस्त्रीकडे वळून ) मातोश्री, आतां मुलाचें नांव सांगा पाहूं !

वृद्धबाईः—अगबाई, हिचं नांव मनुबाई. ही का लोकमान्य टिळक होणार ? कांहींन् बाही अफाट बोलायचं झालं त्याला ताळ ना तंत्र.

[ तेथून एकदम पाय काढीत असलेल्या पण ओशाळगत झालेल्या ज्योतिषाकडे पाहून सर्व स्त्रीपुरुषांत कोण हंशा पिकला असेल ह्याची कल्पना केलेली बरी. ]

# जगांतील १० मोठे शास्त्रज्ञ.

जगांतील अत्यंत मोठे शास्त्रज्ञ निवडून काढणें कठीण आहे. कारण मोठें कोणाला म्हणावें व म्हणूं नये याबद्दल ठराविक नियम नाहींत. तथापि खालील यादींत ज्यांनीं खरोखर जगांत घडामोड केली अशांचा समावेश केला आहे. एडीसन व वॅट हे मोठे शास्त्रज्ञ खरे; पण त्यांनीं नवा सिद्धांत शोधून न काढतां इतरांनीं प्रस्थपित केलेल्या सिद्धां-



अरिस्टॉटल.

तांना व्यावहारिक स्वरूप दिलें इतकेंच. हे दहा पुरुष अमेरिकेंतील थॉमसन नांवाच्या गृहस्थानें ठरविलें असून इतरांनीं त्याला संमती दिली आहे.

पहिला मोठा शास्त्रज्ञ अरिस्टॉटल होय. त्याच्या काळीं सारे शास्त्रीयज्ञान घोंटाळ्याचें होतें. याची ज्ञानलालसा मोठी होती. कोंबडीचें पिलूं अंड्यांतून बाहेर कसें येतें याबद्दल त्यांनीं पुष्कळ गोष्टी ऐकल्या होत्या, पण त्यांनीं त्याचें समाधान होईना. त्यांनीं दररोज तें अंडें फोडून पहावें व पिलूं कितपत तयार होत आहे याकडे लक्ष द्यावें. प्राण्याच्या



गॅलिलिओ.

वाढींतील प्रकार त्याला अशाप्रकारें समजल्यामुळें त्याला प्राणी शास्त्रांतील एक मोठा शोधच लागला.



न्यूटन.

याच पद्धतीनें त्यांनीं निरनिराळे प्राणी कापून पहावेत व आपले सिद्धांत बसवावेत असें चालविलें होतें.

त्यांनीं पशु, पक्षी व वनस्पती यासंबंधी बसविलेले सिद्धांत प्रमाणभूत मानतात.

दुसरा मोठा शास्त्रज्ञ गॅलीलीओ हा होता. हा आधुनिक यंत्रकलेचा जनक होय. त्यानें एक जड



हार्वे.

व दुसरा हलका असे दोन पदार्थ घेतले व उंच अंतरावरून टाकले तर ते एकाच वेळीं जमिनीवर येतात असें सिद्ध केलें. यांच्या पूर्वींची समजूत वेगळी



लॅव्हासिअर

होती. गॅलिलिओनें टेलीस्कोप शोधून काढला व पृथ्वी ही सूर्याभोंवतीं फिरते असें सिद्ध केलें. या शोधामुळें तत्कालीन शहाण्यांनीं याला फार छळलें.

तिसरा मोठा संशोधक न्यूटन हा होय. यानें गुरुत्वाकर्षणाचा नियम शोधून काढला. एक वस्तू दुसऱ्या वस्तूला कशी आकर्षण करून घेते याबद्दल हा नियम आहे. थोडक्यांत न्यूटननें विश्वाचा शोध लावला असें म्हणणें अत्युक्तीचें नाहीं.



हेमहोल्टझ.

चवथा मोठा शास्त्रज्ञ हार्वे हा होय. यानें आपल्या शरीरांतील रक्त वहात असतें असें शोधून काढलें. हार्वेच्या पूर्वीं लोकांना ही गोष्ट खात्रीलायक



फराडे.

माहीत नव्हती. त्यानें सूक्ष्मदर्शकयंत्राच्या योगानें रक्ताची गती पाहून हा सिद्धांत मांडला.

पांचवा शास्त्रज्ञ लॅव्हासिअर हा फ्रेंच गृहस्थ

होता. यानें कोणत्याही वस्तूचें वजन अवस्थांतरामुळें कमी होत नाहीं असें सिद्ध केलें. तथापि कांहीं वस्तूंचें वजन कमी होतें असा आपणास अनुभव येतो. आपण जर एक मण लाकूड जाळलें तर त्याची एक मण राख होत नाहीं. तेव्हां जो पदार्थ गेला त्याचें



बर्नार्ड.

काय झालें? हा शास्त्रज्ञ म्हणतो, त्या पदार्थांनीं कांहीं तरी उपयुक्त कामगिरी केली, म्हणून त्याचें वजन कमी झालें. त्यावेळीं लोकांची अशी समज होती कीं, प्रत्येक वस्तूंत फ्लॉजिस्टिन नांवाचें एक पेटणारें




डार्विन.

द्रव्य असतें व तें मुक्त झाल्यामुळें उष्णता, प्रकाश, ज्योत वगैरे उत्पन्न होते. या शास्त्रज्ञांनीं ही समज खोटी ठरवून ऑक्सीजनमुळें वस्तू पेटते असें सिद्ध केलें.

सहावा मोठा संशोधक हेमहोल्ट्झ नांवाचा होता. यानें कोणत्याही पदार्थाची शक्ती उपयोगामुळें नष्ट होत नाहीं, अगर उत्पन्न होत नाहीं असें सिद्ध केलें. कोळशाची वाफ होते, पाण्याची विद्युत् होते, अश्वशक्तीची उष्णता होते वगैरे गोष्टी यानें दाखविल्या. याचा दुसरा शोध म्हणजे हवेंतून नायट्रोजन घेऊन त्याचा खताकरितां कसा उपयोग करावा हा होता.

सातवा शास्त्रज्ञ फराडे हा होता. याच्या शोधांमुळेंच टेलीग्राफ, टेलीफोन वगैरे विजेच्या हजारों गोष्टी निघाल्या आहेत. याच्या वेळेपर्यंत विद्युत्



पास्टूर.

म्हणजे पाण्याप्रमाणें एक तारांतून वहाणारा प्रवाही पदार्थ आहे अशी समजूत असे. यानें ही समज खोटी ठरवली, व एका तारेंत दुसऱ्या तारेंतील वीज कशी आकर्षण करून घेतां येतें हें सिद्ध केलें.

आठवा मोठा शास्त्रज्ञ बर्नार्ड हा होता. यानें विधायक व विघातक क्रिया चालू आहे असें दाखविलें. त्यानें अन्नाचा सजीव पदार्थ कसा होतो, व त्या सजीव पदार्थाचा ध्वंस कसा होतो हें दाखविलें. त्याचा मोठा शोध म्हणजे गांठीबद्दल होय. दोन गांठी शरीरांत असल्यामुळें मनुष्याची शारीरिक व मानसिक वाढ होते असें त्यानें सिद्ध केलें.

पुढील मोठा शास्त्रज्ञ डार्विन होय. यानें उत्क्रांती-तत्त्व शोधून काढलें. मनुष्याची उत्पत्ती माकडापासून झाली असें म्हणणारा हाच शास्त्रज्ञ होय. तो म्हणतो एका सजीव अथवा निर्जीव वस्तूची दुसरी सजीव अथवा निर्जीव वस्तू बनवितां येते. याच्या पद्धतीनें गाई, कोंबड्या वगैरे दुसऱ्या प्रकारच्या बनविण्यांत आल्या आहेत. तसेंच गहू वगैरे धान्येंहि बदलण्यांत आलीं आहेत.

दहावा शास्त्रज्ञ पास्टूर हा आहे. यानें जंतु शास्त्राचा शोध लावला.

मनुष्याच्या शरीरांत जंतु झाल्यामुळें तो आजारी पडतो व मृत्युमुखीं पडतो. या शत्रूंना हटवावयाचें असेल तर शरीरांत लस टोचणें जरूर आहे असें याचें मत होतें, यानीं वैद्यकशास्त्रांत मोठी क्रांती घडवून आणली. आज काल जो लस टोंचण्याचा प्रकार सर्वत्र चालू आहे त्याचा आद्य पुरस्कर्ता हाच होता.

मॅडम करी, जगदीशचंद्र बोस वगैरेंचा यांत अंतर्भाव केला नाहीं. कारण त्यांचे सिद्धांत अद्याप जुने झाले नसल्यामुळें त्याविषयीं सध्यां उल्लेख न केलेला बरा.

---

# शालापत्रकाची चढाओढ.

**मागील कोड्यांचीं उत्तरें खालीलप्रमाणें आहेतः—**

विश्वासराव नटेश्वर किंवा नटेशराव.

१ रामकृष्ण गोविंद धावळे. ( १ )*
२ शांताराम पुंडलीक नाईक. ( २ )
३ बाळकृष्ण अनंत वाळे. ( २ )
४ निलकंठ सदाशिव देव. ( २ )*
५ दत्तात्रय गणेश भागवत. ( २ )*

मागील खेपेस दिलेल्या कोड्यांत शेवटच्या कोड्यांत " त " जास्त पडल्याकारणानें दोनच कोड्यांचा विचार करून त्यावरून निकाल लागला आहे.

२।३।४।५ या नंबरांचीं उत्तरें बरोबर आहेत.

**लहान मुलांकरितां.**

१ साळपीस, साळ, ससा, साप, पिंगुळ.
२ तितीर, मोर,
३ ससाणा, ससा, तरस,

या दहा उत्तरांपैकीं, खालील मुलांचीं उत्तरें कंसांत दाखविलेलीं बरोबर आहे.

(१) रा. गो. धावळे. (४) *
(२) रा. ना. साळी, (४) *
(३) गो. गो. पेंढरकर. (२) *
(४) भीकचंद रुपचंद शेट (४)
(५) दत्तात्रय गणेश भागवत (३) *
(६) वामन परशुराम कुंटे. (४) *

*सोबत कुपन नसल्यामुळें बक्षीस देता येत नाहीं.

**बक्षीसें.**

**सर्वांकरितां.**

(२) अर्वाचिन महाराष्ट्र.
(३) विद्वत्त्व कवित्त्व व वक्तृत्त्व

**मुलांकरितां.**

(४) लक्ष्मीपूजन अथवा भाऊबीजेची ओंवाळणी.

## नवीं कोडीं.

**सर्वांकरितां.**

खालील नांवें ओळखा. त्यांत आडनांवेंहि आहेत. स्वर फक्त गाळले आहेत.

र र प क ग न
र य ध व द
र त

## मुलांकरितां.

खालील वाक्यांत काय चूक आहे तें सांगा.

" आषाढ वद्य १० मीस गोविंदा चांदण्यांत हिंडत होता, व तारीचया लग्नानिमित्त पुष्कळ लोक जमले होते, याची त्याला बिलकूल दादच नव्हती.

मोत्याच्या गळ्यांतील पट्ट्यावरून हा बिनवारशी कुत्रा आहे असें चोरांनीं ताडलें व तो आपल्या अंगावर भुकला म्हणून पोलीसाकडे नेलें.

दुपारची वेळ होती. आगगाडी इतकी वेगांत असतां कां थांबली याचें त्याला कारण समजेना. इतक्यांत तो डोकावून पहातो तों नभप्रदेशांत चमकणारा सिग्नलाचा हिरवा कंदील त्याच्या दृष्टीस पडला.

---

## शास्त्रीय गंमत

( ले०—गणेश महादेव केळकर. )

हवेच्या दाबासंबंधानें शाळांतून पुष्कळ प्रयोग करून दाखवितात.

तरी त्या संबंधांचीच एक गंमतीची माहिती शालापत्रकाचे वाचकांकरितां सादर करितों.

प्रथम हवेच्या दाबाची माहिती थोडक्यांत देतों. म्हणजे पुढील प्रयोग समजण्यास ठीक पडेल.

दोन्ही तोडांस उघडी अशी कांचेची किंवा चिनयाची नळी घेऊन ती पाण्यांत उभीच्याउभी बुडवावी आणि वर काढतांना तिच्या वरच्या टोंकावर बोट ठेवावें म्हणजे आंतील पाणी गळत नाहीं. किंवा तांब्या भरून त्यावर ओलें फडकें घालावें म्हणजे तांब्यातील पाणी मुळींच गळत नाहीं.

असे आणखी पुष्कळ प्रयोग करतां येतील. परंतु या सर्वांस कारण त्यावरील हवेचा दाब हें होय. आणि तो सर्व दिशांनी कार्य करतो. तो दर चौरस इंचावर १५ पौंडांचा असतो. वर सांगितलेल्या प्रयोगांत जें पाणी तोललें जातें त्याची जास्तींत जास्त उंची २९ फूट असूं शकेल.


येथें जें चित्र दिलें आहे त्यास मराठींत थांबून थांबून सुरू होणारें कारंजें म्हणतात. वर चित्रांत जो सर्वांच्यावर ' अ ' हा गोळा दाखविला आहे तो पोकळ असून त्यांत ' ब ' ही पोकळ नळी त्याच्या आंत अगदीं वरच्या भागापावेतों असून ती त्यांत अगदीं पक्की बसविलेली आहे. आणि त्या गोळ्यास 'ई' या ठिकाणीं एक छिद्र आहे.

आतां ती नळी ' क ' या भांड्यावर एक आडवें

---

| कुपन | कुपन |
|---|---|
| सर्वांकरितां | मुलांकरितां |
| नोव्हेंबर १९२३. | नोव्हेंबर १९२३. |

लांकडाचे पटीस भोंक पाडून त्यांत ती पोकळ नळी गोळ्यासकट उभी बसवितां व काढतां येतें. मात्र त्या नळीचें टोंक ' क ' या भांड्याच्या अगदीं तळा पावेतों गेलेलें नाहीं. ' क ' या भांड्यास ' फ ' या




ठिकाणीं एक छिद्र आहे मात्र तें अ या गोळ्यास जें छिद्र आहे. त्यापेक्षां लहान आहे.

आतां प्रयोगासाठीं आपण वरचा गोळा नळी-सकट निराळा काढूं आणि त्यांत नळीच्या भोंकांतून पाणी ओतूं म्हणजे तो गोळा पाण्यानें नळीचें तोंडा पावेतों भरेल नंतर गोळ्याचे ' ई ' या छिद्रावर बोट ठेऊन गोळा तसा ब क या भांड्यावरचे फळीवर बसवूं आणि क भांडें पाण्यानें भरूं आणि आतां ' ई ' या छिद्रावरचा हात लागलाच काढला तरी पाणी ' ई ' या छिद्रांतून मुळींच गळणार नाहीं. कारण नळीचे खालचें तोंड अगदीं बंद पाणी लागल्यामुळें झालें आहे आणि त्या मुळें ' ई ' या तोंडांतून पाणी पडत नाहीं मात्र आतां ' क ' या भांड्याला ' फ ' हें भोक आहे त्यांतून ' क ' भांड्यांतील पाणी बाहेर जात आहे. पाणी जाता जातां तें नळीच्या तोंडाचे खालीं गेलें म्हणजे त्यांतून हवा आंत शिरेल. आणि ' ई ' या तोंडांतून पाणी बाहेर पडूं लागेल. आणि पाणी बाहेर पडूं लागलें म्हणजे ' क ' हें भांडें भरेल म्हणजे पुन्हां ' ई ' तोंडांतून गळणारें पाणी बंद होईल आणि हें असे वरच्या भांड्यांतील पाणी संपे-पावतों चालेल. यासच थांबून थांबून सुरू होणारें कारंजें किंवा इंग्रजींत ( इंटरमिटंट फौंटर ) म्हणतात

ज्याला याची माहिती नाहीं त्या मनुष्याला हा एक मोठा चमत्कार वाटतो.

हा प्रयोग सर्वांसही थोड्याशा खर्चांत करून पाहातां येण्यासारखा आहे. एकादा सुकलेले नारळाचा बेला घ्यावा. त्यांत चिव्याची नळी घालावी आणि सुताराकडून एक होडी किंवा दुसरें एकादें लांकडी पात्र करून घ्यावें. त्यांत एक फळी बसवून वर दिल्याप्रमाणें प्रयोग करून अनुभव घ्यावा. अशी लेखकाची विनंति आहे.

# जोडाक्षर-विरहित वाचनपाठ.

हें पुस्तक नुकत्याच अक्षर ओळख झालेल्या मुलांमुलींकरितांच लिहिलेलें आहे. पुस्तकांत एकंदर १७ गोष्टी अगदीं सोप्या भाषेंत, व एकहि जोडाक्षर न येऊं देतां लिहिल्या आहेत. प्रत्येक गोष्टीचे आरंभीं कथानकाचें मूर्तिमंत चित्र दिलें असल्यामुळें गोष्ट वाचण्याचे अगोदरच त्यांतील सारांश मुलांचे सहज लक्षांत येतो. किं. अवघी चार आणे.

# उजळणीचें पुस्तक.

ह्यांत सर्व मुळाक्षरें चित्रयुक्त दिलीं असून मोडी व बालबोध बाराखड्या तयार करण्याची समजूत थोडक्यांत करून दिली आहे. नंतर मोडी व बालबोध सोपे शब्द मुलांना सहज ओळखण्यासारखे दिले आहेत. पुढें १० अंक सचित्र दिले असून त्यांबरोबरच मुलांस बेरीज व वजाबाकीची समजूत टिंबांच्या आकृतींनी व गोट्यांच्या चौकटीच्या सहाय्यानें घालून दिली आहे. नंतर पाढ्यांची समजूत दिली असून शेवटीं उजळणी दिली आहे. एकंदरींत हें पुस्तक नवीन तऱ्हेनें मुलांना शिकविण्यास फार उपयुक्त असें झालें आहे. कागद ग्लेज किं. ८१८६.

### लहान मुलांकरितां उपयुक्त अशीं पुस्तकें.

## नवी आवृत्ति ] सचित्र अक्षरबोध. [ नवी आवृत्ति

या पुस्तकांत 'अ' पासून 'ज्ञ' पर्यंत स्वर आणि व्यंजनें हीं सर्व निरनिराळ्या भपकेदार रंगांत व तें अक्षर नांवाच्या प्रथम अक्षरानें दर्शविणाऱ्या चित्रांसह दाखविलेलीं असून १ पासून १० पर्यंत अंकहि वरील पद्धतीनें दाखविलेले आहेत. पुस्तकाचा स.ईज क्राऊन चतुर्थांशाइतका मोठा ७×९ इंच ठेवला असल्यामुळें अक्षरें व चित्रें फारच सुबक व मोठीं अशीं झालीं आहेत. एकंदर पुस्तक इंग्रजींतील सचित्र रंगीत ए बी सी डी शिकण्यास उपयोगी अशा पुस्तकाच्या धर्तीवर तयार केलें असल्यामुळें हें पुस्तक लहान मुलांस फारच आवडून त्यावरून तीं आपला धडा सहज शिकतात. किं. ८८.

## भाग १ ते ६ ] चिमुकल्या गोष्टी. [ भाग १ ते ६

ह्या गोष्टींत रोज व्यवहारांत घडणाऱ्याच गोष्टी दिलेल्या आहेत, पण त्या इतक्या मोहक, मनोरंजक व मार्मिक लिहिल्या आहेत कीं, त्या गोष्टींतील तत्त्वबोध गोष्टी वाचतां वाचतांच मुलांच्या मनावर सहज ठसला जातो. पुस्तक वळीक टाइपांत सुंदर जाड व ग्लेज कागदावर छापिलेलें असून प्रत्येक गोष्टीचे प्रारंभीं कथानकाचें सुंदर चित्र दिलेलें आहे. एकंदर ह्या गोष्टीचे सहा भाग आहेत. प्रत्येक भागांत दहा गोष्टी सचित्र आहेत, प्रत्येक भागास किं. ८४.

**मिळण्याचें ठिकाण**—म्यानेजर—चित्रशाळा प्रेस, पुणें.

॥ ॐ नमः श्रीरामचंद्राय ॥

# आर्यमहौषधालय मु० पो० आंजर्ले.

**कोंकणप्रांतांतील अगदीं ताज्या व शुद्ध वनस्पतींचीं जगत्प्रसिद्ध निर्दोष व रामबाण औषधें.**

**कंदर्पमंजरी पाक**— हा अपूर्व पाक गरिबांपासून तों अमीरउमरावांपर्यंत सर्वांसही अत्यंत उपयोगी असून किंमत माफक ठेविली आहे. यांत मौक्तिक, प्रवाळ लोह, माक्षिक, कस्तूरी, अंबर इ० अत्युच्च गुणकारक पदार्थ असून शिवाय बदाम, पिस्ते, अक्रोड चारोळी, केशर, वेलची, पंजाबी सालममिश्री, सफेतमुसळी, पत्री, गोक्षुर, शतावरी, आस्कंद, वंशलोचन वगैरे (८०) उपयुक्त वनस्पति घातलया आहेत. यानें पथ्यावांचून गुण येतो. यापासून कोणत्याही कारणांनीं होणारा व कशाही प्रकारचा शुक्रस्राव, नपुंसकत्व, मूळव्याधि, रक्तदूषणामुळें त्वगरोग, स्त्रियांची धुपणी व गर्भाशयस्थ दोष या भावना त्यांच्या एकंदर उपविकारांसह तत्काल बऱ्या होऊन धातुवृद्धि होते, व शरीर कणखर आणि तेजस्वी बनतें. २० तो० ड० २ रुपये. एकदम ३ डबे घेणारास ५ रुपये.

**स्वर्णधात्री तेल**— हें चारोळी, बदाम, कंकोळ, एला, बहुविध वनस्पतींचीं सत्वें व उपयुक्त तेलें अशा अनेक पदार्थांनीं बनविलें असल्यानें याच्या मर्दनापासून अपस्मार, उन्माद, वेड, चक्कर इ० रोगांस जलद आराम पडतो. केंसांस चोळल्यानें केंस काळे कुळकुळीत, तजेलदार, सडक लांब व मृदु होऊन मेंदु शांत आणि रोगरहित बनतो. यानें मस्तकाचें टक्कल जातें. हें अंगास चोळून स्नान करीत गेल्यानें शरीराचा दुर्गंध जातो. खरूज गजकर्ण, शिवें, तसेंच तळपाय, तळहात, डोळे व मस्तक यांचा दाह हे विकार खास बरे होऊन निद्रा चांगली येते, आणि नेत्ररोग दुरुस्त होतात. बा० किं० १। रु०

**दंतरक्षक पूड**— ही दांत व हिरड्या यांचे सर्व विकार तत्काल दुरुस्त करून दांत स्वच्छ व मजबूत करण्यांत प्रतिज्ञेची आहे. ड. ६ आणे.

**सुरंगी, मालती, कल्हार, गुलबहार, दणाणा, लक्ष्मीविलास** इ० बादशाही अति उंची अत्तरें व त्याचप्रमाणें गुलाब, हिना, केवडा, चमेली, जाई वगैरे सुगंधी अत्तरें आणि केंसांस लावण्याचीं हरएक प्रकारचीं सुवासिक तेलें माफक दरानें पूर्ण खात्रीचीं मिळतील.

**सूचना:**—वरील औषधें व अत्तरें वगैरे पूर्ण खात्रीचीं असल्यामुळें आज पंचवीस वर्षांत त्यांचा लक्षावधि लोकांस अप्रतिम उपयोग झाला म्हणून त्यांचा नेहमीं फारच खप होत आहे. अनुभवानंतर पूर्ण खात्री पटेलच. औषधें माहितीने खर्च्यासह रोखीनें अगर व्ही. पी. नें पाठवूं. प्याकिंग व टपाल खर्च वेगळा. घाऊक घेणारास कमिशन भरपूर. सर्व औषधांच्या आणि आरोग्यरक्षणाच्या माहितीचें सचित्र मोठें पुस्तक देऊं. आमचीं औषधें वगैरे मागविणें तीं खालील बिनचूक पत्त्यावर मागवावीं.

**कृष्णशास्त्री बिवलकर, वैद्य.**

REGISTERED B. NO. 179




पुस्तक ३४. डिसेंबर सन १९२३. अंक १२.

विषय. पृष्ठ.


| | |
|---|---|
| शिक्षणांतील कांहीं प्रधान गोष्टी. | २२१ |
| दीनोद्धार. ( नाटक ) | २२४ |
| मृगशीर्ष. | २२८ |
| ज्युरीपुढील प्रसंग. ( चुटका ) | २२९ |
| शेतकरी व नाग | २३० |
| चांभार. | २३१ |
| उंदराचें चातुर्य | २३२ |
| फक्त शहाण्यांनींच वाचावें. | २३३ |
| शास्त्रीय माहिती. / नखें भविष्य सांगतात. | २३४ |
| मौज, मजा आणि गंमत. | २३५ |
| जगाद्विख्यात वाचनालयें. | २३७ |
| शालापत्रकाची चढाओढ. | २४० |


मुद्रक व प्रकाशक—रा. रा. शंकर नरहर जोशी, चित्रशाळा प्रेस १०२६ सदाशिव पेठ, पुणें सिटी

# जोडाक्षर-विरहित वाचनपाठ.

हें पुस्तक नुकत्याच अक्षर ओळख झालेल्या मुलांमुलींकरितांच लिहिलेलें आहे. पुस्तकांत एकंदर १७ गोष्टी अगदीं सोप्या भाषेंत, व एकहि जोडाक्षर न येऊं देतां लिहिल्या आहेत. प्रत्येक गोष्टीचे आरंभीं कथानकाचें मूर्तिमंत चित्र दिलें असल्यामुळें गोष्ट वाचण्याचे अगोदरच त्यांतील सारांश मुलांचे सहज लक्षांत येतो. किं. अवघी चार आणे.

# उजळणीचें पुस्तक.

ह्यांत सर्व मुळाक्षरें चित्रयुक्त दिलीं असून मोडी व बाळबोध बाराखड्या तयार करण्याची समजूत थोडक्यांत करून दिली आहे. नंतर मोडी व बालबोध सोपे शब्द मुलांना सहज ओळखण्यासारखे दिले आहेत. पुढें १० अंक सचित्र दिले असून त्यांबरोबरच मुलांस बेरीज व वजाबाकीची समजूत टिंबांच्या आकृतींनी व गोट्यांच्या चौकटीच्या सहाय्यानें घालून दिली आहे. नंतर पाढ्यांची समजूत दिली असून शेवटीं उजळणी दिली आहे. एकंदरींत हें पुस्तक नवीन तऱ्हेनें मुलांना शिकविण्यास फार उपयुक्त असें झालें आहे. कागद ग्लेज किं. ‍‍८१८६.

## लहान मुलांकरितां उपयुक्त अशीं पुस्तकें.

## नवी आवृत्ति ] सचित्र अक्षरबोध. [ नवी आवृत्ति

या पुस्तकांत 'अ' पासून 'ज्ञ' पर्यंत स्वर आणि व्यंजनें हीं सर्व निरनिराळ्या भपकेदार रंगांत व तें अक्षर नांवाच्या प्रथम अक्षरानें दर्शविणाऱ्या चित्रांसह दाखविलेलीं असून १ पासून १० पर्यंत अंकहि वरील पद्धतीनें दाखविलेले आहेत. पुस्तकाचा साईज क्राऊन चतुर्थांशाइतका मोठा ७×९ इंच ठेवला असल्यामुळें अक्षरें व चित्रें फारच सुबक व मोठीं अशीं झालीं आहेत. एकंदर पुस्तक इंग्रजींतील सचित्र रंगीत ए बी सी डी शिकण्यास उपयोगी अशा पुस्तकाच्या धर्तीवर तयार केलें असल्यामुळें हें पुस्तक लहान मुलांस फारच आवडून त्यावरून तीं आपला धडा सहज शिकतात. किं. ‍८८.

## भाग १ ते ६ ] चिमुकल्या गोष्टी. [ भाग १ ते ६

ह्या गोष्टींत रोज व्यवहारांत घडणाऱ्याच गोष्टी दिलेल्या आहेत, पण त्या इतक्या मोहक, मनोरंजक व मार्मिक लिहिल्या आहेत कीं, त्या गोष्टींतील तत्त्वबोध गोष्टी वाचतां वाचतांच मुलांच्या मनावर सहज ठसला जातो. पुस्तक नवीन टाइपांत सुंदर जाड व ग्लेज कागदावर छापिलेलें असून प्रत्येक गोष्टीचे प्रारंभीं कथानकाचें सुंदर चित्र दिलेलें आहे. एकंदर ह्या गोष्टींचे सहा भाग आहेत. प्रत्येक भागांत दहा गोष्टी सचित्र आहेत, प्रत्येक भागास किं ‍८४.

**मिळण्याचें ठिकाण**—म्यानेजर—चित्रशाळा प्रेस, पुणें.

# मराठी शालापत्रक


येथें शब्द नाहीं शिष्यासी । हें अवघें सद्गुरूपणीं ।
सद्गुरु पालटी अवगुणांसी । नाना यत्नें करोनी ॥
जें कांहीं आपणास ठावें । तें हळु हळु शिकवावें ।
शहाणें करून सोडावें । सकळां जनां ॥ १ ॥

—रामदास.


पुस्तक ३४. डिसेंबर सन १९२३. अंक १२


## शिक्षणांतील कांहीं प्रधान गोष्टी.

निरनिराळ्या देशांत शिक्षणाच्या पद्धती निरनिराळ्या आहेत, हें आजकाल वर्तमानपत्रें, नियतकालिकें वाचणारांस सांगण्याची जरूरी नाहीं. निरनिराळ्या विश्वविद्यालयांत ह्या विषयाची बरीच घोषणा चाललेली आहे आणि शिक्षण मंत्री आपआपल्या मगदुराप्रमाणें त्या प्रश्नाची चर्चा करीत आहेत. माझ्या मुलांस विशिष्ट प्रकारचें शिक्षण पाहिजे असा हट्ट युरोपांतील आणि अमेरिकेंतील देशांत जर एखादा पालक करूं लागला तर त्याचा हट्ट पर्यायेनें चालूं शकतो. ह्यास अनेक कारणें आहेत, त्यांतील मुख्य कारण म्हटलें म्हणजे, तीं राष्ट्रें स्वतंत्र आहेत. त्यांतील प्रत्येक व्यक्ती मी स्वातंत्र्याचा भोक्ता असल्यामुळें माझ्या मनास, जें पटत असेल तेंच मी करणार असे प्रतिपादन करूं शकते. 'I am a Roman' ( मी रोमचा नागरीक आहें ) असे रोमन पातशाही भरज्वारींत असतां त्या राज्याचा प्रत्येक रहिवासी सांगत असे ह्या उक्तींत दर्पोक्तीची थोडी छटा आहे हें कोणीहि कबूल

# जोडाक्षर-विरहित वाचनपाठ.

हें पुस्तक नुकत्याच अक्षर ओळख झालेल्या मुलांमुलींकरितांच लिहिलेलें आहे. पुस्तकांत एकंदर १७ गोष्टी अगदीं सोप्या भाषेंत, व एकहि जोडाक्षर न येऊं देतां लिहिल्या आहेत. प्रत्येक गोष्टीचे आरंभीं कथानकाचें मूर्तिमंत चित्र दिलें असल्यामुळें गोष्ट वाचण्याचे अगोदरच त्यांतील सारांश मुलांचे सहज लक्षांत येतो. किं. अवघी चार आणे.

# उजळणीचें पुस्तक.

ह्यांत सर्व **मुळाक्षरें चित्रयुक्त** दिलीं असून मोडी व बाळबोध **बाराखड्या** तयार करण्याची समजूत थोडक्यांत करून दिली आहे. नंतर मोडी व बाळबोध **सोपे शब्द** मुलांना सहज ओळखण्यासारखे दिले आहेत. पुढें **१०** अंक सचित्र दिले असून त्यांबरोबरच मुलांस बेरीज व वजाबाकीची समजूत टिंबांच्या आकृतींनीं व गोटयांच्या चौकटीच्या सहाय्यानें घालून दिली आहे. नंतर पाड्यांची समजूत दिली असून शेवटीं उजळणी दिली आहे. एकंदरींत हें पुस्तक नवीन तऱ्हेनें मुलांना शिकविण्यास फार उपयुक्त असें झालें आहे. कागद ग्लेज किं. ८१८६.

## लहान मुलांकरितां उपयुक्त अशीं पुस्तकें.

## नवी आवृत्ति ] सचित्र अक्षरबोध. [ नवी आवृत्ति

या पुस्तकांत ' अ ' पासून ' ज्ञ ' पर्यंत स्वर आणि व्यंजनें हीं सर्व निरनिराळ्या भपकेदार रंगांत व तें अक्षर नांवाच्या प्रथम अक्षरानें दर्शविणाऱ्या चित्रांसह दाखविलेलीं असून १ पासून १० पर्यंत अंकहि वरील पद्धतीनें दाखविलेले आहेत. पुस्तकाचा साईज क्राऊन चतुर्थांशाइतका मोठा '७×९ इंच ठेवला असल्यामुळें अक्षरें व चित्रें फारच सुबक व मोठीं अशीं झालीं आहेत. एकंदर पुस्तक इंग्रजींतील सचित्र रंगीत ए बी सी डी शिकण्यास उपयोगी अशा पुस्तकाच्या धर्तीवर तयार केलें असल्यामुळें हें पुस्तक लहान मुलांस फारच आवडून त्यावरून तीं आपला धडा सहज शिकतात. किं. ८८.

## भाग १ ते ६ ] चिमुकल्या गोष्टी. [ भाग १ ते ६

ह्या गोष्टींत रोज व्यवहारांत घडणाऱ्याच गोष्टी दिलेल्या आहेत, पण त्या इतक्या मोहक, मनोरंजक व मार्मिक लिहिल्या आहेत कीं, त्या गोष्टींतील तत्त्वबोध गोष्टी वाचतां वाचतांच मुलांच्या मनावर सहज ठसला जातो. पुस्तक वळीक टाइपांत सुंदर जाड व ग्लेज कागदावर छापिलेलें असून प्रत्येक गोष्टीचे प्रारंभीं कथानकाचें सुंदर चित्र दिलेलें आहे. एकंदर ह्या गोष्टीचे सहा भाग आहेत. प्रत्येक भागांत दहा गोष्टी सचित्र आहेत. प्रत्येक भागास किं ८४.

**मिळण्याचें ठिकाण**—म्यानेजर–चित्रशाळा प्रेस, पुणें.

# मराठी शालापत्रक


येथें शब्द नाहीं शिष्यासी । हें अवघें सद्गुरूप शीं ।
सद्गुरु पालटी अवगुणांसी । नाना यत्नें करोनी ॥
जें कांहीं आपणास ठावें । तें हळु हळु शिकवावें ।
शहाणें करून सोडावें । सकळा जनां ॥ १ ॥

—रामदास.


पुस्तक ३४. डिसेंबर सन १९२३. अंक १२


## शिक्षणांतील काहीं प्रधान गोष्टी.

निरनिराळ्या देशांत शिक्षणाच्या पद्धती निरानिराळ्या आहेत, हें आजकाल वर्तमानपत्रें, नियतकालिकें वाचणारांस सांगण्याची जरूरी नाहीं. निरनिराळ्यां विश्वविद्यालयांत ह्या विषयाची बरीच घोषणा चाललेली आहे आणि शिक्षण मंत्री आपआपल्या मगदुराप्रमाणें त्या प्रश्नाची चर्चा करीत आहेत. माझ्या मुलांस विशिष्ट प्रकारचें शिक्षण पाहिजे असा हट्ट युरोपांतील आणि अमेरिकेंतील देशांत जर एखादा पालक करूं लागला तर त्याचा हट्ट पर्यायेनें चालूं शकतो. ह्यास अनेक कारणें आहेत, त्यांतील मुख्य कारण म्हटलें म्हणजे, तीं राष्ट्रें स्वतंत्र आहेत त्यांतील प्रत्येक व्यक्ती मी स्वातंत्र्याचा भोक्ता असल्यामुळें माझ्या मनास, जें पटत असेल तेंच मी करणार असे प्रतिपादन करूं शकतें. ‘ I am a Roman ’ ( मी रोमचा नागरीक आहें ) असे रोमन पातशाही भरज्वानींत असतां त्या राज्याचा प्रत्येक रहिवासी सांगत असे ह्या उक्तींत दर्पोक्तीची थोडी छटा आहे हें कोणीहि कबूल

करील, पण ही उक्ती पूर्ण स्वाभिमान दर्शक आहे हेहि त्यांनाच काय पण आपणासहि कबूल करावें लागेल. स्वाभिमान सर्वांना असावा हें इष्ट आहे, स्वाभिमानाच्या भावना जितराष्ट्रांतील स्त्री-पुरुषांच्या अंगीं असल्या काय आणि नसल्या काय एकच आहे. कसें तें पहा. पाश्चात्त्य राष्ट्रांतिल प्रत्येक सुविद्यच काय पण अर्धं मुर्धं शिक्षण गृहण केलेला गृहस्थ आज तिकडे म्हणत आहे कीं, 'माझ्या मुलास भाराभर पुस्तकें निष्कारण मी कधींही वाचूं देणार नाहीं.' तिकडील नागरीक म्हणतात ' प्रथमतः **आमच्या मुलांच्या शक्तीचा जेणें करून ऱ्हास होणार नाहीं** अशा गोष्टिकडेच आम्ही लक्ष देऊं, येथें साहजीकपणेंच प्रश्न उद्भवतात कीं, मुलाच्या शक्तीचा ऱ्हास करणाऱ्या गोष्टी तर कोणत्या आहेत ? त्यास मला एवढेंच उत्तर द्यावयाचें आहे कीं, आजकाल जीं ठराविक पेयें बाजारांत अथवा घरांत मोठ्या हौसेनें देण्यांत येतात, तीं निदान १९ वर्षांच्या आंतील मुलांना अथवा मुलींना देऊं नयेत. या उप्पर द्यावयाचींच झालीं तर नियमानें दररोज तरी देऊं नयेत. धंद्या-निमित्त प्रस्तुत लेखकाचा प्रवास बहुतेक सर्व हिंदु-स्थानभर व इराणाच्या आखातांत आंत बऱ्याच खोल भागापर्यंत झालेला आहे, व सामान्य जनतेच्या राहणीचें वेळोवेळीं निरीक्षणाहि झालें आहे. शिक्षणा-संबंधी. मुलाबाळांच्या जोपासनेसंबंधीं जेव्हां जेव्हां माझ्या सान्निध्यांत सुशिक्षित असे लोक (स्त्री-पुरुष) येत असत तेव्हां तेव्हां ह्या जिव्हाळ्याच्या प्रश्नां-संबंधीं मी उहापोह करीत असून त्यांचीं मतें माझ्या रोजनिशींत टिपल्यावांचून कधींहि मी राहत नसे. एकदा एक बव्हेरिया प्रांतांतील ७५ वर्षांचा गृहस्थ मला १९१६ सालीं एडन येथें बोटीवर भेटला. सुदेवानें म्हणा, चुकून म्हणा हा गृहस्थ ब्रिटीशांचा कैदी झाला नव्हता त्यावेळीं आमचें त्याचें भाषण होऊन मी त्यांस सहजासहजीं प्रश्न विचारला कीं, " आपण आपल्या देशांत लहान मुलांना शाळेंत जाण्यापूर्वीं सकाळीं खावयास कोणकोणते पदार्थ अथवा पेयें देतां " ? ह्यावर त्यानें सांगितलें कीं, एकोणीस वर्षांच्या आंतील मुलांना-मग तीं शाळेंत असोत कीं फॅक्टरी अक्टाप्रमाणें कोणत्याहि कारखान्यांत काम करीत असोत—**चहा म्हणून आम्ही देत नाहीं.** तुमच्या हिंदुस्थानांतील चहा फारच मादक असतो. तो सतत घेतल्यानें अंगांतील ओजस्विता नाहींशी होऊन **ब्रह्मचर्य नष्ट होतें,** असें आमच्या देशांतिल वैद्यांनीं व डाक्टर्सनीं ठरविलें आहे. हेंच काय, पण दररोज सकाळीं रिकाम्यापोटीं तरूण विद्यार्थी अथवा विद्यार्थिनींनीं चहा घेऊं लागल्यास त्यांची तिसरी पिढी खात्रीनें संतती विहीन होते. थोडक्यांत सांगावयाचें म्हणजे त्यांचा वंश खुटतो. चहांत अंश रूपानें विद्यमान असणारें टॅनिन इतकें घातुक आहे. सकाळीं लोणी, तूप किंवा गव्हांचा ज्ञाडाभरडा अंश पोटांत जात असेल तरच चहा आपले घातुक परिणाम प्रकृतिवर फारसे करणार नाहीं. जवळ जवळ अर्धा लाख गाईंची कत्तल तुमच्या हिंदु-स्थानांत दरवर्षीं होत आहे तेव्हां तुमच्या मुलांना दूध आतां औषधापुरतेंच मिळणार हें माझ्या सारख्या परकियाला देखील कळत आहे. आमच्या राजानें अशा तऱ्हेच्या पेयांस शक्य तों आळा घालावा म्हणून कायद्यानें निर्बंध घातले आहेत. चहाचे ऐवजीं आम्ही कॉफी पीतों आणि मुलांना ती देतों किंवा कांजी सारखीं पेयें किंवा जाडी भरडी रोटी लोणी लावून देतों. हिंदुस्थानांत मुलांच्या शक्तीचा ऱ्हास ह्या पेयांनीं किती भयंकर झालेला आहे ह्याची तुमच्या सरकारला व तुमच्या पुढा-ऱ्यांना जाणीव उत्पन्न होत नाहीं हें तुमच्या राष्ट्राचें दुर्दैव होय ! फ्रान्स व जर्मनी येथील सरकार अशा बाब-तींत फार काळजी घेत आहे. तो इतके देखील

म्हणाला कीं, तुमच्या देशांत इतक्या प्रकारचीं उत्तमोत्तम कडधान्यें आहेत कीं त्यांच्या गुणांसंबंधानें तुम्हांस अजून खरी कल्पनाच नाहीं. 'उसळी किंवा इतर धान्यांपासून निघणारे सांज्या सारखे जाडेभरडे पदार्थ मुलांना कां देत नाहीं ? असे उन्ह उन्ह पदार्थ सकाळीं द्यावेत आणि त्यावर यथेच्छ पाणी प्या म्हणून त्यांना सांगावें. असा अनुभव १।२ महिने घेऊन पहा म्हणजे तीं कशीं सतेज दिसतील हें तुमचे तुम्हांसच कळून येईल. " ह्यांतून आतां आपण काय शिकावयाचें किंवा मुलांसंबंधीं कसें वागावयाचें हें ज्याचे त्यानेंच पहावें.

असो; आतां दुसऱ्या एका प्रधान गोष्टीकडे वळूं. आपापल्या सांपत्तिक स्थितीच्या मानानें जो तो आपल्या मुलाच्या शिक्षणाकडे पहात असून त्यास होता होईल तों जास्त शिकवावें म्हणून मनापासून झटत असतो. हें शिक्षण देत असतांना कित्येक वेळां शिक्षणक्रम अजिबात बदलावयाची पाळी येणें हा प्रसंग जो ओढवतो तो सामाजिक स्थित्यंतरामुळें नव्हे, तर पालटलेल्या राजकीय परिस्थितीमुळें होय. पांढरपेशांतील ज्या मुलांमुलींचें जनन झालें असेल त्यांतील पालकांनीं आपल्या बालकांस ठराविक उच्च प्रतीचें शिक्षण देण्याच्या भानगडींत फारसें न पडतां ज्या धंदेशिक्षणामुळें मुलें स्वतःच्या पायावर लवकर उभीं राहूं शकतील असेंच शिक्षण आतां द्यावयास पाहिजे. "Learning must have earning power" अशा प्रकारची ओरड विलायतेंत सर ऐझाक-पिटमन्‌सारखे गजांत लक्ष्मीवाले म्हणत आहेत. मातीकाम, कांच काम, कोळशाच्या खाणी, मॅंगनीजच्या खाणी, ताग, पत्रें व रंग तयार करणाऱ्या कारखान्यांत इतस्ततः पांढरपेशांनीं आपलीं मुलें पाठवावयास पाहिजेत. तरच दहा पांच वर्षांनीं आपला कांहीं तरी तरणोपाय आहे. आतां चुकलांत कीं सर्वस्वी मुकलांत म्हणून समजा. 'हरळीची मुळी खुडून खाऊन माझा शिंदू राहील तर जन्मभर त्यास भाकरीची ददात पडणार नाहीं.' ही भाषा आतां पुरे. हें मी सामान्य जनतेसंबंधीं लिहीत आहें. ईशकृपेनें ज्यांची सांपत्तिक स्थिति उत्तम असेल त्यांना हवे ते मार्ग आहेत. पण ह्याहि लोकांनीं हें ध्यानांत ठेवावयास पाहिजे कीं मुलगा सामान्य बुद्धीचा असेल, म्हणजे अर्थात् कल्पक नसेल—तर अशा मुलाच्या पायीं शिक्षणांत परदेशीं हजारों रुपये खर्च करण्यापेक्षां ह्या देशांत त्या पैशानें कारखाने चालविलेले बरें.

तिसरी आणि शेवटची पण महत्त्वाची गोष्ट अशी कीं, मुलांना थोडें कळूं लागतांच (अर्थात् प्राथमिक शिक्षण झाल्यानंतर) त्यास रोजनिशी लिहिण्यास जरूर प्रवृत्त करावें. मनुष्यास आपला जय कळण्यापेक्षां अपजय कोठें होत असतो हें क्रमशः कळत गेलेलें बरें. कारण त्यापासून चुकांची दुरुस्ती होऊन तो आपला मार्ग सुधारूं लागतो. सकाळीं पांच वाजल्यापासून रात्रौ ८।९ वाजेपर्यंत 'तुझ्या हातून ज्या चुका होतील किंवा प्रसंगोपात्त कोणावर उपकार होईल, किंवा रस्त्यावर अथवा खेळण्याचे जागीं जे बरे वाईट प्रसंग घडून येतील त्यांचा अत्यंत त्रोटक वाक्यांत इतिहास लिहीत चल' म्हणून प्रत्येक आईबापानें आपल्या मुलांमुलींस दररोज बजावित जावें. त्यांच्या वयाच्या बावीसपर्यंत ही शिस्त त्यांना जरूर लावून द्यावी. त्यांना आपलें मत आवडो वा नावडो पण साम, दाम, दंड, भेद हे प्रकार दाखवून पण विशेषतः त्यांच्याशीं गोडीच ठेवून ह्या मार्गास त्यांना प्रवृत्त करावें. चुकांची दुरुस्ती करणें हीच मनुष्याची खरी प्रगती आहे. पूर्वीची—आपली स्नानसंध्या, अल्प जपजाप्य, नमस्कार, रात्रौ आजिबाईच्या नीतिप्रवर्तक गोष्टी—ही दिनचर्या फार प्रशंसनीय होती, त्यामुळें घरांतील मुलें धार्मिक प्रवृत्तीची राहून वाडवडिलांचा अपमान सहसा करीत नसत. आतां ही समाजांतील घडी विस्कळीत ह्या

आहे. आतां नवीन मिळत असलेल्या आणि सर्व बाबतींत अर्धवट असलेल्या अशा अपुऱ्या शिक्षणानें ही नीट बसणें शक्यच नाहीं. पूर्वात्त्य व पाश्चात्त्य शिक्षणाचा मेळ घालूनच आतां बरें कोणतें, वाईट कोणतें, कोणत्या शिक्षणानें ती स्वतंत्रपणें निसर्गाचें व जगराहटीचें निरीक्षण करूं लागतील व आपलेपणाचा अभिमान मनांत उत्पन्न करून घेऊं लागतील ह्या सर्व गोष्टींकडे आपण पाहिलें पाहिजे. अशा रीतीनें मार्ग आक्रमण करूं लागलों तरच समाजास व राष्ट्रास श्रेयस्कर अशा गोष्टींचा लाभ होईल. एके काळीं आपण किती उच्च प्रतीचीं माणसें होतों, सध्यां आपली हीन दीन अशी जी प्रत्येक गोष्टींत शोचनीय स्थिति झाली आहे ती सुधारण्यास वरील उच्च भावना मुलांत उत्पन्न केल्याखेरीज राष्ट्राचा तरुणोपाय नाहीं. प्रथमतः आपण स्वतःकरितां, नंतर स्वकुलाकरितां, स्वदेशाकरितां आहों अशा सात्विक वृत्तीच्या भावना मुलांच्या मनांत उद्दीपन झाल्या पाहिजेत. निरनिराळ्या ग्रंथांतून, मासिकांतून ग्रथीत झालेलीं वचनें, कविता त्यांच्याकडून रोजनिशींत लिहून घेऊन त्या पाठ करून घेतल्या पाहिजेत, म्हणजे समाजरूपी इमारतीचा पाया भरभक्कम होईल आणि त्यावर आपापल्या बुद्धिमत्तेच्या मगदुराप्रमाणें हीं आपलीं बालकें अथवा बालिका सुंदर इमारती उठवून देतील. शिक्षणांतील कांहीं प्रधान गोष्टींसंबंधानें तूर्त इतकेंच पुरें.

---

( शाळेंतील मुलांकरितां प्रयोग. )

## दीनोद्धार.

( ले० गुणवंत रामचंद्र देशपांडे, बाळापूर. )

### प्रवेश २ रा.

( रा. ब. गोकर्ण इझि–चेअरवर पडले आहेत. )

रा. ब. गोकर्णः—छे बुवा, त्रासलों ह्या कागदपत्रांच्या उकिरड्यांत लोळून लोळून. अरे त्याला मर्यादा ! ईश्वरानें हे पोष्टमन निर्माण केले तरी कशाला ! शिंचे दिवस उजाडला नाहीं तोंच कागदपत्रांची गांठ छातीवर ठेवायला तयार ! आतां हेंच पहा, ह्या महिन्यापासूनचा टप्पा तसाच पडला आहे कोणालाही वाटेल, काय जबर लिखापटीचा माणूस आहे हा ! मला सही पलीकडे एक अक्षर लिहीता वाचतां येत नाहीं ही गोष्ट मी जिवंत आहें ह्या गोष्टीपेक्षांही कदाचित् लोकांना जास्त माहित असेल. ( इतक्यांत एक नोकर येऊन त्यांना एक कागद देतो. )

रा. ब. गोकर्णः—( कागदाकडे पहात, स्वगत ) केवढी पंचाइतीची वेळ आली. ह्या कागदाकडे पाहून गळा काढुन रडूं ? हे इंग्रजी शिष्टाचारच तर जेथें तेथें नडतात. अंदाजावरून कोणी तरी भेटीला आलेसें वाटतें. पण ह्या पांढऱ्या स्वच्छ कागदांत तर मला आंधार गुडूप दिसतो. असो ह्यांतूनही मार्ग काढलाच पाहिजे. ( उघड ) कोण आहे रे बाहेर !

नोकरः—हाहे एक लहाना माणूस. दिसरये

असाच. मिसरूडवी वेस फुटली, नसीब. पन आपला ह्राहे गरीबच. काल सकाळपासून चक्करा घालून राहायलाय.

रा. ब. गोकर्णः–( स्वगत ) तोच तो गरीब विद्यार्थी दिसतो. आला वर्गणीफिर्गणी मागायला. छेः बुवा. नको हें शिक्षण. मला कांहीं ह्याचा अर्थच समजत नाहीं. म्हणजे ह्या वर्गण्या द्यायच्या तरी कितीदां आणि कशाकशाबद्दल. लोक शिकले म्हणजे गावांत सत्राशें उपद्व्याप करतात. कोठें वाचनालय काढ, कोठें परिषद् भरव, कोठें गणपती मांड तर कोठें अमक्याच्या स्वागतासाठीं गुड्या तोरणें उभारून त्याची मिरवणूक काढ ! अरे हें आहे काय, नाहीं काय ! ज्या शिक्षणापासून लोकांना हे भलते उद्योग ज्यांना ते सुधारणा म्हणतात ते सुचतात. त्या शिक्षणाच्याच मूळांत घाव घातला पाहिजे. बस्स कुछ नहीं? ह्या कौन्सिलच्या पुढच्या बैठकींत हा ठराव पुढें मांडणारच. आणि रुपेरी चिमट्यांत सर्वांच्या माना अडकावून बहु मतानें तो पास करून घेणार. प्रत्येक गांवीं शाळांच्या इमारतींत सरकारी किराण्याचें दुकान अगर अबकारी दुकान काढण्याची योजना त्याऐवजीं सर्वांना पसंत पडेलच. सध्यांच्या सर्व तरुण शिक्षकांना कोंडवाडा पाटलाच्या जागा बहाल करून आणि म्हाताऱ्यांना स्टँपवेंडरांचीं लायसन्सें देऊन त्या सर्वांच्या जागा भरून काढण्याकरितां एक भली थोरली इरसाल मारवाड्यांची टोळी बोलावून घेणें ठीक पडेल. हिंदुस्तानांत आतां शिक्षण नको. व्यापाराची भरभराट पाहिजे.

नोकरः–काय सांगू त्या पोऱ्याला, मंग पाठवूं आंत?

रा. ब. गोकर्णः–( त्रासून ) पाठीव आंत. चार दोन शद्ब बोलून कटकट काढून टाकली पाहिजे. तोच मुलगा असावा. त्यानें माझी पांच सहादां बाहेर भेट घेतली. त्याला दिली थाप घरीं भेट म्हणून. येथेंही चार पांचदां टाळले. आतां त्याला स्पष्टच सांगून टाकतों. ( सुमंतीलाल येतो, आदबीनें नमस्कार करतो. रावबहादूर त्याचेकडे बराच वेळ पहात नाहींत. त्याचेकडे पाठ करून वाचित बसतात. )

सुमतिलालः–( स्वगत ) देवा ! काय हा प्रसंग आणलास ! मला माझ्या दुर्दैवी स्थितीपेक्षां ह्या अपमानाबद्दल जास्त वाईट वाटतें. कुत्र्यांत आणि माझ्यांत कांहीं फरक आहे कां " भिक्षा पात्र अवलंबणें। जळो जिणें लाजिरवाणें " ॥ हरहर ! परमेश्वरा अशा बेफिकीर निष्ठुर मनोवृत्तींच्या लोकांपुढें पदर पसरण्याचा प्रसंग यावा ह्यापेक्षां मरण बरें. पण आतां हें वाचन संपणार तरी केव्हां ? आतां सोक्ष मोक्ष करून घेतलाच पाहिजे (उघड) रावबहादूर !

रा. बः–( कुऱ्यानें ) कोण आहेस तूं ?

सुमतिलालः–(स्वगत ) येथून तयारी. ( उघड ) आपल्याला मी पांच सहादां भेटलों होतों.

रा. ब.:–मला तें नको आहे. तूं कोणाचा कोण व माझ्याकडे तुझें काय काम आहे तें दोन मिनिटांत सांग. मला वेळ नाहीं नारायणराव–नारायणराव ( नारायणराव येतात ).

सुमतिलालः–मी एक पोरका दुर्दैवी मुलगा आहे. माझे वडील पोष्टांत थोड्याशा पगारावर कारकून होते; ते गेल्या इन्फ्ल्युएंझांत वारले—

रा. ब.:–त्याला मी काय करणार—मग मी त्यांना जिवंत करूं म्हणतोस ? सर्वांनाच केव्हां तरी एकदां मरावें लागतें, समजलास ! झालें. आटोपलें ? जा तूं आतां. नारायणराव आजच्या कापसाच्या भावाची तार आली कां ? हैद्राबादला ' मी आज येणार ' म्हणून अर्जंट तार करा. अमरावतीला स्टेशनवर ६००० गांठ पडली त्याचें काय ?

सुमतिलालः–साहेब, माझा हकीकत तर पूर्ण ऐका.

रा. ब.–अरे तू अझून येथेंच उभा ?

सुमतिलाल:—माझ्या वडिलांच्या मरणामुळें मी व माझी आई उघडी पडलों. जवळ एक पैसा नाहीं. आई दुसऱ्यांचीं दळणें—कांडणें करून कसें तरी पोटापुरतें मिळविते. माझ्या शिक्षणाला आपण मदत कराल तर फार उपकार होतील. फार नाहीं माझ्या फीकरितां आपण एखादा रुपया तरी दर महिन्याला देण्याचें पुण्य संपादन करून मला दोन अक्षरें शिकवण्यांत साह्य केल्याचें श्रेय घ्यावें. रावबहादूर मोठ्या आशेनें मी आलों आहे, झाली माझी हकीकत.

रा. ब.:—मग नारायणराव कसें काय ? आजचा बाजार कसा काय आहे ? किती गाड्या आल्या ? त्या रॅलीच्या एजंटालाही भेटावयाचें आहे बुवा. काय करावें, फुरसतच होत नाहीं. सारखा चोवीस तास कामाचा मारा सुरू. नारायणराव, हें सर्व टपाल फोडून प्रत्येक कागद मला वाचून दाखवा पाहूं. तीं वर्तमानपत्रें पडूं द्या बाजूला. त्यांचें निव्वळ शोभेशिवाय आपल्या सारख्याच्या इथें काय काम आहे ? तीं सर्व एकदमच येत्या वर्षप्रतिपदेला वाचूं. तुम्ही एक महिना गेला तर फार अडचण वाटली पहा. ( नारायणराव एका पाकीटांतला कागद काढून वाचतो. )

नारायणराव:—हें तारीख २५ जूनचें पत्र.

रा. ब.:—आजची तारीख ?

नारायणराव:—१५ डिसेंबर.

रा. ब.:—आच्छा ! काय म्हणतो ? कोणाचें हें पत्र ?

नारायणराव:—हें पुण्याच्या 'खजिनदार संगित' तमाशा क्लबचें पत्र त्यांच्या क्लबाच्या वार्षिक समारंभाचे आपण अध्यक्ष व्हावें अशी यांत नम्र प्रार्थना आहे.

रा. ब :—केव्हां आहे तो समारंभ ?

नारायणराव.—होऊन देखील गेला तो मागच्या महिन्याच्या ३ तारखेला.

रा. ब.:—मग माझ्या तसबिरीवरच भागवून घेतलें वाटतें बेट्यांनीं. बरें, दुसरें पत्र ?

नारायणराव:—हें आहे नागपुरला सरदार मोहित्याकडचें पार्टीचें आमंत्रण.

रा. ब.:—केव्हां आहे ती पार्टी ?

नारायणराव:—ती देखील पंधरा दिवसांपूर्वीच होऊन गेली. येथें देखील फळफळावळ मेवा खायला आपली तसबीरच मांडली असेल नाहीं साहेब ?

रा. ब :—नारायण ? तूं तरी बडा लुच्या आहेस रे; हा टप्पा पडला, म्हणून घोंटाळा झाला.

नारायणराव:—कांहीं नाहीं साहेब ! आपल्यापुढें कसचा मी !

सुमतिलाल:—साहेब—

रा. ब.:—अरे तूं अजून येथेंच उभा. नवल आहे बुवा. मी तुला आतां स्पष्टच सांगतों. तुला तें कडू वाटेल. पण तें बोलणें हितकर आहे हें पक्कें लक्षांत ठेव. मी तुला फुटकी कवडी देखील देणार नाहीं. एवढा मोठा वाढलास, तुला दुसऱ्याच्या दारोदार हिंडण्याला शरम वाटली पाहिजे. भीक ? भीक म्हणजे काय ! स्वतःच्या पायांवर उभें राहतां येऊं नये म्हणजे काय गोष्ट आहे ! तुला जर भीक मागावयाची असेल तर जिवंतच राहूं नकोस.

सुमतिलाल:—मला खरोखरीच जिवंत राहण्याचा कंटाळा आला आहे.

रा. ब :—नामर्द, मरणाची गोष्ट काढतोस ? तुला जर मरावेसें वाटतें तर तूं माणूसच नाहींस. तुझ्यासारख्या तरुणानें जेथें लाथ मारीन तेथें पाणी काढीन ही हिंमत बाळगली पाहिजे. अमेरिकेंतला तुझ्या एवढा पोरगा असा आश्रयासाठीं वणवण करीत कधीं हिंडणार नाहीं. तुम्हा लोकांना वाटतें आयती लोकांनी मदत करावी. आपण खूप जाडे विद्वान् व्हावें व वैभवास चढावें. तूं गरीब आहेस तर मग शिकतोस कशाला झक मारायला ? अंथरूण पाहून

माणसानें हातपाय ताणावेत. एखाद्या जीनींग फॅक्टरींत अगर स्टेशनवर हमाली कां करीत नाहींस. आपली हिंमत आहे शिकण्याची तर लोकांची भांडीं घासावींत. धुणीं धुवावींत. भीक मागणाऱ्या माणसाचा मला राग येतो. स्वावलंबन! बस्स! स्वावलंबन हा ह्या अडचणींतून तरण्याला उपाय आहे. जा तूं आतां. मला पुन्हां भेटूं नकोस. जा एकदम चालता हो. नारायणरा ?

सुमतिलालः—झालें. भिक्षा मागण्याचा माझा हा पहिला आणि शेवटला प्रसंग. हा सुमति ह्यापुढें कोणाच्याच पुढें दीनवाणा होऊन उभा राहणार नाहीं. रावबहादुरांचे कठोर मुद्रेनें झालेलें रागाचें संभाषण जरी काळ्याभेसूर मेघाच्या गडगडाटाप्रमाणें भासलें तरी त्यांतील अमृतवत् उपदेशाच्या जलधारांनीं माझ्या अंतरंगांतल्या सृष्टींत नूतन व अभिनव-सौंदर्यपूर्ण विचारचैतन्याचे अंकूर जन्मास आणले ह्याबद्दल मी त्यांना केवढे धन्यवाद देऊं! ( उघड ) रावबहादूर, आपण मला जो उपदेश केला त्याबद्दल मी आपला ऋणी आहें. खरें आहे आपलें बोलणें. मी यापुढें कधींच भीक मागणार नाहीं हाच माझ्या पक्का कृत निश्चय तुमचे पाय साक्ष ठेऊन जाहीर करतों. मला चांगल्या स्थितींत पहाण्याइतकें दीर्घायुष्य तो ईश्वर आपणास देवो! ( जातो. )

( दोघेही मोठ्यानें हंसतात. )

नारायणरावः—बरी ब्याद टाळली. हींच माणसें एकदां काम झालें; शिकून सवरून मोठ्या हुद्यावर चढलीं कीं त्यांचे डोळे अस्मानांत चढतात. मग ह्यांना पुन्हां खाऊं कां घालाना, ह्यांचा जोडा आपल्यावर सदां उगारलेला. असली इमान जात असते ही. हो, पण आतां आसपास कोणी नाहीं म्हणून सांगतों. केव्हांची ती गोष्ट सांगेन सांगेन म्हणतों. आपल्या बाळा साहेबांना अलीकडे फार वाईट नाद लागत चालला. ( हळूच कानाजवळ तोंड नेऊन ) ते जुगार खेळत असतात आणि दारु पीतात.

रा. बः—(खडबडून) काय म्हणता नारायणराव? कोणी सांगितलें तुम्हाला हें?

नारायणरावः—चक्षुर्वैसत्यं! काल ह्याच ठिकाणीं आपल्या कपाटांतली ब्रँडीची बाटली घेऊन ग्लासांत ओततांना मीं स्वतः पाहिलें; जुगाराविषयीं, मात्र पोलीस सब-इन्स्पेक्टरांनीं मला आपल्याजवळ मी हें सांगावें म्हणून खाजगी रीतीनें सांगितलें.

रा. ब.:—नारायणराव, घात झाला. बाळ इतका बिघडेल अशी कल्पना नव्हती मला. तरी मला वाटलेंच कीं हा एका वर्गांतच तीन वर्षांपासून कसा कोलांट्या खातोय म्हणून! हें बरें नाहीं झालें!

नारायणरावः—पण साहेब, तिकडे घरांत चला अगोदर. बाळासाहेबांनीं दारूच्या धुंदींत कृष्णाबाई स्वयंपाकीणच्या तोंडाला काजळ फांसून तिला जबरदस्तीनें वाड्याच्या मागच्या बाजूच्या वडाला टांगून ठेवलीन्, धोंडभटजींच्या मिशा व शेंडी कातरलि आणि सर्वांत भयंकर गोष्ट म्हणजे—

रा. ब.:—हां—हां काय हें! आणि आतां तो कोठें आहे? किती गचाळ आदमी आहांत तुम्ही नारायणराव! इतका वेळ कां सांगितलें नाहीं मलां?

नारायणरावः—आपण त्या मुलाशीं बोलत होतां म्हणून मला वाटलं त्याच्या समोर—.

रा. बः—आणि इतका वेळ माझ्याशीं शांतपणानच बोलत होतास वाः!

नारायणरावः—मी तर तो प्रकार पहातांच शुद्धच विसरलों. इतकावेळपर्यंत मी तरी कोठें ठिकाणावर होतों! बेशुद्धींत कांहींतरी बोललों झालं आपल्याशीं. निव्वळ स्वप्नच समजाना ती गोष्ट. असें होईल कां कधीं! नाहीं आपणच सांगा साहेब!

रा. ब.:—म्हणजे! तुला स्वप्न पडलें होय तसें? ( हांसून ) मी तरी काय घाबरलों! माझ्या बाळाविषयीं मला खात्रीच आहे ना!

नारायणराव:—म्हणजे ? आपण ती गोष्ट खोटी समजलां कीं काय ? माझ्या म्हणण्याचा अर्थ असा कीं, बाळासाहेब इतके बिघडतील हें माझ्या स्वप्नींही नव्हतें; पण दुर्दैवानें तें प्रत्यक्ष पहातांच मी देहभान विसरण्याइतका आश्चर्यानें थक्क झालों.

रा. ब.:—( रागावून ) अगदींच व्यवहारशून्य माणूस आहेस तूं नारायण. चल चल अगोदर आंत. ( उठतात तोंच तारवाला येतो. )

तारवाला:— साहेब, तार.

रा. ब:—नारायण, तार घे.

( नारायणराव तार वाचून मटकन खालीं बसतो. )

रा. ब.:—( घाबरून ) काय, काय आहे रे ?

नारायणराव:—गांठीचा भाव उतरला. आपली ३९२ ची खरेदी. आजचा भाव २६१ !! पन्नास लाखांचा तोटा !

रा ब.—( घेरी येऊन पडूं लागतात. ) काय झालें ? पन्नास लाखांचा तोटा ! भाव उतरला ! पुन्हां वाच, पुन्हां वाच तार !! मला सांवरून धर ! माझें डोकें फिरूं लागलें ! मी आतां मरतों ! पार बुडालों नारायण, मी कंगाल झालों ! तोटा ! तोटा !! हा सट्ट्याचा व्यापार !!!—

नारायणराव:–( स्वगत ):–आमच्या रावबहादूरांना M. L. C. एम्. एल्. सी मेंबर ऑफ लेजिस्लेटीव्ह कौन्सिल होण्याचा गेल्या सहा महिन्यांपासून ध्यास लागला आहे. ह्या M. L. C. चें प्रीयाराधन करितां करितां दुसऱ्या तोतया M. L. C. नेंच डाव साधला व तीं याच्या हातांत विराजमान होण्याचीं चिन्हें दिसूं लागलीं. ती M. L. C. ‘ Mother of alarge Cocoanut ’. मदर ऑफ ए लार्ज कोकोनट–अर्थात नारळाची आई ! कालाय तस्मै नम: दुसरें काय ! ( उघड ) साहेब ! मला तुमची स्थिति पहावत नाहीं. मी जातों आतां. ( स्वगत ) पुन्हां दुसरी नौकरी पहाणें भाग आहे असो. आपल्या ताब्यांतले पैशे तर आधीं दाबून ठेवावे, एरव्हीं पगाराचे पैसे काढण्यास मार्गच नाहीं. ( जातो. )

( अपूर्ण. )

## मृगशीर्ष.

एकदां एक मोठा राक्षस शिकार करीत असे. त्याचें नांव मृगशीर्ष असें होतें. या राक्षसाचें मन एका राजकन्येवर बसलें. ज्या बेटावर ही राजकन्या रहात होती, तेथील सर्व पशुपक्षांची हा दिवसभर शिकार करी व संध्याकाळच्या वेळीं ती शिकार आपल्या बापाला अर्पण करी. राजानें या मुलीचें लग्न त्या राक्षसाबरोबर करून देण्याचें कबूल केलें; पण प्रत्यक्ष लग्न लावण्याचें तो कालावधीवर टाकूं लागला. हा राक्षस लग्नाची वाट पाहून पाहून दमला व त्यानें राजकन्या पळवून नेण्याचें ठरविलें. अखेरीस तो राजवाड्यांत शिरला व राजकन्येला घेऊन जाऊं लागला. ही बातमी राजाला कळतांच राजा त्याचा पाठलाग करूं लागला. शेवटीं राजानें त्या राक्षसाला पकडलें. त्याचा क्रोध अनिवार झाला आणि त्यानें या राक्षसाचा चांगलाच सूड घेण्याचें मनांत योजिलें. त्यानें त्याचें डोळे काढले आणि तशाच स्थितींत त्याला समुद्र किनाऱ्यावर मरणाकरितां टाकून दिलें. पण कर्मयोगानें तो राक्षस मेला नाहीं. तो किनाऱ्यावर

विव्हल होऊन पडला असतां त्याला एक आवाज ऐकूं आला. हा आवाज दूरच्या एका हातोड्याचा होता. तो उठला आणि चाचपत चाचपत त्या आवाजाच्या दिशेनें चालला, अखेरीस तो एके ठिकाणीं पोहोंचला. या ठिकाणीं लोहाराच्या देवाची एक मोठी भट्टी पेटली होती. या देवाला त्याची करुणा आली व त्यानें आपला एक माणूस देऊन त्याला दृष्टी यावी म्हणून दुसऱ्या एका देवाकडे नेण्यास सांगितलें. राक्षसानें त्या माणसाला खांद्यावर टाकलें व दोघेजण पूर्वेकडे निघाले. अखेरीस ते त्या देवाकडे आले. हा देवही तसाच दयाळू होता. त्यालाहि याची दया आली व त्यानें आपला दैवी प्रकाश त्याच्या डोळ्यांत पाडून त्याला दृष्टी दिली. मृगशीर्षला आनंद झाला व तो आपल्या मार्गानें गेला.

यानंतर तो त्या दुष्ट राजाच्या मुलीकडे नजातां एका चंद्रलोकींच्या कुमारिकेकडे गेला. पुढें हा व ती कुमारी सुखांत राहूं लागले. दिवसां शिकार करावी, रानांवनांतून हिंडावें असा त्यांचा क्रम असे. तिचेंहि प्रेम याच्यावर बसलें. तिच्या भावाला हा प्रकार सहन करवेना म्हणून त्यानें या राक्षसाला हांकून देण्याचा बेत केला.

मृगशीर्ष हा जल देवतेचा मुलगा होता व त्याच्या बापानें त्याला एक वर दिला होता. या वराच्या योगानें त्याला बिलकूल दुखापत न होतां समुद्र तरून जाता येई. तो या देणगीच्या योगानें पुष्कळ दिवसपर्यंत समुद्रांत डोकें वर ठेऊन पोहूं शकत असे.

एकदां तो देव व त्याची बहीण असे दोघेजण किनाऱ्यावर बसले होते. इतक्यांत त्या देवानें समुद्रांतून एक काळा पदार्थ तरंगत असलेला पाहिला. त्याला हा मृगशीर्ष आहे असें कळून चुकलें. तो आपल्या बहिणीला म्हणाला, बघूं तूं त्या तरंगत असलेल्या पदार्थाला आपल्या तीरांनीं कसें मारतेस ती. त्याची बहिण या कामांत पूर्ण वाकबगार होती. तिनें आपलें धनुष्य उचललें व एका तीरासरशीं त्याचे तुकडे तुकडे केले.

संध्याकाळच्या वेळीं मृगशीर्षाचें प्रेत लाटांच्या हेलकाव्यावरोबर किनाऱ्यावर येऊन आपटलें. हें प्रेत तिनें पाहिलें व आपण आपल्या प्रियकराला ठार मारलें असें तिला कळून चुकलें. त्याबरोबर तिला अत्यंत दुःख झालें.

तिनें त्याचें व्याघ्रांबर, त्याची तलवार, काठी, कुत्रा वगैरे सर्व एकत्र केलें व त्यांना आकाशांत तारका स्वरूपांनीं अचल स्थान दिलें आपल्याला रात्रीं हें नक्षत्र दृष्टीस पडतें. अशाप्रकारची मृगशीर्षासंबंधीची ही एक कथा आहे. याखेरीज त्याच नक्षत्रासंबंधीं दुसऱ्याहि कथा आहेत.

---

## ज्यूरीपुढील प्रसंग. ( चुटका. )


बॅरिस्टर:—( पिंजऱ्यांतील आरोपीकडे बोट करून.) सभ्य गृहस्थहो, माझे अशिलांत जर कांहीं थोडा दुर्गुण असेल तर तो इतकाच कीं, कांहीं वेळ दुष्ट, बदमाष, हरामखोर, चुगलखोर अशांच्या संगतींत हा होता. ह्याखेरीज दुसरा ह्याचा अपराध नाहीं. तर मग आपल्या दयेस माझे' अशील पात्र होणार नाहीं काय ?

ज्यूरींतील मुख्य गृहस्थ:—एवढ्या नामावळीवरून वरील मंडळींतच हा बसण्यास पात्र आहे. त्यांच्याबरोबर ह्यानें दीर्घकाळ रहावयाचें याचें कीं अल्प काळ, हें न्यायमूर्तींचें पाहणें आहे.


---

# शेतकरी व नाग.

दिवस वसंतऋतूचे होते, एक शेतकरी व त्याचा बैल शेतावर काम करीत होते. इतक्यांत एक



नाग त्याच्या जवळ जवळ येऊं लागला. शेतकऱ्यानें त्याला पाहिलें व तो मागें दचकून सरकला. हें पाहून नाग म्हणतो, “असा दचकूं नकोस, मी



जुना दुष्ट नाग राहिलों नाहीं. ही पहा मी माझी जुनी कात टाकून दिली आहे. चल तर आपण दोघे मित्र बनूं.” असें म्हणून तो जवळ येऊं लागला

हें पाहून त्या शेतकऱ्यानें आपली काठी उचलली व म्हणाला “मी तुला पुरता ओळखत आहें.



बाबारे! तुझी कात नवी असली तरी तुझें अंतःकरण जुनेंच आहे.” असें म्हणून त्यानें त्याला ठार मारलें.



शत्रु कितीहि गोड थापा मारूं लागला तरी त्याला जिवंत सोडूं नये.


## अभिनव काव्यमाला भाग ३

या पुस्तकाची दुसरी आवृत्ति छापून विक्रीस तयार आहे. किं. १ रु. ट. ह. व व्ही. पी. खर्च निराळा.

म्यानेजर--चित्रशाळा प्रेस, पुणें.

# चांभार.

माघाचा महिना होता. थंडी खूप पडली होती. संध्याकाळची वेळ होती, अशा वेळीं एक म्हातारा प्रवाशी यात्रेकरू यात्रेला निघाला होता. रस्त्यांत त्याचा जोडा फाटला. जोडा फाटल्यामुळें त्याला चालता येईना. जवळपास एखाद्या खेड्यांत जाऊन जोडा शिवून घ्यावा म्हणून तो चवकशी करूं लागला. इतक्यांत त्याला एक खेडें लागलें व चांभाराचें घरहि आढळलें.

चांभार आपल्या घरांत अंधारांत बसला होता. तो प्रवाशी म्हणाला " दादा, माझा एवढा जोडा शिवून द्याहो. मी एक गरीब यात्रेकरू आहें. घरून निघाल्याला मला तीन महिने झाले, आतां मजजवळ पैसा अडका कांहीं नाहीं. जोडा शिवून द्याल तर मी आपला मोठा उपकारी होईन."

चांभारहि गरिब होता. रात्रंदिवस काम करून तो आपल्या कुटुंबाचें कसें तरी पालनपोषण करी. यात्रेकरूला पाहून त्याला दया उत्पन्न झाली. त्यानें त्याचा जोडा शिवून देण्याचें काम जास्त चवकशी न करतां सुरू केलें; आणि आपल्या बायकोला बोलाविलें व शेगडी पेटव म्हणून सांगितलें.

जोडा शिवून तो त्यानीं प्रवाशाला दिला. हातांत घेतां घेतांच तो जोडा अदृश्य झाला. थोड्या वेळानीं पुनः तो दिसूं लागला. तो प्रवाशी म्हणाला, "बाबारे! तू फार दयाळू आहेस आणि गरीब असूनहि प्रामाणिक आहेस. जोंपर्यंत तुझ्यांत प्रामाणिकपणा असेल तोंपर्यंत तुला या जगांत कशाचीहि वाण पडणार नाहीं. असें म्हणून त्यानें त्याला एक परिस दिला, आणि तो एकदम अदृश्य झाला.

सकाळीं उठून त्यानें तो परिस लोखंडाला चोळला, त्याबरोबर लोखंडाचें सोनें झालें. तें त्यानीं बाजारांत विकलें व पुष्कळ पैसे केले.

चांभार मूळचाच उदार व दयाळू असल्यामुळें त्यानें गोरगरीबांना पुष्कळ द्रव्य वाटलें. घरीं आल्यावर त्यानें सुग्रास भोजन केलें. त्याचें दारिद्य नाहींसें झालें. लक्ष्मीनें त्याजवर कृपा केली. गरिबांना द्रव्य वाटणें त्याचें चालूच होतें. त्यामुळें त्याच्या झोंपडीजवळ गोरगरीबांची नेहमीं गर्दी असे.

पुढें त्यानें स्वतःकरितां एक मोठें घर बांधलें. त्याची कीर्ती चहूंकडे पसरली. जो माणूस त्याच्या घरीं येई तो त्याच्या दयाळूपणानें आश्चर्य चकित होई. त्याचें उदाहरण पाहून दुसरे लोकहि दयाळू झाले. त्या चांभाराच्या परिस्थितींत असा बदल होऊन बरींच वर्षें लोटलीं. त्याची मुलगी या काळांत उपवर झाली. तेव्हां जांवई पहाण्याचा त्यानें प्रयत्न चालविला. पैशाची कमतरता नसल्यामुळे त्याला अत्यंत श्रीमंत जांवई मिळाला हें सांगावयास नकोच. लग्नाची तयारी व लग्नांतील थाटमाट किती उच्च दर्जाचा व श्रीमंतीचा होता ह्याचें वर्णन करणें शक्य नाहीं. सगळ्या गांवांत दारूचीं झाडें व रोषणाई करण्यात आली. ठिकठिकाणीं मंगल वाद्यांचा ध्वनी निघत होता. जेवणाखाणांची तर नुसती लयलूट होती. लांब लांबच्या देशांहून चांगलें चांगलें सामान मागविण्यांत आलें होतें.

अशा प्रकारें मोठ्या थाटांत विवाह झाला. लग्नानंतर त्या चांभारानें आपल्या जांवयाकरितां एक उत्तम वाडा बांधला व त्याला तो बक्षीस दिला.

कांहीं काळ लोटल्यावर गरीबांचा कैवारी म्हणून समजला गेलेला असा तो, घमेंडखोर होऊं लागला. तो कोणाला भेटेनासा झाला.

कोणी भिकारी आला तर त्याला द्रव्य मिळण्याऐवजीं गचांड्या मिळूं लागल्या. शेवटीं त्याच्या जवळील परिसाची पुण्याई संपली आणि तो चांभार पुरा भिकारी बनला.

पुनश्च तो आपल्या झोंपडींत जोडे शिवूं लागला. त्या म्हातार्‍याला आपल्या या वर्तनाचा मोठा पश्चाताप होई व त्याच्या डोळ्यांतून वळघळा अश्रू निघत.

---

# उंदरानें चातुर्य.

एका जंगलांत एक हरिणी रहात होती. एके दिवशीं ती आपल्या पिलांना घरीं ठऊन बाहेर गेली होती. इतक्यांत एक सिंह आला आणि त्यानें तिची सारीं पिलें खाऊन टाकलीं. ही हकीगत जंगलांतील जनावरांनीं हरिणीला सांगितली ती बिचारी हें ऐकून मोठमोठ्यानें रडूं ओरडूं लागली. ती आपलें दु:ख सर्वांना सांगूं लागली. वाघ, हत्ती, चित्ते वगैरेंना तिनें आपली कर्मकहाणी सांगिली. पण तीं जनावरें म्हणालीं "हरिणी ताई, तुझी हकिगत ऐकून फार वाईट वाटतें; पण काय करावें! सिंह आमचा राजा आहे. त्याचा जुलूम आम्हीं मुकाट्यानें सहन केला पाहिजे."

त्यांनीं असें उत्तर दिल्यावर ती बिचारी परत आली आणि सारखी रडूं लागली. इतक्यांत तिला एक उंदीर भेटला. तो म्हणाला "ताई, तूं कां रडतेस?" मग हरिणीनें त्याला सारी हकिगत सांगितली. ती ऐकून उंदीर म्हणतो "रडूं नकोस. मी त्या सिंहाला चांगली शिक्षा करतों." पण हरिणी म्हणाली, "तूं एवढा लहान आणि त्याला शिक्षा कशी करणार? हे एवढे मोठाले प्राणी थकले तेथें तुझा पाड काय?" उंदीर म्हणाला "असें म्हणूं नकोस. मी जरी लहान असलों आणि माझ्या अंगांत त्याच्या बरोबर लढण्याची ताकद नसली तरी मी युक्तीनें चांगली शिक्षा करीन. युक्तीपुढें शक्ती काय करणार? बरं तूं असं कर, चार दिवसांनंतर येथें सार्‍या जनावरांची सभा भरीव; मग आम्ही त्या सिंहाला काय शिक्षा करावयाची हें ठरवूं." हरिणीला हें ऐकून आनंद झाला व ती "बरें" म्हणून घरीं गेली.

इकडे उंदरानें चार दिवस खूप मेहनत करून आपल्या बीळापासून जंगलापर्यंत एक मोठें भुयार खणलें. अशा रीतीनें त्यानें स्वत:करितां एक गुप्त रस्ता तयार केला. चौथ्या दिवशीं त्याच्या बिळाजवळ एक मोठी सभा भरली. त्या सभेंत हरिणीनें आपलें दु:ख सांगितलें. सिंह हा अपराधी ठरला. पण पुढें कोणी कांहीं बोलेना. कारण सभेची हकीगत ऐकून सिंहहि तेथें आला होता. तेव्हां तो उंदीर आपल्या बिळाजवळ उभा राहून म्हणतो "सिंहाला देहान्त दंड झाला पाहिजे."

हें ऐकून सिंह रागानें लाल झाला. त्यानें उंदराला मारण्याकरितां आपला पंजा उगारला. इतक्यांत उंदिर झटकन् आपल्या नव्या रस्त्यानें पळून गेला. सिंहाला बिळांत जातां येईना म्हणून तो बिळाजवळ रागा रागानें बसला. त्यानें असा निश्चय केला कीं, जोंपर्यंत उंदीर पकडला जणार नाहीं तों पर्यंत मी येथून हलणार नाहीं. माझ्या भीतीनें निदान तो आंतल्या आंत मरून तरी जाईल. पण उंदीर

मरण्याचे ऐवजीं हा सिंहच भूकेनें तेथें कांहीं दिवसांनीं मरून पडला. उंदरांच्या युक्तीनें त्यांची शिक्षा खरी ठरली व हरिणीला न्याय मिळाला.

---

# फक्त शहाण्यांनींच वाचावें.

( ले०-वि. ग. मां. )

एका श्रीमंत पण सुशिक्षित गृहस्थांनी रेल्वेंतून प्रवास करीत असलेल्या आपल्या परिचयाच्या एका वर्तमानपत्रकारास आपली 'डायरी' पहावयाची आहे अशी इच्छा प्रदर्शित केली. संपादक महाशय जात्याच मोकळ्या मनाचे असल्यामुळें त्यांनीं लगेंच खिशांतून आपली डायरी त्यांच्यापुढें ठेविली. तें छोटें पुस्तक उघडतां क्षणींच दहा नियमांनीं मंडित झालेलें पहिलेंच पृष्ठ त्यांच्या दृष्टीस पडलें. कर्तृत्ववान् मनुष्याची **रोजची दिनचर्या** कशी असते—किंवा असावी लागते—हें त्यावरून स्पष्ट दिसून येण्यासारखें असल्यामुळें किंचित् फरकानें त्यांचें रूपांतर पुढें मी मांडीत आहें.

१ आजचें कठीण कठीण म्हणून जें काम असेल तेंच प्रथम मी हातीं घेईन—सोपें काय केव्हांहि करतां येतें.

२ कार्यविध्वंसक टीकेस मी मनांत थाराहि देणार नाहीं. कारण मी काय थोडें थोडकें चुकतों!

३ दुसऱ्याचा उत्कर्ष कसा झाला हें पाहून मी सुख मानीन पण त्याबरोबरच त्याच्या उत्कर्षाचीं कारणें शोधावयास कधींहि कसूर करणार नाहीं.

४ आजपासून दुसऱ्याच्या कामाची हेटाळणी मी करणार नाहीं. ही संवय घातुक असून मनुष्याची जोड करण्याऐवजीं तोड करिते. एवढा भरभक्कम ताग्याचा धागा पण ॲसिडाच्या बिंदूनें पार खाक होऊन जातो.

५ एखाद्याच्या तरी मी आज उपयोगी पडलों कीं नाहीं ह्याची आजपासून नोंद केल्यावांचून मी राहणार नाहीं.

६ एकावर दुसरी, दुसऱ्यावर तिसरी, अशा श्रेष्ठपणाच्या पायऱ्या आहेत, हें समजून मी माझ्यावरील श्रेष्ठांचा मान ठेवीन.

७ आत्मविश्वासाबरोबर योग्यता वाढत जाते ही गोष्ट आजपासून जरूर ध्यानांत ठेवीन.

८ कामाशीं तादात्म्य नाहीं तर आनंद नाहीं. आणि आनंद नाहीं तर कामांत राम नाहीं हें जरूर मी ध्यानांत ठेवीन.


# शास्त्रीय-माहिती.

## ४० टनांची पृथ्वी.



इंग्लंडमध्यें एक मोठा दगड खोदून त्याला पृथ्वीचा आकार दिला आहे. त्याकडे पाहिलें असतां जाणाऱ्या येणाऱ्याला भूगोलाचा अभ्यास करतां येतो. याच्या पृष्ठभागावर खंडें, महासागर वगैरे उंचसखल खोदलीं असून तीं अगदीं स्पष्ट दिसतात. त्याचें वजन ४० टन असून व्यास १० फूट आहे.

## लांकडाचें घड्याळ.



रशियांतील एका शेतकऱ्यानें नुकतेंच पोलादी स्प्रिंग शिवाय बाकीचें सारें घड्याळ लांकडाचें बनविलें आहे. घड्याळांतील सारीं नाजूक यंत्रेंहि त्यांनीं मोठ्या कुशलतेनें लांकडाचींच केलीं आहेत. हें घड्याळ त्यानें लेनिनला बक्षिस म्हणून दिलें.

## फुलांना औषध.

एक फ्रेंच शास्त्रज्ञ म्हणतो कीं, ताजीं फुलें सुकूं लागलीं तर त्यांना ॲस्पीरीनचा डोज द्यावा. गरम पाण्यांत ॲस्पीरीनची गोळी फोडून विरघळावी व तें पाणी फुलांवर शिंपडावें म्हणजे फुलें टवटवीत रहातील.

# ❀ नखें भविष्य सांगतात. ❀

एक सामुद्रिक इंग्रज ग्रंथकार म्हणतो कीं, आपल्या नखाच्या क्रमजास्त वाढीवर आपणास विपत्तीचा किंवा संपत्तीचा काळ केव्हां येईल हें समजून येतें.

( १ ) नखाच्या मधला उंचवटा जेव्हां वाढत जातो तेव्हां फारच अल्पकाळांत आपली नौकरी जाते, व्यापारांत तोटा येतो आणि मनुष्य अकस्मात् अंथरुणास खिळून पडतो. अकल्पित रीतीनें मरणप्राय दुःख होण्याचें हें दुश्चिन्ह होय.

( २ ) नखाची वाढ खुंटूं लागली कीं, केंस अल्पप्रमाणावर गळूं लागतात. ह्यावेळीं आजार होऊन आपण संकटाच्या फेऱ्यांत आतां सांपडणार ही खुणगांठ ज्यानें त्यानें आपले मनाशीं बांधून ठेवावी.

( ३ ) नखाच्या आसपास खळगे पडूं लागले म्हणजे तीं थोडीं बहुत चकचकीत दिसतात. ह्या वेळचें दुश्चिन्ह एवढेंच कीं, येणारा आजार फार अल्पावधीचा असतो; पण ह्यावेळीं डोळ्यांतून एकवार पाणी गळेल ही गोष्ट बरीच खरी असते.

( ४ ) नखांवर पांढरे ठिपके दिसूं लागतांच आपण प्राप्त झालेल्या गंडांतरांतून लवकरच मुक्त होऊं ही आशा खुशाल बाळगावी.

# मौज मजा आणि गंमत.

## लहान मुलांकरितां नवे खेळ.

एकदां यमी, ठमी आणि भिमी खोलींत बसल्या होत्या. बाहेर पाऊस मी म्हणत होता. तेव्हां वेळ कसा घालवावा हें त्यांना समजेना. इतक्यांत तिकडून यमीची आई आली आणि म्हणाली, "मुलींनो मी तुम्हांला एक खेळ शिकवितें. काकू म्हणाल्या पहिल्यांदा दोघींनीं आपले डोळे झांकावे व एकीनें डोळे उघडे ठेवावेत. दोघींनीं डोळे मिटल्यावर तिसरीनें खोलींतली एखादी वस्तू मनांत धरावी व त्यांना डोळे उघडावयास सांगावें. त्यांनीं डोळे उघडल्यावर माझी वस्तू ओळखून काढा असें ती मुलगी म्हणूं लागेल. मग दोघी तुझी वस्तू कशापैकीं आहे असें विचारतील. ती मुलगी म्हणेल, "पांढरा कागद काळी शाई, जिन्नस कोणाला दिसत नाहीं." हुशार मुलगी चटकन् वर्तमानपत्र असें म्हणेल. जी मुलगी बरोबर उत्तर देईल, तिनें आतां डोळे उघडे ठेवावेत व दुसऱ्या दोघींनीं तीची जिन्नस ओळखून काढावी." रमाकाकूनीं हा खेळ सांगितला म्हणून त्या मुलींना किती आनंद झाला. तसा तुम्हांला होईल कां?

---

आमचा गोविंदा म्हणजे मोठा खोडकर. कधीं कोणाच्या घरीं जाईल आणि कागाळी घेऊन येईल याचा नेम नाहीं. एकदां बाबांनीं त्याला नवे कपडे शिवले म्हणून ते आणण्याकरितां तो शिंप्याच्या घरीं गेला. तेथें हें उचक तें उचक असें त्यानें चालविलें. इतक्यांत त्याला एक रीळ सांपडलें. तें रीळ घेऊन तो घरीं आला. मुलगा मोठा हुषार होता. त्यानें आपला चाकू घेतला. खोडकरच तो. "चाकू, सुऱ्या, कातरी, हीं मुलांचीं खेळणीं नव्हत" असें बाबा सारखे सांगत, पण तो कसला वस्ताद. त्यानीं त्या चाकूनें रिळाची एक बाजू तासली व भोंवऱ्यासारखी निमुळती केली. नंतर त्या रिळांत जाईल अशी एक काडी आणली व तिचें टोंकहि अगदीं बारीक केलें. नंतर ती काडी त्यानें रिळांत घातली. व काडी चांगली भक्कम बसल्यावर त्यानें तो भोंवरा गर् गर् फिरवला. गोविंदा खोडकर खरा पण हुषारहि होता. मुलांनो, तुम्हाला गोविंदाची युक्ति पसंत आहे कां नाहीं सांगा?

---

आमच्या शाळेला कॉंग्रेसच्या आठवड्याची सुट्टी होती. बाबा यंदा कॉंग्रेसला गेले नव्हते. त्यांनीं आम्हा सर्वांना एकदां वनभोजनास नेलें. मी आणि बनी आंबराईत इकडे तिकडे हिंडत होतों. बनी म्हणाली, "दादा चल आपण एखादा खेळ खेळूं." आमच्याजवळ पत्ते नव्हते, कांहीं नव्हतें पण मास्तरनीं मला एक खेळ सांगितला होता. तो मला तेव्हां आठवला. मीं एक मोठें दुहेरी रिंगण काढलें. शेजारून उंबर आणलें; आणि दोन काटक्या घेतल्या. रिंगणाच्या भोंवतीं असलेल्या दुहेरी रेषेमध्यें उंबर ठेवावयाचें व काटकीनें तें रेषेला न लागतां लोटावयाचें. उंबर रेषेला लागलें कीं डाव गेला. जो जास्त वेळ उंबराला रिंगणांतून नेईल त्याचा जय झाला. एका खेपेला तें उंबर शेवटपर्यंत नेलें पाहिजे. डाव गेल्यावर पुनः पहिल्यापासून सुरवात करावयाची. बनीची व माझी या खेळानें किती करमणूक झाली म्हणून सांगूं!

---

## चुटके.

रात्रीं बाराच्या सुमाराला एका बागेंत एक माणूस निजलेला पोलिसला आढळला. त्यानें त्याला उठवून म्हटलें.

" चल ऊठ ? येथून चालता हो."

" पण अंमलदारसाहेब मी कांहीं उगीच निजलों नाहीं. तें पहा समोर घर दिसतें ना. तेथें जाऊन गणपतराव कुठें आहेत, एवढी चौकशी करून या."

अंमलदारसाहेब तेथें गेले आणि दारावर थाप मारून उभे राहिले. इतक्यांत एक स्त्री ओरडून विचारते.

" कोण आहे तिकडे ?"

" बाईसाहेब गणपतराव आहेत कां ?"

" ते उद्यां सकाळपर्यंत येणार नाहींत." असें म्हणून तिनें एक पाण्याची बादली त्याच्या डोक्यावर ओतली.

बागेंत निजलेला माणूस पोलीसला भिजलेला पाहून म्हणतो—

" काय साहेब ! मी म्हणतों तें खरें कीं नाहीं ? माझी बायको अशी वाईट आहे."

" नीज, बाबा नीज " पाण्यानें भिजलेले अंमलदार म्हणाले.

---

### व्यापारी उपदेश.

एका व्यापाऱ्यानें पुष्कळ दिवस सुटी वगैरे कांहीं न घेतां मुंबईस काळ काढला. त्यानें एकदां घरीं जाण्याचा बेत केला. ते निघणार इतक्यांत त्यांना एक बायकोकडून तार आली.

" काल रात्रीं घराला आग लागली. मुलें आणि मी मोठ्या कष्टानें बचावलें. ताबडतोब निघून या !"

या तारेला त्यांनीं तत्काळ उत्तर पाठविलें.

" घर जर जळलें तर कोठल्या घरीं यावयाचें ! मुलांना आईकडे घेऊन जा, आणि तेथें रहा, मी सावकाश येईन."

---

### चमत्कारिक पाहुणा.

एकदां एक वृद्ध गृहस्थ मुंबईस गेले. तेथें त्यांचे एक मित्र रहात होते. त्यांनीं त्यांना आपल्या घरीं बोलाविलें.

पाहुण्यांच्या स्वागताकरितां चहा वगैरे केला होता.

" घ्या हो हा चहा "

" छे बुवा, मी चहा घेत नाहीं."

" बरं बरं ही सिगारेट घ्या."

" छे, मी सिगारेटहि ओढीत नाहीं."

" मग सोडा मागवूं ?"

" नाहीं, मी सोडाहि पीत नाहीं."

अशा प्रकारचा हा करारीपणा पाहून त्यांचे मित्र जरा आश्चर्य चकीत झाले. थोडा वेळ विचार करून ते एकदम म्हणतात.

" तुम्ही गवत खातां ?"

" काय गवत ? कांहीं तरीच बोलता झालें."

मग काय म्हणूं ? तुम्ही चहा पीत नाहीं, सोडा घेत नाहीं. सिगारेट ओढीत नाहीं आणि गवतहि खात नाहीं. एकूण रावसाहेब, आपण माणसाच्या किंवा पशूंच्या संगतीला योग्य नाहीं असें दिसतें !"


---

विद्याधर वामन भिडे यांचें
**अर्थालंकाराचें निरूपण.**
किंमत १ रुपया. म्यानेजर—चित्रशाळा प्रेस, पुणें.

# एक जगद्विख्यात वाचनालय.

जगामध्यें वाचनालयें सर्वत्र आहेत; परंतु मोठीं वाचनालयें फार थोडीं. अमेरिकेच्या कॉंग्रेसचें जें एक वाचनालय आहे तें फार मोठें आहे व त्यांत पुस्तकांची सारखी भर पडत आहे.


२६ वर्षांपूर्वी नोव्हेंबर महिन्यांत हें वाचनालय



**कॉंग्रेसच्या सभासदांकरितां वाचावयाची खोली.**

उघडलें गेलें. त्या वर्षी ३½ लाखांचा पुस्तकसंग्रह या वाचनालयांत होता. सध्यां तेथें २० लक्ष पुस्तकें आहेत. यांतील बरींच पुस्तकें फार मौल्यवान्, इतर कोठें न सांपडणारीं अशीं आहेत. कागदपत्र, दस्तऐवज वगैरे तर येथें बरेच आहेत. पुस्तकें ठेवण्याकरितां ज्या फळ्या केलेल्या आहेत, त्यांची लांबी १०२ मैल आहे. या प्रचंड संग्रहाकडे पाहिलें म्हणजे दृष्टी दिपून जाते व मन आश्चर्यचकित होतें.

इतक्या पुस्तकांची गैर व्यवस्था होते किंवा काय असा एक प्रश्न उद्भवणें साहाजिक आहे. तेथें गैरव्यवस्था तर नाहींच. परंतु सुव्यवस्था इतकी आहे कीं आपणांस त्याचेंच नवल वाटतें. पुस्तकें एके ठिकाणाहून दुसऱ्या ठिकाणीं नेण्याकरितां लहान लहान रेल्वे केल्या असून तीं वर खालीं नेण्याआणण्याकरितां विजेचे पाळणे केलेले आहेत. पुस्तकावरचें कव्हर फाटलें किंवा पानें अस्ताव्यस्त झालीं तर तीं नीट लावण्याकरितां तेथें पुस्तक बांधण्याचें एक मोठें खातें आहे. त्याप्रमाणें पुस्तकांवर धुळ सांठली तर ती काढून टाकण्याचीहि व्यवस्था केलेली आहे. विजेचे पाळणे आपोआप खालींवर होतात तें स्वयंगतीनें वर जातात, थांबतात व सुटतात. त्यांत



कॉंग्रेसच्या लायब्ररीची इमारत.



लायब्ररीचा मध्यवर्ती दिवाणखाना.

दोन माणसांना बसतां येईल इतकी जागा असते. आंतमध्यें आगगाडीचे डबे पुष्कळ असतात. या डब्यांतून जीं पुस्तकें पाहिजे असतील त्याच्या चिठ्ठया वर जातात व पुस्तकेंहि पोंहचविता येतात. हे डबे अल्युमिनमचे केलेले असतात. त्यामुळें ते फार हलके असतात. या रेल्वेला पुष्कळ स्टेशनें असतात.

या गाडीचा एक फांटा अगदीं शिखरावर नेलेला असतो. दुसरे आजूबाजूला जातात. ही रेल्वे मिनीटाला १०० फूट प्रवास करते.

एखादें पुस्तक पाहिजे असल्यास तो टेलिफोननें पुस्तक मागवितो. त्या बरोबर रेल्वेंतून तें पुस्तक त्याच्याकडे जाऊन पडतें. या रेल्वे लहान लहान बोगद्यांतून चालतात.



लायब्ररीच्या शिखराचे खालीं असलेली वाचण्याची मोठी जागा.

वाचनालयाची इमारत केवढी मोठी असेल व पुस्तकांची वगैरे व्यवस्था किती सुंदर असेल हें सांगावयास नको. या वाचनालयाला दोन हजार खिडक्या आहेत,त्यांतून आंत प्रकाश येतो. या इमारतींत मोठमोठ्या पुरुषांच्या तसबीरी लावल्या आहेत व भिंतीला सोनेरी रंग लावला आहे. या इमारतीवर एक मशाल लावली असून ती ज्ञानद्योतक आहे.

प्रत्येक खिडकीवर लहान लहान मुकुट कोरले असून ते प्रत्येक मनुष्यजात दर्शवितात शिवाय जगप्रसिद्ध अशा वाङ्मय विशारदांचे मोठाले पुतळेहि तेथें ठेवण्यांत आले आहेत. इमारतीचे दरवाजे पितळी असून त्यांवर जगांतील निरनिराळ्या कारागिरांनीं आपलें कौशल्य खोदकामानें प्रगट केलें आहे. मुख्य दिवाणखान्यांत एक यंत्र आहे, तें सूर्य प्रकाशानें फिरतें; आणि त्याभोंवतीं बारा राशी दाखविल्या आहेत. दुसऱ्या ठिकाणीं सात रंग दर्शविण्यांत आले आहेत. पैकीं जांभळा रंग शास्त्रज्ञानाच्या प्रकाशाच्या द्योतक, निळा सत्याचा द्योतक, हिरवा संशोधनाचा द्योतक, पिंवळा नव्या उत्पत्तीचा द्योतक, नारींगी प्रगतीचा द्योतक, तांबडा काव्याचा द्योतक, व व्हायोलेट हा वैभवाचा द्योतक, असा आहे. ही इमारत तीनदां जळली होती.

इमारतीच्या बुरुजावर पुरुष व स्त्रिया नवीं येणारीं पुस्तकें निवडीत असतात. इमारतींत धूळ अगर पाऊस येऊं नये म्हणून काचेचीं तावदानें बसविलेलीं असतात.

या आंतील रेल्वेखेरीज बाहेर पुस्तकें पोहोंचविण्याकरितां एक दुसरी रेल्वे असते. एखाद्याला

या इमारतींत राज्यांतील सारें महत्त्वाचें अस्सल कागदपत्र ठेवण्यांत आले आहेत.

चीनमधील १०००० पानांचा एक शब्दकोश येथें ठेवलेला आढळून येतो. हा टुशुशीचेंग यांनीं लिहिलेला आहे. चिनी लोकांची पुस्तक बांधणी इतर देशांपेक्षां वेगळी आहे. हा कोश प्रेसिडेंट रुझवेल्ट याला बक्षीस म्हणून देण्यांत आला होता. चीनमधील पुस्तकांचा संग्रह येथें फार मोठा आहे. हा संग्रह चीनमधील लायब्ररीच्या खालोखाल आहे.

या कोशाइतकें दुसरें मोठें पुस्तक अमेरिकेंतील पक्षांचें आहे. हें पुस्तक इंग्लंडांत छापलें गेलें. येथें अगदीं एक लहान पुस्तक आहे. हें उमर खयाम संबंधीं आहे. हें ४८ पानांचें असून आंगठ्याच्या नखाएवढें आहे. साध्या डोळ्यांनीं यावरील अक्षरें दिसत नाहींत. सूक्ष्मदर्शक यंत्रानींच हें वाचतां येतें.

त्याच्याइतकीच लहान बायबलची प्रत येथें आहे. १४५९ मध्यें छापलेलें एक पुस्तक येथें सांपडतें. याखेरीज जगांतील साऱ्या वर्तमानपत्रांचा व मासिकांचा एक विभाग येथें आढळतो.

या वाचनालयांत अंधळ्याकरितां एक खोली आहे. या ठिकाणीं त्यांना समजेल अशा प्रकारें काढलेलीं पुस्तकें आहेत. तीं येथेंच तयार केलीं जातात. याखेरीज या वाचनालयांत पुष्कळ निरनिराळे विभाग आहेत. ही इमारत बांधण्यास दहा वर्षें व ३ कोट रुपये लागले. हें वाचनालय कोणत्याहि शास्त्राचा सांगोपांग अभ्यास करणाऱ्यांकरितांच आहे. किरकोळ पुस्तकांचा संग्रह येथें करण्यांत येत नाहीं. अशीं वाचनालयें जगाला खरोखरच फार उपयोगी व भूषणभूत आहेत, यांत संशय नाहीं.

## ❀ शालापत्रकाची चढाओढ. ❀

**मागील कोड्यांचीं उत्तरें:**—१ नागपूरकर, पांगारकर, २ विद्याधर. ३ अत्रे, तारा, तारे, तोरो, राऊत, आतार.

**कंसांत बरोबर उत्तरें दाखविलीं आहेत.**

१ विश्वनाथ वासुदेव सप्रे. ( १ )
२ वामन दाजी नांदेडकर. ( ३ )
३ विश्वनाथ गणेश पोतदार. ( २ )
४ कृष्णाजी रामचंद्र देशपांडे. ( ४ )
५ रामकृष्ण नारायण साळी. ( १ )
६ काशिनाथ परशुराम साने. ( ३ )
७ रामचंद्र धोंडो देवळे. ( २ )
८ वैजनाथ गोविंद देशमूख. ( ३ )
९ दे० श्री० धनेश्वर. ( १ )
१० सिताराम विष्णु कुरणे. ( ३ )
११ स्कंद शंकर साने. ( ३ )
१२ गणेश महादेव केळकर. ( ३ )
१३ राजाराम बाबा पोतदार. ( ४ )
१४ शां० पु० नाईक. ( ४ )
१५ श्रीनिवास व्यंकटेश नखाते. ( २ )
१६ राम यशवंत नाईक. ( ४ )
१७ शिवराम गोविंद कुळकर्णी. ( ३ )
१८ रामचंद्र त्रिंबक केणेकर. ( ३ )

कुपन
सर्वांकरितां
डिसेंबर १९२३.

कुपन
मुलांकरितां
डिसेंबर १९२३.

## लहान मुलांकरितां

१ आषाढ वद्य दशमीस चांदणें नसतें, व लग्नेंहि नसतात.

२ बिनवारशी कुत्र्याच्या गळ्यांत पट्टा नसतो व चोर त्याला पोलिसांकडे नेणारहि नाहीं.

३ दुपारीं सिग्नलचा दिवा लावीत नाहींत व लावलाच तर गाडी हिरव्या कंदिलानें न थांबतां तांबड्या कंदिलानें थांबेल.

कंसांत बरोबर उत्तरें दाखविलीं आहेत.

१ अनंत रघुनाथ केळकर. (३)
२ सदाशिव त्रिंबक पुरंदरे. (३)
३ विष्णु रामचंद्र माटे. (३)
४ वसंत वासुदेव वाचासुंदर. (३)
५ महादेव शिवराम जोशी. (२)
६ वामन परशुराम कुंटे. (३)
७ दत्तात्रय रघुनाथ भिसे. (२)
८ वासुदेव त्रिंबक केणेकर. (२)
९ शिवराम गोविंद कुळकर्णी. (२)
१० राम यशवंत नाईक. (३)
११ श्रीनिवास व्यंकटेश नखाते. (३)
१२ रामचंद्र गोविंद धाबळे. (३)
१३ शां० पु० नाईक. (२)

## बक्षिसें.

### सर्वांकरितां.

नं० ४ विद्वत्त्व, कवित्त्व, वक्तृत्त्व.
नं० १३ अर्वाचिन महाराष्ट्र.
नं० १४ रासेलस.
नं० १६ सुभाषित.
नं० ८ निबंध लेखन आणि अनुवाद.

शेवटच्या नंबराची निवड एक चिट्ठी उचलून करण्यांत आली.

### मुलांकरितां

नं. १ लक्ष्मीपूजन.
नं. २ चिमुकलें रामायण.
नं. ६ विद्यार्थ्यांकरितां नाटिका.
नं. ११ ध्रुव चिलिया.
नं. १२ साक्रेटिसचें चरित्र.

हीहि निवड चिठ्या उचलूनच केली आहे.

## नवीं कोडीं

### सर्वांकरितां.

| | |
|---|---|
| वर<br>१५-२-०७<br>७ स. | कोडी<br>७-८-०४<br>९ स. |
| नौ.<br>४-३-१५<br>२ दु. | सराई.<br>२३-८-२१<br>५ स. |
| या.<br>४-३-०२<br>१२ दु. | चूर.<br>२४-२-२२<br>७ स. |

आम्हांला वरील शिक्यांचीं सहा पत्रें पोस्टाकडून आलीं. परंतु त्यांच्यावरील गावांचा शिक्का नीट उठला नाहीं, तर तीं गांवें कोणतीं असावींत हें ओळखा.

### मुलांकरितां.

गत वर्षांच्या शालापत्रकांतील उत्तम ५ गोष्टी तुम्हांला कोणत्या आवडल्या त्या कळवा. गोष्टी सचित्र असल्या तरी कळवाव्यात. ज्याची निवड बरोबर होईल त्याला बक्षीस मिळेल.

॥ ॐ नमः श्रीरामचंद्राय ॥

# आर्यमहौषधालय मु० पो० आंजर्लें.

**कोंकणप्रांतांतील अगदीं ताज्या व शुद्ध वनस्पतींचीं जगत्प्रसिद्ध निर्दोष व रामबाण औषधें.**

**कंदर्पमंजरी पाक**—हा अपूर्व पाक गरिबांपासून तों अमीरउमरावांपर्यंत सर्वांसही अत्यंत उपयोगी असून किंमत माफक ठेविली आहे. यांत मौक्तिक, प्रवाळ लोह, माक्षिक, कस्तूरी, अंबर इ० अत्युच्च गुणकारक पदार्थ असून शिवाय बदाम, पिस्ते, अक्रोड चारोळी, केशर, वेलची, पंजाबी सालममिश्री, सफेतमुसळी, पत्री, गोक्षुर, शतावरी, आस्कंद, वंशलोचन वगैरे (८०) उपयुक्त वनस्पति घातल्या आहेत. यानें पथ्यावांचून गुण येतो. यापासून कोण त्याही कारणांनीं होणारा व कशाही प्रकारचा शुक्रस्राव, नपूंसकत्व, मूळव्याधि, रक्तदूषणामुळें खगरोग, स्त्रियांची धुपणी व गर्भाशयस्थ दोष या भावना त्यांच्या एकंदर उपविकारांसह तत्काल बऱ्या होऊन धातुवृद्धि होते, व शरीर कणखर आणि तेजस्वी बनतें. २० तो० डं० २ रुपये. एकदम ३ डबे घेणारास ५ रुपये.

**स्वर्णधात्री तेल**—हें चारोळी, बदाम, कंकोळ, एला, बहुविध वनस्पतींचीं सत्वें व उपयुक्त तेलें अशा अनेक पदार्थांनीं बनविलें असल्यानें याच्या मर्दनापासून अपस्मार, उन्माद, वेड, चक्कर इ० रोगांस जलद आराम पडतो. केंसांस चोळल्यानें केंस काळे कुळकुळीत, तजेलदार, सडक लांब व मृदु होऊन मेंदु शांत आणि रोगरहित बनतो. यानें मस्तकाचें टक्कल जातें. हें अंगास चोळून स्नान करीत गेल्यानें शरीराचा दुर्गंध जातो. खरूज, गजकर्ण, शिबें, तसेंच तळपाय, तळहात, डोळे व मस्तक यांचा दाह हे विकार खास बरे होऊन निद्रा चांगली येते, आणि नेत्ररोग दुरुस्त होतात. बा० किं० १। रु०

**दंतरक्षक पूड**—ही दांत व हिरड्या यांचे सर्व विकार तत्काल दुरुस्त करून दांत स्वच्छ व मजबूत करण्यांत प्रतिज्ञेची आहे. ड. ६ आणे.

**सुरंगी, मालती, कल्हार, गुलबहार, दणाणा, लक्ष्मीविलास** इ० बादशाही अति उंची अत्तरें व त्याचप्रमाणें गुलाब, हिना, केवडा, चमेली, जाई वगैरे सुगंधी अत्तरें आणि केंसांस लावण्याचीं हरएक प्रकारचीं सुवासिक तेलें माफक दरानें पूर्ण खात्रीचीं मिळतील.

**सूचना:**—वरील औषधें व अत्तरें वगैरे पूर्ण खात्रीचीं असल्यामुळें आज पंचवीस वर्षांत त्यांचा लक्षावधि लोकांस अप्रतिम उपयोग झाला म्हणून त्यांचा नेहमीं फारच खप होत आहे. अनुभवानंतर पूर्ण खात्री पटेलच. औषधें माहितीचे खर्च्यासह रोकीनें अगर व्ही पी नें पाठवूं. प्याकिंग व टपाल खर्च वेगळा. घाऊक घेणारास कमिशन भरपूर. सर्व औषधांच्या आणि आरोग्यरक्षणाच्या माहितीचें सचित्र मोठें पुस्तक देऊं. आमचीं औषधें वगैरे मागविणें तीं खालील बिनचूक पत्त्यावर मागवावीं

**कृष्णशास्त्री बिवलकर, वैद्य.**

नि मा २/१८



# १८९० तील अनुक्रमणिका.


## अ.

पृष्ठ.

...रिअम् ...... ११७
...स्तान (भाषांतर.) ...... १५४
...पेक्षित पाहुणा जे० ए० सा० ...... १०७
...रिकेचे वकील (भाषांतर.) ...... ४६
...नी लाहान प्रवासी (भाषांतर.) ...... ८९
...गाडीला अडथळा रे० ई० एच्० एच्० ...... ६२
...स्ट महिन्यांतील शास्त्रप्रश्नांचीं उत्तरें देणारांचीं नांवें. ...... १६०
...ीं उबविण्याची विलक्षण रीति ...... ९६
...चा कुबडा पाहुणा तारा तुकारामजी ...... ३१
...च्या पिढ्या (भाषांतर.) रे० ई० एस्० ह्यूम्. ...... १६०

## ई.

...री सूत्रानें झालेला एक जपानी सुधारक. रे० ई० एस्० ह्यूम्. ७४

## उ.

...िल्यम केरी (भाषांतर.) शि० म० ...... ३६
...ंदरांला लिहिलेलें पत्र (भाषांतर.) ...... १९

## ए.

एक नवीन वसाहात व तिची सुधारणा. रे० ई० एस्० ह्यूम्. ...... १४९
एका कुत्र्याचें शाहाणपण के० एफ्० ह्यूम् ...... २६
एका तुरुंगांतील व्यवस्था रे० ई० एस्० ह्यूम् ...... १४०
...का मिनिटांत दोनशें टांचण्या ...... ८३
...का हातानें टाळी वाजत नाहीं ...... १२९

## च.

पृष्ठ

चमत्कारिक ले... ...... १६८
चाष पक्षी ...... १६८
चिनी लोकांची शेंडी. के० फे० ह्यूम् ...... ४२।५०
चिनी लोकांविषयीं माहिती रे० ई० एस्०. ह्यूम् ...... ४५

## ज.

जगत्कर्तृत्व त्र्यं० शा० ...... १८४
जगत्पित्याची सेवा एम्. बिसेल. ...... १७३
जमिनीचें व जलाचें पांघरूण ...... १७९
जयपूर रे० ई० एस्० ह्यूम्. ...... १६१।१७८
जुलै महिन्यांतील शास्त्रप्रश्नांचीं उत्तरें देणारांचीं नांवें ...... १६०
ज्जावा बेट व तेथील लोक ...... ३३
ज्योतिःशास्त्रसंबंधी माहिती ज०जा० डि० ११४।१३०।१४७।१७०।१८...

## ट.

टिप् लुइस व त्याचा दिवा. १२।२८।३१।५१।७०।८५।१०१।११९।१३... १५५।१७३।१८१।१९१
टेडीचा धडा (भाषांतर.) ...... १४
टामीचें स्वप्न (भाषांतर.) क्ष० ...... ३

## ठ.

ठीक आहे ...... १६

## त.

तीन तरुण शूर रे० ई० एस्० ह्यूम् ...... १३
त्रिकोणाश्रित प्रचंड पूल ......

## क.

करढोंक पक्षी रे० ई० एस्० ह्यूम्. ...... ४९
करून घेतलेली शिक्षा (भाषांतर.) त्र्यं० जो० शा० ...... ८९
कर्त्तव्यामागून खेळ त्र्यं० जो० शा० ...... १५८
कांगो नदी व आसपासचे लोक ...... ६६
काय असावें बरें? (कविता) ...... ६१
काय हरकत? (भाषांतर.) त्र्यं० जो० शा० ...... ६७
किटि व चिमणीचें गाणें (भाषांतर.) ...... ६१
कुइबेक् शहर रे० ई० एस्० ह्यूम्. ...... १२९
कोण जिंकितो त्र्यं० जो० शा० ...... १५२

## ख.

खतावणी (भाषांतर) त्र्यं० जो० शा० ...... ७३
[redacted]ा परिणाम ...... ६०
...ंधी बा० बो० स० ...... १७७
[redacted] ...... १९१

## थ.

थडग्यांतील फुलें ......
थोडक्याविषयीं विश्वासु (भाषांतर.) रे० ई० एस्० ह्यूम् ...... १

## द.

दंतकथा ......
दाखला रे० ई० एस्० ह्यूम्. ......
दिवळांतील नक्षो (भाषांतर.) ता० शे० गा० ......
दोन रुपयांस विकलेली (भाषांतर.) ......
दोन वनदेवता (भाषांतर.) ......

## ध.

धीट पाळक ......
धैर्यवान लाहान मुलगा ......
... स० ह्यूम्.

## न.

नोटेची मूळ हकी... ......
न्यूयार्क ... य? ......

## प.

पृष्ठ.

पद्य  रा० रा० गोविंद वि० काळे. ........................ ७०
परोपकार ........................................... १६५
पवित्र नाम ......................................... १३५
पशुपक्षीसंवाद  त्र्यं० जो० ............................ १३६
पाजळलेला दीप  (भाषांतर.) जा० ल० म० .........९३।९९
पासिफिक समुद्रांतील बेटें ................................ १
पूर्वेकडील ज्ञानी मागी लोकांविषयीं  ज० जा० डि० ... ९
प्रभु ख्रिस्ताचें येणें  त्र्यं० जो० शा० .................... ८३
प्रभूची कृपा  वा० ल० सा० .............................. ९६
प्रभूसीं सर्वकाळ  (कविता) रे० एस्० वी० फेरबांक. ...... ६८
प्रसंगावधानाचें फळ ..................................... ७७
प्राचीनकालचें एक कलाकौशल्य  के० एफ्० ह्यूम्....... ४
प्रार्थनेची शक्ति  (भाषांतर.) .......................... १६७
प्रीतीचें फळ ............................................ १८६

ब.

बळकट कुत्रा व नाजूक चिमणी  त्र्यं० जो० शा० ......... १०६
बाण उडविणें ............................................ ९७
बालबोधमेव्याची जाहिरात ....................३२।८०।११२
बेनची सत्यावरील निष्ठा  त्र्यं० जोशी. ................. १२६
ब्रिडिझी  रे० ई० एस्० ह्यूम्. ......................... ५४

भ.

भविष्यवाद्यांसंबंधी प्रश्न  के० फे० ह्यूम्. ............... १२८

म.

व कोणी चोरला  (भाषांतर.) ई० एच्० एच्० ... ५८
डाचें झाड व फळें ........................................ ८१
माल्टेभाल  मिस् ई० एस्० लैमन. ..................... १७
मुक्याची साक्ष  (भाषांतर) ............................ १२
मुलांचें संभाषण  रा० रा० गोविंद वि० काळे ............ ६।२३
मुलींची भीति  त्र्यं० जो० शा० ......................... ९२

य.

उत्तर .................................................. १८५

र.

कसा शिकला  (भाषांतर.) ................................ १९२
ड अथवा पाण्यांतील सूक्ष्म प्राणी ....................... ११८

ल.

लांचा खेळ  रा० रा० गो० वि० काळे. ..................... ६३
लाची  त्र्यं० जो० ........................................ ८८
वासी  (कविता) त्र्यं० जो० शा० ........................... ९०
चूक सुधारणें  रे० ई० एस्० ह्यूम्. ..................... ९२

व.

वसंतवर्णन  (कविता) गो० वि० का० .....................
वारीनें मिळविलेला जय  (भाषांतर.).......................
विलक्षण बुद्धि  (भाषांतर.) त्र्यं० जो०....................
विश्वासु कुत्रा  एच्० जी० केळकर..........................
वेडगळ सिड्नि  (भाषांतर.) ...............................

श.

शास्त्रप्रश्न  के० फे० ह्यूम्. ...................३२।४८।१४४।१
शास्त्रप्रश्नांचीं उत्तरें देणाऱ्यांचीं नांवें... ३२।४८।६४।९६।१२८।
शास्त्रसंबंधी भगीरथ प्रयत्न. रे० ई० एस्० ह्यूम्.. ..........
शास्त्रांत वर्णिलेल्या नद्यांविषयीं प्रश्न  के० फे० ह्यूम्........
शास्त्रांत वर्णिलेल्या राजांविषयीं प्रश्न  के० फे० ह्यूम्......
शास्त्रांत वर्णिलेल्या राण्या व राजकन्या यांविषयीं प्रश्न के० एफ्० ह्यूम् ........
शास्त्रांतील कांहीं जनावरांविषयीं प्रश्न  के० फे० ह्यूम्. ... १
शास्त्रांतील गोष्ट ग्रिकेनें हारीला कशी शिकविली (भाषांतर.).
शास्त्रांतील प्रश्न  के० एफ्० ह्यूम्. ..............................८०।
शास्त्रांतील प्रश्न  रे० ई० एस्० ह्यूम्............................ १
शास्त्रांतील बंदिशाळांसंबंधी प्रश्न  के० फे० ह्यूम्..... १६
शास्त्रांतील विधवांसंबंधी प्रश्न  के० एफ्० ह्यूम्. ...... १६
शिंगाचें पुस्तक ........................................ ५६
शेजाऱ्यांवर प्रीति करणें  (भाषांतर.) .................... ११०

स.

सखूनें शिकविलेला धडा  त्र्यं० जो० शा० ................ १११
संधि .................................................. १८६
सभ्यता ............................................... ५७
सर्वच उपयोगी  (भाषांतर.) त्र्यं० जो० शा०............ ७३
सर्व साधारण कायदा.... ................................ ४८
साहजिक सुदैव ........................................ १६७
सुवर्णनियम ........................................... १४३
सूचना .............................................. ११२।१२८
स्फूट विषय............................. १६।४८।११२।१४४।१६०
स्मरणवहीचें भय  (भाषांतर.) .......................... १२७
स्वतंत्रतेचा पुतळा  रे० ई० एस्० ह्यूम्. ................ १२४

ह.

हस्तीची ओळख ........................................ १३
हातोड्यानें स्क्रू बसविणें ................................ १८५
हिऱ्याची आंगठी  (भाषांतर.) ............................ ५१
हृदयाला विश्रांति पाहिजे .................................. ६३

पृष्ठ.

पद्य रा० रा० गोविंद वि० काळे. ........ ७०
परोपकार ........ १६९
पवित्र नाम ........ १३५
पशुपक्षीसंवाद त्र्यं० जो० ........ १३६
पाजळलेला दीप (भाषांतर.) जा० ल० म० ........ १३।९९
पासिफिक समुद्रांतील बेटें ........ १
पूर्वेकडील ज्ञानी मागी लोकांविषयीं ज० जा० डि० ........ ९
प्रभु खिस्ताचें येणें त्र्यं० जो० शा० ........ ८३
प्रभूची कृपा बा० ल० सा० ........ ९६
प्रभूसीं सर्वकाळ (कविता) रे० एस्० बी० फेरबांक. ........ ६८
प्रसंगावधानाचें फळ ........ ७७
प्राचीनकालचें एक कलाकौशल्य के० एफ्० ह्यूम्. ........ ४
प्रार्थनेची शक्ति (भाषांतर.) ........ १६७
प्रीतीचें फळ ........ १८६

ब.

[illegible]बळकट कुत्रा व नाजूक चिमणी त्र्यं० जो० शा० ........ १०६
[illegible]णाण उडविणें ........ ९७
बालबोधमेव्यांची जाहिरात ........ ३२।८०।११२
[illegible]नची सत्यावरील निष्ठा त्र्यं० जोशी ........ १२६
[illegible]डिझी रे० ई० एस्० ह्यूम्. ........ ५४

भ.

[illegible]विष्यवाद्यांसंबंधी प्रश्न के० फे० ह्यूम्. ........ १२८

म.

[illegible] कोणी चोरला (भाषांतर.) ई० एच्० एच्० ........ ५८
[illegible]डाचें झाड व फळें ........ ८१
मार्न्डआल मिस् ई० एम्० लैमन. ........ १७
[illegible]क्याची साक्ष (भाषांतर) ........ १२
[illegible]लांचें संभाषण रा० रा० गोविंद वि० काळे ........ ६।२३
[illegible]लांची भीति त्र्यं० जो० शा० ........ ९२

य.

[illegible] उत्तर ........ १८९

र.

[illegible] कसा शिकला (भाषांतर.) ........ १९२
[illegible]ड अथवा पाण्यांतील सूक्ष्म प्राणी ........ ११८

ल.

[illegible]लांचा खेळ रा० गो० वि० काळे ........ ६३
[illegible]लाशी त्र्यं० जो० ........ ८८
[illegible]वासी (कविता) त्र्यं० जो० शा० ........ ९०
[illegible] चूक सुधारणें कठीण रे० ई० एस्० ह्यूम्. ........ ९२

व.

वसंतवर्णन (कविता) गो० वि० का० ........
वाईनें मिळविलेला जय (भाषांतर.) ........
विलक्षण बुद्धि (भाषांतर.) त्र्यं० जो० ........
विश्वासु कुत्रा एच्० जी० केळकर ........
वेडगळ सिडनि (भाषांतर.) ........

श.

शास्त्रप्रश्न के० फे० ह्यूम्. ........ ३२।४८।१४४।[illegible]
शास्त्रप्रश्नांचीं उत्तरें देणाऱ्यांचीं नांवें... ३२।४८।६४।९६।१२८।[illegible]
शास्त्रसंबंधी भगीरथ प्रयत्न. रे० ई० एस्० ह्यूम्. ........
शास्त्रांत वर्णिलेल्या नद्यांविषयीं प्रश्न के० फे० ह्यूम्. ........
शास्त्रांत वर्णिलेल्या राजांविषयीं प्रश्न के० फे० ह्यूम्. ........
शास्त्रांत वर्णिलेल्या राण्या व राजकन्या यांविषयीं प्रश्न के० एफ्० ह्यम् ........
शास्त्रांतील कांहीं जनावरांविषयीं प्रश्न के० फे० ह्यूम्. ........ [illegible]
शास्त्रांतील गोष्ट प्रिंकेनें हारीला कशी शिकविली (भाषांतर.). ........
शास्त्रांतील प्रश्न के० एफ्० ह्यूम्. ........ ८०।[illegible]
शास्त्रांतील प्रश्न रे० ई० एस्० ह्यूम्. ........ [illegible]
शास्त्रांतील बंदिशाळांसंबंधी प्रश्न के० फे० ह्यूम्. ........ १६[illegible]
शास्त्रांतील विधवांसंबंधी प्रश्न के० एफ्० ह्यूम्. ........ १६[illegible]
शिंगाचें पुस्तक ........ ९६
शेजाऱ्यांवर प्रीति करणें (भाषांतर.) ........ ११०

स.

सरूनें शिकाविलेला धडा त्र्यं० जो० शा० ........ १११
संधि ........ १८६
सभ्यता ........ ९७
सर्वांच उपयोगी (भाषांतर.) त्र्यं० जो० शा० ........ ७३
सर्व साधारण कायदा ........ ४८
साहजिक सुदैव ........ १६७
सुवर्णनियम ........ १४३
सूचना ........ ११२।१२८
स्फूट विषय ........ १६।४८।११२।१४४।१६०
स्मरणवहीचें भय (भाषांतर.) ........ १२७
स्वतंत्रतेचा पुतळा रे० ई० एस्० ह्यूम्. ........ १२४

ह.

हत्तीची ओळख ........ १३[illegible]
हातोड्यानें स्क्रू बसविणें ........ १८[illegible]
हिन्याची आंगठी (भाषांतर.) ........ ६[illegible]
हृदयाला विश्रांति पाहिजे ........ ६[illegible]